# ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात

अर्थात्

१९३९ ते १९४७ या आठ वर्षांतील राजकीय
स्थित्यंतराचा इतिहास

ग्रंथकार

नरसिंह चिंतामण केळकर

★

संग्राहक

काशिनाथ नरसिंह केळकर

प्रथमावृत्ति सन १९५०

किंमत तीन रुपये

प्रकाशक :
**मोरेश्वर रामचंद्र ढमढेरे**
चिटणीस, केळकर–स्मारक–निधि–समिति,
३२२/३ सदाशिव पेठ, पुणें २.

[ या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीचे हक्क केळकर–स्मारक–निधि समितीला दिलेले आहेत. पुढील आवृत्त्यांसंबंधीं सर्व हक्क तसेंच रूपांतर, भाषांतर, उतारे यासंबंधींचे हक्क श्री. काशिनाथ नरसिंह केळकर यांजकडे आहेत. ]

मुद्रक :
**शंकर रामचंद्र दाते**
'काळ' मुद्रणालय,
२००/३ सदाशिव पेठ, पुणें २.

# नि वे द न

दे. भ. कै. तात्यासाहेब केळकर यांना जाऊन येत्या १४ आक्टोबरला तीन वर्षें पुरीं होतील. ह्या तीन वर्षांच्या अवधींत देशांत केवढी खळबळ उडाली ह्याची माहिती सर्वांना आहेच. त्यांच्या प्रतिवर्षीच्या श्राद्धदिनानिमित्त कांहीं तरी स्मारकरूपानें त्यांची स्मृति ताजी ठेवावी ह्या उद्देशानें कांहींना कांहीं कार्य महाराष्ट्रांत चालू आहेच. पहिल्या वर्षाच्या श्राद्धदिनीं श्री. स. वि. बापट यांनीं त्यांच्या आठवणी पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या; दुसऱ्या श्राद्धदिनानिमित्त त्यांच्या कित्येक वर्षांच्या इच्छेस अनुसरून स्मारक-मंडळानें रु. २५००० पुणें विद्यापीठास मिळण्याकरितां विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बाबासाहेब जयकर यांचे स्वाधीन केले. आणि यंदाच्या श्राद्धदिनीं त्यांच्या सन १९३९ पासून सन१९४७ पर्यंतच्या राजकीय लेखांचा हा संग्रह ' ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात ' ह्या नांवानें स्मारक-मंडळामार्फत प्रसिद्ध करण्यांत येत आहे

स्मारक-मंडळाच्या अनेक उद्दिष्टांपैकीं एकच उद्दिष्ट-आणि तें म्हणजे पुणें विद्यापीठास एक लक्ष रुपये कै. तात्यासाहेब यांचे नांवानें देणगी देणें -अंशतः साध्य झालें आहे. स्मारक-मंडळानें आपल्या निवेदनांत कथन केल्यापैकी बाकीचीं दोन उद्दिष्टें म्हणजे सांगली येथील न्यू इंजिनीअरिंग कॉलेजला एक लक्ष रुपये देणें आणि पुण्यांत मध्यवर्ति अशा जागीं केळकर सभागृह एक लक्ष रुपये खर्च करून बांधणें हीं होत. तीं यशाप्रत जाण्याची स्मारक-मंडळास मुळींच शक्यता वाटत नाहीं हें लिहिण्यास खरोखरीच फार दुःख होतें; परंतु ईश्वरी इच्छाच अशी दिसते कीं हीं दोन उद्दिष्टें अंशतः देखील सिद्धीस जाऊं नयेत!

कै. तात्यासाहेब केळकर यांचें सार्वजनिक जाहीर शेवटचें भाषण श्री. धों. कृ. साठे यांचा सन्मान करण्याकरितां टिळक स्मारक मंदिरांत जी सभा झाली तींतील होय. श्री. साठे यांचे परिश्रम इंजिनीअरिंग कॉलेज् काढण्याकरितां खर्च होत आहेत, महाराष्ट्रांतील तरुणांना ह्यापुढें Technical शिक्षण दिल्याशिवाय भागणार नाहीं. आणि श्री. साठे यांचे परिश्रम वांया

जाऊं देण्याइतका महाराष्ट्र निजलेला, झोंपीं गेलेला नाहीं असें आश्वासन त्या सभेंत जमलेल्या सर्व लोकांसमक्ष कै. तात्यासाहेब यांनीं दिलें होतें; ते स्वत: जर जीवमान असते तर हा त्यांचा संकल्प त्यांनीं सिद्ध करून दाखविलाही असता; स्मारक मंडळाच्या शक्तीपलीकडील हें काम आहे असें १९४८ च्या फेब्रुवारीपासून त्यास वाटूं लागलें आहे; शंकराचें धनुष्य उचलून तें आकर्ण ओढून त्याचे तुकडे करण्याचें सामर्थ्य प्रभु रामचंद्रांत एकट्यांतच होतें; इतरांत नाहीं याची जाणीव स्मारक मंडळास पदोपदीं होत आहे. त्यांतूनही असा जर कोणी रामचंद्राचा अवतार निघालाच तर, त्याला अल्पस्वल्प साहाय्य म्हणून आम्हीं वानरसेनेंतील कांहीं लोक तयार आहोंतच.

प्रस्तुतचा लेखसंग्रह ह्यावेळीं प्रसिद्ध करण्याचे प्रयोजनांपैकीं एक प्रयोजन वर सांगितलें आहेच; परंतु दुसरेंही एक प्रयोजन–आणि महत्त्वाचें प्रयोजन–आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रारंभींचा कांहीं काल आनंदाचा, हर्षनिर्भरतेचा गेला; मागोमाग महात्मा गांधींच्या भीषण हत्येमुळें कांहीं काल दु:खाचा आणि विषण्णतेचा गेला; त्यानंतरचा काल अस्थिरतेचा, चिंतेचा असा गेला; देशांतील राजकारणाला कोणता रंग चढणार आणि काय केलें असतां देशावरील अरिष्टपरंपरा टळेल ह्याविषयीं विचार करण्यांत गेला; एका दृष्टीनें धामधुमीचा गेला; दैवी संकटें आसाममधील भूकंपामुळें आणि पंजाबांतील नद्यांच्या पुरामुळें एकामागून एक देशावर कोसळत राहिलीं; महर्घतेचा कळस झाला; निर्वासितांच्या आर्त किंकाळ्यांनीं आणि त्यांच्यावरील भयंकर प्रसंगांनीं आकाश काळेंकुट्ट होऊन गेलें. अद्यापही तें पूर्णपणें निवळलें नाहीं; मजुरांच्या आणि मालकांच्या बेबनावामुळें उत्पादन कमी झालें; अशा सर्व बाजूंनीं देश व्यापून गेला अशा प्रसंगीं सत्प्रवृत्त देशभक्तानें देशाच्या स्वास्थ्याकरितां कसें वागलें असतां ह्या संकटांतून देशाला बाहेर पडतां येईल ह्याचें ज्ञान प्रस्तुतचा लेखसंग्रह नि:पक्षपातबुद्धीनें वाचला असतां लक्षांत येईल.

ह्या लेखसंग्रहांतील लेखांवरून कै. तात्यासाहेब हे लेख लिहीत असतांना परिणतप्रज्ञ झाले होते असें दिसून येईल. लो. टिळकांचे अनुयायी म्हणून किंवा लोकशाही स्वराज्य पक्षाचे एक अध्वर्यु म्हणून किंवा हिंदुमहासभेचे श्रेष्ठ नेते म्हणून पक्षविशिष्ट बुद्धीनें हे लेख लिहिलेले नाहींत; तर जसा एखादा स्थितप्रज्ञ मनुष्य आपल्या घरांतील कलह माहीत असतांना देखील ते कलह मिटवून त्यांतून मार्ग काढण्याकरितां कसें वागलें पाहिजे हें आपल्या कुटुंबीयांना सांगत असतो, उपदेश करीत असतो; त्यांच्या मनावर एखादा मुद्दा विशेष बिंबविण्याकरितां अलंकार उत्प्रेक्षा, उपमा, दृष्टांत इतिहासांतील

गत गोष्टींचे दाखले देत असतो त्याप्रमाणें ह्या सर्व लेखांमधून एक प्रकारची विशेष बुद्धि कै. तात्यासाहेबांनीं ठेविली होती ही गोष्ट अगदीं स्पष्ट होणारी आहे.

देशाच्या स्वातंत्र्याकरितां ज्यांनीं आपले देह झिजविले, कष्ट सहन केले; ज्यांनीं आपलीं हाडें देखील दधीचिऋषीप्रमाणें लोककल्याणार्थ वेचलीं त्या सर्व देशभक्तांना ह्या लेखसंग्रहांत सुमनांजलि वाहिलेली आढळेल. देशाचें विच्छेदन होऊं नये असें वाटत असतांहि एकदां विच्छेदन अटळ असें ठरलें तर तें मान्य करून आतां स्वराज्याचें सुराज्य—रामराज्य—कसें करतां येईल याची अहर्निश चिंता तात्यासाहेबांस लागलेली ह्या लेखसंग्रहापैकीं अनेक लेखांतून दृग्गोचर होते आपल्या पक्षाचे प्रतिस्पर्धी म्हणून कॉंग्रेसला त्यांनीं अधिक्षेपाने धिक्कारलें नाहींच तर उलट त्या कॉंग्रेसचे त्यांनीं गोडवे गाइले; अभिनंदन केलें. महात्मा गांधींच्या कांहीं गोष्टी मान्य नसतांना देखील त्यांच्या महात्मेपणाला मान लवविली; जी राजसत्ता मिळाली तिचा जास्तींत जास्त उपयोग जेणें करून 'पुष्कळांना पुष्कळ सुख' कसें लागेल ह्याच कामीं कसा करतां येईल ह्याचें दिग्दर्शन ह्या संग्रहांतील लेखांवरूनच वाचकांस समजून येईल.

तात्यासाहेब केळकर हे आधुनिक सर्वश्रेष्ठ निबंधकार आहेत असें महामहोपाध्याय पोतदार म्हणतात त्याची प्रतीति ह्या लेखांतील पानापानावरून येईल. कोणताही लेख घ्या; त्याचा सांगोपांग विचार, त्या विषयाची पूर्ण माहिती घेऊन त्याबद्दलचे आधार पाहून नंतर लिहिलेला आढळेल; उगीच कांहींतरी लिहिण्याचें म्हणून त्यांनीं हे लेख लिहिलेले नाहींत; विषयाचा पूर्ण अभ्यास करून त्यांत आपल्या अनुभवाची भर घालून केवळ लोकहितैक दृष्टीनेंच त्यांचे हे सर्व लेख आहेत. हें वरवर लेख चाळणारासहि सहज कळून येईल.

आपल्या पक्षांखेरीज इतर पक्षांतही कांहीं चांगलीं माणसें आहेत, त्यांची संघटना आपल्या संघटनेपेक्षां चांगली आहे इतकें जाणण्याचें आणि तें प्रकट बोलण्याचें तारतम्य तात्यासाहेबांच्या अंगीं होतें आणि ह्या लेखांतून ती गोष्ट वाचकांना पदोपदीं प्रतीत होईल. मनाचा मोठेपणा हा जसा तात्यासाहेबांचा एक विशिष्ट गुण त्याचप्रमाणें दुसऱ्या पक्षाचे गुण प्रामुख्यानें उल्लेखणें हा एक त्यांचा स्वभावविशेष होता; किंबहुना एकाद्या प्रसंगीं ते स्वपक्षापेक्षां इतर पक्षाचेच अधिक गुण वर्णीत असत; इतके कीं त्या पक्षांतील मनुष्य यापेक्षां अधिक वर्णन करूंच शकताना ! ह्याकरितां तात्यासाहेबांवर आमच्या पक्षांतील कांही तरुण, वृद्ध नाराज असत. गेल्या कांहीं

वर्षातील टिळक पुण्यतिथीच्या घटना ज्यांचे ध्यानांत असतील त्यांना ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे.

ज्यानें जें काम केलें त्याला त्या कामाचें श्रेय पुरें देण्यास तात्यासाहेब सदैव तत्पर असत. प्रस्तुत लेखसंग्रहांतील पान ३०१ वर तर त्यांनी ‘ जनाब ! अब देहेल्ली तो बहोत दूर नही है ’ ह्या लेखांत ‘ हिंदुमहासभेला जें कार्य स्वतःला करतां आलें नाही तें कॉंग्रेसने करून दाखविल्यामुळें त्याचें योग्य तें श्रेय कॉंग्रेसला दिलेंच पाहिजे’ असें स्पष्ट लिहिलें आहे. परपक्षाबद्दल केवळ सहिष्णुताच नव्हे तर त्याच्याविषयीं गुणग्राहकता हा तात्यासाहेबांचा गुणविशेष त्यांच्याबरोबरच लोप पावला असें चालू परिस्थितीकडे पाहून म्हणावेंसें वाटतें! हा लुप्तप्राय होणारा गुण जर वाढीस लागला तर राजकारणांतील बराचसा कडवटपणा नाहींसा होऊन एकजुटीनें काम करण्याची प्रवृति उत्तरोत्तर वाढत जाईल.

तात्यासाहेब हे साहित्यसम्राट् होतेच परंतु त्यांचें राजकीय लिखाण देखील किती मौलिक होतें आणि राजकारणपटु म्हणून त्यांचें केवढें मोठें स्थान होतें हें ह्या लेखसंग्रहावरून कळून येईल. इतर पक्षांतील कांही थोर गृहस्थ तात्यासाहेबांना किती मानीत असत हें उच्चपदप्राप्ति झाल्यानंतर ते तात्यासाहेबांचे घरीं जाऊन त्यांचा आशीर्वाद मागत असत यावरून दिसून येईल. त्याचा बोलबाला स्वतः तात्यासाहेब कधींहि करीत नसत. जे गृहस्थ त्यांचेकडे जात ते मोठे आणि स्वतः तात्यासाहेब त्यापेक्षाहि मोठे! परंतु वेळीं अवेळीं त्यांचेबद्दल अधिक्षेपानें बोलण्याची हीन प्रवृत्ति कांहीं महाराष्ट्रीयांत दिसून येते, त्यांनीं जर हे लेख एकदा दिलेल्या अनुक्रमानेच नजरेखालीं घातले तर त्यांचेहि डोळे उघडतील असा विश्वास वाटतो.

तात्यासाहेबांनीं त्यांचे हयातींत अनेकांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यांच्या ह्या लेखसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचें मी धाडस करूं शकत नाहीं कारण तसें करण्याचें मनांत आणल्यास एकनाथ महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें ‘तेणें रत्नखचिताच्या ताटीं। जाण नरोटी ठेविली।’ असा प्रमाद माझ्याकडून होईल आणि तो प्रमाद मीं तात्यासाहेबांचे बाबतींत कसा करीन ?

**मो. रा. ढमढेरे**

१ ऑक्टोबर
१९५०

# संग्राहकाचे चार शब्द

ती. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या राजकीय लेखांचा हा शेवटचा खंड होय. यांत १९३९ ते १९४७ अखेर त्यांचे केसरी–सह्याद्रीमधील निवडक राजकीय लेख, कांहीं भाषणें व मुलाखती दिलेल्या आहेत. हे लेख तारीखवार अनुक्रमानें दिले असल्यानें, या काळाचा इतिहासच आपण वाचीत आहों असें वाचकांस वाटेल. हे सर्व लेख स्वतःच्या सहीवर तात्यासाहेबांनीं केसरी–सह्याद्रींत लिहिले होते. अर्थात् त्यांनीं लिहिलेलें नव्हे असे एक पानहि या पुस्तकांत छापलेलें नाहीं !

आजपर्यंत त्यांचे पुष्कळ लेखसंग्रह मी प्रसिद्ध केले, पण या ग्रंथाइतकी अपूर्वता त्यांत नव्हती. या पुस्तकाच्या अगदीं पहिल्याच पानावर छापलेल्या त्यांच्या व्याख्यानांत "ब्रिटिशांचें राज्य आमच्यावरून खात्रीनें जाणार" असा त्यांनीं जाहीर इषारा दिला होता. तें त्यांचें विधान 'ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात' या अखेरच्या लेखांत शेवटास जाऊन खरें ठरलें. उपक्रम आणि उपसंहार यांची इतकी सुंदर हातमिळवणी फार थोड्या ग्रंथांत आढळेल! हा लेख पुरा केल्यावर ते दोनचार दिवसहि जगले नाहींत. व त्यांचे मृत्यूनंतर, रोमन अंमलाखालील इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात हे दोन लेख सह्याद्रींत प्रसिद्ध करण्यांत आले. त्यांचा जीवितहेतु मुख्यतः राजकारण हाच असल्यामुळें, ज्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध १८९७ पासून १९४७ पर्यन्त, म्हणजे अखंड पन्नास वर्षे त्यांनीं झगडा केला, त्या ब्रिटिश राज्याचा मृत्युलेख स्वतःच्या हातानें लिहून त्यांनीं आपला देह ठेवला! यामुळे त्यांच्या एकंदर जीवनयात्रेवर जो एक कृतकृत्यतेचा ठसा उमटला आहे तो या लेखसंग्रहावरहि उमटल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. त्यांचा शेवटचा लेख पाहिल्यावर या पुस्तकाला वेगळें नांव शोधण्याचेंहि कारण पडलें नाहीं. गिबननें आपल्या रोमन साम्राज्याच्या इतिहासाला हेंच नांव दिलें आहे!

गिबनचा इतिहास प्राचीन काळाविषयीं व संघटित स्वरूपाचा आहे, तर या पुस्तकांतील इतिहास समकालीन असून संकलनात्मक आहे हें खरें, पण भारतवर्षाचा हा इतिहास घडविण्यांत स्वत: लेखकाचे म्हणजे तात्यासाहेबांचे श्रम कांही अंशीं तरी खर्ची पडले होते, हा गिबनच्या इतिहासापेक्षांहि या पुस्तकाचा विशेष म्हणावा लागेल. या दोन्ही इतिहासांत वस्तुविधानाचे औचित्य, समर्पकपणा व प्रतिभा कदाचित सारखीच दिसून येतील. राजकारणासारख्या अस्थिर वादग्रस्त विषयावरहि लिहितांना त्यांचे शब्द एखाद्या तत्वज्ञाला किंवा इतिहासकाराला शोभतील अशा तोलाचे, वजनाचे, अगदीं काटेकोरपणानें वापरलेले असत, याची साक्ष या लेखसंग्रहांतील कित्येक लेख देतील. राजकारणावर लिहिणाऱ्या इतर अनेक लेखकांपेक्षां त्यांच्यांत विशेष गुण असा होता कीं, त्यांच्या राजकीय प्रतिभेला ऐतिहासिक प्रज्ञेची स्थिर टिकाऊ बैठक लाभलेली होती. त्यांनीं सहज एखादें विधान केलें तरी त्याला पोषक असे पांचसात समर्पक दाखले त्यांच्या संग्रहीं असत. म्हणून त्यांनीं लिहिलेला शब्द सहसा फिरवतां येत नसे, किंवा यापेक्षां अधिक चांगला दुसरा शब्द आपण सुचवूं असेंहि वाचकांना वाटत नसे! राजकारणांत त्याचेंच म्हणणें अखेर खरें ठरल्याविषयीं कित्येक वादांची उदाहरणें त्यांच्या पूर्वीच्या लेखसंग्रहांतून काढून देतां येतील. पण तो प्रस्तुत विषय नाहीं.

अस्सल ऐतिहासिक साधनांचा पुरावा या दृष्टीनें, चरित्र किंवा संघटित इतिहासापेक्षांहि अशा लेखसंग्रहाचे मोल मला विशेष वाटतें. "राजकारण हें प्रचलित स्वरूपाचें असलें तरी तें वाऱ्यानें यावें आणि वावटळीनें जावें अशीच कांहीं त्याची हीन योग्यता नाहीं. राजकारणाच्या जर अंतिम व स्थूल परिणामांना महत्व आहे तर ते कोणत्या क्रमानें व पद्धतीनें घडलें या विषयींच्या सूक्ष्म व ऐतिहासिक ज्ञानालाहि महत्व आहे. हें ज्ञान संघटित इतिहासरूप ग्रंथाच्या द्वारें दिलेलें सर्वांत अधिक उत्तम. पण तें न घडेल तर, निदान क्रमवार मूळचे कागद जसेच्या तसे संग्रहित करून प्रसिद्ध करणें हें तरी घडणें जरूर आहे" असे उद्‌गार "गेलीं पांच वर्षे" या लेखसंग्रहाचे प्रास्ताविकांत मी काढले होते, तेच याहि ग्रंथाला लागू आहेत. व या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथ हा प्रत्यक्ष इतिहासाच्या स्वरूपाचा नसला तरी, ऐतिहासिक

अस्सल साधनांच्या दृष्टीनें कालांतरानें वाचकांना कदाचित् इतिहासा-पेक्षांहि अधिक ग्राह्य वाटेल अशी मला आशा वाटते. विशिष्ट विषयापुरतें कां होईना, पण एका अर्थानें हें तात्यासाहेबांचें विस्तृत चरित्रच होय. यांतील अनेक लेख व भाषणें, पूर्वी ऐकलीं वाचलेलीं असल्यास, एकाद्या ध्वनिमुद्रिकेवर आपण प्रत्यक्ष त्यांचेच शब्द पुन: ऐकत आहों, असें वाचकांस वाटल्याशिवाय राहणार नाहीं. निदान या एका कारणाकरितां तरी लेखांची ही संकलनपद्धति मला चरित्र-लेखनापेक्षां अधिक मानवते. असो.

या पुस्तकांत जितके लेख समाविष्ट आहेत तितकेच राजकीय लेख १९३९ ते १९४७ या काळांत त्यांनीं लिहिले असें नाहीं. 'ब्रिटिश साम्रा-ज्याचा अध:पात' हें नांव या पुस्तकाला मुकर केल्यावर या मुख्य विषयाला धरून जितके निवडक लेख घेतां आले तितके घेतले. आणि ग्रंथाच्या पृष्ठ-मर्यादेकडे लक्ष ठेवून बाकीचे बाजूला ठेवले. राजकारण हा शब्द जरी एकच असला तरी त्यांत दुसरे उपविषय पुष्कळ असतात. उदा० हिंदुस्थानचें आर्थिक पारतंत्र्य, व सध्यांची बिकट आर्थिक परिस्थिति यांवरील लेख, महाराष्ट्र विद्यापीठासंबंधी लेख; राजकीय पक्षभेद मिटविण्याची खटपट 'लो. टिळकांचा राजकीय पक्षोपन्यास' हा अप्रतिम लेख केसरींत लिहून त्यांनीं १९४६ सालीं केली होती, अर्थात् तो लेख; येथील एका प्रसिद्ध विमाकंपनींत आर्थिक दुरवस्था झाली ती सांवरण्याकरितां त्यांनीं लिहिलेले लेख, संस्था-निकांनीं संघराज्य स्थापन करावें की विलीनीकरणास मान्यता द्यावी, इत्यादि अनेक प्रश्नांवर त्यांची लेखणी चाललीच होती. ते सर्व लेख द्यावयाचे तर या पुस्तकांत आणखी तीनशें साडेतीनशें पानांची भर पडली असती. याकरितां लेखांतहि मुख्यामुख्य विवेक असा मनाशी कांही ठरवावा लागला. एकाच विषयावर लेखांची कसोशीनें निवड केली असतां ग्रंथांत एक प्रकारची सूत्रबद्धता व वेधकता निर्माण होते. तितकी संकीर्ण लेखसंग्रहांत येत नाहीं.

ब्रिटिश राज्याचा ऱ्हास आणि भारतीय स्वातंत्र्याचा उदय हा अर्थात् एकच विषय समजावा लागेल. तें स्वातंत्र्य प्राप्त होतांना हिंदुस्थानची फाळणी झाली. हिंदुसभा, लोकशाही स्वराज्यपक्ष, नॅशनॅलिस्ट लीग इत्यादि अनेक राष्ट्रीय पक्षांच्या लोकांनीं हिंदुस्थानची फाळणी होऊं नये म्हणून केलेले

दीर्घ प्रयत्न व्यर्थ झाले. आणि महायुद्धांत हिंदुस्थानची जितकी हानी झाली नसेल, तितकी मुसलमानांचे अत्याचार, रक्तपात आणि मालमत्तेचा नाश यांनीं हिंदूंच्या नशिबीं आली ! हिंदुस्थानला स्वातंत्र्य लाभलें पण तें रक्त-लांछित ठरलें. ही सारी भावी विपत्ति टाळतां आली नसती काय ? हा एक इतिहासाचा कूटप्रश्न ठरेल. भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी इंग्रजांशीं करणारीं जबाबदार पुढारी माणसें ज्यावेळीं आपल्या आठवणी पुढें केव्हांतरी लिहितील तेव्हां या प्रश्नावर कदाचित इतिहासाचा अधिक प्रकाश पडेल.

या दृष्टीनें " स्वराज्याच्या मार्गांतील एक अडचण" ही या पुस्तकांत दिलेली विस्तृत लेखमाला वाचकांना फार उद्बोधक वाटेल. आणि प्रत्यक्ष फाळणी होण्यापूर्वी सात वर्षे अगोदर १९४० सालीं त्यांनीं ही लेखमाला लिहिली होती, हें पाहिलें म्हणजे राजकारणांत त्यांना किती दूरचें दिसत असे याचा प्रत्यय येतो! नागपूरचे डॉ. खरे हे व्हाईसरॉयचे कौन्सिलांत असतांना कॅबिनेट मिशन हिंदुस्थानांत आलें होतें. त्यावेळीं पाकिस्तान-विषयक कारस्थानांचा सुगावा त्यांना लागला होता. त्यांनीं एका ठिकाणीं लिहिलें आहे की, "आपला लोभ आवरून जर कॉंग्रेसवाले, केळकरांनीं दाखविलेल्या मार्गानें गेले असते तर, पाकिस्तान न होतांहि देश स्वतंत्र झालाच असता !"

फाळणीइतकें मोठें संकट, की ज्या संकटाची पूर्वी कधी कल्पनाहि नव्हती तें आल्यावर, "फाळणीविषयीं तात्त्विक विचार" या लेखांत मार्गदर्शन करून जे शेष हिंदुस्थान राहिलें त्याच्या "आता सुराज्याच्या व्यवस्थेला लागा" असा त्यांनीं उपदेश केला आहे. फाळणीबद्दल निराश झाले-ल्यांना धीर देऊन त्यांनी म्हटले आहे की, शिवाजीच्या काळीं याहीपेक्षां बिकट परिस्थितींत मोंगलांशी लढून आपण स्वराज्य मिळविलें, त्या काळाची आठवण आपण कां न ठेवावी ? होय, इंग्रजांनीं करूं नये तें केले आणि हिंदुस्थानची दोन शकलें केलीं. पण तुमच्यांत शक्ति असली तर तीं शकलें एकत्र जोडाना ! आणि हें बळ, कांग्रेसपक्ष जमेस धरून, जर हिंदुस्थानांतील कोणत्याच पक्षांत नसेल तर त्याबद्दल नुसतें हळहळून उपयोग काय ? 'सिद्धस्य गतिः चिंतनीया ' हेंच खरें. हाच राजकारणांतील वास्तववाद. आणि हा

वास्तववाद,जहाजाला दोरी बांधून समुद्राच्या तळाशी रुतलेल्या नांगराप्रमाणें, राजकारणी मनुष्याच्या अंतरंगांत सहज स्वभावसिद्ध रीतीनें वसत असतो. संकटाच्या लाटा आणि वादळे यांनी राजकारणाच्या नौकेला कितीहि हेलकावे बसोत. पण दोरी खेंचून तिच्यावरचा ताण पुरा झाला की, जहाजाला तो नांगर रोखून धरतो. बुडूं देत नाहीं !

हिंदी स्वातंत्र्यासंबंधानें 'शेवटचें लढाऊ जहाज ' या गोष्टींत त्यांनीं वीस वर्षांपूर्वी वर्तविलेलें एक ऐतिहासिक राजकीय भविष्य आश्चर्यकारक रीतीनें कसें खरें ठरलें, त्याबद्दल परिशिष्टांत उल्लेख केला आहे. हिंदी स्वातंत्र्य ही आज सिद्ध वस्तुस्थिति असली तरी तें प्रत्यक्ष मिळे-पर्यंत, तें कसें मिळणार, किंवा मिळणार की नाही हा एक कूटप्रश्नच होता. थेट दादाभाई नौरोजी किंवा लोकहितवादी यांचेपासून तों आजच्या समाज-वादी पुढाऱ्यांपर्यंत, बुद्धिमान लोक आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून याच कूट-प्रश्नाचें उत्तर काढण्यांत गुंतले नव्हते काय? गिबनचा इतिहास पूर्वी कॉलेजांत असतांना त्यांनीं केव्हा तरी वाचला होता. पण १८९९ सालीं तसेंच १९११ सालीं त्यांनीं याच विषयावर मराठ्यांत अग्रलेख लिहिलेले आढळ-तात. त्यावरून ही कल्पना त्यांच्या मनांत फार वर्षांपासून वावरत होती असें दिसतें. केवळ शारीरिक बळानें किंवा क्रांतिवादाचा आश्रय करून इंग्रजांचा पराभव होणें ही दुरापास्त गोष्ट आहे. पेशवाई बुडण्याचे वेळीं आपण व इंग्रज यांत जितकें अंतर होतें त्यापेक्षां हल्ली तें शेंकडों पट अधिक वाढलें आहे. म्हणून साम्राज्याच्या लोभाला लागलेलें इंग्लंडच संकटांत येणें आणि हिंदुस्थानावरचे पाश दूर करण्याची त्याला बुद्धि होणें हीच गोष्ट खरी. हा कांहीसा दैववाद वाटेल. पण तो दैववादहि इतिहासाच्या ज्ञानावरच अधि-ष्ठित आहे. अगदीं अघटित किंवा अशक्य वाटणाऱ्या गोष्टी देखील इति-हासांत पूर्वीं घडलेल्या आहेत. रोमन साम्राज्य बुडालें, नेपोलियनचें साम्राज्य बुडालें, शेकडो वर्षे अनियंत्रित सत्ता भोगलेल्या रशियन झारची सत्ता संपु-ष्टांत आली. तशीच इंग्रजांच्या साम्राज्यालाहि ओहोटी लागेल असें अनुमान कां करूं नये ? १९२९ साली यवतमाळच्या वऱ्हाड प्रांतिक परिषदेंत अध्यक्ष म्हणून त्यांनी जें भाषण केलें त्यांत वरील युक्तिवाद करून, स्वत: इंग्लंड रोमन अंमलांतून कसें मुक्त झालें त्याची आठवण करून दिली होती. ( समग्र केळकर खंड ४. पृष्ठ ७४८ पहा ).

१९२७ सालीं निपाणी येथे श्री व्यंकटेशाचे देवालयांत 'राष्ट्रीय चळवळ' या विषयावर त्यांचें व्याख्यान झालें होतें त्यांत त्यांनी म्हटलें होतें--

"अिंग्रज आपल्या आरमारी सामर्थ्याच्या बळावर आज जगभर धिंगाणा घालतो आहे, पण या आरमारालाच पायबंद बसून घरचें संभाळताना पुरेवाट अशी पाळी केव्हा तरी येणारच नाही असें थोडेंच आहे? अशी गोष्ट खुद्द अिंग्लंडच्या अितिहासांत पूर्वी घडलेली आहे. पूर्वी रोमन लोकांनी अिंग्लंड जिंकून या अिंग्रजांना पांचशे वर्षे आपल्या टांचेखाली ठेवलें होतें. त्याच रोमन लोकांवर रानटी गॉथ लोकांनी स्वारी केली असतां आपलें घर सांभाळतां सांभाळतां पुरे होऊन त्यांना अिंग्लंडास असा खलिता पाठवावा लागला की, "अिकडची सत्ता संपुष्टांत आली आहे, तेव्हा सर्व शिपाईप्यादे व चीजवस्त अिकडे आणा. अिंग्लंडचें राज्य तिकडचे तिकडे राहू दे!" हिंदुस्थानच्या व्हाईसरॉयलाहि असा एखादा खलिता विलायतेहून येण्याची वेळ अघटित घटनेने अिंग्लंडवर कधी येणारच नाही असें कोणी सांगावें? मनुष्यशक्तीप्रमाणे साम्राज्यसत्तेलाहि अंत आहेच, हें कांही मार्मिक व शहाणे अिंग्रज लोकहि मानतात. सत्तेच्या अजिक्य, अफाट व दुर्दम पसाऱ्यांतहि त्याचा नाशक्षण हा प्रज्ञाप्रतिष्ठित विवेचकाला दिसत नसतो असें नाही. अनेक बादशाह्यांची घडामोड झालेल्या दिल्लीच्या वास्तूप्रमाणेच लंडन शहराचे भावी वर्णन एखाद्या भविष्यवाद्याप्रमाणे लॉर्ड मेकॉले याने एके ठिकाणी केलें आहे. तो म्हणतो, कोणी सांगावे, उद्या केव्हा तरी अशी वेळ येईल की, सर्व साम्राज्याच्या प्रचंड घडामोडींचें एके वेळी अधिष्ठान असलेलें हें लंडन शहराचें वैभव नामशेष व स्मृतिशेष होईल; व एखाद्या पडक्या भिंतीवर किंवा टेकडीवर उभा राहून एखादा कुतूहलप्रिय व जिज्ञासू प्रवासी बोट दाखवून म्हणेल–'हो, येथेच ती ब्रिटिश साम्राज्याच्या पार्लमेंट सभेची अिमारत असावी!' (समग्र केळकर :खंड ४, पृ. ७२६ पहा.)

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल अशी एखादी उज्ज्वल कल्पना मनांत वावरत असणें हें जगाच्या इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास आणि प्रतिभा यांचें लक्षण आहे. गरुडपक्षाप्रमाणें त्यांना राजकारणांत फार दूरचें दिसत असे. पण

त्याचवेळीं व्यावहारिक राजकारणाची त्यांची दृष्टि सुटत नसे. प्रसिद्ध इंग्रजी म्हणीविरुद्ध एकेक वृक्ष आणि समग्र वृक्षारण्य हीं दोन्हीहि ते पाहूं शकत. अलीकडचें उदाहरण द्यावयाचें तर, १९४० च्या ऑगस्टमध्यें लोकशाही-पक्षाच्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी भाषण केलें होतें. सरकारच्या मनांत जर स्वराज्य देण्याचें खरेंच असेल तर, या युद्धकाळांत त्याचें अगदीं वेळापत्रक न ठरवितां आलें तरी निदान क्रमपत्रक ठरवितां येईल; असें सांगून सरकारने काय केलें पाहिजे याबद्दल कलमवार बारा मुद्दे मांडले होते. (पृ.७२–७३ पाहा.) व हेच त्यांनी १९४३ च्या सप्टेंबरांत "हा कावा आम्हाला समजतो" या लेखांत उद्‌धृत केले होते. पुढे प्रत्यक्ष स्वराज्य मिळालें तें काय क्रमाने हें ज्यांनी पाहिलें त्यांना या जुन्या लेखाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं. मुंबईचे श्री. आ. गो. दातार यांनीं मुद्दाम केसरींत लेख लिहून त्यांत म्हटलें होतें कीं, "सरकारने काय केलें पाहिजे याबद्दल बारा मुद्दे कै. केळकर यांनी वरील लेखांत लिहिले होते. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ब्रिटिश मजूर सरकारने हिंदुस्थानच्या बाबतींत गेल्या वर्षापासून जें धोरण स्वीकारलें तें जणु काय या लेखाचें पान फाडून त्याप्रमाणेंच थोड्याबहुत फरकाने अमलबजावणी करण्यास व्हाईसरॉय यांस सूचना दिली कीं काय असा भास होतो. हिंदी राजकारणाची नाडी कै. केळकर यांस किती बरोबर उमगली होती हें त्यांच्या वरील लेखावरून उघड होतें."

एक गोष्ट मात्र माझ्या नेहमी मनांत येते ती ही की, हिंदी राजकारणांत तात्यासाहेबांचें निश्चित स्थान काय याची आजच्या पिढीतील लोकांना नीटशी कल्पना नाहीं. एका अर्थानें ही गोष्ट अगदी साहजिक आहे. याचें कारण असें की त्यांचें राजकीय कार्य पन्नास वर्षें म्हणजे दोन पिढ्यांना व्यापून उरेल इतक्या विस्तृत कालखंडावर विभागलेलें होतें, मग एका पिढींतल्या लोकांना त्याची नीटशी कल्पना कशी येईल ? समुद्राला मिळणाऱ्या गंगेच्या विस्तीर्ण मुखाजवळ उभे राहणाराला दूर उंच पहाडांत अदृश्य रीतीनें वाहणाऱ्या गंगोत्रीची कल्पना न यावी हें साहजिकच आहे. पण आज पन्नाशी किंवा साठीच्या घरांत जीं माणसें आहेत त्यांना, १९१७ सालीं लखनौ कांग्रेसने स्वराज्याची मागणी करण्यापूर्वी होमरूल लीग स्थापून लो. टिळकांचें

बरोबरीनें श्री. केळकर यांनी काय कार्य केलें होतें तें माहीत आहे. खुद्द महात्मा गांधी आणि कांग्रेसपक्षांतील अनेक लोकांना याची जाणीव होती. कै. महादेवभाई देसाई यांच्या डायरींत म. गांधींनी संभाषणांत श्री. केळकरांचा उल्लेख ता. १५-१०-१९३२ रोजीं केला आहे तो असा :- गांधीजी म्हणाले, "केळकरांनी टिळकांची गादी संभाळली हें खरेंच. त्यांनी केसरी चालविला, वाढविला, तो इतक्या मर्यादेपर्यंत की, मंडालेच्या तुरुंगांतून टिळक परत आले ते परत त्या गादीवर बसले आणि जणू आपण देशाबाहेर कोठे गेलोंच नव्हतों अशा रीतीनें त्यांनी ती गादी चालविण्यास सुरवात केली. टिळकांनी लागलीच कांग्रेसचा कबजा घेतला आणि होमरूलची चळवळ सुरू केली. या साऱ्याचें श्रेय केळकरांना आहे !"

कांग्रेसचे माजी अध्यक्ष डॉ. पट्टाभि सितारामय्या यांनीं ता. २० ऑगस्ट १९४८ रोजीं श्री. केळकर यांचेबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत. ते असे : " स्वराज्यांत मंत्री, पंतप्रधान, परराष्ट्रीय वकील अगर राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी त्यांना पुरेसें दीर्घायुष्य लाभलें नाही; परंतु होमरूल लीग, होमरूल मिळविण्यासाठी झालेली नंतरची चळवळ, आणि त्यापुढील स्वराज्य आणि संपूर्ण स्वातंत्र्य, अशा चढत्या क्रमानें झालेल्या आंदोलनांचा पाया, त्यांनीच १९१६ पासून केलेल्या कार्यामुळे घातला गेला. स्वातंत्र्य-युद्धांतील अखेरच्या कालखंडांतील सेनापतीशीं त्यांचे विचार तंतोतंत जमले नाहीत, तथापि, जेव्हां आरंभींच्या झगड्याचें तोंड लागलें तेव्हा युद्धाचा आराखडा आणि युद्धाचे डावपेंच त्यांच्याच आंखणीप्रमाणे लढविले गेले.कारण त्या वेळीं लोकमान्य हे अधिकारतः सेनापति होते तरी युद्धविधानप्रमुख ( चीफ् ऑफ् दि स्टाफ) केळकरच होते. लोकमान्य संयोजक ( आर्किटेक्ट ) असले तरी केळकर हेच प्रत्यक्ष रचनाकार ( अेंजिनियर ) होते. त्यांनी ज्या कलामंदिराचे नकाशे, अंदाज वगैरे तयार करून नीलमानचित्रें देखील काढून ठेविलीं होतीं, तें कलामंदिर शेवटी संपूर्ण झालें आहे. इतरांच्या हातून त्याची पूर्तता झाली असली तथापि त्याचा नमुना त्यांनीच कल्पिला होता; त्यांचें नांव चिरंजीव होऊन राहील यांत शंका नाही. "

असो. हे उतारे आणखी वाढवीत नाहीं. अभ्यासकांच्या सोईकरितां ते दिले, अहंकारबुद्धीनें दिले नाहींत. हिंदी स्वातंत्र्याकरितां सारा जन्मभर त्यांनीं आपली लेखणी व वाणी श्रमविली.. पण तें स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर, 'मीं अमुक केलें' हा शब्द कांहीं त्यांनीं उच्चारला नाहीं. इच्छामरणी भीष्माचार्याप्रमाणें अंतर्बाह्य पूर्ण समाधान, शांतता आणि निरहंकार वृत्ति

त्यांनीं अखेरीस स्वीकारली होती. म्हणून कोणत्याहि अहंकार बुद्धीला वळी पडून, राजकारणांत त्यांचें अमुक एक म्हणणें इतरांपेक्षा खरें ठरलें, अशा विधानानें हा लेखसंग्रह मी दूषित करूं इच्छित नाहीं. त्यांनी लिहिलेलें बहुतेक सर्व वाङ्मय आतांपर्यंत प्रकाशित झालें आहे. अभ्यासी वाचकांनीं त्यावरून स्वतःचें हवें तें मत बनवावें !

प्रस्तुत लेखसंग्रहाची जुळणी मी एकदोन वर्षांपूर्वीच करून ठेवली होती. त्यांचें कांहीं अपुरें राहिलेलें ललितवाङ्मय मी सह्याद्रि मासिकांत प्रसिद्ध केलें. तथापि त्यांचें निबंध वाङ्मय हेंच मुख्य असल्यामुळें, 'निबंध-मालाकार चिपळूणकर' यांजप्रमाणें "निबंधकार केळकर" या नांवानें काढतां येईल अशी एका आटपशीर ग्रंथमालेची योजना मी मध्यंतरी मनाशी आंखली व साधनांची अनुकूलता जमेल त्याप्रमाणें इतर अवशिष्ट वाङ्मया-प्रमाणें हा लेखसंग्रहहि पुढे मागें त्या ग्रंथमालेंत प्रसिद्ध करणार होतों. पण तात्यासाहेबांच्या साहित्यविषयक वाङ्मयापूर्वी हें राजकीय लेखसंग्रहाचें पुस्तक निघण्याचा योग अगोदर लाभला याचें श्रेय मात्र, केळकर–स्मारक–मंडळाचे उत्साही चिटणीस व तात्यासाहेबांचे एक निष्ठावंत अनुयायी श्रीयुत मोरेश्वर रामचंद्र ऊर्फ आण्णासाहेब ढमढेरे वकील यांनाच दिलें पाहिजे. त्यांचा राजकीय लेखसंग्रह प्रकाशित करण्यास केळकर–स्मारक–मंडळानेंच पुढे यावें, याहून अधिक औचित्य तें कोणतें ? पुस्तक प्रकाशनाची सर्व जबाबदारी स्मारक मंडळानें पत्करल्यामुळें, या पुस्तकाच्या संपादनाचें काम मला निर्वेधपणानें करतां आलें. काळ मुद्रणालयांत श्री. सामाराव दाते यांनीं हें पुस्तक त्वरेनें सुबक छापून दिलें. श्री. शंकरराव भिडे यांनीं तात्यासाहेबांचा उत्कृष्ट फोटो दिला. व श्री. य. ग. वझे यांनीं पुस्तकावरचें मुखपृष्ठ कल्पकतेनें तयार करून दिलें. या सर्वांचें सौहार्द व आत्मीयतेचें सहकार्य नसतें तर हें पुस्तक वेळेवर वाचकांचे हातीं पडणें केवळ अशक्य होतें. कसेंहि असो. ती. तात्यासाहेबांच्या पश्चात् कां होईना, त्यांच्या एका उत्कृष्ट राजकीय लेखसंग्रहाचें काम हातावेगळें होत आहे याबद्दल समाधान वाटतें. पंच महाभूतांचें ऋण त्यांना परत देऊन अनृणी झालेला कै. तीर्थरूपांचा आत्मा या वाङ्मयसेवेनें संतोष पावो !

पुणें, दि. १।१०।५० **काशिनाथ नरसिंह केळकर**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ जागतेपणचें स्वप्न | १ |
| २ राष्ट्रद्वेषाच्या व्रताचें उद्यापन | १० |
| ३ जर्मन पंडित व इतिहासशास्त्र | ४७ |
| ४ सात वर्षांतील राजकीय घडामोडी | ६३ |
| ५ हा पहा डोमिनियन स्टेटसचा एक नमुना ! | ७५ |
| ६ डोमिनियन स्टेटसचा आढावा | ८२ |
| ७ स्वराज्याच्या मार्गांतील एक अडचण | ९४ |
| ८ प्रवाही राजकारण | १५९ |
| ९ आधी स्वराज्य की आधी राष्ट्रीय सैन्य ? | १७० |
| १० तुरुंगांत जाण्यापेक्षा सैन्यांत शिरा ! | १७८ |
| ११ ऑ. इं. नॅशनॅलिस्ट परिषद | १८४ |
| १२ हा कावा आम्हाला समजतो ! | १९३ |
| १३ हिंदुमहासभा व स्वराज्य | २१५ |
| १४ दोन मुलाखती | २३० |
| १५ अखंड हिंदुस्थान परिषद, मुंबई | २४२ |
| १६ दक्षिणी संस्थानांचा संघ ? | २५० |
| १७ कोण कुणाला जुलुमानें बाटवतो ? | २५४ |
| १८ महाराष्ट्र प्रांतिक हिंदु परिषद, बार्शी | २५७ |
| १९ लहरी ऐतिहासिक घटना | २६० |
| २० सुभाष बोस यांस– | २८३ |
| २१ जनाब ! अब देहेल्ली तो बहोत दूर नही है ! | २८९ |
| २२ ब्रिटिश साम्राज्याचा ऱ्हास | ३०६ |
| २३ फाळणीविषयी कांही तात्विक विचार | ३२३ |
| २४ आतां सुराज्याच्या तयारीला लागा | ३३९ |
| २५ रोमन अमलाखालचें इंग्लंड | ३५७ |
| २६ ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात | ३६२ |


## परिशिष्ट


हिंदी स्वातंत्र्याचें भविष्य खरें ठरलें !



# ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात

## १. जागतेपणचें स्वप्न

( केसरी ता. २९ ऑगस्ट १९३९ )

[ "माझी अशी पक्की खात्री आहे कीं, ब्रिटिशांचें राज्य आमच्यावरुन खास जाणार, हें मी आततायीपणानें किंवा सूडबुद्धीनें बोलत नसून अगदीं विचारपूर्वक बोलत आहे !" असे उद्गार शनिवार ता. २६ रोजीं सायंकाळीं 'जागृतावस्थेंतील स्वप्न' या विषयावर गायकवाड वाड्यांतील गणपतीपुढें व्याख्यान देतांना श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं काढले. आणि योगायोग असा कीं, हें व्याख्यान झाल्यानंतर एकाच आठवड्यांत दुसऱ्या महायुद्धाला युरोपांत सुरुवात झाली ! ]

श्री. केळकर आपल्या भाषणांत म्हणाले, 'आजच्या नियोजित विषयावर बोलण्यापूर्वी मला एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे. तो प्रथम करून मग मी माझ्या विषयासंबंधानें बोलणार आहे. मुंबईस प्रसिद्ध होत असलेल्या 'प्रमोद' नांवाच्या साप्ताहिकांत मजसंबंधी विपर्यस्त मजकूर प्रसिद्ध झालेला माझ्या नजरेस एका गृहस्थांनी आताच आणून दिला. त्या पत्रांत असें एक विधान केलें आहे कीं, 'श्री. केळकर यांना कांग्रेसमध्ये स्थान मिळेना म्हणून ते हिंदुमहासभेंत शिरले.' हें विधान करण्यापूर्वी लेखकानें असा विचार करावयास पाहिजे होता कीं, केळकरांनी हिंदुमहासभेचा जो स्वीकार केला तो कांग्रेसमधून फुटून निघण्यापूर्वीपासून केलेला आहे. हिंदुमहासभा ही विशेष रीतीनें हिंदूंचें हित पाहणारी आहे हें त्या संस्थेच्या नांवावरूनच लक्षांत येतें. प्रथम राष्ट्रीय सभेचें स्वरूप राष्ट्रीय होतें तोंपर्यंत हिंदुमहासभा धार्मिक व सामाजिक विषयांकडेच लक्ष देत होती; परंतु अलीकडे

राष्ट्रीय सभा मुसलमानधार्जिणी व हिंदुहितविरोधी झाल्यामुळें हिंदूंच्या संरक्षणाकरिता महासभेला राजकीय चळवळहि हातीं घ्यावी लागली आहे.

फ्रेंच रहातात तो देश फ्रान्स तसा हिंदु रहातात तो देश हिंदुस्थान असें सावरकर म्हणतात यांत तरी गैर काय आहे ? हिंदूंचा हिंदुस्थान म्हटलें तरी इतर धर्मीयांना तेथे रहाण्याचा हक्क नाही असें सावरकर देखील म्हणत नाहीत. उलट त्या लोकांच्या धर्म संस्कृती भाषा इत्यादिकाला योग्य संरक्षण देण्यांत आलें पाहिजे असेंच ते सांगत असतात.

काँग्रेस अगर तत्सम संस्था ही अशी असावी कीं ज्यांत सर्वांचा समावेश झालेला आहे. या दृष्टीने कांग्रेस ही केव्हाहि हिंदुमहासभेपेक्षा श्रेष्ठ; पण आज तीं निर्दोष नाही. काँग्रेस जर आपलें पक्षपाती धोरण सोडील, सर्वांना राजकारणांत एकत्र माप लावील, मुसलमान–धार्जिणेपणा न दाखवील, व धर्मकारण आणि राजकारण यांची गल्लद न करील तर ती केव्हाहि श्रेष्ठच ठरेल. सारांश, कांग्रेसमध्ये स्थान मिळेना म्हणून केळकर हिंदुमहासभेंत शिरले हें म्हणणें सर्वांशीं खोटें आहे. त्याचप्रमाणे 'केळकरांना जसें काँग्रेसमध्ये स्थान नाही तसेंच हिंदुमहासभेंतहि नाही' हेंहि 'प्रमोद'-कारांचें म्हणणें सत्याला धरून नाही. कलकत्ता येथे भरणाऱ्या जातीय निवाडा विरोधी परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयी अणे यांच्यामार्फत प्रथम मलाच निमंत्रण आलें होतें. पण मी तें प्रकृतीच्या कारणाने नाकारलें ही गोष्ट निराळी. आज जें मी म्हणेन तें महासभा करील अशी मला खात्री आहे. यावरून 'प्रमोद'कारांचें म्हणणें किती विपर्यस्त आहे हें लक्षांत येईल.

## खरा क्रांतिवादी कोण ?

असो; मजवर दुसरा एक आक्षेप असा घेण्यांत आला आहे कीं केळकर मवाळ आहेत. कारण मी बेछूट क्रांतिवादी नाही. 'प्रमोद' पत्राचे संपादक स्वतःला क्रांतिकारक म्हणवून घेतात यांत आश्चर्य करण्यासारखें कांही नाही. पण त्यांच्या दृष्टीने पाहतां लो. टिळक, लाला लजपतराय, देशबंधु दास हे देखील मवाळ ठरतील; कारण यापैकीं कोणीच 'क्रांती'ची

भाषा बोलत नव्हते ! स्वतःला क्रांतिवादी म्हणविणारे तोंडाने वाटेल तसे जहाल विचार बोलतात, पण त्यांच्या बोलण्यांत व कृतींत मेळ नसतो एवढेंच आमचें म्हणणें. शाब्दिक क्रांतिवाद कोणालाहि करतां येतो. ' जाळिन पोळिन नाशिन नेइन सर्व लया ' असें ओरडून बोलणें सोपें आहे. पण तें प्रत्यक्ष कृतीत उतरवितो तोच केव्हाहि वंदनीयच ठरेल.

> राजगुरु, तळेगांवचे पिंगळे हे खरे क्रांतिकारक होत. गाजावाजा न करता त्यांनी क्रांतिकारक कार्य केलें व त्यापायीं प्राणाहुति दिली. हे हुतात्मे खरे थोर क्रांतिकारक आणि म्हणूनच वंदनीय. मी स्वतः स्वातंत्र्याचा चहाता आहे. मला स्वातंत्र्य हवें आहे. अगदी निर्भेळ स्वातंत्र्य पाहिजे आहे. हेंच आमचें खरें ध्येय. आम्ही आमच्या हिशेबवहींत ब्रिटिश राष्ट्राच्या नांवें एकदाच स्वातंत्र्य असें लिहून टाकलें आहे. तें सरकारकडून आम्हाला पुरेपूर वसूल करावयाचें आहे.

असें असूनहि आम्ही 'तूर्त' वसाहतीचें स्वातंत्र्य चालेल असें म्हणतों याचा अर्थ आम्ही तेवढ्यावर कायमचे संतुष्ट आहों असा मुळीच नाहीं. डोमिनियन स्टेटस किंवा वसाहतीचें स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याच्या मार्गांतील एक टप्पा आहे. ती एक मधल्या एका मुक्कामाची जागा आहे इतकेंच.

दिल्लीला निघालेला मनुष्य मध्यंतरीं थांवतोच कीं नाही ? याचा अर्थ त्यानें दिल्लीला जाण्याचा विचार सोडला असें मुळीच होत नाही. दिल्लीच्या वाटेवरचा मुंबई हा एक पहिला टप्पा आहे. कोणी खवचटपणाने जर त्याला असें विचारू लागला कीं, ' का हो! तुम्ही दिल्लीला ना जाणार होता! मग येथेच कां थांबला?' तर त्यावर तो असें उत्तर देईल कीं, 'होय दिल्लीलाच चाललों आहे वाटेवर मुंबईला उतरलों आहे,' या दाखल्यांत सांगितल्याप्रमाणें मीहि टीकाकारांना असें उत्तर देईन कीं 'स्वातंत्र्याकडेच चाललों आहे. वसाहतीचे स्वराज्यावरून जातो आहे' म्हणजे तो एक वाटेंतला मुक्काम आहे, शेवटचा नव्हे. यांत मवाळपणा कोठे झाला? ज्यांना कांहीच करावयाचें नाही त्यांनी एकदम संपूर्ण स्वातंत्र्याच्या गप्पा माराव्या. कारण तशाने इतर कोणालाहि मवाळ ठरविता येतें!

माझा स्वभाव जेवढें आपल्या हातून होईल तेवढेंच बोलण्याचा असल्यामुळे मला बोलघेवड्या चळवळ्यांसारखें हवें तसें बडबडता येत नाही. आज आम्हाला स्वातंत्र्याची तहान लागलेली आहे. पण एखादें कुळ कर्ज फेडण्याकरिता पदरांत रोख रक्कम घेऊन सावकाराकडे आलें कीं सावकार व्यवहार म्हणून पांच–दहा रुपयांची त्याला सूट देतो. त्याप्रमाणें उद्यां सरकार जर आपले नांवें पडलेली बाकी फेडण्याकरिता आमच्याकडे डोमिनियन स्टेटस घेऊन आलें तर तें मी स्वीकारीन. कारण त्यांतून पुढे स्वातंत्र्य निर्माण व्हावयाचेंच असतें. मला वाटतें काँग्रेस देखील तें तसें स्वीकारील. काळ्या–गोऱ्याचें 'साम्राज्य चालेल' असें म्हणणाऱ्या लो. टिळकांना तुम्ही मवाळ म्हणाल काय ? जो राष्ट्राचा नेता असतो त्याला वाटेल तसें बकून चालत नाही. स्वराज्य हा शब्द उच्चारणें तर दूरच राहिलें पण त्याची नुसती पुसट कल्पना देखील जनतेला सांगतांना टिळकांना कसा 'तारेवरचा नाच' करावा लागत असे हें त्यांचे त्या वेळचे लेख आपण वाचा म्हणजे कळेल. सुदैवानें आता तशी स्थिति राहिलेली नाही. मनाला वाटेल तें उघड बोलता येऊ लागलें आहे. असो. मजवर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांना मला केव्हा तरी एकदा उत्तरें द्यावयाचींच होतीं तीं मी या प्रसंगीं दिलीं. आता मी माझ्या मुख्य विषयाकडे वळतों.

आजचा माझा विषय जागृतींतील स्वप्न असा आहे. हा विषय मानसशास्त्रांत येणारा असला तरी मी तो त्याला धरून सांगणार नसून राजकीय भूमिकेवरून सांगणार आहे. स्वप्नें दोन प्रकारचीं असतात. एक झोपेंत पडणारें स्वप्न. हें अनैच्छिक असतें. तसेंच तें विसंगतहि असतें. एखाद्या लहान मुलानें टाइपरायटरवर बसून कागद टाईप केला म्हणजे त्यांत जितपत सुसंगतता दिसेल तितपतच सुसंगतता झोपेंत पडलेल्या स्वप्नांत असते. म्हणजे एका दृश्याचा दुसऱ्या दृश्याशीं काडीइतकाहि मेळ नसतो. स्वप्नाचा दुसरा प्रकार म्हटला म्हणजे जागेपणीं पडलेल्या स्वप्नाचा. अशीं स्वप्नें क्वचित तंद्रीत आपोआप पडतात. पण तीं पाडूनहि घ्यावीं लागतात. हीहि एक कला आहे आणि ती शिकविण्याची वेळ आतां आली आहे. स्वप्नाच्या पहिल्या आणि दुसऱ्या प्रकारांत असा एक भेद आहे कीं

दुसऱ्या स्वप्नांत सुसंगतता आणतां येते. लघुकथा, नाटक, कादंबरी यांत रंगविलेलीं चित्रें हीं एक प्रकारचीं जागृतीतलीं पाडून घेतलेलीं स्वप्नेंच नसतात का ? पण त्यांत सुसंगतपणा असतो. कारण लेखक तीं रंगवितांना त्या त्या मूर्ती, प्रकृती व प्रसंग आपल्या डोळ्यांपुढे प्रथम उभे करतो आणि मग ते शब्दांत उतरवितो. ललित वाङमयाला आपण कपोलकल्पित जरी म्हणतो तरी त्यांत अनैच्छिक पडलेल्या स्वप्नांतल्यासारखा विसंवादीपणा नसतो. यावर कोणी असें विचारील कीं ही झाली तात्त्विक चर्चा; याचा राजकारणाशी मेळ कसा घालणार ?

याला थोडक्यांत उत्तर असें कीं, तुम्ही यापुढे जागेपणीं असें स्वप्न बघण्यास शिका कीं आपल्या देशावर असलेलें ब्रिटिशांचें राज्य गेलें, अगदी पार नाहीसें झालें. आपण अगदी स्वतंत्र झालों. आणि नंतर काय व्यवस्था करावयाची ? देशाचा कारभार कसा चालवावयाचा हें कागदावर टिपून ठेवा. या प्रश्नाचें उत्तर किंवा हा आराखडा सर्वांचा सारखाच येईल असें मुळीच नाही. दहाजणांचीं दहा वेगवेगळीं उत्तरें येतील. पण मनाला हीहि एक शिकवण आहे हें लक्षांत ठेवा. नाही तर अरबी भाषेंतील गोष्टींत सांगितल्यासारखे अल्लाउद्दिनाने जादूचा दिवा घासला आणि तावडतोब त्याच्यापुढे राक्षस येऊन उभा राहिला, आणि काय काम करूं म्हणून विचारू लागला. पण दिवा घासण्यापूर्वी अल्लाउद्दिनाने याचा विचार केलेला नसल्यामुळे त्याची घावरगुंडी उडाली. तशी आपली स्थिति व्हावयाची. उद्या खरोखरच स्वातंत्र्यदेवता तुमच्यापुढे येऊन उभी राहिली तर तिला काय सांगणार? पुढच्या व्यवस्थेचा आम्ही अद्याप विचार केला नाही म्हणून सांगणार ?

हुमायुनाच्या हातांत नेहमी एक आंगठी असे. त्या आंगठीवर 'हेहि दिवस निघून जातील' अशीं अक्षरें खोदलेलीं होतीं. हुमायून विपन्नावस्थेंत होता अर्थात् तेव्हा त्याला आंगठीवरील हें वाक्य वाचून धीर येई. त्याच्या पाठीमागून त्याचा मुलगा अकबर राज्यावर आला. त्याच्याहि बोटांत तीच आंगठी होती. त्याला मात्र 'हेहि दिवस निघून जातील,' हें वाक्य वाचून भीति वाटे व तो प्रजेचें कल्याण कसें करावें याचा विचार करी. आहे

त्याच्या उलट अनुभवाचें स्वप्न पहावयास प्रत्येकानें शिकावें. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, एकच स्थिति एकसारखी टिकत नसते. ती नेहमीच चंचल असते. हें लक्षांत घेऊन मी म्हणतों. नव्हे, माझी अशी पक्की खात्री आहे कीं, ब्रिटिशांचें राज्य आमच्यावरून खास जाणार. हें मी आततायीपणानें किंवा सूड बुद्धीनें बोलत नसून विचारपूर्वक बोलत आहे.

## ब्रिटिशांचें राज्य जाण्याचा संभव कां ?

ब्रिटिशांचें राज्य येथून जाणार असें मी कां म्हणतों याला एक अगदी ढोबळ कारण असें कीं, परमेश्वरानें जगांतील एकाहि साम्राज्याला असा ताम्रपट दिलेला नाही कीं त्याचें राज्य यावच्चंद्रदिवाकरौ सतत चालावें. जुना इतिहास वाचा म्हणजे मी काय म्हणतों तें आपल्याला पटेल. आजवर किती राज्यें, किती साम्राज्यें धुळीस मिळालीं असतील याला कांही हिशेब? रोमन साम्राज्य गेलें, ग्रीसचें राज्य गेलें, जगज्जेता अलेक्झांडर गेला, चक्रवर्ती नेपोलियन नाहीसा झाला. आपल्याकडील चंद्रगुप्ताचें, अशोकाचें साम्राज्य गेलें, मौर्यांचें गेलें, गुप्तांचें गेलें, एक ना दोन किती म्हणून सांगावीं ? परिवर्तन हेंच काळाचें लक्षण असल्यामुळे त्याच्या तडाख्यात हीं सर्व साम्राज्यें नामशेष झालीं. सारांश या जगांत शाश्वत व चिरंजीव असें कांही नाही, ही गोष्ट आपण ओळखली पाहिजे. इंग्रजांनी मात्र हें ओळखलें आहे. तितके ते शहाणेच आहेत. इसवी सन ४०९ मध्यें रोमवर बार्बेरियन लोकांनी चढाई केली तेव्हा इंग्लंडमध्यें असलेलें सर्व रोमन सैन्य रोमकडे त्याच्या संरक्षणार्थ आणावें लागलें. व इंग्लंड आपोआप स्वतंत्र झालें हा इतिहास त्यांना माहीत आहे.

आज युद्धाचा संभव दिसत आहे तेव्हा असाच प्रसंग इंग्लंडवर येणार नाही म्हणून कशावरून ? हिंदुस्थानांतील प्रत्येक गोऱ्या शिपायाला येथून उठून इंग्लंडच्या रक्षणार्थ जावें लागेल.

इंग्रजांना हें माहीत नाही असें नाही. ते अत्यंत धूर्त, कावेबाज, स्वार्थसाधु आणि प्रयत्नवादी आहेत.

## इंग्रजांचें स्वभावचित्र

इंग्रज हा माझ्या ओळखीच्या एका म्हाताऱ्या पुरभय्यासारखा आहे' हा भय्या स्वतःला रामभरोसी म्हणवून घेतो. पण लोक त्याला 'हराम-बेभरवशी' म्हणतात. 'देवळांत देवी आणि गांवांत नायटे' म्हणतात तसें हा भय्या आपल्या घरीं बसून गांवांत कलागती लावतो. घरीं स्वस्थ जेवतो, विश्रांति घेतो आणि मग हातीं सोटा घेऊन, अंगांत पाचपन्नास खिसे असलेला असा एक कोट घालतो, आणि मग भांडणाच्या जागीं जातो. दोघांच्या भांडणांत जेवढें हाताला लागेल तेवढें भराभर तो खिशांत भरतो आणि पोलीस आला कीं, शिष्ठपणाचा आव आणून भांडणाऱ्या माणसांना उपदेश करतो! इंग्रज मनुष्य असा सोदा आहे. आपल्या अलग बेटांत राहावें आणि जगांत धुमाकूळ घालावा हा याचा धंदा. इंग्रजांनी फक्त एकदाच, दुसऱ्या चार्लसच्या काळीं, डच आरमार टेम्स नदींत आलें त्यावेळीं शत्रूच्या तोफा आपल्या देशांत उडतांना ऐकल्या. त्यानंतर नाही. पण आतां तशी स्थिति राहिलेली नाही.

ते दिवस गेले. आज इंग्लंडइतकें दुसरें अप्रिय राष्ट्र कोणतेंहि राहिलेलें नाही. जो तो त्याला पाण्यांत पाहू लागला आहे. हें बेभरंवशाचें कूळ आहे, विश्वास ठेवण्यास पात्र नाही, अशी सर्वांची खात्री झाली आहे. याला कारण इंग्रजांची कुटिल नीति व स्वार्थी लोभी वृत्ति. हातीं आलेलें दुसऱ्याचें धन ज्याचें त्याला देण्याची बुद्धीच इंग्रजांच्या ठिकाणीं नाहीं.

उलट संकटकालीं लोकांनी आपल्याला मदत करावी अशी मात्र इच्छा! एका सरकारी बड्या अधिकाऱ्याने नुकतेंच मला असें सांगितलें कीं साम्राज्यावर संकट येण्याचा संभव आहे या वेळीं तुम्ही साम्राज्याला मदत करण्याविषयी लोकमत अनुकूल करावयास पाहिजे. मी म्हटलें, पण इंग्रजांच्या साम्राज्याला मदत करावयाची इच्छा तरी हिंदी लोकांना कशी होणार? १९१४ च्या युद्धाच्या वेळीं लो. टिळकांनी हिंदी लोकांना लष्करांत कांही वरिष्ठ जागा द्या व युरोपियनांच्या बरोबरीनें सवलती द्या म्हणजे रिक्रूट भरती करून देऊ अशी अत्यंत सौम्य व न्याय्य अट घातली असता तीदेखील

मान्य झाली नाही; अशा स्थितींत मदत करण्याची इच्छा तरी होणार कशी ?

हातीं सत्ता असल्यामुळे सक्तीने जेवढें मिळवितां येईल तेवढें ते मिळवतीलच; तथापि मनावर कोणाला ताबा चालविता येत नाही म्हणून सक्तीमुळे जरी कोणाला कांही साम्राज्याचें कार्य करावें लागलें तरी या ब्रिटिश लोकांना जय मिळू नये, याचा पराभव होऊन अद्दल घडावी असेंच जो तो मनांतल्या मनांत चिंतिल्याशिवाय राहाणार नाही. लष्कराचें हिंदीकरण होण्यास दोनशें वर्षे लागतील असें निर्लज्जपणे सांगण्यास देखील ते कचरत नाहीत ! त्यांच्या मनाचें औदार्य काय वर्णन करावें ?

## वसाहतींचे ब्रिटिश सरकारशीं संबंध

वसाहतीचें स्वराज्य आणि स्वातंत्र्य यांमधला दुवा आतां इतका सूक्ष्म आहे कीं तो आहे म्हटला तर आहे आणि नाही म्हटला तर नाही. त्याला तोडण्यास सोन्याची बोथट कात्रीच चालते. आज वसाहतींची स्थिति काय आहे ? प्रत्येक वसाहत साम्राज्यशाहीचा संबंध तोडून स्वतंत्र होऊ पाहात आहे. व्यापारी व राजकीय संबंध एकमेकांचे इतके वेगवेगळे झाले आहेत कीं प्रत्येक वसहतीची खटपट स्वातंत्र्यसंपादनाची आहे. उदाहरणार्थ कॅनडाचीच वसाहत घ्या. या वसाहतीचा संबंध जितका इंग्लंडशी आहे त्यापेक्षा अधिक युनायटेड स्टेट्स बरोबर आहे. आणि कॅनडाचें लक्ष आपले संबंध इंग्लंडशी जितक्या लवकर तोडता येतील तितके तोडण्याचें आहे. कारण कॅनडाची अशी खात्री आहे कीं इतःपर साम्राज्यशाही आपलें रक्षण करण्यास असमर्थ आहे; मग तिच्याशी संबंध ठेवून तिच्या दास्यांत रहा कशाला ? शिवाय कॅनडामध्ये एकट्या इंग्रजांचीच वस्ती नसून निम्मी वस्ती फ्रेंच वगैरे इतर युरोपियनांची आहे. ऑस्ट्रेलियाचें स्वरूपदेखील वसाहतीचें राहिलें नसून तें एक स्वतंत्र साम्राज्यच बनलें आहे. दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतीदेखील इंग्लंडच्या तंत्राने न चालता इंग्लंडच त्यांच्या तंत्राने चालू लागलें आहे. ( या ठिकाणीं श्री. केळकर यांनी ऑक्टोबर १९३८ च्या पोलिटिकल क्वॉर्टलीमधील कांही भाग आपल्या विधानांच्या समर्थनार्थ

वाचून दाखविला.) साम्राज्याचे वसाहतीशी संबंध पाहिले म्हणजे शेळीच्या शेपटीची आठवण होते. शेळीला आपल्या शेपटीचा उपयोग माशा वारण्याकडे होत नाही. आणि लाज झांकण्याकडेहि होत नाही. तसें साम्राज्याचें झालें आहे. साहजीकच मग वसाहती असा विचार करतात कीं आपलीच शेपटी थोडी लांब रुंद केलेली काय वाईट ?

आपणाला मी सांगतों कीं १९१४ सालीं इंग्लंडची जी परिस्थिति होती त्याहीपेक्षा आताची त्याची परिस्थिति अतिशय विकट झाली आहे. इंग्रजांच्या पापाचा घडा तोंडोतोंड भरला आहे आणि ते मरतील तर आपल्या मरणानेच मरणार आहेत. साम्राज्याची हांव धरली त्याचें हें बक्षिस आहे. आजवरची त्यांची कुटिल नीति त्यांना भोंवत आहे. तें राष्ट्र आज जरी नामशेष झालें नाही तरी तें कसें तरी आता जीव धरून रहाणार इतकेंच.

## डगमगण्याचें कारण नाहीं

परिस्थिति बदलली कीं एकप्रकारची भीति वाटते. उद्या जर इंग्रज येथून निघून गेले तर आपलें कसें होणार ? आपलें संरक्षण कोण करणार ? पण अशी धास्ती वाटून घेण्याचें मुळीच कारण नाही. साहसाशिवाय श्री नाही. आपण आजच पहिल्याने स्वातंत्र्य उपभोगणार आहों असें नाही. आपल्या देशांत पूर्वी लोकसत्ताक राज्यपद्धति होती. साम्राज्यें झालीं. रामराज्यें झालीं. दोन अडीचशें वर्षांपूर्वी आपल्याच मराठ्यांनी अटकेवर झेंडे लावले. कारस्थानें केलीं. हे सगळे नमुने आमच्या देशांत होऊन गेले. याला इतिहास साक्ष आहे. वेगवेगळ्या राज्यपध्दतीप्रमाणें देशाच्या भौगोलिक मर्यादाहि बदललेल्या दिसून येतात. चंद्रगुप्ताच्या वेळीं काबूल-कंदाहार, बलुचिस्तान इत्यादि देशहि हिंदु साम्राज्यांतच मोडत असत. अशोकाचें साम्राज्य काबूलपासून सीलोनपर्यंत होतें. तशीच यापुढेही हिंदुस्थानची सीमा अमुकच आहे तीच राहील असा प्रतिबंध कां घालावा? त्याचप्रमाणें अमुकच प्रकारची राज्यपद्धति पाहिजे असा आग्रह तरी कां धरावा ? कदाचित इटालीप्रमाणें एखादा संस्थानिक पराक्रमी व लोकहिततत्पर होऊन हिंदुस्थानला स्वतंत्र करणार नाही असें तरी कशावरून? मला हें मुळीच असंभवनीय वाटत नाहीं.त्याच-

प्रमाणें इंग्रजांचें राज्य येथून गेलें तर आपलें कसें होईल अशी भीतीहि वाटत नाही व कोणालाहि वाटू नये. यांत थोडासा अविचार (Rashness) कोणाला दिसेल तथापि तोहि दोषास्पद आहे असें मला वाटत नाही. हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशाला आपलें स्वातंत्र्य टिकवितां येणार नाही असें मानण्याचें मुळीच कारण नाही. स्वित्झरलंडला फक्त भूगोल आहे इतिहास नाही असें म्हणत असतात. त्यावरून त्याची स्थिति लक्षांत येण्यासारखी आहे. पण तें स्वतंत्र राहिलें आहेच कीं नाही ?

तात्पर्य, स्वातंत्र्य हें हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाचें ध्येय आहे मग तो कोणत्याही पक्षाचा असो. तथापि तें मिळण्यापूर्वी तूर्तची तोड म्हणून वसाहतीचे हक्क मिळाले तर ते टाकू नयेत एवढेंच आमचें म्हणणें. परिस्थिति लक्षांत घेऊन हल्लीच्या तरुणांनी या जागतेपणांतील स्वप्नाचा म्हणजे इंग्रज गेल्याच्या स्वप्नाचा व त्यानंतरच्या योजनेचा आराखडा आपापल्या बुद्धीप्रमाणें तयार करावयास लागावें.

---

# २. राष्ट्रद्वेषाच्या व्रताचें उद्यापन

(केसरी, ता. २५ जून १९४०)

## (लेखांक १ ला)

चालू महायुध्द सुरू होणार हें ठरलेलेंच होतें. मात्र इतक्या थोड्या दिवसांत फ्रान्सचा पराभव होऊन त्याच्याकडून तहाच्या मागणीपर्यंत पाळी येईल हें भविष्य करण्याचें धाडस कोणीहि केलें नसतें.

१९३९-४० चें युद्ध ही १९१४-१९१८ च्या युद्धाची परतफेड आहे. तथापि फ्रान्स व जर्मनी यांच्यांतील वैर चालू युद्धाने तरी संपेल हें कोणी सांगावें ?

या राष्ट्रीय द्वेषव्रताची परंपरा दाखविणारे दोन तीन उतारे देतों:-

The peace of Versailles has reinstated the period of impotence created by the treaty of West phalia, and has thus given French policy the greatly desired prize of victory. At present the German nation is the victim of this lamentable situation. She can reverse the position, when she has again become free and independent. ( डॉ. जेस्लर --कोलोन गॅझेट. )

Before crossing swords *again* with the French and Belgians we ought to examine our consciences. We ought to refind the spirit animating us in 1914. (जनरल मुदरा -प्रेसिडेंट हेस्लर लीग १९२७ जुलै. )

France was and will be Germany's mortal enemy (कौंट रॅव्हॅंटलो, १९३०)

The watchword must be 'France is our enemy.' (डर अॅंग्रिफ सप्टेंबर १९३०)

I emphasise, and I am firmly convinced, that this second occasion of a life or death struggle between France and Germany must and will occur. (हेर हिटलर–मिअन कॉंफ.)

I want to be able to fight France *once more*. You will victoriously enter Paris. I shall look down on you from Heaven and bless you. (हिंडेनबुर्ग १९२७.) आणि त्याप्रमाणें व्हावयाचें तें झालेंच. असो.

' थोरांमोठ्यांचा अधःपात पहाण्याचें कुणाच्याहि नशिबीं न यावें ! '

मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताला सुळी द्यायला नेऊ लागले तेव्हा एका सहृदय मनुष्यानें वरील उद्‌गार काढले. मला वाटतें, ज्याला आपण निर्दय अंतःकरणाचें केवळ उपमानच समजतों, तशा प्रकारच्या एका 'मांगा'-चेच वरील उद्‌गार आहेत.

फ्रान्स म्हणजे केवढें बलाढ्य साम्राज्य ! पण आज त्याच्यावर दातीं तृण धरून तहाची याचना करण्याचा प्रसंग यावा ना ! पण ज्यांनी जगाचा इतिहास वाचला असेल त्यांना अशा प्रकारचे दाखले राजकीय ऐतिहासिक क्षेत्रांत सर्वत्र पेरलेले आढळतात. म्हणून त्यांना अशा दुःखद प्रसंगाने वाईट वाटलें तरी तें क्षणमात्रच वाटतें. त्यांचें मन अशा प्रसंगांची इतर रीतीने चिकित्सा करण्यांत अधिक गुततें.

या चिकित्सेंत त्यांना प्रथम हें दिसतें कीं, जगांत असले प्रसंग अनेक राष्ट्रांवर एकेकदा व कांही राष्ट्रांवर अनेकदा आले आहेत.

स्वतः फ्रान्सवर प्रस्तुतचा हा असला तिसरा किंवा चौथा प्रसंग असेल. १८१५ सालीं परम बलाढ्य असा फ्रेंच बादशहा जो नेपोलियन त्याला प्रशियन-ऑस्ट्रियन-इंग्रज राष्ट्रांशी तह करून अशीच शरणागति पत्करावी लागली. १८७० सालीं फ्रेंच बादशहा लुई नेपोलियन हा असाच सर्व सैन्यासह जर्मन सेनापतीच्या स्वाधीन झाला! आणि आज १९४० चा फ्रान्सवर हा तिसरा प्रसंग !

असे प्रसंग आलेल्या आणखी इतर राष्ट्रांचीं उदाहरणें देत बसण्यांत अर्थ नाही. येऊन जाऊन इंग्लंड हें एकच राष्ट्र असें आहे कीं, त्याच्यावर अलीकडे शेंकडो वर्षांत असा प्रसंग आलेला नाही. पण नॉर्मन लोकांनी इंग्लंडला अकराव्या शतकांत जिंकलें तें कायमचेंच झालें ! शिवाय अजून इंग्लंडचा इतिहास संपला नाही !

असे प्रसंग ज्यांच्यावर येतात त्यांच्याबद्दल त्या वेळेपुरती सहानुभूति वाटली तरी एकंदरीने न्यायदेवतेचा निकाल सर्वस्वी त्यांच्याच बाजूला असतो असें मात्र नाही. यामुळे ती सहानुभूति त्या मानाने पातळ झाल्यास नवल नाही.

नेपोलियनला १८१५ च्या पराभवानंतर, प्राणरक्षणार्थ आपल्या शत्रूच्या म्हणजे इंग्लंडच्या, जहाजाचाच आश्रय करावा लागला हें पाहणाराला मृच्छकटिकांतील मांगासारखेंच वाईट वाटलें असेल. पण नेपोलियनला हें जे बक्षीस मिळालें त्याचें कारण त्याची अन्यायी व दुर्दम्य महत्त्वाकांक्षा !

त्याला वाटलें 'मी जगाला अजिंक्य आहे' म्हणून दैव म्हणालें, 'ज्या इंग्लंडवर स्वारी करणें हें आपल्या पराक्रमाचें शिखर असें तूं मानीत होतास त्याच्या जहाजावरच बंदीवान होण्याला तुला पाठवितो, थांब !'

१८७० सालीं लुई नेपोलियननें, जर्मनीशी अगदी निष्कारण कुरापत काढली व फ्रान्सवर आपल्या हाताने युद्ध ओढवून घेतलें. जुनें वैर असेल; पण स्पेनच्या रिकाम्या गादीवर बसण्याला एका जर्मन राजपुत्राला पाचारण करण्यांत आलें; आणि हें घडलें तर जर्मनीचें पारडें जड होतें म्हणून ती गोष्ट घडूं नये अशी इच्छा फरेंच बादशहान प्रगट केली, आणि तिला मान देऊन जर्मन राजपुत्राची उमेदवारी परत घेण्यातहि आली. पण याच्यापुढे आणखी जाऊन लुई नेपोलियनन असा आग्रह धरला कीं, स्पेनचें असलें आमंत्रण यापुढे केव्हांहि स्वीकारलें जाणार नाही अशी कायमची हमीच द्यावी. अर्थात जर्मनीने ती गोष्ट नाकारली. कारण तेव्हा तिसरा विल्यम व काऊंट बिस्मार्क हे खंबीर गडी जर्मनीच्या केंद्रांत सत्ताधीश होते. लगेच या नकाराचें निमित्त करून फरेंच बादशहाने रणशिंग फुंकलें. याला खरें कारण असें. लुई नेपोलियनला लोकसत्ताभिलाषी फ्रान्समध्ये आपलें राजपद स्थिर करावयाचें होतें. आणि हें होण्याला परराष्ट्रीय राजकारण दिमाखदार रीतीनें रंगविणें व लोकांचें लक्ष बाहेर काढून नेणें, एवढे एकच साधन तेव्हा त्याजजवळ होतें. म्हणून त्यानें ही जर्मनीची नसती कुरापत काढली. तेव्हा त्याचें फळ त्याला मिळालें यांत काय आश्चर्य ?

आता फरान्सवरील आजचा हा प्रसंग. त्याला वरीलप्रमाणें एखादें उघड दिसणारें कारण सांगता येण्यासारखें नाही. पण व्हर्सायचा म्हणून जो बेसुमार कडक अटींचा तह जगप्रसिद्ध आहे तो १९१९ सालीं पराभूत जर्मनीवर लादण्यांत आला त्याला मुख्य कारण फरान्स हाच होता ! त्या तहाची आठवण जर्मनी विसरणे शक्य नाही. त्यावेळचा (स १९१९) फरेंच मुख्य प्रधान क्लेमाँसो याचें या विषयावरील पुस्तक वाचणाराला हें आढळून येईल की, जर्मनीला संभाळून घेण्याला इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज हा मनांतून तयार होता. व प्रेसिडेंट विल्सनने तिऱ्हाईतपणे सुचविलेल्या नुसत्या १४ मुद्द्यांत वस्तुतः जर्मनीला विशेष अपमानास्पद असें कांहीं

नव्हतें. पण 'नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति' या न्यायाने म्हणा, किंवा 'आपके गलीमे कुत्ता शेर' या न्यायाने म्हणा, क्लेमाँसोचा वरचढपणा गाजत होता. तहाच्या वाटाघाटी फरान्समध्ये चालू होत्या; आणि संयुक्त लष्करी मुख्याधिकारीहि फ्रेंच सेनापतीच्या हातीं होता. याचा फायदा घेऊन त्या तहाचीं कलमें क्लेमाँसो याने अधिकांत अधिक कडक करण्याचा आग्रह धरला. एवढेच नव्हे तर पुढे तहाच्या अमलबजावणींत किंचित सैलपणा येताच तो जळफळू लागला.

क्लेमाँसो हा १९१९ सालांतच इतका म्हातारा होता कीं, आजचें हें उलटलेलें गाडें पाहण्याला तो जिवंत असणे शक्य कोटींतलें नव्हतें. पण त्यावेळीं तरुण असणाऱ्या माणसांना गेल्या पंचवीस वर्षांचा इतिहास डोळ्यांना दिसत आला आहे. शिवाय या अवधींत सर्व (फरेंच, इंग्रज, जर्मन इत्यादि) बाजूनीं प्रांजलपणें लिहिले गेलेले अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यावरून जर्मनीच्या आजच्या त्वेषाचें कारण क्लेमाँसोचा तो अन्यायी तह हें सहज दिसून येतें.

'हर्षकाळ हा पापकाळ असतो' असें जें वचन आहे त्यांत तथ्य नाही असें कोण म्हणेल? आपल्या चालत्या काळीं संधिसाधु मुत्सद्दी वेतालपणे वागतात, त्याचें फळ पुढेमागे मिळाल्याशिवाय राहत नाही. इटालीचा गेल्या शतकांतला विख्यात मुत्सद्दी काऊंट कॅव्हूर याने एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'आमच्या राष्ट्रांच्या नांवाने किंवा हवें तर त्यांच्या हितार्थ म्हणा, आम्ही मुत्सद्दी लोक ज्या गोष्टी करतों, त्या इतक्या वाईट असतात कीं, आम्ही त्याच स्वतःच्या खासगी व्यक्तिहिताकरिता केल्या तर जग आम्हाला अट्टल बदमाष ठरवील!' मग राष्ट्र झालीं म्हणून त्यांना हा दोष लागू नये असें थोडेंच आहे!

असो, प्रस्तुत लेखाचा उद्देश नीतिबोध करण्याचा नाही, तर इतिहासाभ्यासाचा एक विशेष मुद्दा वाचकांच्या पुढे मांडण्याचा आहे. तो मुद्दा असा. इतिहासांत नेहमी पुनरावृत्ति होत असते. कारण मनुष्यस्वभाव केव्हाहि कोठेहि एकच असतो. फक्त प्रासंगिक स्थानिक परिस्थितीच्या चौकटींतून त्याचें नवें नवें पण पुनरावृत्त चित्र नजरेस पडतें. समजा, 'गर्वाचें घर

खालीं' या तत्त्वाचें ऐतिहासिक उदाहरण द्यावयाचें आहे, तर तें १८१५' १८७०, १९१९ व १९४० या सालीं झालेल्या फ्रेंच व जर्मन राष्ट्रांच्या वर्तनावरून, मात्र उलटसुलट रीतीनें, देतां येईल. आणि अशीं उदाहरणें घेऊन, त्यांचें समांतर तुलनात्मक समालोचन चिंतन केलें तर तें कोणालाहि मनोरंजक व बोध घेणाराला बोधप्रद होऊ शकतें.

ज्या व्हर्सायच्या तहाचा एक परिणाम चालू महायुद्धांत झाला, त्याविरुद्ध आज सतत वीस वर्षें जर्मनी तक्रार करीत आलेला आहे. आणि ताजी बातमी अशी आहे कीं, येत्या शुक्रवारीं ( ता. २८ जून ) व्हर्सायच्या जुन्या इतिहासप्रसिद्ध राजवाड्यांत हिटलर हा जाहीर रीतीनें १९१९ चा तो तहनामा जाळून टाकणार आहे ! जुन्या-पुराण्या इतिहासप्रसिद्ध इमारतींचें हें नशीव म्हणावें किंवा वैभव म्हणावें कीं, त्यांना आपल्या प्राकारांत किती तरी निरनिराळ्या प्रकारचे अद्भुत प्रसंग घडलेले पहावयास सांपडतात. वास्तुशांतीच्या हिंदुधर्म विधितत्त्वाप्रमाणें अशा इमारतींत गाडलेल्या वास्तुपुरुषांची मुलाखत घेण्याचें साधन जर कांही योगसामर्थ्यानें उपलब्ध झालें तर तें पुराण पुरुष किती तरी मनोरंजक व शिवाय इतिहासशास्त्रदृष्ट्या सत्यस्वरूपाच्या, हकीगती सांगूं शकतील !

पॅरिस शहराजवळ असलेला व्हर्सायचा राजवाडा चौदाव्या लुई राजानें बांधला. त्यामध्यें एकामागून एक अनेक अद्भुत रोमांचकारी प्रसंग घडले आहेत. वैभवशाली १४ वा लुई बादशहा या वाड्यांत नांदला. रिचलियोनें अंगावर धर्माध्यक्षाचा लाल झगा घालून त्याच्या आड अनेक कृष्णकृत्यें याच वाड्यांत केलीं. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं राजसिंहासन याच वाड्यांत भणंग भिकाऱ्यांच्या पायांनी तुडविलें गेलें ! नेपोलियननें राज्याभिषेक याच वाड्यांत करवून घेतला. जर्मन राजा विल्यम यानें याच वाड्यांत संयुक्त जर्मनीचें बादशाही पद घेतलें. त्याचा नातू दुसरा विलियम त्या पदावरून पदच्युत होऊन, जर्मनी नामशेष करणाऱ्या तहावर याच वाड्यांत शिक्कामोर्तब झालें. आणि आता त्याच वाड्यांत हिटलर तो तहनामा फाडून टाकून जर्मनीची पुनः प्राणप्रतिष्ठा करणार ! फोटोग्राफीच्या काचेवर पडणारी छाया व प्रकाश हीं रसायन-द्रव्यानें तेथेंच कायमचीं बंदिवान

करतां येतात. व्हर्सायच्या राजवाड्यांतील आयनेमहालांतल्या आरशांमध्ये अशीच एखादी शक्ति असती तर--!

असो. चालू महायुद्ध फ्रान्सपुरतें संपून आतां तहाच्या बोलण्यांना सुरुवात झाली आहे. परंतु पक्का तह पदरांत पडून पुनः फरान्समध्ये पूर्ववत् शांतता नांदू लागण्याला पुष्कळ अवकाश लागेल असें वाटतें. दरम्यान सर्व प्रकारच्या उलटसुलट बातम्या वाचून साधेभोळे लोक रोज गोंधळांत पडतील. पण दोषी तापाप्रमाणें हें तहाचें कारस्थान, ठराविक मुदत घेऊन अखेर फरान्सविरुद्ध निकालांत निघेल असाच अंदाज आहे. १९४० चा तह ही १९१९ च्या तहाची पुनरावृत्ति, मात्र उलट बाजूने होणार ! १९१९ सालीं डॉ. भवितव्यतेच्या कपाटांतल्या ज्या बाटलींतली राष्ट्रीय अपमानाची कडू गोळी जर्मनीला खावी लागली, त्याच बाटलींतली गोळी आता फरान्सला खावी लागणार आहे !

१९४० चा यापुढे होणारा कच्चापक्का तहच काय पण तहाच्या वाटाघाटीचें कारस्थान देखील, ही १९१९ च्या तहाचीच पुनरावृत्ति होणार असल्याने, एकवीस वर्षांपूर्वी झालेल्या त्या तहाची कांही हकीकत केसरीच्या वाचकांना दोनतीन लेखांत सांगण्याचें मी योजिलें आहे. म्हणून वाचकांनी तिकडे अवधान द्यावें अशी विनंति आहे.

---

## ( लेखांक २ रा )

अगदी आगंतुक बाचाबाची सोडून दिली तर, एखादें ' राष्ट्रीय युद्ध ' म्हटलें म्हणजे त्याला आदि मध्य व अंत ही अवस्थात्रयी असते, व तीनहि मिळून एक संपूर्ण युद्धचक्र होतें. पैकीं आदि अवस्थेमध्ये गुप्त पण दूरदर्शी स्वार्थी हेतूंची धारणा, मित्रानुसंधान, सैन्याची भरती, युद्धसामग्रीची तयारी हीं येतात. मध्यावस्थेंत अन्योन्यनिषेध, शिव्यागाळी, निमित्तसंशोधन, व प्रत्यक्ष लढाया हीं येतात. आणि अन्ताच्या स्थितींत कच्चापक्का तह, शांतता-प्रस्थापन , शेवटी झाल्यास वैरोपशम आणि दिलजमाई हीं येतात. पण असलें

एक चक्र संपल्यावर, लगेच किंवा कालांतरानें, दुसरें युद्धचक्र पुन्हा त्याच दोन राष्ट्रांत सुरू होणार नाहीं असें सांगतां येत नाहीं. फरान्स व इंग्लंड यांच्या इतिहासात हीं उभय राष्ट्रें मधून मधून पण शतकानुशतकें युद्ध करीत होतीं. तसेंच जर्मनी (प्रशिया) व फरान्स या राष्ट्रांनीहि अनेक शतकावधींत परस्परांना युद्धचक्रांतून अनेक वेळा खेळविलें व लोळविलें असेंच इतिहास सांगतो.

हल्लींचें महायुद्ध हें एकंदरीनें आज मध्यावस्थेंत आहे. आणि इंग्लंडच्या संबंधांत तर या मध्यावस्थेचा पूर्ण भोगहि अजून व्हावयाचा आहे. फरान्सच्या संबंधांत अंताच्या तिसऱ्या अवस्थेला सुरुवात आहे. मात्र तहांतून दिलजमाईपर्यंत मजल जाण्याला बराच काळ लागेल. पण गेल्या महायुद्धाचें ( १९१४–१९१८ ) चक्रभ्रमण यापूर्वी पूर्ण होऊन पक्क्या इतिहासांत जमा झालें आहे. म्हणून तें उदाहरण घेणें सोयीचें होईल.

१८९९–१९०० पासून म्हणजे जर्मनी हा साम्राज्याभिलाषी ठरला, व तो आपल्याला व्यापारांत मोठा प्रतिस्पर्धी निर्माण होणार हें इंग्लंडनें पाहिलें. तेव्हापासून गेल्या ( १९१४–१८ ) महायुद्धचक्राला सुरुवात झाली. १९११ ते १९१८ हा त्याचा मध्यकाल व १९१८ ते १९२६ हा त्याचा अंतकाल ठरतो. एका टोकाला बोअर युद्धांत जर्मन कायसरनें प्रेसिडेंट क्रूगरला पाठविलेली तार येईल, तर दुसऱ्या टोकाला जर्मनीचा प्रवेश 'राष्ट्रसंघां'त होऊन इंग्लंड–फरान्स–जर्मनी यांनी मिळून कांही कामही केलें हें येईल–मात्र लगेच नव्या युद्धचक्राला सुरुवात झाली !

क्लेमाँसो एके ठिकाणीं म्हणतो, 'The armistice is the interval between fall and the rise of the curtain'–कच्चा तह म्हणजे नाटकांतल्या दोन अंकांतली अवधि. उपमा ठीक आहे. पण राष्ट्रद्वेषाचें आणि युद्धचक्रांचें हें नाटक किती अंकांचें आहे हें कोणाला ठाऊक ? कांही ललितांतील किंवा सिनेमांतील नाटकांप्रमाणें, रंगभूमीवर तेंच तें नाटक सतत चालू राहावयाचें असतें, पण प्रेक्षकसमूह मात्र कंटाळून एक जाऊन त्या जागीं दुसरा येत असतो. तसें हें नाटक ईश्वरकृपेनें नसावें !

कच्च्या तहांतून पक्का तह, त्यांतून कायमची शांतता, त्यांतून दिल-जमाई, व त्यांतून सुधारणेची प्रगति असें झालें तर त्या तहाला कांही किंमत ! पण क्लेमांसो म्हणतो, 'Armistice is a door opening on the unknown. Such has ever been the course of human life as the pendulum swings to and fro.' कच्च्या तहावर सह्या होतांना हायसें वाटतें. पण पुढे पक्क्या तहांतील अज्ञात अटींच्या वाटाघाटी सुरू झाल्या म्हणजे जित राष्ट्राच्या छातींत गोळा उठतो. आणि त्याचे डोळे पांढरे होऊं लागतात.

ता. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं फ्रान्स व जर्मनी यांच्यामधील कच्च्या तहावर सह्या झाल्या हें ऐकतांच, क्लेमाँसो म्हणतो, 'माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. खरोखर मला रडें कोसळलें!' सतत १५६० दिवस मृत्यु-भयांत काढणाऱ्या राष्ट्राच्या सुपुत्राला असें रडूं येईलच. पण त्या रड-णाऱ्या फ्रेंच प्रधानाचें हृदय किती कठीण होतें ही गोष्ट, त्यानें डोळे पुसल्या-बरोबर जर्मनीवर कोणत्या अटी लादण्याचा आग्रह धरला, यावरून सहज दिसून येतें. क्लेमाँसोला 'वाघ' म्हणत. आणि खरोखरच तो वाघासारखा क्रूरकर्मा ठरला. व्हर्सायच्या तहानें जर्मनीच्या अंगचें कातडें सोलून निघालें. तरी क्लेमांसो हा असंतुष्टच. तो कसा कोणावर जळफळला याचा थोडासा मासला देतों म्हणजे कळेल. तो म्हणतो— "इंग्लंडच्या दुटप्पी धोरणानेंच आमची घाण केली. तह करतांना इंग्लंडचें लक्ष फ्रान्सचें हित कसें साधावें याकडे नसून जर्मनीला कसा वांचवावा याकडे होतें. मी जर्मनीला ज्या कडक अटी घातल्या त्यांना विरोध इतर कोणाचा नाही तर फक्त इंग्लंडचा !"

'At such a moment the British allies were applying themselves heartily to the task cf *sparing* Germany! It might have been more natural to think first and foremost of succouring France so cruelly ravaged by German Soldiers.'

येवढेच नव्हे तर तो असें बजावतो कीं, 'Great Britain *may yet suffer more* from this than the insight of her latter day

politicians yet allows them to suppose.' यावर तिऱ्हाइताची टीका एवढीच कीं, व्हर्सायच्या तहाच्या अटी किंचित् सौम्य करण्याचा प्रयत्न तेव्हा इंग्लंडनें केला ही गोष्ट जर्मनीहि जाणतो. पण इंग्लंडने जर्मनीचें दारुण शत्रुत्व पुढे संपादलें. त्याचीं खरीं कारणें वेगळीं असून तीं या तहानंतर घडलीं आहेत. वरें, तहाच्या अटी कडक करून तरी अखेर फरान्सला काय लाभ झाला, हें क्लेमाँसो आज जिवंत असता तर, त्याचें त्यालाच दिसून आलें असतें.

चालू महायुद्धाच्या अंतावस्थेंतील फ्रान्स व जर्मनी यांच्यांतील तहाला उद्देशून समांतर व तुलनात्मक समालोचन, इतकाच मर्यादित हेतु माझ्या या लेखाचा असल्यामुळे, आतां व्हर्सायच्या तहाचा इतिहास काय व कसा घडला तेवढें थोडक्यांत पाहूं.

गेल्या महायुद्धांत दोनहि पक्ष जोरांत लढत होते तोंपर्यंत ( १९१८ ) तहाची कल्पना कोणाच्याही डोक्यांत आली नाही. मग तोंडानें तिचा उच्चार कसा होणार ? पण १९१४ च्या ता. १ ऑगस्टपासून, म्हणजे सतत छत्तीस महिने, लढल्यावर जर्मनीलाच प्रथम कमकुवतपणा वाटू लागला. उलट दोस्त राष्ट्रें तेव्हा टिकून होतीं, तीं कां होतीं हें परवां फ्रेंच मार्शल पेटन याने आपल्या करुण कहाणींत जातां जातां सांगितलेंच आहे. असो. जर्मनीने निर्वाणीचें अस्त्र म्हणून ' यू ' बोटींचा तडाखा सुरू केला, व प्रथम-ग्रास म्हणून लुसिटानिया या प्रचंड अमेरिकन बोटीचा नाश केला. तथापि प्रेसिडेंट विल्सन हा मध्यस्थी करण्यास तयार आहे असें कळतांच, जर्मनीने १९१७ च्या डिसेंबरांत आपल्या तहाच्या अटी त्याजकडे पाठविल्या पण हळूच सुचविलें कीं " आम्ही हें केवळ गुप्त संधान म्हणूनच करीत आहों. हें बाहेर फोडू नका. कारण आमचे पाय लटपटत आहेत असें दोस्त राष्ट्रें समजतील. " भांडणांत पाय जितके अधिक लटपटतात तितका तोंडच्या वल्गनांना अधिक जोर येत असतो !

पण यापूर्वी सप्टेंबरपासूनच जर्मनीच्या आशेला ओहोटी लागली होती. रशिया बल्गेरिया ऑस्ट्रिया टर्की यांचा, म्हणजे जर्मनीच्या या

दोस्तांचा धीर सुटून तीं राष्ट्रें स्वतंत्र आपल्यापुरता तह करण्याला तयार झालीं होतीं. खुद्द जर्मनींतहि १९१७ च्या जुलैमध्ये सोशालिस्ट पक्षाचे लोक तहाची भाषा आपापसांत बोलू लागले होते. कारखान्यांत संप होऊ लागले होते, आणि रणांगणावरील जर्मन शिपाई रशियन शिपायांप्रमाणें आपलीं ' कौन्सिलें ' बनवू लागले होते.

ता. ८ सप्टेंबरपासून किरकोळ जर्मन लष्करी अधिकारी हे तहाची इष्टता वरिष्ठ अधिकाऱ्यांना, उघडपणें कळवू लागले होते. आणि ता. ३० सप्टेंबर रोजीं तर मुख्य जर्मन सेनापतीनेंच तीच सूचना केली.

जर्मनीकडून तहाचीं बोलणीं आलीं तरी फ्रेंच सेनापति प्रथम कबूल करीना ! त्याला वाटे कीं, जर्मनीचा हा कांही तरी डाव असावा. 'तहाचें बोलणें लावून आम्हाला बेसावध करावें आणि इकडे त्या अवधींत आपण सैन्याचें बस्तान बसवून तह नाकबूल करून उलट चढाई करावी " अशा कपटी बेतांचा संशय फ्रेंचांना आला. पण खरी गोष्ट ही कीं, आपला झालेला मोड जर्मनीने अत्यंत कुशलतेनें लपवून ठेवला होता आणि दोन तीन महिनेपर्यंत जर्मनीच्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांत तहमागण्याविषयी ज्या उलटसुलट वाटाघाटी चालल्या होत्या, त्या जर्मनीनें इतक्या यशस्वीपणें गुप्त ठेवल्या होत्या कीं, दोस्त राष्ट्रांना त्यांचा काडीइतकाहि सुगावा लागला नाहीं !

पुढे तहाची मागणी करण्याकरितां जर्मन लष्करी वकील प्रत्यक्षच आले तेव्हा फ्रेंच बेसुमार चढून गेले ! पॅरिसच्या वर्तमानपत्रांनी तर एकच गिल्ला करून चौमुखी आरोळी उठविली कीं, तह व्हावयाचा तो बर्लिनमध्ये प्रवेश केल्याशिवाय होऊ नये ! पण 'जर्मनीने तहाची स्थूल भूमिका म्हणून प्रे. विल्सनचे चौदा मुद्दे स्वीकारल्यास आम्ही कच्चा तह करून प्रत्यक्ष युद्ध थांबवूं' अशी दोस्त राष्ट्रांनी विल्सनला कबुली दिली होती त्याप्रमाणें वागणें त्यांना प्राप्त होतें.

फ्रेंच सेनापतीला तर नाकबुलीने प्राणांतिक पेंच होता. कारण तह न करून म्हणजे लढणें चालू ठेवून, जर्मन सैन्याला मागे रेटीत नेऊन, बर्लिन-

मध्ये कोंबून वर्लिन हस्तगत करीपर्यंत लाखो फ्रेंच सैनिक आणखी बळी द्यावे लागले असते ! आणि केवळ एका चढेल पोरकट भावनेकरितां इतकी प्राणहानि करणें योग्य नव्हतें हें उघड आहे. इतक्यांतच तह मागावा कीं नाहीं याविषयी जर्मन-जर्मनांत ज्या वाटाघाटी होत होत्या, त्यांची हकीकत वाचकाला फार मनोरंजक वाटण्यासारखी आहे. ती वाचावयाची अिच्छा असेल त्यानें 'विल्यम अँड नॉरगेट' कंपनीनें प्रकाशित केलेलें The Germans at Versailles by Victer Schiff हें पुस्तक मुळांत वाचावें अशी मी शिफारस करतों.

असो. नाहीं होय म्हणतां म्हणतां ता. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं कॉंपीनी येथें कच्च्या तहावर उभयपक्षीं सह्या झाल्या. हल्लींचा १९४० चा कच्चा तहहि कॉंपीनो येथेच झाला आहे! पण पुढे पक्का तह ता. २८ जून १९१९ पर्यंत झाला नाहीं. हा तह होण्याला सात महिन्यांचा अवधि लागला याचें कारण तहाच्या अत्यंत कठिण व अपमानकारक अटी येवढेंच होतें. म्हणून त्या काय होत्या याची माहिती पुढील लेखांत देतों. व्हर्सायिचा तह आता वीस वर्षांचा झालेला व तो उलथूनही गेला. पण त्याच्या अटींची आठवण करून देण्याचें कारण हें कीं, हा व्हर्सायिचा तह तेव्हाच मुळांत इतका कठिण व अपमानास्पद झाला नसता तर कदाचित् १९३९-४० चें महायुद्ध झालें नसतें. तात्पर्य, हात चालू आहे तोंपर्यंत राष्ट्रांना व मुत्सद्द्यांना न्यायबुद्धि सुचत नाहीं हेंच खरें !

जोंवर प्रत्यक्ष आपल्यावर प्रसंग नाहीं तोंवर दुसऱ्यानें केलेल्या गोष्टीला नांवें ठेवणें व परस्पर फुकटचा सल्ला देणें सोपें असतें. पण तो प्रसंग स्वत:वर गुदरला म्हणजे काय तें खरें कळतें ! हल्लीच्या युद्धांत आतापर्यंत जर्मनीपुढे ज्या राष्ट्रांनीं शरणागति स्वीकारली त्या सर्वांना इंग्लंडनें नांवें ठेविलीं. पण जात्यांत भरडले जाणारे सुपांतल्यांना म्हणतात, "ठीक आहे. तुमच्यावर प्रसंग येईल तेव्हा तुम्ही काय कराल हें आम्हीहि पाहूं." चिमुकला बेल्जम व त्यापूर्वी नॉर्वे यांनी 'दोस्त राष्ट्रांचा विश्वास-घात' केला अशी हाकाटी करण्यांत आली हें प्रसिद्ध आहे. पण ज्या फ्रान्सनें पूर्वी बेल्जमच्या राजाला नावें ठेवलीं त्याच्यावरच आज त्याच गोष्टीकरिता

स्वतःला नांवें ठवून घेण्याची वेळ आली आहे ना ! फ्रान्सच्या वसाहती म्हणे लांवून फ्रान्सला नांवें ठेवतात व धीर देतात ! पण त्यांच्या हें लक्षांत आलें पाहिजे कीं, अपमानास्पद अशा तहाच्या अटी सुखासुखी कोण पत्क-रील ? पण आता प्राण जातो कीं राहतो अशी स्थिति झाल्यावर, त्या पत्क-राव्यात की न पत्कराव्यात यांत विवेक करण्याला अवसरच राहत नाहीं ! आजपर्यंत इतर सर्वांना आपण जो दोप दिला तो निदान आपणावर तरी येऊ नये असें वागण्याची संधि आता इंग्लंडावर मात्र आली आहे. तेव्हा आपल्या बलाढ्य साम्राज्याच्या मदतीवर भिस्त ठेवून योग्य तें उदाहरण इंग्लंड तरी जगाला घालून देईल अशी आशा कां न करावी ?

प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, फ्रान्सनें शरणागति स्वीकारली ती थांब-विण्याला आपल्या हातून जर कांही मदत होण्यासारखी नाही, तर त्याला नांवें ठेवून त्याच्या दुःखावर कोणी डाग देऊ नये. स्वतः जर्मनीलादेखील या गोष्टीची जाणीव आहेच. कारण सन १९१८साली त्यावर हुबेहूब हाच प्रसंग होता. दोस्तराष्ट्रांनी त्यावेळीं जर्मनीपुढे टाकलेल्या अटी इतक्या अपमानास्पद होत्या कीं तेव्हाच्या जर्मन सरकारनें व लोकांनी निराशेने दांत ओठ खाल्ले, आपल्या नखांनी आपल्या अंगाचीं रक्तें काढलीं, त्रागा केला, स्वतःला व शत्रूला शिव्याशाप दिले, आत्मविश्वासाचीं कमालीचीं बोलणीं बोलून तरी उसना धीर येतो का पाहिला. परंतु शेवटीं नाक दाबून जर्मनीला त्या अटी मान्य कराव्या लागल्या. त्या वेळचे कांही उद्गार असे आहेत.(हे मूळ इंग्रजीवरून भाषांतर करून दिले आहेत)"अटी मान्य न कराव्या तर काय करावें? मरणाराला आशा उरत नाही. जगेल तो आशा तरी बाळगील. तोफा कपाळाला येऊन भिडल्या, अशा वेळीं आपण शत्रूच्या अन्यायी बुद्धीचा निषेध हवा तेवढा करू पण उपयोग काय? नाही म्हटल्याने टळत नाही. आज 'नाही' याचा अर्थ आणखी चार दिवसांनी 'होय' आणि चार दिवसांत जो नाश होईल त्याचें काय? आज नाही म्हटलें होय म्हटलें, दोहोंचेंही वावदूक समर्थन सारखेंच करतां येईल. पण आज आमचीं मुलें व ज्या त्या मुलांचीं मुलें यांची वाट काय होणार? या आगीच्या डोंबाळ्यांतून तें दार समजून बाहेर पडलें पाहिजे. तह स्वीकारण्यांत लौकिक, आध्यात्मिक सर्वस्वाची हानि

आहे. या काट्यांतून जातांना अंगाचीं रक्तें निघतील. पण ती आग, ते कांटे, सोसून पलिकडे गेलों तर पुढे हातपाय कांही तरी हलवितां येतील. मरून जाण्याचा प्रश्न व्यक्तिमात्रापुरता असता तर त्याचें उत्तर देण्याला हजारों लोक मिळतील पण तेवढ्याने भागत नाही ना !

तहाच्या अटी मान्य कराव्या कीं नाही हा झगडा जर्मनीमध्ये दोन महिने सारखा सुरू होता. पण आणखी दोन वर्षे चालता तरी काय? प्रति-काराची आशा जेथे संपली तेथे सर्वच संपलें. १९१८ सालीं जर्मनीने व आज फ्रान्सने म. गांधींचें नॉन–व्हायोलन्सचें (अनत्याचारित्वाचें)तत्त्व मान्य केलें पण तें केव्हा? म्हणजे आधी प्राणांतिक सशस्त्र युद्ध व आत्मरक्षणार्थ 'व्हायोलन्स' करून तें निष्फळ ठरल्यावर! पण तें युद्ध आधी केलें म्हणून तेव्हा जर्मनीला व आज फ्रान्सला शूर बहाद्दर इतकें तरी म्हणवून घेता आलें! नाहीं तर पुरुष व बायको एकच !

---

## (लेखांक ३ रा)

युद्धाअखेर कच्च्या तहावर सह्या झाल्या म्हणजे व्यक्तीवरील प्राणसंकटें टळतात. कारण प्रत्यक्ष मारामारी थांबते. पण जिंकल्या गेलेल्या लोकांच्या मनांत तेथून पुढे आपल्या राष्ट्रावरील प्राणसंकटाची चिंता उभी राहते. प्राण्याचा प्राण एका क्षणांतहि जातो. राष्ट्राचा प्राण जाण्याला वर्षानुवर्षे लागतात.

१९१९ च्या नोव्हेंबरांत कच्च्या तहावर सह्या झाल्या तेव्हाच जित जर्मन राष्ट्र उपाशी मरत होतें. पण दोस्त राष्ट्रांनी ती उपासमार पुढे आठनऊ महिने चालू ठेवली. त्यांनी आपले लोक जर्मनीच्या कैदेंतून सोड-वून आणले, पण जर्मनीचे परत दिले नाहीत. जर्मन सैन्य सर्वच्या सर्व परत जर्मन हद्दींत काढून नेण्याला अगदी काटेकोर अशी थोडी मुदत दिली. पण उलट, एक महिन्याच्या आंत जर्मनीने तावडतोब पांच हजार चालतीं

रेल्वे इंजिनें, पंधरा हजार रेल्वेचे डबे, व पांच हजार मोटार लॉऱ्या दोस्तांच्या स्वाधीन केल्या पाहिजेत अशी सक्ती केली! सैन्य वाहून नेण्याचीं साधनें स्वाधीन केल्यावर आपलें लाखों सैन्य जर्मनी अल्पावधींत शेकडों मैल परत कसें नेणार? पण हा दुहेरी कोलदांडा जर्मनीला तेव्हां घालण्यांत आला खरा!

कच्च्या तहाच्या मुदतीवर मुदती वाढूं लागल्या, व त्यांचा दुरुपयोग फ्रान्सने नव्या नव्या अटी घालण्याकडे केला. आणि 'कच्च्या तहाची एखादी लहानशीहि अट अमलांत येण्याची राहिली तर, अठ्ठेचाळीस तासांची नोटीस देऊन, तोफांची सरबत्ती सुरू करू' असल्या धमकीची तरवार जर्मनीच्या डोक्यावर खडी ठेवलेली होती!

पुढे पक्क्या तहाच्या वाटाघाटीला जर्मनीने प्रतिनिधि पाठवावयाचे ते, येतांना बरोबर, सर्वाधिकारपत्रच घेऊन आलेले असावे असा आग्रह फ्रान्सने धरला. याचा अर्थ 'होय कीं नाही' याचा निकाल जागच्या जागीं मुखत्यारीनें झाला पाहिजे! बर्लिनमध्यें असलेल्या वरिष्ठ सरकाराला संधि व त्याला लागणारी मुदत मिळावयाची नाही! दोस्तांच्या अटींचा मसुदा म्हणून चारशें पानांचें पुडकें जर्मन वकिलाच्या पुढे टाकण्यांत आलें. आणि अटीसंबंधाचें जर्मन वकिलाचें म्हणणें असेल तें तोंडी सांगू देणार नाही, लेखी दिलें पाहिजे, अशी सक्ती केली! जर्मन वकिलाना घरांतून बाहेर पडण्याची परवानगी होती. पण त्याना हळूच असें सांगण्यांत येई कीं, 'फ्रेंच लोक जर्मनीवर चवताळून उठलेले आहेत. तेव्हा फार दूरवर हिंडूफिरून त्यांच्या तावडींत न सांपडाल तर बरें' !

ही तहाच्या चौकटीवरील वेलबुटी होती. आता आंतील चित्र काय होतें तें थोडक्यांत पाहूं. तहाच्या मुख्य मुख्य अटी खालीलप्रमाणें होत्या.

प्रथम मुलुखाची हानि घेऊ. त्याविषयीं अट अशी होती कीं, जर्मनीने आल्सेस व लोरेन हे दोन प्रांत फरान्सला द्यावे. जर्मन लोक बहु-संख्य असलेले कांही मोठे मुलुख पोलंडला द्यावे. सायलेशिआचा कांही, म्हणजे ज्यांत सर्वस्वी जर्मन वस्ती आहे असाहि, एक भाग पोलंडला

द्यावा. डेन्मार्क, बेल्जम, चेकोस्लोव्हाकिया यांना कांही मुलूख द्यावा. यांतहि वरीच जर्मन वस्ती होती. सार प्रांत फरान्सला द्यावा; कारण त्यांत खनिज संपत्ति पुष्कळ होती. आपल्या सर्दच्या सर्व वसाहती जर्मनीने सोडून द्याव्या.

वरील अटींवर थोडक्यांत पहिलीच टीका अशी कीं, लोरेन प्रांत हा फरेंच लोकसंख्या असलेला व संस्कृतीने फरेंच वळणाचा म्हणून तो फरान्सला परत दिला तें योग्य केलें असें म्हणता येईल; पण आल्सेस हा सर्वस्वी जर्मन लोकांचा प्रांत होता. तो देणें अन्यायाचें होतें. आपल्या 'फरान्स' या पुस्तकांत ( १९२६ ) हडलस्टन हा इंग्रज ग्रंथकार म्हणतो, 'France has not dealt with complete wisdom towards Alsace Loraine and a serious problem already presents itself' ( फ्रान्सची, आल्सेस लॉरेनसंबंधाची, वर्तणूक पूर्णपणें शहाणपणाची नाही. त्यामुळें आधींच एक मोठा वादग्रस्त प्रश्न उत्पन्न होऊन राहिला आहे.)

१९१९ सालीं ते प्रांत फ्रान्सला मिळाल्यावर, फ्रान्सने त्यांतील जर्मन लोकांवर फ्रेंच भाषा शिकण्याचीहि सक्ती सरकारी हुकमाने सुरू केली ! तशीच सामाजिक चालीरीतीवर आल्सेस लोरेन हा प्रांत फ्रान्सला किंवा जर्मनीला पचविता आला नाही. म्हणून व्हर्सायच्या तहांत तो प्रांत स्वयं-शासितच करावयास पाहिजे होता. तीच गोष्ट इतर मुलुखांसंबंधी. आणि सर्वांत विपरीत हें कीं, ज्या स्वयंनिर्णय तत्त्वाचें यज्ञकंकण हातांत बांधून महात्मा प्रेसिडेंट विल्सन यांचा अवतार अमेरिकेहून निघून फ्रान्सला आला होता. व या अद्भुत नैतिक तत्त्वाच्या भूमिकेवर युद्ध संपवून चिरंजीवी शान्तता प्रस्थापित करणार होती, तेंच तत्त्व वरील चिरफाडीच्या नक्की विरुद्ध होतें !! पण प्रेसिडेन्ट विल्सनहि चकला. लॉईड जॉर्ज व क्लेमाँसो यांनीं त्याला गुंडाळून खिशांत घातला. विल्सननें केलेली ही घोडचूक दूर अमेरिकेंत अमेरिकन लोकांच्या लक्षांत आली. आणि त्या क्षणापासून विल्सनचें वजन नाहीसें होत चाललें.

अध्यक्ष विल्सन याचा सेक्रेटरी म्हणून, रॉवर्ट लॅन्सिंग नांवाचा अधि-कारी मुत्सद्दी त्याच्या बरोबर पॅरिसला आला होता. त्याचें व विल्सनचें

अनेकांपैकीं याहि मुद्द्यावर बनलें नाहीं. राजिनामा देऊन परत गेल्यावर लॅन्सिगनें याविषयीं स्वतंत्र ग्रंथच लिहिला आहे तो वाचकांनीं पाहावा. त्यांतील येथें लागू असे फक्त दोन-तीन उतारे भाषांतर करून देतों. लॅन्सिग म्हणतो, "व्हर्सायिच्या तहानें कांहीं जर्मन मुलूख ऐनजिनसी इतरांना दिला गेला, आणि सरहद्दी वाटतील तशा बदलल्या. या गोष्टी धडधडीत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाविरुद्ध होत्या ! जर्मनीबाहेर चिनांतील कियाचो हें जर्मन ठाणें जपानला व टायरोल हा ऑस्ट्रियन प्रांत इटालीला दिला ही गोष्टहि अशीच सदोष होती." तो म्हणतो–"असा मुलूख मालकीचा करून देणें वाईट दिसेल म्हणून 'मॅण्डेट' नामक हुकमतीची कपटी कल्पना निघाली! पण ती नुसती डोळ्यांत धुळफेक होती, आणि तीहि एवढ्याकरितां कीं, या मुलुखाची कांही तरी किंमत म्हणून एरवीं जर्मनीला हक्कानें मागता आली असती तीहि मागता येऊ नये ! ही किंमत मिळती तर जर्मनीला आपल्यावरील भूर्दंड पैशानें थोडा तरी हलका करता आला असता. उलट ज्या राष्ट्रांना जर्मनीचे हे मुलूख दिले त्यांना, नांवाने मालकी मिळाली नाही म्हणून किंमतहि द्यावी लागली नाही. आणि इतर रीतीनें जर्मनीविरुद्ध मांडलेला नुकसानभरपाईचा दावा शिल्लकच उरला." लॅन्सिगनें म्हटलें आहे–

"In actual operation the apparent alturism of the mandatory system worked in favour of the selfish and material interest of the powers which accepted the mandates."

तोंडानें म्हणावयाचें आम्ही काय या मुलुखाचे नुसते रखवालदार ! पण इतक्या अवधींत त्या राष्ट्रांनी त्यांतील संपत्ति खोऱ्यानें ओढली आहे. अमेरिकेला ही गोष्ट तेव्हाच पसंत पडली नाही, म्हणून शेवटी अमेरिकन पार्लमेंटनें व्हर्सायिच्या तहाला संमति दिली नाही. अमेरिकेला लांच म्हणून आर्मिनियावर हुकमत देऊ करून पाहिली, पण ती तिनें नाकारली.

शेवटी तोडून दिलेल्या कांही कांही मुलुखांना जेव्हा स्वयंनिर्णयाचें तत्त्व लावून मतमोजणी केली, तेव्हा यांतील अन्याय व कपट आंकड्यांनीच

सिद्ध झालें. उदाहरणार्थ पोलंडला दिलेल्या 'आलेन्सस्टिन' प्रांतांत 'आम्ही जर्मनीकडे जातो' अशीं म्हणणारी शेकडा ९७ मतें पडलीं! आणि 'आम्ही पोलंडकडे राहतो' म्हणणारीं शेकडा ३ मतें पडलीं! यावरून हा प्रदेश जर्मनीकडून काढून घेऊन पोलंडला दिला हा केवढा अन्याय झाला होता हें सहज दिसून येईल.

जर्मनीच्या निःशस्त्रीकरणाला फारसा दोष देता येत नाही. व्हर्सायच्या तहाने असें ठरलें कीं, जर्मनीने लष्करी सैन्य व आरमारी सैन्य मिळून एक लक्षाहून अधिक सैनिक पदरीं ठेवू नयेत. आणि सर्व प्रकारचें खासगी लष्करी शिक्षण बंद करावें. तसेंच मोठचा तोफा, टँक्स, विमानें, लढाऊ जहाजें व पाणबुड्या हीं सर्व अगदी मर्यादित संख्येइतकी ठेवावीं. जर्मनीचें सगळेंच्या सगळें आरमार इंग्रजांनी स्वाधीन करून स्कापा फ्लो येथील बंदरांत ठेवलें. जर्मन खलाश्यांनी तें सर्व आपल्याच हाताने बुडवून टाकलें ही गोष्ट वेगळी. पण कसेंहि असलें तरी अशा रीतीने जर्मनी सर्वस्वी निःशस्त्र व निरुपद्रवी केला गेला. जर्मनीने आज तहांत तोच डाव फ्रान्सवर उलट टाकला आहे.

व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर दोन प्रकारचें ऋण लादलें. एक नुकसानभरपाई म्हणून आणि दुसरें दंड म्हणून. पैकी नुकसानभरपाईच्या तत्त्वांत चूक नव्हती. जर्मनीने बेल्जियमचा सत्यानाश केला होता. शहरें, कोट, किल्ले, देवळें इत्यादि इमारती तर जमीनदोस्त केल्याच. पण कांही कोळशाच्या खाणींचा निष्कारण नाश केला! तोफांच्या मारगिरींत पडझड होणें वेगळें, पण खाणींचा नाश हा शुद्ध अत्याचार होता; त्याबद्दल जर्मनी-कडून नुकसानभरपाई मागणें योग्य होतें. पण त्याकरिता मागितलेली रक्कम एवढी प्रचंड होती कीं ती देणें जर्मनीला अशक्य होतें.

नुसता पहिला हप्ताच एक अब्ज ( शंभर कोटि ) पौंडांचा होता; व हें निमित्त करून पंधरा वर्षेपर्यंत ऱ्हाईन–कांठचा प्रांत जर्मनीच्या खर्चाने फ्रेंच सैन्याच्या ताब्यांत राहावा असें कलम घातलें गेलें. आणि नुकसान भरपाईचा हक्क सांगता यावा म्हणून "आम्ही एकटेच महायुद्धाकरिता जबाबदार आहों" असें जर्मनीकडून लिहून घेतलें! 'आम्ही एका हाताने

टाळी वाजविली' असें लिहून घेण्यासारखेंच तें निरर्थक व हास्यास्पद होतें. जर्मन प्रतिनिधींनी आपल्या राष्ट्राच्या पदरांत हा दोष घेण्याविरुद्ध जितकी खळखळ केली तितकी दुसरी कशावरही केली नाही. कारण या महायुद्धाला वास्तविक किती जणांच्या चुका कारण झाल्या होत्या पहा !

त्या महायुद्धापूर्वी ऑस्ट्रियन राजपुत्राचा खून एका सर्व्हियन माथे-फिरूने केला म्हणून, या एका माणसाच्या चुकीबद्दल ऑस्ट्रियाने तलवार उपसून हंगेरीला निर्वाणीचा खलिता पाठविला, ही ऑस्ट्रियाची चूक ! आपल्या पंखाखालील एका पिलावर ऑस्ट्रियाने पंजा उगारला एवढ्या-करिता रशियाने ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारलें, ही रशियाची चूक ! फ्रान्सने रशियाशी केवळ दोस्तीचा तह झालेला म्हणून रशियाची बाजू घेऊन तलवार उपसली, ही फ्रान्सची चूक ! ऑस्ट्रियाचा पक्षपाती जर्मनी यानें मुख्यतः रशिया सोडून फ्रान्सवर स्वारी केली आणि तीहि बेल्जियममधून केली, ही जर्मनीची चूक ! आणि बेल्जियमला साहाय्य करणें हें सहानुभूतिदृष्ट्या योग्य पण कायदेशीर दृष्टीनें अवश्य नसता, इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें, ही इंग्लंडची चूक !

तात्पर्य, अशा रीतीने त्या पापकाळांत सगळ्यांच्याच चुका झाल्या असें असतां, एकट्या जर्मनीवर सर्व जबाबदारी टाकली, हा व्हर्सायच्या तहानें मोठा अन्याय केला असें जर्मन प्रतिनिधींचें म्हणणें होतें. पण ' वो टु धी कॉंकर्ड ' अशी इंग्रजींत म्हण आहे. म्हणजे ' हरेल त्याच्या डोक्यावर (ओझ्याचा) हारा ' याप्रमाणें घडलें. एकदा लीग ऑफ नेशन्समध्ये, किंवा मला वाटतें, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये, या मुद्द्याची चर्चा झाली असतां लॉर्ड सॅलिसबरी यांनी उघड रीतीनें कबूल केलें कीं, ' बेल्जियमवर जुलूम झाला ही गोष्ट खरी. परंतु जगांत पुष्कळ ठिकाणीं असे जुलूम चालू अस-तात. म्हणून बेल्जियमच्या वतीनें इंग्लडने युद्धांत पडलेंच पाहिजे होतें हें त्याचें अनिवार्य नैतिक कर्तव्य होतें असें ठरत नाहीं. ' पण खुणेची खरी गोष्ट वर सांगितलीच आहे. ती अशी कीं, जर्मनीच्या गळ्यांत तेव्हा तशा कबुलीचें खापर अडकविल्याशिवाय फ्रान्सनें म्हणा, दोस्त राष्ट्रांनी म्हणा, जर्मनीच्या माथीं नुकसानभरपाई म्हणून व दंड म्हणून जी रक्कम मारली ती मारण्याला चांगलासा आधार मिळाला नसता.

## (लेखांक ४ था)

मागील लेखाचे शेवटीं सांगितलेल्या, म्हणजे जर्मनीवर बसविलेल्या दंडाची हकीकत विशेष लक्ष देण्यासारखी आहे. मुख्य मुद्दा रकमेचा. ज्योतिर्गणितांत तारे व ग्रह यांचीं अंतरें मोजून सांगण्याला ज्या अगाध आंकड्यांचा उपयोग करतात तशा आंकड्यांनीच ही रक्कम मोजतां येणारी आहे! आणि त्यामुळच म्हणा ना, ती रक्कम केव्हांहि वसूल झाली नाही. पहिलीं चार–पांच वर्षें जर्मनीनें कांहीं थोडथोडा दंड भरण्याचा प्रयत्न केला. त्यांतून योग्य ती थोडीबहुत नुकसानभरपाई बेल्जम व फ्रान्स यांना मिळाली. पण मुळांत हप्त्यांचा हिशोबच साठ वर्षांवर पसरलेला होता. म्हणून शेवटीं आपल्या वजनानेंच हें ओझें जमीनीवर कोसळलें !

जर्मनीनें 'शुद्ध' सत्याग्रहच केला. एखादें कर्जदार कूळ, निराशेनें नेसूचें धोतर सोडून, तें सावकाराच्या अंगावर फेकून, जमीनीवर बैठक मारून बसतें. आणि त्याला म्हणतें, "हा घे मी जमीनीला टेकलों. आतां तूं माझें काय वसूल करून घेणार तें घे !" तेंच जर्मनीनें केलें.

१९२२ सालीं फ्रान्सनें पुढील हप्ते वसूल करण्याकरिता जर्मनीच्या रूहर प्रांतावर स्वारी केली. हेतु हा कीं त्या संपन्न भागांत लोखंडाच्या, कोळशाच्या, प्रचंड खाणी होत्या आणि क्रुप थायसेन वगैरे मालकांचे प्रचंड यांत्रिक कारखाने होते. तेव्हां हें ताब्यांत ठेवून त्यांचें सर्व उत्पन्न आपणांकडे लावून घेतलें म्हणजे हप्तेवसुलीला मदत होईल !

सुमारें ५० हजार फ्रेंच सैन्य या रूहर प्रांतांत पेरलें गेलें. त्याचा परिणाम मात्र 'निःशस्त्र लोकांवर सशस्त्रांची स्वारी' असा दारुण झाला. येथील कारभारावर देखरेख करण्याकरिता नेमलेल्या कमिशनच्या रिपोर्टां-तच असें म्हटलें आहे की, 'या कारभारांत दुष्काळासारखी स्थिति झाली. एकहि इमारत धड उभी राहिली नाही. शेंकडो जर्मन मारले गेले. आणि आगंतुक दंडवसुलीच दोन कोट पौंड झाली. सव्वालक्ष मुलें घराबाहेर पडलीं. दोनशें वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांना टाळीं लागलीं. भर रस्त्यांत चोर सावांना

लुबाडू लागले. आणि इतकें करून दंडाच्या हप्त्यांची वसुली यथातथाच झाली ! ' हें कमिशन दोस्त राष्ट्रांनी नेमलेलें होतें हें लक्षांत ठेवावें !

शिवाय यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशनच्या एका अमेरिकन इन्स्पेक्टरनेहि अशीच हकीकत प्रसिद्ध केली आहे. असो. पुढें फ्रान्सलाच कळून आलें कीं, कांही केल्याने दंडवसुली पुरी होत नाही, म्हणून त्यानंतर एकामागून एक योजना–कमिशनें नेमण्यांत आलीं. एकाला डॉज कमिशन, दुसऱ्याला यंग कमिशन इत्यादि नांवें आहेत. या कमिशनांनी दंडाच्या रकमा हळूहळू उतरवीत आणल्या. आपल्या इकडे एक गांवठी पण विनोदी म्हण आहे ती ही कीं, " पांडव किती ? तर वाजल्याच्या खुराइतके तीन " आणि असें म्हणून शेवटीं दोनच बोटें हातानें दाखवावयाचीं. त्याचप्रमाणे दंडाच्या जमाबंदीची थट्टा झाली. !

आणि शेवटीं सर्वांत मौजेची गोष्ट ही कीं, जर्मनीकडून दंडवसुली तर थांबलीच, पण ज्या इतर राष्ट्रांनी अमेरिकेचीं कर्जें काढलीं होतीं, त्यांनी, ही संधि साधून, आपापल्या कोनाड्यांत शेणाच्या पणत्या ठेवून, 'खाका वर करून, आपली दिवाळखोरी बेशरमपणें प्रकट केली ! म्हणून हल्लीच्या युद्धांत ' मालाचा पैसा आणि पैशाचा माल ' अशी दुकानदारी करण्याची फायदेशीर संधि आली तेव्हा, जुन्या अनुभवाचा फायदा घेऊन, अमेरिकन सरकारानें आपल्या दुकानावर मोठ्या अक्षरांत पाटीच लावून टाकली. ती अशी ' टक्का रोख व्यवहार चोख ' cash and Carry ' पैसा रोख आला आता माल उचला ! अन्यायी किंवा लोभी सावकारांना जें फळ जगभर मिळतें तेंच शेवटीं अमेरिकेला मिळालें.

लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की, या दिवाळखोरीच्या पर्वणींत स्वतः इंग्लंडनेहि आपला हात धुवून घेतला. ओघानेच आलें म्हणून सांगतों कीं, १९३२ सालीं मी विलायतेस गेलों असतां, एके दिवशीं रिकामा म्हणून पार्लमेंटचें काम पहाण्याला गेलों. त्या दिवशीं अमेरिकन युद्धकर्जाच्या परत फेडीचीच चर्चा चालली होती ! ती लक्षांत ठेवून ' सावकाराला सुटी ' या मथळ्याचा एक वर्णनात्मक लेख मी केसरींत लिहिला, तो कदाचित् कोणा वाचकांच्या लक्षांतहि असेल.

यानंतर आणखी एक कलम. तें जर्मन अधिकाऱ्यांचा इनसाफ करून त्यांना शिक्षा देण्याचें. स. १९२० च्या प्रारंभीं दोस्त राष्ट्रांनी जर्मनीकडे खलिता पाठवून अशी गुरमीची मागणी केली कीं " कायसर विल्यम, हिंडन-बुर्ग, ल्यूडेनडॉर्फ, टिरपिटझ, बेथमन हॉलवेग, इत्यादींसह आठशेंपंचाण्णव ( ८९५ ) अधिकारी गुन्हेगार म्हणून दोस्तांच्या स्वाधीन करण्यांत यावे. दोस्त राष्ट्रें एक न्यायमंडळ नेमतील व निर्णय देतील." पण कच्च्या तहा-पूर्वीच कायसर हॉलंडमध्ये पळून जाऊन राहिला. आणि तो स्वाधीन करण्याची मागणी हॉलंडकडे करण्यांत आली ती डच सरकारानें धुडकावून लावली! वरील ८९५ पैकी इतर कांहीजण असेच पसार झाले म्हणून ते वांचले! वास्तविक शत्रुपक्षाच्या सैनिक–सेनापतींची गुन्हेगार म्हणून चौकशी करण्याची मागणी अगदी अयोग्य होती. अमेरिका, जपान व कांहीसा फ्रान्सहि याला प्रतिकूळ होता. पण या कामीं इंग्लंडनेच विशेष आग्रह धरिला! जर्मनींत राज्यक्रांति झाली होती तरी कायसरला शत्रूच्या स्वाधीन करणाऱ्या प्रधानमंडळाला जर्मन लोकांनी फाडून खाल्लें असतें! अखेर न्यायइनसाफाचा फार्स कांहीं थोडया किरकोळ माणसांसंबंधानें झाला पण तो सर्व वार फुसका ठरला, व कायसरला फांशी देण्याची लॉइड जॉर्जची घोषणा फुकट गेली!

असो! आणखी अन्यायाचीं कलमें म्हणून या व्हर्साय तहांतील किती सांगावीं ? इकडे स्वयंनिर्णयाचें तत्त्व प्रस्थापित केलें, पण ऑस्ट्रियासारख्या देशाला त्याचा फायदा घेऊं दिला नाही. तो मिळता तर त्यानें देशांतील राजशाही मोडून टाकल्यावर जर्मन रिपब्लिकशी एकसंध होण्याचा निर्णय केला असता. पण दोस्तांनी ऑस्ट्रियावर स्वतंत्र राहण्याची सक्ती केली ! डॅन्झिक बंदरापर्यंत एक पट्टी आंखून घेऊन तिच्या योगानें प्रशियाचीं दोन शकलें केलीं. या पट्टीवरील जर्मनीचा अधिकार काढून घेतला व डॅन्झिक शहर आणि बंदर मुक्तद्वार केलें. जर्मनीचें सगळें व्यापारी आरमार दोस्तांनी ताब्यांत घेतलें. जर्मनीबाहेर जर्मन लोकांची खाजगी मालमत्ता होती ती सर्वच्या सर्व जप्त केली. रशियानें जर्मनीशी स्वतंत्र तह केला होता तो रद्द करविला.

शेवटीं एकच लहानशी गोष्ट. ती म्हणजे जर्मनीने फ्रान्सला दीड लक्ष दुभत्या गाई द्याव्या ही अट! तरी बरें, दुभत्या गाईऐवजी दुभत्या दाई मागितल्या नाहींत! म्हणजे एकूण तहांत काय मागावें न मागावें याचा सुमारच दोस्त राष्ट्रांना राहिला नाही.

सर्वांवर शिखर हें कीं जर्मनीला राष्ट्रसंघांत स्थान दिलें नाही; कारण या संघांत बसणारा तो बरोबरीचा ठरतो! आणि जिंकलेल्या शत्रूला बरोबरीचा मान कसा द्यावा? शेवटीं भांडून भांडून १९२६ सालीं जर्मनीने राष्ट्रसंघांत स्थान मिळविलें. पण तेथील चरित्र पाहिल्यावर, आणि पुढे तर आपलें सामर्थ्य कळून आल्यावर, जर्मनीने आपण होऊनच राष्ट्रसंघाचा खोडा आपल्या पायांतून काढून टाकला!

दोस्त राष्ट्रें स्वार्थी म्हणून त्यांनी जर्मनीला होणाऱ्या अन्यायाकडे डोळेझाक केली हें स्वाभाविकच होय पण भविष्यकाळांतील अनर्थ टळण्याकरतां प्रे. विल्सन याने राष्ट्रसंघाची म्हणून जी कल्पना काढली, ती परिणत होण्याकरितां प्रथम पक्क्या तहावर सह्या होण्याला पुष्कळच वेळ लागला आणि त्यामुळे जर्मनीची कुचंबणा झाली. त्या राष्ट्रसंघाचें वास्तविक स्वरूप काय होतें हें अमेरिकन सेक्रेटरी लॅनसिंग याने आपल्या ग्रंथांत स्पष्ट सांगितलें आहे.

"It must be admitted in honesty that the League of Nations is an instrument of the mighty to check the normal growth of the national power, and national aspirations, among those who have been rendered impotent by defeat! Examine the treaty and you will find peoples delivered, against their wills, into the hands of those whom they hate, while their economic resources are torn from them and given to others. Resentment and bitterness, if not desperation, are bound to be the consequences of such provisions. It may be years before these oppressed peoples are able to throw off the yoke, but as sure as day follows night, the time will come when they will make the efforts."

"प्रामाणिकपणें बोलावयाचें तर हेंच कबूल करावें लागतें कीं राष्ट्र-संघ म्हणून जी संस्था निर्माण करण्यांत आली ती एक शुद्ध कपटयंत्र आहे! त्याचें कर्मकौशल्य हेंच कीं, युद्धांत जीं राष्ट्रें पराभूत व हतबल झालीं असतील त्यांची नैसर्गिक भावी प्रगति, परिणति, राष्ट्रीय तेज व आकांक्षा या सर्वांवर दाब बसावा. म्हणजे तीं राष्ट्रें कायमचींच खुरटलेलीं राहावीं. व्हर्सायिचा तह नीट पहा; त्यांत हें आढळेल कीं, कांहीं ठिकाणच्या लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या द्वेष्यांच्या (शत्रूंच्या) हातीं देण्यांत आलें आहे. त्यांची आर्थिक सुस्थितीचीं साधनें त्यांजपासून हिरावून घेऊन दुसऱ्यांना देण्यांत आलीं आहेत. पण अखेर याचे परिणाम काय होणार ! राग, द्वेष जळफळाट हेच कीं नाही? या जुलमाचें जोखड आपल्या मानेवरून काढून टाकण्याला त्या लोकांना कित्येक वर्षें लागोत, पण तसा प्रयत्न केल्याशिवाय ते कधींही राहणार नाहींत, ही काळ्या दगडावरची रेघ समजावी." (लॅनसिंग पृ. २७३) तो आणखी म्हणतो, "या राष्ट्रसंघाची गुरुकिल्ली अशी आहे कीं, त्यांत जीं पांच प्रमुख गुंड राष्ट्रें आहेत, त्यांचें एकमत झालें कीं, इतर कोणाहि सभासदाला त्यांना नमवितां येतें व कशालाहि होकार भरण्याला लावतां येतें. मग न्याय राहो बाजूला. अन्यायावर न्यायाचा शिक्का पाडणें सुलभ झालें. नांवाचा राष्ट्रसंघ पण या पांचांचा तो कट व गट यांहून कांही नाही! यामुळे या राष्ट्रसंघांत कपट, गुप्त कारस्थान आणि लोभबुद्धि यांचीच कारवायी चालत राहणार. अशा स्वार्थाच्या वाळूवर बांधलेला हा न्यायबुद्धीचा दिखाऊ किल्ला कोसळल्याशिवाय कसा राहील? आणि व्हर्सायिच्या तहाच्या कमानींतील मुख्य कैंचीचा दगड म्हणजे हा राष्ट्रसंघ ! तेव्हां यांतून पुढे शांतता निघेल कीं युद्धें निघतील याची कल्पना कोणालाहि करतां येईल."

व्हर्सायिच्या अन्यायी तहाच्या कलमांत प्रत्येक दोस्त राष्ट्राच्या दुराग्रहाने थोडीफार भर पडलीच. पण सर्वांत अधिक फ्रान्सच्या आग्रहाने व सर्वांत कमी इंग्लंडच्या आग्रहाने. इंग्लंडचें धोरण सौम्य असण्याचें खरें कारण मात्र जर्मनीविषयी प्रेम हें नसून, जर्मनी रशियाच्या हातीं जाऊन बोल्शेविक होण्याची भीति हेंच खरें कारण होतें. असो.

या एकंदर तहासंबंधानें खुद्द इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज याच्याच लेखी मताचा एक उतारा देतों. त्यावरून खात्री होईल.

ता. २५ मार्च १९२० च्या एका खलित्यांत तो लिहितो.

" आम्ही असला कडक तह केला तर तो फार तर एक पिढीपर्यंत टिकेल. पण त्यानंतर पुन्हा कलह सुरू होईल. युद्ध माजेल. १८७१ चा तह जर्मनीने फ्रान्सवर लादला, त्याने जर्मनीला कायमचें वर्चस्व मिळेल अशी समजूत होती. पण उलट झालें. तसेंच या तहाचें होईल."

" You may strip Germany of her Colonies, reduce her armaments to a mere police force and her navy to that of a fifth rate power. All the same in the end if she feels that she has been unjustly treated in the peace of 1919, she will find means of exacting retribution from her Conquerors."

आणि चालू महायुद्धाने हें भविष्य शेवटीं खरें झालें नव्हे काय ? व्हर्सायच्या तहाचे दोष तके तपशीलवार मी दाखविले याचें कारण हेंच कीं, युद्धांत जय मिळाल्यावर कोणत्याहि राष्ट्राची न्यायबुद्धि शुद्ध रहात नाहीं ! आणि ती शुद्ध न राहिली तर, राष्ट्रद्वेषाच्या विषवृक्षांतून एका-मागून एक कोंब फुटून त्याच्या शाखा पसरतात. आणि फिरून त्या वृक्षाचीं फळें जमिनीवर पडून पुन्हा त्यांतून त्याच जातीचे विषवृक्ष निर्माण होतात. ही गोष्ट, जर्मनीला आज फरान्सवर व इतर कांही देशांवर जय मिळवितां आला आहे म्हणून त्याने वेळींच लक्षांत ठेवावी. इंग्लंडने देखील पूर्वीची चूक पुन्हा करू नये असें म्हणतां येईल. परंतु इंग्लंडला जय मिळाल्यावर ! आज त्याच्या जयापजयाविषयी कोणास कांही बोलतां येण्यासारखें नसल्यामुळे, जुन्या दाखल्यांचा बोध घेण्याला त्याला अवसरच नाही हें उघड आहे.

असो. व्हर्सायच्या तहाला नांवें ठेवण्याला आधारभूत असे उतारे ज्या ग्रंथांतून मी घेतले आहेत ते तहानंतर बऱ्याच काळाने प्रसिद्ध झालेले आहेत. पण या तहाच्या वाईटपणाविषयीच्या मताचा एक अस्सल व अगदी सम-कालीन असा पुरावा गमतीने सुचला तो देतों. हा पुरावा स्वतः माझ्या साक्षींतला आहे ! त्याचा प्रकार असा—

तह झाला त्या दिवशीं मी विलायतेंत होतों. ता. १९ जून १९१९ रोजीं मी माझें वातमीपत्र 'केसरी'ला लंडनहून पाठविलें त्यांत मी लिहिलें– "तहासंबंधानेहि, युद्धकर्जाप्रमाणेंच, येथें दुमत दिसून येतें. जर्मनीवर जबर अटी लादण्यांत येणार याबद्दल अिंग्लंडांतील वरच्या वर्गाला खूप आनंद झाला आहे. मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज हे अटी थोड्याशा सौम्य करणार. अशी मध्यंतरीं येथें वातमी पसरली होती. पण जबर अटी लादण्याचें श्रेय फरेंच प्रधानानें मिळविल्यामुळे लॉईड जॉर्ज यांच्यावरील देशद्रोहाचा आरोप आयता परस्पर निभावला. मॉंटेग्यू (स्टेट सेक्रेटरी) यांनी दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगीं टेबलाजवळ माझ्या शेजारीं बसलेल्या एका बड्या गृहस्थाने कदाचित माझें मन पाहण्याकरितां असेल, मला विचारलें कीं तुम्हांला तहाच्या अटींबद्दल काय वाटतें'? मी म्हणालों, 'मला यांतलें फारसें कळत नाही.' तथापि त्यांनी 'तरी पण' असें म्हटल्यावर मी म्हणालों, 'मला अटी फारच कडक वाटतात व यापुरती जर्मनीविषयी कोणाहि त्रयस्थाला सहानुभूतीच वाटेल!' ते गृहस्थ म्हणाले, 'पण जर्मनी यशस्वी झाला असता तर त्याने अिंग्लंडवर कशा अटी लादल्या असत्या याची कल्पना तुम्हांला आहे काय?' मी म्हणालों, 'होय, जर्मनीनेंहि हेंच केलें असतें, व मग तीच सहानुभूति आम्हांला तुमच्याबद्दल वाटली असती! पण त्यामुळे अटी सौम्य ठरत नाहीत.' (पहा समग्र केळकर–वाङ्मय, वार्ताहर खंड ६ पृ. ३९–४०)

---

## (लेखांक ५ वा)

गेल्या चार लेखांत व्हर्साय तहाचा अन्यायीपणा स्पष्ट करून दाखविण्यांत माझा हेतु हें सांगण्याचा आहे कीं, तो तह 'तसा' झाला नसता तर आजचें हें महायुद्ध 'असें' झालें नसतें! आता लढाऊ वृत्तीच्या व लढाऊ साधनांनी संपन्न असलेल्या राष्ट्राला दुसऱ्याशी युद्ध सुरू करण्याला फार थोडें निमित्त लागतें, हें मला ठाऊक आहे. स्वत: इंग्लंडने युद्धें उभारून जगभर साम्राज्य निर्माण करतांना कितीशीं सबळ कारणें पाहिलीं? तें इतिहासाच्या आधारानें सांगू लागलों तर एक स्वतंत्र लेखमाला लिहितां

येईल. म्हणून केवळ खुणेनेच निर्देश करावयाचा तर, आफ्रिकेंतील महादी व बोअर युद्ध, चीनवर अफू लादण्याकरिता आरंभिलेलें युद्ध, ब्रह्मदेशचें युद्ध इत्यादि युद्धांना कितीशीं सबळ कारणें होतीं ? पण तो विषय निर्भीडपणें सांगणें आज सोईचें नाही. म्हणून तो मी सोडून देतों. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, हिटलर हा कितीहि वाईट असला तरी तो व्हर्सायच्या तहाच्या अन्यायाची ढाल पुढे करून लढत आहे तोंपर्यंत, तिला टाळून त्याला लागेल अशी टीकेची गोळी मारणें कोणालाहि जरा कठीण जाईल. एरवी अस्सल हिटलरशाहीची राज्यपद्धति नष्ट झाली पाहिजे ही गोष्ट सर्वत्र सर्वमान्यच आहे त्यांत वाद नाही.

आतापर्यंत धूर्त हिटलरनेहि असा बहाणा केला आहे कीं, 'मी युद्धांत दुसरें तिसरें कांहीं मागत नव्हतों. व्हर्सायचा तह उखडून टाकणें हेंच माझें एक साध्य आहे. आणि तें करू देण्याला जे आड आले त्यांच्याशी मी युद्ध आरंभिलें इतकेंच.' जर्मनीने सन १९३३ पासून आतापर्यंत जें केलें तें हेंच एक केलें. हें वास्तविक कोणालाहि कबूल करावें लागेल. व्हर्सायचा तह उलथून पाडण्याव्यतिरिक्त त्याने अद्यापि कांही विशेष केलेलें नाही. आणि बेल्जम, नॉर्वे, हॉलंड, डेन्मार्क, फ्रान्स हे देश त्याने युद्धांत जिंकले असले तरी ते त्याला कायमचे जर्मनीचे सुभे करावयाचे नाहींत हें उघड दिसतें.

म्हणूनच आशा वाटते कीं फ्रान्स मार्गातून दूर झालाच, तेव्हा आतां इंग्लंड जर व्हर्सायच्या तहांतील उरलेलीं कलमें दुरुस्त करण्याला संमति देईल तर अजून हिटलर इंग्लंडवर स्वारी करणार नाही. त्या तहांतील उलगडण्यासारखीं आणखीं कांही कलमें शिल्लक आहेत तीं जर सामोपचाराने न उलगडलीं तरच इंग्लंडवर स्वारी होईल. शिवाय जगाच्या इतर भागांत युद्ध वाढत जाईल, व मग तें वर्ष दोन वर्षेहि टिकेल. कारण जगाचे हे इतर भाग म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, यांचे विद्यमान साम्राज्यविभाग वसाहती, जर्मनीकडून व्हर्सायच्या तहाने काढून घेतलेल्या वसाहती, व त्यांच्या सान्निध्याचे मान्याचे मुलूख या सर्व ठिकाणीं युद्ध भडकेल. पैकी या वसाहतींचाच प्रश्न घेऊन त्यासंबंधाने व्हर्सायच्या तहाने काय केलें हें सांगतों. म्हणून त्याकरिता प्रथम व्हर्सायच्या तहापूर्वी जगांतील राष्ट्रांच्या वसाहती कोठे

किती होत्या हें पाहूं. या वसाहतींची माहिती देणारें एक कोष्टकच या खाली देतों.

| | मूळ स्वराज्य. | | | साम्राज्यांतील वसाहती | |
|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्रफळ चौ. मैल | लोकसंख्या | लोकसंख्या [द.चौ.मै.] अदमासे | क्षेत्रफळ चौ. मैल हजारांत | लोकसंख्या हजारांत |
| ग्रेट–ब्रिटन | ९८,०४१ | ४६,०१०,५०० | ४८८ | २,३७५ | ६१,५०० |
| फरान्स | २१२,६५९ | ४१,९०७,०५५ | १९७ | ४,५०२ | ६३,५५२ |
| हॉलंड | १२,६९८ | ८,५५६,९२० | ६७३९ | ७९३ | ६४,६९० |
| जपान | १४७,६११ | ६९,२५४,१४८ | ४६९ | ६०१ | ६०,१६० |
| अमेरिका | २,९७२,७७६ | १२९,२५७,०६० | ४१·३ | ७११ | १४,१४४ |
| बेल्जियम | ११,७७५ | ८,३३०,९५९ | ७०७ | ९४२ | १२,९०० |
| इटाली | ११९,७१४ | ४२,९९३,६०२ | ३५५·२ | ९२५ | २,४८५ |
| पोर्तुगाल | ३४,२५४ | ७,२६०,००० | १८५·६ | ८०८ | ८,७२० |
| स्पेन | १९६,६०७ | ४,५८३,०९६ | १२५ | १२९ | १,००५ |
| जर्मनी | १८१,६९९ | ६३,०३०,४९१ | ३९३ | ० | ० |

वरील कोष्टकांत पूर्वीच्या म्हणून जर्मनीच्या सुमारें दहा लक्ष चौ. मै. क्षेत्रफळ व सव्वा कोटी लोकसंख्या असलेल्या वसाहती असें दाखवितां आलें असतें. पण आज तेथे मोठीं शून्येंच दाखवावीं लागत आहेत! या कोष्टकावरून हेंहि दिसेल कीं बहुतेक प्रमुख राष्ट्रांनी, आपल्या वाढत्या लोकसंख्येची बाहेर कोठे सोय लागावी, आणि स्वदेशांतील उद्योग-धंद्यांना लागणारा कच्चा माल बाहेरून मिळावा, याकरिता जगाच्या पाठीवर मुलुखगिरी करून मिळेल तेथे मुलूख मिळवून त्यावर साम्राज्याधिकार स्थापला. मग जर्मनीलाच तेवढ्या वसाहती कां नकोत? उलट फरान्सला इतक्या मोठ्या वसाहती कशाला हव्या? फ्रान्सची लोकसंख्या दरचौरस मैलीं फक्त १९७ इतकी तुरळक असतां, त्याच्या वांटयाला ४५ लक्ष चौ. मैल इतका बाहेर मुलूख! आणि जर्मनीची लोकसंख्या दरचौरस मैलीं ३९३ इतकी दाट असतां त्याच्या वांटयाला अवघ्या १० लक्ष चौरस मैलांचा वसाहती मुलूख होता. आणि व्हर्सायच्या तहाने तोहि सर्व काढून घ्यावा? हा कोठचा न्याय? इंग्लंडने जर्मनीकडे आत्मौपम्याने थोडेसें पाहिलें असतें तर, प्रस्तुत युद्धापूर्वी जर्मनीला त्याच्या वसाहती त्याच्या मागणीप्रमाणे देऊन टाकण्यास संमति द्यावी असें त्याला वाटलें असतें. वरें फ्रान्सच्या ताब्यांत इतका वसाहती मुलूख असतां त्याचें धोरण त्याविषयीं कितपत खरें अगत्याचें होतें हें पाहूं.

प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं फ्रेंच साम्राज्याची पुष्कळशी वाढ तिसऱ्या 'प्रजासत्ताक' राज्यांत झाली! इंग्लंडच्या राजवैभवाला साम्राज्य शोभतें असें कोणी म्हणेल तरी! पण प्रजासत्ताक राज्याला साम्राज्याची उठाठेव कशाला? बंधुता, समता, स्वातंत्र्य इत्यादि उदार तत्त्वांवर अधिष्ठित झालेल्या 'रिपब्लिकने' स्वदेशांतील गोऱ्या प्रजेला तेवढा या तत्त्वांचा लाभ द्यावा, आणि काळ्या पिवळ्या लोकांवर मात्र अंमल आणि गुलामगिरी असें कां असावें? म्हणजे संन्याशाला घरीं लग्नाची स्त्री नसावी, पण बाहेर त्याने रखेली ठेवली तर चालते, असा न्याय फरान्सच्या प्रजासत्ताक राज्यशास्त्रांतून निघतो म्हणावयाचा.

वरें, फरान्सला इतक्या मोठ्या वसाहती मुलखाचें कारणहि नाही. कारण एक स्पेन व पोर्तुगाल सोडला तर त्याच्या इतकी पातळ लोकवस्ती कोण-

त्याहि युरोपियन देशाची नाही. बरें, आहे ती लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे असें म्हणावें तर तेंहि नाही. फ्रान्समधील लोकसंख्येचें प्रमाण उतरतें आहे. आणि परवा मार्शल पेताँ याने जर्मनीशी तह करतांना आपल्या देशाचा कमीपणा म्हणून हाहि एक सांगितला! पूर्वी फ्रेंच राजांनी मिळवलेल्या वसाहतींविषयी क्रांतिकारक रोबेसपेर म्हणे, 'Let the Colonies perish if they are to cost us our happiness, our glory, our liberty.' याचें कारण परदेशच्या लोकांवर आपली सत्ता गाजविण्याने स्वातंत्र्याच्या ध्येयाला बाध येतो. सन १८२९ मध्ये एक फ्रेंच लिहितो–' The Colonies are costly, and we should gain much by losing them. ( 'या वसाहती संभाळणें हें भारी खर्चाचें काम होऊन बसतें म्हणून त्या आमच्या हातून जातील तर बऱ्या') याचा अर्थ हा कीं फरान्सला वसाहतींची आधी जरुरी नाही, तो देश शेतकरी लोकांचा! ज्या वसाहती हातीं त्या निरुत्पादक. म्हणजे त्यांत अंगचें सत्व नाही किंवा त्यांतून फायदा काढून घेण्याचें शहाणपण फ्रेंच लोकांत नाही. ' Had France been more whole heartedly attached to her empire, Germany might have been less aggressive. ' ( हडलस्टन पृ. ४६ )

तात्पर्य, अशा प्रत्येक बाजूने वसाहतीचें साम्राज्य अयोग्य असतां फ्रान्सने व्हर्सायिच्या तहाने स्वतःकरिता आणखी वसाहती मिळविल्या. आणि ज्या जर्मनीला त्यांची गरज व उपयोग, त्याच्या होत्या त्याहि वसाहती काढून घेतल्या ! जर्मनीची लोकसंख्या आधीच फ्रान्सच्या दीडपट आहे आणि ती वाढावी असे जर्मनीचे प्रयत्नहि आहेत.

आफ्रिकेंतील टयुनिशिया घेऊन फ्रान्सने इटालीचें वैर पूर्वी संपादलेंच. पण दोन वर्षांपूर्वी इटालीने ॲबिसीनिया घेतला तेव्हा इंग्लंडच्या चिथावणीने राष्ट्रसंघांत इटालीविरुद्ध काहूर उठलें !

इंग्लंडचेंहि जवळ जवळ तसेंच चुकलें. त्याने इटालीला ॲबिसीनिया प्रकरणांत विनाकारण विरोध केला. आफ्रिकेंत इंग्लंडला वसाहतीचें साम्राज्य हवें आणि मग इटालीला कां नको ? आज इटाली हा इंग्लंडचा शत्रु झाला आहे म्हणून इटालीविषयी अनुकूल बोलणें बरें नव्हे हें खरें आहे. पण

अवघ्या पंचवीस वर्षांपूर्वी तोच इंग्लंडचा मित्र म्हणून जर्मनीविरुद्ध लढला त्याची वाट काय ? आजचा शेंदाड शिपाई इटाली तेव्हा तरवारबहाद्दर कसा ठरला ? इटालीविरुद्ध इंग्लंडने ॲबिसीनियाच्या बाबतींत केलेल्या कारवाई-मुळे, दोनतीन वर्षांपूर्वीच इंग्लंडचें व इटालीचें युद्ध जुंपलें असतें. तात्पर्य, मुत्सद्द्यांनी राष्ट्रनीति वाटेल तशी प्रासंगिक कारणांनी बदलली तरी न्याय नीति यांचीं तत्त्वें अशीं चलनशील असत नाहीत. आणि माझ्यासारखा तिऱ्हाईत त्यांनाच अनुलक्षून बोलतो म्हणून त्याला अप्रिय बोलणें भाग पडतें.

जर्मनीला वसाहती परत देण्याचा प्रश्नसुद्धा पूर्वी निघाला तेव्हा असा कांगावा करण्यांत आला कीं, जर्मनी हा त्या देशांतील मूळच्या रहि-वाश्यांना चांगल्या रीतीने वागविणार नाही. जसें कांही बाकीच्या साम्राज्य सरकारांनी आपापल्या वसाहतींतल्या लोकांना प्रेमाने दयाबुद्धीनेच वागविलें आहे ! दक्षिण आफ्रिकेंत व केनियांत उत्तम सुशिक्षित हिंदी लोकांना इंग्रज कसें वागवितात हें म. गांधींना विचारा ! मग मूळच्या नेटिव्ह रहिवाश्यांची गोष्टच नको. आणि ज्या बेल्जियमचें नांव घेतल्याबरोबर 'अरेरे गरीब गाय' म्हणून डोळे पुसण्याचा प्रधात पडला आहे, त्याने पूर्वी आफ्रिकेंत बेल्जिअन काँगोमध्ये किती निर्दयपणाचें वर्तन केलें, हें इतिहासाला विचारा ! पूर्वी जशा 'सिसिलियन ॲट्रॉसिटीज' किंवा 'आर्मीनियन ॲट्रॉसिटीज' अशीं अमानुष छळाचीं नांवेंच पडलीं होतीं, तसेंच एक नांव 'बेल्जियन ॲट्रॉसि-टीज' हें आहे. 'Organised plunder' पद्धतशीर लूट कशी करावी ? तर 'बेल्जियन राजा लिओपोल्ड याने काँगोंत केली तशी' अशी युरो-पांत म्हणच पडली आहे.

आर. एस. लँबर्ट आपल्या 'मॉडर्न इंपीरिॲलिझम' या पुस्तकांत लिहितो.– (पृ. १५)

"कांगोमध्ये हजारो मूळच्या रहिवाश्यांची कत्तल झाली. हजारो देशो-धडीला गेले. रबर वसुलीचा कर इतका जाचक झाला कीं, तो भरतांना या लोकांना धान्य पिकविणें अशक्य झालें. गांवचीं गांवें बेचिराख झालीं. साठ वर्षांत कांगोची लोकसंख्या ४० मिलियन वरून ८॥ मिलीयनवर उतरली. मग राष्ट्रसंघाने बेल्जमच्या ताब्यांतून या वसाहती काढून कां घेतल्या नाहींत ?"

## ( लेखांक ६ वा )

प्रस्तुतची लेखमाला आणखी वरीच लांबण्यासारखी आहे. तथापि या शेवटच्या लेखांत एकाच गोष्टीची माहिती देऊन ती माला पुरी करणार आहे. ही गोष्ट म्हणजे या राष्ट्रद्वेषाच्या व्रताची फलश्रुति.

म. गांधींचें अहिंसाव्रत सर्व जगाने पत्करलें तर किती तरी चांगलें होईल. मात्र त्यांत गोम इतकीच आहे कीं तें सर्व जगाने एकाच वेळीं स्वीकारलेलें असलें पाहिजे. इतर नीतीचा मुहूर्त प्रत्येकाचा वेगवेगळा असला तरी चालतो. नीत्शे किंवा बर्नहार्डी हे युद्धाचे गुण कितीहि गावोत, किंवा लोकसंख्येची वाढ कमी करण्याचा एक उपाय म्हणून युद्धांचा उपयोग अर्थशास्त्री सांगोत. पण युद्धांत होणारी हिंसा व नाश पहाणाराला, लोकसंख्या कमी करावयाचीच तर, त्याकरिता या आसुरी उपायापेक्षा संततिनियमनाचा जागतिक उपदेश पुरवेल ! निसंतान ही आपत्ति संततिनाशापेक्षा अधिक वरी. संततिनियमनांत प्राणिबीजांचा नाश असला तरी तो अदृश्य असतो. युद्धांत होणारा संहार दिसतो व अंतःकरण पिळून काढतो.

अहिंसेच्या गांधीप्रणीत सिद्धांतावर आक्षेप वर दर्शविल्याप्रमाणे इतकाच कीं, तो सिद्धांत सर्व जग मान्य करील तेव्हाच व्यवहारांत उतरेल. जोंपर्यंत दुष्ट माणसें—अत्याचारी माणसें—जगांत आहेत, तोंपर्यंत प्रतिकार व आत्मरक्षण यापुरती तरी अहिंसाव्रताला बगल द्यावी लागते. तथापि युद्धें टळावीं अशी प्रार्थना परमेश्वरापाशी करणें केव्हाहि योग्यच होईल. कारण गेल्या महायुद्धाचे परिणाम भोगून संपले नाहीत, असें असतां फिरून नवें युद्ध उभें राहिलेलें आहे !

असो. गेल्या महायुद्धाचे परिणाम कसे झाले ते पहा. दोहोंकडील युध्यमान राष्ट्रांचे मिळून एक कोटी सैनिक रणांगणावर पडले. हे सर्व मध्य वयांतील लोक होते ! दोन कोटी जखमी झाले. पैकीं कांही लक्ष लोक जन्माचे जायबंदी झाले. रोगराई व उपासमार यांनी लक्षावधि स्त्री-पुरुष व मुलें हाल होऊन मेलीं. जगलेल्याहि लोकांच्या जीवनावर नुसत्या उपासमारीने कायमचा परिणाम झाला ! कारण बालपणची उपासमार जन्मभर

भोंवते ! युद्धापायीं राष्ट्रांना खर्च किती आला याची गणती कोण करणार ? आणि तज्ज्ञाशिवाय तो कुणाला समजणार ? अंदाज करतां असें दिसतें कीं, युद्धकर्जाची एकंदर रक्कम १३५,०००,०००,००० डॉलर इतकी भरेल. ( एक डॉलर म्हणजे सुमारें तीन रुपये तरी समजा. ) वार्षिक करवाढीची रक्कम ५०,०००,०००,००० डॉलर ! शिवाय मालमत्तेचा नाश किती झाला असेल ?

युद्धाआधी व नंतरहि कित्येक वर्षे, अनेक राष्ट्रें द्वेषाशिवाय दुसरी भावनाच इतर राष्ट्रांविषयी जाणत नव्हतीं ! कितीतरी वर्षांत जर्मनीमध्ये इंग्लंडबद्दल व फरान्सबद्दल एकहि बरा शब्द तोंडून निघाला नसेल. द्वेषाचें हें पाणी घालून वाढविलेले विषवृक्ष बहरल्याशिवाय कसे राहतील? राष्ट्रें या दृष्टीनें सर्वांत अधिक नाश कोणाचा झाला असेल तर तो ऑस्ट्रियाचा ! आणि त्या महायुद्धाची आग पेटण्याला पहिली काडी कोणी ओढून लावली असेल तर ती ऑस्ट्रियाने. म्हणून ही ऑस्ट्रियाला देवानेच शिक्षा केली असें पुष्कळांना वाटतें. जुन्या काळीं ऑस्ट्रियावर जुलमी राजवंश राज्य करी हें खरें. तरी त्या राज्यांत लोक उपाशी तरी मरत नव्हते. पण व्हर्सायिच्या तहाने ऑस्ट्रियाला जें लोकशाही राज्य उरू दिलें त्यांत लोकांची अशी कांहीं कोंडी व त्यामुळे उपासमार झाली कीं, एखाद्या गरीबाला जीवदान देण्याला दयाबुद्धीनें भाकरी वाढावी तशी ऑस्ट्रियांतील लोकांना अन्न पोचूं देऊन जगविण्याची व्यवस्था मुद्दाम करावी लागली ! कोणत्याही बंदरापर्यंत स्वाधीन असा रस्ता व मुलूख नाही. आणि चारही अंगांनी वेढा पडला तो शत्रुराष्ट्रांचा. समाईक पाडाव झालेल्या जर्मनीसारख्या एखाद्या मित्रराष्ट्राशी जुगून राहण्याची परवानगी मिळती तरी ऑस्ट्रियाचें काम झालें असतें. पण व्हर्सायिच्या तहाने ती परवानगी मुद्दाम नाकारली. सर्व युरोपांत वैभव भोगलें असें ऑस्ट्रियन पातशाहीने ! पण शेवटीं त्या साम्राज्याला अगदी कुत्र्याच्या मरणाने मरण आलें.

सर्व युध्यमान राष्ट्रांची औद्योगिक प्रगति अनेक वर्षे थांबली. तहापूर्वीच्या चारपांच वर्षांत बहुतेक मोठे कारखाने जो माल तयार करीत तो प्राणरक्षक नसून प्राणभक्षकच असे. युद्ध थांबल्यामुळे लष्करी पोषाख उत-

रून उदरंभरणाकरिता नोकरी हुडकीत जाणाऱ्या लाखो लोकांना बेकारीमुळे उपासमार सोसावी लागली. जुनीं यंत्रें निकामी झालीं. भांडवलाचा पुरवठा होईनासा झाला. तयार मालाला परदेशी बाजार मिळावे तसे मिळेनात. व्यापाराला मंदी आली. आंतरराष्ट्रीय चलन व हुंडणावळ यांची विसकटलेली घडी कांही केल्या बसेना. प्रत्येक राष्ट्राचें कर्ज इतकें वाढलें कीं, त्याचीं व्याजें भरण्यापायीं अनेक भावी पिढ्यांच्या मिळकतीवर व उत्पन्नावर तारणादाखल कायमचे कर बसले, सालोसालच्या जमाखर्चाची तोंडमिळवणीहि करतां येईना. नाण्याची टंचाई भागविण्याकरितां कागदी चलन बेसुमार सुरू करावें लागलें. कांही देशांत बाजारभावाच्या किंमतीं वाढल्या पण उलट मजुरीचे दर त्या प्रमाणांत वाढेनात. त्यांतल्या त्यांत सरकारी नोकरांसारख्या ठराविक प्राप्तीच्या पगारी लोकांना ही स्थिति फार जाणवली. आर्थिक त्राण व मजबुती उरली नाही.

पण मढ्याच्या ताळूवरचें लोणी खाणारे प्राणी प्रत्येक स्मशानाभोवती असतातच. त्याप्रमाणे युद्धानें उद्ध्वस्त झालेल्या राष्ट्रामध्ये कांही लोभी कारखानदार व व्यापारी उदमी वर्ग यांनी आपली तुंबडी भरून घेतली. गरजवंताला अक्कल नसते त्याप्रमाणे युद्धकाळीं युद्धोपयोगी कोणत्या पदार्थाला किती किंमत मागावी याचा सुमार रहात नाही. यामुळे नफेबाजीला ऊत आला. आणि दरिद्री बनलेल्या लोकांच्या दैन्याच्या पार्श्वभूमीवर, या एका रात्रींत बनलेल्या श्रीमंतांच्या मिजासीचा दिमाख डोळ्याला दुःखद वाटूं लागला. सट्टेबाजी वायद्याचे सौदे वाढले. आणि बाजारांना जुगारी अड्ड्यांचें स्वरूप आलें. युद्धानंतर ब्रिटिश पार्लमेंटरी निवडणुकी झाल्या त्यानंतर पार्लमेंटच्या सभागृहाकडे पाहून, प्रसिद्ध अर्थशास्त्री मेनार्ड कीन्स याने असें म्हटलें होतें कीं संयुक्त मंत्रिमंडळाच्या पाठीशी ४२० इतकें बहुमत आहे. पण त्यांत कोण आहेत ? तर तोंडाकडे पाहतांच निर्दय निष्ठुर दिसणारे लोक—ज्यांनी युद्धामध्ये स्वतःचा फायदा खूप करून घेतला होता ते. ‘Hard faced men who looked as if they had done very well out of the war.’

बरें, शांततेच्या तहानं जगांत शांतता अवतरली काय? पण तीहि नाही. १९२३ सालीं राष्ट्रांची मनःस्थिति १९१८ हून अधिक वाईट होती. जुनी

स्पर्धा वैरें घुमसत होतीं. मनःक्षतांतून रक्त स्रवत होतें. व्हर्सायिच्या तहानें नवीं छोटीं राष्ट्रें बनलीं तीं शेफारून जाऊन राष्ट्रीय वृत्तीचा धुडगूस घालूं लागलीं. युद्धापूर्वीपेक्षाहि शस्त्रास्त्रांचा संभार अधिक वाढला. त्याला आळा घालण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. सरहद्दीवर लष्करी तटांबरोबर जकातींच्या कचेऱ्या थाटूं लागल्या. वॉशिंग्टन परिषद, केलॉग पॅक्ट इत्यादि शस्त्रसंभार कमी करण्याच्या योजना महत्प्रयासाने केल्या गेल्या पण शेवटीं त्या निष्फळ झाल्या. जीनिवाच्या मसुद्यावर इंग्लंडने सही करण्याचें नाकारलें. तें म्हणूं लागलें कीं, आमचें साम्राज्य सर्वांत मोठें. अर्थातच त्याचें रक्षण करण्याची आमची जबाबदारी पार पाडायला आम्हाला सर्व राष्ट्रांपेक्षा अधिक मोठें आरमार पाहिजे. फ्रान्स, इटाली व जपान या तीन राष्ट्रांचें मिळून जेवढें आरमार असेल, तितकें आमचें एकट्याचें हवें. आणि आमचा मित्र अमेरिका त्याचेंहि आमच्या बरोबरीचें असलें पाहिजे.' उलट राष्ट्रसंघांत स्थान मिळालेलीं चिमुकलीं बालराष्ट्रें समान मताच्या हक्काच्या जोरावर जुनाट प्रचंड राष्ट्रांची बरोबरी सांगू लागली.

१९२८ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथांत इतिहासकार (एच. सी. थॉमस) म्हणतो--

'Most of the statesmen of the world seem to have learnt nothing from the war and are srill following the methods of 1914. The forces of greed and imperialism are pursuing policies, which are bound to lead to another war more terrible than the last! Disarmament can never be gained so long as statesmen think of disarmament in terms of war instead of terms of peace. The fate of humanity depends upon the outcome of the race between nationalism and internationalism (p. 331).

'बहुतेक मुतसद्दी युद्धापासून कांहीच शिकले नाहीत, ते १९१४ च्याच जुन्या चाकोरींतून गाड्या हाकीत आहेत. बेसुमार लोभबुद्धि आणि साम्राज्यसत्तेची आवड यांच्यामुळे अशीं धोरणें संभाळलीं जात आहेत कीं, त्यापासून पूर्वीच्याहून अधिक भयंकर असें महायुद्ध हटकून निर्माण व्हावें! निःशस्त्री-

करणाच्या सूचना पुढे आल्या म्हणजे भावी युद्ध डोळ्यापुढे ठेवूनच चर्चा होते, भावी तह डोळ्यापुढे ठेवून नव्हे! राष्ट्रीयत्व आणि जागतिकत्व यांत स्पर्धा लागून राहिली आहे. तिचा निकाल काय लागतो यावर मानवी जगाचें भवितव्य अवलंबून राहील.'

राष्ट्रसंघासारख्या नव्या संघटनेच्या युद्धप्रतिषेधामुळे युद्धें थांबलीं नाहीत. मात्र मजुरांचे हक्क, सर्व राष्ट्रीय आरोग्य इत्यादि किरकोळ गोष्टींत त्यामुळे थोडीशी सुधारणा पदरांत पडली इतकेंच; पण इतकेंच कबूल करतां येईल.

इंग्लंडच्या प्रधानमंडळाकडून गेल्या महायुद्धाच्या वेळीं युद्धहेतूंची घोषणा होत असे तींत (१) लहान सान राष्ट्रांना संरक्षण, (२) स्वयं-निर्णयाला पाठपुरावा, आणि ( ३ ) लोकशाहीचें समर्थन हे तीन मुख्य हेतु म्हणून सांगण्यांत येत. पैकी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची पुढे थट्टाच व्हावी असा त्याचा उपयोग करण्यांत आला. लहान राष्ट्रें कांहीं नवीं निर्माण करण्यांत आलीं. तीं मेणाच्या बाहुल्यांसारखीं निर्बल व लिबलिबीत ठरलीं. त्यांना आत्मरक्षणाचें सामर्थ्य केव्हाहि लाभलें नाही. शिवाय त्यांची रचना स्वार्थी हेतूने व जर्मनीच्या द्वेषाने दोस्त राष्ट्रांनी केली, आणि भोळ्या प्रे. विल्सनने त्याला संमति दिली, यामुळे मूळच्या उदार तत्त्वाला हीनता आली.

लोकशाहीच्या दृष्टीने ऐनजिनसी फायदा हा झाला कीं, रशिया, ऑस्ट्रिया व टर्की या राज्यांतील राजमुगुट धुळीला मिळाले, व तेथे प्रजा-सत्ताक राज्यें निर्माण झालीं. नाही म्हणायला राजाची गादी अशी एकच नवी लहानशी निर्माण झाली पण तें राजपदहि आता नामशेष झालें आहे. युद्धानंतर लोकशाहीच्या तत्त्वाचा प्रसार झाला खरा. पण त्यांतूनच जर्मनी इटाली रशिया यांतल्याप्रमाणे झोटिंगशाहीने डोकें वर काढलें आहे.

महायुद्धानंतर एक अशी वेळ खुद्द इंग्लंडांतच आली होती कीं, जबाब-दार प्रधान-मंडळाचें तत्त्व गोता खातें कीं काय ? आस्टेन चेंबरलेन हा आत्म-चरित्रांत लिहितो कीं 'लॉईड जॉर्जने एक वेळ प्रधानमंडळ बाजूला सारून राज्यकारभार करण्याचें मनांत आणलें होतें ! ' यासंबंधाने इतिहासकार जे. ए. स्पेंडर लिहितो 'पार्लमेंटरी राज्यपद्धतीच्या बहुतेक खुणा लोपून जाऊं

लागल्या होत्या. लहानसहान कूटें बनवून कारवाया करण्याची युद्धांत लागलेली संवय नाहीशी होईना. प्रधानमंडळाच्या बैठकी क्वचितच होत. आणि जबाबदारीच्या कारभाराचें तत्त्व जवळ जवळ लोपलें होतें.'

Great Britain 1886–1935 by J. A. Spender (P. 602).

तसेंच इतिहासकार थॉमस लिहितो—

'While there were apparent gains for democracy in the overthorw of ancient monarchies, the establishment of republics, and the general extension of the suffrage, the arbitrary powers assumed by Governments during the war, the crushing out of hard worn liberties, and the epidemics of dictatorship that swept Europe, make the real gains for democracy problematical. Democratic Constitutions do not necessarily mean democratic governments. Time alone will tell whether the people of the older democracies, will win back their lost liberties and whether the democratic principles written into the new constitutions will develop into real democracy in practice.'

(P.318)

'जुनीं राजपदें नष्ट झालीं, प्रजासत्ताक राज्यें निर्माण झालीं, सर्व सामान्य मतदारी वाढली–हे फायदे दिसून येतात खरे. पण उलट काय झालें आहे तेंहि पाहा म्हणजे वजाबाकींत फायदा उरत नाही, तोटाच उरतो. उलट घडलेल्या गोष्टी अशा. युद्धकाळीं सरकारी वर्ग जुलुमी सत्ताधीश बनला; व फार काळ कष्ट सोसून मिळालेलें लोकस्वातंत्र्य त्याच्या पायाखाली चिरडून टाकण्यांत आलें. सर्व युरोपभर झोटिंगशाहीची सांथ पसरली. राज्यघटना या नांवाने लोकशाही नमुन्याच्या असल्या म्हणून त्यांत खरी लोकशाही नांदते असें थोडेंच आहे. जुनें स्वातंत्र्य पुनः ज्याचें त्याला मिळेल. आणि नव्या बनलेल्या राज्यघटनांत कागदावर रेखाटलेलें लोकस्वातंत्र्य पदरांत पडेल कीं नाही हें पहावयाचेंच आहे.'

जुन्या सराईत अनुभवी अभिमानी लोकशाहीची ही अवस्था मग ज्या हिंदुस्थानसारख्या देशांत लोकशाही नव्याने प्रथमच प्रविष्ट होणार त्याची गति काय होईल तें देव जाणे !

---

# ३. जर्मन पंडित व इतिहासशास्त्र

( सह्याद्रि जुलै १९४० )

या *संमेलनाच्या ठराविक पद्धतीला अनुसरून आज मी अितिहासासंबंधी अेक विषय चर्चेला घेतला आहे. तो सुमारें अर्ध्या तासांत आपणांपुढें मांडून होईल. प्रासंगिक चर्चेला विषय सुचावयाचे ते विद्यमान परिस्थितींतूनच सुचणें अगदी स्वाभाविक होय. आणि माझेंहि प्रस्तुत तसेंच झालें आहे.

आज सर्व जगाचें चित्त आकर्षून घेणारी परिस्थिति म्हणजे चालू युद्धाविषयीचीच नव्हे काय ? १९१४ च्या युद्धाला आपण महायुद्ध म्हणत होतों. १९३९ च्या युद्धाला महा–महायुद्ध म्हणावें लागेल. अशा वेळीं 'विचारांचा सुकाळ पण शब्दांचा दुष्काळ' ही म्हण खरी ठरते. पण आणखी पंचवीस वर्षांनी युद्ध जुंपलें तर तें याहूनहि विस्तृत व भयंकर होणार नाही कशावरून? आणि तसें झालें तर महा हें आश्चर्यदर्शक विशेषण दोहोंच्याअैवजीं तीन वेळां लावून महा–महा–महायुद्ध म्हणाल, झालें !

तें असो. पण १९१४ व १९३९ या वर्षी सुरू झालेल्या दोन युद्धांवरून अितिहासाच्या तत्त्वज्ञानावर कांही प्रकाश पडतो काय ? व पडत असेल तर त्या प्रकाशांत काय दिसतें ? त्या प्रकाशांत मला तर हें दिसतें कीं, अितिहासाच्या घटनांकडे पाहण्याच्या दोन रीति उघड आहेत. एक रीत या घटनांत कार्यकारणभावाचें श्रेष्ठत्व मानणारी व दुसरी रीत भवितव्यतेचें श्रेष्ठत्व मांनणारी. पैकी जर्मन तत्त्ववेत्त्यांची दृष्टि सामान्यतः भवितव्यतेला प्राधान्य देणारी आहे. 'डेस्टिनी' हा शब्द जर्मन तत्त्ववेत्त्यांकडून होणाऱ्या

* भा. अि. सं. मंडळ, पुणें, या संस्थेच्या २७ व्या संमेलन प्रसंगीं झालेलें अध्यक्षीय प्रास्ताविक भाषण.

अितिहासशास्त्राच्या चिकित्सेंत जितका दिसून येतो, तितका अितरांच्यांत दिसून येत नाही.आणि जर्मन राष्ट्राचा अलिकडील प्रत्यक्ष अितिहास पाहिला तरी तो या तत्त्वज्ञानालाच अनुसरून कसा दिसतो हें मी थोडक्यांत सांगणार आहे.

## अपमानकारक तह

चालू युद्धाला नुकता प्रारंभ झाला आहे. शेवट दूर आहे.यामुळे त्यांत शेवटीं यश कोणाच्या पदरांत पडेल हें सांगवत नाही. तथापि स्थूलपणें असें म्हणतां येईल कीं, १९१८ सालीं ज्या मित्र राष्ट्रांनी तें युद्ध नाँवाने जिंकलें तींच, पुढील वीस वर्षांत, आत्मविश्वास नष्ट होऊन, स्वतःच भयभीत व संकटग्रस्त असल्यासारखीं गांगरून वागत होतीं. याच्या उलट त्या युद्धांत जो जर्मनी नांवाने पराभूत झाला तो पुढील वीस वर्षांत आपल्या भवितव्यतेवर निष्ठा ठेवून, स्वतः निर्भय व अुत्साहपूर्ण रीतीने वागून, आपल्या जेत्यांना सतत भीति उत्पन्न करीत राहिला. व्हर्सायचा तह जर्मनीवर लादून आपण त्या हिंस्र रानटी पशूचीं नखें व दांत काढून टाकले असें समाधान मित्र राष्ट्रांनी प्रथम मानलें. आणि असला अन्यायी अपमानकारक तह अेका प्रतिष्ठित राष्ट्रावर लादून, मित्र राष्ट्रांनी आपल्या ठिकाणीं न्याय, नीति व माणुसकी नाही असें सिद्ध केलें, अशी टीकाहि आरामखुर्चीवरून कांही टीकाकारांनी केली. पण फ्रेंच मुत्सद्दी जॉर्ज क्लेमेंको काय म्हणतो पहा! ‘ Grandeur and Misery of Victory ’ या आपल्या पुस्तकांत लोकार्नो येथील तहाला अुद्देशून तो लिहितो, ‘ On one side France suing for peace with Germany at the cost of any concession and any surrender. On the other, Germany having only one goal, the annulment of the treaty that set the seal on Germany of her guilt and French Victory. ’

## मित्र म्हणविणाऱ्यांचें अंतरंग !

अिंग्लंडविषयी असें म्हणतां येईल कीं, व्हर्सायचा तह जर्मनीवर लादून आपण जो अन्यायाचा अपराध केला त्याची टोंचणी मनाला सतत

लागून राहिल्यासारखी अिंग्लंडची वर्तणूक पुढील वीस वर्षांत होती. विंस्टन चर्चिल आपल्या 'World Crisis' या पुस्तकांत लिहितो कीं, '१९१८ सालीं जर्मनीशी armistice–तात्पुरता तह–झाला त्या दिवशींच संध्याकाळीं मी व लॉअिड जॉर्ज यांनी अेकत्र खाना खाल्ला त्या प्रसंगीं, यापुढे जर्मनीला आपण कसा वांचवावा या विषयावर आम्ही विचारविनिमय केला. पण अिंग्लंडचें हें धोरण 'traditional' म्हणजे परंपरागत होतें त्यांत नवीन कांहीं नव्हतें हें लॉअिड जॉर्ज याने क्लेमेंकोजवळ अेकदा झोकांत कबूलच केलें. तें धोरण असें–Great Britain is an island defended by waves which is why she believes herself obliged to multiply causes of dissension among the people of the continent so as to secure peace for her own conquests ( क्लेमेंको पृ. ११३ ). The policy of England is to keep the continent of Europe divided for benefit of the islander. ' 'भवानी देवळांत आणि गावभर नायटे' ही म्हणच खरी ! मित्रमित्र म्हणविणाऱ्या राष्ट्रांचें हें अंतरंग पाहा !

असो. प्रस्तुत माझा तो मुख्य मुद्दा नाहीं. मित्रराष्ट्रांनी आपणाकडून व्हर्सायच्या तहाने जर्मनीचीं शकलें केलीं. तीं अेका पेटींत भरलीं. तिच्या तोंडाला कुलूप लावलें. आंतल्या बाजूस देखील हीं शकलें अेकसंध होअूं नयेत, म्हणून त्रयस्थ व तटस्थ अशा नात्याचीं लहानसान मित्र राष्ट्रें निर्माण करून तीं या शकलांच्या मधूनमधून भरलीं. फिरून ही पेटी लीग ऑफ नेशन्स म्हणजे राष्ट्रसंघ नामक वर्फाच्या मोठ्या पेटींत घातलीं. आणि जर्मनीने सैन्य, आरमार, विमानें, दारूगोळा हीं जास्तींत जास्त आपल्या पदरीं किती ठेवावीं याला सक्त मर्यादा घातली ! पण प्रत्यक्षांत काय घडलें पाहा ! प्रथम युद्धसामग्री घेअूं या बाबतींत जर्मनीने सर्व तह धाब्यावर बसवून केवढी तरी प्रगति केली !

## जर्मनीने तह धाब्यावर बसविला

व्हर्साय तहाच्या १६४ व्या कलमाअन्वये जर्मनीने पदरीं ठेवण्याच्या युद्धसामग्रीचे आंकडे व १९२५ ते १९३० ( म्हणजे हिटलर उदयास

येण्याच्या आधी तीन वर्षें ) या अवधींत जर्मनीने प्रत्यक्ष पदरीं सिद्ध केलेल्या सामग्रीचे आंकडे असे होते :–

| | मंजूर | पण प्रत्यक्ष तयार केली |
|---|---|---|
| रायफल बंदुकी | ८४,००० | |
| कडाविनी | १८,००० | |
| | १०२,००० | ३००,००० |
| जड मशिनगन्स | ७९२ | |
| हलक्या " | १,१३४ | |
| | १,९२६ | २०,००० |
| मध्यम ट्रेंच मॉर्टर्स | ६३ | |
| हलक्या " | ९८९ | |
| | १,०५२ | १९,००० |
| तोफखाना मैदानी | | |
| ७ अिंची तोफा | २०४ | |
| १० " हॉविट्झर | ८४ | |
| | २८८ | २,००० |
| तोफांचे गोळे | ४५०,००० | २५००,००० |

याच प्रमाणाने सैन्यांत शिपाअी व अधिकारी यांची, आणि या सर्वांहून अधिक प्रमाणांत विमानांची भरती.

हे आंकडे फक्त १९३० पर्यंतचे आहेत. व त्यावरून १९३० ते १९३९ या अवधींत ही भरती आणखं किती प्रमाणाने वाढली असेल याचा विचार करावा !

## जमीनदोस्त जर्मनी ?

जर्मनीच्या डोक्यावर नुकसानभरपाअी व दंड मिळून अेवढी मोठी रक्कम दोस्त राष्ट्रांनी बसविली होती कीं, कदाचित् ५० वर्षेंपर्यंत, प्रामाणिकपणें आपलें सर्वस्व वेचून, ती रक्कम देण्याचें जर्मनीने मनांत आणलें

असतें तरी तें शक्य झालें असतें कीं नाही शंकाच आहे. मित्र राष्ट्रांनी १७२ बिलीयन १७२ हजार दशलक्ष सुवर्ण मार्क्सची मागणी जर्मनीकडे केली ! आणि तिचे हप्ते जर्मनीकडून देणें होत नाही म्हणून रूहर परगणा फ्रान्सने ताब्यांत घेतला. पण स्वत: मित्र राष्ट्रांना तरी आपापलीं कर्जे कुठे फेडतां आलीं ! आणि शेवटी तर 'अति तिथे माती' या न्यायाने, कर्जफेड नुकसान-भरपाओ अित्यादिकांच्या नांवाने जर्मनीच्या शिरावर उभारलेला दंडाचा प्रचंड डोंगर सर्वच जमीनदोस्त झाला ही गोष्ट निराळी ! पण ही जर्मनीने अेक प्रकारच्या सत्याग्रहाने घडवून आणली हें मला सांगावयाचें आहे! अितर युरोपियन राष्ट्रांप्रमाणे जर्मनीच्या कांहीं वसाहती होत्या त्याहि मित्रराष्ट्रांकडून काढून घेण्यांत आल्या. आणि अिंग्लंड व फ्रान्स दोघांनी मिळून मात्र लक्षावधि मैलांचा मुलूख मँडेटच्या नांवाखाली आपल्या मांडी-खाली दडपून घेतला व जवळ जवळ तो खालसाच केला जर्मनीची वसा-हतीची मागणी पुढे मागे पूर्ण झाल्यास नवल नाही.

अशा रीतीने पैशापरी पैसा, मुलुखापरी मुलूख, प्राणापरी प्राण, यशापरी यश गमावून जर्मनी जमीनदोस्त झाला खरा, पण फार थोड्या काळांत अुसळी मारून त्याने आपलें डोकें वर काढलें. आणि आज तो तरवार अुपसून, पॅरिसहूनहि लंडनला अधिक जवळ येऊन थडकला आहे. हातून गेलेल्या वरील गोष्टींपैकी अैनजिनसी किंवा मोबदला म्हणून जर्मनी अखेर काय मिळवूं शकेल तें कोण सांगणार ? परंतु अेवढी गोष्ट खरी की अुलट या महत् संकटांतून बचावण्याची भिस्त अेखाद्या अीश्वरी चमत्कारा-वर अवलंबून ठेवण्याची पाळी फ्रेंच मुख्य प्रधानावर आज आली आहे. आणि स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या हिंदुस्थानाला अिंग्रज लोक अेक खवचट प्रश्न नेहमी विचारतात तोच, प्रत्युत्तर म्हणून, अिंग्लंडला विचारण्याचीहि वेळ तशीच आली आहे.

## खवचट प्रश्नाचें सडेतोड उत्तर

अिंग्रजांचा प्रश्न असा असतो नव्हे का ?—" अहो मूर्ख भारतीयानो ! तुम्ही स्वतंत्र होअूं पाहातां काय ? पण मग तुमचें रक्षण कोण करील ? "

त्याचें अुत्तर हेंच कीं, "अहो मानभावी अिंग्रज लोकांनो! तुम्ही आज हजारों वर्षें स्वातंत्र्य भोगलेलें, घराभोवती समुद्राचा खंदक खणून अजिंक्य होअून बसलेले, ज्यावर सूर्य कधी मावळत नाही असें साम्राज्य जगभर पसरलेलें, तुम्ही तरी अेकट्याने आज ग्रेटब्रिटनचें संरक्षण करूं शकतां काय? तुम्हीहि शेंकडो वर्षांचें जुनें वैर विसरून लोचटपणाने फ्रान्सची मैत्री संपादितां! अमेरिकेकडे दोन दृष्टीने पाहून, व अंकल सॅमच्या पांढऱ्या दाढीला हात लावून, लाचारीने मदत मागतां! सुखाच्या वेळीं वसाहतीच्या घरचें लोणी खाअूनहि त्यांच्यावर अधिराज्य मिरवितां, पण संकटकाळीं मात्र रक्तामांसाच्या नात्याची त्यांना आठवण करून देअून त्यांच्याकडून मदतीची याचना करतां! आणि ज्या हिंदी राष्ट्राला, विशेषत: मराठे लोकांना, शांततेच्या काळीं सवतीच्या मुलासारखे वागवून शिपाईगिरींतून दूर ठेवतां त्यांनाच, सांकडें पडलें म्हणजे, कौल लावून, त्यांचे पोवाडे छापून भिंतीवर चिकटवितां! तात्पर्य, स्वातंत्र्य भोगीत असतां परचक्र आलें तर हिंदुस्थानहि तसेंच कांहीसें करील. त्यांत काय चुकलें? संकटनिवारणार्थ जोडेल तो मित्र जोडावा, आणि तोडावा लागेल तो मित्र तोडावा, ही जगाची रीत तुमच्याप्रमाणें आम्हांलाहि थोडीवहुत कळते." असो.

## एक निर्विवाद सत्य घटना

जर्मनीने सैन्य, शस्त्रास्त्रें अित्यादि बाबतींत आपलें डोकें वर काढल्याचें सांगितलेंच आहे. त्यांतील कांही गोष्टी त्याला कदाचित् गुप्तपणें करतां आल्या असतील, पण रूहर प्रान्त परत घेण्यापासून परवा बेल्जम जिंकीपर्यंत जर्मनीने आत्मसमर्थनार्थ जीं अतिक्रमणें केलीं तीं तरी अगदी अुघडीं होतीं ना? जसें कांहीं अेखादें वेळापत्रक किंवा अेखादा कार्यक्रम आंखावा, त्याप्रमाणे मध्य युरोपपासून पश्चिम सुमुद्रापर्यंत त्यानें स्वत: होअून उठावणी करून ऑस्ट्रिया, चेकोस्लोव्हाकिया, पोलंड, नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड व बेल्जम हीं राज्यें जिंकलीं. याचा अर्थ हाच की, मित्र राष्ट्रांनी अेका किंवा दुसऱ्या नांवाखालीं जे तट किंवा बुरूज अुभारून जर्मनीला कोंडून ठेवलें होतें ते सर्व त्यानें अवघ्या दोन वर्षांत पाडून टाकले. आणि द्वंद्वयुद्धांत ज्याप्रमाणे समोरासमोर तलवारीला

तलवार भिडते त्याप्रमाणे, निकराची प्राणांतिक लढाई करण्याकरितां मित्र राष्ट्रांना आव्हान केलें आहे. याच्या उलट मित्र राष्ट्रें अितकीं प्रबळ असतां, आणि त्यांच्या मतें जर्मनीकडून हें अन्यायाचें आक्रमण घडत असतां, त्यांजकडून यापैकीं अेकाहि राष्ट्राला वेळेवर किंवा पुरी मदत झाली नाही!

वरील हकीगत सांगण्यांत प्रस्तुत युद्धाचा शेवट कसा होईल हें यत्किंचितही दर्शविण्याची जबाबदारी मी घेत नाही. कारण मी भविष्यवादी नाही. आणि स्वतः मित्र राष्ट्रांनाच जर विजय मिळण्याची खात्री वाटते तर आम्हांला ती कां न वाटावी? वर दिलेली हकीगत ही केवळ अैतिहासिक सत्यात्मक व निर्विवाद Fact म्हणून दिली आहे. व अुदाहरणादाखल ती देऊन प्रारंभीं दर्शविलेला अैतिहासिक तत्त्वज्ञानाचा प्रश्न फिरून मी आपणांपुढे मांडतों.

## ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा प्रश्न

तो प्रश्न हा की, अितिहासाची घडण कार्यकारणभावाने व तर्कपद्धतीने घडून येते? किंवा भवितव्यता, जिला इंग्रजींत Destiny असें म्हणतात ती, मधून मधून प्रसंगानुसार आविष्कृत होते, स्वतः अवतार घेते, आपल्या हस्तकांकडून अवतारकृत्यें करविते, यामुळें अितिहासाची घडण घडते? अितिहासामध्ये Events follow events असें मानणारा एक पंथ आहे तर Events follow from events असें मानणारा दुसरा पंथ आहे. या अिंग्रजी वाक्यांचें भाषांतर असें–"अैतिहासिक घटना या केवळ अेकामागून अेक घडतात" किंवा "त्या अेकापासून अेक म्हणजे अेकामुळे अेक घडतात.' मागून आणि मुळे हे साधे दोन शब्द, पण वरील दोन विरोधी वाक्यांत किती खोल तत्त्वज्ञान आहे? मात्र तें केवळ अितिहासविषयक नसून नीतिशास्त्र, अध्यात्मशास्त्र फार काय पण भौतिकशास्त्र यांतहि वादरूपाने यापूर्वी प्रकट झालेलेंच आहे. प्रश्नरूपानें तें तत्त्वज्ञान उल्लेखावयाचें म्हणजे जगांत कर्मविपाक प्रभावी आहे कीं आत्मस्वातंत्र्य प्रभावी आहे ? असा प्रश्न करावयाचा. हा प्रश्न विचारलेला आढळतो तो प्रायः व्यक्तिजीवनासंबंधाने. परंतु मनुष्य–समाजरचनेंत राष्ट्र या नांवाने जे निरनिराळे लहानमोठे संघ बनतात त्यांच्याविषयीहि हा प्रश्न विचारतां येण्यासारखाच

आहे. या दोन प्रश्नांतील प्रत्येकांत मूलभूत असलेल्या सिद्धान्ताभोंवतीं तत्त्वचिंतनाचे वेढे पडपडून ते दोन संप्रदाय सुदृढ बनले आहेत आणि मला सांगावयाचें तें हें कीं, अिंग्लंडप्रमुख कांही राष्ट्रें अेका संप्रदायाचीं तर जर्मनी प्रभृति राष्ट्रें दुसऱ्या संप्रदायाचीं अनुयायी आहेत. तेव्हां आतां या संप्रदायाचीं विशिष्ट मतें कोणतीं हें थोडें खोलांत जाअून पाहूं.

## इतिहासांतून काढलेलीं दोन प्रमेयें

अिंग्लंडप्रभृति राष्ट्रें उत्क्रांतिवादी व कर्मविपाकवादी आहेत. म्हणजे त्यांच्या मतें अितिहासांतील प्रत्येक उत्तरोत्तर घटनेला कोणती ना कोणती तरी पूर्वपूर्व घटना कारणीभूत असते. हा पंथ उघडच प्रयत्नवादी आहे. तो उदारमतवादी असल्यामुळे सर्व प्रकारच्या क्रान्तीला तो मनांतून अनुकूल असतो, व तिला वाव मिळावा असा आग्रह धरतो राजकारणांत हा पंथ लोकशाही तत्त्वाचा पक्षपाती आहे. स्वतंत्र बुद्धीने करावें, करूं द्यावें, युक्तायुक्त क्रियेचें फळ ज्याचें त्याने आपल्या पदरीं घ्यावें, आत्मौपम्य बुद्धीने अितरांशी सहकारिता करावी, आणि सर्वांनीं मिळून शान्ततेनें मानवी सुखाचा मोक्ष गाठावा हें अिंग्लंडचें तत्त्वज्ञान.

याच्या उलट जर्मन तत्त्ववेत्ते अितिहासांतून वेगळ्या प्रकारचें प्रमेय काढतात. ते म्हणतात की, व्यक्तिमात्राला थोडेंबहुत स्वातंत्र्य हवें. पण तें असलें तरी समाजाची बुद्धि व भवितव्यता म्हणून कांहीं स्वतंत्र आहे तिच्या स्फूर्तीनेच राष्ट्र चालतें. व त्यांतील प्रभावी व्यक्तिमात्रांनाही प्रेरणा व चैतन्य हीं तिच्याकडूनच लाभतात. हें भवितव्य कोणासही टाळतां येत नाही. स्वयंशासित, स्वयंपूर्ण व सर्वंकष अशी मध्यवर्ती राजसत्ता असणें हें उत्तम राष्ट्राचें मुख्य लक्षण होय. राष्ट्रांत व्यक्तीपेक्षां वंशाला महत्त्व अधिक म्हणून त्याची शुद्धता शक्य तितकी ठेवली पाहिजे. अिच्छाशक्ती-सारखें दुसरें बळ नाही. व हें बळ ज्या राष्ट्राजवळ भरपूर असेल तेंच प्रभावी होईल. युद्ध हाच जीवनाचा पाया आहे, व युद्धाला सदैव तयार राहणें हीच यशस्वी जीवनाची अट होय. दुबळ्या लोकांनीच शांततेचें ध्येय प्रतिपादावें, त्यांनीच लोकशाहीचें प्रस्थ माजवून सामान्य कृपण जनांच्या पदरीं प्रतिष्ठा बांधावी, मतामतांच्या गलबल्याचा ध्वनि हाच सुस्वर

मानावा. उलट अितिहास हेंच शिकवतो कीं, विभूतिमान व्यक्ति निर्माण होते तेव्हांच भवितव्यता जागरूकतेने आपलें कार्य करते. असें समजावें हें जर्मन तत्त्वज्ञान !

## इतिहासज्ञाचें काम

घटनेपासून घटना होते, म्हणजे अेकांतूनच दुसरी निघते, असें म्हटलें म्हणजे जगाच्या प्रारंभापासून अंतापर्यंतच्या अितिहासाची ती अेकच अखंड साखळी झाली. आणि तिचे जुने दुवे नव्याशीं कार्यकारणभावाने जोडले गेले आहेत किंवा जातात असें मानलें म्हणजे मग पुढील दुवेदेखील त्याच नियमांनी जोडले जातील असें सांगण्याचा हक्क येतो. अशा रीतीनें सर्व अितिहास तर्कनिष्ठ ठरतो. आणि अितिहासशास्त्र्याला भविष्यें वर्तविण्याची पात्रता ओघानेंच आली ! पण निश्चित गुणधर्म व निश्चित सृष्टिनियम यांच्यावर आधारलेल्या भौतिक शास्त्रालाही बिनचूक भविष्यें करण्याची कला मान्य नाही. कारण पूर्वेतिहासाचें म्हणून जें ज्ञान आपण म्हणतों तेंहि संपूर्ण नसतें, तुटक असतें. अेक भौतिक शास्त्रज्ञ म्हणतो— ‘The question, whether from a complete knowledge of the past we can predict the future, does not arise; because a complete knowledge of the past involves a self-contradicition. A quantum action may be the means of revealing to us some fact about nature--but simultaneously a fresh unknown is implanted in the womb of time. An addition to knowledge is one at the expense of an addition to ignorance. It is hard to empty the well of Truth with a leaky bucket. ( ‘The nature of the Physical World’ by Eddington. p. 228–229. ) भौतिक शास्त्राची जर ही गत तर अितिहासाची काय होईल ? कारण अितिहासांत मनुष्य-समाजाचा संबंध असतो. आणि मनुष्याच्या मतासारखें चंचल व अनिश्चित दुसरें कांही नाही. मग जुन्या अितिहासावरून नव्या अितिहासाविषयी बिनचुक अनुमान कसें होईल ? तात्पर्य events follow *from* events हें खरें नाही. अुलट events simply follow events असें म्हटलें म्हणजे,

जें घडलेलें दिसलें जें खरें वाटलें तें निर्विकार बुद्धीने लिहावें अेवढेंच काम अितिहासज्ञाकडे राहतें.

## भवितव्यता

पण पुढच्या घटनेला जर मागची घटना कारण नाही तर ही पुढची घटना कोण घडवितो ? त्याला जर्मन तत्त्वज्ञांचें अुत्तर असें कीं, ही कामगिरी Destiny म्हणजे दैव किंवा भवितव्यता करिते. आणि हा सिद्धान्त मानणें म्हणजे आधुनिक भौतिक संस्कृतीच्या युगांतून परत प्राचीन आधिदैविक संस्कृतीच्या युगांत प्रविष्ट होण्यासारखें आहे. या विचारसरणींत दैव म्हणून कोणी अेक महापुरुष कल्पावा लागतो, आणि 'दैवमेवात्र पंचमम्' हें वचन त्यालाच अुद्देशुन आहे असें म्हणावें लागतें. अितिहासांत तर्कपद्धति व कार्यकारणभाव लावतां येत नाही याचें अुदाहरण म्हणून जर्मन पंडित हेंच देतील की, व्हर्सायिचा तह हें जर कर्मविपाकजन्य कारण मानलें तर आजला जर्मनी नामशेष होणें हेंच त्याचें निश्चित कार्य व्हावयास पाहिजे होतें. कारण प्रे. विल्सन, लॉईड जॉर्ज, क्लेमॅन्को अित्यादि अठरा पगड मुरव्वी मुत्सद्द्यांनी, जर्मनी फिरून जागचा अुठून अुभाच राहूं नये असा, या तहाने, बंदोबस्त करण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व खर्चिलें होतें. असें असतां जर्मनीचें आजचें लढाअू आक्रमण कसें सिद्ध झालें ? साध्या कार्यकारणभावाच्याविरुद्ध ही गोष्ट घडली ! अर्थात कांही ज्ञानावरोबर कांही अज्ञानहि चालून येत होतें, प्रभावी होत होतें आणि ही गोष्ट जर्मनीची भवितव्यता घडवून आणीत होती, असें म्हटलें तर काय हरकत ? आता कोणी जर्मनीला प्रसन्न असणाऱ्या भवितव्यतेअैवजी ती अिंग्लंड-फ्रान्सवर रागावलेली भवितव्यता म्हणो. पण मिळून भवितव्यताच की नाही ? असें हे जर्मन पंडित म्हणतील. मात्र अिंग्लिश-फ्रेंच अितिहासकारांनी असा भवितव्यतेचा हवाला कधीच सांगितलेला आढळत नाही. युद्ध जिंकूं असें आत्मविश्वासाचें म्हणून अिंग्रज-फ्रेंच बोलतात, पण डेस्टिनीचा हवाला देत नाहीत. ते आत्मस्वातंत्र्यवादी, अिच्छास्वातंत्र्यवादी, प्रयत्नवादी व कार्यकारणवादी आहेत. आणि अशा रीतीने या निरनिराळ्या राष्ट्रांतील अितिहास-तत्त्ववेत्त्यांच्या दृष्टींतील फरक कोणालाही दिसून येअील.

जगांतील युद्ध थांबविण्याचा अुपाय म्हणून अिंग्रज लोक जगांतील सर्व राष्ट्रांचें मिळून अेक फेडरेशन हा अुपाय सुचवितात. अुलट जर्मनांची भिस्त केवळ आपल्या अेकट्याच्या मनगटावर आहे. कोणी सहानुभवी सहकारी मिळाला तरी वाहवा न मिळाला तरी वाहवा.

## जर्मनीची परंपरा

जर्मनीचा अेकंदर अितिहास पाहिला तर तेथे लोकशाहीचें बीज कधी झाल्याचें फारसें दिसत नाही. फार जुन्या काळीं अेकदा जर्मनींत ग्रीसप्रमाणे नगरराज्यें होतीं. पण त्यांनी अेकमुखी मध्यवर्ती राजसत्तेला विरोध केल्याबरोबर तीं दडपून टाकण्यांत आलीं. आणि फ्रेड्रिक दी ग्रेट, बिस्मार्क अित्यादि राजसत्तावादी मुत्सद्दी हेच जर्मनीच्या सर्व अितिहासभर ठळकपणे वावरलेले व गौरवलेले दिसतात. जर्मन तत्त्वज्ञ कॅन्ट याने व्यक्तिशः फ्रेंच राज्यक्रांतीला शाबासकी दिली खरी. तथापि त्याच वेळीं सर्व प्रशियन विद्यापीठांतून राजसत्तेच्या गुणांचीच घोषणा होत होती. आणि येथून पुढे तर बहुतेक जर्मन तत्त्वज्ञ अुग्रबलोपासक, राजसत्तेचे अभिमानी व समर्थक असेच आढळतात. हेगेल हा तत्त्वज्ञ विरोध व घर्षण हेच जगाच्या संसाराचें मुख्य तत्त्व आहे, असें मानणारा होता. प्रथम विरोध व द्वंद्व मग त्यांतून काय निघेल तें ! त्याचीं कांही वाक्येंच देतों. ' Struggle is the law of growth. Life is not made for happiness but for achievement. History is a dialectical movement–almost a series of revolutions–in which genius after genius becomes the instrument of the absolute. The Spirit of the Age is the mother of future, great men are only their mid-wives. " त्यानंतर शोपेनहोर व गटे हे अितिहासांत व्यक्तिमत्व व विभूतिमत्व यांना महत्त्व देणारे होते. " In an age when all the great seemed dead they once more preached the ennobling worship of heroes. " पण विभूतीची त्यांची कल्पना नीत्शेच्या कल्पनेअितकी हीन न्व्हती.

## स्पेन्सर व नीत्शे

यानंतर अेका बाजूला अिंग्लिश तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर आणि दुसऱ्या बाजूला समकालीन जर्मन तत्त्वज्ञ नीत्शे यांच्या शिकवणीची तुलना केली असतां, राजकारण व अितिहास यांच्याकडे अिंग्रजांची व जर्मनांची पाहाण्याची दृष्टि यांतील फरक कळून येअील. स्पेन्सरनें शुद्ध बुद्धीला प्रामाण्य दिलें तर नीत्शेने सत्ताभिलाषी अिच्छाशक्तीला प्राधान्य दिलें. " Will to war, will to power, will to overpower. " ही त्याच्या तत्त्वज्ञानांतील मुख्य त्रिसूत्री होती. झरथुष्ट्र या आपल्या पुस्तकांत तो त्या अिराणी ऋषीच्या तोंडून खालील वाक्य वदवितो–" Live dangerously. Erect your cities besides Vesuvious. Send out your ships to unexplored country. Live in a state of war. "

'सुपरमन' हा शब्द व ही कल्पना नीत्शेपासूनच पुढे अुदयाला आली. या अतिपुरुषाचें मुख्य लक्षण म्हणजे चैतन्य, बुद्धि, स्वाभिमान यांचें योग्य मिश्रण करून तीं मोठ्या ध्येयाच्या कामीं लावावयाचीं. आणि हें ध्येय म्हणजे सत्ताधारी बनणें. अर्थात् हा अतिपुरुष ॲरिस्टोक्रसी म्हणजे अभिजात शिष्टसंघ यालाच मानतो, व लोकशाहीला धिक्कारतो. " Democracy is a mania for counting noses; it must be eradicated before it is too late. " लोकांचीं नाकें मोजण्याअैवजी नाकें पकडून लोकांना वळविणें हेंच नीत्शेच्या राजकारणाचें तत्त्वज्ञान. " Feminism is the natural corrollary of democracy. Who will resque the world from England, and England from Democracy?" असें तो सरळ विचारतो, ' Nature abhors equality ' हें त्याचें सूत्र. अिंग्रज राष्ट्राप्रमाणें द्रव्यशोषण करून लोकांना मारण्यापेक्षा त्यांना लढाईच्या व्यवसायांत सन्मानाने मारणारा नेपोलियन अधिक बरा, असें तो अिंग्रज बनियांना अुद्देशून म्हणतो.

## ऑस्वल्ड स्पेंग्लर

असो. १९१४ च्या महायुद्धाच्या वेळी बर्नहार्डीबरोबर नीत्शे, ट्रॉटस्की अित्यादि आपल्या अिकडील लोकांच्या वाचनांत आले, आणि

अजूनहि ते स्मरणांतून गेले नाहीत म्हणून त्यांचीं मतें अधिक सांगत बसत नाही. परन्तु जर्मनीच्या अैतिहासिक तत्त्वज्ञानाचें वैशिष्टच दाखविणाऱ्या अलिकडील एका ग्रंथकाराचा अुल्लेख केल्याशिवाय हें भाषण संपवावेसें वाटत नाही. हा ग्रंथकार ऑस्वल्ड स्पेंग्लर हा होय. त्याने मागील महायुद्ध सुरू असतां (१९१७) 'Decline of the West' नांवाचा प्रचंड ग्रंथराज प्रसिद्ध केला. तो कोणीहि वाचक वाचून संपवू शकणार नाही. त्या ग्रंथांतील दोन निवडक वाक्यें देतों--" The key to the historic process is to be found in multiple periodicity, a succession not of stages but of completed cycles. The unity of mankind, though a biological fact has no historical existence. Civilisation passes through the stages from childhood to old age not once alone, but again and again. One civilisation after another moves onward to its appointed end. Western civilisation is the latest but not the last of the recurring cycles which advance and recede like the tide on a shelving beach. The philosophy of History, in a word, is the fulfilment of an immanent destiny." ( Germany '–G. P. Gooch,Page 330. )

पण त्यानंतर १९३४ सालापूर्वी 'The Hour of Decision' नांवाचें एक लहानसें पुस्तक त्याने लिहिलें आहे, तें आपण अवश्य मिळवून वाचावें अशी शिफारस मी करतों. तें सुमारें ४ दिवसांत वाचून संपणारें आहे. पण त्यांत आजच्या जर्मन तत्त्वज्ञानाचा अर्क पूर्णपणें सांठविला आहे. स्पेंग्लर हा बोलून चालून नीत्शेचा शिष्य व सांप्रदायी आहे. आणि त्याची मुख्य शिकवण हीच आहे की, अितिहासांतील घटना एकापासून किंवा अेकामुळे अेक–म्हणजे कार्यकारणभावाने–घडून येत नसून राष्ट्राची भवितव्यताच त्या घटना घडवून आणते. त्याच्या मतें जर्मनीपुरतें या देवतेचें कार्य सर्वस्वीं आशावादी असून ती यापुढे जर्मनीलाच सर्व जगांत मोठें करणार आहे.

तो म्हणतो–

'The forces which will sway the future are the will of the strong, healthy instincts, race, the will to passion and

power; while justice, happiness and peace are dreams, hovering ineffectively over them and will always remain dreams. The theories of progress, liberty, the happines of the greatest number, these fail to realise the Destiny in History which depends upon more robust forces. Human History is war History. Life in danger is the real life of History. History recks nothing of humon logic. Thunderstorms, earth-quakes, lava streams, these are the near relatives of the *purposeless* elemental events of world-History.'

## एक शंका

अेकच गोष्ट लक्षांत ठेवावी ती ही की, हें पुस्तक हिटलर हा अधिकारारूढ झाल्यानंतर किंवा त्याच्या समर्थनार्थ लिहिलेलें नाही. या ग्रंथाच्या सूचींत हिटलर हा शब्दहि नाही. याचा अर्थ हिटलरपूर्व जर्मन तत्त्वज्ञानाचा तो उद्‌गार आहे. या पुस्तकावरून असा बोध निघत नाही किंवा कोणी घेतहि नाही की, आज हिटलर जें जें करीत आहे तें सर्व बरोबर आहे परन्तु प्रत्येक राष्ट्राच्या राजकारणामागे कांहीं तत्त्वज्ञान म्हणून असतें. जसें इंग्लंडच्या राजकारणामागे लोकशाही व अुदारमतवादित्व यांचें तत्त्वज्ञान आहे. तेंच जगाच्या अितिहासांतून परिणत होत आलें आहे, असेंहि इंग्रज अितिहासकार दाखवितील.याच्या उलट जर्मनीच्या राजकारणाच्यामागे भवितव्यता, विभूतिमत्व व बलोपासना यांचें तत्त्वज्ञानच उभें असलेलें दिसेल. म्हणून जर्मन तत्त्वज्ञ त्याच दृष्टीने अितिहासाचा अर्थ करतात व सांगतात. यांत खरा कोण, खोटा कोण, असा निर्णय देणें शक्यच नाही. पण अितिहासाच्या तत्त्वज्ञानांत भिन्न मतवादी संप्रदाय कसे कोणत्या कारणांनी निर्माण होतात हें दर्शविण्याकरिताच मी ही चर्चा आज आपणापुढे मांडली आहे.

येथे माझी मलाच एक शंका सुचते ती ही की, जर्मन पंडितांचा डेस्टिनीवरील भरवसा हें खरोखर अितिहासशास्त्रांतील प्रमेय किंवा तत्त्वज्ञान या सदराखाली घालतां येअील, की तो केवळ आत्मप्रौढी, आत्मसमर्थन,

अहंकार यांचा अुद्‌गार समजावा ? कारण अितिहासशास्त्रांतील कोणताहि तत्त्वज्ञानसिद्धांत म्हटला म्हणजे तो सर्वसंगत ( Universal ) असला पाहिजे. पण जर्मन पंडित डेस्टिनी म्हणून सांगतात ती फक्त आपल्या राष्ट्रापुरती. प्रत्येक समाजाला राष्ट्राला अशीच डेस्टिनी असते असा व्यापक सिद्धान्त त्यांनी मांडलेला मला आढळला नाही. तेव्हा त्यांचा डेस्टिनीचा सिद्धान्त स्वार्थी असावा, परमार्थी नसावा असें वाटतें. पण जगांतील एकाच राष्ट्राला डेस्टिनी असावी व अितर राष्ट्रांना नसावी हें कसें ? जर्मन राष्ट्र हेंच काय तें अीश्वराचें लाडकें आणि अितर सर्व नावडतीं असें समजावयाचें की काय ? अुलट प्रत्येक राष्ट्राची म्हणून अेकेक डेस्टिनी असली, तर आज जीं युद्धें होत आहेत त्यांत हीं डेस्टिनी नामक दैवतेंच आपापल्या आश्रित राष्ट्रांची कड घेअून लढत आहेत असें म्हणावें लागेल ! प्रथम पोरें भांडतात आणि नंतर आपापल्या पोरांची कड घेअून त्यांचे आअीबाप भांडू लागतात तसेंच हें असेल काय ? ग्रीक व भारतीय पुराणें व महाकाव्यें यांत देवदेवता आपापल्या भक्ताच्या वतीने युद्धांत सामील झाल्याचीं रसभरित वर्णनें आपण वाचतोंच की नाही ?

## जर्मनराष्ट्रसापेक्ष सिद्धान्त

पण सूक्ष्म दृष्टि चालविल्यास असें आढळेल की, डेस्टिनीचा सिद्धान्त हा जर्मन पंडितांकडून शास्त्राचा किंवा तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त म्हणून मांडला जाण्यापेक्षा केवळ जर्मनराष्ट्रसापेक्ष असाच मांडला जात असतो.जर्मन राष्ट्रच अंतीं सर्व जगावर राज्य करणार वर्चस्व गाजविणार अशी ज्यांची समजूत त्यांना सर्व जगांत अेकच डेस्टिनी व तीहि जर्मनपक्षपाती आहे, मग अितर राष्ट्रांच्या वांट्याला ती येणार कशी, असें वाटल्यास नवल नाही. आणि अितर राष्ट्रांना डेस्टिनी असली तरी तिने जर्मनीच्या डेस्टिनीपुढे नमून तिच्या अनुरोधाने, तिची मर्जी संभाळून तिची सर्व गरज भागवून अुरेल त्यांत आपल्या आश्रित राष्ट्रांचें हित पाहिलें पाहिजे. ' डूश पॉलिटिक ' या पुस्तकांत अर्नेस्ट हॅस हा जर्मन म्हणतो–' Our aim is world Dominion. We want lands even those inhabited by foreigners, whose destiny in the future will be shaped by our

own requirements. ' पण राजकारणी मनुष्य ( पॉलिटिशियन ) असें बोलला तर शोभणार नाही म्हणून जर्मन पंडितांनी, विद्वान शास्त्री लोकांनी, या डेस्टिनीच्या सिद्धान्ताचें समर्थन करून त्याला तत्त्वज्ञानाची झाक प्राप्त करून दिली आहे. १९१४ साली ९०।९५ प्रमुख जर्मन पंडितांनी काढलेला युद्धसमर्थनपर जाहिरनामा प्रौढ वाचकांच्या लक्षांत असेलच.

मला डेस्टिनीचा हा सिद्धान्त अितिहासाच्या शास्त्रीय तत्त्वज्ञानांत जमा धरावासा वाटत नाही. अितिहासांत घटनेमागून घटना घडतात त्यांत कांही मर्यादेपर्यंत कां होअीना सयुक्तिक कार्यकारणसंबंध लावतां येअू शकतो, अशा मताचा मी आहे. मग अपुऱ्या माहितीमुळे किंवा दृष्टिदोषामुळे अपसिद्धान्त निर्माण होवोत. डेस्टिनीला आपल्या कार्यांत ओढण्याचा मोह दोन विशिष्ट प्रकारच्या स्थितींत माणसाला होतो. अेक विपन्नावस्था किंवा दुःखपीडित स्थिति, किंवा दुसरी गर्वाची—अहंकाराची अुन्मादावस्था. जर्मनीला गेल्या शतकांत १९१८ पर्यंत दुःख नव्हतें असें वाटतें. अर्थात त्याने डेस्टिनीचें प्रतिपादन करण्याला त्याची अहंकाराची अुन्मादावस्था हेंच कारण दिसतें. माणसासारखा माणूस सगळें जग कसें जिंकणार ? म्हणून देवदेवता, डेस्टिनीच्या कल्पनेचा आश्रय करावा लागतो. डेस्टिनीला कोणी तरी हस्तक लागतोच. श्रीमंतांचें नोकराशिवाय कसें चालेल ? हा नोकर किंवा हस्तक सुपरमन म्हणजे अतिमानुष विभूति ही होय. विभूति ही अीश्वराचा अंश असें आपली भगवद्गीताहि सांगते. सुपरमनची कल्पना जुनीच आहे.ॲरिस्टॉटल, स्पायनोझा व नीत्शे या तिघांनी तीन काळांत सुपरमनची कल्पना स्वीकारली आहे.पण स्पायनोझाचा व ॲरिस्टॉटलचा सुपरमन सात्त्विक किंवा फार तर राजसगुणी आहे. तर नीत्शेचा हा तामस गुणांचा अवतार आहे. जर्मनी आज जे अत्याचार करीत आहे. त्यांना डेस्टिनी व सुपरमन अशांची अुपपत्ति आवश्यकच असते. पण या विशिष्ट अुपपत्तींत विकार अधिक विचार कमी, हें उघड ठरतें. आणि अुघड अुघड विकारावर आधारलेल्या सिद्धान्तांना अैतिहासिक तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठा देतां येत नाही.

---

# ४. सात वर्षांतील राजकीय घडामोडी

( केसरी ता. २ ऑगस्ट १९४० )

“आम्ही डोमिनियन स्टेटस तूर्त स्वीकारू, पण तें लांबणीवर न टाकतां तुम्ही ताबडतोब त्याच्या कार्याला सक्रिय प्रारंभ करा, व तसें न कराल तर युद्धाला मदत देणार नाहीच, पण सत्याग्रह,कायदेभंग अशा चळवळीहि करू, असा ताठ जबाब गांधींनी कॉंग्रेसचा म्हणून व्हाइसरॉयला दिला असता तर, अधिकारसंन्यास पुढची क्रमप्राप्त गोष्ट झालेली दिसली असती. तसें न झाल्याने सरकारला अडचण तर कांहीच झाली नाही, उलट स्वातंत्र्याची अव्यवहार्य मागणी करण्यांत येते म्हणून आम्ही कांहीच देत नाही अशी सबब सांगून सयुक्तिकपणाची बतावणी सरकाराला करतां आली” असे सार्थ उद्गार श्री. न. चिं. केळकर यांनी लोकशाही स्वराज्य पक्ष परिषदेचें उद्घाटन करतांना काढले.

## पुणें ता. १ ऑगस्ट

सात वर्षांपूर्वी लो. स्व. पक्षाची स्थापना मुंबईस झाली, त्यावेळीं परिषदेचें उद्घाटन करण्याचें काम मजकडे आलें होतें. फिरून आजहि तें काम मजकडे आलें आहे. तथापि आपला पुष्कळ वेळ घेण्याची इच्छा नसल्याने मी या सात वर्षांतील घडामोडीचें समालोचन फार थोडक्यांत करणार आहें.

प्रथम आपला हा राजकीय पक्ष आजवर टिकून राहिला आहे, याबद्दल त्याचें अभिनंदन करतों. कारण तो मोडून टाकावा, आणि कॉंग्रेसमध्ये राहूनच जें काय कार्य करणें तें करावें, अशा सूचना प्रतिपक्षाकडून तर होतच होत्या पण कांही स्वकीयांच्याकडूनहि होत असत. विशेष सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, या पक्षाचे एका वेळचे अध्यक्ष बापूजी अणे यांनीं,

१९३६ सालीं, या पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजिनामा दिला, यामुळें या पक्षाविषयी कांही काळ अनेकांचें प्रतिकूल मत झालें. खरें पाहिलें तर बापूजींनी केलेली राष्ट्रीय सभेवरील टीका आमचा पक्ष करतो तशीच होती व आहे.

## बापूजी अणे यांचें उदाहरण

कायदे–कौन्सिलावरील बहिष्कार उठवावा, राष्ट्रीय पुढाऱ्यांनी मंत्रिपदाचे व इतर अधिकार हातीं घेऊन राष्ट्रीय राजकारणाचा गाडा पुढे ढकलावा, आणि कम्युनल अवॉर्डला कसून विरोध करावा, इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत बापूजी अणे यांचीं जीं मतें तींच या पक्षाचीं आहेत. क्वचित कोणी एखादा सभासद मर्यादा सोडून एखाद्या व्यक्तीसंबंधाने बोलला असेल इतकाच अपराध ! कॉंग्रेसमध्ये मतस्वातंत्र्याला वाव नाही, ही गोष्ट बापूजींनी स्वतःच जाहीर रीतीने अनेक वेळां सांगितली आहे.

कॉंग्रसमध्ये राहूनच कार्य करूं म्हणणाऱ्यांवर यंदा वऱ्हाड-नागपुरांत काय प्रसंग आला हें प्रसिद्ध आहे. एक वेळ कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष असलेल्या, व आज सुमारें वीस पंचवीस वर्षें ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीचे सभासद असलेल्या, बापूजींना त्या कमिटींत यंदा स्थान नाही. आणि पाहुणे म्हणून पूर्वी त्यांना वर्किंग कमिटीच्या बैठकीला निमंत्रण येत असे, तसें यंदा निमंत्रण दिलें गेलें नाही. या सर्व गोष्टी काय दर्शवितात व सुचवितात याचा आपणच विचार करा.

आमचा लो. स्व पक्ष महाराष्ट्रापुरताच बावरतो म्हणून तो ठीक नाही असा आक्षेप घेऊन, चार वर्षांपूर्वी, पं. मालवीय यांच्या प्रमुखत्वानें बापूजी अणे यांनी कलकत्त्यास सर्व राष्ट्रीय स्वरूपाचा म्हणून एक पक्ष निर्माण केला. तेव्हा 'नवीन पक्ष असा काढू नका, फार तर कम्युनल अवॉर्ड विरोधी लीग काढा, व कायम स्वरूपाच्या पक्षाचें पुढारीपण घेऊन, याच पक्षांत राहून, सर्व हिंदुस्थानभर कार्य करा,' असें त्यांना आमचेकडून सांगण्यांत येत होतें. पण आमच्या पक्षाहून कांग्रेसशीं अधिक नमतें घेणारा एखादा पक्ष हवा म्हणून त्यांनीं कांग्रेस नॅशनॅलिस्ट पक्षाची स्थापना केली. पण त्या पक्षाचें पुढे काय काम झालें हें प्रसिद्धच आहे ! त्या पक्षातर्फे पंजाब व बंगा-

त्यांत कांही लोक निवडून आले तसे मुंबई कौन्सिलांत लोकशाही स्वराज्य पक्षाचेहि चार पांच लोक निवडले गेले. तात्पर्य, कांग्रेसमध्ये राहूनच काय तें काम कोणीहि करावें या सिद्धांताचा फोलपणा अनेक बाजूंनी प्रकट झाला आहे.

आणि हा प्रयत्न आजपर्यंत बापूजी अणे यांच्याइतका निष्ठावंतपणें इतर कोणी क्वचित केला असेल, म्हणूनच त्या प्रयत्नाचें अपयश पटविण्या-करिता बापूजींचें उदाहरण मी दिलें. मला यांत वाईट इतकेंच वाटलें कीं, बापूजींनी या पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे मध्य महाराष्ट्र व वऱ्हाड, नागपूर महाराष्ट्र यांजमध्यें, राजकारणाच्या मतांत वस्तुतः फरक नसतां, हे प्रांत एकमेकांपासून निष्कारण दुरावल्यासारखे वाटूं लागले. एरवी बापूजींबद्दल याहि प्रांतांतल्या लोकांच्या मनांत किती आदर आहे ही गोष्ट इकडच्या महाराष्ट्रांत त्यांच्या ६१ टीच्या प्रसंगाने, त्यांचा सत्कार करण्या-करिता स्वतंत्र प्रांतिक मंडळ स्थापूनहि आमच्या पक्षाकडून सहकारिता करण्यांत येत आहे यावरून दिसून येईल.

## कांग्रेस व लोकशाही पक्ष

असो. १९२६ सालीं अकोल्यास स्थापलेल्या प्रतिसहकार नांवाच्या पक्षाच्या शब्दांत 'कांग्रेस' हा शब्द नव्हता. त्याप्रमाणे १९३३ सालीं मुंबईस स्थापन झालेल्या लोकशाही स्वराज्य पक्षाच्या नांवांतहि 'कांग्रेस' हा शब्द नाही. तथापि पक्षाच्या घटनेंत प्रथम असा निर्बंध घालण्यांत आला होता की या पक्षाचा सभासद होणाराने कांग्रेसचें सभासदत्व आधी स्वीकारलें पाहिजे. बरींच वर्षे हा नियम अमलांतहि राहिला. आणि आमच्या पक्षाच्या सभा-सदत्वाची पांच आणे फी कोणी भरली तर त्यांतले चार आणे आधी स्थानिक कांग्रेस कमिटीकडे जमा व्हावे, मग आपला एक आणा आपण घ्यावा, अशी विपरीत व्यवस्था चालू होती. परंतु कांग्रेसच्या सभासदत्वाची ही अट विना-कारण आपल्या मार्गांत येते म्हणून पुढे ही सक्तीची अट ढिली करण्यांत आली.

तथापि या पक्षाचे पुष्कळ सभासद अजूनहि आपलें कांग्रेस सभासदत्व संभाळतात, व कांग्रेस हाच या देशांत आज सर्वांत प्रमुख असा राजकीय

पक्ष आहे असें मानतात. त्यांची इच्छा इतकीच असते की, कांग्रेस ही सर्वमान्य होण्याच्या मार्गांत आज जे लहानमोठे अडथळे आहेत ते दूर व्हावे, आणि कांग्रेसचा असा एकच एक मोठा व प्रबल पक्ष होऊन त्याच्या पुढारीपणाने राजकारण लढविलें जावें. हें होण्याला भ्रामक सत्यपालनाची आणि अहिंसापालनाची अव्यवहार्य लेखी प्रतिज्ञा घेणें, सूत कातणें, खादी अबाधितरीत्या वापरणें, इत्यादि अटी काढून टाकाव्या, आणि लोकशाहीच्या खऱ्या तत्त्वानुसार कांग्रेसचा अंतर्गत कारभार चालावा. असें झाल्यास आपल्या लोकप्रियतेवर ज्यांना कां. कमिटयांतून निवडून येण्याची पात्रता असेल ते येतील नाही तर स्वस्थ बसतील. आजहि आमच्या पक्षाचे पुष्कळ सभासद कांग्रेसचेहि घटक सभासद आहेत. तथापि त्यांना कां. कमिटीच्या निवडणुकींना उभे राहतां येत नाहीं.

## सत्याग्रह यशस्वी केव्हा होतो ?

असो. आता लो.स्व. पक्ष स्थापन झाल्यापासून हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रांत काय काय घडून आलें हें पाहूं. १९३३ पासून कायदेभंगाची चळवळ मागे पडली. पुणें परिषदेंत सामुदायिक कायदेभंग थांबविण्यांत आला, फक्त व्यक्तिनिष्ठ सत्याग्रह शिल्लक ठेवला. पण त्याचीहि किल्ली गांधींनी आपल्या कनवठीला लावली. आणि या कनवठीला गांधीजी आपलें घडचाळ ठेवीत असतात. दोहोंचा मिळून अर्थ हाच कीं, गांधीजी जी वेळ योग्य म्हणून ठरवितील त्या वेळीं व योग्य ठरवितील त्या कॉंग्रेवाल्यांनी सत्याग्रहास सुरुवात केली जाईल. परवा पुण्यास झालेल्या सभेच्या रंगावरून कदाचित् ही चळवळ पुढेमागे सुरु होईल असें वाटत होतें. पण तूर्त तो रंग नाही पण पुढे सुरू झाली तरी फिरुन १९३३ प्रमाणेच ती थांबवावी लागेल. अशा चळवळीचें तात्कालिक उद्दिष्ट निश्चित व मर्यादित असलें तरच सत्याग्रह फलप्रद होतो हें दक्षिण आफ्रिकेंत गांधींच्या प्रत्ययास आलें परंतु हिंदुस्थानांत असें मर्यादित निश्चित उद्दिष्ट डोळयांपुडे ठेवून सत्याग्रह न करतां, स्वराज्य, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय अशा व्यापक ध्येयांना उद्देशून आरंभलेली सत्याग्रहाची चळवळ, तीं ध्येयें पदरांत न पडतां, पराभवाची कबुली देऊन थांबवावी लागेल हें उघड आहे व त्याचेंच वाईट वाटतें. उलट हॉलवेल स्मारक हल-

विण्याची सत्याग्रहाची चळवळ यशस्वी झाली. कारण त्याचें उद्दिष्ट निश्चित व लहान होतें.

## कौन्सिल बहिष्कार इतिहासजमा

असो. आमच्या पक्षाच्या तत्त्वाप्रमाणे काँग्रेसने कायदेकौन्सिलावरील बहिष्कार उठविला हें चांगलें केलें. पण त्याबरोबर कम्यूनल अवॉर्डला मूक संमति देऊन कौन्सिल प्रवेश केला एवढी गोष्ट मात्र वाईट केली. पुढे निवडणुकी जिंकल्या व कांही कायदेमंडळांत निर्णायक बहुमत मिळविलें, तरी प्रथम काँग्रेसने अधिकारग्रहणावर बहिष्काराचा बहाणा चालविला. पण तें नाटकहि लवकरच संपलें. काँग्रेसने अधिकारस्वीकार केला त्याचा दुहेरी सुपरिणाम झाला. एक तर या स्वीकाराने राष्ट्रीय पक्ष सुदृढ होतो आणि सत्ता हातीं आली तर लहानसान राजकीय सुधारणा पदरांत पाडून घेतां येतात हें सिद्ध झालें. लोककल्याण तितक्यापुरतें करतां येतें, व स्वतःच्या पात्रतेबद्दल आत्मविश्वास वाढतो हेंहि सिद्ध झालें. म्हणून अधिकारग्रहण केल्याबद्दल व त्या अवधींत काँग्रेसने ज्या अनेक चांगल्या गोष्टी केल्या त्याबद्दल, मी तिचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. पण युद्ध सुरू होतांच अधिकारसूत्रें खाली ठेवलीं हें तिने चांगलें केलें नाही. कारण सरकारची अडवणूक करण्याचा तो एक रीतसर सुप्रसंग होता, आणि ती करून गव्हर्नरांकडून प्रधानमंडळांनी बडतर्फीच घेतली असती तर जनतेवर त्याचा परिणाम चांगला झाला असता. असो. युद्धाची तात्पुरती अडचण निघून गेली म्हणजे काँग्रेस फिरून प्रधानमंडळें बनवील अशी आशा आहे. तसें झालें म्हणजे पुढे केव्हाहि कौन्सिलबहिष्कार हा कायमचा इतिहासांत जमा होईल असें वाटतें.

सत्य, अहिंसा, यांविषयी बोलण्याचें कारणच नाही. बहुतेक सर्व काँग्रेस पुढाऱ्यांनीच परवा पुण्यास आपल्या कबुलीने अहिंसेची असंबद्धता मान्य केली आहे. म. गांधी व त्यांचे निष्ठावंत अनुयायी यांच्यांत बेबनाव व्हावा असें कोणास चिंतण्याचें कारण नाही. येवढा प्रचंड अनुयायांचा समाज एका पुढाऱ्यामागे अशा निष्ठेने राहणें, ही गोष्ट परदेशच्या लोकांच्या मनावर परिणाम करणारी आहे. आणि या दृष्टीने मी गांधींना या कर्तृत्वाबद्दल धन्यवाद देतों. तथापि तेच परदेशचे लोक सत्य व अहिंसा यांची थट्टा करून

हिंदुस्थानचे लोक बुद्धिप्रामाण्यांत कमी पडतात असें मनांत समजतात ही गोष्ट अनिष्ट होय. हिंदुस्थानच्या या असाधारण राजकीय पुढाऱ्यांच्या राजकारण-विषयक ज्ञानाबद्दल व शहाणपणाबद्दल ते मनांत काय म्हणत असतील ? किती नांवें ठेवीत असतील ? तुच्छता बुद्धीने किती हसत असतील ? टिळकांच्या तत्वज्ञानाचें मर्म गांधींनी जाणलें नाहीं.

आत्यंतिक अहिंसा हें थोतांड आहे ही गोष्ट दिल्ली येथील गुरु-शिष्यांच्या अपूर्व कलहांत सिद्ध झालीच पण ती सक्रिय रीतीनें सिद्ध करण्याला सेवाग्रामांतील एका कोल्हयाला आपले प्राण खर्ची घालावे लागले याचें मात्र वाईट वाटतें ! ही गोष्ट चर्चिल व हिटलर यांना कळली तर म. गांधींनी या दोघांना अहिंसेचा उपदेश करून पाठविलेलीं पत्रें जळत्या शेगडींत पडतील यांत काय संशय ? गांधींना हिटलर जितका जवळ आहे त्यापेक्षा गांधी हे आम्हाला अधिक जवळ आहेत. म्हणून आमच्या अहिंसा-विरोधाच्या मर्माचा उपदेश त्यांना अनाहूतपणेहि करण्याचा अधिकार आम्हाला पोचतो. म्हणून फिरून एकवार येथे सांगतों कीं लो. स्व. पक्षाचा अहिंसा–प्रतिज्ञेला विरोध आहे तो, त्या पक्षाला तामस हिंसा प्रिय आहे म्हणून नव्हे, तर अहिंसेला कांही व्यावहारिक मर्यादा पडतात म्हणून ! लो. स्व. पक्ष बलोपासक आहे. पण त्या उपासनेचा त्याचा मंत्र कालिदासाच्या शब्दांत सांगावयाचा तर 'बलमार्तभयोपशांतये' किंवा 'आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि' असा सांगतां येईल. लो. टिळकांचें तत्त्वज्ञान हिंसाप्रधान (!) म्हणून तें मला हाणून पाडावयाचें आहे असें गांधी १९२० च्या सुमारास म्हणत असें लोक सांगतात ! त्याची आठवण या प्रसंगीं सहज होते, व टिळकांच्या तत्त्वज्ञानाचें मर्मच गांधींनी जाणलें नाही, असें म्हणण प्राप्त होतें.

## काँग्रेसच्या मागणींतील अव्यवहार्यता

असो. प्रस्तुत महायुद्ध सुरू न होतें तर काँग्रेस मंत्रिमंडळांनी आपला अधिकार सोडला नसता असें वाटतें. पण तो सोडल्यावर काँग्रेसने स्वराज्यदानाच्या स्पष्ट अटीवर सरकारला मदत करण्याचें आश्वासन द्यावें

तें दिलें नाही. पण दुसरे पक्षीं गांधींनी इंग्रजांविषयी व पर्यायाने साम्राज्यशाहीशी सहानुभूतीच प्रकट केली. आपल्या साम्राज्यावरील प्रसंग जाणून ब्रिटिश सरकारने युद्धानंतर लवकरच हिंदुस्थानला डोमीनियन स्टेटस देऊं केलें. पण लगेच काँग्रेसने त्याऐवजी संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेची मागणी केली! म्हणजे म्हण आहे त्याप्रमाणे, हा शुद्ध करणेकऱ्याचा वसा होय! हीं सर्व धोरणें परस्पर विसंगत व फारच चुकीचीं अशीं वाटतात. आम्ही डोमीनियन स्टेटस तूर्त स्वीकारूं, पण तें लांबणीवर न टाकतां तुम्ही तावडतोब त्याच्या कार्याला सक्रिय प्रारंभ करा, व तसें न कराल तर युद्धाला मदत देणार नाहीच, पण सत्याग्रह, कायदेभंग अशा चळवळीहि करूं. असा ताठ जबाब गांधींनी काँग्रेसचा म्हणून व्हाइसरॉयाला दिला असता तर, अधिकारसंन्यासापुढची क्रमप्राप्त गोष्ट झालेली दिसली असती. तसें न झाल्याने सरकारला अडचण तर कांहीच झाली नाही, उलट स्वातंत्र्याची अव्यवहार्य मागणी करण्यांत येते म्हणून आम्ही कांहीच देत नाही अशी सबब सांगून सयुक्तिकपणाची वतावणी सरकारला करतां आली.

असो. आता ब्रि. सरकारचें स्वतंत्र धोरण काय आहे हें पाहूं. युद्ध सुरू होईपर्यंत स्वराज्याची मागणी देण्याचा विचार स्थगितच होता. पण उन्हाच्या तापाने झाडांना अंकुर फुटतात त्याप्रमाणे, या युद्धाच्या तापाने सरकारच्या औदार्यबुद्धीला अंकुर फुटला. त्यांनी प्रथम युद्धहेतूंची म्हणून घोषणा सुरू केली. पण ते हेतु काय हें कधीच स्पष्ट सांगितलें नाही. १९१४ च्या महायुद्धाच्यावेळीं स्वयनिर्णय हें महत्तत्त्व मुखर झालें होतें. पण त्याची थट्टा पुढे आपोआप झाली. कारण स्वयंनिर्णय हा शाळेंतला खाऊ आहे, देवळांतला प्रसाद नव्हे, असें ठरलें. तें कसें ? तर खाऊ हा फक्त लहान मुलांनाच देतात, प्रसाद हा मात्र लहानांप्रमाणे थोरांनाहि द्यावा लागतो. त्या उदार घोषणेचा फायदा फक्त चिल्लर राष्ट्रांना मिळाला व तोहि युरोपियन राष्ट्रांना. हिंदुस्थानाला तो कां मिळाला नाही ? तें राष्ट्र मोठें आहे व आशियांत आहे हा काय त्याचा गुन्हा झाला ?

वायको पुरुषाच्या हाताला हात लावते त्याप्रमाणे इंग्लंडच्या हाताला हात लावण्याला व इंग्लंडाचिया बाजूला आणखी एका मताची गणती व्हावी

याकरिता, हिंदुस्थानला राष्ट्रसंघांत एक जागा दिली. पण आज हिंदुस्थानची राज्यघटना स्वयंनिर्णयाने बनली आहे काय ? राष्ट्रसंघांत परतंत्र हिंदुस्थानाला इतर राष्ट्रें बसूं तरी कशीं देतात हेंच कळत नाही. कदाचित् हें कारण असेल कीं विचारें हिंदुस्थान ओझ्याच्या गाढवाप्रमाणे पाठीवर लादला जाईल तितका राष्ट्रसंघाचा खर्च आपला हिस्सा म्हणून निमूटपणें सोसतें. १९१९ साली व्हर्सायच्या तहावर सह्या करणारांमध्ये हिंदुस्थान हें एक होतें म्हणून तें संस्थापक सभासद गणलें गेलें. पण मागाहून घेतल्या जाणाऱ्या सभासदाची पात्रता 'Any fully Self–governing state or colony or Dominion' अशी ठरली; त्याप्रमाणे हिंदुस्थान हें Fully self–governing आहे काय ? हिंदुस्थान हें वरील व्याख्येप्रमाणे स्टेट नाही, कॉलोनी नाही; डोमीनियन नाही. तर डिपेंडन्सी आहे!

## युद्धहेतु जाहीर न करण्यांतील मर्म

युद्धहेतूंच्या प्रतिज्ञा गळ्याशी येतात, म्हणून या खेपेस इंग्लंडने तशा प्रतिज्ञा केव्हांहि स्पष्ट शब्दांनी न सांगण्याची सावधगिरी ठेवलेली दिसते. अर्थात शेवटीं तहांत जीं तत्त्वें मान्य होतील तेच पूर्वी आमचे हेतु होते असें इंग्लंड म्हणूं शकेल. आणि डोळ्यांनी पाहून तोंडाने सांगितलेलें भविष्य ज्याप्रमाणे खोटें ठरण्याचा संभव नसतो, त्याप्रमाणे शेवटीं जर्मनीशी तह ठरेल त्याप्रमाणेच आमचे मूळ हेतु होते असें इंग्लंड म्हणाल्यास त्यांच्या युद्धहेतूंची प्रतिज्ञा हटकून पार पडेल !

युद्धहेतूंचा म्हणून ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या तोंडून जो ओझरता उल्लेख होतो त्यांत Civilisation व Freedom हे दोन शब्द येतात. पण त्याची थोडी चिकित्सा व्हावयाला हवी. हिटलर गर्विष्ठ, अरेराव, जुलमी आहे. या दृष्टीने तो निंद्य आहे. पण त्याने जगांतील Civilisation कशी बुडविली हें कळत नाही. Civilisation चा मूर्धाभिषिक्त अर्थ घेतला तर 'लौकिक संसारांतील सुखसोयीची व संस्कृतीची वाढ आणि अभ्युदय' असा अर्थ शब्दकोशांत निघतो. मग जर्मनी या बाबतींत मागासलेला आहे काय ? आता 'फ्रीडम' घेऊं. त्याच्या राज्यांत राजकीय स्वातंत्र्य नाही ही गर्हणीय गोष्ट

कबूल करावी लागेल. पण हा स्वातंत्र्याचा स्वार्थत्याग जर्मन प्रजेने कांही काळपर्यंत आपल्या राष्ट्राचा विजय होण्याकरिता जाणून बुजून केलेला असणें शक्य आहे ! ती गोष्ट जाणत्या स्वयंनिर्णयानेहि घडली असेल.

पण आपणाला जर्मनीशी काय करावयाचें आहे ? मात्र इंग्लंड जगांतल्या कोणत्या भागांतील लोकांना कोणत्या प्रकारची व कोणत्या दर्जाची स्वतंत्रता मिळवून देणार व कशी देणार हें आज कळणें कठीण आहे. त्या भागांत हिंदुस्थानचा समावेश आहे कीं नाही ? व ती स्वतंत्रता फक्त मिळेल तें खाऊनपिऊन उनाडण्यापुरती आहे की आपल्या देशाचें राज्य कोणी करावें कसें करावें हें ठरविण्याची स्वतंत्रता इंग्लंड देणार आहे ? नाही तर freedom चा अर्थ इतकाच व्हावयाचा कीं, कर द्यावे लोकांनी व राज्यसूत्रें राहावीं परक्या ब्रिटिश सरकारच्या हातीं. येऊनजाऊन लोकांच्या खाजगी व्यवहारांत सक्ती नसली म्हणजे झालें ! पूर्वीच्या युद्धहेतूंमध्ये स्वयंनिर्णय या तत्त्वाला प्राधान्य होतें, हल्लीचा रोख असा दिसतो कीं स्वयंनिर्णयाचा हक्क नसेना का ? राष्ट्रांत हिटलरपद्धतीची झोटिंगशाही नसावी म्हणजे झालें !

## हिंदुस्थानच्या आकांक्षा

पण इंग्लंडचे युद्धहेतु कांहीहि असले तरी हिंदुस्थानच्या आकांक्षा काय आहेत हें तरी त्याचें त्याला चांगलें कळतें. शिवाय त्या आकांक्षांची प्राप्ती तो कोणत्याहि युद्धाच्या निकालावर अवलंबून ठेवण्याला तयार नाही. कारण युद्ध ही गोष्ट आगंतुक आहे. त्यांत इंग्रजांना जय मिळाला तर, त्या आमच्या आकांक्षा त्यांनी आनंदाची देणगी म्हणून पुऱ्या कराव्या. जय न मिळाला तरी आपत्तीच्या वैराग्यांत खिन्न मनाने कर्तव्य म्हणून त्या पुऱ्या कराव्या. या आकांक्षांमध्ये स्वयंनिर्णयाने बनविलेली स्वराज्यघटना व तिचा अंमल अबाधितपणे करण्याचें स्वातंत्र्य, या गोष्टी मुख्यतः येतात. तथापि सर्व गोष्टी एकदम चुटकीसारख्या घडून येऊं शकत नाहीत म्हणून त्यांचा क्रम कसा असावा हें विधायकपणें थोडें सांगतों.अर्थात् तें व्यक्तिशः माझें मत आहे,

या परिषदेचें किंवा या पक्षाचें नव्हे. पक्षाचें मत उद्या परिषदेंत मान्य होतील त्या ठरावांवरून ओळखावयाचें आहे.

इंग्लंड हिंदुस्थानला डोमिनियन स्टेटसचें स्वराज्य देण्यास तयार आहे असें सांगण्यांत येतें. पण हें नुसतें मोघम आश्वासन आहे. तें घडून येण्याची जास्तीत जास्त अवधि, त्याचा हप्तेबंद कार्यक्रम, ते हप्ते पदरांत टाकण्याची रीति पद्धति, यापैकी कशाचाच उलगडा नाही. 'आशां कालवतीं कुर्यात् कालं अर्थेन योजयेत्' ही कणिकनीति प्रसिध्द आहे. आणि कपटी कणिकाचार्य भारतांतच होऊन गेले असें नाही तर ते इंग्लंडांतहि आहेतच. म्हणून इंग्लंडच्या मोघम आश्वासनाचा विश्वास वाटत नाही. 'युध्दसमाप्तीनंतर एक वर्षाच्या आंत' या शब्दांनी सुचविलेली अवधीहि मान्य होईल. पण दरम्यानचें अगदी वेळापत्रक तयार न करतां आलें तरी क्रमपत्रक तयार करतां यावें.माझ्या मतें हें क्रमपत्रक असें असावें, व तें अमलांत आणतांना सरकारने कोणाच्या खुषीनाखुषीची पर्वा करूं नये.

## सरकारने काय केलें पाहिजे

१. प्रथम बादशहांच्या तोंडून डोमिनियन स्टेटसचें हें आश्वासन जाहीरनाम्याच्या रूपानें वदवावें. २. त्यानंतर मध्यवर्ती कायदेमंडळ व प्रांतिक मंडळें बरखास्त करून नव्या निवडणुकी करवाव्या; आणि त्यांत निवडून येणाऱ्या सर्व सभासदांची मिळून घटनासमिती (कॉन्स्टिटच्युअंट असेंब्ली) होणार आहे असें जाहीर करावें. म्हणजे निवडणुकी होतील त्या हें निश्चित ध्येय डोळ्यांपुढे ठेवून होतील. ३. या निवडणुकींत यशस्वी झालेल्या सभासदांतून मतें दिलेल्या मतदारांच्या संख्येच्या शेंकडेवारीच्या कांही ठराविक प्रमाणांत, पण एकंदर सुमारे दोनशें प्रतिनिधि पक्षबलसंख्येच्या प्रमाणांत (प्रपोर्शनल रेप्रेझेंटेशन) निवडले जावेत व ही घटनासमिती व्हावी. ४. या समितीने ढोबळ स्वरूपाची डोमिनियन स्टेटसच्या स्वराज्याची घटना बनवावी. ५. या घटनेला संमति देणारा एक तह इंग्रज सरकार व या समितीने निवडलेले पांच प्रतिनिधी यांच्या दरम्यान लेखी व्हावा. ६. नंतर तज्ज्ञ कायदेपंडितांचें एक छोटेंसें मंडळ नेमून त्याजकडून या घटना–मसुद्याला

कायद्याचें स्वरूप कलमवारीने द्यावें. ७. नंतर तें बिल म्हणून ब्रिटिश प्रधान-मंडळाने पार्लमेंटपुढे मांडावें व पास करवून घ्यावें. ८.पणहें इकडे होत असतां, बादशहांची जाहीर घोषणा झाल्याबरोबर, गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांतील सभासदांची संख्या वाढवून त्यांत, मध्यवर्ती मंडळांत निवडून आलेल्यांपैकीं पक्षदृष्टया प्रातिनिधिक स्वरूप ज्यांना आहे, अशा कांहीं गृहस्थांची नेमणूक हल्लीच्या सरकारी सभासदांच्या जागीं करावी, व त्यांजकडे बहुतेक खातीं सोंपवून द्यावीं. आणि जबाबदारीचें तत्त्व सुरू करावें. प्रथम संयुक्त नसली तरी फुटकळ पण जबाबदारीची पद्धति चालू करावी. ९.पार्लमेंटरी बिल मंजूर होईपर्यंत ही तात्पुरती व्यवस्था ट्रॅन्झिशनल प्रोव्हिजन म्हणून समजावी. १०.कोणत्याही मुद्द्यावर घटनासमितीचा निर्णय एकमताने न झाल्यास ब्रिटिश प्रधानमंडळाने तो निर्णय स्वतःच्या जबाबदारीवर करावा. ११.हा निर्णय करतांना राजकीय स्वरूपाच्या योजना करावयाच्या त्या,विद्यमान डोमीनियन्सच्या निरनिराळ्या घटना डोळ्यांपुढे ठेवून कराव्या. आणि जात, धर्म इत्यादि दृष्टया प्रश्न येतील त्यांचा निर्णय राष्ट्रसंघाच्या नियमांना अनुसरून करावा. १२. कलम ५ मध्ये सांगितलेल्या तहांत हिंदु–मुसलमानादि कोणाहि जातवार धर्मवार वर्गांत शेंकडा शंभर इतकी एकी होण्याचा आग्रह धरूं नये, अट घालूं नये. एकी झाल्यास उत्तमच; न झाल्यास वादग्रस्त प्रश्न वरील पद्धतीने जबाबदारीने प्रधानमंडळ निकालांत काढील. पण एकंदरीने डोमीनियन स्टेटसच्या अधिकारांत कमीपणा येऊं देणार नाही असें आगाऊ बजावून ठेवावें.

## स्वराज्यदानाचें कपटी नि अप्रामाणिक आश्वासन

हा द्राविडी प्राणायाम दिसतो. पण डोमीनियन स्टेटस तावडतोब द्यावयाचें तें, प्रथम तह व तहानुसार पार्लमेंटरी बिल या जोड व्यवस्थेने द्यावयाचें असें गृहीत धरल्यास, हा द्राविडी प्राणायाम टळणार नाही. दुसरे पक्षीं निर्भेळ स्वातंत्र्य हें आमचें ध्येय व तेंच आम्ही तावडतोब पदरांत पाडून घेऊं म्हणणारांनी बंडच केलें पाहिजे. आणि समांतर सरकार–पॅरलल् गव्हर्मेंट स्थापून स्वतंत्र न्यायकोर्टें स्थापून राज्यकारभार सुरू केला पाहिजे. वरील दोहोंपैकीं कांही होवो, पण " हिंदु–मुसलमानांनी एकी करून घटना

बनवावी, आणि मग ती अमलांत आणण्याची तयारी करण्याचे मार्ग शोधून काढण्याच्या विचाराला सवडीने व सोयीने लागूं" हें स्वराज्यदानाचें आश्वासन म्हणजे ही कपटी अप्रामाणिकपणाची, कांही न करण्याच्या अंत:स्थ इच्छेची, दगलबाजीची, अपमान करण्याची कपिलाषष्ठीच्या वाय-द्याची भाषा आहे असें खुशाल समजावें. ज्यांनी आयर्लंडचा अद्ययावत् इतिहास वाचला असेल त्यांना इंग्रज लोक स्वराज्यदानांत किती कृपण आहेत हें कळून येईल. १९१२ सालीं लिबरल प्रधानमंडळाने होमरूलचा प्रश्न काढला तेव्हा काय घडलें हें इतिहासकाराच्या शब्दांनीच सांगतों–

'पार्लमेंटच्या सभेंत गुद्दागुद्दी झाली. त्यांत चर्चिलच्या तोंडाचे ओर-खडे निघाले. प्रत्येक पक्ष हा एकेक सैन्याचें केन्द्र बनला. आयर्लंडमध्ये तर दक्षिणेकडील व उत्तरेकडील विभागांत दोन बंडें उभारलीं गेलीं. सर्व आयर्लंडला मिळून होमरूल देत नाही म्हणून दक्षिणेंतील बंड व तसा होम-रूल देणार म्हणून उत्तरेकडील बंड! सैन्यें उभारलीं जाऊं लागलीं. लष्करी शिक्षण व कवायती सुरू झाल्या. परदेशाहून गुप्तपणें शस्त्रास्त्रें आणण्याला सुरवात झाली. पण याहून महत्त्वाची गोष्ट अशी कीं, हीं बंडें मोडण्याला आयर्लंडमध्ये जें सैन्य पाठविण्याचें योजिलें, त्यांतच होमरूलला अनुकूल व प्रतिकूल असे तट पडले. शिपाई लोक अधिकाऱ्यांचे हुकूम मानणार कीं नाही? गोळीबार करणार कीं नाही? व केला तर कुणावर? असा प्रश्न निघाला! कारसनसारखे कायदेपंडितहि लष्करी बंडखोर बनले. लॉर्ड रॉबर्टसारख्या फील्ड-मार्शलनी बंडवाल्यांची साथ केली. म्हणजे एका शब्दांत सांगावयाचें तर इंग्लंडांतील लिबरल व यूनियन पक्षांत पूर्वीच्या कॅव्हेलियर्स व राऊंडहेडस्, किंवा व्हाईट रोझ व रेड रोझ, यांच्यांतील युद्धाप्रमाणे युद्ध होण्याचा रंग दिसूं लागला. आणि मुख्य प्रधान अ‍ॅस्क्वीथ याला सैन्यांतील बंडखोरी थांबविण्याकरिता स्वतःकडे सेनापतिपद घ्यावें लागलें!'

इंग्लिश मुत्सद्द्यांमध्ये हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याविषयी इंग्लंडांत असे तट पूर्वी कधी पडले काय? व पुढे तरी पडतील काय? मोघम भाषा वापरली जाते तेथपर्यंत दोन्ही पक्ष हो हो करीत असतात. पण ज्या दिवशीं

हिंदुस्थानच्या विषयावर वरील सारखी यादवी ब्रिटिश मुत्सद्द्यांत माजेल, त्या दिवशीं इंग्लंडने हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याला खरें काढलें असें समजावें. पण त्याहिपेक्षा उत्तम मार्ग हा कीं, कोणत्याहि पार्लमेंटरी पक्षावर न विसंबतां हिंदी लोकांनी आपणच आपली चळवळ करून ती शेवटाला न्यावी. आयरिश सिनफेन पक्षाने हेंच केलें.

### आचरणाची कसोटी, बहुमताची नव्हे

असो. माझें भाषण संपलें. एखाद्या पक्षाचे सभासद त्याच्या पटावर किती नोंदले आहेत, किंवा त्याच्यातर्फे कायदे कौन्सिलांत किती लोक निवडले गेलेले आहेत, केवळ यावरून त्याची आवश्यकता किंवा महत्त्व ओळखणें बरें नव्हे. तर परवा 'लोकशक्तीं'त एक कांग्रेसपुढारी श्री. शंकरराव देव यांनी 'आचरणाची कसोटी, बहुमताची नव्हे' या लेखांत म्हटल्याप्रमाणे 'सार्वजनिक जीवनांत कांही प्रश्न असे असतात कीं त्यांचा हात मोजून निर्णय लावणें मूर्खपणाचें ठरेल हेंच खरें.'

---

## ५. हा पहा डोमीनियन स्टेटसचा एक नमुना!

( केसरी २० ऑगस्ट १९४० )

आयरिश फरी स्टेट, म्हणजे स्वतंत्र आयरिश राज्य, हें ब्रिटिश साम्राज्यांत अन्तर्भूत होतें काय? या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें दिल्यास साम्राज्याच्या पोटांत राजकीय स्वातंत्र्य समावूं शकतें असें होईल. पण स्वातंत्र्य व साम्राज्य यांतील तात्त्विक विरोध नाहीसा करण्याला प्राचीन ग्रीक किंवा अर्वाचीन बंगाली नैय्यायिकच आणावा लागेल. आणि 'पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते,-म्हणजे पूर्णांतून पूर्ण काढून घेतलें तरी पूर्ण उरतें. या वैदिक वचनाचा आधार देऊन तो नैय्यायिक आपल्या उत्तराचें समर्थन करूं शकेल. याचा अर्थच हा की, कांही एका मर्यादेपलीकडे अशा प्रश्नाची चिकित्सा होऊंच शकत नाही.

आज महायुध्द सुरू असतां आयर्लंड व इंग्लंड यांचे संबंध काय आहेत हें लक्षांत घेतलें असतां, वरील कूट प्रश्नावर एका बाजूने प्रकाश पडण्यासारखा आहे. म्हणून ती चिकित्सा थोडोशी करण्याचें आज योजिलें आहे.

प्रथम वाचकान ही गोष्ट लक्षांत आणावी कीं, वरच्या टोकाला ब्रिटिश साम्राज्यांतील इंग्लंडने आपल्या स्वतंत्र अधिकारान युध्द पुकारलें. आणि त्याच्या शेपटीला बांधल्याप्रमाणे, केवळ व्हाइसरॉयांच्या घोषणेने, परतंत्र हिंदुस्थान युध्दांत सामील झालें. दिल्ली येथील कायदेमंडळाला किंवा प्रांतिक प्रधानमंडळांना विचारून त्यांची संमति या कामीं घेण्यांत आली नव्हती. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या ब्रिटिश वसाहतींनी आपापल्या पार्लमेंटांना विचारून युद्ध पुकारलें. कॅनडा वसाहतीन ता. ९ सप्टेंबर १९३९ रोजीं पार्लमेंटामध्ये युद्धास संमति दिली. आणि दुसरे दिवशीं इंग्लंडच्या राजाने कॅनडांतील प्रधानमंडळाच्या सल्ल्यावरून (!) कॅनडा युध्दांत पडल्याची, घोषणा केली. एका दिवसाच्या फरकाने घडलेल्या या दोन गोष्टींचा अर्थ राजकीय घटना-पटु असा करितात कीं, परराष्ट्रीय राजकारणांतहि, अन्तर्गत राजकारणाप्रमाणे, कॅनडाचें स्वातंत्र्य इंग्लंडने मान्य केलें.

दक्षिण आफ्रिकेंत थोडी वेगळीच गोष्ट अनुभवाला आली. तेथे मुख्य प्रधान जनरल स्मट्स् याने युद्धांत सामील होण्याचा ठराव पार्लमेंटामध्ये मांडला. त्याला डॉ. मालन, हार्टझोग इत्यादि राष्ट्राभिमानी सभासदांनी विरोध केला, व शेवटीं युध्दांत पडण्याचा ठराव झाला तो बहुमताने झाला, एकमताने झाला नाही. आणि याच बाजूने पुढे जाऊन सांगावयाचें तें असें की आयरिश पार्लमेंटाने मात्र युद्धांत न पडतां अलग व तटस्थ राहण्याचाच ठराव केला. ही जी परंपरा सांगितली ती तिजवरून साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचे दर्जे कसे लागतात व आयर्लंडची पदवी हिंदुस्थानाला येण्याला किती अन्तर अजून तोडलें पाहिजे, हें ध्यानांत येईल.

आयरिश मुख्य प्रधान डी व्हॅलेरा याने या विषयावरील वादांत पार्लमेंटला असें सांगितलें की, " आयर्लंडने या युध्दांत इंग्लंडच्या बाजूने सामील व्हावें असें बऱ्याच आयरिश लोकांचें मत आहे. ही गोष्ट खरी. गेल्या महायुद्धांत इंग्लंडच्या सैन्यांत लढलेले दोन लक्ष सैनिक (आतां

नोकरींत नाहीत ) आणि आयरिश सेनेटमधील कांही वजनदार लोक त्यादि या प्रश्नाला अनुकल आहेत. पूर्वीच्या महायुद्धांत सुमारें ५० हजार आयरिश लोक इंग्लंडच्या बाजूने रणांगणावर मेले त्यांचें राष्ट्रीय स्मारक आर्यलंडांत आहे. अर्थात चालू युद्धांतहि इंग्लंडच्या बाजूनेच लढावें असें म्हणणारे आयरिश लोक पुष्कळ असतील." पण डी व्हलेरा याने उलट असेंहि प्रतिपादलें की, 'आयर्लंडला असा एक पक्ष आहे की, त्याला हिटलरचें प्रेम नसलें तरी इंग्लंडचेंहि प्रेम नाही. त्याच्या मनांत इंग्लंडविषयीचा जुना द्वेष अजून धुमसतो आहे.'

'आयरिश रिपब्लिकन आर्मी' नांवाच्या विध्वंसक लोकांनी अगदी परवा-पर्यंत इंग्लंडात किती अत्याचार केले हें प्रसिद्ध आहे. फार काय, पण १९३८ च्या प्रारंभीं मुख्य प्रधान चेम्बरलेन याच्याशी तडजोड करून या दोन देशांतील आर्थिक युद्ध कसेंबसें थांबविलें, तेव्हां स्वत: डी व्हॅलेरानेच बोलून दाखविलें कीं, 'अल्स्टर परगणा आयर्लंडांत सामील होऊन एक अखंड आयरिश राष्ट्र झाल्याशिवाय आयर्लंडचें इंग्लंडशी भांडण संपणार नाही व शांतता नांदणार नाही. अल्स्टरमध्ये असलेलें ब्रिटिश सैन्य व अल्स्टरला होणारी इंग्लंडची आर्थिक मदत थांबविणें ही गोष्ट इंग्लंडच्या हातची आहे., व इंग्लंड ती करणार नाही तोंपर्यंत अल्स्टरबरोबर इंग्लंड-लाहि आयर्लंडकडून शत्रु किंवा प्रतिपक्षी मानण्यांत येईल.' ब्रिटिश सरकारने खुद्द इंग्लंडमध्ये सक्तीची लष्करी नोकरी कायद्याने प्रस्थापित केली पण अल्स्टरला तो कायदा लागू केला नाही. कारण अल्स्टरमध्ये, थोडे कां होईना, पण आयरिश स्वातंत्र्याचे भोक्ते आहेत, व लष्करी नोकरीची सक्ती केल्यास ते बंड करून उठतील. तात्पर्य जी गोष्ट अल्स्टरमध्ये देखील करतां येत नाही ती म्हणजे सक्तीची लष्करी नोकरी 'स्वतंत्र' आयर्लंडमध्ये कशी लागू करतां येईल? ही सर्व या प्रश्नाची दुसरी बाजू होय आणि ती सांगून डी व्हॅलेराने पार्लमेंटला असा सल्ला दिला की, आयर्लंडने युद्धांत न पडतां अलग, तटस्थ रहावें हें योग्य. याचा अर्थ हा की, डोमिनियन स्टेटस् अस-लेलें आयर्लंड परराष्ट्रीय राजकारणाच्या कारभारांत स्वतंत्र आहे. त्याला वाटेल तर तें युद्धांत पडेल, वाटेल तर तें पडणार नाहीं !

आयर्लंडप्रमाणे इतर ब्रिटिश वसाहतीनाहि वाटल्यास तटस्थ राहतां आलें असतें, पण इंग्लंडविषयी या वसाहतींची भूमिका वेगळी आहे. आयर्लंडची वेगळी आहे. या वसाहतींना इंग्लंडचें शत्रुत्व करण्याचें कारण नाही. उलट, इंग्लंडच्या आरमाराकडून आपलें संरक्षण करून घेण्याची त्यांची अपेक्षा आहे. म्हणून त्यांना युद्धांत सामील झाल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. आयर्लंडलाहि अशा संरक्षणाची गरज नाही असें नाही. कारण त्यांचें आरमार अगदी क्षुद्र आहे. तथापि आयर्लंड हें इंग्लंडचें जुनें वैर अजून विसरत नाही, व अजून कांही चालू दावेही त्याला इंग्लंडविरुद्ध उगवून घ्यावयाचे आहेत. म्हणजे इतर वसाहती व आयर्लंड यांत फरक हाच की, या संरक्षणापेक्षा आपल्या स्वातंत्र्यालाच डी व्हॅलेरा अधिक मान देतो !

युद्धांत अलग किंवा तटस्थ राहणें किती कठीण आहे, हें त्याला माहित नसेल काय ? कारण चालू महायुद्धाच्या अनुभवावरून 'तटस्थ' याचा अर्थ 'कोणाहि युध्यमान राष्ट्रांशी वैर न करणारा,' असा जो सामान्यतः होतो त्यापेक्षा, कोणाहि युध्यमान राष्ट्राने ज्याच्यावर खुशाल चढाई करावी असाच अधिक होतो, हें डी व्हॅलेराला माहीत आहे. नॉर्वे, बेल्जम वगैरेचें उदाहरण डोळ्यापुढे आहे. परंतु त्याने मनांत असें योजलेलें दिसतें कीं, तटस्थतेचा हा दुसरा व विपरीत अर्थ खरा ठरून, नॉर्वेवर केली त्याप्रमाणें, जर्मनीने आपल्या सोयीकरिता आयर्लंडवर स्वारी केली तरी वाहवा, किंवा इंग्लंडने आपल्या सोयीकरिता स्वारी केली तरी वाहवा ! कारण यांपैकी कोणी एकानें स्वारी केली म्हणजे उरलेल्या दुसऱ्याकडून आपणाला सहजच मदत होईल ! हाच आशय थोडा पुढे नेऊन असेंहि म्हणतां येईल कीं, जर्मनीने हिटलरशाही न गाजवितां संयुक्त आयर्लंडला स्वातंत्र्य देऊ केलें तर आयर्लंड तटस्थता सोडून इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारणार नाहीच असें नाही. याचाच अर्थ, वर सांगितल्याप्रमाणें, आरमारी संरक्षणापेक्षा आयर्लंडला स्वातंत्र्य अधिक इष्ट वाटतें. मग पुढे स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आयर्लंड वाटेल त्याचें संरक्षण आपल्या इच्छेनें घेईल ! आज मात्र इंग्लंडला कांही न देतां त्याजकडून आयर्लंडला फुकटांत संरक्षण मिळत आहे असें दिसतें. याला उद्देशून एका विनोदी टीकाकाराने म्हटलें आहे कीं, 'आयर्लंड हें संयुक्त ब्रिटिश राष्ट्रसंघांतील ऑनररी ( सन्मान्य ) सभासद आहे. त्याला फीची माफी आहे.

असो; अशा या गुंतागुंतीच्या परिस्थितींतून अनेक मौजेच्या गोष्टी दृष्टीस पडतात. कशा त्या पहा. एकंदर आयर्लंडचे उत्तर (अल्स्टर) व दक्षिण आयर्लंड असे दोन भाग. या दोहोंतील स्थलमर्यादा अजूनहि थोडी वादग्रस्त आहे, व जी निर्विवाद आहे तीहि केवळ कल्पनागम्य आहे. असें असतां अल्स्टरचे सहा परगणे इंग्लंडबरोबर युद्धांत सामील आहेत, आणि दक्षिण आयर्लंडचे २६ परगणे तटस्थ आहेत ! म्हणजे एका शरिराचा एक हात युध्यमान व दुसरा तटस्थ असें होत नाही काय ? उत्तर आयर्लंडांत रिक्रूटभरती जोरांत सुरू आहे. दक्षिणेंत ती मुळीच नाही. उत्तरेंत ब्रिटिश पलटणी मुक्कामाला राहतात.पण दक्षिणेंत लढाऊ सैनिक गणवेष घातलेला दिसण्याची सोय नाही. उत्तरेकडील व्यापारी माल इंग्लंडच्या बंदरांत जकात न देतां उतरू शकतो. दक्षिण आयर्लंडच्या मालाला जकात द्यावी लागते. तथापि आयरिश लोक, स्त्री-पुरुष, ब्रिटिश कॉमनवेल्थचे नागरिक या नात्याने इंग्लंडांत 'पासपोर्ट' शिवाय जाऊ शकतात; तेथे नोकरी मिळवूं शकतात. आणि ही नोकरी सरकारीसुद्धां. आयर्लंड तटस्थ असतां आयरिश लोक ब्रिटिश लष्कर व आरमार यांतहि नोकरीला घेतले जातात; पण याविषयी कोणी प्रश्न काढीत नाही; म्हणजे तटस्थतेला बाध आला असें म्हणत नाही. आयरिश लोकांना लष्करी नोकरीची सक्ती लागू नाही, यामुळे या नोकरीला टाकून त्यांना इंग्लंडांतून स्वदेशी जातां येतें. उलट, अनेक आयरिश वीरांनी युद्धांत नांव व यश कमावलें आहे; पण हें सर्व बिनसक्तीने.

आयर्लंड तटस्थ आहे म्हणून इंग्लंडचा सैनिक आयर्लंडमध्ये दिसला तर तटस्थतेचा भंग होतो. हा दोष टाळण्याकरिता आयरिश सैन्याचा सरकारी पोषाख घातलेले शिपाई किनाऱ्यावर हिंडत असतात. आणि समजूत अशी की, एखादें ब्रिटिश जहाज किंवा विमान आयर्लंडच्या बंदरांत किंवा किनाऱ्यावर मुद्दाम उतरलें किंवा चुकून लागलें तर आयरिश शिपायांनी त्यांना अटकाव करून ताब्यांत घेतलें पाहिजे. पण खरोखर असें घडत आहे की, इंग्रज सैनिक किंवा वैमानिक किनाऱ्यावर दिसला तर आयरिश शिपाई तिकडून तोंड फिरवून दुसरीकडे पाहूं लागतो किंवा कानाडोळा करतो.

आयरिश लोकहि कोणी नाहीसे पाहून, हळूच त्या सैनिकाला अन्नपाणी देतात, विमानांना पेट्रोल देतात. आज कांही कांही क्रांतिकारक रिपब्लिकन आयरिश लोकहि असें करण्याचा संभव आहे. इंग्लंड हा वैरी, पण व्यक्तिशः इंग्लिशमन हा कांही आयरिशमनचा वैरी नाही. याच्या उलट गेल्या महायुद्धांत हीच मदत जर्मन जहाजें, विमानें यांना हे क्रांतिकारक करीत होते; कारण त्या वेळीं आयर्लंडला डोमिनियन स्टेटसचें स्वराज्य दिलें नव्हतें. आणि तें दिल्यामुळेच आज आयर्लंडांत शातन्ता आहे. नाही तर इंग्लंडला त्रास देण्याची ही सोन्यासारखी संधि आयरिश क्रांतिकारक वरे सोडते ?

गतवर्षी चेम्बरलेनने डी व्हॅलेराशी समेट करून आयर्लंडचीं चार-दोन बंदरें त्याच्या स्वाधीन केलीं. आज त्या बंदरांचें संरक्षण तटस्थ राष्ट्र म्हणून आयर्लंडला करावें लागत आहे. गेल्या महायुद्धांत तें इंग्लंडला करावें लागत होतें. बाकी आयर्लंड आपल्या बंदरांचें रक्षण कितीसें करणार ! शेवटीं, तें ब्रिटिश आरमारालाच करावें लागेल. पण "आम्ही तुमचें रक्षण करणार, मग आमच्याजवळ स्वातंत्र्य कां मागतां" हें म्हणणें डी व्हॅलेराने ऐकलें नाही व ऐकणार नाही. इंग्लंडनेहि पाहिलें की स्वातंत्र्याच्या अभिमानाखातर बंदररक्षणाचा खर्च आयर्लंड करील तितकाच आपला वांचला. तसेंच बंडहि वांचलें. एकंदरीने तज्ज्ञांचें मत असें की आयर्लंड व इंग्लंड यांचे संबंध या युद्धांत पूर्वीच्या युद्धापेक्षा अधिक चांगले राहणार. अर्थात् याचें कारण स्वराज्यदान. या स्वराज्यदानामुळेच डी व्हॅलेराला क्रान्तिकारक रिपब्लिकवाल्यांनाहि ताब्यांत ठेवणें भाग पडलें आहे. इकडे नाही कां कांग्रेसने मंत्रिमंडळें बनविल्यावर त्यांतील 'होममेंबर'नी पोलिसांकरवी बेकायदेशीरपणाला आळा घातला? स्वतः डी व्हॅलेरा क्रान्तिकारकच. त्याला एक वेळीं फाशीची शिक्षाहि झालेली होती! पण तोच आज आयरिश क्रांतिकारकांना दबावतो, दटावतो, वेळी फाशीच्या शिक्षाहि देतो; कारण स्वराज्याबरोबर जबाबदारीहि आली. स्वराज्य नव्हतें तेव्हा उपद्रव झाला तर इंग्लंडला. पण आता तसें म्हणून कसें चालणार ?

आयर्लंड नांवाने तटस्थ आहे खरें. पण सगळा भर आहे इंग्लंडशी सलोखा ठेवण्याचा, कारण आयर्लंडांत माल येतो त्यांतला निम्मा इंग्लंडाहून

येतो. आणि आयर्लंडांतून बाहेर माल जातो त्यांतला नऊ-दशांश इंग्लंडला जातो. आज डी व्हॅलेराची इंग्लंडविरुद्ध तक्रार काय ती एकच आहे ती ही की, अल्स्टर प्रान्ताला वेगळें पार्लमेंट दिलें आहे उलट, इंग्रज लोकहि स्वराज्यदानाने समाधान पावलेल्या डी व्हॅलेराचे गुण पूर्वीपेक्षा अधिक घेऊं लागले आहेत. त्याला कांही दिवसापूर्वी राष्ट्रसंघाचा अध्यक्ष होण्याची संधि मिळाली, तेव्हा त्याने आपली बुद्धिमत्ता, चातुर्य व नैतिक गुण सर्व राष्ट्रांच्या चांगलेच प्रत्ययाला आणले. डी व्हॅलेराचा प्रामाणिकपणा इंग्रज आता कबूल करतात. तात्पर्य, आधीचा माणूस असेल तर, स्वराज्यदानाने त्याच्या माणुसकीला अधिक उजळा मिळतो. पूर्वी डी व्हॅलेराचें नांव निघतांच इंग्रज त्याला शंभर शिव्या मोजीत.पण आता स्वराज्य देण्याचें भांडण मिटल्या-वर ते दोघेहि एकमेकांना अधिक चाहू लागले आहेत.

आणि हें सर्व सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, उद्या डोमिनियन स्टेटस हिंदुस्थानच्या पदरांत पडलें म्हणजे आयर्लंडच्या उदाहरणाप्रमाणे साम्राज्या-च्याहि उदरांत स्वातंत्र्य असू शकतें हें हिंदी लोकांना कळेल आणि हिंदी लोक स्वतंत्र राज्यकारभार करण्याला किती सत्पात्र आहेत हें उलट इंग्र-जांनाहि कळेल.

'वेस्ट मिनिस्टर स्टॅट्यूट'प्रमाणे दिलेलें 'डोमीनियन स्टेटस' ( याला दुर्दैवाने समर्पक मराठी शब्द नाही ) हा एक चिनी पंखा आहे. तो वापर-णाराला वारा घेण्याचा पंखा तर असतोच, पण तो वापरणारा कुशल असेल तर, त्या पंख्याच्या फक्त घड्या बदलून, त्याला त्या पंख्यांतूनच वास घेण्याचें फूल, पाणी पिण्याचा पेला, आणि प्रसंगविशेषीं पोट फाडणारा जंबियाहि करतां येतो ! यांत काय तें समजा.

# ६. डोमिनियन स्टेटसचा आढावा

( केसरी १७ सप्टेंबर १९४० )

'पुणें येथील गायकवाडवाड्यांतील गणेशोत्सवांत श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांचें 'डोमिनियन स्टेटसच्या प्रकरणाचा एकंदर इतिहास, किंवा ताजा आढावा' या विषयावर मार्मिक व तर्कशुद्ध भाषण झालें. त्याचा विस्तृत सारांश खालीं दिला आहे.

## भारतसंरक्षण कायद्याचा दुरुपयोग

श्री. तात्यासाहेब केळकर आपल्या भाषणांत म्हणाले-'आढाव्याचे विषय दोन. युद्ध व हिंदी राजकारण. पैकी गेल्या वर्षांत युद्धाची प्रगति. किती झाली हें आपण सर्व जाणताच. मी गतवर्षी येथें व्याख्यान दिलें त्यावेळीं युद्ध सुरू नव्हतें. म्हणून मला स्पष्टपणें त्यावरील आपले विचार बोलतां आले. आज ती स्थिति नाहीं. भाषणाला बंदी नसली तरी मनमोकळें बोलण्याला बंधन वाटतें, कारण देशसंरक्षण कायद्याचा हल्ली फार दुरुपयोग होत आहे. बोलणारे, न बोलणारे, असे शेंकडो लोक आज सरकारकडून तुरुंगांत घालण्यांत येत आहेत ! कारण काय ? तर म्हणे त्यांच्यामुळे युद्ध यशस्वी होण्याला अडथळा होतो. पण युद्धसाहित्य जमविण्याला कोणी हरकत केल्याचें ऐकिवांत नाही. सरकार स्वतःच मनांत भितें त्याला कोणी काय करावें? इकडच्याप्रमाणे विलायतेंतहि हेंच घडत आहे. माझ्या हातीं 'न्यू स्टेटसमन'चा अंक आहे. त्यांत याविषयी किती तरी तक्रारी दिल्या आहेत.

या महायुद्धांत घडत आहे तेंच पूर्वीच्या महायुद्धांत घडलें कसें तें पहा. इंग्लंडमधील पहिल्या प्रतीचा तत्त्ववेत्ता बर्ट्रन्ड रसेल याजवर तेव्हा भाषणबंदी घातली होती ! त्याला युनिव्हर्सिटींतील व्याख्यानेंहि देतां येईनात. कारण म्हणे की, त्यांतील तात्त्विक विवेचनानें युद्ध जोरांत चालविण्याला अडचण

येते! रसेलचें 'जस्टिस इन वॉर' हें पुस्तक येथें माझ्या हातीं आहे, त्यांत तो लिहितो, 'मी आतां बोलू तरी काय ? येशू ख्रिस्ताचें गुणवर्णन केलें तरी शांतताप्रसाराचा आरोप मजवर येणार ! मग परराष्ट्रीय राजकारण, युद्ध-नीति अशा विषयांवर बोलणें दूरच राहिलें.' असो; पण सरकारने हेंहि लक्षांत ठेवावें कीं, केवळ सेन्सॉरच्या पसंतीने बाहेर पडणारी किंवा मुद्दाम बन-वून दिलेली सरकारी माहिती आज कोणी खरी मानीत नाही. नाविक-दलाच्या अपघाताच्या कित्येक बातम्या किती उशीरा कशा प्रसिद्ध झाल्या व त्याला भलतीं कारणें कशीं सांगण्यांत आलीं हें साध्या वाचकालाहि माहिती आहे. असो. युद्धाविषयी भविष्य करणें कठीण आहे, आणि मी स्वतःला भविष्यवादी म्हणवीत नाही. तात्पर्य युद्धांतील आढावा इतकाच की, हिटलरने बारा महिन्यांत सात देश जिंकले ! पुढे काय होतें तें पहाव-याचें आहे. युद्धांत विजय मिळणार याबद्दल जर स्वतः इंग्लंडला विश्वास वाटतो तर इतर कोणाला अविश्वास कसा वाटेल ? पूर्वी चर्चिलसाहेबांनी म्हणून ठेवलेंच आहे की, 'लंडन सोडून जावें लागलें तर आम्ही आमचें राज्ययंत्र घेऊन कॅनडांत जाऊ !' होय. जातील पण लक्षांत ठेवा की, तेथे झालें तरी ते हातचें साम्राज्य सोडून देणार नाहीत. हिंदस्थानाला स्वराज्य देणार नाहीत. नदींत बुडून मरणारा ब्राह्मण कनवठीला दक्षिणा ठेवूनच मरेल ! ती 'कृष्णार्पण' करणार नाही !

## इंग्रज सरकारचा कपटी बहाणा

असो. मी आता हिंदी राजकारणाच्या आढाव्याकडे वळतो. आढावा म्हणजे जमाखर्चाची बेरीज वजाबाकी करून शेवटीं किती ऐवज कोणाकडे उरतो हें पहावयाचें. या बाबतींत माझें म्हणणें असें की, गेल्या वर्षात इंग्लंडने हिंदुस्थानाला दिलें त्यापेक्षां हिंदुस्थानने इंग्लंडलाच अधिक दिलें. बाकी निघाली ती जमेकडे नाही. नावेंकडे! हिंदुस्थान युद्धाला मोठ्या देणग्या देत आहे. खूप युद्धकर्ज घेत आहे. संस्थानिकांनी तर आपलें सर्वस्व सरकारच्या स्वाधीन केलें आहे. पण उलट इंग्लंडने कोणाला काय दिलें ? तर 'डोमिनियन स्टेटस् युद्धानंतर शक्य तितक्या लवकर देऊं' ही लॉर्ड लिन्लिथगो यांची घोषणा! पण असल्या घोषणांनी आम्ही आता फसून

जाणार नाही. ही तोंडावर साखर पेरली! तोंडाला पानें पुसलीं. ही घोषणा अगदी पोकळ आहे. त्यांत सत्व नाही. हें मी दुष्ट बुद्धीनें म्हणत नाहीं. तर डो. स्टे. चा गेल्या वीस वर्षांत किती खेळखंडोबा झाला याच्या अनुभवावरून सांगतो. आणि तें इतकेंच की,मनांत कांही द्यावयाचें नसतां सर्वस्व देण्याला काढलें असा कपटी बहाणा करावयाचा हा इंग्रजांचा जुना क्रम चालू आहे. असो. तर आतां डो. स्टे. चा इतिहास क्रमवार थोडा सांगतों लक्षांत घ्या.

## मोर्ले–मिंटो सुधारणांची गर्भधारणा

१९०५ सालीं ना. गोपाळराव गोखले यांनी बनारसच्या राष्ट्रीय सभेंत 'वसाहतीच्या स्वराज्याची' मागणी केली. १९०६ सालीं दादाभाईंनी कलकत्त्यास स्वराज्याची मागणी केली. अर्थ एकच होता. त्याने हिंदी लोकांची मागणी इंग्रजांना कळली. पण काय उपयोग? १९०७ सालीं पहिली 'वसाहत परिषद' भरली. पण तींत हिंदुस्थानचा खास प्रतिनिधि तर नाहीच, पण हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीलाहि स्थान नव्हतें. मग वसाहतीचें स्वराज्य कोठचें? त्याच सालीं मोर्ले–मिंटो सुधारणांची गर्भधारणा झाली. यावेळीं एक अत्यंत थोर उदारमतवादी (!) स्टे. सेक्रेटरी हिंदुस्थानाला लाभला होता तो म्हणजे लॉर्ड मोर्ले.त्याने आयर्लंडच्या होमरूलकरिता जीव टाकला! पण हिंदुस्थानला होमरूल देणें ही कल्पना त्याला एखाद्या राक्षसाहून भयंकर वाटली ! ! वि. चर्चिल यांनी अलीकडे प्रसिद्ध केलेल्या थोर पुरुषांच्या अल्प चरित्रांत असा तडाखा ठेवून दिला आहे की "उदारमतवादी म्हणविणारा लिबरल मोर्ले हा ज्या गोष्टीला इतका प्रतिकूल, तीच गोष्ट अलीकडचे कॉन्झरव्हेटिव्ह म्हणविणारे मुत्सद्दी करू म्हणतात पण खरेंच आहे. 'जेथे पाऊल टाकण्याला देवदूत भितात तेथे संचार करण्याला मूर्खाला कांहीच वाटत नाही, अशी म्हणच आहेना!' आणि या मताचे चर्चिल उद्या युद्ध संपल्यावर म्हणे आम्हाला डो. स्टे. देणार.

## बादशाही जाहीरनामा व मोगली रेल्वेचें वेळापत्रक

१९११ सालीं दुसरी वसाहत परिषद भरली. तिला 'साम्राज्य परिषद' असें नांव होतें. यावेळीं हिंदुस्थानची आठवण झाली; कारण पुढे होणारें

युद्ध डोकावूं लागलें होतें! तेव्हा या परिषदेंत हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीचा समावेश करण्यांत आला व त्याने परराष्ट्रीय राजकारणाच्या चर्चेंत भाग घेतला. ही झाली म्हणे हिंदुस्थानची प्रगति! नंतर सहा वर्षांनी, प्रत्यक्ष युद्ध सुरू असतां 'साम्राज्ययुद्ध परिषद' म्हणून भरली. तींत वरीलप्रमाणेच घडून आलें, व असेंहि ठरलें की 'परराष्ट्रीय राजकारणांत मत देण्याचा अधिकार हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीला यापुढे राहील.' नंतर १९१७ च्या २० ऑगस्टला सुप्रसिद्ध बादशाही जाहीरनामा निघाला. त्यांत अशी घोषणा केली गेली की, 'यापुढे हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य क्रमवार मिळवून देणें हेंच इंग्लंडचें धोरण राहील.' ही घोषणा ऐकून आपण सर्वच तेव्हा आनंदलों हें खरें नव्हे काय ? वाटलें की बोगद्याच्या पलीकडच्या तोंडांतून प्रकाश दिसला.

पण आपण अजून बोगद्यांतच आहोंत. आणि या अंधारांत सरकार आमच्याशी किती लपंडाव खेळतें आहे, आमच्या मार्गांत किती अडचणी घालीत आहे, याचा अनुभव आलाच. जबाबदारीचें स्वराज्य प्रांतांतून किंचित दिसलें. पण त्याच्या वरच्या मजल्यांतील कारभारांत अजून फुंकराइतकाहि धक्का लागलेला नाही! आणि 'क्रमवार' हा शब्द तरी सरकारला कां सोयीचा झाला? तर स्वराज्याच्या मागणीला उत्तर म्हणून तें केव्हांच संपावयाचें नाही. कारण या क्रमाला वेळापत्रक नाही. आणि मोगलाई रेल्वेप्रमाणे कांही वेळापत्रकें यापूर्वी फुकटहि गेलीं आहेत. अजून स्वराज्याचा-डो. स्टे. चा-प्रश्न निघाला म्हणजे इंग्रज, श्रुतिवचनाप्रमाणे, या १९१७ च्या घोषणेकडे हात दाखवितात. आणि 'जें सर्व कांही आहे तें यांत आहे' असें म्हणतात. म्हणजे आम्हाला मिळणारें स्वराज्य शब्दांत आहे. प्रत्यक्षांत नाही.

पुढे १९१८ सालीं 'साम्राज्य युद्ध प्रधानमंडळाची' परिषद भरली. त्यांत पुढचें पाऊल पडावें म्हणून बिकानेरच्या महाराजांना हिंदुस्थानचे खास प्रतिनिधि या नात्याने नेमण्यांत आलें. या परिषदेंत या महाराजांनी हिंदुस्थानच्या हक्काचें भांडण काय कसें लढविलें हें माहीत नाही. पण परवा फ्रेंच युद्धप्रधान क्लेमाँसो याने लिहिलेला ग्रंथ मी वाचीत असतां दुर्दैवने

त्यांत मला विकानेरबद्दल इतकाच उल्लेख आढळला की 'ते इस्लामी स्त्रियांच्या तोंडावरील पडदा काढून टाकण्याविषयी खूप जोराने बोलले, आणि क्लेमाँसो हिंदुस्थानांत आले तेव्हां महाराजांनी त्या फ्रेंच वाघाची (क्लेमाँसोला वाघ म्हणतात) हिंदी जंगलांतील वाघाशी गांठ घालून दिली' म्हणजे शिकार रंगविली! युद्धमंत्रिमंडळांतील हिंदी सहकाऱ्याची एवढीच पोरकट आठवण नमूद असावी हें पाहून कोणालाही मान खाली घालावी लागते. असो.

## निर्लज्ज इंग्लंड काय उत्तर देईल?

१९१९ सालीं आणखी एक पाऊल पुढें पडलें! त्याचीहि कहाणी त्वेष उत्पन्न करणारी आहे. या सालीं युध्द संपून विजय मिळून विल्सनप्रभृतींनी राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) स्थापन केला. त्यांत हिंदुस्थान हें एक राष्ट्र गणून, त्याच्या एका प्रतिनिधीला हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीबरोबर या संघावर सभासदाची जागा देण्यांत आली. फिरून लोकांना वाटलें हिंदुस्थानचा केवढा अपूर्व सन्मान झाला ! पण यांतच फार मोठें कपट होतें. राष्ट्रसंघावर जागा मिळणारें राष्ट्र स्वायत्त (अॅटॉनमस्) पूर्ण स्वराज्य भोगणारें असलें पाहिजे अशी अट होती. ब्रिटिश सरकारला पक्कें माहीत होतें की हिंदुस्थान हें स्वतंत्र स्वराज्य भोगणारें नाही. असें असतां त्याला राष्ट्र हें नांव देऊन प्रतिनिधि देवविला, याचा अर्थ इंग्लंडने या संघांत आपल्या बाजूला एक मत अधिक मिळविलें! या प्रकाराचें थोडें घरगुती वर्णन देतों. एका गृहस्थाला वैदिक ब्राह्मणांची महासभा भरवून मोठी दक्षिणा द्यावयाची होती. यादी करण्याचें काम उपाध्याकडे आलें. त्याने प्रारंभीं एक महामहोपाध्याय यांचें नांव व खाली एक दोन दशग्रंथी लोकांचीं नांवें लिहून, त्या खालीं स्वतःचें नांव घातलें. आणि त्याहि खाली तातंभट, बंडंभट, गुंडंभट अशीं आणखी नांवें घातलीं. शेवटी प्रत्यक्ष सभेंत या शेवटच्या तीन नांवांची केवळ 'मुंज झालेली शेंबडीं पोरें शालजोड्या सरसावीत येऊन बसलीं! तीं कोण असें विचारतां स्वतः उपाध्ये बुवांचीं मुलें ठरलीं'! आणि सभेंतून बाहेर पडतांच उपाध्ये बुवांनी त्यांच्या हातून दक्षिणा शालजोड्या काढून घेऊन त्यांना पिटाळून खेळायला घालविलें. समाराधनेंतहि पोटार्थी भिक्षुक घरचीं पोरेंसोरें घऊन अशाच प्रतिष्ठित जागा अडवितात !

राष्ट्रसंघाच्या बैठकींत जर इंग्लंडला कोणी विचारलें असतें की, 'अहो, या सभेंत स्वतंत्र स्वराज्य भोगणाऱ्या राष्ट्राचाच प्रतिनिधि बसू शकतो तर हिंदुस्थानचा प्रतिनिधि कसा?' याला निर्लज्ज इंग्लंड काय उत्तर देईल? कारण हें धादांत कपट होय. पण राष्ट्रसंघ हाच मुळांत स्वार्थी एकपक्षी लोकांचा कट व गट असल्यामुळे असा प्रश्न तरी कोण विचारणार? स्वराज्याचा प्रश्न निघाला की, अजाणत्या माणसाला फसविण्याकरिता इंग्रज सांगतात 'पहा आम्ही हिंदी राष्ट्राला राष्ट्रसंघावर जागा दिली! ' १९१७ चा जाहीरनामा आणि राष्ट्रसंघावरील ही जागा यांत 'संभाव्य डोमिनियन स्टेटस् आहे' असें मानण्यांत येतें. पण शब्दकोषांत सर्व वाङमय आहे असें म्हणण्यापैकींच तें हास्यास्पद होय.

असो. इंग्लंडच्या १९१९ च्या वेळापत्रकाप्रमाणे दहा वर्षांनी, १९२९ सालीं, फिरून पुढचें पाऊल टाकण्याचा वाद सुरू झाला. लाहोर येथें काँग्रेसनें स्वातंत्र्याची घोषणा केली. कायदेभंगाची चळवळ होणार असें दिसूं लागलें. त्या वेळीं विचारे सत्त्वस्थ असे लॉर्ड आर्यविन व्हाइसरॉय होते. त्यांनीहि गांधीजींना अशी थाप दिली कीं, 'अहो! १९१७ च्या घोषणेंत डो. स्टे. हें अव्यक्त, गर्भित, कूटस्थ, अप्रकट असें आहेच की, आणखी काय लागतें?' याच अर्थानें तिकडे स्टेट सेक्रेटरीनेहि पार्लमेंटांत री ओढली!! मनांतील डाव हा की, या भुलथापेनें चळवळ थांबावी. पण ती थांबली नाहीं ही गोष्ट वेगळी. पण काकदृष्टीच्या एका पार्लमेंटच्या सभासदानें बोलून दाखविलेंच की, '१९१७ सालीं जी गोष्ट मनांतहि आली नव्हती ती त्या सालच्या घोषणेच्या शब्दांत गर्भित आहे असें तुम्ही कसें म्हणतां?' पण मंत्रिमंडळाच्या पाठीमागे बहुमत असेपर्यंत त्याला हवें तितकें खोटें बोलतां येतें तसें झालें. लॉर्ड रीडिंग यांनी वरच्या सभागृहांत सरळच सवाल केला की, "१९१७ सालच्या घोषणेंत जर डो. स्टे. गर्भित होतें जर तेच स्पष्ट शब्द नक्की १९१९ च्या सुधारणा कायद्याच्या उद्देशपत्रिकेंत ( प्री–अँबलमध्ये ) कां घातले गेले नाहीत? त्या उद्देश विधानांत नसलेलें डो. स्टे. अभिप्रेत आहे असें कसें म्हणतां?" लॉर्ड सॅलिसबरी हे तर यापुढे जाऊन म्हणाले, 'खोटी गोष्ट! हिंदुस्थानाला डो. स्टे. देण्याचा आमचा कधीच उद्देश नव्हता! मग तो कोणत्याही शब्दांत गर्भित तरी कसा येईल?'

पुढे १९३१ सालीं हीच चर्चा आणखी एकदा झाली. तींत चर्चिल-साहेब प्रथम चुकून असें बोलून गेले की, ' हिंदुस्थानला डो. स्टे. एका अर्थानें आहेच. म्हणजे रँक ( दर्जा ), ऑनर ( सन्मान ), सेरिमनी ( उपचार ), या अर्थानें तें आहे. ' पण लगेच आपली चूक सुधारून ते म्हणाले, " याचा अर्थ कॅनडासारखें डो. स्टे. आहे असा मुळीच नव्हे. " दिल्ली तो बहोत दूर है याप्रमाणेंच ' कॅनडा तो बहुत दूर है. ' चर्चिल यांनी आणखी युक्तिवाद असा केला की, " सायमन कमिशनने डो. स्टे. ची शिफारस केलेली नाही. १९२६ च्या साम्राज्य परिषदेने डो. स्टे. ची व्याख्या बदलली आहे तो १९१७ च्या घोषणेंत कशी असेल? करावयाची तर त्या शब्दांनी नवी घोषणा केली पाहिजे; पण ती आम्ही करू देणार नाही. " तसेंच १९३१ च्या वेस्ट मिनिस्टर स्टॅट्यूटमध्ये, म्हणजे डो. स्टे. च्या खास कायद्यामध्ये, इतर स्वराज्य भोगणाऱ्या सर्व वसाहतींचा उल्लेख आहे. हिंदुस्थानचा नाही. हिंदुस्थानला डो. स्टे. खरें द्यावयाचें असतें तर पार्लमेंटला त्या कायद्यांत हिंदुस्थानचेंहि नांव घालण्याला काय हरकत होती ? शब्दांत नाही म्हणून मनांतहि नाही. पण या वादांत डो. स्टे. ची नवी घोषणा न करतां ' १९१७ च्या घोषणेंत सर्व कांहीं आहे ' असें तुणतुणें वाजविण्यांत आलें ! आणि ' ती घोषणा आम्ही रद्द करीत नाही, कायम ठेवतों, हा काय थोडा उपकार झाला ? ' असें दर्शविण्यांत आलें !

## पार्लमेंटमधील युक्तिवादाची आतषबाजी

यानंतर गोलमेज परिषदा भरल्या. त्यांचा निष्कर्ष म्हणून 'व्हाइट-पेपर' चा प्रबंध निर्माण झाला. मेजर अॅटली यांनीं मजूर पक्षातर्फे असा प्रश्न विचारला की, 'यांत डो. स्टे. दिल्याचा किंवा ध्येयाचा उल्लेख कां नाही?" पण अॅटली हे स्वतःच सायमन कमिशनचे एक सभासद होते. तेव्हा त्यांना डो. स्टे. चा उल्लेख करण्याची कल्पना तेव्हाच कां आली नाही? हें आश्चर्य नव्हे काय ? पश्चात् बुद्धि हें नुसतें ब्राह्मणाचेंच लक्षण दिसत नाही! अॅटली-साहेबांना स्टेट सेक्रेटरी सर सॅ. होअर यांनी ठराविक उत्तर दिलें. ते म्हणाले, 'व्हाईट पेपेर'च्या शब्दांत डो. स्टे. नाही. पण अगदी जवळजवळ आहे

(Very close) आणि या 'व्हेरी क्लोज'चा आधार घेऊन किंवा त्या अर्थानें लॉर्ड विलिंग्डन त्यावेळचे व्हाइसरॉय, यांनीं फिरून सर्व कांही मुद्देमाल १९१७ च्या घोषणेंत आहे असें बोलून दाखविलें. पुढे या 'व्हाइट पेपर'-वर आधारलेलें हल्लीचें गव्हर्मेंट ऑफ इण्डिया अॅक्टचें बिल पार्लमेंट-मध्ये आलें, तेव्हा फिरून डो. स्टे. चा प्रश्न निघून 'आतां तरी तें काय-द्याच्या उद्देश विधानांत घाला' अशी अॅटली यांनीं उपसूचना केली. पण ती नापास झाली. अनेकांनी युक्तिवाद नाचविले. अॅटर्नी जनरल (सरकारी कायदेपंडित) म्हणाले, 'डो. स्टे. चे अर्थच वेगवेगळे आहेत. तेव्हा कोणत्या एका अर्थानें तो शब्द येथे घालावा? म्हणून कोणताही नच घालावा तो बरा'! लॉर्डांच्या सभेंत लॉर्ड क्यू या मुद्द्यावर म्हणाले, 'शब्द आणखी घाला काय आणि कशाला? अहो! हिंदुस्थानला डो. स्टे. मिळून चुकलेंच आहे की! नवें द्यावयाचें तें काय? प्रत्यक्ष अधिकार नसले म्हणून काय झालें? स्टेट दर्जा आहेच कीं नाही?' पण याहून समर्पक असा युक्ति-वाद एकाने केला. तो म्हणाला, 'होय डो. स्टे. हा शब्द कायद्याच्या उद्देश विधानांत घालू. पण न्यायकोर्ट फक्त कायद्याचा शब्द मानतें. उद्देश विधान मानीतच नाही. मग तो शब्द घालून तरी उपयोग काय? व्यवहारार्थी तो फुकटच. लॉर्ड क्यू यांचें पूर्वी दिलेलें विधान वाचून मला हल्लीचे स्टेट सेक्रे-टरी अॅमेरी यांच्या एका उद्‌गाराची आठवण झाली हे भले गृहस्थ परवा म्हणून गेले की, 'बिचाऱ्या इंग्लंडला तरी डो. स्टे. हून अधिक प्रतिष्ठित किंवा सत्ता देणारें असें स्वराज्य कोठे आहे?' एका अर्थानें हें खरें! कारण आज कॅनडा व इंग्लंड यांच्या स्वतंत्र स्वराज्याच्या प्रकारामध्ये कोळ्याच्या धाग्याइतकाच असला तर फरक असेल. पण हिंदुस्थानाची तुलना करतां 'बिचारें इंग्लंड'हे शब्द हास्यास्पद ठरत नाहीत काय? पण तो मुळांत मानभावीपणा असल्यामुळे त्याचा राग आल्याशिवाय कसा राहील? असो. इतकी फुकट चर्चा होऊन १९३५ चा कायदा पास झाला. पण त्यांत डो. स्टेटस नसल्यामुळे तो हिंदुस्थानांतील सर्व पक्षांनी नापसंत अमान्य ठरविला हें प्रसिद्धच आहे.

आता दुसऱ्या एका रीतीनें विचार करू. डो. स्टे. मध्ये दर्जाचा औपचारिक एक भाग पण जबाबदारीचा स्वराज्याचा दुसराही एक भाग

असतो. या प्रकारच्या स्वराज्याच्या मागणीची काय वाट लागली? एखाद्या भोळ्या माणसाला वाटेल कीं, हिंदुस्थानाला स्वराज्य मागावयाचें तें आपण होऊन 'जबाबदारीचें' स्वराज्य कां मागावे? पण त्या खुळ्याला हें माहीत नसतें की, मानभावी इंग्रज सत्ता या शब्दाचें स्वार्थी रूपांतर करून जबाबदारी हा शब्द वापरीत असतात. उदाहरणार्थ, बादशहाने गव्हर्नर जनरलाना उद्देशून केलेल्या सूचनापत्रांत (इन्स्ट्रुमेंट ऑफ इन्स्ट्रक्शन्स) त्यांची अमुक अमुक 'विशेष जबाबदारी' आहे. असे शब्द घातलेले असतात. १९३५ च्या कायद्यांतहि तसे शब्द आढळतात. पण हिंदुस्थानच्या संबंधांत त्या जबाबदारीचा अर्थ 'विशेष प्रकारचा सत्ताधिकार' असाच असतो. आणि आम्ही जबाबदारीचें स्वराज्य मागतों याचा अर्थ गव्हर्नरादि जसे पार्लमेन्टला जबाबदार तशींच आमचीं प्रधानमंडळें हिंदी जनतेला, म्हणजे लोकनियुक्त कायदेमंडळांना, जबाबदार असावीं असा अर्थ असतो. प्रधानमंडळाची जबाबदारी म्हणजेच कायदेमंडळाची सत्ता.

## फेडरेशनचें तिकाटणें व महायुद्धाची पोकळ सबब

वरिष्ठ कायदेमंडळाला ही सत्ता देण्याचा प्रश्न गोलमेजपरिषदेंत (१९३१) निघाला तेव्हा फेडरेशनची कल्पना युक्तीने पुढे आणण्यांत आली. फेडरेशन हें एका दृष्टीने चांगलें. कारण हिंदुस्थान हें जर आपण एक संयुक्त अविभाज्य राष्ट्र असें मानतों, निदान असें म्हणतों, तर या सर्व देशाचा कारभार फेडरल पार्लमेंट स्थापून त्यांतून चालावा या आकांक्षेंत वावगें कांहीच नाही. पण फेडरेशनचें हें तिकाटणें आम्हांला अडखळून पाडण्याकरिताच पुढे आलें. आणि आता संस्थानिक, आज नऊ वर्षें कुशलतेने खेळ खेळत राहून, फेडरेशनमध्ये सामील तर होत नाहीतच. पण आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित मान्य करून घेऊन फिरून वेगळेच्या वेगळे राहणार! शिवाय संस्थानिक आंत आले म्हणजे राज्यघटना त्यांच्या संमतीशिवाय बदलणे नाही ही देखील आमच्या स्वातंत्र्याची हानीच. म्हणून वाटतें की आयती संस्थानिकांची व्याद गळ्यांतून गेली तें बरें झालें.

पण धूर्त इंग्रजांचा कावा लक्षांत घ्या. त्यांनी असें वीं तेव्हा पेरून ठेवलें की फेडरेशन होईल तरच वरिष्ठ कायदेमंडळांत लोकशाही. नाही

तर नाही. पण आम्हीहि असें म्हणू शकतों की फेडरेशन न झालें म्हणून नुसत्या ब्रिटिश मुलखाच्या सर्व प्रांतांचें मिळून संयुक्त फेडरल स्वराज्य करण्याला काय हरकत? याकरिता हल्लीच्या कायद्याचें एक कलम बदलावें लागेल हें खरें. संस्थानिक आंत येण्याची जी अट म्हणून आहे ती काढून टाकावी लागेल इतकेंच. आणि सर्व ब्रिटिश प्रांतांचें फेडरेशन करणें ही काय कमी महत्त्वाची गोष्ट होय? ती करा आणि जबाबदारीचें स्वराज्य द्या. संस्थानिकांचे बादशहांशी संबंध काय जुने असतील ते राहतील. लोकशाहीला ती अडचण नाही. म्हणून ती सबब कोणी सांगू नये.

पण असें बोलून युक्तिवाद गळ्यांत घातला म्हणजे त्यावर दोन आक्षेप येतात. पहिला असा की, 'अहो, ही एवढी घडामोड युद्धाच्या बिकट प्रसंगीं कशी होईल?' त्याला उत्तर हेंच की पार्लमेंटच्या बैठकी युद्धांतहि भरत आहेतच. आणि आता संयुक्त राष्ट्रीय असें एकमताचें प्रधानमंडळ झालें आहे. तेव्हा मनांत आणलें तर ही गोष्ट त्याला चुटकीसरशीं करतां येईल. परवाच पहा ना! फरान्स हातचें शस्त्र खालीं ठेवणार असें दिसतांच इंग्लंडकडून प्रतिष्ठितपणें सरळ अशी सूचना फरान्सला करण्यांत आली म्हणे की, 'तुमचा आमचा सेनापति एक हें तर पूर्वी झालेंच. त्याचप्रमाणें तुमचें आमचें पार्लमेंटहि एक करूं. दोनहि राज्यांची घटना एकच होईल.' मग मी विचारतों की एवढी अजस्र घडामोड या महायुद्धांत होते, तर १९३५ च्या आमच्या कायद्यांतील एखादें कलम बदलणें, किंवा एखादा भागच्या भाग काढून टाकणें, ही गोष्ट कठीण कां म्हणावी? इंग्लंडच्या वरील सूचनेप्रमाणे व्हावयाचें तर इंग्लंड आपल्या घटनेंतील राजपद काढून टाकून 'रिपब्लिक' करणार होतें काय? किंवा ज्या फरान्सने आजवर 'रिपब्लिक' भोगलें तें 'राजशाही' पत्करणार होतें काय? पण तें कांही नाही. इंग्लंडच्या स्वार्थाची अशी प्रचंड घडामोड युद्धात होऊ शकते. युद्धाची हरकत काय ती हिंदुस्थानचा स्वार्थ पदरांत पडण्याला!

## प्रधान तरी जबाबदारीच्या तत्त्वावर नेमा

पण यापुढे मी जाऊन सत्वपरीक्षाच घेऊन असें म्हणतों की कायदा न बदलतांहि एक लहानशी गोष्ट पुढच्या पावलादाखल करतां येईल ती

तरी होऊं द्या. गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलांत आणखी चार हिंदी सभासद नेमून घेण्याचें घाटत आहे. आता तें तरी पदरांत पडेल की नाही कोणाला ठाऊक? पण समजा त्या नेमणुका झाल्या तर त्या लोकांना तरी जबाबदारीच्या तत्त्वावर कां नेमण्यांत येऊं नये? त्यांना सरळ प्रथमच असें सांगावें की, जोंपर्यंत कायदेमंडळाला तुमचा कारभार आवडेल, त्यांचा तुमच्यावर विश्वास राहील, तोंपर्यंतच तुम्ही या जागांवर राहाल, नाहीतर तुम्हांला जावें लागेल. कायदेमंडळाचा अविश्वासाचा ठराव झाल्यावर कोणीही स्वाभिमानी प्रधान आपल्या जागेवर राहणार नाहीं हें उघड आहे. पण राहिलाच तर गव्हर्नर जनरलला त्याला नेमण्याप्रमाणे बडतर्फ करण्याचा, काढून टाकण्याचा, अधिकार कायद्याने आहे. मग या रीतीनें इतक्यापुरती तरी जबाबदारी कां प्रस्थापित करू नये? परवा प्रो. लास्की यानेहि नक्की हेंच म्हटलें आहे. नवे चार कौन्सिलर जबाबदार राहणार नाहीत तर दरमहा पांच चोक वीस हजार रुपये व्यर्थ खर्ची कां घालावे? शिवाय इंग्लंडावर स्वारी होण्याच्या भीतीमुळे अलीकडे पार्लमेंटाने आपले म्हणजे स्टेट सेक्रटरीचे कांहीं अधिकार गव्हर्नर जनरलला दिलेच आहेत. त्यांचाहि उपयोग मनांत असेल तर जबाबदारीचा कारभार सुरू करण्याला होईलच.

पण हा युक्तिवाद गळयांत आला म्हणजे शेवटचें अडवणुकीचें अस्त्र आहेच. तो आक्षेप हा की तुमच्यांत एकी नाही म्हणून संयुक्त राष्ट्रीय प्रधानमंडळ नाहीं. आणि तें कायदेमंडळाला जबाबदार करतां येत नाही. मिळून कांही नाही. फेडरेशन नाही म्हणून वरिष्ठ सत्ता नाही. आणि फेडरेशनचा प्रकार बदलूनहि राष्ट्रांत एकी नाही म्हणून वरिष्ठ सत्ता नाही. तरी शेवटीं हें पालुपद आहेच की, "हो हो युद्धानंतर डो.स्टे.आम्ही देणारच आहों. १९३५ च्या कायद्याने १९१९ च्या कायद्यांतलें उद्देशविधान आम्ही काढून टाकलेलें नाही. तें कायम आहे. आणि तें उद्देश विधान १९१७ च्या घोषणेवर आधारलेलें आहे. त्यांत डो. स्टे. किंवा त्यासारखें जें काय स्वराज्य तुम्ही मागत असाल किंवा आम्ही देणारे होऊं तें गुप्त, गर्भित, अव्यक्त असें आहेच. तेव्हा आज आणखी काय मागतां"!

असो, स्वतंत्र दृष्टीने विचार करणाऱ्या विद्वान इंग्रजांना देखील आमच्याप्रमाणेच हा कपटी लपंडाव स्पष्ट दिसतो. प्रो. कीथ याने आपल्या

ग्रंथाच्या शेवटीं हें स्पष्ट म्हटलें आहे कीं 'या कपटाला प्रारंभ झाला तो राष्ट्रसंघावर हिंदुस्थानला अनधिकाराने सभासदत्व दिलें तेथूनच झाला. हिंदुस्थानाला डो. स्टे. द्यावयाचें इंग्लंडच्या मनांत नाही तर तसें त्याने स्पष्ट सांगावयाचें होतें. पण कपटी लपंडाव करून, म्हणजे जें मनांत नाही तें भासवून बिचाऱ्या हिंदुस्थानाला कां फसवावें ?' हें प्रो. कीथ याचें म्हणणें सर्वस्वी खरें आहे. आम्ही इकडेहि तेंच म्हणतो.

## पोकळ दर्जा व निरर्थक आडनांवें सारखींच

तात्पर्य ताजा आढावा काढला तर हाच निघतो. हिंदुस्थानाला डो. स्टे. उद्या केव्हा देऊ असे म्हणणारे म्हणतात की, वर सांगितल्याप्रमाणे नुसते स्टेटस या अर्थी तें आजहि आहेच.मात्र त्या सर्वांनाच हें कबूल करावें लागतें की दर्जा असला तरी तो औपचारिक आहे. प्रत्यक्ष व्यवहारांतला अधिकार नाही. सत्ता नाही. इंग्रजी जाणणारांना 'स्टेटस्' व 'फंक्शनिंग' यांतला भेद सहज समजणारा आहे. आणि जास्तींत जास्त म्हटलें तर या भेदाने मर्यादित अशाच डो. स्टे. ची अपेक्षा युद्धानंतर हिंदुस्थानाने करावयाची आहे! म्हणूनच मी प्रारंभीं म्हटलें की लॉर्ड लिनलिथगो यांच्या घोषणेंत नवें कांहीच दिलें सांगितलें नाही. सर्व जुनेंच आहे. हा पोकळ दर्जा म्हणजे केवळ एक प्रकारचें औपचारिक सांप्रदायिक आडनांव ठरतें. त्याहून अधिक अर्थ त्याला नसतो. आणि निव्वळ थट्टेखातर या निरर्थक आडनांवांचीं कांही उदाहरणें देऊन मी आपलें भाषण संपवितों.

या निरर्थक आडनांवांचा प्रकार असा. नांव अष्टपुत्रे. पण पोटीं एकहि पोर नाही. समूळ वंशच्छेद पुढे उभा. नांव चतुर्वेदी, त्रिवेदी. पण याच्या बापजन्मीं वेदाची ऋचा तोंडून निघालेली नाही. नांव पंचनदीकर. पण एक मैलावरून माकणेने पाणी आणावें लागतें. आडनांव अग्निहोत्री. पण तोंडांतल्या विडीशिवाय हा दुसरी कोणतीहि समिध शेकीत नाही. याचें नांव दीक्षित. पण याच्या कुळांत कधी कोणी यज्ञ केला नव्हता. पण म्हणे याच्या एका पूर्वजाला एका यज्ञांत होमाचा धूर घालविण्याकरता ( वेणुधमन्या प्रबोध्य ) फुंकणीने फुंकावयाला सांगितलें होतें. गुजराथी भाषेंत महाराज

म्हणजे आचारी किंवा पाणक्या! सौभाग्यवती हें एखाद्या स्त्रीचें निरर्थक आडनांव कसें होऊं शकतें हें सांगावयास नकोच. पण पुरुषहि यांतून सुटत नाहीत. कारण पत्राच्या माथन्यांत हे राव 'राजश्रिया विराजित.' पण हातांत चौपदरी घेऊन मधुकरी मागतात! हिंदुस्थानाला पूर्वी दिलेलें, म्हणजे दिलें म्हटलेलें, म्हणजे शब्दांत गर्भित, अव्यक्त, असलेलें डो. स्टे. आज या प्रकारचें आहे. व्हाइसरॉयांच्या शब्दांतून निघणारें डो. स्टे. याहून अधिक कांही असेल असें म्हणवत नाही. पण पुढे काय होतें तें तुम्ही आम्ही मिळून पाहूंच.

(वरील व्याख्यानांत रा. केळकर यांनी सुमारें पांच-सात ग्रंथांतील मूळ इंग्रजी उतारे आपल्या आधाराकरितां व श्रोत्यांच्या खात्रीकरिता वाचून दाखविले.)

---

# ७. स्वराज्याच्या मार्गांतील एक अडचण

(केसरी ७ नोव्हेंबर १९३९)

## (लेखांक १ ला)

हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. त्या सर्व एकाच वेळीं एकत्र लक्षांत येत नाहींत. विशेष प्रसंगाने विशेष अडचण लक्षांत येते.

इंग्रज लोकांकडे स्वराज्य मागून त्यांच्या हातून (खुषीने हो, वा नाखुषीनें हो) तें मिळवणें याशिवाय दुसरी कोणतीहि विचारसरणी आज हिंदुस्थानांतील लोकांच्या डोळ्यापुढें नाही. यामुळें इंग्रज त्याला जी एखादी अडचण पुढे आणून दाखवतात, तीच काय ती एकमेव अडचण असें आपणाला वाटतें; पण इंग्रज आपल्या मनांतील खरी गोष्ट कधीच बोलून दाखवीत नाहीत. म्हणून इतर अडचणी लक्षांत येत नाहीत.

समजा, इंग्रज सरकार भलेपणा सोडून, नंगे बनून, कोंडलेल्या मांजरा-सारखें तोंड फिरवून, हिंदी पुढाऱ्यांच्या अंगावर चालून येऊन म्हणालें, "बस बस, तें कांही नाही. तुम्ही हिंदुस्थानांतल्या सर्व पक्षोपपक्षांनी मिळून, एकमत करून, अगदी एकाच मजकुरावर सह्या करून स्वराज्याची मागणी केली तरी हिंदुस्थान आमच्या हातचें-म्हणजे लुबाडायला, तावडायला, ओरबडायला ओरपायला आज सांपडतें तें निघून गेलें तर इंग्लंडचें काय किती नुकसान होईल हें आम्हांला चांगलें समजतें. म्हणून तुम्हांला स्वराज्य देत नाही जा ! मग काय म्हणतां बोला ! "

तर या प्रश्नाला उत्तर काय देणार ? "हो ! हो ! तुमच्याशी लष्करी युद्ध उभारून स्वराज्य घेऊं" असें उत्तर आज तरी एकदम तोंडातून येईल काय? कारण हिंदुस्थानांतील पक्षोपपक्षांचें एकमत झालें तरी युद्धाचीं साधनें हिंदुस्थानाजवळ काय आहेत ? गांधींचा अहिंसेचा उपदेश अंतिम स्वरूपांत पुष्कळसा या विचाराला धरूनच असावा. असें पहा कीं, १८५७ सालीं हिंदु-मुसलमानांत जेवढी एकी होती तेवढी आज होणें शक्य आहे काय ? त्या-वेळीं मुसलमान बंडवाले एकवेळ हिंदु पेशव्याला दिल्लीच्या तक्तावर बस-विण्यासहि तयार झाले असते. शिवाय बंडखोर हे शिपाई होते. ते कवाईत शिकलेले होते. त्यांच्या हाताखाली हत्यारें सरकारी फौजेच्या हातांतल्या हत्यारांसारखींच होतीं. इतकें असून बंड यशस्वी झालें नाही. मग ?

## हिंदी संस्थानिकांची अडचण

दुसरी एक खरोखरीची अडचण सरकारच्या ध्यानांत असते. पण ते ती सहसा बोलून दाखवत नाहीत. ती म्हणजे हिंदी संस्थानिकांची. या संस्थानिकांना आपल्या प्रजेला स्वराज्य द्यावयाचें नाही. यामुळे शेजारच्या इंग्रज सरकारनेहि आपल्या प्रजेला तें देऊ नये असें त्यांना वाटतें. फेडरेश-नच्या संकीर्ण वादांत संस्थानिकांनी स्वतःचें स्वातंत्र्य पक्कें करण्यासारख्या कबुल्या इंग्रज सरकाराकडून वदवून घेतल्या आणि शेवटीं वरती फेडरेशन लाथाडलेंच!

आणखीहि इतर कांही अडचणी अशाच सांगतां येतील पण पाल्हाळ होईल म्हणून वाढवीत नाही.

स्वराज्य मिळविण्याच्या बाबतींत स्वतः आमच्या अडचणी पुष्कळ आहेत आणि आमच्या तोंडावर टाकण्याच्या इंग्रजांच्या अडचणी – म्हणजे सबबी–तशाच पुष्कळ आहेत. पण त्या सर्वांचा सांगोपांग विचार करणें माझ्या प्रस्तुतच्या लेखमालेचा उद्देश नाही. मी फक्त त्यांच्या एकाच ढोबळ सबबीचा विचार करणार आहे. ती म्हणजे हिंदुस्थानांतील अल्पसंख्य गटांचा ( मायनॉरिटीजचा ) प्रश्न ! स्वराज्याच्या मागणीचा वाद निघाला रे निघाला की, नक्की हा प्रश्न पुढे आणण्यांत येतो. नुकत्याच झालेल्या व्हाइसरॉय साहेबांच्या घोषणेंत व पार्लमेंटांतील वादविवादांत, सरकारतर्फे सर्व भर याच प्रश्नावर दिला गेला होता हें वाचकांना माहीतच आहे

पण, हा सगळा कपटी कांगावा आहे. इंग्लंडच्या फायद्याची कोणती गोष्ट, संस्थानिक किंवा अल्पसंख्याकांचे गट यांच्या विरोधामुळे, सरकारनें आजवर अशी ना तशी दडपून उगवून घेण्याचें सोडलें आहे ? पण स्वतःच्या हातची सत्ता सोडण्याच्या बाबतींत तें तसें कां करील ? उलट जशी कांहीं एखादी ठरीव योजना आधींच असावी, उडविण्याकरितां बार भरलेला असावा, तशा प्रकारें अल्पसंख्याक गटांचा प्रश्न नक्की नेमका पुढे काढण्यांत येतो.

## काशीयात्रेला जाण्याच्या वाटेंत अपशकुन !

एका सनातनी आजोबाची गोष्ट सांगतात. ही म्हाताऱ्याची पीडा आता काशीयात्रेला निघून जाईल तर फार बरें असें त्याच्या नातवंडांना होऊन गेलें होतें. हें जाणून म्हाताराहि यात्रेला जाण्याचा आपला बेत नित्य बोलून दाखवी. पण त्यानें अशी युक्ति करून ठेवली होती कीं, यात्रेचें प्रस्थान ठेवण्याकरितां म्हणून तो पागोटें घालून निघाला म्हणजे, त्याला सामील असलेला एक नोकर अगदीं आयत्यावेळीं घरचें पाळीव मांजर मुद्दाम हुसकून त्याला आडवें घालवी. आणि तसें झालें कीं, म्हातारा परत पडवींत येऊन डोक्यावरचें पागोटें काढून खुंटीला ठेवी. एकदा मांजर आयत्यावेळीं आडवें जात नाही असें दिसलें तेव्हा त्याच्या सुदैवानें आळींतील एक विधवा त्याच्या सामोरी आली. तिसरे वेळीं पाल चुकचुकली. चवथ्या वेळीं यापैकीं कांहीच घडेना. तेव्हां म्हातारा म्हणू लागला, 'छेः माझा डावा डोळा लवू

लागला बुवा! यात्रेचें प्रस्थान रहित.' स्वराज्यदानाच्या बाबतींत साम्राज्यवादी इंग्रज हा अपशकुन हुडकणाऱ्या या सनातनी म्हाताऱ्यासारखाच वाटतो.

हिंदी प्रजेंतील मतभेद, किंवा अल्पसंख्य, बहुसंख्य, गटांची परस्पर नाखुषी, हेंच जर स्वराज्य न देण्याला खरें कारण असेल तर सरकारला असा एक प्रश्न आम्ही करू कीं, "होय, ही मतभेदाची अडचण एका अर्थानें खरी आहे पण असें तरी लिहून देता का–किंवा घोषणा करता का–कीं, अल्पसंख्य व बहुसंख्य यांचे पुढारी मिळून स्वातंत्र्याची, स्वराज्याची जी योजना एकमतानें लिहून पुढे मांडतील ती, कानामात्रा न बदलतां आम्ही पार्लमेंटचा कायदा करून अंमलांत आणूं! बोला, असें कांही होत असेल तर बहुसंख्य गट आपल्या डोक्यांत मोठ्यांतला मोठा धोंडा मारून घेण्याला, स्वार्थत्यागाचा विक्रम करण्याला, पुढे सरसावतील."

## दक्षिण आफ्रिकेंत काय घडलें?

आणि सन १९०९ सालीं असें प्रत्यक्ष घडल्याचें एक उदाहरणहि आहे. यापूर्वीं दक्षिण आफ्रिकेंत इंग्रज,बोअर, डच, आफ्रिकँडर, अशा हितांनी विभागलेल्या चार पोट वसाहती होत्या. त्यांचें 'फेडरेशन' बनवावयाचें होतें. तेव्हा त्यांनी इंग्लंडला अगदीं असाच सवाल टाकला. इंग्रज प्रधानमंडळानें 'होय' म्हटलें. चारहि पोट वसाहतींनी (नाताळ, ट्रान्सवाल, ऑरेंज रिव्हर फ्रीस्टेट, केप कॉलनी) आपापले प्रतिनिधी नेमून दिले. सतत शंभर दिवस सभागृहाचीं दारें लावून घेऊन त्यांनी खलवत केलें. निर्धारानें स्वार्थत्याग केला. अडचणी उत्पन्न करणारें असें जें होतें तें त्यांनी परस्परांना दिलें घेतलें. एकमुखी एकजिनसी घटना तयार केली. आणि पार्लमेंटनें तीच, एक अक्षर न बदलतां, मान्य केली! ही घटना डोमिनियन स्टेटस्‌ची होती. मग चला बोला, हिंदुस्थानाकरितां तसें कांही करण्याची तयारी सरकारची असली तर प्रतियोगी सहकारितेची तयारी आमचीहि आहे. तसें नसेल तर सरकार रोज एक नवी अडचण उत्पन्न करणार, आणि बहुसंख्य प्रजा मात्र स्वार्थत्यागाची कबुली देऊन आपल्या हातानें आपलें तोंड बांधून घेणार! स्वार्थत्याग केला तो फुकट गेला! पण, लक्षांत ठेवा, पक्का इंग्रज

त्याच्या अंगाशी येणारी ही निर्वाणीची सूचना कधीच मान्य करणार नाही. जुन्या गडकोटांना जसे दरवाज्यामागे दरवाजे असतात किंवा मैदानी रणक्षेत्रावर जसे खंदकामागे खंदक असतात, त्याप्रमाणें इंग्रजाने आपल्या खोट्या अडचणींची, म्हणजे दिखाऊ सबबींची, रचना करून ठेवलेली आहे. जसा कांहीं सातपुडा पर्वत !

एक पुड म्हणजे खिंड आणि एक दरी ओलांडावी तो दुसरी आ वासून तयार ! या प्रवासाला कोणता प्रवासी पुरा पडेल ?

आता हा तात्त्विक युक्तिवाद साध्या मनुष्यस्वभावावरच आधारलेला असल्यामुळें, केसरीच्या अनेक वाचकांना तो सहज पटण्यासारखाच आहे. पण या सामान्य वाचकाला एक कल्पना नसते ती ही कीं, बहुसंख्य व अल्पसंख्य, अशा स्वरूपाची गटवार वांटणी, एकाच देशांत राज्यांत असणें ही गोष्ट जगांत अपूर्व नाही. या दुर्दैवी हिंदुस्थानांतच तो आढळते असें नाही! तर पहाणाराला जगभर व सर्व कालभर ती आढळेल. मात्र दृष्टि किंचित् सूक्ष्म केली पाहिजे; व ती सूक्ष्म करणाराने इतिहासाची चाळशी डोळ्याला लावली पाहिजे इतिहासज्ञानाचा फायदा होण्यासारखा हा प्रसंग खचित आहे.

म्हणूनच भानगडीच्या अशा वाटणाऱ्या या प्रश्नाविषयी मी या लेखमालेच्या द्वारें थोडीबहुत चर्चा करण्याचें योजिलें आहे. आणि ती वाचणाराला शेवटीं असेंच निश्चितपणें वाटेल कीं, इंग्रज सरकार जर प्रामाणिक असेल ( म्हणजे परवा सर सॅम्युअल होअरनी आढ्यतेने म्हटल्याप्रमाणे 'फोडा व झोडा' हीच दुष्ट राजनीति इंग्रज सरकारला खरोखरच अवलंबावयाची नसेल) तर स्वराज्यदानाला हिंदी प्रजेंतील मतभेदाची सबब ते कधीहि सांगणार नाहीत. "आमच्या स्वार्थाकरिता तुम्हांला स्वराज्यदान नाही" असें इंग्रज म्हणेल तर तें वेगळें!

## अल्पसंख्यांचा प्रश्न चोहोकडेच आहे

एक ग्रंथकार म्हणतो,–

"The causes out of which the problem of minorities arises the difference between the boundaries of nations

and States--exists to a greater or lesser extent throughout the world. Wherever more nations than one are joined in a single State, a national problem of minorities will exist. And wherever a nation is divided between more States than one there is at least a potential international problem.. Not only the British rulers in India, but also the native population of India itself would lose nothing by considering the history of the minorities–struggle in Europe."

या ग्रंथकाराचें नांव सी. ए. मेकार्टने असें आहे. त्याच्या वरील उताऱ्याचें तात्पर्य हेंच कीं, "एखाद्या राष्ट्रीय समाजाची वांटणी निरनिराळ्या राज्यामध्यें झालेली असली, किंवा उलट एखाद्या राज्यांत निरनिराळ्या राष्ट्रीय समाजांचा समावेश झाला असला तर, अल्पसंख्य गटांचा म्हणून प्रश्न तेथें हटकून उत्पन्न होतोच. मग त्याचा उपद्रव त्या राज्यापुरताच होवो, किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा होवो."

एका राज्यांत फक्त एकजिनसी राष्ट्रीयत्वाचे लोक असावेत, दुसरा कोणीहि असू नये, हें घडवून आणण्याची वृत्ति आधुनिक काळीं दिसून येते. म्हणजे राज्य व राष्ट्रीयत्व हीं पूर्णपणें समव्याप्त करण्याची वृत्ति. परंतु ही स्थिति स्वाभाविक तर नाहीच पण, इष्टहि नाही असें लॉर्ड ॲक्टन यानें स्वातंत्र्यावरील आपल्या निबंधांत म्हटलें आहे. खरें लोकशाही तत्त्व त्याच राज्यानें अनुसरलें असें म्हणतां येतें की, ज्यामध्यें भिन्न राष्ट्रीय लोक राहतात, पण ज्या सर्वांना सरकार न्यायबुद्धीनें निःपक्षपातीपणानें वागवितें. आपलें अस्वाभाविक ध्येय अनुभवांत उतरविण्याकरितां, कांहीं राज्यांचीं सरकारें परकी वाटणाऱ्या लोकांना राज्यांतून हाकलून देतात किंवा सतत जुलमानें त्यांना आत्मसात् करितात. पण अशीं राज्यें पुढे लोकशाहीच्या दृष्टीनें दुर्बल ठरतात. या मताचा आधार देऊन वरील ग्रंथकार म्हणतो–
"Minorities will continue to exist, and will continue to present a problem which State craft will find insoluble, until it tries the method, so rarely, adopted hitherto, of applying the principles of justice, equality, and good Government. These minorities will then cease to be a

torment to the State possessing them, and will become instead a blessing ! May that day come soon. "

हिंदुस्थानसंबंधानें आम्ही असेंच म्हणतों. पण हा दिवस उगवण्याला म्हणजे विरोधी राष्ट्रीयत्वाचा प्रश्न सुटण्याला, एकाच गोष्टीची वाण आहे. ती म्हणजे या देशाच्या सरकारमध्ये खरी न्यायबुद्धि व खरी समताबुद्धि यांचा उदय आणि निःपक्षपाती निर्भय वृत्तीचा राज्यकारभार.

तो कसा सोडवावा याची चिकित्सा करूं

सांगण्याचा मुद्दा हा कीं, असल्या भानगडी अटळ आहेत म्हणून त्यांना कंटाळून कोणी आपलें प्रगतिपर कार्य टाकून दिलें नाही. राजकीय राष्ट्रीय प्रगति ही नदीसारखी आहे. तिच्या मार्गांत खडक आला तर शक्य असल्यास, ती त्याला वळसा घालून जाईल; पण तसें शक्य नसेल तर ती तो खडक फोडून त्यांतून जाईल. भानगडी निघतात त्याप्रमाणें त्यांच्यावर उपायहि सुचतात. आणि इंग्रज सरकारच्या मनांत असेल तर हिंदी अल्पसंख्य-बहुसंख्य गटांचा विरोधी हक्कांचाहि प्रश्न त्यांना सोडवितां येईल. तो कसा याचें विवेचन करण्याकरिता प्रथम राज्य, राष्ट्र, राष्ट्रीयत्व, उपराष्ट्र, अल्पसंख्य इत्यादि शब्दांची थोडीशी चिकित्सा हवी ती पुढील लेखांत करूं.

---

## ( लेखांक २ रा )

## राष्ट्रीयत्वाची कल्पना

मागील लेखांत सांगितल्याप्रमाणे राज्य व राष्ट्र या शब्दांचा आता विचार करूं

मनुष्याच्या सहवासप्रियतेमुळे, अर्थात् हजारों वर्षांत, कुटुंबापासून गण, गट, जाति, वंश, राष्ट्र व राज्य येथपर्यंत वाढत्या व्याप्तीच्या संस्था निर्माण झाल्या आहेत. शरीरांत जशा ठिकठिकाणीं स्नायु-ग्रंथी ( गांठी ) बनून राहतात, तसेच समाजाचे लहान मोठे संघ जगांत निरनिराळ्या देशांत बनून राहिलेले आहेत.

पहिल्या पहिल्या काळांत हे संघ स्थायिक नसतात. पोटामागे धावणाऱ्या लोकांना घरें, वाडे, इमले काय करावयाचे? पण या अखंड प्रवासाचा मनुष्याला पुढे पुढे कंटाळा येतो. आणि जेथे कोठे जावें असें वाटतें, ती जागा कदाचित् दुसऱ्या कोणी आधीच आक्रमिलेली आढळली म्हणजे, आहे ती तरी हातची सोडू नये असें त्याला सहजच वाटतें. आणि मग त्याला स्थायिकपणाचे फायदेहि कळू लागतात.

कालांतराने एकाच ठिकाणीं पूर्वीच्याहून निराळे असे आणखी लोक आले, म्हणजे त्यांच्यांत व यांच्यांत कलागती होतात. पण त्या फार काळ न टिकतां एक दुसऱ्याला हाकून तरी देतो, किंवा ते दोघेहि कांही समजुतीने एकत्र राहण्याचा निश्चय करतात. आणि या एकत्र राहण्याने जुन्या गटांची वाढ किंवा रूपांतर कळत न कळत होत जातें.

## राज्य व राष्ट्र यांतील अंतर

राज्य व राष्ट्र यापैकी राज्य या शब्दाचा अर्थ कठीण नाही. राज्य (स्टेट) म्हटलें म्हणजे त्याला निश्चित क्षेत्रमर्यादा असते, आखीव सरहद्दी असतात, आणि त्या मर्यादेंत चालणारा असा त्याचा स्वयंपूर्ण राज्याधिकार एखाद्या विशिष्ट घटनेनुसार सिद्ध झालेला असतो.

राष्ट्र हें मात्र राज्याप्रमाणें कायदेशीर घटनेवर रचिलें, आधारलें जात नाही. त्याची संघटना मनांत असते. राष्ट्र या शब्दाचे अर्थ अनेक मानले जातात. कारण वंश, धर्म, संस्कृति, भाषा, चालीरीती यांपैकीं कोणत्याहि एखाद्या बाजूने एकसंघ झालेला, किंवा स्वतःला तसें मानणारा, समाज हें राष्ट्र म्हणतां येतें. एकाच राज्यांत वरील अर्थाचीं अनेक राष्ट्रें असू शकतील. उलट एकच राष्ट्र विस्ताराने फार मोठें असलें तर (किंवा ऐतिहासिक कारणें तशीं असतील तर) त्याचीं अनेक राज्यें बनूं शकतील.

राष्ट्रीयत्वाच्या मुळांत आपपरभाव व स्वकीयाभिमान या गोष्टी मूलभूत असतात. आपले कोण व परके कोण यांतला भेद मनुष्यमात्राला प्रायः उपजत बुद्धीने समजतो. तो शिकवावा लागत नाही. हा भेद कांही बाह्य खुणांवरूनहि कळून येतो. आणि या व्यवच्छेदक (भेददर्शक) बाह्य

खुणा हींच राष्ट्रीयत्वाचीं लक्षणें ठरतात.परक्या मुलखांत परक्या राज्याच्या अमलाखाली असणारे लोक या खुणांवरूनच एकमेकांना स्वकीय म्हणून विशेष रीतीने ओळखतात. आणि त्या प्रतिकूल परिस्थितींतहि परस्पराविषयी राष्ट्रीयत्वाची भावना ठेवतात.

## एकराष्ट्रीयत्वाचें लक्षण

या व्यवच्छेदक खुणांत मुख्यतः वंश, धर्म, भाषा सामाजिक चालीरीती यांचा समावेश होतो. मोठमोठ्या समाजशास्त्रज्ञांत याविषयी मतभेद आहे एक (मॅक्स नॉर्डो) म्हणतो कीं, केवळ एक भाषा हेंच राष्ट्रीयत्वाचें खरें आधारस्थान होय. भाषावार प्रांतरचनेच्या सूचनेचें मर्म हेंच होय. उदाहरणार्थ, महाराष्ट्र म्हणजे ज्यांत लोक मुख्यतः मराठी भाषा बोलतात तो देश (राष्ट्र); कर्नाटक म्हणजे ज्यांत लोक मुख्यतः कानडीभाषा बोलतात तो देश (राष्ट्र). जॉन मिलच्या मते 'आपण एका राज्यांतली (स्टेट) प्रजा आहों' ही भावना हाच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा आधार असतो. पण पूर्वानुभवावरून राष्ट्रीयत्वाची सर्वसंमत व्याख्या करितांना राज्याभिमानापेक्षां वंश, धर्म, सामाजिक संस्कृति, भाषा या गोष्टीच अधिक जमेस धराव्या लागतात.

प्रथम वंशनिष्ठ राष्ट्रीयत्व घेऊं. अगदी मूळचे वंश कसे निर्माण झाले हें कोणीहि समाजशास्त्रज्ञ निश्चयाने सांगत नाही. तो इतकेंच सांगतो कीं, कोणताहि वंश कालांतराने मिश्र (दूषित म्हणण्याचें कारण नाही) बनत असला (म्हणजे त्याची मूळची शुद्धता उरत नसली) तरी होईल तितके आपले मूळचे गुणधर्म टिकवून धरण्याकडेच त्याची प्रवृत्ति असते. यामुळें कोणत्याहि राष्ट्राच्या स्वरूपाची ओळख मुख्यतः त्यांतील वंशाच्या मूळच्या गुणधर्मावरूनच पटते

पण त्या वंशरूपी राष्ट्राच्या पोटांत नंतर उप–राष्ट्रें अशीं कांही बनतात की, मूळच्या वंशाशी असलेलें त्याचें साम्य न गेलें तरी, या उपराष्ट्रांचें आपापसांतील वैधर्म्यहि दिसून येऊं लागतें. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील मूळच्या आर्यवंशांतून जसे सूर्यवंश व चंद्रवंश हे वेगळे निघाले. तसेंच पुढे

या सूर्यवंशांतून व चंद्रवंशांतून अनेक कुळें निर्माण झालीं. आणि तीं पुढें इतकीं विस्तारलीं की, त्यांना कुळें हें नांव अपुरें पडूं लागून तीं आर्य राष्ट्राचीं उपराष्ट्रें ठरलीं.

कांही वंशांचीं नांवें प्रसिद्धच आहेत. उदाहरणार्थ, आशिया खंडांतील कॉकेशियन, मॉंगोलियन तारतार व आर्यन. दक्षिण आफ्रिकेंतील मेक्सिकन, उत्तर अमेरिकेंतील रेड इंडियन. आफ्रिकेंतील नीग्रो, हॉटेन्टॉट. ऑस्ट्रेलियांतील बुशमेन. युरोपांतील आर्य व अनार्य-किंवा उत्तरेस नॉर्डिक, मध्यें अल्पाईन, दक्षिणेस मेडिटरेनियन. पण युरोपांतील या मुख्य तीन वंशांचे सुमारे दहापंधरा पोटभेद होऊन त्यांना आता राष्ट्राचें स्वरूप आलें आहे. उदाहरणार्थ,ग्रेट ब्रिटनमधील केल्ट व सॅक्सन, फरान्समधील नॉर्मन व लॅटिन, मध्य युरोपांतील पोल्स, मॅगियारस, ज्यू, जिप्सी, हंगेरियन, स्लाव इत्यादि.

हिंदुस्थानांतील वंशोपवंशांचा सूक्ष्म विचार १९३१ च्या खानेसुमारीच्या वेळीं तज्ज्ञांकडून करविण्यांत आला. वंशभिन्नता ठरविण्याचीं कांही गमकें शरीरावयवांची ठेवण, हाडांचीं मोजमापें, डोळ्यांचा, केसांचा रंग इत्यादि मानलीं जातात. आणि या तज्ज्ञांनी सुमारें ५१ गटांसंबंधानें प्रत्यक्ष रंगरूप पाहून मोजमापें घेऊन अनुमानाने असें ठरविलें की, आज हिंदुस्थानांत सुमारें सात वंशांचे लोक नांदतात. हें आढळण्याचीं ठिकाणें १ तेलगू २ नागर, कायस्थ, कर्नाटकी ब्राह्मणेतर ३ काफिर, पठाण इ. ४ भिल्ल वगैरे. ५ नाग वगैरे. ६ काश्मीरी, ब्राह्मी इ. ७ डोंगरी, अंगामी लोक इ.

पण हे वंश स्वतंत्र मानले तरी हिंदुस्थानच्या लोकांना आज या दृष्टीचा स्वकीय परकीय असा भेदभाव मुळीच जाणवत नाहीं. म्हणजे ती ती वंशोत्पत्ति हें त्यांना राष्ट्रीय अभिमानाचें आधारस्थान होऊ शकत नाही. मग यांच्याहि आणखी मागे जाऊन क्रमवार कोणकोणत्या वंशांची वसाहत हिंदुस्थानांत होत गेली याचा विचारच करावयास नको! कारण चार हजार वर्षांपूर्वी सर्व हिंदुस्थानभर एकाच प्रकारची, म्हणजे आर्य संस्कृति मुख्यतः प्रस्थापित झाली होती.

तात्पर्य, आज हिंदुस्थानांत आर्य-अनार्य अशा ढोबळ वंश-नांवानेहि कोणी कोणास-आपणाला किंवा परक्याला-ओळखीत नसून, राष्ट्रांची वांटणी धर्म किंवा भाषांच्या अनुरोधानें झाली आहे. एक वांटणी हिंदु, मुसलमान, खिस्ती, झोरोरास्ट्रियन अशा धर्मांच्या नांवाने होते. किंवा दुसरी वांटणी कर्नाटक विरुद्ध महाराष्ट्र, बहारी विरुद्ध बंगाली, तेलगू विरुद्ध तामील अशी भाषा-भेदाच्या अनुरोधाने होते.

## धर्म व एकराष्ट्रीयत्व

वंशाभिमान हा कदाचित् इतर सर्व अभिमानांपेक्षा प्रबळ ठरेल. तथापि वंशाची कल्पना दृश्य नाही. मानीव व केवळ बुद्धिगम्य आहे. पण धर्म म्हणजे (तत्त्वसिद्धांत सोडून दिले तरी) धर्माच्या नांवाचा आचार हा दृश्य आहे. आणि एकच धर्माचार आचरणाऱ्या लोकांमध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना राहणे अगदी स्वाभाविक आहे. आता एकाच धर्माचे अनुयायी रक्तशुद्धीच्या म्हणजे वंशाच्या अभिमानाने स्वधर्मीय अशाहि इतर कांही गटांशी लग्नसंबंध न करोत. तथापि असेहि लोक परस्परांना धर्मबांधव आणि त्या कारणाने एका राष्ट्राचे अवयव मानतात.

परस्परांच्या पंक्तीला बसून न जेवणारे लोकहि धर्मबांधव असू शकतात. स्पृश्य व अस्पृश्य हिंदु हे राष्ट्रीय दृष्टया एकच आहेत. रजपूत, रठ्ठी व द्रविड हे एक वंशाचे नव्हत; तथापि त्या तिघांचें एकराष्ट्रीयत्व हिंदु धर्माच्या समान अधिष्ठानावर प्रतिष्ठित आहे; तिघांनाहि हिंदुधर्माचा अभिमान असून परक्यांच्या आक्रमणाला ते सारखाच विरोध करतील.

जर्मनींत हर हिटलर याने जर्मन राष्ट्रीयत्वाला वंशोत्पत्तीचा म्हणून आधार घेतला आहे. पण तो समर्थनीय नाही. शास्त्रीयदृष्टया आज जगांत कोणताच वंश मूळच्या शुद्ध स्वरूपांत टिकलेला नाही. न जाणो ध्रुवप्रांतांतले एस्किमो यांच्या वंशाची शुद्धि राहिली असली तर असेल! आर्य किंवा नॉर्डिक वंशाचा अभिमान बाळगणारा व ज्यू लोकांना अनार्य म्हणून हद्दपार करणारा हिटलर हा स्वतः मूळचा ज्यू आहे,

असें म्हणतात! खरें खोटें देव जाणे! तात्पर्य, आज जर्मन राष्ट्रीयत्वाचा आधार राज्याभिमान होय हेंच खरें ठरेल.

## राष्ट्रीयत्व आणि वंश

एकवंशियांमध्ये प्रेम असतेंच हेंहि खरें नाही. कारण उत्तर फ्रान्सचे लोक व जर्मन एकाच वंशाचे पण कट्टे वैरी. तसेंच पोलंडचे पोल व लिथुॲनियन. ग्रीक व अलबेनियन हे एकाच वंशाचे पण हाडवैरी. फ्रेंच देशभक्त गॅंवेटा हा इटालियन होता. नेपोलियन कॉर्सिकन होता. इटालियन देशभक्त कॅव्हूर हा फ्रेंच होता. लुई कौसूथ हा स्लाव होता. डी व्हॅलेरा हा मूळचा आयरिश वंशाचा नाही. अशा रीतीने वंश व राष्ट्रीयत्व यांच्यामध्ये विसंवादित्व कां येतें याचें विवेचन पुढे येईलच.

धर्मदृष्ट्या राष्ट्रीयत्व मानण्याचा काळ पूर्वी बराच मोठा होऊन गेला. हिंदुस्थानांत पूर्वी केव्हा धर्मनिष्ठ असें राष्ट्रीयत्व नव्हतें. सर्व धर्मांचे लोक सहिष्णुतेने एकत्र सुखाने नांदत असत. शिवाय राज्यें फार लहान असत. त्यामुळे धर्म (राष्ट्र) व राज्य यांची व्याप्ति मिळत असे. युरोपांत ख्रिस्ती धर्मोदयापूर्वी धर्मनिष्ठ राष्ट्रीयत्व नव्हतें. मध्यंतरीं प्रॉटेस्टंट व क्याथॉलिक अशा भेदाने तें पुढे आलें. त्यामुळे प्रथम ख्रिस्ती विरुद्ध मुसलमान अशीं धर्मयुद्धें (क्रूसेड्स) झालीं. आणि प्रॉटेस्टंट धर्मपंथ निर्माण झाल्यानंतर इंग्लंड, स्कॉटलंड, प्रशिया, हॉलंड हीं राष्ट्रें प्रॉटेस्टंट, व फ्रान्स, स्पेन, इटाली, ऑस्ट्रिया हीं राष्ट्रें क्याथॉलिक, असे गट होऊन एकमेकांत या अभिमानाने युद्धेंहि झालीं पण युरोपांत आता धर्मनिष्ठ राष्ट्रीयत्व उरलें नाही. अमेरिकेंत प्रथमपासूनच तें नष्ट होतें. नव्या रशियांत गेल्या राज्यक्रांतीनंतर तें नष्ट झालें.

## मुसलमानांचें धर्मनिष्ठ राष्ट्रीयत्व

मुसलमान लोक हे एकच असे झाले की, त्यांनी सामान्यतः धर्मावरच आपलें राष्ट्रीयत्व आधारून ठेवलें. हल्ली नव्या तुर्कस्तानांत राष्ट्रीयत्व हें राज्यनिष्ठ आहे, धर्मनिष्ठ नाही, असें कदाचित् म्हणतां येईल. इराण, अिराक, अरबस्तान, अफगाणिस्तान अित्यादि देश राज्यसत्तेच्या

दृष्टीनें स्वतंत्र राष्ट्रें आहेत. तथापि मुसलमानी धर्मावर कोणी ख्रिस्ती राष्ट्र उठल्यास हे सर्व आपली धर्मनिष्ठा जागृत करतील व धर्मनिष्ठ राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें एकजुटीनें लढतील असा संभव आहे.

जुनें तुर्की राष्ट्र महमदानुयायी असल्यानें तेथें तुर्क, कुर्डिश, सर्व, अलबेनियन, आरमीनियन असे वंशभेद व भाषाभेदहि असले तरी, मुसलमान धर्मीय म्हणून सर्व मिळून एकच राष्ट्र मानलें जाई. १९१५–१६ च्या युद्धांत ग्रीक भाषा बोलणारे मुसलमान हे ग्रीसमधून तुर्कस्तानांत निघून गेले. उलट तुर्की भाषा बोलणारे ग्रीक ( ख्रिस्ती ) हे तुर्कस्तानांतून ग्रीसमध्ये निघून गेले.

ख्रिस्ती, मुसलमान व हिंदु या तीनहि धर्मीयांत शेंकडो पंथ आहेत. यांपैकी ख्रिस्ती धर्म हें जगांत आता बिलकुल राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान उरलें नाही. बहुतेक ख्रिस्ती लोक आपल्या राज्याचे अभिमानी झाले आहेत. तथापि मध्य व दक्षिण युरोपांत मात्र धर्माभिमानापेक्षा व राज्याभिमानापेक्षा, वंशाभिमान, भाषाभिमान हें राष्ट्रीयत्वाचें मूळ मानणारे बरेच लोक आहेत.

मुसलमान व हिंदु या धर्मामध्ये किती तरी पंथ आहेत. तथापि राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें पंथभेदाला महत्त्व न देतां, हिंदु व मुसलमान हे मुख्य धर्मालाच महत्त्व देतात.

## धर्म एक, पण राष्ट्र वेगळें

चीनमध्ये बौद्ध धर्म आहे असें आपण म्हणतों. पण कनफ्यूशिअस व ताओई यांच्या नांवचे पंथ बुद्धानुयायी पंथाइतकेच तेथें प्रबळ आहेत. एकंदरीनें आज चिनी लोकांचें राष्ट्रीयत्व धर्मनिष्ठ नसून देशनिष्ठ आहे. चिनांत सुमारें दोन कोटी (?) मुसलमान आहेत. परंतु धर्मनिष्ठ राष्ट्रीयत्व गाजविण्याइतके ते संघटित नाहीत. चिनांत ख्रिस्ती आहेत पण ते खिसगणतींतहि भरत नाहीत. ज्या ख्रिस्ती राष्ट्रांनी चीनची नाकेबंदी पूर्व किनाऱ्याला केली आहे, तीं ख्रिस्ती धर्मप्रसाराकरिता तिकडे गेलीं नसून व्यापाराकरिता गेलीं आहेत, व सुधारलेलीं शस्त्रास्त्रें हेंच त्यांच्या चढाईचें मुख्य साधन आहे.

चीनचा खरा शत्रु आज जपान असून तो बुद्धधर्मीच आहे. तथापि चीन व जपान यांतील लढा देशराष्ट्रीयत्व बुद्धीने चाललेला आहे. चीन व जपान स्वतंत्र व स्नेही असते, तर पूर्व विरुद्ध पश्चिम असें एक नवेंच राष्ट्रतत्त्व अभिमानाला आधारभूत घेऊन तीं दोन राज्यें मिळून युरोपियन राष्ट्रांशी लढलीं असतीं.

जपानचें राष्ट्रीयत्व सर्वस्वीं राजभक्तीवर आधारलेलें आहे हें सुप्रसिद्ध आहे. राजभक्ति व देशभक्ति हीं तेथे समव्याप्त आहेत. आपल्या धर्माचा, भाषेचा अभिमान गाजविण्याला जपानी लोकांना कारणच पडलेलें नाही. कारण अभिमान विरोधाने उत्पन्न होतो, आणि या दोन गोष्टींत जपानीयांना स्वदेशांत कोठेच विरोध झालेला नाही.

असो, वंश व धर्म हीं जीं राष्ट्रीयत्वाचीं दोन प्रमुख कारणें त्यांचा विचार झाला. आता सामाजिक संस्कृति, भाषा, चालीरीती इत्यादि ज्या इतरहि गोष्टी राष्ट्रीयत्वाला पोषक असतात त्यांचा विचार पुढील लेखांत करूं.

---

## ( लेखांक ३ रा )

## भाषा व राष्ट्रीयत्व

धर्मभावनेची स्निग्धता दाट असली तरी एकच भाषा बोलणारांमध्ये एकराष्ट्रीयत्व अधिक लवकर पटतें व उमगतें. कारण सामाजिक आर्थिक व्यवहार हा भाषेच्या अर्थबोधावरच सर्वस्वीं अवलंबून असतो.

आज मध्य युरोपखंडांत अल्पसंख्य राष्ट्रीयांचा प्रश्न ज्यांच्या नांवाने उपस्थित झालेला आहे ते झेक, मॅगियर, पोल, जर्मन हे आपलें राष्ट्रीयत्व भाषेवरच आधारतात. आणि परकी भाषा बोलणाऱ्या राज्यकर्त्यांकडून स्वभाषेवर जुलूम झाला, बंधनें घातलीं गेलीं, म्हणजे तोच आपला खरा छळ असें मानतात.

धर्मभावनेची तीव्रता कमी झालेल्या या काळांत संस्कृतिदृष्ट्या जन्मभाषेला राष्ट्रीय महत्त्व यावें हें सर्वस्वी स्वाभाविक आहे. सामाजिक-धार्मिक

संस्कृतीच्या हृत्कपाटाचें कुलूप खोलणारी किल्ली भाषा हीच नव्हे काय ? माणसांमाणसांतला सर्व प्रकारचा व्यवहार वाढून फलद्रूप होण्याला भाषेसारखें दुसरें साधन कोणतें ? भावना हा जो मानुषतेचा गाभा किंवा सत्त्व आहे तें प्रकट करावयाचें काम भाषा हीच करूं शकते.

कोणत्याहि भाषेकडे पहा. तिच्यांतलें शब्दभांडार, शब्दप्रयोगाची ठेवण, शब्दस्वभावाची जपणूक, म्हणी, व्याकरणाच्या लकबी, वाक्प्रचार यांतच कोणत्याहि समाजाचें खरें अंतरंग आढळेल, त्याची संस्कृति व तत्त्वज्ञान दिसून येईल. आणि या गोष्टीबाहेर राष्ट्रीयत्व म्हणून आणखी कोठे हुडकावयाचें ? लहान मूल स्तनपान करीत असतां आईच्या तोंडाकडे पाहून मातृभाषेचा पहिला शब्द उच्चारतें तेव्हा तें मातृदुग्धाबरोबर आपल्या वंशाच्या–जातीच्या राष्ट्रीयत्वाचा पहिला घुटका घेतें असें एका भाषापंडितानें म्हटलें आहे तें खरें आहे. कांही कारणाने स्थानत्याग करून परभाषेच्या मुलुखांत किंवा परराज्यांत जाणारे लोक आपली जन्मभाषा आपणाबरोबर नेतात, आणि घरच्या व्यवहारांत तरी तिचा उपयोग करून ती सांभाळतात.

मुख्य भाषांतून पुढें बोली निघतात, आणि बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात तें थोडेंसें खरें आहे. पण राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने मुख्य भाषा हेंच अभिमानाचें स्थान मानलें जातें. तें खाली बोलीपर्यंत ओढलें जात नाही. कारण तसें केल्यास अनवस्था प्रसंग यावयाचा. अल्पसंख्याकांच्या राष्ट्रीय भावनेला मान देऊन जेव्हा एखाद्या देशाचें सरकार कांही व्यवस्था करतें तेव्हां फक्त मुख्य भाषा लक्षांत घेऊन करतें.

ब्रिटिश हिंदुस्थानचा विस्तार उत्तरेस बलुचिस्तान ते आसाम व दक्षिणेस केप कन्याकुमारी येथपर्यंत मानला तर त्यांत ठळक अशीं भाषांचीं चार घराणीं आहेत. तीं १ ऑस्ट्रोएशिआटिक, २ द्राविड, ३ इंडोआर्यन व ४ तिबेटो चायनीस.पैकी पहिलीं दोन घराणीं सर्वांत जुनीं मानण्यांत येतात. पण घराण्यांतून घरें वेगळीं झालीं म्हणजे घराण्याचें नांव व अभिमान मागे पडतो. कारण तो अव्यवहार्य ठरतो. आणि घराचें (कुटुंबाचें) नांव चालू होतें. तसें या भाषांचें झालें आहे.

भाषावार प्रांतरचनेचा विचार कांग्रेसने केला तेव्हा हिंदुस्थानांत सुमारें वीस देशी भाषांना प्राधान्य आहे असें मानण्यांत आलें. परंतु ती सर्व योजना अद्यापि पूर्णपणें अमलांत यावयाची आहे. मुसलमान लोक हे कांग्रेस-मध्ये सामील नसल्याने ते भाषावार प्रांतरचना कशी सुचवितील हें सांगतां येत नाही. पण कांग्रेसेतर मुसलमानांच्या डोक्यांत भाषावार प्रांतरचनेपेक्षा धर्मवार हिंदुस्थानच्या विभागणीची कल्पना अधिक दृढमूल झालेली दिसते. आणि पाकिस्तान सिद्ध झाल्यास मुसलमानेतर लोकांच्या भाषांना ते किती मान देणार हें अजून बाहेर आलें नाही.

हिंदुस्थानांत आज नामनिर्देश करण्यासारख्या प्रचलित भाषा म्हटल्या तर त्या खालील होत. १ ल्हांडा, २ सिंधी, ३ गुजराथी (कछी काठी), ४ मराठी, ५ कानडी, ६मल्याळी, ७ तामीळ, ८ तेलगू, ९ ऊरीया, १० बिहारी, ११ बंगाली, १२ आसामी, १३ हिंदी, १४ उर्दू, १५ पंजाबी, १६ भिल्ली, १७ खानदेशी, १८ पहाडी, १९ तुळू, २० तोडा, २१ गोंड, २२ कंढ,२३ कुरुवं. (ब्रह्मी, तिबेटी भूतिया, नेपाळी अित्यादिकांचा विचार करण्याचें कारण नाही).

भाषावार प्रांतरचनाच म्हटली तर महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूर, मराठवाडा मिळून एक; गुजराथ, कच्छ, काठेवाड मिळून एक; असे प्रांत झाले पाहिजेत. मलबार व तेलंगण हे प्रांत स्वतंत्र झाले पाहिजेत. तसाच ओरिसा. बंगालप्रांत व बंगाली भाषा यांच्यासारखी समव्याप्ति अितर कोठेहि आढळत नाही. हिंदी भाषा बोलणारी संख्या इतकी मोठी आहे की ती सर्व मिळून एकाच प्रांतांत कोंबणें कठिण आहे. शिवाय हिंदी व उर्दू यांचें संमिश्रण इतकें दाट आहे की उर्दूचा व हिंदीचा प्रांत वेगळा करणें जवळ जवळ अशक्य आहे.

वंश, धर्म व भाषा यांच्याप्रमाणे स्थलाभिमान, पोषाकपेहराव, चाली-रीती या गोष्टीहि राष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक ठरूं शकतात. पण थोड्या प्रमाणाने. गांवाचें नांव निघालें की, परग्रामस्थांशी भांडतांना विधर्मी लोकहि एकदिल होऊ शकतात. जुन्या काळीं गांव हेंच एक प्रकारें स्वयंपूर्ण राज्य असल्यामुळे, पूर्वी सांगितलेल्या जॉन स्टुअर्ट मिलच्या अभि-

प्रायाप्रमाणे, स्थलाभिमान व राज्याभिमान हे समव्याप्त होऊं शकत. किंबहुना एका गांवांतली मुलगी दुसऱ्या गांवीं दिली येवढ्यावरून या दोन गांवांनी आपणाला व्याही-सोयरे मानावें असेंहि घडे.आणि मुलीवाल्या गांवकऱ्याने तिच्या नवऱ्याच्या गांवीं पाणीहि प्यावयाचें नाही असा सामाजिक निर्बंध पाळला जाई ! कोकण व देश यांची वादग्रस्त तुलना निघाली की, कोकण्या वाल्यांपासून खोतांपर्यंत कोकणी राष्ट्रीयत्वाचे अभिमानी; आणि देशावरच्या कुणब्यांपासून राजांपर्यंत देशी राष्ट्रीयत्वाचे अभिमानी; असेच आढळतील. पण स्थानाभिमान हा फारसा त्रासदायक किंवा अडचणीचा होऊं शकत नाही.

सामाजिक चालीरीती, पोषाक पेहराव यांच्या द्वारें राष्ट्रीयत्वाची भावना प्रकट होऊं शकते, पण अशा बाबतीला राजकीय स्वरूप येऊं शकत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणें असतें. सामाजिक नापसंती किंवा चेष्टा याशिवाय धाक नसतो यामुळे चालीरीती व पोषाकपेहराव यांच्या द्वारें प्रकट होणारें (अराजकीय) राष्ट्रीयत्व बिनबोभाट पार पडतें. समान सामाजिक चालीरीती पाळणारे व सारखा पोषाक-पेहराव करणारे यांच्यामध्ये सहजच आपलेपणा वाटूं लागतो. परस्परांविषयी सहानुभूति उत्पन्न होते. मात्र तिचा उपयोग व्हावयाचा तर प्रतिपक्षीयांकडून विरोध होईल तरच. पण या बाबी इतक्या क्षुद्र व निरुपद्रवी असतात की, त्यांना विरोध करणारा प्रतिपक्षी सहसा भेटत नाही.

'सर्व: सगंधेषु विश्वसति' हें कालिदासाचें वचन मोठें मार्मिक आहे. पण कोण कोणाशी 'सगंध' म्हणावा हें ठरविणें कठिण नाही. कारण सगंधता म्हणजे सारखेपणा. मग तो कोणत्याहि व्यापक अर्थानें वा संकुचित अर्थाने घेतल्यास त्याचें पर्यवसान विनोदांत होऊं शकतें. कारण लसूण खाणाऱ्या लोकांचें राष्ट्रीयत्व लसणीच्या घाणींत, दारू पिणाऱ्या लोकांचें राष्ट्रीयत्व दारूच्या दुर्गंधींत, अत्तर लावून हिंडण्याची संवय असणाऱ्या लोकांचें राष्ट्रीयत्व अत्तराच्या सुवासांत, असें म्हणावें लागेल !

समान गुणधर्मत्वाच्या इतरहि कांहीं गोष्टी अशाच आहेत कीं, त्यांतून राष्ट्रीयत्व सिद्ध करणें हास्यास्पद ठरेल. युरोपियन लोक व कांही

कोकणस्थ ब्राह्मण यांचे डोळे घारे असले म्हणून ते स्वतःचें एकराष्ट्रीयत्व मानीत नाहीत. किंबहुना एकमेकांना वैरी मानतात. शुभ्र गोऱ्या रंगाचे लोक जसे काश्मिरांत तसेच कांही मद्रासी वैष्णवांत सांपडतात; म्हणून ते कांही त्या कारणाने परस्परांना सराष्ट्रीय मानीत नाहीत. उलट काळा रंग सर्व हिंदुस्थानभर इतका सार्वत्रिक आहे कीं, त्यामुळे एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते असें मुळीच नाही. हीच गोष्ट केसांच्या रंगासंबंधाने समजावी.

आता शेवटी राज्याभिमानाच्या दृष्टीने राष्ट्रीयत्वाचा विचार करावयाचा उरला. हा अभिमान कोणत्याहि बाह्य खुणांनी दाखवितां येत नाही. कारण खरोखर ज्या देशांत राज्याभिमानावर राष्ट्रीयत्व आधारलेलें असतें, तेथें भिन्न वंशाचे, भिन्न भाषा बोलणारे, भिन्न धर्मीय, भिन्न चालीरीतींचे व भिन्न पोषाक–पेहरावाचे–तात्पर्य इतर कोणतीहि कितीहि भिन्नता असणारे लोक त्या राज्याच्या अभिमानाने एकराष्ट्रीय म्हणून उठलेले आढळतील.

मात्र अशा प्रकारचा राज्याभिमान उत्पन्न व्हावयाचा तर तें राज्यहि स्वतः स्वतंत्र असून इतर अंगांनीहि तसेंच गुणविशिष्ट पाहिजे. या गुणांत व्यक्तिस्वातंत्र्य, स्वयंनिर्णय, समानतेची वागवणूक, न्यायप्रतिष्ठा, आर्थिक समृद्धि, प्रगतीविषयी आशादायित्व, पराक्रमशीलता, आत्मरक्षणक्षमता इत्यादिकांचा समावेश होतो. आणि हे गुण नसतील तर लोकांचें लक्ष राज्याभिमानापेक्षा वर दर्शविलेल्या अितर गोष्टींच्या अभिमानाकडे खेचलें जाईल. उदाहरणार्थ, परतंत्र हिंदुस्थानांत आज राज्याभिमान धरावयाचा म्हणजे तो इंग्रज साम्राज्यशाहीचा धरावा लागेल ! पण तो कोण धरील? हिंदुस्थानांत आज राज्याभिमान बाळगण्यासारखी स्थितीच नाही. म्हणून हिंदी देशाभिमान हा खरोखरच हिंदभूमीचा अभिमान ठरतो.

ज्या मानाने हिंदुस्थानांत लोकशाही व राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित होईल त्या मानाने त्यांतील लोक वंश, धर्म, भाषा यांचा अभिमान सोडून देऊ लागतील. कारण इंग्रज व हिंदी हा भेद सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीं-

तला निघून गेला म्हणजे हिंदी या शब्दावर जोर देण्याचें कारण पडणार नाही. आज तुम्ही गर्विष्ठ इंग्रज म्हणून आम्ही अभिमानी हिंदी ! आज हिंदुस्थानांत धर्माभिमान प्रभावी दिसतो, पण ज्या प्रमाणांत सर्वस्वी न्याय-बुद्धीने निरनिराळ्या धर्मांच्या लोकांत राजकीय सत्ता विभागली जाईल, त्या मानाने धर्मांचा असा अभिमान कमी प्रकट होऊं लागेल. आज कांही भाषांचा रोख ( उर्दूचा ) सरकारी मदत घेऊन इतर भाषांवर आक्रमण करण्याचा दिसतो. त्या ऐवजीं, उद्या राष्ट्रीय सरकाराकडून कोणत्याहि भाषेला अशा अतिक्रमणास मदत मिळणार नाही असें निःपक्षपाती धोरण प्रकट होईल, अनुभवाला येईल, तेव्हा भाषावार प्रांतरचनेचाहि ह शिथिल पडेल. आज अल्पसंख्याकांना स्वार्थाकरिता आपल्या हातीं धरून बहुसंख्य समाजावर अतिक्रमण करण्यास सरकार फूस देत आहे, त्याऐवजीं अल्पसंख्य हो बहुसंख्य हो सर्वांना एकाच नियमाने एकाच मापाने न्याय-बुद्धीने वागविण्याचें धोरण प्रकट होईल, आणि लाडावलेल्या अल्पसंख्याकांना तुमचा अन्यायी हट्ट चालू देणार नाही अशी ताकीद सरकार देईल, त्यावेळीं राज्याचा अभिमान हाच सर्वश्रेष्ठ अभिमान असें लोकांना वाटू लागेल.

एक तज्ज्ञ म्हणतो की राजकीय भवितव्य म्हणूनहि कांही असतें. आणि तेंहि राष्ट्रीयत्वाचें अधिष्ठान होऊं शकतें.

Community of destiny naturally evolves a community of character, which becomes operative on the one hand through the natural inheritance of the characteristics acquired through the common destiny of the nation; and on the other, through the common transmission of the cultural values whose peculiar nature is determined by the nation's destiny.

नित्य सहवासाने भेदभाव भांडणें वाढू शकत नाहीतच असें नाही. परंतु तीं वाढण्याऐवजी समान भावनांचें एकीकरण होण्याचाच संभव अधिक. गांवांतल्या नागरिकांपेक्षा प्रवासाकरिता निघालेल्या आगबोटीवरील उतारूंमधील भांडणें कमी. आणि आगबोट फुटून जीवरक्षणाकरिता

'लाईफ बोट' मध्ये उतरलेल्या प्रवाश्यांत त्याहून भांडणें कमी. राष्ट्रीय राज्य व राजकीय राष्ट्रीयत्व ही समाजाची अंतिम परिणति ठरलेली असल्यामुळे, तें स्थापलें जाण्याचा संभव जसजसा अधिक उत्पन्न होत जातो तसतसा कुल, वंश, धर्म, भाषा इत्यादिकांविषयीचा पृथक् अभिमान कमी कमी होत जातो; व त्या जागीं संकीर्ण असा नवाच एक अभिमान उत्पन्न होतो.

इंग्लंड हें आपला ताबा हिंदुस्थानावरून काढून घेणार असें 'भवितव्य' पटल्याबरोबर या देशांतील अल्पसंख्य बहुसंख्य जुळेल तसें जुळवून घेण्याला खात्रीने पुढे सरसावतील.

असो. राष्ट्रीयत्वाच्या भावनेचें समर्थन कसें व कितपत करतां येतें तें पुढील लेखांत पाहूं.

---

## (लेखांक ४ था)

## युरोपांतील भाषाभिन्नता

आता पश्चिम दिशेकडे थोडें वळूं. या भागांत भाषांचें (प्रचलित राष्ट्रीय भाषांचें) वैचित्र्य किती आहे पाहा. सात टयुटॉनिक वंशाच्या- इंग्लिश, जर्मन, फ्लेमिश, डेन्स, डच, स्वीडिश, नॉर्वेजियन; सहा लॅटिन- वालून्स, पोर्तुगीज, रुमेनियन, इटालियन, फरेंच, स्पॅनिश; आठ स्लॅव्हिक- बल्गेरियन, स्लोव्हॅनीज, झेकोस्लाव्हॅक, पोलिश, रशियन, सर्ब, क्रोट, मिश्र (सर्ब-क्रोट); सात इंडोयुरोपीयन-ग्रीक, केल्ट, आर्मीनियन, अलबेनियन, लेट, लिथुॲनियन, पर्शियन-कुर्द. आठ मंगोलियनादि संमिश्र-आरब, कॉकेशियन, बास्क, बर्गर, फिनिश, एसथेनियन, मॅगिअर, खिरगीज, तुर्क, तारतार, सामोएडिज. बिचारे ज्यू लोक हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे, पण भाषेच्या दृष्टीनें ते लोक इतके मिळते घेणारे आहेत की, जेथे राहतात तेथली भाषा ते आपलीच मानतात.

युरोपांत भाषा इतक्या पुष्कळ असून शिवाय भाषेला महत्त्वहि इतकें देतात की बोलूं नये. फरेंच तत्त्ववेत्ता रूसो याच्या वेळेला युरोपांत राष्ट्रीय

दृष्टचा वंशाला, रक्तशुद्धीला महत्त्व देत. परंतु पुढें हर्डर, श्लेजेल, फिच इत्यादि तत्त्वज्ञांपासून वंशाचें महत्त्व जाऊन तें भाषेवर येऊन बसलें.

Schlegel suggested that the most appropriate principle for the definition of states was language, both as constituting the spiritual link between the members of a nation and offering proof of a common origin. Even greater emphasis on the factor of language was laid by Fitchte, who considered that wherever a separate language was found, there is also a separate Nation, which has a right to manage its affairs *independently* and to rule itself. ( मॅकार्टने पृ. ९९ )

महायुद्धानंतर स्वयंनिर्णयाचें जें तत्त्व पुढे आलें तें या भाषेवर अधिष्ठित होतें. आणि अगदी या तत्त्वाप्रमाणे राष्ट्रविभागणीची मागणी झाली व मान्य केली गेली तर एका युरोपांत ३६ राष्ट्रें व्हावयाचीं!

युरोपांतील या राष्ट्रीय खिचडीचें हें वर्णन देण्याचा हेतु हा की. हिंदुस्थानांत अनेक वंश व अनेक भाषा आहेत म्हणून तेथे लोकशाहीचें राज्य स्थापणें अशक्य आहे असा जो कांगावा करण्यांत येतो त्याचा खोटेपणा वाचकांच्या निदर्शनास यावा. युरोपांत ३६ भाषा चालतात म्हणून कांही तेथे ३६ निरनिराळीं राज्यें नाहीत. तेथे असें राज्य नाही की, ज्यांत एकाहून अधिक भाषा चालू नाहीत. एवढासा चिमुकला स्विट्झरलंड ना? त्यांत आज चार भाषा सुरू आहेत. आणि त्या पार्लमेन्टांतहि!

## मनुष्यमात्राची संचारप्रियता

एका राज्यांत देशांत अनेक भाषा एकत्र येण्याचें कारण हें की, जगातील कोणताहि वंश हजारो वर्षें एकाच स्थळसीमेंत राहिलेला आढळणार नाही. शिवाय स्थलांतर करतांना तो आपली विशिष्ट भाषा, संस्कृति व राष्ट्रीयभावना आपणाबरोबर नेतोच. यामुळे एकाच प्रदेशांत कालांतराने भिन्न राष्ट्रांची वस्ती एकत्र होते. पण राष्ट्रीयत्व भिन्न असलें तरी त्या सर्वांची समाजधारणा व्हावयाची, संरक्षण व्हावयाचें, प्रगति व्हावयाची,

तर त्या सर्वांचें मिळून एक राज्य बनावें लागतें. मग तें राजसत्तांकित असो, प्रजासत्तांकित असो, किंवा मिश्रसत्तांकित असो. अशा रीतीनें एकाच राज्यांत अनेक राष्ट्रांची खिचडी बनते. त्या खिचडींतले लोक शांत,सात्त्विक, सहिष्णु असले तर ठीक. नाही तर राष्ट्रीय भावनेमुळे कलह ठेवलेलाच.

मनुष्यमात्र हा जसा सहवासप्रिय आहे. तसा तो संचारप्रियहि आहे. तो संचार करतो तो बहुधा संघच्या संघ किंवा गटच्या गट मिळूनहि करतो; पण एकाच स्थानाला कायमचा चिकटून बसत नाही. मनुष्यामध्ये स्वस्थलाभिमान असतो, पण तो कालांतरानें इतर कारणांपुढे टिकत नाही. यामुळे जुनें ठिकाण सोडण्याला स्वाभाविक नाखुषी असली तरी, एखाद्या नव्या ठिकाणच्या आवडीमुळे किंवा आर्थिक गरजेमुळे तो स्थानत्याग करायला तयार होतो.

आम्ही आर्यन लोक एक वेळ ( टिळकांच्या मताप्रमाणे ) उत्तर ध्रुवाजवळ मूळचे होतो असें मानलें काय, किंवा मूळचे भरतभूमींत होतों ते उत्तर ध्रुवाकडे उठून गेलों असें ( नाना पावगी यांच्या मताप्रमाणे ) मानलें काय, दोहोतून आर्य समाजाची संचारप्रियता किंवा संचारशीलता किंवा संचारक्षमताच सिद्ध होते. एक जागा दुसरीहून अधिक हवाशीर, किंवा अधिक सुपीक, किंवा उद्योग-धंद्याला अधिक किफायतीची, किंवा आत्मरक्षणाला अधिक सोयीची-तात्पर्य या नाही तर त्या कारणाने मनुष्याचा जागचा पाय कालांतराने हलल्याशिवाय रहात नाही. यामुळे कालांतराने नव्या नव्या ठिकाणीं नव्या नव्या लोकांशी त्याचा सहवास घडतो.

## राष्ट्रीयत्वाच्या भावनेंतील स्थायीभाव

वरील सर्व विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेल कीं, राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा संबंध राज्य, वंश, धर्म, भाषा इत्यादिकांशी येत असला तरी राष्ट्रीयत्वाचें समीकरण म्हणून वरील पैकी कोणत्याहि एकाशीच आहे, किंवा कोणत्याहि एकाशी आहेच आहे असें म्हणतां येत नाही. अर्थात राष्ट्रीयत्वाची भावना प्रकट होणें हें इतर कोणत्या तरी उपाधीवर, म्हणजे प्रसंगावर किंवा निमित्त कारणावर, अवलंबून असतें म्हणून त्या गोष्टीचें थोडेंसें तात्त्विक विवेचन करतों.

हें विवेचन करतांना साहित्यशास्त्रांतील कांही एक प्रक्रिया किंवा परिभाषा उपयोगी पडण्यासारखी आहे. ती अशी. इतर नवरसांप्रमाणे राष्ट्रीयत्व हा एक रस आहे असेंहि म्हणतां येईल ! मग त्याचा स्थायीभाव काय ? आणि त्याला विभावभूत गोष्टी कोणत्या असू शकतात ? याचें उत्तर असें कीं, राष्ट्रीयत्व या रसाचा स्थायीभाव अभिमान. आणि राज्य, वंश, धर्म, भाषा, संस्कृति, चालीरीती, पोषाख–पेहराव इत्यादि त्या रसाचे विभाव म्हणजे आलंबनकारण असून विरोधजन्य क्षोभ हें त्याचें उद्दीपन-कारण असतें.

जोंपर्यंत अप्रतिबन्ध रीतीनें, किंवा सुखानें, आपणाला प्रिय वाटणाऱ्या गोष्टी मनुष्याला करतां येतात तोंपर्यंत तो त्या करीतच असतो. पण राष्ट्रीयत्वासंबंधानें 'रसोत्पत्ति' होण्याला भावनेचें जें केंद्रीकरण, जी तीव्रता लागते ती विरोध होईपर्यंत येत नाही.हें केंद्रीकरण विरोधामुळें किंवा आक्र-मणाच्या भीतीमुळे होतें. आणि दोन प्रकारच्या विजेचीं टोकें एकत्र आलीं म्हणजे ठिणगी पडते त्याप्रमाणे राष्ट्रीयत्वाला परक्यांकडून विरोध आणि त्यामुळे जागृत झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभिमान, यांची गांठ पडली म्हणजेच कलह सुरू होतो.

"इंधन चाळविलें गेलें म्हणजेच अग्नीची ज्वाळा उठते.विप्रतिकार झाला म्हणजेच सर्प फणा काढतो. तात्पर्य, केवळ विरोधजन्य क्षोभामुळे जीवमात्र हा आपलें महिमान (मोठेपणा) प्रतिपादूं लागतो. एरवी नाही" असें कालि-दासानें शाकुंतलांतील एका पात्राकडून वदविलें आहे तें अगदी यथार्थ आहे.

या न्यायानें एखाद्या समाजाच्या कोणत्या अंगाचा स्वाभिमान कोठे कसा जागृत किंवा प्रदीप्त होईल हें विशेष प्रसंगानेंच ठरतें. म्हणून त्याला नियम सांगतां येणार नाही. जी गोष्ट व्यक्तिमात्राची तीच समाजाची.

अहंकार, अभिमान या शब्दांना सामान्यतः वाईट अर्थ असतो. पण समर्थनीय म्हणजे चांगल्या प्रकारचा अहंकार, अभिमान असूं शकतो. कारण लौकिक जीवन किंवा संसार हा मुळांत अहंकारावर व आपपर भावावरच उभा आहे. आपपर भाव हा सर्वस्वी नष्ट होईल तर व्यवहार चालणार

नाही! शुद्ध शास्त्रीय अहंकार हें एक सृष्टितत्त्वच आहे. त्याच्या बीजावर वाढून तो वृक्षासारखा मोठा होतो.

समाजाची घटना व वाढ हीं या अहंकारापासूनच होतात. वेदांती भाषेने बोलावयाचें तर एकमेव ब्रह्माला अनेक होण्याचा खेळ करावासा वाटला तेव्हा त्याला नाम व रूप यांचा आश्रय करावा लागला. हा अनकेत्वाचा खेळ इतका साधला आहे की, जगांतील कोटचनुकोटि वस्तूंपैकी कोणतीहि एक वस्तु दुसरीसारखी तंतोतंत आढळत नाही. हा वेगळेपणा बीजभूत अहंकाराशिवाय साधणार नाही. रूपाचा वेगळेपणा राहण्याची खबरदारी स्वतः सृष्टीच घेते. पण नामाचा वेगळेपणा मनुष्याला आवडीप्रमाणे आपला आपण साधावा लागतो

## अहंकाराचीं पुटांपुटांवर पुटें

अहंकाराच्या बीजावर पुटांमागून पुटें चढून त्याचा वृक्ष बनतो याला समांतर अशीं दोन उदाहरणें देतों. पेपरमिंटाच्या लहानमोठ्या रंगीबेरंगी गोळ्या तुम्ही पाहिल्याच आहेत. त्या तोंडांत टाकून तुम्ही चघळूं लागला म्हणजे आंतून एक एक नव्या रंगाचें पुट किंवा कवच बाहेर निघतें. तोंडाच्या ओलाव्याने तें झिरपलें म्हणजे दुसरें निघतें. गोळी हळूहळू लहान होत जाते. आणि शवटीं साखरेचे सर्व कण नाहीसे होऊन आंतून बडीशेपेचा एक दाणा निघतो. व्यक्तिमात्राच्या भावनासंभाराच्या मुळाशी असणारा अहंकार हा या बडिशेपेच्या दाण्यासारखा आहे.

किंवा दुसरें उदाहरण. समुद्रांत मोतीं कसें बनतें हें सर्वांना माहितच आहे. मुळांत एखादा रेतीचा बारीक कण असतो. तो लिबलिबीत अशा कालव नामक प्राण्याच्या शरीरांत शिरतो. त्याचें रुतणें खुपणें टळावें म्हणून तें कालव त्या कणाच्याभोंवती आत्मरसाचे थरावर थर चढवितें. या थरांना सुंदर जिल्हई व तेज असतें आणि ते सर्व मिळून मोतीं होतें. त्या मोत्याच्या उदरांतल्या कणासारखाच मानवी अहंकार हा होय. तो कण कणखर असतो; पण तो सुख होण्याइतकाच खुपावा याकरिता मनुष्यमात्र त्यावर, व्यक्तीपासून समाज व राष्ट्र यापर्यंत, वाढत्या क्रमाने अभिमानाचीं पुटें किंवा थर चढवितो, आणि या थरांतूनच संसाराचा डोलारा उभारला जातो.

व्यक्तीपासून जगापर्यंतहि अभिमान धरण्यासारख्या पदार्थांच्या पायऱ्यांनी निर्माण झालेली अशी एक शिडी असते. पण यांपैकी कोणत्या पायरीवर चढून बसणें योग्य हें मनुष्य एकदाच व कायमचें ठरवीत नाही. अगदी कनिष्ठ म्हणजे केवळ व्यक्तिस्वार्थाच्या पायरीवर उभा राहणारा मनुष्य लोकदृष्ट्या हीन ठरतो. आणि स्वतः त्यालाहि तेथे सुख वाटत नाही. उलट सर्वांत श्रेष्ठ आणि बहुमानास्पद म्हणून बाकी सर्व टाकून तो एकदम जगाच्या पायरीवर अभिमानाचा पाय टेकून बसू म्हणेल, तर तो व्यवहाराला अपात्र ठरेल आणि तेथे डोळे फिरून तो खाली केव्हा कोसळेल हें सांगतां येणार नाही.

समजा, आपल्या हातीं साखरेचा एक खडा आहे. तर तो आपलपोटे-पणाने आपणच खाऊन टाकणारा मनुष्य अधम खरा. उलट तो खडा खडक-वासल्याच्या तळ्यांत टाकून पुण्यांतल्या सर्व लोकांना त्याच्या गोडीचा लाभ देऊं असें म्हणणारा मनुष्य निःस्वार्थी असला तरी मूर्खच ठरेल. पण तोच खडा आपण एखाद्या लहान गरीब बालकाला दिला तर आपल्या निःस्वार्थी-पणाच्या आनंदाबरोबर निदान एक तोंड तरी गोड व आनंदी झाल्याचें पाहण्याचें प्रत्यक्ष सुख आपल्याला लाभेल. लोकाला दिला तरी खडा माझाच होता व चांगला होता हा अभिमान!

## अहंकार दूषणास्पद नसावा

मनुष्याने अहंकार, अभिमान, धरावा व गाजवावा पण तो तीन अटी सभाळून. एक अट ही की, हा अभिमान ज्याविषयी ( वंश, धर्म, भाषा इ. ) बाळगावयाचा त्याच्या फक्त गुणासंबंधी तो बाळगावा. दुसरी अट ही की, तो आक्रमणाच्या पराक्रमाकरितां न गाजविता फक्त आत्मरक्षणापुरता गाजवावा. आणि तिसरी अट ही की, तो अभिमान गाजवितांना स्वार्थी-पलीकडे जाऊन कांही तरी परार्थ (म्हणजे व्यापक अर्थ, हित,) साधणें हा-हेतु असावा. वरील अटी संभाळून गाजविलेला अभिमान दूषणास्पद ठरत नाही.

याविषयी लवकर समजण्यासारखें म्हणून, आज महाराष्ट्रांत जात्यभि-मानाने होणाऱ्या अनेक संघटनांचेंच उदाहरण देतां येईल. तें असें. हल्लीं

महाराष्ट्रांतील प्रत्येक धर्म, पंथ, जात, पोटजात आपल्या संघटनेच्या प्रयत्नांत सभा, मंडळें, संस्था निर्माण करीत आहे, व त्यांचें कार्य वर्गण्या देणग्या यांच्या बळावर चालवीत आहे. यावर प्रश्न असा की, ही परोपकारी बुद्धि अशा जात्यभिमानानें दूषित करणें हें चांगलें काय ? याचें उत्तर 'नाही' असें सकृद्दर्शनीं सुचतें. पण मनुष्यस्वभाव लक्षांत घेता त्याला फार नांवें ठेवूनहि चालणार नाही.

विचार असा करावा की, उदार व्यापक बुद्धि ठेवणें हें चांगलें; पण मनुष्य करतो त्याहून मोठ्या कार्यावर खर्च करण्याची बुद्धीच त्याला ईश्वरानें दिली नसेल तर त्यानें लहान स्वरूपाचें केलें हेंच चांगलें म्हणून पदरांत पाडून घेतलें पाहिजे. चोराच्या हातची लंगोटी म्हणतात तोच न्याय येथें लावावा. जो आपलें धन केवळ आपल्या कारणींच खर्च करतो त्याला हिंदुनीतिशास्त्रांत ' चोर ' असें म्हटलेंच आहे. तेव्हा अशा चोराच्या हातून जातिनिष्ठेमुळें कां होईना, जो परोपकार घडला ती या चोराच्या हातून वांचविलेली लंगोटीच की नाही ? त्या लंगोटीनें, म्हणजे त्या मर्यादित बुद्धीच्या अशाहि परोपकारानें, एक प्रकारें नागडा स्वार्थ झाकला जातो, माणुसकीची लाज राखली जाते, असें म्हणून समाधान मानतां येतें.

## क्षेत्रमर्यादा आंखून घेणें सोयीस्कर

नीतीची दृष्टि सोडून उपयोगाची दृष्टि घेतली तरी मर्यादित क्षेत्र हें अमर्यादित क्षेत्रापेक्षा अधिक बरें असें सिद्ध करतां येईल. शेतकऱ्याजवळ सलग अशी पुष्कळ जमीन असली तर त्या सर्वाला कुंपण घालणें त्याला शक्य होत नाही. म्हणून त्यांतलीच एखादी सोयीची अशी लहानशी जागा पाहून, पसंत करून, तो तिच्यापुरतें कुंपण घालतो व तींत भाजीपाला फळफळावळ पिकवितो. कुंपण लहान जागेला घातलें हा बाकीच्या जागेला अन्याय झाला असें तात्त्विक दृष्टीनें हवें तर म्हणावें.पण कुंपण लहान घातलें तरच तें चांगलें घालतां येतें. आणि तें चांगलें घालतां आलें तरच आंतील पिकांचें, भाज्यांचें, फळांचें संरक्षण त्याला करतां येतें. तेव्हा तें योग्यच झालें असें म्हणतां येईल. आपल्या कार्याला कोणीहि आपल्या आवडीप्रमाणें, साधनसामग्रीप्रमाणें मर्यादा आंखून घेणें हीच सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट असते.

याच दृष्टीने आपण खोलीला बाहेरून कुलूप लावून फिरून आंतल्या कपाटांत पेटींत मौल्यवान कागदपत्र व ठेवणीच्या जिनसा ठेवतों. याच तारतम्याने घर बांधतांना त्यांत खोल्या काढतों. घराबाहेर कंपाउंडची उंच भिंत घालतों. तसेंच एखाद्या कारखान्यांत खातेवार व्यक्तिवार कामें वाटून दिल्यानें मर्यादा घातल्यासारखें होतें, पण त्या मर्यादेमुळेच कोणाचें काम नक्की कोणतें व किती हें ठरून तें नीट केलें जातें व मापतां येतें. स्थावर मिळकतीला चतुःसीमा घातल्याशिवाय म्हणजे तिच्या मर्यादा आंखल्याशिवाय तिच्या व्यवहाराचा कागद रजिस्ट्रार नोंदीतच नाही !

## जातिभेदाने कार्याच्या क्षेत्रमर्यादा ठरतात

हिंदुस्थानांत जातिभेदाने एक प्रकारें राष्ट्रीयत्वाच्या प्राथमिक मर्यादा ठरविल्यासारखें झालें आहे. जगांतील इतर समाजांत अशा प्रकारचा जातिभेद नसला तरी, ते समाज इतर दृष्टींनी आपापला वेगळेपणा मानतात, राखतात आणि अभिमान गाजवितातच ! एका इंग्लंडांत इंग्रज, स्कॉच, वेल्श, आयरिश अशा जातींचें मिश्रण हवें तितकें झालें आहे. तसेंच युरोपांतील इतर वंशीयांशी या चौघांचेहि लग्नव्यवहार होतात. तथापि बाप, आजा, पणजा या क्रमाने म्हणजे पितृवंश परंपरेने ठरणारें राष्ट्रीयत्व हेंच आपलें असें ते अभिमानाने सांगतील.

मात्र विषय असेल त्याप्रमाणे हा अभिमान, पुराणांतील मनूने वाचविलेल्या ताम्हणांतील माशाप्रमाणें,लहानांत लहान व मोठ्यांत मोठी व्याप्ति घेऊं शकतो. याचीं दोन टोकांचीं दोन उदाहरणें देतों. वाईमध्ये दिवाळींत नदीच्या घाटावर चरकी बाणांचीं युद्धें होतात.त्यांत एका आळीचे लोक दुसऱ्या आळीशी लढतात, ते आळीच्या नांवाने. अमुक आळी तमुक आळीपेक्षा अधिक कुशल किंवा शूर ठरली एवढाच अभिमान. हा अभिमान दुसरे दिवशीं सकाळीं टिकणार नाही. आणि दुसरे दिवशीं आट्यापाट्यांचे सामने निघाले तर या दोहों आळींचे खेळाडू मिळन वाईची ' टीम ' या अभिमानाने पुण्याच्या ' टीम ' शी सामना देतील.

दुसऱ्या टोकाचें उदाहरण घडलें तें जपानने रशियाशी युद्ध करून विजय मिळविला तेव्हा! या युद्धाने आशिया विरुद्ध युरोप असा लढा रंगला! आणि त्या जपानी विजयश्रीच्या लाभांत आम्हीहि सामील आहों (कारण हिंदुस्थान व जपान हीं एकाच आशिया खंडांत आहेत) असें हिंदुस्थानचे लोक अभिमानाने म्हणूं लागले ! मला वाटतें त्यावेळीं अशा अर्थाचे अग्रलेख केसरींत आले होते. 'आशिया विरुद्ध युरोप' या वादाच्याहि पुढे जाऊन पूर्व विरुद्ध पश्चिम असा वादहि रंगवितां येतो. 'पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम' हें रुडियार्ड किपलिंगचें वाक्य पाश्चात्यांच्या अभिमानाने व पौर्वात्यांच्या विषयीच्या क्षुद्रता-भावनेनेंच निघालें. 'गोरे विरुद्ध काळे' हा राष्ट्रीय भावनेचा लढा याच अर्थाने सुरू आहे. पण येवढेच काय, उद्या मंगळाच्या ताऱ्यावर मनुष्यवस्ती आढळली तर आम्ही पृथ्वीनिवासी लोक पृथ्वी हें एक राष्ट्र मानून मंगळ-निवासी लोकांशी भांडूं लागूं, आणि सूर्यग्रहमाला ही आकाश–गंगेशी 'राष्ट्रीय' अभिमानाने भांडू लागेल !

## उद्दीपनकारणाची मीमांसा

आता थोडें सांगावयाचें उरलें तें राष्ट्रीयत्वाचा 'रस' रंगण्याला क्षोभ हें 'उद्दीपनकारण' म्हणून पूर्वी म्हटले त्याविषयी. हा क्षोभ दोन कारणांनी उत्पन्न होतो. आपण आपल्या राष्ट्रीयत्वाचा दिमाख मिरविण्याकरिता दुसऱ्याला नाक खाजवितों हें एक कारण; किंवा आपण आपले राष्ट्रीय आचार दुसऱ्याला उपद्रव न करता आचरीत असता, तो दुसरा आम्हाला दुष्ट बुद्धीने विरोध करतो हें दुसरें कारण. या दुसऱ्या ठिकाणीं अभिमान हा विरोधाला केवळ प्रतियोगी ठरतो. विरोध संपला कीं अभिमानहि संपला! यामुळे राष्ट्रीयत्वाची भूमिका ही कालदृष्ट्या तात्पुरती,स्थानदृष्ट्या चंचल, आणि व्याप्तिदृष्ट्या अनिश्चित अशी ठरते!

असो. प्रत्येक राष्ट्रीय समाजागणिक स्वतंत्र व त्यापुरतीं स्वयंपूर्ण अशीं राज्यें जगांत निर्माण होऊं शकलीं व टिकू शकलीं तर अल्पसंख्य व बहुसंख्य अशा प्रकारचें भांडण ऐकावयासहि मिळणार नाही. पण एका राज्यांत अनेक भिन्न राष्ट्रीयांची वस्ती असा प्रसंग आला म्हणजे हें भांडण हटकून उत्पन्न होतें. या दृष्टीने या विसंवादी घटनेचें पर्यवसान किती निरनिराळ्या रीतींनी होऊ शकेल याचा विचार पुढील लेखांत करूं.

## ( लेखांक ५ वा)

## अल्पसंख्याकांचें काय करावयाचें

मग हा राष्ट्रीय राजकारणाचा प्रश्न सोडवावयाचा कसा? याचें उत्तर असें की, एकाच राज्यांत निरनिराळ्या राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांची खिचडी झाली तर मुख्यतः तो प्रश्न पांच मार्गांनी सोडवितां येईल.

पहिला मार्ग जुलूमजबरदस्ती करून, अल्पसंख्य राष्ट्रीयांचीं हाडें मोडून, बहुसंख्य राज्यकर्त्यांनी त्यांना आत्मसात् करावयाचें. किंवा हें शक्य नसेल तर अल्पसंख्याकांचा सरसकट संहार करून त्यांना नामशेष करावयाचें

दुसरा मार्ग हा की अल्पसंख्याकांना सुखाने जेथल्या तेथे राहूं द्याव-याचें, पण राजकीय राज्याच्या सरहद्दी अशा बनवावयाच्या की, एका राज्याच्या मर्यादेंत स्थलसीमेंत एकच राष्ट्र (उ. एकच भाषा बोलणारे लोक) सामावूं शकेल.

तिसरा मार्ग असा की, राज्याच्या सरहद्दी आहेत तशाच ठेवावयाच्या पण राज्यांतल्या अल्पसंख्याकांची देवघेव ( अदलाबदल ) परराज्याशी करावयाची. बहुजिनसीपणा मोडून एकजिनसीपणा प्रस्थापित करावयाचा.

चवथा मार्ग असा की अल्पसंख्याकांचा संहार करावयाचा नाही, किंवा अदलाबदलहि करावयाची नाही, पण त्यांना आपल्या राज्यांतून जा असें म्हणून घालवून द्यावयाचें.

आणि शेवटचा पांचवा मार्ग असा की, अल्पसंख्य व बहुसंख्य हे सुखाने एकत्र एकाच राज्याचा अभिमान धरून नांदतील, अशी लोकशाही राज्याची व्यवस्था करावयाची.

या पांच मार्गांपैकी उत्तम मार्ग कोणचा हें वाचकांना सांगावयासच नको. कोणीहि वाचक म्हणेल कीं, पांचवा मार्ग हाच सर्वांत श्रेयस्कर होय. कारण इतर चोहोंपैकी कोणत्याहि मार्गाने राज्यांतली प्रजा एकजिनसी एक-

राष्ट्रीय करण्याचा प्रयत्न केला तरी तो टिकाऊ नसतो. तो टिकला तर फार थोडा काळ टिकतो. पण लगेच प्रजा विविध म्हणजे बहुजिनसी होऊं लागते.

## दळणवळण बंद होणार नाही

याचें कारण जगभर दळणवळणाचे मार्ग व साधनें बेसुमार वाढलीं आहेत. राष्ट्रें मित्र असोत वा शत्रु असोत, समुद्रमार्ग हा सर्वांचाच मार्ग. आगगाडीच्या रस्त्यांचीं तोंडें एकत्र मिळालेलीं असतात. आणि साध्या पाय-रस्त्याचे मार्ग तर असंख्यच ! सरहद्दी हा शब्द आपण वापरतों खरा; आणि लांबी लांबीवर दगड पुरून त्या हद्दी दर्शविल्या जातात हें खरें. पण ही गोष्ट नकाशांतल्या नकाशांत राहते. हम रहदारीच्या मुख्य रस्त्यावर एखाद्या ठिकाणीं कांटेरी तारेचें फाटक लावून संत्री उभे करून आंत बाहेर येणेंजाणें बंद करतां येईल. पण जेथे शेंकडो मैलपर्यंत जमिनीला जमीन लागलेली तेथे मनुष्यसंचार कोण कसा थांबविणार ? डोंगर चढून जातां येतात, नद्या उतरून पोहून जातां येतात, जंगलांअरण्यांतून वाट काढून बाहेर पडतां येतें. अशा स्थितींत फाटकें कोठे किती लावाल ? तारा किती गुडाळाल ? संत्री किती उभे कराल ?

बरें, जगांत व्यापारी बुद्धि इतकी वाढली आहे कीं, दळणवळणाचे मार्ग कमी किंवा बं करण्याऐवजी नवे बांधणें, खुले करणें ही प्रवृत्ति प्रभावी झाल्याशिवाय रहात नाही. कारण प्रतिबंधाला कारण वर्षांतून एकदां निघेल तर स्वैरसंचाराला उत्तेजन देण्याचें कारण वर्षांतून ३६४ दिवस !

पण संचारामुळे सहवास वाढला, आणि सहवासामुळे इतर व्यवहार वाढला, तरी राष्ट्रीयत्वाची बुद्धि त्याप्रमाणे कमी झाली नाही ! गिरणींत कापड काढण्याचा मार्ग तोच. पण त्यावर निघणाऱ्या कापडाचे रंग, वाण, 'डिझाईन' यांत वैचित्र्य आणावें लागतें, तेंच समाजजीवनांत अभिरुचीने आपोआप येतें.

असो; तर आता वर दर्शविलेल्या मार्गांपैकीं आधी पहिल्या चारांचें थोडें थोडें विवेचन करून, मग अल्पसंख्य बहुसंख्य विविध राष्ट्रें एकत्र सुखाने नांदण्याचा मार्ग कोणता याचें थोडें विवेचन करूं.

## राज्याच्या सरहद्दी बदलतात

प्रथम सरहद्दी बदलून एकजिनसी राष्ट्राचें राज्य करण्याची कल्पना घेऊं. कोणतेंहि राज्य घेतलें तरी त्याच्या हद्दी व मर्यादा शेंकडो वर्षे कायम टिकलेल्या नाहीत. स्वतः त्या राजाला आपला मुलूख वाढवावासा वाटला म्हणून त्याने दुसऱ्याच्या मुलुखावर अतिक्रमण केलें किंवा अगदी याच्या उलट घडलें तरी मुलुखाची व्याप्ति बदलणार व त्यामुळे सरहद्दी बदलणार. गेल्या महायुद्धापूर्वी असलेल्या युरोपियन राष्ट्रांच्या सरहद्दी १९१९ च्या तहाने पार बदलल्या गेल्या. आणि आता पुन्हां त्या तहाच्या हद्दी प्रस्थापित करण्याकरिता हें नवें युद्ध निर्माण झालें आहे म्हणे ! कारण युद्धापूर्वीच जर्मनीने, रशियाने, पोलंडने, इटालीने आपापल्या हद्दी थोडथोड्या बदलून घेतल्या होत्या.

या राष्ट्रांनी आपल्या हाताने हद्दी बदलून घेणें हा आंतरराष्ट्रीय गुन्हा केला असें म्हणण्याची रीत किंवा फॅशन आहे ! परंतु १९१९ सालीं महायुद्धांत यश मिळाल्याची धुंदी चढून इंग्लंड व फ्रान्स यांनी तरी काय केलें ? वाटेल तसा आपला हात उगवून घेतला. आणि एका राष्ट्राला स्वयंनिर्णय देण्याचा बहाणा करून दुसऱ्या राष्ट्राला अन्याय केला. या अन्यायाचा मनांतला हेतु असा होता की, स्वयंनिर्णयाच्या नांवावर पण युद्धाच्या दृष्टीने फ्रान्स, इंग्लंड, व त्यांचे साथीदार सुरक्षित रहातील अशा मध्य युरोपांतील राष्ट्रमर्यादा ठरवाव्या.

## अधिक सुरक्षितता कशास ?

एक ग्रंथकार म्हणतो, 'The security of one state means the insecurity of another state. And once the absurd warmentality of 1919 has been dissipated, and the equality of all states is once more recognised, no possible ground seems to exist for saying that the Victor States need security more than the Vanquished; the more particularly as the latter are generally smaller and weaker from the military point of view.'

याचा अर्थ–एका राष्ट्राला सुरक्षितता मिळवून द्यावयाची म्हणजे तत्संबंधी इतर राष्ट्रांची सुरक्षितता कमी करावयाची. १९१९ ची युद्धाची खुमखुम बाळगणारी मूर्खपणाची मनोवृत्ति नष्ट झाली आणि सर्वच राष्ट्रें पुन्हा एकवार समानतेच्या भूमिकेवर येऊन बसलीं म्हणजे मग जित राष्ट्रांपेक्षा विजयी राष्ट्रांना सुरक्षितता अधिक पाहिजे हें म्हणणें उरतेंच कोठे ? कारण जित राष्ट्रें हींच लष्करी दृष्ट्या त्यांतल्या त्यांत अधिक दुर्बळ व अधिक लहान असावयाचीं !

तात्पर्य, हद्दी बदलून घेण्याच्या अनवस्थेंत १९१४ चें युद्ध पर्यवसान पावलें. आणि ती अनवस्था पुढे चालू राहण्याकरिता हल्लीचें युद्ध सुरू झालें आहे. पण अशाने युद्धें कधीच संपणार नाहीत.

## अल्पसंख्याकांची देवघेव

आता दुसऱ्या एका म्हणजे सरहद्दी दुरुस्त करतां येत नाहीत म्हणून अल्पसंख्य राष्ट्रीयांची देवघेव व अदलाबदल करण्याच्या मार्गाच्या उपायाचा विचार करू. या देवघेवीने झालें तरी कार्य साधतेंच असें नाही. पण त्या मार्गाचा उपाय अवलंबिला गेल्याचीं उदाहरणें मात्र सांपडतात व तीं आश्चर्यकारक वाटतात.

जुन्या काळीं समाज हे फारसे स्थिरपद नसत, यामुळें भीति उत्पन्न होताच अल्पसंख्य किंवा परकीय लोक स्वतःच देशत्याग करून जुलूम किंवा संहार टाळीत, किंवा राज्यकर्त्यांनाहि निर्दयपणें परकी लोकांना हद्दपार करण्याचें वाईट वाटत नसे. आधुनिक युगांत समाज स्थिरपद झाले आहेत. तथापि हीं हद्दपारीचीं उदाहरणें घडत नाहींत असें नाही. बहुसंख्याकांचें राष्ट्रीयत्व स्वीकारून देशांत राहा अशी सवलत देण्यांत येते; पण ही गैरसोयीची स्वाभिमानघातक सवलत न स्वीकारणारीं व आपखुषीनें देशत्याग पत्करणारीं अशींहि कांही राष्ट्रें निघतातच.

पूर्वी बाल्कन राष्ट्रांचा त्रास फार होऊं लागला, तेव्हा तुर्कस्तान सरकारने कित्येक वेळी ख्रिस्ती लोकांच्या कत्तली केल्या. शांततेने बाल्कन लोक सोडून जातील अशा खटपटीहि कित्येक वेळा केल्या. पण दोन्ही

मिळून १८७८ ते १९१२ या अवधींत दोन लाख बल्गेरियन लोक तुर्कस्तानांतून उठून बल्गेरियांत म्हणजे स्वदेशात गेले. फिरून १९१२ ते १९१४ या दोनच वर्षांत आणखी दोन लाख लोक गेले. याच्या उलट १९१२ मध्ये एक लाख तुर्क लोक बाल्कन प्रांत सोडून तुर्कस्तानांत गेले, १९१३ सालीं ग्रीकांच्या स्वारीमुळे १५ हजार बल्गेरियनांनी देशत्याग केला. उलट १० हजार ग्रीक लोकांनी सर्व्हिया व बल्गेरिया यांचा त्याग केला. ७० हजार ग्रीक थ्रेस-मधून निघून गेले. ४८ हजार मुसलमान पश्चिम थ्रेसमधून व ४६ हजार बल्गर पूर्व–थ्रेसमधून गेले. १९१४ सालीं तुर्कस्तानमधून २ लक्ष ६५ हजार ग्रीक लोकांना घालवून देण्यांत आलें, व ग्रीसमधून १ लक्ष १५ हजार मुसलमान तुर्कस्तानांत निघून गेले.

१९१५ पासून पुढच्या काळांत सुमारें १६ लक्ष आर्मेनियन कत्तल झाल्याने किंवा हद्दपारीने तुर्कस्तानांतून कमी झाले. तद्नंतर वरील लोकां-पकी कांही कांही परत आले. पण पुष्कळसे एकदा बाहेर पडले ते पडलेच. १९१४–१५ सालीं तरुण तुर्कांनी ख्रिस्ती आर्मेनियन लोक घालवून देऊन स्वदेशांत एकजिनसी तुर्क, निदान मुसलमान लोकच राहावे असा प्रचंड प्रयत्न केला. तद्नंतर ग्रीक व बल्गेरिया या राष्ट्रांनी आपखुषीने आपापल्या राष्ट्रीयांची कांही प्रमाणांत देवघेव केली. तशी ग्रीस व तुर्कस्तान यांत मात्र होऊ शकली नाही.

## देवघेवीचा प्रयोग अयशस्वी झाला

इतक्या प्रचंड प्रमाणांत देवघेव किंवा देशत्याग करण्यांत आल्यावर लोकांचें नुकसान किती झालें असेल याची सहजच कल्पना करितां येते. महायुद्धानंतर सर्व स्थिरस्थावर झाल्यावर युरोपांत या नुकसानभरपाईच्या विचाराकरिता एक आंतरराष्ट्रीय कमिशनही बसलें होतें. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. प्रत्येक राष्ट्राला स्वकीय लोकांची प्राणप्रतिष्ठा करण्याला फार खर्च आला. पण तितक्यानेही त्या लोकांचें सर्व नुकसान भरून आलें नाही. आणि शेवटीं विचारवंतांना असा शेरा मारणें भाग पडलें की, "Such experience as we possess of the exchange of population, as a means of solving the minority problem,

is not calculated to encourage a repetition of the experiment." हा राष्ट्रीय लोकसंख्येच्या देवघेवीचा प्रयोग अयशस्वी झाला, म्हणून तो फिरून करण्याच्या भानगडींत कोणतेंहि सरकार पडण्याचा संभव नाही.

If conditions are settled and the relations between minorities and majorities are happy, exchange is unnecessary, and an appeal for a voluntary exchange would meet with no result. A compulsory exchange, against the wills of the individuals concerned, is admittedly a barbarous act. But experience has shown that a voluntary exchange simply does not take place except under conditions which amount in reality to compulsion.

## आपखुषीचा देशत्याग खरा तसा नसतो

एकाच राज्यांत राहण्याचा योग आलेले अल्पसंख्य व बहुसंख्य परस्परांशी न्यायबुद्धीने व गोडीगुलाबीने वागतील, तर वर दर्शविल्याप्रमाणे लोकसंख्येची देवघेव करण्याचें कारणच पडणार नाही. पण जुलूम जबरदस्तीनें लोकांना अराष्ट्रीय ठरवून हद्दपार करणें यांत माणुसकी काय राहिली ? आणि प्रत्येक राज्य असें करूं लागलें तर हें थांबावयाचें तरी केव्हा? किंवा हें गाडें चालू लागलें म्हणजे जावयाचें कोठवर? लोक आपण होऊन जाणें हा तिसरा प्रकार उरला. पण ही गोष्ट सुखासुखी कोण करील? दिसण्यांत आपखुषीचा देशत्याग दिसतो तो तसा खरा नसतो. कारण आपण होऊन उठून जाणारा मनुष्य खरोखर आंतून होणाऱ्या छळाला कंटाळलेला असतो म्हणूनच निघून जातो.

युरोपांतील बहुधा प्रत्येक राज्याने युद्धापूर्वी हा छळाचा प्रकार चालविला होता. म्हणून गेल्या महायुद्धाच्या वेळीं सन १९१७ च्या जानेवारींत अमेरिकन प्रेसिडेंट विल्सन यानें असें जाहीर केलें कीं, 'Security of life, worship, industrial and social development should henceforward be guaranteed to all peoples, living hitherto

under Governments devoted to a faith and purpose hostile to their own.

पूर्वी मित्र-राष्ट्रांनीं जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारतांना लहानसान राष्ट्रांना फक्त स्वयंनिर्णयाचा अधिकार देणें एवढाच युद्ध हेतु म्हणून प्रथम जाहीर केला होता. पण स्वयंनिर्णयाचा हक्क बजावून राष्ट्रांची पुनर्घटना झाली, तरी स्वयंनिर्णयाने स्वीकृत अशाहि राज्यांत पुढे बहुसंख्याकांकडून जुलूम होण्याचा संभव शिल्लक उरतोच. म्हणून या नव्या विस्तृत हेतूची घोषणा झाली. वास्तविक हा युद्धाचा हेतु म्हणतां येणार नाही, तर तें भावी तहाच्या धोरणाचें दिग्दर्शन होतें. पण त्यामुळे लहानसान राष्ट्रांना पुष्कळच आश्वासन मिळालें.

## अल्पसंख्याकांना नीट वागविण्याविषयी ताकीद

त्याप्रमाणें १९१९ जानेवारी ता. १०च्या प्रेसिडेंट विल्सनच्या मसुद्यांत खालील कलम घातलें गेलें.

" The League of Nations shall require all new States to bind themselves, as a condition precedent to their recognition as independent and autonomous States, to accord to all racial or national minorities, within their several jurisdictions, exactly the same treatment and security, both in law and fact, that is accorded to the racial and national majority of their people. "

याचा अर्थ–" राष्ट्रसंघाने अशी सक्तीच करावी की तहाने जीं नवीं राष्ट्रें निर्माण करण्यांत येतील त्यांचा स्वतत्र स्वयंपूर्ण राष्ट्राधिकार मान्य करण्यांत येण्यापूर्वी त्यांनी एक अट मान्य करून स्वतःला बांधून घेतलें पाहिजे. ती अट ही की त्यांच्या राज्यांत जे कोणी वंशाभिमानी किंवा राष्ट्रीय वृत्तीचे अल्पसंख्य लोक असतील त्यांना, त्याच प्रकारच्या बहुसंख्यांना असतील तेच हक्क, कायद्यानें व प्रत्यक्ष व्यवहारांत देण्यांत येतील. म्हणजे अल्पसंख्य व बहुसंख्य यांना पूर्ण समानतेनें वागविण्यांत येईल. "

## (लेखांक ६ वा)

## राष्ट्रसंघाची उपाययोजना

राष्ट्रीय भावनांचा लढा किंवा प्रश्न सोडविण्याच्या निरनिराळ्या उपायांचें विवेचन मागील लेखांत केलें. त्यावरून हें दिसून आलें असेल कीं, सरहद्दींची अदलाबदल, छळ, जुलूम, जबरदस्ती, देशत्याग हद्दपारी हे उपाय अप्रिय व त्रासदायक आहेतच. पण शिवाय ते टिकाऊहि नाहीत. तर दैवयोगाने एकत्र आलेल्या लोकांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहण्याच्या निश्चयानें सलोख्याने वागणें हाच उपाय सुपरिणामी, सुखदायक व टिकाऊ आहे. लोकशाही नांदावयाची तर ती याच योजनेने नांदू शकेल.

युरोपांतील राष्ट्रीय भावनांचें युद्ध व तन्निवारणार्थ आजपर्यंत झालेले प्रयत्न, यांचें पूर्ण व सूक्ष्म अवलोकन करून तिकडील तज्ज्ञांनीहि हाच निर्णय दिलेला आहे. जोसेफ मेलार ( झेकोस्लोव्हॅक ) नांवाचा ग्रंथकार आपल्या 'नॅशनल मायनॉरिटीज इन सेंट्रल युरोप' या पुस्तकांत शेवटीं म्हणतो--

The investigation and comparison of the treatment of minorities in central Europe shows very objectively that, for that area, so varied ethno-graphically, there is one but one danger. The nationalist and imperialist tendency, which asserts itself in a ruthless policy with regard to weak minorities on the one hand, and in the exploitation of minorities in the realisation of aggresive plans, on the other hand. And the sole method of obviating this danger is the method of democracy-that is the mutual respect and collaboration of all the central European nations and states, and an *equitable nationality policy* and *loyalty* between majority and minority nations

याचा तात्पर्यार्थ असा-'अल्पसंख्य व बहुसंख्य यांच्या भांडणांत लोकशाही रसातळाला जाते आणि राजकीय झोटिंगशाहीचें आणि साम्राज्यशाहीचें चांगलेंच फावतें. म्हणजे तें असें. स्वतःच्या राज्यांतल्या दुर्बळ अल्पसंख्याकांवर (उदाहरणार्थ जर्मनींतले ज्यू) जुलूम तरी होतो. किंवा ज्या

झोटिंगशहाला शेजारच्या राज्यावर अतिक्रमण करण्याची बुद्धि होईल त्याला त्या राज्यांतल्या स्वकीयांवर (उदाहरणार्थ झेकोस्लोव्हॅकियांतले व पोलंडांतले जर्मन) होणाऱ्या न होणाऱ्या खऱ्या खोटया जुलमांचा उगीच नसता गवगवा करायला सांपडतो आणि या गवगव्यावर पराक्रमणाचें कारस्थान उभारलें जातें. या दोहोंवरहि उत्तम उपाय म्हटला म्हणजे मध्ययुरोपांतील सर्व राज्याधिकाऱ्यांनी एकत्र बसून सहकारितेने हा प्रश्न सोडवून आपलें स्वातंत्र्य आणि लोकशाहीची प्रतिष्ठा हीं रक्षिलीं पाहिजेत. त्यांनी हा विचार केला पाहिजे की, स्वार्थी अल्पसंख्य किंवा स्वार्थी बहुसंख्य कांहीहि म्हणोत, न्यायाची म्हणून दृष्टि कांही वेगळीच असते, तिचाच सल्ला ऐकला पाहिजे. तसेंच अल्पसंख्य नि बहुसंख्य यांनीहि सदासर्वदा भांडणाची उठावणी न करतां ही न्यायाची दृष्टि ठेवून आपणाप्रमाणें दुसऱ्यालाहि कांही हक्क असतात—हें आत्मौपम्य बुद्धीने शिकलें पाहिजे.

## न्यायबुद्धीचें तारतम्य व पथ्य

पण कितीहि जीव तोडून असें सांगितलें तरी मनुष्यस्वभाव पालटत नाही. ही गोष्ट लक्षांत घेऊन हें न्यायबुद्धीचें तारतम्य व पथ्य सांभाळण्याची जबाबदारी राष्ट्रसंघाने मध्ययुरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरकारांवर टाकली आहे, व त्याला अनुसरून त्यांच्याकडून करार करवून घेतले आहेत. या तहाच्या अन्वयें (१) फिनलंडमध्यें स्वीडिश अल्पसंख्याकांना, (२) एस्टोनियामध्यें जर्मन, रशियन, स्वीडिश व ज्यू अल्पसंख्याकांना (३) लटेव्हियामध्ये जर्मन, रशियन, पोल्स व ज्यू यांना, (४) लिथुएनियामध्यें जर्मन, ज्यू, पोल्स, लेट व रशियन यांना (५) मेमेलमध्यें जर्मन, लिथुएनियन, पोल्स व ज्यू यांना, (६) पोलंडमध्यें रुथेनियन, युक्रेनियन, रशियन, ज्यू, जर्मन, लिथुएनियन व झेक यांना, (७) जर्मनीमध्यें पोल्स व ज्यू यांना, (८) झेकोस्लोव्हाकियामध्यें जर्मन, मॅगियार, पोल्स, ज्यू व रुथेनियन यांना (९) ऑस्ट्रियामध्ये झेक, स्लोव्हक, मॅगियर, क्रोट, स्लोव्हेन्स यांना अशा रीतीने तहांच्या योगाने संरक्षण देण्याची व्यवस्था झालेली आहे. वरील शिवाय हंगेरी रुमेनिया, बेसारेबिया, युगोस्लाव्हिया अलबेनिया, ग्रीस, बल्गेरिया, टर्की, इराक इत्यादि राज्येंहि अशाच तहांनी बांधलीं गेलीं आहेत.

## अल्पसंख्याकांना बारके चिमटे

आता इतकें करूनहि अल्पसंख्याकांचीं दुःखें संपलींच असें म्हणतां येत नाही, याचीं कारणें अनेक आहेत. राज्यांतील बहुसंख्याकांच्या हातीं राज्याधिकार राहणें स्वाभाविक आहे; आणि तसें झालें म्हणजे अल्पसंख्याकांना उघड छळणें शक्य नसल्यानें बारीक चिमटे घेण्याच्या युक्त्या सुचतात. यामुळे पदरांत अपराधाचें माप घालतां येत नाही. राष्ट्रसंघाने अशा फिर्यादींचा निकाल करण्याकरितां न्यायकोर्टें नेमलीं आहेत. पण तेथपर्यंत जाऊन फिर्याद करणें व तिची तड लावणें कठीण जातें.

पण यांत राष्ट्रसंघाला दोष देतां येत नाही. त्यानें आपणाकडून विचारपूर्वक सर्व योजना केली. जगांत प्रबळ व दुर्बळ यांच्या भांडणांत सर्वत्र जो प्रकार दिसून येतो, तोच युरोपखंडांत अल्पसंख्य व बहुसंख्य यांच्या भांडणांतहि दिसून आल्याशिवाय रहात नाही. शिवाय आता तर राष्ट्रसंघाच्या हातचा दंड ढिला पडला इतकेंच नव्हे तर अनेक राष्ट्रांनी त्याचें सभासदत्व सोडून दिलें व बेगुमानपणे इतर तहांप्रमाणे हा अल्पसंख्य संरक्षणाचा तहहि धाब्यावर बसविला आहे! पण अशा गोष्टींत प्रयत्नावर नजर द्यावयाची असते; फलावर नाही.

पण निदान त्याने केलें अितकें केल्याशिवाय राष्ट्रसंघाचें चाललें नसतें. कारण आंतरराष्ट्रीय शांतता राखणें हें संघाने आपल्या संघटनेचें ध्येय म्हणून ठरविलें होतें. आणि त्याला हें माहीत होतें कीं, युरोपांत जर ही शांतता नष्ट झाली असेल तर ती राष्ट्रीय भावनांच्या कलहामुळे. हा कलह थांबविणें दोन बाजूंनी अिष्ट होतें. एक मानवी तत्त्वज्ञान व नीति यांची दृष्टि व दुसरी राजकीय दृष्टि.

## संस्कृतिरक्षणाचा हक्क

मानवी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीन पाहतां प्रत्येक व्यक्तिमात्राला आपली संस्कृति रक्षिण्याचा हक्क असतो. ही संस्कृति राखतां आली नाही तर जगून काय करावयाचें असें त्याला वाटतें. संस्कृतीपुढें स्वराज्यहि त्याला तुच्छ वाटतें. जर त्याच्या देशाचें सरकार त्याच्या संस्कृतींत हात घालून,

सक्तीने अधिकाराच्या जोरावर, ती भ्रष्ट, दूषित करील, किंवा प्रजाजनांतल्या एखाद्या वर्गानें आक्रमण केलें असतां सरकार योग्य तें संरक्षण त्याला देणार नाही, तर तो आपल्या सरकारशी अिमानी राजनिष्ठ रहात नाही. बरें राज्यांत अशांतता नादूं लागली, पक्ष माजले, म्हणजे मग तें राज्य कमकुवत होतें आणि त्या राज्यावर चढाई किंवा आक्रमण करण्याला टपलेल्या शेजारच्या राष्ट्राचें फावतें. तात्पर्य, तत्त्वज्ञानांतील ध्येयवादित्व व राजकीय व्यवहार दोनहि दृष्टींनी राष्ट्रीय भावनांना संरक्षण देणें हें प्रत्येक सरकारचें कर्तव्य ठरतें.

असो. आता हें संस्कृतिसंरक्षण सामान्यत: कशा प्रकारच्या नियमांनीं केलें जातें हें लक्षांत यावें म्हणून त्याची थोडी माहिती देतों. पण त्याबरोबर हें सांगतों की, हे नियम, ही व्यवस्था, राष्ट्रांतील अल्पसंख्य व बहुसंख्य यांनी एकत्र बसून सलोख्याने व सहकारितेने केलेली नाही. तर ती शहाण्याजाणत्या नि:स्वार्थी नि:पक्षपाती तज्ज्ञांनी स्वतंत्र रीतीने दूरवर विचार करून तिऱ्हाईतपणें सुचविलेली आहे; व ती तशी म्हणूनच राष्ट्रसंघाने स्वीकारून राष्ट्राराष्ट्रावर तहानी लादलेली आहे. "हिंदुस्थानांतील लोकांनी आपलें भांडण आपणच तोडलें पाहिजे, नाही तर स्वराज्यदानाचें पुढचें पाऊल आम्ही टाकणार नाही," असें म्हणून घोळ घालून बसणाऱ्या सरकाराने ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे.

ती गोष्ट त्यांच्या ध्यानांत नाही कोठे? निजलेल्याला जागें करतां येतें पण जाग्याला जागें कोण करणार ? अिंग्रज सरकारला ही गोष्ट माहीत नाही काय की, ज्या राष्ट्रसंघाचे आपण व हिंदुस्थान हे सभासद आहों त्या संघानेंच हे नियम केले आहेत ? व त्यांनी शांततारक्षणाचा पुष्कळसा कार्यभाग झाला आहे ? पण लक्षांत घेतो कोण ? हिंदुमुसलमानांच्या भांडणाची सबब त्यांची त्यांच्या तोंडावर फेकतां आली; आणि दिसण्यांत तरी ती सबब बरी दिसते या कपटबुद्धीने अिंग्रज वागत आले आहेत हें लहान मुलालासुद्धा समजेल.

## नि:पक्षपाती त्रयस्थांनी सुचविलेली योजना

राष्ट्रसंघाने निरनिराळ्या राष्ट्रांकडून जे तह करवून घेतले आहेत ते सर्व एकाच छापील नमुन्याबरहुकूम नाहीत. ज्यांच्या ज्यांच्यांत तह करा-

वयाचा त्यांची विशेष परिस्थिति लक्षांत घेऊन, त्यांच्या संमतीनेच या तहाची भाषा व कलमें ठरविलेलीं आहेत. तथापि त्या सर्वांत कांही तजविजी मूलभूत असल्यामुळे समान स्वरूपाच्या आहेत त्यांचा उल्लेख करितों.

१. अल्पसंख्य म्हणवून घेण्याचा व त्या कारणाने राजकीय संरक्षण मागण्याचा हक्क कोणाला पोचतो ?

सामान्यतः देशांतील एकंदर लोकसंख्येच्या निदान एकपंचमांशाइतकी ज्या लोकांची संख्या एकगटाने भरेल, ते अल्पसंख्य असे समजले जातात. कारण शेंकडा दोन किंवा चार अितक्या लोकसंख्येने कोणतीहि स्वतंत्र व्यवस्था मागितली तर ती करितां येणें सोईचें नाही. तथापि विशेष कारणाकरिता विशेष संख्याप्रमाण ठरविण्यास हरकत नसते. पोलंडमध्ये जर्मन अल्पसंख्य या वर्णनाला पात्र. पण अिंग्लंड, फ्रान्स यांतील जर्मन नव्हत.

२. एखाद्या गटाला अल्पसंख्य म्हणवून घ्यावयाचें असेल तर त्याने आपण बहुसंख्य लोकांपासून संस्कृति, भाषा, धर्म अित्यादि कारणांनी खरोखरच वेगळे ठरतों हें शाबीद केलें पाहिजे. राजकीय मतभिन्नतेमुळे होणारा वेगळेपणा या बाबतींत जमेस धरला जात नाही. उदाहरणार्थ, अिंग्लंड, फ्रान्स अमेरिका या देशांत अल्पसंख्याकांचा प्रश्नच नाही. तेथे धार्मिक सामाजिक संस्कृति व भाषा जवळ जवळ एकजिनसी आहे. या देशांत कॉंझरव्हेटिव, लिबरल, डेमोक्रॅटिक, रिपब्लिकन, सोशियालिस्ट, सिंडिकॅटिलिस्ट, कम्युनिस्ट असे राजकीय मतांचे भेद आहेत. परंतु मतदानाचा अधिकार सर्व व्यक्तींना सारखाच असल्यामुळे, 'आम्ही अल्पसंख्य म्हणून आम्हाला संरक्षण द्या' असें कोणा गटाला म्हणतां येत नाही. अिंग्लंडमध्ये रोमन क्याथोलिक व फ्रान्समध्ये प्रॉटेस्टंट अल्पसंख्य; पण ते स्वतंत्र व्यवस्था मागत नाहीत, कारण देशांत धार्मिक स्वातंत्र्य आहे.

३. अल्पसंख्य हे देशांत कायमचे रहाणारे असले पाहिजेत. उपरी लोकांना अल्पसंख्याकांचे हक्क मिळू शकत नाहीत.

४. अल्पसंख्यांनी त्या राज्याचे प्रजाजन म्हणवून घ्यावयास तयार असलें पाहिजे म्हणजे राजनिष्ठ राहिलें पाहिजे.

५. स्थानिक वसाहत, शिक्षण अित्यादि संबंधाने सोईसवलती हव्या तर अल्पसंख्यांनी व्यवहार्य अशा स्थलमर्यादेंत राहिलें पाहिजे. वाटेल तसें दूर दूर पांगून राहुन चालणार नाही. उदाहरणार्थ, एखाद्या शहरांत जवळ जवळच्या मोहोल्यांत रहाणाऱ्या अल्पसंख्याकांच्याकरितां म्युनिसिपालिटीला शाळा काढणें भाग पाडतां येईल. पण जर त्यांची वस्ती अितकी तुरळक असली की, एका मोहोल्यांत एक वर्ग भरण्याअितकीं मुलें भरत नाहींत, तर सर्व वर्ग असणारी शाळा चालविली पाहिजे असें म्हणतां येणार नाही. अल्पसंख्याकांच्याहि शिक्षणाकरितां किती खर्च करावा याला मर्यादा असणारच.

६. अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांच्या हक्कांवर अतिक्रमण करतां कामा नये. बहुसंख्य असणें हा जसा गुन्हा नव्हे त्याचप्रमाणें अल्पसंख्य असणें ही कांही विशेष पात्रताहि नव्हे. मानवी नात्याची समानता हाच उभयतांच्या हक्कांचा व व्यवहाराचा मुख्य पाया व आधार असें समजण्यांत यावें. लहान भावंडाने सवलत मागावयाची तर लहानपणाचें नातें मान्य करूनच मागितली पाहिजे. लहान झालें म्हणून कांही त्याला वरचढपणाचा हक्क नाही.

७. अल्पसंख्याकांना विशेष सवलती द्यावयाच्या तर त्या कांही मुदतीपर्यंतच राहतील, त्या कायमच्या बिनमुदत राहतील असें समजू नये. याचें कारण असें कीं, एका राज्यांत राहाणाऱ्या सर्व प्रजेने हळूहळू एकजिनसी होण्याचें ध्येय डोळ्यांपुढे ठेवलें पाहिजे. विषमता हा अपवाद होय. अर्थात ती अनंत कालपर्यन्त टिकणें योग्य नाही व टिकविणें व नांदविणें शक्य नाही.

असो. वरील सर्व अटींवरच अल्पसंख्याकांना संरक्षण, हक्क व सवलती दिल्या जातात, मात्र या अटी पाळल्या गेल्या तर अल्पसंख्य व बहुसंख्य यांच्या हक्कांत यत्किंचित्‌ही विषमता उरूं नये अशी राष्ट्रसंघाची योजना आहे.

याविषयी कांही अभिप्राय देतों. एम. डी. मेलो फ्रँको (ब्राझिलियन) म्हणतो--

Those who conceived this system of protection of minorities did not dream of creating within certain states a group of inhabitants, who would regard themselves as permanently foreign to the general organisation of the country.

ब्लॉसिसझस्कि ( पोलिश ) म्हणतो--

We must avoid creating a state within a state. We must prevent the minority from transforming itself into a privileged caste, and taking definite form as a foreign group, instead of being fused in the society in which it lives.

दद्रामिस ( ग्रीक ) म्हणतो--

If privileges were granted to a minority in any country, inequality would be created between this minority and the majority; the latter would be oppressed by the minority and it would then be the Majorities' question which would have to engage the attention of the League of Nations!

सर ऑस्टिन चेंबरलेन ( इंग्रज ) म्हणतो--

It was certainly not the intention of those who had devised the system of minority protection to establish in the midst of a nation, a community which would remain permanently estranged from national life.

---

## ( लेखांक ७ वा )

या लेखमालेंत य पूर्वीचे सहा लेख लिहिले त्यांतले कांही तात्त्विक व कांही युरोपमधील परिस्थितीसंबधाचे असले तरी, त्या सर्वांचा रोख हिंदुस्थानांतील अल्पसंख्य, बहुसंख्य यांच्या प्रश्नावरच होता. हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल तरी आता त्या प्रश्नाकडे वळून प्रत्यक्ष त्याचाच विचार करू.

प्रथम अल्पसंख्याकांचा प्रश्न कोणत्या बाजूंनी आज नडत आहे हें पाहूं. वंशाचा अभिमान धरून सवता सुभा किंवा विशेष हक्क मागणारे लोक हिंदुस्थानांत नाहीत. त्यांना आपला धर्म व भाषा हीं कळतात व त्यांचा अभिमान ते धरतात. पण आपण नक्की कोणत्या वंशाचे याचें नांव ज्यांना सांगतां येत नाही ते त्या नांवाच्या वंशाचा अभिमान कसा धरणार?

## भाषांचा प्रश्न

हिंदुस्थानांत भाषा दहावीस आहेत. परंतु आधीच भाषावार प्रांतरचना पुष्कळशी झालेली आहे. कॉंग्रेसने भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलें आहे. एकदोन प्रांत भाषावार पद्धतीने अजून वेगळे व्हावयाचे आहेत आणि ते पुढेमागे होतीलहि. दहा वर्षांपूर्वी सिंध व ब्रह्मदेश वेगळे झाले नव्हते ते आता झाल्यामुळे सिंधी व ब्रह्मी भाषांच्या भांडणाचा प्रश्न उरत नाही.

भाषावार प्रांतरचना झालेल्या प्रांतांत एकमेकांचीं टोकें कोठे कोठे एकमेकांत घुसलीं आहेत. म्हणून तेथे भाषांचें भांडण थोडें ऐकूं येतें. पण कायदे कौन्सिलांत मराठी कानडी गुजराथी या तिन्ही भाषांतून बोलण्याची परवानगी मिळते. येऊन जाऊन भांडण येतें तें प्राथमिक शाळा कोठे जितक्या हव्या तितक्या नाहीत इतक्यापुरतें. पण हें भांडण अजून विकोपाला गेलेलें नाही; व जाईल तर कायदे कौन्सिलांत त्याचा विचार होऊं शकेल. आणि प्रांताच्या गव्हर्नराकडे अर्ज केल्यास या भांडणांत लक्ष घालून तो न्यायाचा निकाल देऊं शकेल, व तो अंमलांतहि आणूं शकेल.

भाषेचा हा वाद महाराष्ट्र कर्नाटकांत थोडासा जाणवतो. उत्तर हिंदुस्थानांत उर्दू व हिंदी यांतील भांडण असेंच जाणवण्यासारखें आहे. परंतु तिकडील हिंदु लोक हे स्वतःच उर्दू पक्षपाती आहेत. आणि कॉंग्रसनेहि हिंदीला हिंदुस्थानी बनविण्याचें धोरण ठेवल्याने उर्दू व हिंदी यांचें भांडण विकोपास जाण्याचा संभव नाही. पारशांसारखे कांही विधर्मी लोक इकडे आले त्यांनी गुजराथी हीच आपली मातृभाषा केली.

## धर्म व संस्कृति

भांडणाचें कारण उरतां उरलें तो धर्म. आणि संस्कृति हें धर्मांचेंच अंग असल्याने तिचा वेगळा विचार करण्याचें कारण नाही. धर्माच्या दृष्टीनें विचार करतां असें दिसून येईल कीं, या देशांत हिंदु पासष्ट टक्के, मुसलमान पंचवीस टक्के, पहाडी विनधर्मी दोन टक्के, खिरस्ती एक टक्का–शीख एक टक्का, जैन एकपंचमांश टक्का, आणि इतर एक पंचमांश टक्का, अशी लोकसंख्येंत वांटणी आढळते. हे आंकडे १९२१ चे घेतले आहेत. कारण १९३१ च्या खानेसुमारीवर कॉंग्रेसने बहिष्कार घातला होता. म्हणून त्या सालचे आंकडे लक्षांत घेण्यापेक्षा १९२१ चेच घेतलेले बरे. दिवसानुदिवस मुसलमानांच्या लोकसंख्येंत वाढ, व हिंदूंच्या लोकसंख्येंत घट, होत आहे हें अर्धशतकांतले आंकडे लक्षांत घेतले असतां कोणालाहि तेव्हाच दिसून येईल. परंतु येथें स्थल–प्रमाणाचा सामान्यपणें विचार करण्याचा असल्याने इतक्या खोलांत शिरण्याचें कारण नाही.

मुख्य गोष्ट इतकीच की, हिंदु व मुसलमान मिळून नव्वद टक्के लोकसंख्या भरते यामुळे पहाडी, खिरस्ती, शीख, जैन, पारशी इत्यादि सर्व मिळून दहा टक्के भरणाऱ्या, लोकसंख्येचा विचार करण्याचें कारण उरत नाहीं. सांगण्यासारखी एक गोष्ट म्हणजे बुद्धधर्मीयांची लोकसंख्या पूर्वी चार टक्के होती. पण आतां ब्रह्मदेश वेगळा झाल्यामुळे हिंदुस्थानांतील बुद्धधर्मी लोक खिरस्ती, शीख यांच्या पातळीवरच येऊन बसतील. आणि वर सांगितलेलें नव्वद व दहा टक्के हें प्रमाण कदाचित् वाढेलहि. म्हणजे ९१ व ९ असें होईल. ८९ व ११ असें होणार नाही.

या नऊदहा टक्क्यांतल्या विधर्मी लोकांनीं सवत्या सुभ्याची मागणी तर नाहीच पण धर्मवार मतसंघाचीहि मागणी केलेली नाही. म्हणून स्वराज्याच्या मार्गांत त्यांचा अडथळा मुळीच नाही. विषमधर्मीय लोक सोडून समधर्मीयांचा विचार केला असतां असें आढळेल कीं, हिंदूंत जैन–लिंगायतांचा समावेश सहज होऊं शकतो. शिवाय दक्षिणेंत जेथें लिंगायत वस्ती आहे तेथे ती एकवटलेली व मोठ्या प्रमाणांत असल्याने तिला बहुसंख्यतेचें रूप आलेलें आहे. म्हणून लिंगायतवस्तीच्या प्रदेशांत लिंगायत कर-

तील तें होईल असें असल्यामुळे त्यांना विभक्तपणाचें भांडण भांडण्याचें किंवा स्वतःला संरक्षण मागण्याचें कारण नाही.

## स्पश्यास्पृश्य प्रश्न

मद्रास इलाख्यांत व महाराष्ट्रांत ब्राह्मण–ब्राह्मणेतर असा भेद ठळक आहे. परन्तु येथेहि ब्राह्मणेतर हे संख्येने इतके अधिक व प्रबळ आहेत की, त्यांच्यापुढे ब्राह्मणांचा टिकाव लागू शकत नाही. म्हणून संरक्षण मागावयाचें तर तें ब्राह्मणेतरांकरितां नसून ब्राह्मणांकरितांच मागावें लागेल. पण ब्राह्मण तें मागूं इच्छीत नाहीत. जैन हे गुजराथेंत व मध्य हिंदुस्थानांत प्रामुख्याने आढळतात. परन्तु जैन व जैनेतर कोणत्याहि प्रदेशांत तेथील मुख्य भाषा बोलणारे असतात; इतकेंच नव्हे तर जैन व जैनेतर यांच्यामध्यें लग्नादि शरीरसंबंधहि घडतात.

समधर्मीय हिंदूंपैकीं स्पृश्य व अस्पृश्य किंवा हीन व उन्नत हा भेद महत्त्वाचा असून गेल्या वीस वर्षांत तो पुष्कळच पुढे आला व नडू लागला. परंतु त्यांना कांहीं प्रमाणांत स्वतंत्र मतदारसंघ देण्याची व्यवस्था झाल्यामुळेच, अस्पृश्यांचा कांही दावा शिल्लक उरला असला तरी ती स्वराज्याच्या मार्गांतील अडचण म्हणण्याइतकी नाही. अस्पृश्य पुढारी आंबेडकर हे जवळजवळ मुसलमानांइतका तीव्र विरोध कांग्रेसला करतात असें दिसून येतें. पण त्याचीं कारणें वेगळीं आहेत. आणि मला हें निश्चित वाटतें कीं, मुसलमानांचा प्रश्न समाधानकारक रीतीने निकालांत निघाला तर अस्पृश्यांच्या प्रश्नाचा निकाल चुटकीसरशी लागेल. दिवसेंदिवस स्पृश्यांकडूनच असा प्रयत्न सुरू आहे की अस्पृश्यता ही हिंदु समाजांतून सर्वस्वी निघून जावी.

## मुसलमानांचें राजकीय भांडण

इतकी निरवानिरव केल्यानंतर हें उघडच दिसून येईल की, आज खरा सोडविण्यासारखा प्रश्न आहे तो फक्त मुसलमानांचा. मात्र तो सर्वांगीण आहे. म्हणजे मुसलमानांचें भांडण धर्म, संस्कृति व भाषा यापुरतें नसून त्याला पुष्कळसें राजकीय स्वरूप आहे. वास्तविक गोवध व वाद्यवादन

यामुळे प्रायः हिंदु-मुसलमानांतील तंटे होतात असें दिसतें. पण या कलहाचें मूळ त्यापलीकडे आहे. आणि तें राजकीय आकांक्षेच्या भूमींत दाट घुसून बसलें आहे. कसेंही असलें तरी हा कलह इतक्या थराला पोंचला आहे की ब्रिटिश लोकांनी त्याकडे हात दाखवून म्हणजे त्याची सबब सांगून हिंदुस्थानला स्वराज्य देण्याच्या काळजींतून मोकळे होऊन खुशाल झोपीं जावें !

मग आता पुढचा प्रश्न हा की, हें भांडण तुटणार कसें व केंव्हा? पण कसें या प्रश्नाचें उत्तर दिलें म्हणजे केंव्हा या प्रश्नाचें निराळें उत्तर द्यावयाला नको. कारण ज्या दिवशीं हा कलह मिटण्याचा मार्ग किंवा योजना सुचून उभयपक्षीं मान्य होईल, किंवा ब्रिटिश सरकार स्वतःची कांही योजना ठरवून ती अमलांत आणण्याचा निश्चय जाहीर करील, त्या क्षणींच हा कलह संपेल. या कलहाचा ज्वर विज्वर विषम ज्वराहूनहि घातक आहे. पण त्याला बरा होण्याला मुदत नाही. किल्ली हाती लागली तर बसल्या बैठकीला तें कुलप उघडलें जाईल. नाहीतर हा कलह किती तरी कालपर्यंत चालू राहील ! व घणाचे घाव घातले तरी तें कुलूप फुटेल की नाही याची शंकाच वाटते.

असो. हा प्रश्न कसा सुटेल याचा विचार करतां या मालेंतील पूर्वी पांचव्या लेखांत जो निरनिराळ्या मार्गांचा विचार केला तोच येथे करून पाहूं. पहिला मार्ग, प्रांतांच्या सरहद्दी बदलून शक्य तितकी एकेका प्रांतांत एकजिनसी लोकसंख्या आणण्या–वसविण्याचा प्रयत्न करणें. या दृष्टीनें पाहतां सिंध वेगळा झाल्यानें त्यापुरता प्रश्न सुटला आहे. पण पंजाब आणि बंगाल या एकेका प्रांताचे दोन दोन प्रांत करण्याचें योजिलें तर सरहद्दी सोयीच्या करून प्रांत बनविण्याची कल्पना कांहीशी फलद्रूप होण्याचा संभव आहे. नाही असें नाही.

## पंजाब व बंगाल

पंजाबच्या नकाशाकडे पाहिलें तर असें दिसेल की, त्या प्रांतांत सुमारें १५ जिल्हे मुसलमान–प्रमुख आहेत. त्यांत ६१ टक्क्यांपासून ९० टक्क्यांपर्यंत मुसलमानांची बहुसंख्यता आढळते. त्या खालोखाल दोन जिल्हे असे आहेत की

त्यांत मुसलमानांची संख्या वरीच आहे म्हणजे कोठे २१ टक्के तर कोठे ४९ टक्के व एखादे ठिकाणीं ५७ टक्केहि. तीन जिल्हे असे आहेत की, त्यांत हिंदु-मुसलमानांची समानता आहे. उलट नऊ जिल्हे असे आहेत की, त्यांत हिंदु व शीख लोकांची संख्या मुसलमानांहून पुष्कळच अधिक आहे, म्हणजे पुष्कळ ठिकाणीं ही संख्या ६७, कांही ठिकाणीं ७८ व एका जिल्हयांत ९४ टक्के भरते. आणि पंजाबचा नकाशा या दृष्टीनें रंगवून पाहिला तर, फिरोजपूर, जलंदर, अमृतसर हे घेऊन यांच्या पूर्वदिशेचे सर्व जिल्हे एकत्र केले तर हिंदु पंजाब व मुसलमान पंजाब असे दोन प्रांत होणें शक्य आहे.

तीच गोष्ट बंगाल्याची. तेथेंहि १३ जिल्हे असे आहेत की, ज्यांत मुसलमान लोकांची संख्या खूपचखूप आहे. दोन जिल्हे असे की, ज्यांत मुसलमानांची संख्या खूपचखूप नव्हे पण वरीच आहे. सुमारे चार जिल्हे असे आहेत की, त्यांत दोन्ही संख्या समसमान आहेत आणि सुमारे १० जिल्हे असे आहेत की, त्यांत हिंदूंची लोकसंख्या खूपचखूप आहे. तात्पर्य पंजाबाप्रमाणें बंगालचाहि जर या दृष्टीने नकाशा रंगविला तर,पूर्व व उत्तर दिशेनें झुकणारा मुस्लिम बंगाल आणि दक्षिण-पश्चिम बाजूनें झुकणारा हिंदु बंगाल असे दोन प्रांत होऊं शकतील. पण अशा तऱ्हेची नवीन प्रांतरचना करण्याची योजना पुढे आलेली माझ्या ऐकिवात नाही.

## इतर प्रांतांची परिस्थिति

पण खरा प्रश्न आहे तो यापुढचा असा की, बंगाल व पंजाब प्रांत असे एकाचे दोन केले तरी त्यापैकी कोणच्याहि जिल्हयांत फिरून इतर ठिकाणची तीच म्हणजे पूर्णपणें एकजिनसी लोकसंख्या नसण्याची अडचण हा उरतोच. अल्पसंख्य, बहुसंख्य अशी वांटणी झाली, किंवा समसमान लोकसंख्या असली तरी काय ? समजुतीने मिलाफाने घेतलें नाही तर धर्म व भाषा यांचें भांडण उरणारच. पंजाब, बंगाल व सिंध हे प्रांत सोडले असतां इतर प्रांतांत मुसलमानांचें प्रमाण कोठेंहि १५ ते २० हून अधिक पडत नाही. लीग ऑफ नेशन्सने कायदेशीर अल्पसंख्येचें प्रमाण शेंकडा सुमारे २० इतकें ठरविलें आहे तेंच इकडे लावलें तर, वरील प्रांत सोडून

इतर कोणत्याहि प्रांतांत अल्पसंख्य मुसलमानांना वेगळी सोय किंवा संरक्षण मागण्याचा हक्कच पोंचत नाही. ज्याला फंडामेंटल किंवा मूलभूत हक्क असें म्हणतात, म्हणजे जे हक्क केवळ मानुषत्व किंवा प्रजाजनत्व येवढ्यावर आधारलेले आहेत, याशिवाय दुसरे कोणतेहि हक्क बहुतेक प्रांतांतून मुसलमानांना मिळणें हें राष्ट्रसंघाच्या योजनेंतहि बसत नाहीं, आणि हे जे मूलभूत हक्क म्हणून सांगितले त्याविषयीं अल्पसंख्याकांचें कांही गाऱ्हाणें असेल तर त्या प्रश्नांत हात घालण्याचा अधिकार प्रांतानिहाय गव्हर्नरांना आजहि आहे. म्हणून तो प्रश्न अडचणीचा वाटण्याचें कारण नाही.

पण सिंध, बंगाल व पंजाब यांत हिंदूंची लोकसंख्या मात्र राष्ट्र-संघाच्या योजनेंत बसते, आणि त्या योजनेप्रमाणें जें संरक्षण देणें योग्य तेव-ढेंच तेथील हिंदूंनी मागणें योग्य होईल. म्हणजे हिंदूंकरिता वेगळे मतदार-संघहि न करून तंटा मिटेल.

## सलोखा हाच मार्ग

असो. हद्दी न बदलतां आहेत त्या हद्दींतच बहुसंख्यांनी अल्पसंख्यांना जुलूम करून छळून भंडावून सोडून, त्यांना प्रान्तत्याग करावयास लावणें, किंवा सक्तीने त्यांना हद्दपार करणें, हे उपाय इतके रानटी आहेत की, यापुढें त्यांचा अवलंब कोणतेंहि सुधारलेलें सरकार करणार नाही. म्हणून मीहि पण त्याचा विचार करीत नाही. कित्येकांना असें वाटतें की, चार प्रांत मुसलमान सत्तेचे आणि इतर प्रांत हिंदु सत्तेचे असे झाले, म्हणजे त्यांतच अल्पसंख्यांवरील छळा-जुलमाविरुद्ध जामिनकी आपोआपच मिळते. पण या जामिनकीचा अर्थ विपरीत होतो. "कारण पंजाबांतील मुसलमा-नांनी तेथील हिंदूंवर जुलूम केला, तर मद्रासेंतील हिंदूंनी तेथील मुसलमानां-वर जुलूम करावा आणि उट्टें काढावें, सूड घ्यावा! आणि असें झालें म्हणजे मूठभर मुसलमानी प्रांतांना सहजच दहशत बसेल आणि ते हिंदूंचा छळ करणार नाहींत"! पण अशी ही सूडबुद्धीची जामिनकी-खुनशी प्रतिक्रियेची जामिनकी-डोळ्यापुढे आणणेंहि वेडेपणाचें होईल. जामिनकी हुडकावयाचीच असेल तर लोकसंख्येच्या विषम स्थितींत बहुसंख्यांनी न्यायबुद्धीने अल्प-

संख्यांना वागविणें आणि अल्पसंख्यांनीहि उगीच त्रास न देतां सलोख्यानें वागणें, यांत जी जामिनकी मिळेल तीच खरी व तीच यशाला जाईल.

आणि असें न व्हावयाचें तर हिंदुस्थानांत पुढील युगांत अराजकता अनवस्था यांचें साम्राज्य होण्याचें चित्र कोणीहि आपल्या डोळ्यापुढे खुशाल रंगवावें. मग शेवटीं त्यांतून काय निघेल तें निघेल. तात्पर्य, या लेखमालेंत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें बहुसंख्यांमध्यें न्यायबुद्धि आणि अल्पसंख्यांत समंजस-पणा हे गुण उतरण्यावरच हिंदु–मुसलमानांचा प्रश्न, समाधानकारक रीतीनें सुटणें हें अवलंबून आहे. पण हा समेट समजुतीने घडवून आणणें खाजगी प्रयत्नाने कितपत शक्य आहे हा महत्त्वाचा प्रश्न असून, त्याचा गेल्या पंधरा वर्षांतील इतिहास पाहिला असतां मन जवळजवळ निराश व उदास होतें. म्हणून तो इतिहास काय व कसा घडला याचा विचार पुढील लेखांत करूं.

---

## (लेखांक ८ वा)

## समेटप्रयत्नांचा इतिहास

हिंदु–मुसलमानांतील सलोखा घडवून आणण्याचा प्रश्न मला इतका निराशाजनक वाटतो याचें कारण त्याचा गेल्या २३ वर्षांतील इतिहास माझ्या डोळ्यापुढे आहे. निदान १९२४–१९२८ या पांच वर्षांत तरी मी इतर लोकांबरोबर त्या चर्चेंत जबाबदारीने भाग घेतला होता. हा इतिहास अगदी थोडक्यांत सांगतों.

१९१६ साली लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे वेळीं त्या वेळचे बहुतेक हिंदु व मुसलमान पुढारी त्या अधिवेशनाला हजर होते. किंब-हुना असेंहि म्हणतां येईल की, सर्व पक्षोपपक्ष आपल्या प्रतिनिधिद्वारां ज्याला हजर होते असें राष्ट्रीय सभेचें दुसरें कोणतेंहि अधिवेशन मला स्मरत नाही. याच सभेंत कॉंग्रेस-लीग नांवाचा सुप्रसिद्ध राज्यघटनात्मक तह झाला. 'कांग्रेस-लीग' या नांवांत त्याचें मर्म आहे. तें असें की, स्वराज्यविषयक एखादी योजना करून ती सरकारपुढें मांडावयाची तर हिंदु व मुसलमान

या दोघांनी बरोबरीच्या नात्याने मान्य केलेली असावी. १९१६ सालीं कांग्रेस ही जशी अग्रगण्य राजकीय संस्था होती तशीच मुस्लिम लीग ही देखील मुसलमानांची एकमेव प्रतिनिधि समजली जात होती. बॅ. जिना यांनी ही योजना तयार करण्यांत भाग घेतला होता. आणि आज ते जे कांग्रेसला विरोध करीत आहेत त्याचें कारण हेंच असावें की, आज सर्व हिंदुस्थानच्या वतीने बोलण्याचा अधिकार एकट्या कांग्रेसलाच आहे. इतर कोणाला नाही असें कांग्रेस म्हणूं लागली आहे.

कांग्रेस म्हणजे म. गांधी हें अलिकडे प्रसिद्धच आहे. पण हिंदुस्थान देशाकरिता एकट्याने बोलण्याचा गांधींचा हक्क गोलमेज परिषदेंत जिना–आंबेडकर इत्यादिकांनी उघड नाकबूल केला ही गोष्ट देखील तितकीच प्रसिद्ध आहे. कांग्रेस अजून तो हक्क सोडीत नाही व जिनाप्रभृति तो अजून कबूल करीत नाहीत. लखनौ कांग्रेसच्या वेळीं हिंदुमहासभा अस्तित्वांत नव्हती पण मुसलमान तेवढे संघटित झाले होते. पुढे कटु अनुभवामुळे हिंदूहि संघटित होऊ लागले. आणि आज मुस्लिम लीगप्रमाणें हिंदुमहासभाहि असें म्हणत आहे की, कांग्रेस ही स्वराज्य योजनेविषयी एकटी सर्वाधिकारी नाही.

## कॉंग्रेस म्हणजे म. गांधी

१९२७ सालीं मद्रास कॉंग्रेसने इतर अनेक संस्था–संघटनांशी सहविचार करून स्वराज्य–योजना आंखण्याचा अधिकार आपल्या वर्किंग कमिटीला दिला, त्यावेळीं मुस्लिम लीग कॉंग्रेसशी सहकार्य करण्याला तयार झाली होती. आणि या सहविचाराकरिता देशांतील सुमारें २५ संस्थांना वर्किंग कमिटीने निमंत्रण केलें होतें. त्यांचीं नांवेंच देतों म्हणजे दिसून येईल की, कॉंग्रेस ही अलिकडेच अत्यंत अधिकारलोभी झालेली असून ती इतर संस्थांना सहविचारांत घेऊं अिच्छीत नाही. असो. या पंचवीस संस्था अशा:– नॅशनल लिबरल फेडरेशन, हिंदुमहासभा, ऑल इंडिया मुस्लिम लीग, सेंट्रल खिलाफत कमिटी, सेंट्रल शीख लीग, साऊथ अिंडियन लिबरल फेडरेशन, ऑल अिंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस, होमरूल लीग, रिपब्लिकन लीग, दिल्ली असेंब्लींतील स्वातंत्र्य पक्ष, व राष्ट्रीय पक्ष, इंडियन स्टेटस् सबजेक्टस्

कॉन्फरन्स व असोसिअेशन, स्टेटस् पीपलस् कॉन्फरन्स, अँग्लो अिंडियन असोसिएशन व इंडियन असोसिएशन कलकत्ता, पार्शी सेंट्रल असोसिअेशन, झोरोराष्ट्रीय असोसिएशन, पार्शी राजकीय सभा, पार्शी पंचायत, इंडियन खिश्चन कॉन्फरन्स, हिंदी चेम्बर ऑफ कॉमर्स, द्रविड महाजन सभा, अनेक लँडलॉर्ड असोसिएशन्स, मुंबई ब्राह्मणेतर पक्ष, राष्ट्रीय ब्राह्मणेतर पक्ष, मुंबई कम्युनिस्ट पार्टी, मुंबई वर्कर्स अँड पेझंटस् पार्टी, इ.

इतकीं नांवें पाल्हाळाने देण्याचें कारण हें की, कॉंग्रेसला १९२८ सालीं या देशांतील इतक्या प्रातिनिधिक संस्थांची आठवण होती. आज कॉंग्रेसला आपल्या एकटयाशिवाय स्वराज्यासंबंधी, अल्पसंख्याकांच्या प्रश्नाविषयी, बोलण्याला अशी कोणतीहि संस्था दिसत नाही की, जिला निमंत्रण करून सहविचारांत घ्यावें. आणि सहजच या अहंकाराचीं फळें कॉंग्रेस भोगीत आहे.

## सर्वपक्षीय परिषद

असो. १९२८ च्या फेब्रुवारीच्या १२ तारखेला एक महापरिषद दिल्लीस भरली, तिला वर दर्शविलेल्या पुष्कळ संस्थांचे प्रतिनिधि होते. ही परिषद सतत १० दिवस चालू होती. या परिषदेने नेमलेल्या पोटकमिटीने उरल्यासुरल्या विषयांवर आपला रिपोर्ट केल्यावर फिरून ता. ८ मार्च रोजीं परिषद भरली. परंतु येथून मतभेदास प्रारंभ झाला व मुसलमान सभासदांनी हळूहळू अंग काढून घेण्यास प्रारंभ केला. हिंदुमहासभा व मुस्लिम लीग यांच्या विरोधी मागण्यांची तोंडमिळवणी परिषदेला करतां येईना. ही परिषद मुंबई येथे फिरून ता. १९ मे १९२८ रोजीं भरली. तेव्हा निराश होऊन देखाव्यापुरती एक लहानशी पोट कमिटी नांवाला नेमून, पुनः परिषद पुढील ऑगस्टांत भरावी असें ठरवून, परिषदेचें विसर्जन करण्यांत आलें. पण या लहानशा उपसमितींतले बरेच लोक निराश होऊन परत गेले. जागेवर पंडित नेहरू-प्रभृति कांही थोडे लोक उरले; या कमिटीने अखेर जो रिपोर्ट केला त्याला नेहरू-रिपोर्ट ही संज्ञा असून, प्रथम तो कॉंग्रेसने मान्य केलाच; पण १९२९ सालीं लाहोरच्या अधिवेशनांत तो रिपोर्ट स्वतः कॉंग्रेसनेच फेकून दिला!

सांगण्याचें तात्पर्य हेंच की, राष्ट्रीय सभाधिकृत अशा दोन वर्षांच्या प्रयत्नांचा हा सगळा खटाटोप फुकट गेला. कांग्रेसच्या बाजूला तिच्या हुजुरात पथकाचे असे४–२,व पं.मोतीलालांना पानपट्टी करून देणारे १–२मुसलमान शिल्लक राहिले. कॉंग्रेस–विरोध करून आपलें बळ वाढवावें म्हणून मुस्लिम लीग अधिक संघटित होऊ लागली. आणि आपणाला कांग्रेस विचारीत नाही, किंबहुना आपल्यावर जातीयत्वाचा शेरा मारून अपमान करते, असें पाहून हिंदुमहासभा आपलेंहि संघटन करूं लागली. अहंकारनिविष्ट राष्ट्रीय सभेच्या एककल्ली धोरणाचा गेल्या ९वर्षांतील इतिहास सांगावयासच नको. पण त्यापूर्वीहि सर्वपक्षीय परिषदेला अल्पसंख्य बहुसंख्य यांचा समेट करतां आला नाही याविषीं नेहरू रिपोर्टांतीलच खालील कबुली वाचा म्हणजे कळेल.

Indeed the very fact that we were called upon to determine principles of the constitution after considering these divergent views of the Madras Congress, the Muslim League, the Hindu Mahasabha, the Shikh League,shows that *we are expected to exercise our judgment* in the matter and *make such recommendations as are in our opinion, most conductive to the political advancement of the country*.–The only hope for an agreed constitution lies in *finding the basis for just and equitable compromise* between all the parties after a full and fair cosideration of all the circumstances.

नेहरू रिपोर्टावर सर अल्ली इमाम व सुअेब कोरेशी या दोघाच मुसलमानांच्या सह्या आहेत परंतु या बरोबर हेंहि लक्षांत ठेवावें की, सर अल्ली इमाम हे आजारीपणामुळे कमिटीच्या फक्त एकाच बैठकीला हजर राहू शकले. आणि सुएब कोरेशी यांनी भिन्न मतपत्रिका जोडली असून तींत असें म्हटलें आहे की "रिपोर्टांतील आंकडे व युक्तिवाद मला मान्य नाही पण निर्णय मान्य आहे. तथापि माझेंहि म्हणणें असें की, मध्यवर्ती कायदेमंडळांत एकतृतीयांश इतक्या जागा मुसलमानांकरितां राखून ठेवल्या जाव्या !"

या रिपोर्टाच्या वेळीं बॅ. जिना हे विलायतेंत गेले होते. ते परत आल्यावर त्यांना सहविचाराकरिता निमंत्रण करण्यांत आलें. परंतु तें निमं-

त्रण त्यांनीं नाकारलें. पुढे सर्वपक्षीय परिषदेचा एक पुरवणी रिपोर्ट म्हणून झाला तेव्हा तर कोरेशी यांनीं कमिटीचा राजीनामाच दिला म्हणूनहि त्यांची सही नाही. त्यांचे जागीं अब्दुल कादर कासूरी या एका नव्या सभासदांची सही झाली.

## गांधींचें उपोषण

काँग्रेसने पुढाकार घेऊन भरवलेल्या सर्वपक्षीय परिषदेचा असा बोजवारा १९२८ सालीं झाला, पण यापूर्वी १९२४–२५ सालीं दिल्ली येथे अशाच सर्वपक्षीय परिषदा भरल्या होत्या. पहिली १९२४ च्या सप्टेंबर अखेर भरली. तींत हिंदु–मुसलमानांत ऐकीचा ठराव करणें व गांधींना उपोषणापासून निवृत्त करणें हा विषय होता. या परिषदेला १९२८ च्या परिषदेपेक्षा अधिक गर्दी होती. आणि तिला कित्येक मौलवीहि हजर होते. ही सभा २ आक्टोबरपर्यंत चालून तींत हिंदु–मुसलमानांच्या समेटाचीं पुष्कळ उपयुक्त कलमें ठरलीं. सर्व जातीय तटे तोडण्याकरितां राष्ट्रीय पंचायत म्हणून मंडळ स्थापावें असें ठरलें. आणि शेवटीं गांधींनीं उपोषण सोडलें. या समेटाच्या ठरावाचीं दहा कलमें असून, माझ्या दृष्टीनें, त्यांत हिंदु मुसलमानांच्या धार्मिक विरोधाच्या कलहाचा प्रश्न चांगला तपशिल-वार सोडविला आहे. फक्त या परिषदेंत या कलहाचा राजकीयदृष्ट्या निर्णय झाला नाही. हा दस कलमी ठराव त्या वेळच्या वर्तमानपत्रांत वाचा-वयास सांपडेल. ( १९२४ च्या आक्टोबरचा पहिला आठवडा. ) नवीन स्वराज्यपक्ष व राष्ट्रीय सभा यांचाहि यावेळीं थोडाबहुत समेट झाला. कारण यावेळीं राष्ट्रीय सभा पडतें घेऊं शकत होती. हल्लीप्रमाणें तिच्यावर अहं-काराचा मद चढला नव्हता, व इतर पक्षोपपक्षांशी सहकारिता सहविचार करण्याने तिची हल्लीसारखी बेअब्रू होत नव्हती.

## जिनांचें पूर्ववृत्त

बॅ. जिना यांचें पूर्ववृत्त प्रसिद्ध असल्याने, राजकारण व जातीय कलह या दोनहि बाबतींत त्यांची परागति किंवा पुच्छागति होत आहे असेंच म्हणावें लागतें. उदयोन्मुख बॅरिस्टर म्हणून स. १९०६ सालीं सर फेरोजशहा

यांच्या पंखाखाली ते नांवारूपाला आले. १९१६ सालीं लखनौ येथील राष्ट्रीय सभेंत ते प्रमुखपणें सामील होते. पुढे लॉर्ड विलिंग्डन यांच्या मुंबईच्या कारकीर्दींत त्यांनी होमरूल चळवळींत प्रमुख भाग घेतला. आणि परवा मुंबई हायकोर्टांत ज्या दिवाणखान्याचा ( कॉंग्रेस जिना हॉल ) दावा निकालांत निघाला तो जिना यांच्या पूर्वीच्या राष्ट्रीय वृत्तीचें स्मारकच आहे. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीपासून ते कॉंग्रेसपासून फुटून निघाले. आणि १९२० सालीं नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत गांधीला मी महात्मा नाही म्हणणार मिस्टर म्हणेन, या मुद्द्यावर त्यांनी हमरी तुमरी केली.

तथापि त्यांचें राष्ट्रीयत्व अद्यापि लुप्त झालें नव्हतें. १९२४ साली दिल्ली सरकारने 'रिफॉर्म्स एन्क्वायरी कमिटी' म्हणून अेक मंडळ नेमलें. त्याने १९१९ च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्यांत काय सुधारणा कराव्यात यावर रिपोर्ट सादर केला. त्यांत सरकारी कलाच्या सभासदांचें बहुमत असून त्यांच्या रिपोर्टाला अेक 'मायनॉरिटी रिपोर्ट' म्हणून जोडला गेला. त्यावर सर तेजबहादुर सप्रू, सर शिवस्वामी अय्यर, डॉ. रघुनाथराव परांजपे यांचे बरोबर बॅ. जिना यांची सही आहे. येथे सांगण्याचा मुद्दा हाच कीं, त्या रिपोर्टांत जिना यांनी असें मत दिलें आहे की, 'हिंदुस्थानांतील जातीय कलहामुळे त्याची राजकीय प्रगति थांबण्याचें कारण नाही.' जिना म्हणतात—

" It will give a totally wrong impression of the political attitude of the Mohamedan community to say that being afraid of political power passing into the hands of the Hindu majority, they are as a community opposed to responsible Government. "

याला आधार म्हणून बॅ. जिना यांनी मुस्लिम लीगचा ठराव उद्धृत केला आहे, व त्यांत प्रगतीचीं व कलह निवारण्याचीं मूलभूत तत्त्वें मांडलीं आहेत. तीं येथे दिल्यास विस्तार होईल पण वाचकांनी तो रिपोर्ट मिळवून पहावा. १९२४ सालीं जिना यांनी दिल्ली विधिमंडळांत नव्या स्वराज्य पक्षाशी मिळून प्रथम काम केलें, पण पुढे सर्वपक्षीय परिषदेच्या वेळीं ते विथरल्यासारखे दिसू लागले. ते परिषदेला हजर रहात नसत, आले तर नीट

बोलत नसत, बोलले तर म्हणत की, मुसलमान ‘ हटवादी ’ कां म्हणाना, ते अयुक्तवादी (unreasonable) असेंहि हवें तर म्हणा, पण मागतात तें द्या. हें मी स्वत: पाहिलें आहे. १९३१ च्या गोलमेज परिषदेपासून ते आणखी बिथरले आणि १९३२ ची कायदेभंगाची चळवळ आणि त्यानंतर काँग्रेसच्या मंत्रिमंडळांचा कारभार यांचें निमित्त करून ते इतके दूर झटकले की, आता कांग्रसने अगदी बरोबरीचें नातें मान्य केल्याशिवाय ते गांधींशी किंवा जवाहरलाल नेहरूंशी बोलूंहि इच्छीत नाहीत.

बॅ. जिना यांचें साद्यंत चरित्र देण्याचा हेतु इतकाच की, आज जिना यांना वगळून मुसलमानांशी समेट होणें शक्य नाही. जुने नवे मुसलमानांतील पक्ष एरवी आपापसांत भांडत असले तरी काँग्रेसशी लढण्यांत एक आहेत. मौलवी मौलाना मागे पडले असून जिना हे ईदच्या प्रार्थनेंत सामील होऊ लागले आहेत, आणि ते ईश्वरभक्तीचा उपदेश करू लागले आहेत ! ! या सर्वांचा अर्थ काय हें मी सांगावयास नको.

---

## ( लेखांक ९ वा )

## अपयशाचें मर्म

ज्या बॅ. जिनांचा उदय राष्ट्रीय भावनेंतून झाला त्यांची जर ही कथा तर जिवाभावाने श्रद्धेने धर्मांध असलेल्या इतर मुसलमान पुढाऱ्यांची मन:स्थिति खरी कशी असेल याचा वाचकांनीच विचार करावा. १९२४ सालीं दिल्ली विधिमंडळांत पं.नेहरूंनी स्वराज्य पक्ष स्थापला त्याच्या ‘व्हिप’चें काम मजकडे असतां, दुय्यम व्हिपचें काम करणारे बिहारचे एक मुसलमान सभासद होते. परंतु पुढे दोन वर्षांत ते स्वराज्य पक्ष सोडून गेले आणि कट्टर मुसलमानांचे आपल्या प्रांतांतले पुढारी झाले. डॉ. अन्सारी, बॅ. शेरवानी,हकीम अजमलखान, मौलाना आझाद इत्यादि ५-४ मुसलमान गृहस्थ सोडले तर, अखेरपर्यंत राष्ट्रीय वृत्ति धारण केलेले आणि हिंदु-मुसलमान प्रश्नाची अडचण उत्पन्न न करणारे, असे कोणीहि मुसलमान मला आढळले नाहीत.आणि फिरून त्यांतल्या त्यांत पहातां असें दिसलें की, डॉ. अन्सारी व मौलाना

आझाद यांच्या आग्रहामुळेच काँग्रेसने 'कम्युनल अवार्ड' चा स्पष्ट शब्दांनी निषेध करण्याचें टाळलें. अन्सारी हे स्वातंत्र्य मागण्यांत काँग्रेसच्या बाजूला होते. परंतु पुढे पुढे जातीय मतदारसंघाविषयी त्यांचें धोरण जिनांच्या धोरणाहून फारसें वेगळें नव्हतें. तसेंच विधिमंडळांत मुसलमानांना जागा किती असाव्या, याबद्दलहि गांधी किंवा काँग्रेस यांच्याशी सहमत असलेले मुसलमान पुढारी जास्तींत जास्त म्हणजे, संयुक्त मतदारसंघाच्या योजनेला मान्य झाले असते; परंतु नेहरू रिपोर्टांतील निवडणुकीच्या इतर योजनेला ते मान्य झाले नसते.

ही योजना अशी आहे की, भाषावार प्रांतरचना करून प्रत्येकांत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणाने जागा द्याव्या व त्या त्यांजकरिता राखून ठेवाव्या. या राखीव जागा त्यांच्या पदरांत पडावयाच्या तर त्या संयुक्त मतदारसंघांतूनच पडाव्या; मात्र सर्वसाधारण निवडणुकींत उभे राहून मुसलमानांनी जर आणखी जागा मिळविल्या तर त्याविषयी त्यांना मनाई नसावी. पण नेहरू रिपोर्टला मुसलमान पुढाऱ्यांनी कधीच संमति दिली नाही. आणि आज बॅ. जिना यांच्या १६ मागण्या याच जागा धरून वळकट बसल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्या पलिकडे मजल जाऊन पाकिस्तानची योजना दृढमूल होऊं पहात आहे. यावरून पुन: एकदा आपखुषीने किंवा सक्तीने हिंदु व मुसलमान पुढारी भावी राज्यघटनेचा निर्णय करण्याकरिता एकत्र बसले तरी काय निकाल लागेल याचा अंदाज करता येतो. खुशाल प्रयत्न करून पाहावा.

## गांधींचा कोरा चेक

गेल्या २५वर्षांच्या राजकारणांतील अनेक चमत्कारांपैकी सर्वांत मोठा मला हा वाटतो की,हिंदु पुढाऱ्यांनी मुसलमानांची मनधरणी करण्याचा जो जो प्रयत्न केला तो सर्व विपरित परिणामी झाला. या मनधरणीचा प्रारंभ१९१६ च्या लखनौ काँग्रेसमध्ये लोकमान्य टिळकांनी केला असें म्हणण्यांत येतें व तें खरें आहे पण लखनौच्या करारांत सवत्या सुभ्याच्या योजनेला व मुसलमानांना लोकसंख्याप्रमाणाच्या बाहेर प्रतिनिधि देण्याला, जी १० वर्षांची

मुदत घातली होती ती टळल्यावर मुसलमानांनी कोणतें धोरण स्वीकारलें हें पहाण्याला टिळक जगते तर ते मनधरणीचा नाद पुढे सोडते असें मला वाटतें.

गांधींसारखा कोरा चेक मुसलमानांना देण्याला ते कधीहि तयार झाले नसते. पण मौज ही की, मनधरणीकरिता गांधींनी जो कोरा चेक दिला त्याची वाट काय झाली? कोऱ्या चेकचा अर्थ असा की, तो देणाऱ्या मालकाने सही केली आहे व घेणाराने आपल्या हाताने हवा तो आंकडा वर घालावा पण या कोऱ्या चेकची दुहेरी बेअब्रू झाली! हिंदु समाज म्हणाला की, "असा चेक देण्याचा अधिकार गांधींना काय? राज्याधिकारांतील हिंदूंची वांटणी किंवा हिस्सा ही कांही गांधींची वडिलार्जित किंवा स्वार्जित मिळकत नव्हे ती परस्पर देऊन टाकणारे गांधी कोण"? पण याहून मोठी बेअब्रू ही की ज्याला तो चेक लडिवाळपणाने प्रेमाने दिला तें लाडावलेलें मूल तो चेक हातांतहि धरीना! गांधींच्या या कोऱ्या चेकाच्या देणगीचें सत्त्व मुसलमान पुढाऱ्यांनी शब्दशः कां घेतलें नाही? त्यांनाहि हा चेक अनधिकाराने दिला असें वाटलें की काय? किंवा तो आपल्या हाताने भरून घेतला तर तो खोटा ठरवून ब्रिटिश सरकारची बँक तो अमान्य करील असें त्यांना वाटलें? तात्पर्य, या कोऱ्या चेकच्या भाषेने अिष्ट व्यवहार तर कांही साधलाच नाही, पण विद्वेष व उपहास हीं मात्र गांधींच्या पदरांत पडलीं. मुसलमानांची मनधरणी करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करणारा गांधींसारखा दुसरा कोणी मनुष्य हिंदुस्थानांत आजवर झाला असें वाटत नाही. असें असतां जिनांकडून होणारी गांधींची हेटाळणी पाहिली म्हणजे तें दैवदुर्विलसिताचें अत्यंत नमुनेदार उदाहरण म्हणावेंसें वाटतें.

## दुसरें उदाहरण आंबेडकरांचें

तसलेंच दुसरें उदाहरण आंबेडकरांचें. अस्पृश्यता नाहीशी करण्याचाहि प्रयत्न गांधींइतका आजवर दुसऱ्या कोणी केला असें मला वाटत नाही. शिवाय या कार्यांत सर्व सुशिक्षित हिंदु समाजाचा त्यांना पाठिंबा होता. अस्पृश्यता घालविण्याकरिता गांधींनी प्राणान्तिक उपोषणाचीहि प्रतिज्ञा केली असें असतां डॉ. आंबेडकरांइतका गांधींना नांवें ठेवणारा टीकाकार आढळणें कठीण.

वरील दोन चमत्कारांचा अर्थ करावयाचा तरी कसा, लावावयाचा तरी कसा, हा मोठाच प्रश्न आहे. सामाजिक मानसशास्त्रवेत्त्यांनाहि त्याचें समाधानकारक उत्तर देणें कठीण जाईल. त्याचें उत्तर मी स्वत:पुरतें इतकेंच देईन की, "कोणाची मनधरणी करणें, सामाचा मार्ग अनुसरणें, हें इष्ट व शिष्टसंमत असलें तरी त्याचें योग्य म्हणून कांही एक प्रमाण आहे. पण तें प्रमाण सुटलें म्हणजे हटकून प्रतिक्रिया होते. मुसलमानांची मनधरणी करण्यांत गांधींनी कांही शिल्लक ठेवलें नाही असें असतां, मुसलमानांनी ज्या मागण्या मागितल्या आहेत त्याहून अधिक अतिगामी किंवा अन्यायाच्या मागण्या हिंदु महासभा ही मुसलमानांना एकटीच प्रतिपक्षी असती तरीही त्यांना करण्याला सुचलें असतें असें वाटत नाही."

## घटना-समितीची योजना

असो. मग हा तिढा कॉंग्रेसने मागितलेल्या घटना समितीने तरी सुटणार आहे काय? दुर्दैवानें या मागणीची तपशीलवार रूपरेखा ज्याची त्यानेंहि अद्यापि स्पष्टपणें पुढे मांडलेली नाही. ज्या समितीच्या हातीं घटना तयार करण्याप्रमाणे ती अमलांत आणण्याचें लष्करी सामर्थ्य असेल तीच खरी घटना समिति ठरते! जगांतील निरनिराळ्या राज्यांच्या घटना आजवर कोणी कशा कोणत्या परिस्थितींत केल्या हें पाहिलें म्हणजे माझें वरील विधान खरेंच ठरेल. पण अखेर कायदा करण्याची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटच्या हातीं असतां, द. आफ्रिकेंतील फेडरेशन निश्चित होतांना ब्रिटिश सरकारने एक घटना समिति नेमली होती तिचें उदाहरण कॉंग्रेस पुढाऱ्यांनी आपल्या डोळ्यापुढे ठेवलें असल्यास नकळे! चेंबरलेन-प्रधानमंडळाने घटना समितीची ही मागणी मान्य केल्यास बरेंच होईल. पण हिंदुस्थानांतील प्रत्येक अठरा किंवा २१ वर्षें वयाच्या मनुष्याला या समितीचा मतदार बनविल्याने मतदारसंघांची बेसुमार संख्या किती निर्माण होईल? त्यांच्या हातून सर्व देशभर निवडणुका घडविण्याचें काम कोण करणार? या मतदारसंघांच्या याद्या करणार की तोंडी निर्वाह करणार? या मतदारसंघांनी निवडलेले जे प्रतिनिधि घटना समितींत बसावयाचे त्यांची संख्या किती असणार? त्यांत जातवार प्रतिनिधि किती व कोणते घेणार? घटनेची चर्चा कोणत्या

नियमाने होणार ? इत्यादि प्रश्न डोळ्यापुढे आले म्हणजे त्यांचीं उत्तरें मला तरी सुचत नाहीत. काँग्रेस पुढाऱ्यांच्या मनांत तीं असलीं तर त्यांनी तीं एकदा जाहीर केलेलीं बरीं ! मला स्वतःला असें वाटतें की, अॅडल्ट फ्रॅन्चाईजच्या तत्त्वावर घटना समिति निवडण्यापेक्षा, आज सर्व वरिष्ठ व कनिष्ठ कायदेमंडळांत मिळून जे लोकनियुक्त सभासद आहेत तेच घटना समितीचे सभासद कां समजू नयेत ? हीच संख्या इतकी मोठी होईल की, तिने एकत्र बसून स्वराज्य राज्यघटनेचीं कलमें ठरविणें हा विचारच दुर्घट किंवा हास्यास्पदहि वाटतो. कांग्रेसच्या विषयनियामक कमिटीने बनवलेले ठराव 'डंका बजाव' पद्धतीने कांग्रेसच्या अधिवेशनांत पास करून घेणें, आणि राज्यघटनेचीं कलमें ठरविणें हीं एकच नव्हत हें कोणीहि कबूल करील. पण येथे मला सांगण्याचा विशेष मुद्दा हा की, कोणत्याहि स्वरूपाची लहान अगर मोठी घटना समिति तयार केली, तरी तींत अल्पसंख्य बहुसंख्य यांच्या प्रश्नावर एकमत होण्याचा संभव मला तरी दिसत नाही.

## आपसांत समजूत होत नाही

जातीय प्रश्नांची व मतांची अडवणूक समितीच्या निवडणुकीपासून अखेर निर्णयापर्यंत एकसारखी होत राहील यांत मुळीच शंका नाही. आणि असें झालें म्हणजे या मतभेदाचें प्रदर्शन जगापुढे करून 'स्वराज्यदानाला हिंदुस्थानचे लोक अजून पात्र नाहीत' असेंच ब्रिटिश सरकार म्हणत उठणार! १९२४ पासून भरलेल्या सर्वपक्षीय परिषदांचें वृत्त जे वाचक वाचतील त्यांना हें दिसून येईल की, मुसलमानांच्या मागण्या काय आहेत हें कळावयाचें आता शिल्लक बाकी राहिलेलें नाही,आणि दुसरें हेंहि कळून चुकलें आहे की, स्वराज्यप्राप्तीकरिता, म्हणजे या मोठ्या ध्येयाकरिता, आपल्या मागण्यांचा आग्रह सोडण्यास मुसलमान तयार नाहीत. किंबहुना कांग्रेसला ज्या प्रकारचें स्वातंत्र्य पाहिजे त्या प्रकारचें स्वातंत्र्य मुसलमानांना हवें आहे असेंहि वाटत नाही मग याचा निर्णय लागावयाचा तरी कसा? त्याला माझें उत्तर हेंच आहे की, जें ब्रिटिश सरकार घटनासमिति देईल त्याला जातीय कलहांत खरें न्यायाचें काय आहे हें समजतें. तितकें तें सुबुद्ध आहे, शिवाय लीग ऑफ नेशन्सचे दाखले अगदी तपशिलवार कलमवार त्याच्यापुढे आहेत. या-

मुळे इतर रीतीने स्वराज्याची घटना वहाल करण्याचें त्यांच्या मनांत असल्यास अल्पसंख्यांच्या भांडणावर अडून बसण्याचें त्यांना कारण नाही, किंवा हा प्रश्न आपल्या अधिकारांत न सोडवितां एखाद्या पंचमंडळाकडे किंवा न्यायाधीश मंडळापुढे सोपवावा असें वाटल्यास तें करतां येईल इतकेंच नव्हे तर, हिंदु–मुसलमानांना तो निर्वाणीचा उपाय मान्य करण्याशिवाय गत्यंतर उरणार नाही. कॉंग्रेस मंत्रिमंडळांच्या राज्यांत मुसलमानांवर जुलूम झाले की नाही, याचा निर्णय व्हाइसरॉयसाहेबाचे हातून घेण्याला जे जनाब जिना तयार झाले आहेत ते अल्पसंख्यांचा प्रश्न तिऱ्हाईत न्यायाधीशाकडून सोडवून घेण्याला मान्य झालेच पाहिजेत.

तात्पर्य, आपसांत समजूत होण्याची आशा व्यर्थ आहे हेंच जुना इतिहास सांगतो. जगांतील वादीप्रतिवादी हवे तितके समंजस असते तर न्यायकोर्टें, बेलिफ, पोलीस, व लष्करी शिपाई यांचें करणच पडलें नसतें !

---

## (लेखांक १० वा)

## व्यावहारिक अनुभव

कित्येकांना असें वाटतें की, १९३५ च्या कायद्याप्रमाणे प्रान्तानिहाय मंत्रिमंडळें स्थापन झालीं म्हणजे तीं मंडळें हा जातीय प्रश्न यशस्वी रीतीने सोडवितील. कारण बहुसंख्य प्रतिनिधि मंत्रिमंडळाला अल्प संख्यांना न्यायाने वागविण्याची जबाबदारी अधिक भासूं लागेल. मनुष्य नुसता तोंडाने वावदुकी पद्धतीने बोलत असतो तोंपर्यंत तो केवळ तात्त्विकतेच्या ऐटीने कांहीहि बोलत असतो. पण हातीं अधिकार पडून तो प्रत्यक्ष चालविण्याची वेळ आली म्हणजे व्यवहारांतील तारतम्य काय असतें. आणि कोणत्याहि ठिकाणीं पडलेली अवघड घडी कशी नीट साफ करून घ्यावी लागते, हें त्याला कळतें.

## तात्त्विक विचार व प्रत्यक्ष अनुभव

पण हें बोलणें देखील तात्त्विकच ठरतें. कारण अलीकडे प्रत्यक्ष अनुभव आला तो फारसा अनुकूल नाही. काँग्रेस मंत्रिमंडळें सात प्रांतांत बनलीं, व तेथे त्यांनी आपल्या समजुतीप्रमाणें अल्पसंख्यांना न्यायाने वागविलें. पण उलट मुसलमान काय म्हणतात पहा ! बॅ. जिना व त्यांचे कट्टे अनुयायी अगदी प्रतिज्ञा करून चंग बांधून बोलत आहेत की, "काँग्रेस मंत्रिमंडळांनी प्रान्तानिहाय मुसलमानांवर जुलूम केले, अन्याय केले. आणि 'या आरोपांचा भरपूर पुरावा आपल्याजवळ असून प्रिव्हि कौन्सिलच्या एखाद्या न्यायाधीशापुढे तो आपण मांडण्यास तयार आहों" असें जनाब जिना छातीला हात लावून सांगत आहेत.

दुर्दैवाची मौज ही की, कित्येक हिंदु पुढाऱ्यांनीं काँग्रेस मंत्रिमंडळांवर बरोबर याच्या उलट प्रकारचे आरोप केले आहेत. म्हणजे काँग्रेसच्या मुसलमानधार्जिणेपणामुळे, किंवा अल्पसंख्यांविषयी फाजील उदार बुद्धीमुळे काँग्रस मंत्रिमंडळांतील हिंदूंनी मुसलमानांना पक्षपात दाखवून हिंदूंच्या हक्कांची पायमल्ली केली. आणि याला प्रत्यंतर म्हणून त्यांना हें दाखवितां आलें की, संयुक्त प्रान्ताचे मुख्य प्रधान यांनीच आपल्या तोंडानें प्रसिद्ध केलें की, 'पहा ही आमची न्यायबुद्धि ! पहा ही आमची अधिकारपात्रता ! कारण आम्ही आपल्या कारभारांत मुसलमानांनाच सवलती अधिक दिल्या व देणें योग्य नव्हत्या अशाहि दिल्या !

## मुसलमानी कारभाराविषयी पुसूच नका

ही झाली काँग्रेस मंत्रिमंडळांची गोष्ट. पण बंगाल व पंजाब या दोन प्रांतांत मुस्लिम मंत्रिमंडळें बनविलीं गेलीं त्यांच्या जातीय कारभाराला तरी तेथील हिंदूंनी भलेपणाचें सर्टिफिकेट दिलें काय ? या दोनहि प्रांतांत एखाददुसरा हिंदु प्रधान मंत्रिमंडळांत समाविष्ट करून घेण्यांत आला होता; आणि अशा संमिश्र मंडळाचा कारभार बरा चालतो अशी परवापर्यंत समजूत होती. पण बंगालच्या प्रधानमंडळांत प्रथमपासून असलेले नलिनीरंजन सरकार यांनी, युद्धविषयक ठरावाला विरोध करून

राजिनामा दिल्यावर जो खुलासा केला, त्यांत मुस्लिम प्रधानवर्गाच्या धोरणाविषयी काय लिहिलें आहे तें पहा.

आता उरलें पंजावचें प्रधानमंडळ त्याचीहि हकीकत सांगतों. केसरीच्या वाचकांना हें आठवत असेल की, कांही दिवसांपूर्वी पंजावचे मुख्य प्रधान सर शिकंदर हयातखान यांनी वृत्तपत्रप्रतिनिधीला मुलाखत देतांना असें सांगितलें की, 'माझ्या प्रान्तापुरता हिंदु-मुसलमानांचा प्रश्न मी सोडविला आहे. लोकांची समजूत अशी होती की, शिकंदर हयातखान हे पंजावी मुसलमान असले तरी तितके कट्टर नाहीत. आणि परवा परवापर्यंत ते बॅ. जिनांशी पूर्णपणें सहमत नव्हते. परंतु अलिकडे मुस्लिम लीगचा सर्वाधिकार त्यांनी उघडपणें मान्य केला. तरी अजून ते म्हणतात की, १०।१२ प्रतिष्ठित हिंदु-मुसलमान पुढारी एकत्र विचाराकरिता बसले तर, हे प्रश्न सुटतील. पंजाव हें मुसलमानी सत्तेचें व भावनेचें केंद्र असल्यामुळे, तेथे जर हिंदुमुसलमानांचा प्रश्न खरा सुटला असेल तर फार चांगलें झालें ! म्हणून सर शिकंदर हयातखान यांची मुलाखत मी वाचली तेव्हा मला ती कौतुकास्पद वाटली. पण दुसरी बाजू कळावी म्हणून मी लाहोरच्या माझ्या कांही मित्रांना पत्रें लिहून ती मागविली तेव्हा त्यांचीं जीं उत्तरें आलीं, त्यांवरून असा निष्कर्ष काढावा लागला कीं, शिकंदर हयातखान म्हणतात त्याप्रमाणें हा जातीय प्रश्न उभय पक्षांना समाधानकारक रीतीने पंजाबांत सुटलेला नाही ! कसें तें पहा--

## पंजाबांतील हिंदु पुढाऱ्यांचे अनुभव

माझ्या पत्राला उत्तर देतांना (लाहोरचे) राजा नरेंद्रनाथ लिहितात, " शिकंदर हयातखान म्हणतात त्याप्रमाणे पूर्वी इकडे एक ऐक्य-परिषद म्हणून भरली होती खरी. तिच्या दोन तीन बैठकाहि झाल्या. पण निर्णय असा कांहीच झाला नाही. हिंदूंना असा संशय येत होता की, या ऐक्य-परिषदेंतून मुसलमानांना हल्ली आहेत याहून कांही अधिक सवलती व हक्क द्यावे असा डाव कदाचित् असेल. हिंदु व मुसलमान यांनी मिळून एकत्र येऊन कांही सण-समारंभ साजरे करावे म्हणजे ऐक्य वाढेल असा एक बूट निघाला होता. पण मुसलमानांना मनातून ही गोष्ट मुळीच पसंत नव्हती. पंजाबांत

नोकऱ्या देणें, वढती करणें या कामीं प्रधानमंडळ हिंदूंना न्यायानें वागवीत नाही, त्यांना मागे ठेवतें, अशी तक्रार आहे. पण असें असतांहि मुसलमान आहे यावर संतुष्ट नाहीत. माझें (राजा नरेंद्रनाथ यांचें) मत असें आहे की, हल्लीच्या राज्यघटनेंत मूलग्राही असा फरक झाला पाहिजे, जातवार मतदारसंघ काढून टाकले पाहिजेत, आणि सरकारी नोकऱ्या देणें हें सर्वस्वी उमेदवाराच्या पात्रतेवर अवलंबून ठेवलें पाहिजे. जातीशी व धर्माशी असलेला या गोष्टीचा संबंध तोडून टाकला पाहिजे पण आहे स्थिति अशीच टिकेल तर, वर सांगितलेलें ध्येय पदरांत पडणें मुष्कीलीचें होईल." राजा नरेंद्रनाथ हे पंजाबांतील एक पहिल्या प्रतीचे जमीनदार व हिंदु पुढारी आहेत.

सर गोकुळचंद नारंग हे लाहोर येथील विख्यात वकील, अत्यंत सुविचारी पुढारी व विद्वान गृहस्थ अशी ख्याती आहे. ते मला पाठविलेल्या उत्तरांत म्हणतात–

"सर शिकंदर हयातखान हे प्रधानमंडळ बनवून स्वतः मुख्य प्रधान झाले तेव्हा त्यांनी जातीय ऐक्याविषयी एक परिषद भरविली होती हें खरें आहे. पण तींतून कांहीच निष्पन्न झालें नाही. म्हणून ती परिषद तशीच टाकून द्यावी लागली. सर शिकंदर म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी पंजाबांतील हिंदु–मुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न मुळीच सोडविलेला नाही. तसाच इतर कोणत्याहि प्रांतांतला! ते मुख्य प्रधान होण्यापूर्वी पंजाबांत जी स्थिति होती तीच आजहि आहे. याविषयी कलकत्ता येथील 'करंट रेव्ह्यू'च्या गेल्या आक्टोबरच्या अंकांत मी एक लेख लिहिला आहे तो वाचून पहा म्हणजे याविषयी पुष्कळ माहिती मिळेल. सर शिकंदर हयातखान यांच्या विधानाला अनुलक्षून डॉ. गोपीचंद भार्गव यांनीं जाहीर उत्तरें दिलीं आहेत तीं तुम्ही वाचलीं असतीलच."

डॉ. गोपीचंद भार्गव हे पंजाबांतील कॉंग्रेस पक्षाचे, व पंजाब विधिमंडळांतील कॉंग्रेस सभासदांचे पुढारी आहेत. त्यांचेंहि माझ्या पत्राला उत्तर आलें. त्यांत ते म्हणतात,

"१९३७ सालीं लाहोर येथे एक ऐक्य–परिषद म्हणून भरविण्यांत आली होती तिचा रिपोर्ट छापलेला नाही. पण तींत झालेल्या ६ ठरावांची

प्रत करून या सोबत पाठवीत आहें त्यावरून कळेल. यापैकीं ठराव नं. २ असा आहे, 'सरकारी व स्थानिक स्वराज्यांतील नोकऱ्यांविषयी धोरण ठरवावयाचें तें प्रधान–मंडळानेंच ठरवावें.' नं. ४ च्या ठरावांत म्हटलें आहे की, 'विधिमंडळामध्ये निवडणुकी होण्यासंबंधानें एखादी नवी व हल्लींहून अधिक चांगली योजना झाली तर हवी आहे. पण ती सर्वसंमत अशी असली पाहिजे.' या योजनेचा सांगोपांग विचार करण्याकरिता ७ गृहस्थांचें एक उपमंडळ नेमलें आहे. यांत तीन मुसलमान, दोन शिख व दोन हिंदु सभासद नेमण्यांत आले. या कमिटीनें स्थानिक स्वराज्य संस्थांचाहि विचार करणेचा होता हाच काय तो ठराव मुख्य व विधायक स्वरूपाचा होता, पण या उपमंडळाचें कार्य पुढे झालेंच नाही. या ऐक्य–परिषदेंत इतर कांही ठराव मामुली स्वरूपाचे झाले. त्यांत जातीय तेढ वाढवूं नये, कोणीहि आपल्या हातीं कायदा घेऊं नये, मारामाऱ्या करू नयेत, इत्यादि ठराविक मोघम शांतिपाठाचीं सूत्रें होतीं."

वरील हकीगतींवरून हें दिसून येईल की, हातीं अधिकार असलेल्या मंत्रिमंडळाकडून हा प्रश्न सुटेल असें जें कित्येकांना वाटतें तोही निव्वळ भ्रम होय.

## ना. आगाखानहि हा प्रश्न सोडवूं शकत नाहीत

या शिवाय आणखीहि कांही मार्ग आशाळभूत लोकांना दिसत असतात. त्यांतल्या एकाचा संबंध आगाखानांशी लावण्यांत येतो. तो असा की, या लोकांच्या मतें "आगाखान हेच मुसलमानांचे खरे व एकमेव पुढारी आहेत; आणि समेटाचीं सगळीं सूत्रें त्यांच्या हातीं आहेत; तीं बॅ. जिनांच्या हातीं नाहीत किंवा मौलवी लोकांच्या हातीं नाहीत.' आणि ही भोळी समजूत असलेल्या लोकांची दृष्टि आगाखानांच्या हालचालीवर टपून बसलेली असून, या हालचालीकडे ते एखाद्या शकूनवंतीप्रमाणे पहात असतात. पण त्यांना हें माहीत नाही की, आगाखान हे इतक्या उंचीवरून हिंदुस्थानाकडे पहातात की, त्यांना हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष स्थिति फार थोडी दिसते. त्यांचें संस्थान नसूनहि ते संस्थानिक आहेत. त्यांचें वास्तव्य नेहमी युरोपांत असतें. फक्त हिवाळ्यांत तेवढे हवा पालटण्याकरितां ते इकडे येतात तेव्हा विलाय-

तेंतील प्रधान मंडळाकडून एखादा गुप्त संदेश घेऊन येतात, आणि तो इकडील मुसलमान पुढाऱ्यांच्या कानांत सांगतात. परंतु कोणतीहि भानगड हातीं घेऊन जबाबदारीने तिचा निकाल करण्याइतकी त्यांना कळकळ नाही किंवा अधिकारहि नाही. मी तिसऱ्या गोलमेज परिषदेला गेलों तेव्हा मौज पाहिली की, पहिल्या दिवशीं सर्व बिनसरकारी सभासदांचें प्रतिनिधित्व, त्यांना कोणी दिलें नसता त्यांनी तें आपणाकडे घेतलें आणि थाटाने उभे राहून सर्व बिनसरकारी प्रतिनिधींचे पुढारी म्हणून आभार-प्रदर्शन केलें. पण दुसऱ्या दिवसापासून ते जे अदृश्य झाले ते जवळ जवळ सर्व काळ अदृश्यच! ब्रिटिश प्रधानमंडळाच्या हातचें ते एक बाहुलें आहेत, पण त्यांच्या हातचें ते शस्त्र नव्हेत.

## दोन्ही प्रश्नांची गल्लत करू नका

तात्पर्य, आज सामोपचाराने, सहविचाराने, सलोख्याने हा जातीय प्रश्न सुटावयाचा तर त्याच्या मार्गांत या अनंत अडचणी आहेत. सर्वांत मुख्य अडचण ही की, काँग्रेस ही ब्रिटिश सरकारशी बोलणें चालणें करण्याचा हक्क मक्तेदारीप्रमाणें सर्व आपणाकडे आहे असें म्हणत आहे आणि इतर सर्व वर्ग तो हक्क नाकबूल करीत आहेत. प्रमुख=सर्व हें समीकरण होऊं शकत नाही हें काँग्रेस अधिकारमदाने विसरली असें म्हणावें लागतें. पण १९२८ प्रमाणे काँग्रेसने पुढाकार घेऊन, इतर अनेक संस्थांना बरोबरीच्या नात्याने सहविचाराकरिता पाचारण केलें तरी एकमुखी निर्णय लागेल काय ? आज काँग्रेस म्हणते; 'आधी स्वातंत्र्य व मग अल्पसंख्यांच्या हक्कांचा निर्णय', त्यावर सरकारचें उत्तर हें की, 'आधी अल्पसंख्यांचा प्रश्न सोडवून दाखवा मग स्वराज्याची मागणी करा!' पण या दोन गोष्टी कांही अंतरावर चक्राकार एकमेकांभोंवती फिरत राहिल्या म्हणजे संपलेंच! त्यांचा निर्णय केव्हाच लागणार नाही. स्वातंत्र्य मिळालें तरी अल्पसंख्यांचे प्रश्न शिल्लक उरतात हें युरोपांतील स्थितीवरून कोणाच्याहि लक्षांत येईल.

यामुळे अल्पसंख्यांचा प्रश्न हा स्वराज्यांतील अनेकांपैकी फक्त एक प्रश्न अितकाच याचा अर्थ समजावा. त्याचा स्वातंत्र्याशी मेळ घालणें चुकीचें

आहे. कारण " जातीय प्रश्न सुटून आमचें एकमत झालें" असा ठराव कागदावर लिहून हिंदुमुसलमानांनी मिळून तो सरकारकडे पाठविला तरी सरकार तावडतोब स्वातंत्र्य देणार आहे काय? म्हणून विचारवंतांनी स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग आणि जातीय प्रश्न सुटण्याचे मार्ग यांचा स्वतंत्र दृष्टीने वेगळेपणाने विचार करावा. एकाचे पाय दुसऱ्याच्या पायांत अडकवून उगाच गोंधळ घालू नये. आणि हा गोंधळ घालणें हें फक्त सरकारच्या सोयीचें आहे हें लक्षांत ठेवावें !

---

# ८. प्रवाही राजकारण

(वाङ्मयशोभा मे १९४१)

यंदाच्या वसंत व्याख्यानमालेचें उद्घाटन श्री. न.चिं. केळकर यांच्या व्याख्यानाने झालें. 'ही माला व आपण समवयस्क आहों व तिच्याशी आपलें नातें गेलीं ३५ वर्षे जडलेलें आहे' असें प्रथम सांगून, केळकर यांनीं आयत्या वेळचा विषय म्हणून (कारण न्यायमूर्ति जयकर हे आदले दिवसापर्यंत येणार होते ते अखेर आले नाहीत) 'प्रवाही राजकारण' हा घेतला. ते म्हणाले:–

"राजकारणाला प्रचलित हें नांव देतात त्यापेक्षा प्रवाही हें नांव मला अधिक बरें वाटतें. प्रचलित या शब्दानें जागच्या जागीं हलविलेलें, चाळविलेलें असा अर्थ होतो. पण राजकारण हें तळचांतल्या तळचांत हलविलेल्या पाण्यासारखें नसून त्याला अखंड प्रवाहाचें रूप आहे. राजकारण ही एक नदी आहे. तिचा उगम कोठे झाला, केव्हा झाला, हें कळतें; पण तिचा अन्त कोठे होणार, तिचें मुख कोणतें, हें सांगतां येत नाही. राजकारणांतील 'राज' या शब्दावरून त्याचा उगम राजसंस्थेंतून आहे असें वरवर वाटतें. पण त्याचा खरा उगम मनुष्य समाजाच्या जन्मापासून आहे.

या राजकारणी नदीला पंचगंगा असें म्हणावें. जुन्या महाबळेश्वरांतील कृष्णेच्या उगमाप्रमाणे राजकारणाचा उगम पांच मुखांतून होतो. हीं मुखें अशीं– (१) अर्थविषयक आकांक्षा, (२) शहाणपण किंवा ज्ञान, (३) उद्योग, (४) सामर्थ्य व (५) सत्ता.

महत्त्वाकांक्षा असलेल्या मनुष्याला ती कशी सफल होईल याचें तात्त्विक व व्यावहारिक दोन्ही प्रकारचें ज्ञान लागतें. याचेंच नांव शहाणपण. यानंतर उद्योग लागतो. पण ज्ञानाशिवाय उद्योग व्यर्थ होय. शहाणपणावर आधारलेला उद्योग केल्यानेच सामर्थ्य लाभतें. शेवटीं सामर्थ्याच्या बळावर सत्ता हातीं येऊन मूळची महत्त्वाकांक्षा किंवा अर्थलाभाची इच्छा ही पदरांत पडते.

चालू राजकारण हा विषय एरवी आपल्या पायापुरता असा पूर्वी वाटला असता. पण आता त्याला जागतिक स्वरूप येत चाललें आहे. आपण तळ्यांत टाकलेल्या लहानशा खड्याने उठविलेली लाट तळ्याच्या कडेला जाऊन पोचल्याशिवाय राहत नाही, तसें राजकारणाचें झालें आहे. जगाच्या कोठल्याहि टोकाला खळबळणाऱ्या राजकारणाची लाट प्रत्येक देशांतील लोकांपर्यंत आजकाल येऊन पोंचते. कांही कांही तत्त्वज्ञानी म्हणतात की, विश्वाच्या मर्यादा दिवसेंदिवस वाढत आहेत (Expanding Universe). पण एक गोष्ट खचित कीं, जगांतील मनुष्यसमाजांत कोठेंहि चळवळ झाली तर ती इतर कोठेहि कळल्याशिवाय राहात नाही. म्हणजे एका अर्थाने विश्वाचा विस्तार वाढत असला तरी दुसरीकडून मानवी जगाची व्याप्ति आकुंचित होत आहे.

असो. राजकारणाला प्रवाही नदीची उपमा दिल्यामुळे सहजच अशी कल्पना सुचली की, जगाच्या मधून वाहणाऱ्या या नदीचे पूर्वकांठ व पश्चिम कांठ असे दोन निर्दिष्ट भाग होत असून, या दोन कांठांवर होत असलेल्या राजकारणाचा निकट अनुभव मध्यस्थांनाहि येत आहे व त्याजवर परिणाम घडवीत आहे. नदीकांठीं ठिकठिकाणीं घाट असतात. तसे जागतिक राजकारणरूपी नदीच्या पूर्व कांठावर दोन मोठे घाट आज दिसतात. एक जर्मन घाट व एक जपानी घाट. तसेच पश्चिमेला ब्रिटिश घाट व अमेरिकन घाट

हे दिसतात. नदीच्या उगमापासून मुखापर्यंत हर ठिकाणीं तिचा उपयोग मनुष्यमात्र करीत असतोच. पण तिचा उपयोग घाटावरच सांघिक सामुदायिक रीतीनें होत असल्याने, तेथे किती अनेकविध लोकव्यवहार चालतो हें दिसून येतें व मौज वाटते. या जर्मन-जपानी घाटांवर दोन उन्मत्त रेडे उधळले असून ते त्या भागांतील सर्व लोकांना आपल्या शिंगांनी ढोशीत धूम पळवीत आहेत. जर्मनीने सुमारें अठरा महिन्यांत युरोपांतील अठरा देश जिंकले असें म्हणतां येईल! जपानी रेड्यानें जपानपासून खाली जवळजवळ ब्रह्मदेशापर्यंत नाकेबंदी करीत आणली आहे !

मग इकडे पश्चिम घाटावर काय दिसतें ? सहज एक भट-भिक्षुकी कल्पना चालवून असें म्हणतों की, या घाटावर मला एक मातबर यजमान दिसतो. बाप मेला किंवा इतर कांही सुतक आलें म्हणून तो क्षौर करून, दुःखी चेहऱ्याने, नदींत स्नान करून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत आहे. पण पायाखालची वाळू वाहून जात असल्यामुळे 'बुडतों रे बुडतों!' 'धावा रे धावा!' म्हणून दूर उभे असलेल्यांना तो हाका मारीत आहे.

हा श्रीमंत पण संकटांत सांपडलेला यजमान म्हणजे इंग्लंड नव्हे काय? त्याला आतां अमेरिकेशिवाय जगांत दुसरा कोणी साहाय्यकर्ता उरलेला नाही. आणि ही साहाय्याची त्याची याचना, प्रथम युद्धसाहित्याच्या मर्यादित हिशेबी म्हणून दिमाखदार मागणीने सुरू झाली असतां, आता खुद्दच 'या आणि आमच्याकरतां लढा', येथपर्यंत त्या याचनेची मजल गेली आहे! प्रथम युद्धसाहित्य ऐटीने राजरोस विकत मागितलें, मग सर्व ऐवज पटेना म्हणून भाड्याने मागितलें. मग 'आम्ही करतों तें तुमचेंच कार्य' म्हणून फुकट मागण्यास सुरुवात केली. मग युद्धसाहित्य हातीं आलें तरी 'तें नेण्याला सोबत व रखवाली द्या' असें म्हटलें. ही रखवाली प्रथम २००० मैलांपर्यंत असली म्हणजे पुरे असें म्हटलें. आणि आता म्हणणें की, 'आपला सर्व सरंजाम सैन्य घेऊन प्रत्यक्ष युद्ध–सहकार्य कराल तरच बचावूं!'

'थोरामोठ्यांचा अधःपात पाहणें ही दुःखाची गोष्ट होय' असें 'मृच्छकटिकां'तील चारुदत्ताला वधस्तंभाकडे नेणाऱ्या स्वतः एका मांगानेच

म्हटलें. याचें कारण सगळेच मांग मांगाच्या हृदयाचे नसतात ! इंग्लंडचें हें संकट पाहून, मी साम्राज्याचा प्रतिपक्षी असलों तरी, मलाहि मनांतून थोडें वाईट वाटतेंच. कारण तो कांही झालें तरी थोरामोठ्यांचा अधःपात होय ! पण इंग्लंडने अमेरिकेला मारलेल्या हाकेचें हें वर्णन मी किंचित् खुलवून केलें याचें कारण इतकेंच कीं, 'इंग्रज हिंदुस्थानांतून गेले तर तुमचें कसें होईल' असा गैरलागू बोचक प्रश्न हिंदुस्थानला विचारण्यांत येतो. आणि त्याला उत्तर हेंच सहज सुचतें की, 'आम्ही बुडूं लागलों तर, आणि इंग्लंड आम्हांला वांचविण्यास असमर्थ झालें तर, आम्हीहि त्या संधीचा फायदा घेऊन स्वतंत्र होऊं, किंवा अडलेंच तर कोणा डाव्या उजव्या हातच्या समर्थ शेजाऱ्याला मदतीकरिता हटकू. त्यांत काय बिघडलें ? ' तात्पर्य, इंग्रज हिंदुस्थानांतून गेले तर या देशाचें कसें होईल असा आडमुठा आडवू उपरोधिक प्रश्न विचारणाऱ्या इंग्लंडने आज स्वतःलाच विचारावें की, ' आम्ही एवढे सनातन स्वातंत्र्य भोगलेले, बलिष्ठ साम्राज्य जगभर पसरलेलें, कोटचवधि परकी लोकांच्या मानेवर साम्राज्याचें जूं ठेवून त्यांना राबविणारे, सगळ्या जगांतून घरच्या कोठीप्रमाणें राष्ट्रसंसाराला हवें तें सामान उचलून आणणारे, त्या आम्हांला शेवटीं दातीं तृण धरून अमेरिकेला शरण जावें लागलेंच की नाही ? ' संकटसमयीं अभिमान विसरणें ही जगाची रीतच आहे. आणि जें इंग्लंड आज करतें तें उद्या हिंदुस्थानला करावें लागलें तरी त्यांत पाप नाही.

वास्तविक इंग्लंड हें एक बेट आहे. तें कोणाच्या अध्यांतमध्यांत गेलें नसतें तर सुखी निर्भय राहिलें असतें. पण त्याचा आज ३०० वर्षे जगभर चाललेला उपद्रव पाहा. कोठेहि तंटा निघो त्यांत हे संभावित मध्ये पडण्याला म्हणजे साधेल त्याप्रमाणें एकाला पळ व दुसऱ्याला छू म्हणण्याला, तयारच! सगळ्या जगाला युद्धसाहाय्याची खैरात करण्याची जाहिरात ! पण चालू युद्धांत ती कुमक एकहि राष्ट्राच्या पदरीं भरपूर किंवा वेळेवर पडली नाही! आणि यांचीं जीं सैन्यें दुसऱ्याच्या संरक्षणार्थ गेलीं त्यांना, शेवटी स्वतःचें संरक्षण कसें होईल याच्या विवंचनेंत, कसा तरी परत तळ गांठावा लागला व 'तोच पराक्रम' असें सांगण्याची पाळी आली ! हा सगळा महत्त्वाकांक्षेचा परिणाम !

आता मोठ्याचें सगळेंच मोठें असें म्हणतात. इंग्लंडची महत्त्वाकांक्षा जितकी मोठी तितकेंच आजचें त्याच्यावरचें संकट मोठें. पण एक गमतीची गोष्ट सांगावयाची राहिलीच. महादानांनी पापक्षालन सुलभ होतें, आणि पुण्यमार्ग सुकर होतो, असें वाटल्यावरून या यजमानाने सर्व जगाला स्वातंत्र्याचें दान करण्याचें उदक सोडलेंच. पण त्यावरोबर घाटावरील आपल्या एका आश्रित भिक्षुकालाहि एक महादान दिलें. हा आश्रित भिक्षुक म्हणजे हिंदुस्थान. स्नानाकरितां घाटावर नदींत उतरणाऱ्या आपल्या यजमानाला लागेल तें देण्याचें काम त्याच्याकडे होतें. दर्भ, समिधा पुरवाव्या, संकल्प सांगावा, अंग पुसायला पंचा पुढे करावा, धोतर द्यावें, गंध उगाळावें, हीं सगळीं कामें या आश्रिताकडे आलीं व तीं त्याने हौसेने आनंदाने पत्करलीं. हें पाहून कृतज्ञतेने भारावलेल्या या यजमानाने आगाऊच एक दान म्हणून एक चेक हातीं दिला, व सांगितलें की, ' भटजी, मी निभावून क्रियाकर्मांतर पुरें केलें व तुम्ही आम्ही परत घरीं गेलों, म्हणजे हा चेक बँकेंत पटवा !" बिचाऱ्या भिक्षुकाने तो चेक तोंड वळवून उघडून पाहिला तों त्याला आढळलें की, चेकाखाली खोडखोडून केलेली एक सही आहे, पण रक्कम कुणाला व किती द्यावयाची या दोन्ही ओळींवर मिळून पुढीलप्रमाणे हुकूम बँकेला होताः "सर्वांना मिळून सर्व द्यावें" ! भिक्षुकाला याचा अर्थ कळेना. तेव्हा त्याने जवळच्या कांही तज्ज्ञ मित्रांना विचारलें; तों त्यांनाहि अर्थ लागेना. त्यांनी इतकेंच सांगितलें की, "या यजमानाला असे घोटाळ्याचे चेक देण्याची नेहमींची सवय आहे. ते सहसा पटत नाहीत. याचे चेक घेणारे पुष्कळ लोक फसले आहेत. ईश्वराघरीं हें दान रुजू होण्याचा संभव नाही. तुझा यजमान इतर पुण्याईच्या बळावरच या नदींतून काय कसा बाहेर पडेल तो पडो ! "

हें रूपक उकलून सांगण्याला फारसें कठीण नाही. हा यजमान म्हणजे इंग्लंड, हा भिक्षुक म्हणजे हिंदुस्थान, हा चेक म्हणजे युद्धानंतर हिंदुस्थानला स्वराज्य (डोमिनियन स्टेटस) देण्याचें आश्वासन ! आणि अशीं आश्वासनें देऊन भुलविण्याची सवय इंग्लंडला जुनीच आहे. त्याविषयी कित्येक कोटिबाज लोकांनी गमतीच्या कोट्याहि केल्या आहेत.

कांहीं असो, वरती चर्चिल, मध्यें ॲमेरी व खाली लिन्लिथगो ही अधिकारी पितरत्रयी असतां आपण स्वराज्याची आशा करू नये. 'सर्वांना मिळून सर्व दिलें ' यांतील ' सर्वांना मिळून 'याच्या अर्थाचा घोळ हिंदी पुढाऱ्यांतील मतभेदाकडे हात दाखवून इंग्रज कसा घालतात हें उमजावें. आणि ' सर्व ' या बरोबर ऑब्लिगेशन, सेफगार्डस् येतांत तेव्हा त्या सर्वांची ऐनजिनसी किंमत किती हेंहि उमजावें. वरील तीन व्यक्तिनांवेंच घेतलीं म्हणून व्यक्तिविषयक थोडें बोलणें प्राप्त होतें तें असे.

लॉर्ड लिन्लिथगो यांना हिंदुस्थानांतील बैलांची चांगली परीक्षा आहे पण माणसांची नाही. ॲमेरी यांचें वर्णन ए. जी. गार्डिनर यांच्या ' Certain People of Importance ' या पुस्तकांत वाचा. वास्तविक ॲमेरी हे हिंदुस्थानांत जन्मलेले आहेत. पण त्यांना हिंदुस्थानचा अभिमान नाही. उलट त्यांची आई हंगेरियन व बाप ज्यू असें असतां त्यांना ब्रिटिश साम्राज्याचा येवढा अभिमान की तो एखाद्या इंग्रजालाहि नाही!

ॲमेरी हे हट्टी, दुराग्रही, भांडखोर आहेत. एकदा पार्लमेंटमध्ये त्यांची बदनामी करणाऱ्या सभासदाच्या नाकावर मुष्टिप्रहार करून त्यांनी त्याला रक्तबंबाळ केलें. ते आपल्यापरी वजनदार आहेत; पण त्यांना लोकप्रियता मुळीच लाभलेली नाही. चुकीच्या कल्पना डोक्यांत घेऊन त्यांच्या पुरस्कारार्थ भांडत-तंडत बसण्याची त्यांना खोड आहे. गार्डिनर म्हणतात, 'ॲमेरीसाहेबांचें तत्त्वज्ञान रानटी समाजाचें आहे. ख्रिस्ती धर्माला न पटणारीं अशीं त्यांचीं ध्येयें असतात. आणि अरण्यांतल्या दरवेशाइतके ते अविचारांध आहेत.'

आता मुख्य प्रधान चर्चिलसाहेब कसे आहेत तें पाहा. पुन्हा गार्डिनरचाच आधार देतों. ' स्नेहाला चांगले. पण जुटून चालणारे नाहीत. लॉर्ड बर्कनहेडसारखे त्यांचे स्नेही ! यावरून त्यांचीं राजकीय मतें कशीं असतील! राजकारणांत ते तेरड्याप्रमाणें रंग पालटतात. प्रथम टोरी पक्षांतून फुटून लिबरल बनले. आणि फिरून त्या पक्षाला येऊन मिळाले. टोरी पक्ष त्यांचा द्वेष करतो; त्यांना जवळ करीत नाही. बरें, लिबरल पक्ष तरी त्यांच्यावर विश्वासतो का ? मुळीच नाही. कारण या पक्षाच्या पाठीवर बसून त्यांनी प्रमुख स्थान व सत्ता मिळविली, व ती मिळतांच त्या पक्षाचा त्यांनी त्याग

केला. मजूर पक्षाचा द्वेष चर्चिल हे करितात, व त्या पक्षाला अपमानास्पद रीतीने लेखतात. या पक्षाच्या मतें चर्चिल प्रतिगामी व दुसरे मुसोलिनीच आहेत ! '

पण प्रस्तुत मुद्द्याची म्हणून मला ही गोष्ट सांगावयाची की, १९०५ सालीं चर्चिलसाहेब वसाहत खात्याचे दुय्यम सेक्रेटरी असतां, त्यांनी ट्रान्सवालांतील बोअर लोकांना स्वराज्य देण्याकरितां जिवाचें रान केलें. बोअर लोक इंग्रजांशी लढल्याचें प्रसिद्धच आहे. तेव्हा बोअर लोकांनी चर्चिलला युद्धांत कैद केलें होतें. सगळा देश बोअर लोकांना स्वराज्य देण्याविरुद्ध होता. त्याचे सहकारी त्या योजनेच्या विरुद्ध असतां, चर्चिलने बंडखोर बोअर लोकांची खूप तरफदारी करून त्यांना स्वराज्य अर्पण केलें. आणि तेच चर्चिल आज राजनिष्ठ हिंदी लोकांना स्वराज्याचे वाढते हक्क देण्याच्या मार्गांत आडवे पडले आहेत. याचा अर्थ उघड असा नाही काय, की इंग्रजांच्या खांद्याशी खांदा लावून मित्र म्हणून लढेल त्याला स्वराज्य द्यावयाचे नाही. पण इंग्रजांच्या छातीला छाती भिडवून जो शत्रु लढेल त्याला मात्र स्वराज्य द्यावयाला हे तयार ! तेव्हा 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें' हेंच वचन खरें नव्हे काय ?

चर्चिलसाहेबांचें हिंदुस्थानविषयक गेल्या १२ वर्षांतील कोणतेंहि भाषण काढून वाचा, त्यांत राजकीय सुधारणांना त्यांचा विरोधच आहे असें आढळेल. आपल्या एका भाषण–ग्रंथाच्या प्रस्तावनेंत चर्चिलनी सांगितलें आहे की, " १९१९ सालीं इंग्लंडांत सनदशीर प्रधानमंडळ नव्हतें. फक्त युद्धमंडळ होतें. त्याचें मन वळवून मॉन्टेग्यूसाहेबांनी हिंदुस्थानविषयक उदारमतवादी घोषणा केली. त्याला नाइलाज म्हणून आम्ही संमति दिली. शिवाय मॉन्टेग्यू झाले तरी खाजगी भाषणांत आम्हांला सांगत असत की, " अहो ! तुम्ही खुळे लोक हो, या घोषणेने भितां विचकतां कां ? ती घोषणा, १९१९ च्या कायद्याची प्रस्तावना, आणि त्यांतील ४१ वें कलम, हीं सर्व एकत्र विचारांत घ्या, म्हणजे कळून येईल की, आम्ही हिंदुस्थानाला खरें दिलें असें कांहीच नाही ! फक्त आम्ही एक प्रयोग करण्याचा बहाणा करीत आहों. तो वाटेल तेव्हा बंद करूं किंवा दिलेले हक्कहि परत घेऊ.

द्यायला जितका वेळ तितकाच ते काढून घेण्याला. दिल्लींत नवें विधिमंडळ निर्माण करीत आहों, पण त्याला एखाद्या डिबेटिंग सोसायटीपलीकडे काय अधिकार आहेत? साम्राज्यसरकारला विरोधी ठरेल अशा सत्तेचा एक अंशहि आम्ही दिलेला नाही."

चर्चिल पुढे म्हणतात, "मॉन्टेग्यूसाहेबांनी खाजगींत आमची अशी खातरजमा केल्यामुळेच आम्ही तेव्हा फारसा विरोध केला नाही. पण पुढे तो करावा लागला. कारण खुळे वेडे आर्यविन भेटले! त्यांनीं आयत्या तुरुंगांत पडलेल्या गांधींशी तह केला. त्यांना विलायतेस गोलमेज परिषदेस पाठविलें, आणि मजूर मंत्रिमंडळाच्या स्वाधीन करून गांधींचा दिमाख वाढविला. लॉर्ड आर्यविननी सायमन कमिशन रिपोर्टाचा नाश केला. लॉइड जॉर्ज, लॉर्ड रीडिंग हे–म्हणजे लिबरल देखील–आर्यविन घोषणेला नाराज होते. पण व्हाइसरॉय पडला ना! करतां काय? पुढे गोलमेज परिषद भरली. तेव्हा मात्र आम्ही डाव साधला. कारण त्या परिषदेंत स्वराज्यदानाचा आभास निर्माण झाला तरी, संरक्षक बंधनें अशीं कांही घट्ट करण्यांत आलीं, की तितकीं तीं पूर्वी केव्हाहि ठासून सांगितलीं गेलीं नव्हतीं."

चर्चिलने बोअर लोकांना इतक्या उत्साहाने जें स्वराज्यदान केलें तें पार्लमेंटला किती अप्रिय होतें पाहा. जे. ए. स्पेंडर, इतिहासकार, लिहितो :–

"The Government were denounced in unmeasured terms for having betrayed British interests in South Africa for having sacrificed in the ballot box what had been won in the war. Balfour declared that Ministers had committed themselves and the Country to a dangerous reckless and audacious experiment. His colleagues and supporters viewed with one another in painting its consequences in the gloomiest Colours. In the House of Lords, Lansdowne and Milner were equally vehement, the latter going to the length of saying that the British people would spit the new policy out of their mouths if they knew what it really meant."

बोअर लोकांना चर्चिलने दिलेल्या या स्वराज्याचें वर्णन ब्रिटिश सरकारकडून असें करण्यांत आलें.

"Grant immediate responsible Government to the Transvaal in full confidence that, under the free institutions established by the constitution, the prosperity and contentment of the Transvaal and its people will be permanently secured, with the hope that the step now taken will in due time lead to the union of the interests of the whole of His Majesty's Dominions in South Africa."

लक्षांत ठेवा की या वेळीं ट्रान्सवाल, नाताळ, केप कॉलनी हीं हिंदु–मुसलमानांप्रमाणें परस्परविरोध करणारीं होतीं.

आणि हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचा प्रश्न निघाला तेव्हा मात्र याच चर्चिलनी कशी पगडी फिरविली ? फिरून स्पेंडर म्हणतो :—

"The long delays and incessant recriminations had embittered feelings (in India) and taken the graciousness out of the gift to India." तथापि Winston Churchill, rallying the die-hards, gave formidable expression to the opinions of a former generation of Indian officials, and echoed their lamentations over the Lost Dominion in speeches of great power and eloquence."

हें चित्र पाहा आणि हेंहि चित्र पाहा. असले हे चर्चिलसाहेब आज मुख्य प्रधानपदावर आहेत. मग स्वराज्याची आशा कशाला ?

आणि १९३५ च्या कायद्याच्या वेळीं तर चर्चिलसाहेबांनी किती आकांडतांडव केलें हें प्रसिद्धच आहे. तात्पर्य, लॉर्ड लिनलिथगो, अॅमेरी, व चर्चिल अशी पुत्र, पिता, प्रपिता पितरत्रयी अधिकारारूढ असतां आम्ही डोमिनियन स्टेटस्‌ची अपेक्षा करणें हें बुद्धिमांचाचें लक्षण नव्हे काय ?

कोणी तरी एखादा साहेब दिल्ली-सिमल्यास कांही तरी उत्तेजनपर बोलला; तें घेऊन, स्वतः राज्ययंत्रांतल्या चाकाप्रमाणे फिरलेला कोणी एखादा नेमस्त पुढारी सरसावला, त्याने धावपळ करून मुंबई परिषद

भरविली, आणि ठराव केले. पण शेवटीं अॅमेरींनी त्यांचें हंसेंच केलें की नाही? आणि असे फजित पावलेले हे हिंदी पुढारी आतां चडफडत, तडफडत आहेत. जसे कांहीं निखाऱ्यावर भाजलेले पापडच ! आणि भाजल्या पापडाचीं टोकें, कोने–कोपरे, एकमेकांशी कधींच जुळत नाहीत त्याप्रमाणे हिंदी पुढाऱ्यांच्या मतभेदांचें प्रदर्शन होत आहे.

आधी सर्वांना मिळून सर्व दिलें अशा भाषेचा फसवेगिरीचा खोटा चेक, आणि त्यांतून तो पटविण्याची भाषा कोणी बोलूं लागला तर संरक्षक बंधनांचा बडगा पुढे उभाच आहे. अशी स्थिति असतां आपण डोमिनियन स्टेटसची आशा धरतों. पण आशेच्या मोहाला बळी पडून शेवटी फसलेल्या फजितखोरापेक्षा अधिक हास्यास्पद असें काय असणार ? आशेच्या दुःखा-पेक्षा निराशेचें सुख अधिक बरें. फुकट आशेला लोभावलेला मनुष्य आपल्या बुद्धीची दुर्बलता मात्र प्रगट करतो. तसें आपणां पुढाऱ्यांचें झालें आहे. त्याला इंग्रज लोक बाजूला तोंड करून हंसत आहेत. आणि परवांच्या मुंबई परिषदेसारखी एखादी खटपट केली म्हणजे, इंग्रज लोकांचें खरें मनोगत कळण्याइतकीहि बुद्धिमत्ता आपणांजवळ नाही असा पुरावा आपण होऊन आम्ही देतों.

मला वाटतें की शिकावयाचेंच तर आता यापुढे गेल्या १०० वर्षांत ज्या कल्पना आपल्या डोक्यांत कधीं आल्या नाहीत, त्या कल्पना करण्याला शिकावें. उदाहरणार्थ, कदाचित् दुर्दैवाने इंग्रज युद्धांत हतबल होतील; हिंदुस्थानांत अराजक व यादवी माजेल; हरप्रकारचें दुःख सोसावें लागेल; धर्मद्वेषाचा परमावधि होईल; इत्यादि कल्पना अप्रिय असल्या तरी त्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानाला धरून आहेत. इंग्रजी राज्यांतील शांततेचीं गेलीं १०० वर्षे सोडलीं तर, पूर्वी आपल्याला अशा अप्रिय कल्पनांचाच अनुभव नव्हता काय ? इंग्रजांच्या शिकवणीने सरळ आगगाडीच्या रुळांवरून जाऊन शेवटच्या स्टेशनची मजल आपण गांठणार असा भ्रम हिंदी लोकांत उत्पन्न झाला होता, तो आपण आतां सोडून दिला पाहिजे ! कारण ज्यांच्या आधारावर व शिकवणीने मनाला ही शान्तता व प्रगति यांच्या आशेची संवय लागली, त्यांचेंच आसन जर डळमळूं लागलें तर ही संवय किंवा खोड

आपण सोडून द्यावयाला नको काय? यापुढे हिन्दी लोकांनी सगळ्या गोष्टींकरतां मन खंबीर केलें पाहिजे. नव्या अनुभवाला तयार राहिलें पाहिजे. एरवी इतिहासाचा इतका अभ्यास करून तो फुकट गेला असें होणार नाही काय?

दुसराही एक अप्रिय प्रश्न मी विचारतों, तो असा की, 'इंग्रजांच्या राजनीतीचे दोष मीं दाखविले. पण आज १६ आणे स्वराज्य व स्वातंत्र्य, सत्ताधीश अशा स्वार्थी लोभी बुद्धिमान परकीयांकडून आपल्या पदरांत एखाद्या गोळ्याप्रमाणें चटकन पडावें याविषयी, आम्हीं हिन्दी लोकांनी तरी अशी कोणती पात्रता प्रकट केली आहे? कोणते शहाणपण दाखविलें आहे? कोणता स्वार्थत्याग केला? कोणतें बळ मिळविलें आहे'? हा प्रश्न अप्रिय वाटला तरी त्याचें उत्तर देणें मला वाटतें कठीणच जाईल.

असें असतांहि आपण इंग्रजांना युद्धाच्या कामीं साहाय्य करावें हें योग्य आहे, तें आपण करीत आहोंच, व आणखीहि करावें. पण हें साहाय्य देण्याघेण्यांत इंग्रजांची दृष्टि तीच आपली असणार नाही. दोघांचाहि स्वार्थच. पण इंग्रज तें साहाय्य साम्राज्याच्या संरक्षणार्थ मागतात, तर आपण तें स्वातंत्र्याच्या लाभार्थ देत आहों. हिंदी सैनिक लढाईवर गेले तरी ते लष्करी शिक्षणाचा एक अपूर्व वर्ग उघडला गेला आहे त्यांत शिक्षण मिळवावें म्हणून. आणि तें पुढे स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या कार्यांत उपयोगी पडण्याचा संभव आहे या आशेने! दोन माणसें आपापल्या मनांत निरनिराळे किंवा परस्परविरोधी, हेतु ठेवून एकाच कार्यात सहकारिता कशी करू शकतात याचें हें गमतीदार उदाहरण नव्हे काय?"

---

# ९. आधी स्वराज्य कीं आधी राष्ट्रीय सैन्य ?

( केसरी १२ सप्टेंबर १९४१ )

ता. ३ बुधवार रोजीं गायकवाडवाडयांतील गणपतीपुढे 'राष्ट्रीय संरक्षण' या विषयावर श्री. न. चिं. केळकर यांचें व्याख्यान झालें. त्याचा सारांश खालीं दिला आहे. श्री. केळकर म्हणाले:-

"आज विषय राजकारणांतील हल्लीची कोंडी व ती फोडण्याचे उपाय हा प्रथम घेणार होतों. पण नुकतेंच बापूजी अणे यांनीं एका भाषणांत सांगितलें कीं, गांधी व कांग्रेस यांनी राजकारणाचें स्मशान बनविलें आहे. तेव्हा वाटलें की, या स्मशानांत पायपिटी करून अंगावर चिताभस्माची राखाडीच उडवून घ्यावयाची की नाही ? म्हणून राष्ट्राचें संरक्षण हा विषय घेतला, व तो चालू युद्धाला सर्वस्वी लागू आहे.

या संरक्षणांत राष्ट्राचें शरीर व जीव, राष्ट्रीयत्व, राष्ट्रसंसार, व राष्ट्र-संस्कृति इत्यादिकांचा समावेश होतो. परंतु मला मुख्यतः पहिल्या दोहोंचाच विचार कर्तव्य आहे. राष्ट्राचा संसार त्यांतील व्यक्ति स्वार्थी असल्यामुळे यशस्वी रीतीने करू शकतात. एखादा धर्मगुरु किंवा अवतारी साधुसंत व उच्च शिक्षण यांच्या योगानेहि संस्कृतीचें संरक्षण होऊं शकतें. पण राष्ट्राचें शरीर व त्याचा प्राण यांचें रक्षण शस्त्रसिद्ध, बलसंपन्न, व वीर्यशाली असें देशभक्तिप्रेरित सैन्यच करू शकेल. या कामीं ईश्वरी कृपा हें मुख्य अधिष्ठान आपण मानतोंच. साधुसंत, महात्मे, थिऑसॉफींतील मास्टर्स, यांची पुण्याई राष्ट्ररक्षणाला उपयोगी पडत असेल तर ती पडो व आम्हांला ती हवीच. वडिलांचे आशीर्वादहि तसेच. पण देवस्थानें कितीहि जागृत व जाज्वल्य म्हटलीं, तरी तीं स्वतःचें आत्मरक्षणहि करूं शकत नाहीत. सोरटी-सोमनाथाच्या मूर्ति फोडल्या गेल्या. कित्येक मूर्तींना भितींत स्वतःला चिणून घेऊन रक्षण करावें लागलें. पर्वतीच्या मूर्ति चोरांनी पळवून

नेऊन आटविल्या ! साधुसंत कर्जबाजारी होत आहेत! मग हे सर्व आमचें रक्षण काय करणार ?

अहिंसाव्रताविषयी तर असें म्हटलें पाहिजे की, या व्रताला धार्मिक पुण्याईची जिल्हाई दिसली तरी तें तत्त्व नपुंसक व राष्ट्ररक्षणाला सर्वस्वी निरुपयोगी आहे. परवा चर्चिल व रूझवेल्ट यांनी एक अष्टपदात्मक सूत्री महासागरावर अज्ञात स्थळीं बसून निर्माण केली. तो शेवटी जललेखच ठरणार ! पण त्यांतील नि:शस्त्रीकरणाचा उल्लेख पाहून गांधी हर्षून म्हणाले, 'हा पहा माझ्या अहिंसातत्त्वाचा विजय !' पण मी म्हणतों याहून अधिक आत्मवंचना ती कोणती? कारण नि:शस्त्रीकरण याचा अर्थ सोळा आणे हत्यारबंदी नव्हे! शस्त्रहिंसेला व सैन्यवाढीला कांही मर्यादा घालणें इतकाच त्या जललेखाचा अर्थ ! नि:शस्त्रीकरणावर ग्रंथ लिहिणारे लोकहि हें मान्य करतात की, व्यक्तिशः राष्ट्राचें मर्यादित नि:शस्त्रीकरण केलें तरी राष्ट्रसंघाला स्वतःचें सैन्य असें ठेवावेंच लागेल, व कारणपरत्वें शस्त्रहिंसा करावी लागेल ! आणि राष्ट्रीय सैन्याला निव्वळ पोलिसाचें स्वरूप आलें, तरी तें देखील अहिंसाव्रताचे पुतळे होऊन भागत नाही. "The question that concerns the present disarmament negotiations is not that of a complete abandonment of all armaments, but only of their drastic reduction The League of Nations must have some sort of international force at its disposal, for the function of carrying out its decisions by armed force if necessary. (Disarmament by J. P. Steefes 1933). तात्पर्य, यांत गांधी यांनी कांही तरी पाहिलें, व ते नेहमीच्या रीतीने कांही तरी बोलले इतकेंच समजावें !

पण आम्ही हिन्दी लोक खोट्या अहिंसातत्त्वाने सर्वस्वी हुरळून गेलेलों नसलों तरी, राष्ट्राचें रक्षण सेनाच करू शकते हें मात्र हळूहळू विसरत चाललों आहों. कारण खरी सेना व तिचें कर्तृत्व न पाहतांच अनेक सुशिक्षित पिढ्यांचे जन्म गेले व जात आहेत. मृच्छकटिकांतील विदुषकाला त्या लुच्च्या कुंभिलकाने प्रश्न केला की, .' नगराचें संरक्षण कोण करतो ' ? तेव्हा तो भोळा ब्राह्मण म्हणाला, 'अरे, नगरांतले रस्ते !' तेव्हा त्याला

सांगावें लागलें की, ‘तू मूर्ख आहेस, नगराचें रक्षण रस्ते करीत नसून सेनाच करते.’

नागरिक संस्कृतीला व शांततेला चटावलेल्या आम्हां लोकांना प्रशस्त, स्वच्छ रस्ते एवढेच दिसतात. पण रात्रीं या रस्त्यांवर चोर वावरतात अशी वार्ता निघाली तर घरांचीं दारें लावून घेऊन बसावें एवढाच उद्गार अशा नागरिकांच्या तोंडून निघावयाचा ! चार आळीकरांनी रात्रीं बाहेर पडावें व चोर पकडावा ही भाषा त्यांना एकदम सुचणार नाही.

तात्पर्य, सेना अदृश्य असली तरी तिला विसरतां कामा नये, तीच परिणामीं राष्ट्ररक्षण करणारी. गोधडेबुवांनीहि परवा कीर्तनांत सांगितलें की, ईश्वर नवसाला किंवा पूजेला पावत नाही तर तो मनुष्यकर्तृत्वालाच पावतो.आणि हें कर्तृत्व दिसावयाचें तर राष्ट्रांतील लोकांनी त्याच्या रक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली पाहिजे.

आम्ही हिंदी लोक हें विसरून जात आहों की, पूर्वी या भरतखंडांत अति विस्तीर्ण अशीं साम्राज्यें, राज्यें, लोकशासित राष्ट्रें,आणि स्वयंपूर्ण नगरें होतीं. याविषयीं अशोक, चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, कनिष्क, हर्षवर्धन इत्यादि जे राजेमहाराजे होऊन गेले त्यांचीं वर्णनें इतिहासग्रंथांतून वाचा म्हणजे त्या वैभवाची कल्पना येईल; व हें सर्व वैभव मिळविणें व सांभाळणें या गोष्टी सैन्याशिवाय व क्षात्रकर्माशिवाय झाल्या नाहीत हेंहि लक्षांत आणा. (येथे केळकरांनी याविषयी कांही उतारे वाचून दाखविले.) चाणक्याच्या अर्थ-शास्त्रांत तर सैन्याच्या कारभाराची सांगोपांग माहिती तुम्हाला आढळेल.

यानंतर अर्वाचीन हिंदी राजांची परंपरा लक्षांत आणा. प्रथम शिवाजी नंतर पेशवे यांचींहि सैन्यें लक्षांत आणा म्हणजे सैन्यावर राज्यें अवलंबून किती व कशीं होतीं हें कळून येईल याविषयी मी मुद्दाम एकत्र केलेले कांही आंकडेच ओळीनें देतों म्हणजे कळेल.

| राज्य | स्वार | पायदळ |
|---|---|---|
| महापद्मानंद | ८० हजार | २० हजार |
| चंद्रगुप्त | ३० ,, | ६ लक्ष |
| कृष्णदेव (विजयनगर) | ३२ ,, | ७ लक्ष |
| शिवाजी | ५० ,, | ५० हजार |

| राज्य | स्वार | पायदळ |
| --- | --- | --- |
| पेशवे (१७८७) | १ लक्ष | १० ,, |
| पेशवे (१७९८) | ४० हजार | २० हजार |
| शिंदे | ६० हजार | ३० हजार |
| भोसले | ५० ,, | १० ,, |
| होळकर | ३० ,, | ४ ,, |
| गायकवाड | ३० ,, | (आंकडा मिळत नाही) |

हें शेवटचें, म्हणजे पेशवे व सरदार यांचें मिळून २,१०,००० स्वार ६४,००० पायदळ एवढें सैन्य भरतें. याशिवाय प्राचीन काळीं सैन्यांतील हत्तीचे आंकडे हजारांनी मोजतां येत. पुढे ते कमी झाले. पण हत्ती मागे पडून तोफा पुढे आल्या. काशी राजाच्या बखरीप्रमाणे पानपतास पेशव्यांकडे ५५ हजार स्वार, १५ हजार पायदळ व १५ हजार पेंढारी व २०० तोफा येवढें सैन्य होतें. आणि तुलना म्हणून सांगतों की, जगप्रसिद्ध वाटरलूच्या लढाईंत बोनापार्टच्या विरुद्ध एकूण सैन्य ६० हजार होतें पैकीं इंग्रज सैन्य फक्त २४ हजार होतें! स्वतःचें सैन्य थोडें पण परभारें कारभार व उपद्रव मोठा हा इंग्रजांचा शिरस्ता कांही नवीन नव्हे. असल्या या चिमुकल्या सैन्याच्या राष्ट्राने एका शतकांत जगभर साम्राज्य पसरलें, पण तेंहि जेथल्या तेथे सैन्य उभारून व लढवून.

असो. भरतखंडांत ही लढाऊ परंपरा अशी असतां आज आपण इतक्या हीन दशेला आलों आहों की, स्वतःचें रक्षण स्वतः करण्याची कल्पना मनाला शिवत नाही. आणि इंग्रजांनी तर अनेक हिन्दी जातींवर नामर्द, नालायक, बिनलढाऊ असा उपमर्दकारक शेरा मारून टाकला! ही दुरवस्था कशाने प्राप्त झाली ? इतिहास वाचाल तर या प्रश्नाचें ठीक उत्तर मिळेल. पूर्ण सत्य बोलावयास निघालें म्हणजे स्वतःविरुद्धहि बोलावेंच लागतें. म्हणून सांगतों की मराठ्यांच्या डोक्यावर हा जो नादानीचा शेरा पडला हा पेशवाईअखेरच पडला ! शिवाजी, पहिला बाजीराव, यांच्यापर्यंत जुनी उज्ज्वल परंपराच चालू होती. पुढे नानासाहेब पेशव्यापासून उतरती कळा लागली व तिचें पर्यवसान दुसऱ्या बाजीरावाचे वेळीं झालें. कसें तें पहा.

शिवाजीच्या वेळीं खडी फौज अशी नव्हतीच. पण प्रत्येक मराठा हा लढाऊ शिपाई होता. केव्हाहि हातांतला नांगर व आसूड टाकून भाला

किंवा क्वचित् बंदूक घेणें त्याला अवघड वाटत नव्हतें. आणि तेवढ्यान कामहि भागत होतें. शिवाजीने निरोप पाठविले, आणि कर्णे व शिंगें वाजूं लागलीं, म्हणजे वसंत ऋतूंत डोंगर व दऱ्या पळसाच्या लाल फुलांनी भरून जाव्या त्याप्रमाणें घाटमाथे व किल्ले सैन्याने गजबजून जात ! शिवाजीला सर्व कारकीर्दीभर सैन्याची गरज पडली. परंतु त्याने सैन्याचें राष्ट्रीयत्व घालविलें नाही. जहागिरी व सरंजाम निर्माण करून सैन्य-भरतीचे परभारे हवाले देऊन परस्वाधीनता पत्करली नाही.

त्याच्या वेळीं बंदुका तोफा यांचा उत्कर्ष झालेला नसून, मराठे सैन्य व मुसलमानी शत्रुसैन्य यांच्यांतील अंतर घोड्यावर बसलेल्या स्वाराच्या हातांतील भाल्याहून अधिक नसे. क्वचित् तें अंतर तलवारीइतकें आखूड होई ! आणि व्यक्तीला व्यक्ति भिडली, माणसासमोर माणूस उभा राहिला म्हणजे त्या युद्धांत मराठा कोणाला हार जात नसे. प्रतापगडावर एका बाजूला प्रचंड देहाचा अफजुलखान व त्याचे दोन पठाण शिपाई, आणि दुसऱ्या बाजूला शिवाजी व त्याचे दोन शिपाई अशा अवघ्या तीन माणसांची गांठ पडली असतां शेवट कसा झाला हें प्रसिद्धच आहे. शाहू व पहिला बाजीराव येथपर्यंत हें टिकलें.

पुढे नानासाहेब पेशव्यापासून सैन्यभरती, लढाऊ सरंजाम, व लढाऊ धोरण या सर्वांतच फरक पडला. शिवाजी व कान्होजी आंग्रे यांच्या वेळीं बंदुका व तोफा यांचा किंचित् उदय झाला. परंतु विशेषतः आरमारी फौजेतच त्यांनी क्वचित् ४।२ पोर्तुगीज व १।२ डच असे सैनिक ठेवले. पण येथून पुढे बंदुका व तोफा अधिक उपयोगांत येऊ लागल्या, यामुळे त्या शस्त्रसाधनांशी सराईत असलेले परके फिरंगी व इतर गोरे लोक यांची मदत घेण्याला सुरुवात झाली. पण त्याच्याहि आधी मराठे सरदारांचे जहागीरदार व सरंजामदार करण्याची पद्धत सुरू झाली !

सन १७५१ सालीं निजामाच्या दरबारीं प्रसिद्धीस आलेला लढाऊ फ्रेंच शिपाई सरदार बुसी याला आपल्या नोकरीस ठेवण्याचा प्रयत्न नानासाहेबांनी केला तो फसला. पण बुसीच्या हाताखाली शिकलेले मुजफरखान व इब्राहिमखान गारदी घेऊन त्याने कसे तरी आपलें समाधान केलें.येथून पुढे

तोफखाना वाळगून व गनिमी कावा सोडून ठाणबंद लढाईची योजना हळूहळू अमलांत येऊं लागली. पूर्वी सांगितलेलें शत्रुसैन्यांतलें अंतर वाढलें.कंपू पद्धतीने थोडी शिस्त आली पण पायाची चपळता गेली. नव्या पद्धतीचा सदुपयोग उद्‌गीरच्या लढाईत झाला म्हणतात. पण पानपतास तो डाव अंगावर आला हें प्रसिद्ध आहे.म्हणतात की,होळकराचा गनिमी काव्याचा सल्ला ऐकून तडक चालीने सदाशिवरावभाऊ दिल्लीस येता तर पानपतचा पराभव टळता ! पण इब्राहिमखान गारद्याच्या आग्रहावर तळ रोवून, खंदक खणून, मोर्चा उभारून भिंती घालून, ठाणबंदी लढाई दिली म्हणून ती अंगावर आली, असा तज्ज्ञांचा तरी अपवाद आहे.

कसेंहि असो, कृष्णमृत्तिका काळी दारू हिने भुरळ घातली खरी. पण दारू, तोफा व बंदुका यांची विद्या हस्तगत करण्याकडे मराठ्यांचें लक्ष न लागतां, त्या विद्येंत आधीच तयार असलेले परकी गोरे लोक हे सैन्यांतील शिपाई व अधिकारी नेमण्याचा प्रघात पडला व तो शेवटी अंगावर आला. येथून पुढे शिंद्याने पदरीं ठेवलेल्या गोऱ्या सैनिकांत डिबाईन, पेरन, बोरक्विन, मायकेल, फिलोज, सुमरु, जॉर्ज थॉमस, शेपर्ड इत्यादि नांवें इतिहासकार देतो. जाटांच्या पदरीं मॅडेक होता. होळकराच्या पदरीं दद्रुनेक, व्हिकर, आर्मस्ट्रॉंग, टॉड हे होते. दुसऱ्या बाजीरावाच्या पदरीं बॉईड, जॉन फोर्ड इव्हान्स इत्यादि होते.

ही पद्धति सर्वच बाजूंनी अनिष्ट होती. या लोकांना भारी पगार द्यावे लागत. महादजी शिंद्याने डिबॉइनला ३ हजार रु. पगार ठरविला होता! आणि तो व मायकेल फिलोज हे पुढे शिंद्यांचे जहागिरदार झाले. कारण वेळेवर पगार देणें कठीण होऊं लागून मुलूख व जहागिरी तोडून देणें हा उपाय सुचला. पेशव्यांच्या सबंध कागदपत्रांत दोन गोष्टी ठळकपणें आढळतात. येथून तेथून सावकारी कर्जें, खाशांची व खर्चाची, फिटण्याची नड! आणि जहागिरदाराकडून हिशेब देतघेत कारकून मंडळी वर्षानुवर्षं बसली आहेत हा कंटाळवाणा देखावा! खडी फौज ठेवल्याने हे प्रकार टळतात. वाटेल तें करून महिनाअखेर पगार चुकवावा लागतो. असो. हे परकी लोक पैशाने तर महागच, शिवाय बहुदुर्गणी होते. त्यांतले बहुतेक

लोभी, दगाबाज, चंचल, भांडखोर, बेशिस्त असे असत. आणि खानदानी पहावी तर कोणी आचारी, पाणके, न्हावी, कंपनीची नोकरी सोडून पळून आले, किंवा युरोपांतून नशीब काढण्याला आले, म्हणजे मराठ्यांच्या सैन्यांत मेजर व कर्नल व्हावयाचे!

या लोकांचा माल परदेशाहून येईल त्यावर बंदरी जकातीची माफी! त्याना बिगारीचा हक्क! तसेच पालखींतून मिरवण्याचा हक्क असे! इतका बडेजाव ठेवून शेवटी ते काय इमान राखतील तें खरें! आणि हें सर्व कां तर त्यांना मराठ्यांपेक्षा कंपूची कवाईत व गोलंदाजी अधिक माहीत म्हणून! सैन्याबाहेरहि परकी लोक आत्मसंरक्षणाकरिता ठेवण्याची पद्धत थोर मराठ्यांची पडूं लागली. अरबांचा भरणा पहाऱ्यावर व घरें सांभाळण्यावर होऊं लागला. नाना फडणीसांच्या पदरींचे अरब कसे कज्जेदलाल होते याची साक्ष पुण्यांतील खुन्या मुरलीधर देतो! अरबांप्रमाणेच माथेफिरू गारदी लोकहि प्रस्थ पावले. नारायणराव पेशव्यांचा वध गारद्यांनीच केला. त्यानंतर पुरभय्ये पहारेकरी होऊं लागले. हल्ली पठाणांखालोखाल तगादेदार म्हणून भय्यांचीच प्रसिद्धि असते. ही परतंत्रीपणाची परंपरा चालविण्याकरिताच की काय आता पुण्यामुंबईंत धनिक लोक गुरखे पाहरेकरी ठेवूं लागले आहेत! जसे कांही शूर मराठे मेले! या सर्वांचा स्वाभाविक परिणाम हा झाला की, मराठा हा ऐदी बनला.

असो; शेवटीं कळस झाला तो १८०२ सालीं. बाजीराव पेशव्याने बसईचा तह करून आपलें रक्षण करण्याचें कामच सर्वस्वी इंग्रजांवर सोपविलें! व त्या करता भारी रकमा व मुलूख तोडून दिला. खाली निजामानेहि हीच गोष्ट केली.

त्यानंतर बंडाचें निमित्त करून इंग्रज सरकाराने दोन तीन गोष्टी केल्या. सर्व हिंदी राष्ट्र निःशस्त्र केलें, ब्रिटिश फौज व अधिकारी इकडे आणण्याचा पायंडा अधिक घातला, आणि बिचाऱ्या गरीब हिंदुस्थानच्या पैशावर खुशाल साम्राज्याची धन केली! बंडापूर्वी कंपनी सरकारच्या राज्यांत सैन्य हिंदी होतें व त्यावरील वरिष्ठ अधिकारी प्रायः हिन्दीच असत. बहामनी मुसलमानी राज्यांत जसे अनेक ठिकाणीं मुख्य प्रधान व सरदार हिन्दूच होते तसे! पण

खास राणी सरकारचा अंमल चालू झाल्यापासून हिंदी सैनिकाला यःकश्चित शिपायाहून अधिक योग्यता राहिली नाही. क्रमानें हत्यारें गेलीं, घोडीं गेलीं, आणि पठाणासारखे परजातीय लोक मात्र कानाकोपऱ्यांत प्रवेश करून सशस्त्र राहून जुलूम करू लागले. या स्थितीला आम्हाला पोहोंचवून आता राज्यावर संकट आलें म्हणून, कोणा हिंदी सैनिकाला चांद मिळाला, तर कोणाला मोठा किताब मिळाला, तर आफ्रिकेंत 'हर हर महादेवा'ची गर्जना झाली, हिंदी सैनिक सर्वत्र पराक्रमी ठरले, अशा वार्ता सांगून हिन्दी लोकांना सैन्यांत शिरण्याला उत्तेजन देण्यांत येत आहे. आणि आम्हीहि, पण संधिसाधुपणानेच किंवा आपद्धर्म म्हणून या भरतीला साहाय्य करीत आहो. वाटते की चोराच्या हातची लंगोटी तरी परत मिळवावी. थोडी हत्यारांची ओळख होईल. थोडी लढाई पहावयास सांपडेल. बेकारी थोडीशी हटेल. अशा दृष्टीने पण आपद्धर्म म्हणूनच आम्हीहि सांगतों की 'बाबांनो, या पराधीन स्थितींतहि लष्करांत जा आणि पराक्रम करा, ती कमाई पुढे आपल्या राष्ट्ररक्षणाला उपयोगी पडेल.'

पण कांही गोष्टींचा आपण आजहि आग्रह धरला पाहिजे. पहिली गोष्ट ही की, हत्यारांचा कायदा रद्द झाला पाहिजे. कारण नुसतें हत्यार हातांत असलेला मनुष्य केवळ लढाऊ भावनेने दुप्पट बलवान होतो. कोल्टन या ग्रंथकाराने असें प्रतिपादलें आहे की, प्रजेला सशस्त्र करण्यापासून राज्याला कधी धोका असत नाही, असेल तर तो हत्यारें काढून घेतल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या माथें फिरलेल्या व्यक्तीकडून किंवा गुप्त मंडळ्यांकडूनच येतो ! Our real danger is not from the arming of the average responsible citizen, but from the vapouring of irresponsible hot-heads and secret Societies, who can calculate upon taking Society by surprise. If we look steadily at history as a whole, we shall see that the abuse of general military training for anti- social or anti-democratic purposes is exceptional. ( G. C. Coulton 294-5 ) हातांत हत्यार असलें म्हणून मनुष्य तें कांही सुखासुखी चालवीत नाही. आणि उलट घातक प्रवृत्ति बळावली तर हत्याराच्या कायद्याखालीं न येणाऱ्या अशाहि पदार्थांनी खून करता येतात !

पण हें सर्व केव्हा होईल? तर स्वराज्य मिळाल्यावर! आधी स्वराज्य प्राप्ति व मग राष्ट्राचें सैनिकीकरण असा क्रम लागतो पण राष्ट्राचें सैनिकीकरण होण्याच्या आधी स्वराज्य कसें मिळेल असें कोणी विचारलें तर त्याचें उत्तर हेंच की 'इंग्रजाला सुबुध्दि सुचून, आपलें संकट जाणून वचनाला जागून, स्वराज्य दिलें तर मिळेल, नाहीतर काय होईल तें मी कशाला बोलूं?

---

# १०. तुरुंगांत जाण्यापेक्षा सैन्यांत शिरा !

(काळ १७ जुलै १९४२).

ज्याला जें सुचेल तें त्यानें करावें या माझ्या तत्त्वानुसार काँग्रेसच्या चळवळीला मी नांवें ठेवूं इच्छीत नाही. नेमस्तपणा आणि व्यवहारज्ञान यांची योग्य किंमत सरकार ओळखत नसल्याने ठांशीव स्वरूपाची अंतिम मागणी करणारा कोणीतरी पुढारी हवा होताच. तें काम गांधींच्या घोषणेने झालेलें आहे. पण काँग्रेस व इतर पक्ष यांच्यांत आंतून एकमेकांविषयीचा समजूतदारपणा असणें आवश्यक आहे. तरच अशा गोष्टींचा राष्ट्राला फायदा होतो.

"पण पुष्कळदा असें वाटतें की, तुरुंगभरतीच्या सत्याग्रहापेक्षा आज जे लोक सैन्यभरतींत जात आहेत त्यांच्या देशभक्तीवरच अधिक भिस्त ठेवणें योग्य होईल. आज रणांगणावर प्राण देण्यासाठीं गेलेले लोक परत आले म्हणजे ते आपल्या देशाचें पारतंत्र्य मुकाट्याने सहन करतील की काय? भेंड्यांची भाजी खाऊन पोटदुखी थांबल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत नसतील; पण आज शत्रूवर रोंखलेल्या बंदुका उद्या तोंड फिरवून स्वतःचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठी रोंखणाऱ्या सैनिकांचीं उदाहरणें इतिहासांत खचित आढळतात. लष्कर भरतीचा डाव दुहेरी खेळतां येतो पण तुरुंगभरतीचा डाव हा मात्र सर्वस्वी एकेरी आहे.

"राज्यक्रांति फलद्रूप करण्याच्या कामीं चळवळ आणि परिस्थिति यांना सारखेंच महत्त्व आहे. त्याचा अमुक एक निश्चित आंखलेला मार्ग असा नसतो."

हे विचार दे. तात्यासाहेब केळकर यांनीं कॉं. वर्किंग कमिटीच्या ठरावाविषयी आपला अभिप्राय व्यक्त करतांना 'काळ' च्या प्रतिनिधी-जवळ काढले.

प्रश्न–कॉं. व. कमिटीचा ठराव आपल्या वाचनांत आला असेलच. त्याचा अर्थ आपण काय करतां ? व त्याविषयी आपल्याला काय वाटतें ?

उत्तर–होय. मी तो ठराव वाचला आहे व त्याचा सरळ अर्थ काय तो मला समजला आहे. पण कॉंग्रेसच्या व गांधींच्या सरळपणाच्या पोटांत कांही तरी वाकडेपणा असतोच, तो मात्र मला समजला नाही. शिवाय लौकरच ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा होणार आहे तेव्हा तोंपर्यंत आणि त्या सभेंत काय काय फेरबदल व खुलासे होतील ते कळल्याशिवाय अभिप्राय देणें थोडें धाडसाचेंच होईल.

प्रश्न–तरी पण हल्ली प्रसिद्ध झालेल्या ठरावाच्या भाषेवरून तरी आपणांस काय वाटतें ?

उत्तर–मला असें वाटतें की, या ठरावांतून शेवटी गांधींचा निष्कर्ष कांही निघो किंवा सरकार त्याची वासलात कशीही लावो; मला एक गोष्ट बरी वाटते ती ही की, या ठरावांत जी ठासून राजकीय मागणी केली आहे ही तशी कोणी तरी करावयास हवीच होती. आणि गांधी हेच आज एक असे आहेत की, असली ठांशीव अंतिम स्वरूपाची मागणी तेच करूं शकतात. याचा अर्थ इतर पक्षांच्या पुढाऱ्यांना असली मागणी सुचत नाही असें नाही. पण त्यांचें व्यावहारिक धोरण त्यांच्या आड येतें.

प्रतिविरोधी चळवळीच्या सर्व वाटा शेवटी जेलकडेच जातात हें मला माहीत असल्यामुळे ही गांधींनी आपली ठेवणींतली जडीबुट्टी काढली तरी अखेर पर्यवसान तुरुंगभरतींतच होईल असें मी समजतों. सरकारने किंवा

त्यांच्या अधिकाऱ्यांनी गांधींसारखी कांही अहिंसेची शपथ घेतलेली नाही ! म्हणून मला वाटतें की ही चळवळ व्यर्थ होय.

पण ज्याला जें सुचेल तें त्याने करावें असें माझें तत्त्व असल्यामुळे मी कांग्रेसलाहि नांवें ठेवूं इच्छीत नाही. ते चळवळ करतील, लोक पहातील. या चळवळीने युद्धोपयोगी सामान व शिपाई सरकारला मिळण्याला आतांपर्यंत अडचण झाली नाही, तशीच पुढेही होणार नाहीं.

प्रश्न–मग ही चळवळ योग्य नाही तर सशस्त्र बंड करावें किंवा तें होईल काय ?

उत्तर––तेंही होईल असें मी म्हणत नाही. आजच्या स्थितींत लोकांना काय करतां येईल याच्या मर्यादा मला उघड दिसतात. पण माझें म्हणणें इतकेंच की, स्वातंत्र्य, सैन्यउभारणी, देशाची पारतंत्र्यांतून मुक्तता आणि गांधींनी मुलाखतींत एकाला सांगितल्याप्रमाणे बंड, इत्यादि शब्द उच्चारले जात असतां, झालें तर सशस्त्र बंडहि, असें म्हणण्याची लाज कोणाला कां वाटावी ? तोंडाने म्हटलें म्हणून होतें असें नाही; पण बोलावयाचें तें सयुक्तिक तरी बोलावें. एक वेळ असें वाटतें की, तुरुंगभरतीच्या सत्याग्रहापेक्षा जे लोक आज लष्करभरतींत दाखल होत आहेत त्यांच्या देशभक्तीवरच आम्ही अधिक भिस्त ठेवणेंहि योग्य होईल.

तुरुंगांत जाऊन बसणाऱ्यांत देशभक्ति आहे आणि जे हिंदी लोक आज निरुत्साहाने कां होईना पण रणांगणावर जाऊन आपला जीव धोक्यांत घालीत आहेत ते उद्या जय मिळवून परत आल्यावर असेंच मुकाट्याने देशाचें पारतंत्र्य पाहतील काय ?

या लोकांच्या देशभक्तीला भूषणास्पद अशी ही कल्पना कां करू नये ? भेंड्यांची भाजी खाऊन पोटदुखी थांबल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत मिळत नाहीत, पण शत्रुवर आज रोंखलेल्या बंदुकी उद्या तोंड फिरवून स्वतःचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं रोंखणाऱ्या सैनिकांचीं उदाहरणें इतिहासांत खचित आढळतात. लष्करी भरतीचा डाव दुहेरी खेळतां येतो हें मला कळतें. पण तुरुंगभरतीचा डाव हा सर्वस्वी एकेरी आहे, दुहेरी नाही.

आतां तुम्ही म्हणाल की गांधी तुरुंगभरतीची तरी चळवळ करतात व बोलतात; इतर पक्ष काय सुचवितात ? त्याला माझें उत्तर असें की ही गोष्ट खरी आहे.

## हटकून यशस्वी होईल असा उपाय

आम्हां इतर कांग्रेसबाह्य पक्षांनाहि सुचत नाही हें अगदी खरें. पण आम्हांलाही प्रश्न करतां येईल की गांधी १९२० ला जन्माला आले; त्याच्या पूर्वीच्या राजकीय सुधारणा मिळाल्या त्या कोणाच्या बळावर मिळाल्या ? अर्थात प्रजेत असंतोष, सरकारला त्या असंतोषाची जाणीव आणि समुद्रांत भरती भरते त्याप्रमाणे लोकमताचा दाब. हे शब्द मोघम दिसले तरी त्यांत विधायकत्व नाही असें मात्र नाही. चळवळ, उद्योग, प्रयत्न हे शब्द विधायक अर्थीच समजतात. त्यांत कलमवारी घटना किंवा सूचना नसल्या म्हणून काय झालें ? १९२०च्या पूर्वी सुज्ञ लोकमताच्या बळावर सुधारणा झाल्या त्या युद्धाच्या नेटाने द्रुतगतीने होतील. पूर्वी जी गोष्ट होण्याला दहा वर्षे लागत ती आतां सहा महिन्यांत होईल. याचें थोडेसें प्रत्यंतर असमाधानकारक अशाहि कौन्सिल–सभासदांच्या वाढीने आलें आहे. ही कांही कॉंग्रेसची कामगिरी नाही. ती स्वतंत्र लोकमताचीच आहे. यापुढची पायरी अर्थसचिव, गृहमंत्री हे दोघेही हिंदी असावेत आणि सर्व कौन्सिल मिळून स्वायत्त अधिकार असावेत, म्हणजे गव्हर्नर जनरलने स्टेट सेक्रेटरीचें न ऐकतां या कौन्सिलचें ऐकावें असा आग्रह धरणें ही पुढची पायरी होय. ती मागणी करण्यांत कॉंग्रेस व इतर पक्ष सहज एक होऊ शकतील. आता हुकुमी असें कांही कोणाला बोलतां न आल्यामुळे किंवा न दाखवितां आल्यामुळे हें बोलणें पोकळ मानलें जाण्याचा संभव आहे. पण या कामीं फक्त एकाच बाजूने अडवितां येईल असें नाही. सर्वांना एकमेकांना अडवितां येईल, कारण कोणाचेंच कांही चालत नाही ; मग ते लिबरल असोत, नाही तर ऑल पार्टीवाले असोत, नाहींतर नॅशनॅलिस्टवाले असोत, डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्षवाले असोत, हिंदुमहासभा असो किंवा कॉंग्रेस असो.

याविषयी लहान मुलांच्या एका खेळाची आठवण होते. एक मुलगा दुसऱ्याला विहिरींत भांडें पडल्याची गोष्ट सांगतो आणि मग खालील-

प्रमाणे प्रश्नाला सुरुवात होते. 'खालीं पाहिल्याने भांडें वर निघेल ?–मग तो वर पहातो. वर पाहिल्याने भांडें निघेल ?– मग तो हंसतो–मग हंसल्याने भांडें वर निघेल ?' तात्पर्य, प्रश्नहि संपत नाहीत व उत्तरहि देतां येत नाही अशी अनवस्था प्राप्त होते. या खेळाचें उदाहरण राजकीय पक्षांच्या उपन्यासांत खरोखरच लागू पडतें असें मला वाटतें. कारण एक भांडें काढल्याशिवाय भांडें निघत नाही इतकेंच खरें बाकी सर्व खोटें. त्याप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय मिळत नाही हेंच खरें. परवा रेमंड पोस्टगेट याचा ' How to make a Revolution हा ग्रंथ वाचला. त्यांत त्याने हुकमी राज्यक्रांति करण्याच्या कल्पनेची फार उत्तम छाननी केली आहे. आणि तत्त्वज्ञानी ज्याप्रमाणे दैव व उद्योग या दोघांनाही सारखेंच महत्त्व देतात त्याप्रमाणे त्याने चळवळ व परिस्थिति या दोघांनाही राज्यक्रांति फलद्रूप करण्यांत सारखेंच महत्त्व दिलें आहे. न कर्त्याचा वार शनवार असेल, पण कर्त्याचा तरी वार रविवार, सोमवार, मंगळवार हें कोणी सांगितलें ? म्हणजे अमुक दिवशी केलें तर तें हटकून यशाला जातें असें तरी कोठे आहे?

प्रश्न–मग त्यांतल्या त्यांत तुमची स्वतःची भिस्त आजच्या घटकेला कशावर आहे ?

उत्तर– मी बोलतों हेंहि अकरणात्मक किंवा अविधायक वाटेल. कोणी त्याला दैववादित्व म्हणतील. पण माझा असा विश्वास आहे की, आजच्या परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्यशाही जितकी आपल्या मरणाने मरेल तितकी आमच्या प्रयत्नाने मरणार नाही. आणि तशी ती आपल्या मरणाने मरूं घातलीच आहे. एरवी भर पार्लमेंटांत We are seeing the British Empire breakup before our eyes असे उद्‌गार कसे निघते ? याविषयी मात्र वर्किंग कमिटीच्या ठरावाची कांही भाषा मला पूर्णपणें आवडली ती म्हणजे ही–

"Frustration has resulted in a rapid and widespread increase of ill-will against Britain and a growing satisfaction at the success of Japanese arms. And this ill-will, unless checked, will inevitably lead to a passive acceptance of aggression."

याचा अर्थ असंतोष परमावधीला पोंचला म्हणजे त्यांतूनच दुष्ट बुद्धि निर्माण होते, आणि हिंदी लोकांची बुद्धि अशी होऊं दिली तर तिला दुष्ट तरी कां म्हणावें ? जपान-जर्मनींना जय मिळू नये अशी आमची खरी इच्छा असून ती शेंकडो वेळां प्रकट केली आणि राष्ट्राने द्यावयाची ती सर्व मदतहि दिली असें असतां, जर सरकार अजून आपला हातचा अधिकार सोडावयाला तयार नाही तर तुम्ही आपल्या मरणाने मरा हा शाप न ठरतां भविष्यवाणीच ठरेल. भविष्यवाणींत दुष्टबुद्धि नसते; पण पुढे होणाऱ्या गोष्टीचा आगाऊ कयास असतो. असो. इतकें निष्ठुर बोलणारी कांग्रेस फिरून 'आम्ही तुम्हांला अडचण करू इच्छीत नाही' असें बोलते याचें मात्र आश्चर्य वाटतें. प्रांतानिहाय अधिकार सोडण्याची चूक कांग्रेसने केली ती आता तरी तिच्या लक्षांत येत आहे हें सुचिन्ह. प्रामाणिकपणे बोलावयाचें तर, साम्राज्याची अडचण तीच आमची संधि असें म्हणण्याची आजची स्थिति आहे. आणि हिंदुमहासभा ही लष्करभरती करण्याला साहाय्य देते तें दिसण्यांत आज साहाय्य करण्याकरितां असलें तरी वास्तविक पुढची अडचण उत्पन्न करण्याकरिता आहे. जय मिळाला तरी अडचण टळत नाही, आम्ही टाळणार नाही, ती करूच करू; पण पराजय झाला तर ती मात्र सरकारला आपोआपच अधिक दुस्तर होईल. आज लष्करांत गेलेल्या लोकांवरच उद्या स्वातंत्र्य-स्वराज्य मिळवून देण्याची आमची भिस्त आहे, आंतली नजर आहे हें मी तरी मानतों. लष्करी कायद्याची भीति-बुजगावणें मला वाटत नाही !

हेच आजचे सैनिक उद्या ताठ उभे राहून सरकारला सवाल करतील की, आम्ही मरणाच्या दारीं गेलों ते काय गुलाम होऊन राहण्याकरिता ? आणि कायदाच मोडायचा तर तो मग नुसत्या मिठाचाच कशाला ? देशाकरिता मरावयाचेंच मग लष्करी कायदा अमान्य करूनच कां नाही मेले ?

पण आमचें सरकारहि सुज्ञ आहे. आमच्यापेक्षाहि त्यांना या गोष्टी अधिक कळतात. पण हातचें होता होईल तों सोडू नये हा मनुष्यस्वभावच होय. सरकार झालें तरी तीं माणसेंच पण त्यांनाहि लक्षांत ठेवावें लागतें कीं प्रजा ही सुद्धां माणसेंच आहेत!

# ११. ऑ. इं. नॅशनॅलिस्ट परिषद

## न. चिं. केळकर यांचें भाषण

( केसरी ४ ऑगस्ट १९४२ )

स्वागत मंडळातर्फें आपणा सर्वांचें व विशेषतः परप्रांतांतून आलेल्या प्रतिनिधींचें मी अगत्यपूर्वक स्वागत करतों. ज्या स्वागतमंडळातर्फें मी आपलें स्वागत करीत आहे, त्या मंडळांत या परिषदेला उपस्थित झालेल्या प्रतिनिधींइतकीच विविधता आढळेल. कारण तींत लोकशाही स्वराज्य पक्ष, अ. भा. नॅशनॅलिस्ट लीग व अ. भा. काँ. हिंदु लीगचेहि प्रतिनिधि आहेत. लोकशाही स्व. पक्ष १९३३ सालीं स्थापन झालेला असून वेळोवेळीं स्वतः मी, ना. अणे व श्री. जम्नादास मेहता हे त्याचे अध्यक्ष होतो. सध्यां ना. दा. ग. खापर्डे हे त्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. ना. अणे यांनी स्थापलेल्या मूळ हिंदु नॅशनॅलिस्ट लीगचें पुढे ऑ. इं. काँग्रेस हिंदु लीग व फिरून त्यानंतर ऑल इंडिया नॅशनॅलिस्ट लीग असें रूपांतर करण्यांत आलें. त्या लीगचे सभासद स्वागतमंडळांत आहेतच. खेरीज डॉ. मुंजांसारखे हिंदुमहासभेचेहि लोक त्यांत समाविष्ट आहेत. अशा रीतीने स्वागतमंडळांत बहुरंगीपणा दिसत असला तरी 'बारा पिळे पण एक रहाट' या न्यायाने त्या सर्वांचा टिळकपंथीय राजकीय धोरणाचा आग्रह हाच एक प्रमुख सामान्य विशेष आहे. त्या सर्वांची संपूर्ण लोकशाही पद्धतीच्या कारभारावर दृढ श्रद्धा असून निर्भेळ राजकीय स्वातंत्र्यच त्यांना अभिप्रेत आहे. तसेंच राजकीय पक्षोपपक्षांची संघटना शुद्ध लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेली असावी, त्यांत कोणाचीहि मुस्कटदाबी होऊ नये, व राजकारण हें राजकारणाच्याच व्यवहारी मार्गानें हाकलें पाहिजे, असा त्यांचा विश्वास आहे. स्वागतमंडळासंबंधी ही मी अशी फोड मुद्दाम अशाकरिता करून सांगितली की त्यावरून परिषदेंत होणाऱ्या कार्याची आपल्याला कल्पना यावी.

अ. भा. नॅशनॅलिस्ट लीगची गेल्या वर्षी दिल्ली येथे रीतसर प्रतिष्ठापना झाली. लीग मुद्दामच जातिनिरक्षेप ठेवण्यांत आली आहे. तिला अ. भा. स्वरूप असल्यामुळे तिचीं अधिवेशनें निरनिराळ्या प्रांतांत भरविलीं गेलीं पाहिजेत हेंहि उघड आहे. श्री. जम्नादास यांची इच्छा यंदाचें अधिवेशन मुंबई प्रांतांत व्हावें अशी होती आणि लीग आणि टिळकपंथीय राजकारण यांची ध्येयधोरणादिकांत समव्याप्तीच असल्यामुळे अधिवेशन खुद्द पुण्यासच भरवितां आलें तर उत्तम असें त्यांना स्वाभाविकपणेंच वाटलें. टिळक पुण्यतिथिनिमित्ताने दरसाल इं. होमरूल लीग ट्रस्ट मार्फत येथे टिळकपंथीय राजकीय कार्यक्रमाचा आखाडा पडतच असतो. अर्थात् त्याच अनुषंगाने होमरूल लीग, लोकशाही स्वराज्यपक्ष व हिंदुमहासभेचे कार्यकर्ते यांनी जम्नादासांच्या परिषदेसाठी आपणहून सर्व साहाय्य देण्याची तत्परता दाखविली यांत आश्चर्य नाही. जम्नादास हे आमच्या लोकशाही स्वराज्य पक्षाचे माजी अध्यक्ष आहेत व तेच आज या नॅशनॅलिस्ट लीग अधिवेशनाचेहि अध्यक्ष आहेत. यावरूनहि फिरून या दोन्ही संस्थांच्या ध्येयधोरणांतील अभेदता स्पष्ट होईल. लीगचें हें अधिवेशन याच वेळीं ठेवण्यांत आणखीहि एक हेतु आहे. तो हाच की कांग्रेस ताळ्यावर येऊन आपल्या वृत्तींत व कार्यक्रमांत बदल करीपर्यंत जे खरोखर राष्ट्रीय आहेत, परन्तु ज्यांना कांग्रेसमध्ये स्थान नाही अशा कांग्रेसबाह्य राजकीय पक्षोपपक्षांना एकत्र आणून त्यांची अखिल भारतीय संघटना करण्याच्या प्रयत्नाचा प्रारंभ करावा.

काँग्रेसच्या धोरणाबाबत माझे मतभेद प्रसिद्ध आहेत. तिच्या प्रमादांचा विसंगतीचा वाटेल तेवढा मोठा पाढा मला सहज वाचतां येईल. पण आजचा प्रसंग असा आहे की त्याची खपली काढू नये. म्हणून या आणीबाणीच्या प्रसंगीं काँग्रेस कार्यकर्त्यांच्या खऱ्या देशहितबुद्धीला आवाहन करून फक्त इतकीच विनंति करतों की त्यांनी अखिल भारतांतील पक्षोपपक्षांना एकत्र आणून सर्वांची एकमुखी मागणी करण्याचें श्रेय संपादावें.

काँग्रेसबाहेर जे पक्ष आहेत त्यांनी केवळ यावेळीं काँग्रेसच्या कार्यक्रमावर टीका करीत बसल्यान एखादा संयुक्त राष्ट्रीय पक्ष संघटित

होऊ शकणार नाही. गेल्या दहा-बारा वर्षांच्या प्रतिकूल अनुभवामुळे त्यांच्या ठिकाणीं जी पराभूत वृत्ति निर्माण झाली आहे, ती त्यांनी प्रथम झाडून टाकली पाहिजे. आणि कॉंग्रेसेतर सर्व पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते सर्व एकमुखाने बोलू लागतील तर त्याच पराभूत वृत्तीचें विजिगीषु वृत्तींत रूपांतर होणे कठीण नाही.

भावनांच्या आहारीं जाऊन अचाट घोषणांचा आक्रोश कोणालाहि वाटेल तेवढा मोठा करतां येणे अशक्य नाही. परंतु डोळे उघडे ठेवून चालणाऱ्या व्यवहारी राजकारणी लोकांना अंतर्यामींच्या भावना तशाच अंतर्हित ठेवून प्रत्यक्ष व्यवहारांत सफल होण्याचा संभव असेल तेंच बोललें पाहिजे. पण त्या धोरणाने अशा लोकांनी आपली मागणी बुद्धयाच थोडी आखूड धरली, किंवा भाषेला थोडी मुरड घातली, तरी लगेच त्याचा विपर्यास करण्यांत येतो.. वास्तविक परकीयांच्या हातून सर्व राजकीय सत्ता हिंदी लोकांच्या हातांत पडणार त्या क्रांतीच्या विविध मार्गांच्या शक्याशक्यतेचें गणित व्यवहारवादी राजकारणी लोकांना मनोमन करतां येत नसेल असें थोडेंच आहे ? पण तें गणित लोकांत जाहीर रीतीने मांडून दाखवतांना कांही अडचणी येतात. एक तर क्रांतीच्या त्या त्या मार्गांत आडवीं येणारीं अकल्पित अभावित संकटें कोणचीं असूं शकतील याचा त्यांना जाहीर उच्चार करवत नाही. कारण तसा तो करावा तर लगेच लोकांच्या उत्साहावर पाणी ओतल्याचा आरोप स्वीकारावा लागतो. याशिवाय दुसरी अडचण म्हणजे सर्वच राजकीय पक्षांना हेतुनिदर्शन करण्याबाबत पीनल कोडाने घातलेली मर्यादा आणि भरींत भर म्हणून आता लादला गेलेला भारतरक्षणाचा सर्वव्यापी कायदा.

या कायद्यांत दिसून येणारी महायुद्धामुळे झालेली इंग्रजांची मनःस्थिति अगदीच नाजूक होऊन गेली आहे. इतकी की त्या भांबावलेल्या मनःस्थितींत ते वाटेल त्या गोष्टीचा काल्पनिक आधार घेऊन स्वतःला व लोकांना धीर देण्याचा हास्यास्पद प्रयत्न करीत आहेत. व्ही फॉर व्हिक्टरीचा शोध हा त्याचाच नमुना. पूर्वी शक्तिउपासनेंत शाक्त व तांत्रिक लोक आपल्या गुप्त विधींत असल्याच यंत्रांचा, चक्रांचा, स्वस्ति-

कांचा उपयोग करीत त्यांतलाच हा प्रकार! त्याचाच भाऊ शोभणारा दुसरा नमुना म्हणजे रूझव्हेल्ट आणि चर्चिल हे हाडभाऊ ठरविण्याचा कोणा संशोधकाने केलेला उपद्व्याप! त्याला म्हणे सूक्ष्म संशोधनांत असें आढळून आलें की, इंग्लंडचे प्रधान चर्चिलसाहेब आणि अमेरिकेचे प्रेसिडेंट रूझव्हेल्टसाहेब यांचीं घराणीं पंधरा पिढ्यांपूर्वी एकच होतीं! म्हणजे अर्थात चर्चिलच्या अंगांत रूझवेल्टचेंच रक्त खेळत आहे आणि रूझवेल्टच्या अंगांत चर्चिलचें रक्त सळसळत आहे! अमेरिका इंग्लंडसाठी सध्या जे रक्ताचे डोह सांडण्यास सिद्ध झाली आहे त्यांत या रक्तसंबंधाने जणु काय मोठी भरच पडणार आहे!

आज अमेरिका खरोखरीच इंग्लंडला सर्व तऱ्हेची मदत देण्यास सिद्ध झाली आहे, हें उघडच आहे. अमेरिकेच्या म्हणजे या चुलत चुलत चुलत चुलतभावाच्या या मदतीचे उतराई होण्यासाठीं चर्चिलसाहेबांनी अमेरिकेशी नुकत्याच केलेल्या व्यापारी तहाने हिंदुस्थानची गठडी वळून त्याला अमेरिकेच्या आर्थिक गुलामगिरींत टाकण्याचा करार लिहून दिलेला नसला म्हणजे पुरे! असा संशय कोणास आला तर तो स्वाभाविक आहे. कारण अमेरिकेने इंग्लंडसाठी सर्वस्वच पणास लावल्यासारखें केलें आहे; तेव्हा त्याला बक्षिसहि तसेंच पाहिजे. क्रिकेटच्या खेळांतील एका गंमतीदार प्रसंगाचा दृष्टांत देऊन माझा एक विनोदी स्नेही म्हणाला की, स्वतःला धांवता येई ना म्हणून आपल्या धावा काढण्यासाठी इंग्लंडने अमेरिकेला आपला धांवण्या भिडू बनवून आणलें खरें. पण तो सवाई मदतगार भेटला! स्वतः धावण्याची हमाली करून, शिवाय इंग्लंडचा स्कोअर वाढवून देण्याऐवजी तोच बॅटस्मन पुढे घुसून इंग्लंडने मारावयाचे चेंडू आपल्याच बॅटीने टोलवीत निघाला आहे व इंग्लिश गड्याला विश्रांति देत आहे! असो चालू महायुद्धाने आपण स्वतः खरोखर किती दुबळे आहोत याची चांगलीच जाणीव इंग्रजांना आता झाली आहे. पण त्याजमुळे ते कमालीचे चिडखोर, कावरेबावरे बनले आहेत. 'ऐवज थोडा, रुवाब मोठा' या म्हणींतील सरदाराप्रमाणें इंग्लंड केवळ दमावर किंवा भपक्यावर वेळ मारून नेतें, असा इंग्रजी राजकारणाचा दुर्लौकिक गेलीं पन्नास

वर्षे साऱ्या युरोपभर गाजतच होता. या महायुद्धाचे वेळीं मात्र त्याचें खरें स्वरूप बाहेर पडलें आहे. आणि खालच्या वर्गाचें तिकिट काढून बेलाशक वरच्या वर्गाने प्रवास करणाऱ्या एखाद्या गांवठी साहेबाचा कोट तिकिट कलेक्टरने पकडून त्याला 'तिकिट बताव' म्हणून ताणलें म्हणजे त्याची जी शोभा होते तशीच आज इंग्लंडची झाली आहे.

एका राष्ट्राच्या हातांतून सर्व राजकीय सत्ता दुसऱ्या राष्ट्राच्या हातांत ज़ाते ती क्रांति अगोदर आंखलेल्या नकाशाबरहुकूम अगदी बिन-चूक त्या त्या क्रमाने घडून येते असें क्वचितच घडतें. 'ॲनॅटमी ऑफ रेव्हो-ल्यूशन' या ग्रंथांत प्रो. ब्रिन्टन म्हणतात कीं, तशी क्रांति प्रत्यक्ष घडून येणें हें जितकें आधी ठरविलेल्या मसलतीच्या नकाशावर अवलंबून असेल तितकेंच तें बहुधा तत्कालीन परिस्थितीवर किंवा योगायोगावरही अव-लंबून असेल. केवळ योगायोग किंवा केवळ कटाची कांटेकोर सिद्धता या एकेकां-वरच भर देणें चूक ठरेल. तो निखालस एकांतिक अतिरेकीपणा ठरेल. परिस्थितीने गांजलेले लोक क्रांतिवादी बनून प्राप्त परिस्थिति उलथून टाक-ण्यासाठीं बंडाची मसलत ठरवितात, कटाची सिद्धता करतात व क्रांतीची बीजें ते पेरतात. पण ती कुशल माळ्याप्रमाणे अनुकूल हंगाम पाहूनच त्यांना पेरावीं लागतात म्हणजे निसर्ग, परिस्थिति किंवा योगायोग यांचें साहाय्य त्यांना लागतेंच आणि तसें मिळालें तरच त्यांचे प्रयत्न प्रत्यक्ष सफळ होतात. आता तोच दृष्टांत हिंदुस्थानच्या चालू परिस्थितीस लावून पाहिला तर असें दिसून येईल की, कांग्रेसने क्रांतीसाठी सत्याग्रहाचा म्हणून मार्ग स्वीकारला आहे तो अपुरा एकांगी आहे. कारण सत्याग्रहयांना डांबावयास लागतील एवढे तुरुंग सरकारजवळ आहेतच. शिवाय हा जो सत्याग्रह होणार तो नक्की कोणत्या ध्येयासाठी याचा स्पष्ट खुलासाहि अद्याप झालेला नाही, निदान लोकांना तो पटलेला नाही. पण सर्वांत मोठा आक्षेप असा की, या सत्याग्रहामुळे चालू राजकीय गोंधळांतून मार्ग निघण्याऐवजी अधि-कच गुंतागुंत होईल, व तदनुषंगिक किंवा जातीय दंग्यांना ऊत येऊन उप-द्व्यापी लोकांच्या हातांत कोलीत दिल्यासारखें होईल.

याच्या उलट आता हजारोंनी भरती करून या वेळीं सरकारला साहाय्य द्यावें, सैन्यांतील सैनिकांच्या बळावर पुढे चळवळ करून ध्येय

साध्य करावें हा दुसरा मार्ग अधिक यशस्वी होण्याचा संभव. पण चालू युद्ध संपणार, त्याला कालावधि आहे. मात्र हा मार्ग इंग्रजांनाहि मान्य होण्यासारखाच आहे. पण तरीहि लोकांत विश्वास आणि उत्साह वाढविण्यासाठी राजकीय सुधारणा त्वरित दिल्या पाहिजेत. तसें होईल तरच लोकांना सैन्यांत शिरण्याचा उपदेश करण्यास लोकांना उत्साह वाटेल व सैनिकांनाहि अशी खात्री पटेल की, महायुद्धानंतर रणांगणावरून आपण स्वदेशांत परत येऊं ते स्वतंत्र राष्ट्राचे शिपाई म्हणूनच येऊं.

आज सरकारच्या मुलकी व लष्करी सर्वच खात्यांचीं द्वारें युद्ध-साहाय्यार्थ सर्वांना सताड उघडीं झाल्यामुळे त्यांत, बेकारी भोगीत असलेले लक्षावधि लोक तूर्त पोट भरू लागले आहेत हें खरें. पण तेथे खपणाऱ्या त्या लक्षावधि लोकांपैकीं एकाच्या तरी चेहऱ्यावर अशी समधानाची छटा उमटत असेल काय की मी येथे जातीनिशी खपतों तें माझ्याच सरकारासाठी किंवा माझ्याच देशासाठी ? हिंदी लोक दुसऱ्या कोणाही आक्रमक परकीय सैन्याशी लढणार किंवा लढतात तें त्यांना तसें करणें प्राप्तच आहे म्हणून ! परंतु त्यावेळीं त्यांची मनांत हीच भावना असते की यावेळीं अगदींच अनोळखी उपटसुंभ शत्रूंना घरांत घेण्यापेक्षा तूर्त इतके दिवस जानपछान झालेला जुन्या ओळखीचा परकीयच आपला म्हटलेला बरा ! हिंदी लोकांना जर्मनी–जपानपासून आपला लभ्यांश नाही हें कळतेंच. शिवाय परकी राष्ट्राची मदत घेऊन खरें स्वातंत्र्य मिळविता येत नाही हेंहि जगाच्या अनुभवावरून त्यांना माहित झालेलें आहे. इसापनीतींतील माणूस आणि घोडा यांची गोष्ट तो कसा विसरेल? असो. हें लोकांसंबंधी झालें. उलट पक्षीं सरकारने हे लक्षांत घेतलें पाहिजे की, लोकांत असंतोष बेगुमानपणे तसाच धुमसूं दिला तर त्याचें निखालस दुष्टाव्यांत रूपांतर झाल्याखेरीज राहात नाही. लोकांचा अंत सरकारने पाहूं नये. जनतेंत पसरलेल्या या विद्वेषी भावनेचें वर्णन कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या ठरावांत पुढील शब्दांनी उत्कृष्टपणें व्यक्त केलें आहे. ते शब्द असे: " लोकांत ब्रिटनविरुद्ध असंतोष भयंकर प्रमाणांत वाढत असून त्याचा परिणाम म्हणजे दिवसेंदिवस जपानच्या विजयाबद्दल लोकांना मन:पूर्वक आनंद वाटूं लागला आहे हें होय. ब्रिटनविषयीच्या

दुस्वासाची किंवा द्वेषाची ही भावना निर्मूल करण्याचा प्रयत्न झाला नाही तर त्याचें पर्यवसान हिंदी लोक शत्रूला फितूर होण्यांत झाल्याखेरीज राहाणार नाही." कॉंग्रेसला अर्थातच परक्या शत्रूचें आक्रमण मान्य नाही. तिला शत्रूचा प्रत्यक्ष प्रतिकारच करावयाचा आहे. पण त्यासाठी लष्करभरतीचा प्रचाराचा मार्ग सोडून तिने स्वीकारलेला सत्याग्रहाचा मार्ग मात्र अगदी विचित्र आहे यांत शंका नाही.

क्रिप्ससाहेबांची तडजोड फुकट गेली; पण त्यांतूनच गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाची वाढ झाली. पण अद्यापहि इंग्लंडला उदारपणा दाखविण्यास वाव आहे. कारण त्या कार्यकारी मंडळाचें संपूर्ण हिंदीकरण कोठें झालें आहे ? ती गोष्ट त्यांना सहज करतां येईल. तसेंच जीं महत्त्वाचीं चार खातीं आज तिघां नव्या युरोपियनांनाच सुपूर्त केलीं आहेत तीं हिंदी सभासदांकडे सोपविण्यास काय हरकत ? आज कदाचित तावडतोब मध्यवर्ती कार्यकारी कौन्सिल, मध्यवर्ती असेंब्लीला जबाबदार असें करतां येणार नाही. पण उलट स्टेट सेक्रेटरीचे अधिकार आपणहून गव्हर्नर जनरलला सुपूर्त करणें आणि गव्हर्नर जनरलने आपल्या कौन्सिलच्या निर्णयानुसारच वागावें अशी प्रथा पाडणें या गोष्टी तर सहज करतां येतील. युद्धकाळापुरता सरसेनापति प्रथम गव्हर्नर-जनरलला व त्याच्यामार्फत कार्यकारी कौन्सिलला जबाबदार धरला जावा. या सर्व सुधारणा १९३५ च्या स्टॅट्यूटमध्ये किंचित फेरबदल करून सहज साधतां येतात. व ब्रिटिश कॅबिनेटने मनांत आणलें तर त्यांना एका दिवसांत पार्लमेंटची मंजुरीहि मिळविणें कठीण नाही. ऐन दंगलीच्या वेळीं असले फेरफार घडवून आणणें हें फार कठीण आहे, असा कोणी आक्षेप काढील तर त्याचेंहि तोंड तावडतोब बंद करतां येईल. महायुद्धांत फ्रान्सवर नौबत गुदरली त्यावेळीं जबाबदार ब्रिटिश मुत्सद्द्यांनीच रिपब्लिक फ्रान्स व नियंत्रित राजसत्ताक इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांना युद्ध चालू असेपर्यंत एका राज्ययंत्राखाली आणण्यांत यावें अशी सूचना केली नव्हती काय ? मग त्या मानाने गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलला राज्यकारभाराच्या जबाबदारीचे हक्क देऊन टाकणें म्हणजे तर फारच सुलभ गोष्ट होय.

निरनिराळ्या पक्षोपपक्षांनी स्वतंत्र प्रयत्न करण्यांत शक्तिक्षय होतो,तो या महत्त्वाच्या प्रसंगीं तरी हिंदुस्थानांत होऊं नये असें मला वाटतें. १९२० सालापूर्वी जसा कांग्रेस हा एकच सर्वसमावेशक पक्ष होता तसा प्रकार घडला पाहिजे. त्या वेळच्या कांग्रेसमध्ये जहाल, मवाळ, हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिश्चन सर्व एकत्र एकमेकांच्या खांद्याशी खांदा लावून देशाचें भांडण भांडत होते. आज मुस्लीम लीग फुटुन निघेल व त्यामुळे आज अर्थात मुसलमान तशा कांग्रेसमध्ये येणार नाहीत. पण तेवढे सोडले तरी इतरांचा समावेश समभावाने करून घेण्याची दूरदृष्टि किंवा सौजन्य कांग्रेसने दाखविलें पाहिजे. "सर्व राष्ट्राच्या वतीने बोलण्याचा हक्क काय तो एकटच्या आम्हालाच." ही घमेंडानंदनवृत्ति कांग्रेसने सोडली पाहिजे. खुद्द इंग्लंडांतहि मुत्सद्द्यांना विशिष्ट प्रसंगीं पक्षाभिनिवेश सोडून संयुक्त मंत्रिमंडळें स्थापावींच लागलीं आहेत हें विसरूं नका. २०० वर्षे सतत बद्धमूल झालेली ती पद्धत १९१४ ते १८ या कालांत व कच्च्या तहानंतरच्या डळमळीच्या चार सालांत इंग्लंडला अजीबात सोडावी लागली. त्यानंतर सात वर्षेपर्यंत पुन्हा बहुसंख्य पक्षाकडे प्रधानमंडळ गेलें. पण त्यानंतर देशांतील आर्थिक स्थिति इतकी बिकट झाली कीं त्या वेळच्या अधिकारारूढ मजूर पक्षीय मंत्रिमंडळाने पक्षाभिनिवेश सोडला व सर्वपक्षीय राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापून राज्यकारभार केला. सारांश, बहुसंख्येच्या जोरावर हक्काचें मंत्रिमंडळ हातीं असता व्यापक दृष्टि चालवून आपल्या स्वार्थावर व सत्तेवर मुरड घालून दुसऱ्या पक्षांना समाविष्ट करून घेण्याचा उदारपणा आपण होऊन तेथे दाखविला गेला. खुद्द आजच्या युद्धकाळीं तोच प्रकार तेथे घडलेला आहे. अर्थात इकडेहि, कांग्रेस जर स्वतः सर्वांत मोठा व प्रबळ पक्ष म्हणून दावा सांगते, तर तिनेच पुढाकार घेऊन सर्व पक्षीयांची एकी करून एक संयुक्त राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापण्याची खटपट करणें हें तिचेंच कर्तव्य आहे. राजकीय दृष्ट्या इंग्लंड किंवा जर्मनी यांचें परस्परांशी जसें युद्ध सुरू आहे तसेंच हिंदुस्थानचें इंग्लंडशीहि एक तऱ्हेने युद्धच चालू आहे. आणि तें युद्ध हिंदुस्थानाला जिंकावयाचें तर तुमची एकी कोठे आहे तें दाखवा या सरकारच्या आव्हानाला ती एकी करून दाखवूनच उत्तर दिलें पाहिजे.

ब्रिटनने हिंदुस्थानाला तावडतोब सर्व राजकीय सत्ता देऊन टाकावी असे परदेशांतही आता उद्गार निघूं लागले आहेत. प्रो. लास्की म्हणतात, "हिंदी लोकांच्या मागणीला धाब्यावर बसवून आपण जो रगडून राज्यकारभार तेथे चालूच ठेवला आहे, त्यामुळे जगांत आपलीं तोंडें काळीं झालीं असून साऱ्या जगभर कपटी म्हणून आपली नालस्ती होत आहे. हिटलर–मुसोलिनी यांचें संकट पुढे उभें राहीपर्यन्तच्या मागच्या काळांतला इंग्रजी अंमल म्हणजे साम्राज्यशाहीतर्फे कसें शोषण करण्यांत येतें याचें उत्कृष्ट उदाहरण होय. हिंदुस्थान ब्रिटनपुढे खडा उभा राहून आपल्या हक्काच्या स्वराज्याची मागणी करूं लागला आहे. आणि आपणहि आता मनांत हें पक्कें जाणून आहोत कीं, आपलें कितीहि अपरंपार नुकसान झालें तरी तें त्याला देऊन टाकणें आपल्या देवालाहि टळत नाही. पण तरीहि सुचेल त्या खऱ्याखोटया सबबी सांगून आपण अद्याप त्याला टोलवतोच आहो. खरोखर आम्ही कसले हिंदुस्थानचे पालक ? एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे खरोखर पालक केव्हा म्हणता येईल तर तेव्हाच की जेव्हा अगदी त्रयस्थ व्यक्तीहि निर्वाळा देईल की पालक म्हणून म्हणविणाऱ्या राष्ट्राचा त्या राष्ट्रांत यत्किंचितहि स्वार्थ किंवा हितसंबंध गुंतलेला नाही, तेथले लोक हा पालक काढून ऱ्या अशी मागणी करीत नाहीत, व पालक राष्ट्र ज्या कांही गोष्टी करतें त्यांचा फायदा प्रत्यक्ष फळाच्या रूपाने त्याच राष्ट्राच्या पदरांत पडलेला दिसतो. या कसोटया लावल्या, तर इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील साम्राज्याबद्दल कोणीहि असेंच म्हणेल की हिंदुस्थानांतून जितक्या लवकर आपण आपलें चंबूगबाळें आवरू तितकें दोघांनाहि हितकर होईल. आज या महायुद्धांत साऱ्या जगाचें स्वातंत्र्य आणि लोकशाही रक्षण करण्याचा डंका पिटीत आपण निघालों आहोत. तेव्हा हिंदुस्थानांतून आपली स्वत्वनिवृत्ति करण्यास यापेक्षा सोन्याची संधी दुसरी कोणती ?"

---

# १२. हा कावा आम्हांला समजतो!

( सह्याद्रि, सप्टेंबर १९४३. )

तारीख २ ऑगस्ट रोजीं मावळते व्हाअिसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी मध्यवर्ती विधिमंडळापुढे, निरोप घेण्यादाखल, अेक विस्तृत भाषण केलें. तें अपेक्षेप्रमाणे पोकळ वावदुकी स्वरूपाचेंच झालें. युद्ध-काळांत हिंदुस्थानाचे कोटयवधि रुपये खर्च करून आपण मित्रराष्ट्रांना युद्ध-साहित्य कसें किती पुरविलें, आणि लष्करी सामर्थ्य अनेकांगानी कसें कितीं वाढविलें, याचें भरपूर विवेचन या भाषणांत होतें. पण अितकें साहाय्य पुरवि-णाऱ्या हिंदुस्थानाला राजकीय दृष्टया अिंग्लंड काय देणगी देणार याचा खुलासा त्यांनी अितकाच केला की, 'या देशांतील सर्व पक्षोपपक्षांनी अेक-मुखी स्वराज्याची मागणी केल्यास ती अिंग्लंड मान्य करील.'

## मानभावीपणाचें आश्वासन

पण हें आश्वासन सर्वस्वी मानभावीपणाचें आहे.कारण त्यांतील ही कपटी अट केव्हाहि पुरी होणें शक्य नाही हें त्यांना स्वतःला पूर्णपणें माहीत आहे. आणि या असंभवाखाली आश्रय घ्यावयास सांपडल्यामुळे हिंदुस्थानला स्वराज्य देण्याचें आपोआप टळतें, याचें त्यांना गुप्त समाधानहि वाटत असावें. ' सर्व राजकीय व अितर पक्षांचें अेकमत करा ' ही अट अितकी अुघड अुघड अवघड आहे की ती हिंदुस्थानांत केव्हाहि पुरी व्हावयाची नाही, अितकेंच काय, जगांतील कोणत्याहि देशाच्या आजी किंवा माजी राजकीय अितिहासांत अशा प्रकारची अट पुरी झाल्याचा दाखला मिळ-णार नाही.

या अेकीच्या चौकटींत कोण कोण बसावयाचे हें लक्षांत घेतलें, म्हणजे वरील अट घालणाराचें बुद्धिमत्व, पण त्याबरोबर त्याचें अप्रामाणि-

कत्व कळून येतें. ज्या अेकमताची मागणी करण्यांत येते त्यांत अितके पक्षोपपक्ष आहेत– (१) पाकिस्तान मागणारे मुसलमान. (२) पाकिस्तान न मागणारे, पण आपल्या प्रांतांत अल्पसंख्य म्हणून शिरजोर होण्याअितकें महत्त्व मागणारे मुसलमान. (३) पाकिस्तान काय वाटेल तें झालें तरी अमान्य म्हणणारे हिंदु. (४) पाकिस्तान दिलें तरी निदान प्रांतानिहाय हिंदु लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्वाचे हक्क मिळालेच पाहिजेत असें म्हणणारे हिंदु. (५) जातीने व वंशाने हिंदु, तथापि अन्याया-मुळे मागासलेले अस्पृश्य गणले गेलेले आजवरचे दलित, म्हणून यापुढे पुढार-लेल्या वर्गावर वर्चस्व गाजवून सूड अुगविण्यास सांपडावा अशी अिच्छा करणाऱ्या हिंदु जाती. (६) बोलूनचालून विधर्मी पण अल्पसंख्य म्हणूनच जादा हक्क मागणारे खिस्ती, यहुदी, पार्शी अित्यादि वर्ग. (७) आजवर प्रस्थापित झालेले म्हणून चालू वहिवाटीने यापुढेहि राहावें, अशा फाजील हक्कांचा दावा सांगणारे परदेशीय गोरे नोकर. (८) साम्राज्यशाहीचा अुपयुक्त आधारस्तंभ असे ब्रिटिश व्यापारी. आणि (९) लष्करी दृष्टचा साम्राज्याचें हित पाहणारे लोक.

## निःस्वार्थी जुलूमहि चालेल !

अितक्या विविध व विरोधी पक्षोपपक्षांनीं मिळून अगदी 'एकमताने' राज्यघटना तयार करावी ! आणि मग ती पार्लमेन्ट हिंदुस्थानाला बहाल करणार ! पण अशी तोंडमिळवणी आजवर कोणत्या देशांत सुखाने समजु-तीने समाधानाने झालेली आहे ? कोणत्याहि देशांतील पार्लमेंटाची घटना पाहिली, तर तींत अनेक संघटित पक्ष असतातच. आणि पार्लमेंटाचा कारभार चालतो तो कोठेहि त्यांच्या 'अेकमताने' चालत नाही ! बहुमतानेच चालतो! बरें, ज्या देशांत पार्लमेंट प्रस्थापित नाही त्या देशांत राजा, किंवा प्रेसिडेंट, किंवा अध्यक्ष, किंवा सोटेशहा, किंवा सुलतान राज्य हाकीत असला (म्हणजे संघटित पक्ष नसले तरी) राज्यांत त्याला प्रतिपक्षी नाही असें कधी तरी घडतें काय ? अशा देशांत अेकतंत्री 'अेकमताने' राज्य चालतें याचा अर्थ 'एकट्या'च्या मताने पण जुलूमजबरदस्तीने तें चालतें असाच असतो ! तेथे पक्ष नाहीत, किंवा आहेत ते सर्व सहमत आहेत, असा त्या 'अेकमताचा'

अर्थ नाही. अर्थात हिंदुस्थानांत राज्यघटना व्हावयाची ती पार्लमेन्टरी देशां-तल्याप्रमाणे सर्वानुमतें न होतां केवळ 'बहुमताने' झाली तरी ती अिंग्लंडने व्यवहार्य म्हणून मान्य केली पाहिजे, किंवा, निदान पार्लमेंट नसलेल्या देशांतल्याप्रमाणें, सर्व पक्षांना बाजूला ठेवून अिंग्लंडने आपला खास अधिकार चालवून, वाटल्यास जुलुमाने म्हणा, ती घटना हिंदुस्थानावर लादली पाहिजे.

हा वरील शेवटचा विकल्प दिसण्यांत थोडा चमत्कारिक दिसतो. पण त्याचा खुलासा सोपा आहे. कारण मुद्द्याची गोष्ट ही की, त्यांत कल्पि-लेल्या, हिंदुस्थानाला मिळणाऱ्या व जुलुमाने प्रस्थापित होणाऱ्या, राज्यघट-नेंत खरें स्वराज्य व स्वातंत्र्य आहे की नाही ? आणि तें असेल तर मग तें स्वातंत्र्य देणारी अशी कोणतीहि घटना अिंग्लंड करो, व वाटल्यास ती हिंदुस्थानांतील कांही पक्षांवर जुलुमानेहि लादो ! अमेरिकेंत पूर्वी गुलाम-गिरी रद्द झाली, तेव्हा सरकारी शिपायांनी अधिकाऱ्यांनी गांवोगांवीं जाअून आपल्या हाताने गुलामांना बंधमुक्त केलें. तेव्हा, असें सांगतात की, गुलाम-गिरी अंगवळणीं पडलेले, किंवा गुलामगिरींत सुखावलेले, असे कित्येक गुलामच स्वतः या बंधमुक्ततेवर नाराज होते ! त्यांना वाटलें, 'आमच्यावर स्वातंत्र्य 'लादलें' जातें हा कोण जुलूम ? ' पण हा जुलूम करणारा अमेरि-कन प्रेसिडेंट लिंकन स्वतः निःस्वार्थी, खरा परोपकारी होता म्हणून परि-णामीं त्याचा जुलूम हा गुलामांवर अुपकारच ठरला. असा निःस्वार्थी जुलूम– म्हणजे स्वराज्य व स्वातंत्र्य लादण्याचा जुलूम–अिंग्लंड हिंदुस्थानावर कर-णार असेल तर तो जुलूम आम्ही सोसू ! बाप मुलाला सर्वाधिकार देण्याला तयार झाला याची खूण म्हणून, त्याने कमरेच्या किल्ल्या काढून खाली पाहून मुलाच्या अंगावर आनंदाने फेकल्या, आणि त्या किल्ल्या मुलाच्या कपाळाला लागून टेंगूळ आलें तरी काय हरकत ? अेका हाताने तो किल्ल्या अुचलील व दुसऱ्या हाताने टेंगूळ चोळील.

## स्वातंत्र्याची घोषणा म्हणजे शपथच !

आता हा जुलुमाचा अपवादहि टळावा, तो आपणावर न यावा ,अशी अिंग्लंडची अिच्छा असली, तर त्यालाहि अेक मार्ग आहे. पक्षोपपक्ष व

विरोधी हितसंबंध असतात तेथे अेकमुखी अेकमत कधीच होणें शक्य नाही, याचा दाखला आपणाला आज जगभर न्यायकोर्टांतून मिळतोच की ! कारण स्वतः पक्षकारच जर अितके समजूतदार झाले, तर न्यायाधीशाची गरज काय ? पण न्यायाधीश व न्यायकोर्टें ज्यांत नाहीत असा अेक तरी देश भूतलावर आहे काय ? आणि पक्षकार भांडतात म्हणून त्यांच्यावर रागावून, किंवा त्यांच्या भांडणाचें निमित्त करून, न्यायाधीश हात जोडून बसतो काय? तो म्हणतो, " हे पक्षकार लोक आपसांत तडजोड करूं शकत नाहीत म्हणूनच मी या खुर्चीवर बसलों आहें. आणि कांही तरी न्यायनिर्णय दिल्याशिवाय तिच्यावरून मला अुठतां येत नाही, व मी अुठणार नाहीं." प्रथम तो आपल्या 'चेंबर' मध्ये पक्षकारांच्या वकिलांना बोलावून समेटाच्या सूचना करील. त्यांचा अुपयोग झाला नाही, तर जावजबावांना सुरुवात करील. फिरून मधून मधून तोडजोडीच्या सूचना करील. साक्षीपुराव्याचें काम निम्मे अधिक झालें असतां, त्या मजलेलाहि पक्षकार तयार होतील तर, त्यांना लवाद नेमून देअील. हेतु हा की, कोर्टापेक्षा लवादापुढे अधिक खेळीमेळीनें म्हणा, शिव्यागाळीने म्हणा, पण अनौपचारिक रीतीने, काम चालतें. आणि तेंहि नाही तर मग स्वतः निर्णय देण्याला तो न्यायाधीश सरसावतो.

याचा अर्थ हाच. न्यायाधीशाचा निश्चयच असतो की, (१) कोर्टांत आले तरी पक्षकारांना तडजोड करण्याला साहाय्य करीन. (२) तें न झालें तर त्यांना मनांत मूर्ख म्हणेन, पण न्यायाचा निकाल करण्याची जबाबदारी स्वतः पतकरीन. मग स्वतः निर्णय लिहावयास बसतांना तो वकिलांना 'तुमच्या तक्रारी सांगा' असें म्हणेल. कायद्याचीं पुस्तकें चाळील. न्यायनिवाड्यांचे रिपोर्ट चाळील. दाखले पाहील. देवाला व मनाला स्मरून निकाल लिहील. कोणाला काय द्यावयाचें तें देअील. नाही म्हणावयाचें तें नाही म्हणेल. कोणाचें वर्तन कमीअधिक सदोष हें पाहून त्याप्रमाणे, कोर्टाचा खर्च वादी-प्रतिवादींवर कमीअधिक लादील. पण शेवटीं निकाल करूनच उठेल. व तो अमलांत आणण्याचा हुकूम देअील. आता अशा रीतीने न्यायाधीशाच्या हातून निवाडा घेणाऱ्या सर्व पक्षकारांना आपणाला हवा तसाच निकाल कसा मिळेल ? पण मग, आपल्या हट्टामुळे सर्व बिघडलें

हें जाणून, त्यांना तो निकाल, न्यायाधीशाला शिव्या देत देत कां होईना, स्वीकारावाच लागतो. हा दाखला हिंदुस्थानाच्या राजकारणाला लावून असें म्हणतां येतें की, हिंदी पक्षोपपक्ष अेकत्र बसून सर्वानुमतें निर्णय घेण्याला, राज्यघटना बनविण्याला, असमर्थ ठरले तरी न्यायदानाचा निकाल त्यांच्या पदरीं पडू नये असें होत नाही. न्यायाधीश न्यायपीठावर आरूढ होतांना न्यायदानाची शपथ घेतो, त्याप्रमाणें 'युद्धोत्तरकालीं हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्याचीं' घोषणा ब्रिटिश प्रधानमंडळाने केली ती शपथच घेतली. अर्थात् त्याप्रमाणें तें स्वातंत्र्य त्यांच्या पदरांत टाकण्याची जबाबदारी त्याची त्यानें पार पाडली पाहिजे.

## सरकारानेच जबाबदारी घ्यायला हवी

हें करण्याला मदत म्हणून सरकाराने प्रमुख प्रमुख हिंदी पुढाऱ्यांना व्यक्तिशः बोलावून सल्ला घ्यावा. प्रत्येक पक्षोपपक्षाला आपापल्या परिषदा भरवून ठराव करण्यास व ते करून आपणाकडे पाठविण्यास सांगावें. हिंदुस्थानांतच गोलमेज परिषद भरवावी. अुठल्याबसल्या विलायतेंतून तज्ज्ञ या नांवाखाली आपले गोरे हस्तक सरकार आणवितें तसे कोणी या निर्णयाकरिता वाटल्यास बोलावून आणावे. त्यांच्याकडून अशा परिषदेंत किंवा खासगी रीतीने वाद करून तत्त्वशोधन करावें. वाटल्यास तिऱ्हाअीत सल्लागार–कोणी अमेरिकन–युरोपियन–बोलवावा. अशा गोलमेज परिषदेपुढे लीग ऑफ् नेशन्स्ने (राष्ट्रसंघ) राष्ट्रीय पुनर्घटनेकरिता अल्पसंख्य लोकांच्या हितसंरक्षणार्थ केलेले कायदेकानू मांडून चर्चा करवावी. आणि हिंदी अल्पसंख्य पक्षांना त्याविषयी मान्यता अमान्यता विचारावी. अेकेक मुख्य किंवा अुपविषय घेअून, वाटल्यास त्या त्या पुरते अुभय-संमत न्यायाधीश किंवा लवाद नेमून, त्यांचे निर्णय घ्यावे. स्वतःची म्हणन अेखादी योजना करून गोलमेज परिषदेपुढे मांडावी. तात्पर्य (१) लोकपक्षांना प्रास्ताविक हालचाल करण्यास सांगण्यापेक्षा सरकारने ती स्वतः करावी; आणि (२) तुम्ही अमुक अेका अवधींत निर्णय न कराल तर तो आम्ही जबाबदारीने करू, व अधिकाराच्या जोरावर अमलांत आणू, अशी घोषणा करावी. युद्ध चालू असतांच त्या कामाला लागावें.

ही गोष्ट सरकार करील तर पेंचप्रसंग सुटेल, चाकें हलूं लागतील, निर्णय घेतले जातील, व युद्ध संपण्याच्या सुमारास स्वतंत्र स्वराज्याची योजना तयार होअून राहील. युद्ध चालू असतां या योजनेला पार्लमेंटरी कायद्याचें स्वरूप प्रत्यक्ष देतां येणार नाही हें कबूल आहे. पण अिकडे हिंदुस्थान युद्धाला मदत करीत आहे, त्याबरोबर युद्धानंतरच्या स्वातंत्र्यदानाचीहि तयारी तितक्याच कसोशीने सरकाराकडून चालू आहे, असें लोकांना दिसेल. आणि युद्धसाहाय्याविषयी ज्या पक्षांत आज अुदासीनता किंवा शिथिलता आहे, त्यांत त्या कामीं अुत्साह दिसेल. बरें, सरकाराने स्वतःवर जबाबदारी घेअून केलेला निर्णय फुकट जातोच असेंहि नाही. कारण १९३१ चें कम्यूनल अॅवॉर्ड व १९३५ चा हिंदी राज्यकारभाराचा कायदा, हे दोघेंहि सरकारने आपल्या जबबादारीने केले व अमलांत आणले नाहीत काय? ते हिंदी लोकांना कधी कितीसे संमत होते? पण त्यांचा प्रत्यक्ष अंमल व व्यवहार झालाच की नाही? या निर्णयावर आधारलेल्या कायदेमंडळांचा स्वीकार, त्यांना शिव्या देत देत, कांग्रेससुद्धा सर्व पक्षांनी केलाच की नाही! त्याकरिता निवडणुकी लढवल्याच की नाही? प्रधानमंडळें बनविलींच की नाही? युद्ध सुरू झाल्यावर कॉंग्रेसने मूर्खपणाने अधिकारत्याग केला ही गोष्ट स्वतंत्र आहे व चालू चर्चेला गैरलागूहि आहे.

## स्वतः सरकारची विधायक सूचना कोठे आहे ?

पण वर वर्णन केल्याप्रमाणें स्वतः विधायक अुपक्रमाला यत्किंचितहि आरंभ न करतां, सरकार लोकपक्षांना उद्देशून 'तुम्ही एकत्र येऊन अेकमुखाने मागा म्हणजे आम्ही देतों' हें अेकच वाक्य पोपटपंचीसारखें नुसतें घोकीत राहिलें आहे. आणि उगवता–मावळता व्हाअिसरॉय तेंच बोलतो. स्टेट सेक्रेटरी तेंच बोलतो (चर्चिल तेंहि पुरें बोलत नाही.). साम्राज्यवादी ब्रिटिश व अमेरिकन वर्तमानपत्रें तेंच बोलतात. मुद्दाम निर्णय घेण्याच्या तांतडीच्या अैटीने स्टॅफर्ड क्रिप्स पाठविला तोहि तेंच बोलून हात हलवीत ( पण शेकहँड नव्हे हो! ) जातो. बरें, लोकांनी अेकत्र येअून निर्णय घ्यावा, तर त्याला उत्तेजन व साहाय्य तर नाहीच, उलट अडचणी उत्पन्न करण्याची सरकाराची तयारी! गांधींना सोडा म्हटलें तर सोडावयाचें नाही. सप्रू–जयकरांचें शिष्टमंडळ

भेटू म्हणेल तर भेट घेण्याची तयारी नाही. सभा-परिषदांना बंदी. धड खावयाला व अंग झाकावयाला कसें मिळेल याची चिंता जनतेला उत्पन्न करून ठेवलेली. अेवंच राज्य-घटनानिर्मितीकरिता पुढे पाऊल टाकावयाचें म्हटलें तर त्याला सर्वत्र विध्वंसक-प्रतिबंधक योजनांची उभारणी! स्वतः सरकाराची अशी विधायक सूचना, रचना, मांडणी, चालना कांही नाही!'

पण सरकार जर निर्णयाची अंतिम जबाबदारी आपल्या अंगावर न घेअील, तर कोण हलेल ? व हलून उपयोग तरी काय ? म्हणून जिना आपल्या घरीं! सावरकर आपल्या घरीं ! पण तेंच सरकार हिंदुस्थानांत अधिकृत गोलमेज परिषद भरवूं द्या, गांधींना सोडूं द्या, निरनिराळ्या पक्षांना परिषदेला प्रतिनिधि पाठविण्याचें आमंत्रण देअूं द्या, आणि "अशा परिषदेंत तुम्ही निर्णय घेतला नाही तर, नाअिलाज म्हणून, आम्ही तो घेतल्याशिवाय रहाणार नाही; मग तुम्हांला नाकें मुरडून चालणार नाही; नांवें ठेवण्याचा हक्क राहणार नाही; बहिष्काराची भाषा पूर्वीप्रमाणे फुकट जाईल; आम्ही न्यायदानाची शपथ घेऊन, दाखले पाहून, तारतम्य चालवून देव बुद्धि देईल तें करू; पण हिंदुस्थानाकरिता स्वतंत्र राज्याची घटना करून ती अंमलांत आणूं, सोडणार नाही." अशी घोषणा सरकार करूं द्या, म्हणजे काय चमत्कार होतील तें पाहा! पूर्वी एकदां पार्लमेंटामध्ये अेका मोठ्या अधिकाऱ्यानें असें म्हटलें होतें की, "हिंदुस्थानाचे लोक स्वराज्याच्या घोड्यावर आरूढ झालेले, व घोडा चालू लागलेला, पाहीपर्यंत आम्ही हिंदुस्थानांतून पाय काढणार नाही." याचा अर्थ हाच नव्हे का? की वरील दोन गोष्टी करण्याची जबाबदारी सरकारानें स्वतःवर घेतली आहे. 'क्विट इंडिया' ( चलो, भारतसे हट जाव, यहांसे निकल जाव ) या कॉंग्रेसच्या घोषणेला वरील उत्तर असेल तर ठीक आहे. पण तींत जी जबाबदारी गर्भित आहे, ती सरकार कां स्वीकारीत नाही?

## धूर्त साम्राज्यवाद्यांचा कावा

या सर्वांचा अर्थ आमच्या मतें तरी असा आहे की, युद्ध चालू असेपर्यंत हिंदुस्थानाच्या लोकांच्या डोळ्यांसमोर स्वातंत्र्याचें लोभनीय आमिष ठेवा-

वयाचें; भावी लाभाविषयीं केवळ गोड गोड बोलावयाचें; युद्धाची सबब सांगून आज विधायक असें स्वतः कांहीच करावयाचें नाहीं; आणि युद्ध संपल्यावर आश्वासनांचें माप पदरांत टाकण्याची वेळ येईल तेव्हा 'ज्या लोकांवर स्वराज्य घटना तयार करण्याचें आम्ही सोपविलें होतें त्यांनी त्याचें कांहीच केलें नाही' असा दोष देऊन मोकळें व्हावयाचें ! असा हा धूर्त साम्राज्यवाद्यांचा कावा आहे आणि आम्ही बुद्धिमंद लोक त्या कपटी काव्याला बळी पडत आहों. मित्र राष्ट्रांना युद्धाकरिता जी काय मदत हिंदुस्थानाकडून मिळावयास पाहिजे आहे त्यांतली कांही आम्ही खुषीनें देत आहों, आणि उरली सुरली सरकार आपल्या सत्तेच्या बळावर चोपून घेत आहे. यांत त्यांचें काडीअितकेंहि कमी पडलेलें नाही. मात्र युद्धानंतर स्वराज्य-दानाची वेळ येईल त्या वेळीं सरकार हात हलवून नामानिराळें होणार अशी अटकळ केल्यास फारशी चूक होणार नाही. युद्धकालीन घोषणा या सहेतुक व त्या वेळेपुरत्या असतात. अंगांतील दुखणें संपलें की तोंडांतल्या 'आओ' 'रामा' 'देवा' या सर्व हाका नाहीशा होतात, हें पूर्वीच्या महायुद्धानंतर अनुभवाला आलेलें आहे.

पण हें लक्षांत न घेतां सरकारच्या युद्धकालीन आश्वासनांनी भुलून जाणारे कांही लोक आमच्यांत आहेत. 'अंडीं फोडावयाच्या आधीच पिल्लें मोजणारे' लोक या जगांत असतातच. त्यांतील कांही लोक फाजील आशावादी असतात. म्हणजे जितकीं अंडीं तितकीं सगळीं पिल्लें शाबूत निघणारच, अशी त्यांची बिनहिशेबी अटकळ किंवा भोळी समजूत असते. पण इतर कांही लोक लुच्चे–लबाडहि असतात. त्यांना मनांतून हें माहीत असतें की, कोंबडीने घातलेल्या अंड्यांतून शेंकडा शंभर पिलें कधीहि निघूं शकत नाहीत. कारण त्यांतील कांही अंडीं नीट उबविलींच गेलीं नसतात, कांही नासतात, कांही कुजतात, कांही फुटतात. कांही अंडीं साप किंवा मांजरें खातात. कांही अंडीं अुनाड पोरें चोरून नेतात!

पण शेंकडा शंभर असा जो हिशेब होतो तो खरोखर या लबाडांच्या मनाशी नसतो. जनाशी असतो, बोलून दाखविण्याचा असतो. कारण त्यांना कोंबड्यांच्या व्यापारावर आगाअू कर्ज काढावयाचें असतें, व पुढे तें बुडवावयाचें असतें !

केवळ कोंबड्या पाळून अंड्यांचा व्यापार करणारेच असे असतात असें नाही. तर आंब्याला आलेल्या मोहरावरून फळांचा अंदाज करणारे व फळांची खोती विकू पाहणारेहि असेच–म्हणजे स्वतः फसणारे किंवा दुसऱ्याला फसविणारे–निघतात. खरें पाहिलें असतां सगळ्याच मोहराचे आंबे झाले तर झाडें मोडून जातील ! पण हा विचार कोण करतो ?

युद्ध जिंकल्यावर आपण काय काय करणार याविषयी दोस्त राष्ट्रांनी हल्ली जे मनोरथ बांधण्याचें काम आगाऊच चालविलें आहे तें पाहिलें म्हणजे, वर दिलेला कोंबडीच्या अंड्यांचा किंवा आंब्याच्या मोहराचा दाखला कोणालाहि सहज सुचण्यासारखा आहे. आणि त्याची खात्रीहि पण होईल की, हा केवळ भोळ्या आशावादित्वाचा प्रकार नसून पुष्कळसा जगाला फसविण्याचा डाव आहे.

## स्वार्थी मतप्रचार

चालू युद्ध जिंकल्यावर दोस्तराष्ट्रें काय काय करणार त्याचें शुभ वर्तमान तर अैका ! (१) जर्मनी, अिटली, जपान यांना असें नेस्तनाबूद करणार, अितकें चिरडून टाकणार, की त्यांनी पुढे केव्हाही वर डोकें करू नये. (२) कायमची शांतता प्रस्थापित होण्यासारखा तह या शत्रुराष्ट्रां. वर लादणार. (३) फॅसिझम, नाझीझम, सोटेशाही यांचा नायनाट करणार. (४) सर्व जगभर लोकसत्ता, स्वातंत्र्य व समता अवतरविणार. (५) प्रत्येक राष्ट्राला हवी ती राज्यपद्धति अमलांत आणू देणार. (६) बॉंबहल्ल्यादिकांनी जो नाश व विध्वंस झाला त्याचाच आयता फायदा घेअून, नवीं नगरें अुपनगरें वसवून सर्व प्रकारच्या वास्तुसुधारणा घडवून आणणार. (७) सर्व देशांतील दारिद्र्य, अुपासमारी व बेकारी काढून टाकणार. (८) सर्व राष्ट्रांना व्यापाराकरिता सर्व जग खुलें करणार व कच्चा माल यथान्याय वांटून देणार. (९) समाजसत्तेला अधिक वाव देअून, कांही थोड्या वर्गांच्या हातीं असलेली सत्ता व संपत्ति यांना आळा घालणार, आणि रशियाशी कायमची मैत्री जोडणार. (१०) जगांतील लष्करी खर्च कमी करणार. मात्र कोणाहि राष्ट्रावर शत्रूचा अवचित घाला पडून तें

जिंकलें जाअू नये अितकी सुरक्षितता साधणार. (११) हुंडणावळीचा गोंधळ काढून टाकून प्रत्येक राष्ट्राला आपापल्या अैपतीप्रमाणें परराष्ट्रीय व्यापार करणें सुलभ होईल अशी चलन-पद्धति अमलांत आणणार. (१२) दुर्बळां-वर प्रबळानें अतिक्रमण व अन्याय करणें शक्य होअू नये याकरिता सार्व-राष्ट्रीय असें न्यायमंदिर अुघडणार, व सार्वराष्ट्रीय असें सैन्य व आरमार जय्यत तयार ठेवणार ! अितकें खरेंच झाल्यावर सर्व जगभर सुख व शांतता नांदू लागावी यांत काय आश्चर्य ? पृथ्वीवरचा स्वर्ग याहून आणखी तो काय ? आणि लक्षांत ठेवा की, हें सर्व अिंग्लंड व अमेरिका दोघेच दोघे करणार !

अशा प्रकारचें शुभ वर्तमान पसरविण्यांत हेतु हा असतो की, तें कानीं पडणाऱ्या जनतेने, भावी आशेच्या अुवेने, अुत्तेजित अुल्हसित व्हावें. या भावी आशेच्या सुखमय कल्पनेंत चालू आपत्ति विपत्ति विसरून जावी. युद्ध लढण्याला लागणारें सर्व प्रकारचें बळ व साधन—माणसें सामान पैसा—हीं पुरवावीं. आणि सर्व प्रकारची अंतर्गत शांतता राखून, आपापल्या राष्ट्रांच्या सरकारांना आपलें सर्व लक्ष युद्ध लढण्यावर केंद्रीभूत करतां येअू द्यावें.

पण सफलतेची शक्यता नसतां असलीं शुभ वर्तमानें पसरविणें हा अेक स्वार्थी मतप्रचारांतला भाग आहे हें पुष्कळ शहाणे लोक ओळखतात.

## कांटेरी तारांचीं गुप्त वेटोळीं

इतर दलित राष्ट्रांबरोबर हिंदुस्थानाचेंहि नशीब उघडणार अशा घोषणा पार्लमेंटाचे अधिकारी मोघमपणें मधून मधून करीत आहेत. पण त्यांत अडचणी किती आहेत पहा. कोणत्याहि देशांत निरनिराळ्या राज-कीय पक्षांत संपूर्ण मतैक्य होअू शकतच नाही. बरें तें झालें तरी अिंग्लं-डचे हिंदुस्थानाशी असलेले आजवरचे संबंध व त्यांतून अुत्पन्न झालेले ऋणानुबंध पुढे येणार. ब्रिटिश व्यापारी आपले हितसंबंध अबाधित राह-ण्याकरिता जामिनक्या मागणार. अमेरिकेनें केलेले अुपकार कसे फेडाव-याचे हा प्रश्न पुढे येणार. युद्धाच्या कामीं झालेल्या खर्चाचें काय व्हाव-याचें हा प्रश्न पुढे येणार. हिंदुस्थानच्या भावी लष्करी संरक्षणाची व्यवस्था

काय हा प्रश्न विचाराकरिता येणार. हिंदुस्थानाला परराष्ट्रांशीं वाटतील तसे तह करण्याचें स्वातंत्र्य राहणें हें हितावह होईल काय असा प्रश्न विचारला जाणार. आणि यापुढे जर स्वातंत्र्य (अिन्डिपेन्डन्स) हा शब्दच फुकाचा ठरून, परस्परावलंबन (अिन्टरडिपेन्डन्स) हा शब्द खरा ठरणार तर, हिंदुस्थानानें आत्मरक्षणाकरिता दुसऱ्या कोणा प्रबळ राष्ट्राशी स्नेह जोडावयाचा तो कोणाशी हा विचार अुत्पन्न होणार. असे प्रश्न अुपस्थित झाल्यास त्यांचीं अंतिम अुत्तरें देण्याचा अधिकार कोणाकडे राहणार ? आणि त्यांत अिंग्लंड व हिंदुस्थान यांचा मतभेद झाल्यास हिंदुस्थानाचा आग्रह तडीस जाअील याविषयी जामिनकी कोण घेणार व पटविणार ? अेखादा सर स्टॅफर्ड क्रिप्स याची घोषणा वरून साफ व गुळगुळीत दिसली, तरी तिच्या पोटांत कांटेरी तारांचीं अशीच गुप्त वेटोळीं असतात, हें अुद्या आयत्या वेळीं अनुभवाला येअील. हें अशुभ भविष्य वर्तविण्याला मात्र कोणी मोठा ज्योतिषी खचित नको.

ही निव्वळ दुष्ट कुशंका नव्हे ! कारण अिंग्लंडला जर हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य व स्वराज्य असें बहाल करावयाचें असतें तर तें यापूर्वी, म्हणजे दोनहि राष्ट्रें युद्धाच्या संकटांत सांपडलीं नव्हती अशा वेळीं, करतां आलें असतें. तें कां केलें नाही ? त्याला युद्धाचा सुमुहूर्तच कशाला हवा होता ? याचा अर्थच हा की, या संकटाच्या कामीं युद्धाला शक्य तेवढी मदत हिंदुस्थानाने करावी, आणि या संकटाच्या काळीं कोणताहि अुपद्रव करू नये. आणि असा विचार केला असतां क्रिप्ससाहेबांचें युद्धोत्तरकालच्या स्वराज्यदानाचें आश्वासन ही निःस्वार्थी देणगी न ठरतां स्वार्थी लांचलुचपत ठरते. आणि मनांत येतें की, काम पदरांत पाडून दिल्यावर लांचखाऊ मनुष्याला मिळालेल्या वचनाची वाट जगांत नेहमी लागते, तशी हिंदुस्थानास देअू केलेल्या स्वराज्याची लागणार नाही कशावरून ?

पुढे घडणाऱ्या, पुढे अनुभवास येणाऱ्या असल्या वरील अवघड प्रश्नांचें अुत्तर कोण देणार ? आणि कोणी दिलें तरी तें हिंदुस्थानाला कसें पटणार ? कारण पूर्वानुभव हा भविष्यकालाविषयी थोडीशी कल्पना चालविण्याला अुप-

योगी पडतो. म्हणून युद्धांत विजय मिळाल्यानंतर आपण काय काय करणार याचीं जीं गुलाबी चित्रें दोस्त राष्ट्रांकडून आज आगाअू रंगविलीं जात आहेत तीं कितपत खरीं ठरतील याचा अंदाज बांधू अिच्छिणाराने, गेल्या महायुद्धाच्या वेळीं त्या वेळच्या दोस्त राष्ट्रांनी कोणत्या घोषणा केल्या व त्यांचें फळ शेवटीं कोणाच्या पदरांत किती पडलें, याचा अितिहास वाचावा हें बरें.

## सोज्ज्वल युद्धहेतूंचे विपर्यस्त परिणाम

आधी हेंच पाहा की युद्ध पुकारलें गेल्यावर मगच या युद्धांत पडण्याचे आपले हेतु काय हें या मित्रराष्ट्रांना जगाला सांगावेसें वाटूं लागतें. पण त्या हेतूंची प्रत्यक्ष भाषा ठरविण्यालाहि त्यांना बराच विचार करावा लागतो. कारण मनांतले खरे हेतु बाहेर सांगण्यासारखे नसतात. शिवाय आपल्या व अितर युध्यमान राष्ट्रांच्या निवेदनांत घोषणेंत विसंगति विरोध दिसू नये याविषयी खबरदारी घ्यावी लागते. आणि आपले साथीदार कोण होणार हें ठरण्याला वेळ लागतो. चालू युद्ध सुरू झाल्यावर बरेच दिवसपर्यंत–अमेरिका युद्धांत पडेपर्यंत–अिंग्लंड आपल्या युद्धहेतूंविषयी निश्चित भाषा बोलूं शकत नव्हतें. काय बोलावें हें दोघांचें ठरल्यावर मगच जाहीर घोषणा जोराने सुरू झाल्या.

गेल्या महायुद्धाच्या वेळींहि युद्धहेतूंचीं वर्णनें किती तरी निरनिराळ्या शब्दांनी झालीं पाहा ! (१) आंतरराष्ट्रीय कारभारांत नवी घडी बसविणें ( To usher in a new order in international affairs ). (२) भावी युद्धें कायमचीं थांबविणें ( The war to end war), (३) लष्करी भांडखोरीची बळजोरीची वृत्ति चुरडून नष्ट करणें ( To crush militarism and autocracy ). (४) लहानसहान व दुर्बळ राष्ट्रांच्या हक्कांचें संरक्षण करणें ( A war for the preservation of the rights of weak and small nations ), (५) राजकीय व आर्थिक आपपर भाव व अन्याय नष्ट करणें ( A war to destroy political and economic discrimination and injustice), (६) सर्व राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देणें ( A war to inaugurate the principle of self-determination). अित्यादि किती तरी !

असल्या उदात्त (!) हेतूंनी आरंभलेल्या गेल्या महायुद्धांत अेक कोटि शिपाअी प्राणाला मुकले आणि दोन कोटि लोक जखमी, निकामी झाले. याशिवाय बरादारांचा नाश होअून किंवा 'अन्नान्न'दशा होअून किती बायकापोरें मेलीं असतील याची कल्पनाच करावी. गणती कशी होणार ? युध्यमान सर्व राष्ट्रांना मिळून १३५ अब्ज डॉलर अितकें नवें कर्ज झालें. आणि ५० अब्ज डॉलर अितकें द्रव्य पुढे प्रतिवर्षी नवे कर सोसून लोकांना द्यावें लागलें. सुमारें ३५० अब्ज डॉलर किंमतीची मालमत्ता नष्ट झाली. नगरें उपनगरें यांतील सुंदर मौल्यवान किंवा पवित्र वस्तु मंदिरें लोकोपयोगी अिमारती यांचा किती नाश झाला याची गणना कशी होणार ? शिवाय जगभर भीति द्वेष स्वार्थसाधन यांचीं नवीं कारणें निर्माण झालीं. वर्षानुवर्ष खोट्या मतप्रसाराचा वर्षाव जगभर होत राहिला. सत्य काय हें लोकांना कळेनासें झालें. युरोपांत कांही राजे पदभ्रष्ट होअून त्या देशांत लोकशाही राज्यें निर्माण झालीं हें खरें. तथापि त्याच्या अुलट किती तरी राष्ट्रोप-राष्ट्रांचें जुनें स्वातंत्र्य नष्ट झालें आणि युरोपभर सोटेशाही, सुलतानशाही झोंडगिरी यांचें बीं पडून या नव्या रोगाचें पीक फोफावलें ! अैनजिनसी स्वातंत्र्याचा लाभ अंतिम जनतेला किती झाला हा प्रश्नच आहे. आर्थिक स्थितींत अितका घोटाळा निर्माण झाला की तो सांगतां पुरवत नाही. कारखानदारी हटली. बेकारी बेसुमार निर्माण झाली. रणांगणावर प्राण देण्यास गेलेले लोक युद्ध थांबून परत आल्यावर शांततेंत जगणें मुष्किलीचें म्हणून युद्धांतच मेलों असतों तर बरें होतें, असें त्यांना वाटण्याची वेळ आली. कारखान्यांत जुनें नवें करण्याला भांडवली पैसा व यंत्रसामग्री मिळेना. जुन्या बाजारपेठा खलास झाल्या. नव्या लवकर निर्माण होअीनात. हुंडणावळ अस्थिर झाली. राष्ट्रीय अुत्पन्नाचा बराच मोठा भाग कर्जफेडीला जाअू लागला. यामुळे भावी पिढ्यांकरिता जीवनोपयोगी विधायक सुधार-णेच्या योजना थांबल्या. अुत्पन्नांत व खर्चांत सदा तूट येअू लागल्यामुळे कागदी चलनाची वाढ बेसुमार झाली. त्यामुळे जगभर महागाअी वाढली. कामकऱ्यांचें वेतन मजुरी यांचे दर त्या मानाने वाढले नाहीत. कांही थोड्या लोकांनी खूप पैसा मिळविला. पण खूपच खूप लोकांना थोड्या पैशावर जगून अुपासमार करावी लागली.

## नवीं रुजलेलीं युद्धबीजें

पण या दुष्परिणामाहून मोठा तोटा हा की युद्धें थांबण्याकरिता म्हणून सुरू केलेल्या युद्धाने पुढे युद्धें थांबलीं नाहीत, तर नवीं युद्धबीजें रुजलीं. राष्ट्रांना स्वयंनिर्णय मिळवून देणें हा युद्धहेतु म्हणून घोषित झाला असतां पदरांत त्या दृष्टीने फार थोडें पडलें. जर्मन जनतेची विभागणी, अिटाली, ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया यांत झाली. आलसेस–लोरेनमधील जर्मन फ्रान्समध्यें अंतर्भूत झाले. नवीं राष्ट्रें केवळ लष्करी सोयीच्या दृष्टीनें निर्माण करण्यांत आलीं; त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला स्वसंरक्षणार्थ नवें सैन्य निर्माण करावें लागलें. आपापल्या राष्ट्रांतल्या अुद्योगधंद्यांचें संरक्षण करण्याकरिता प्रत्येक राष्ट्राने परदेशी मालावर जबर जकाती बसविल्या. जर्मनीवर अितकी खंडणी लादली गेली की, ती फिटण्याला त्याला दहा जन्म लागते ! आणि प्रत्येक जन्मांत राष्ट्रांतील सर्व पैसा जेत्या मित्रराष्ट्रांच्या पदरांत ओतावा लागता. पण स्वतः मित्रराष्ट्रांनाहि अमेरिकेचें कर्ज फेडवेना म्हणून दिवाळखोरी पत्करून निर्लज्जपणाने ती जाहीर करावी लागली ! कारण सरळ हिशेबाने कर्जफेड साठ-साठ सत्तर-सत्तर वर्षें करीत राहूनहि ती फिटली नसती. कैसर विल्यम पकडला जाअून लंडनमध्ये फाशी द्यावयाचा होता (!) तो हॉलंडला पळून गेला. जर्मनीला आपलें सर्व आरमार वसाहती सोडून द्याव्या लागल्या व दिवाळखोरी पत्करून सर्व राष्ट्रीय अुत्पन्न जेत्या राष्ट्रांना अर्पावें लागलें. नाअिलाजाने निःशस्त्रीकरण स्वीकारावें लागलें. पण ही स्थिति १९१८ पासून १९३० पर्यंत म्हणजे अवघीं बारा वर्षेंच टिकली. आणि १९३१ पासून जर्मनीने कोठून स्वर्गीय अमृतसंजीवनी पैदा केली कोणाला ठाऊक–१९३३ सालीं हिटलर हा सर्वाधिकारी झाला. त्याने १९३५ सालीं जुन्या तहांची पायमल्ली करावयास प्रारंभ केला, आणि १९३९ पर्यंत निम्मा युरोप जिंकून फ्रान्स व अिंग्लंड यांना युद्धांत ओढलें. जगभर निःशस्त्रीकरण होण्याअैवजी शस्त्रसंभार निर्माण करण्याकडे सर्व कारखाने अुपयोगांत येअू लागले. नवीं आरमारें व विमानदलें निर्माण करण्यांत आलीं. आणि जुन्या युद्धाला भलें म्हणण्याअितकें घोर तीव्र दुष्ट आणि विनाशक नवें युद्ध सुरू झालें.

पुढील सर्व युद्धें थांबविणें' सर्वस्वी खोटें ठरलें. कारण त्यानंतर (१) फिन्लंड व रशिया, (२) तुर्कस्थान व मित्रराष्ट्रें, (३) रशिया व अिंग्लंड व अितर कांही राष्ट्रें, (४) अिटाली व आड्रिआटिक राष्ट्रें, (५) जपान व चीन, (६) अिटाली व अॅबिसीनिया अित्यादि राष्ट्रांमध्ये तर युद्धें झालींच. आणि शेवटी १९३९ सालीं प्रस्तुतचें महायुद्धच जुंपून तीं 'भावी युद्धें अशक्य करण्याची' घोषणा पाण्यावरील लेखासारखी फुकट गेली !

## कांही विफल घोषणा

लष्करी सत्तांचें नियंत्रण करणें–

प्रथम १९३३ पर्यंत कांही राष्ट्रांनी निःशस्त्रीकरणाचें नाटक केलें. पण तें फुकट जाऊन लगेच शस्त्रास्त्रांची वाढ सुरू होअून तींत अमेरिका व अिंग्लंड हीं सामील झालीं. आणि जर्मनीने तर अवघ्या सहाच वर्षांत (१९३३ ते १९३९) शस्त्रसंभार किती सिद्ध केला हें प्रस्तुत महायुद्धावरून दिसून येतच आहे.

राष्ट्रांची लोकसंख्या लक्षांत घेअून जगांतील परदेशीय वसाहतींची यथान्याय वांटणी करणें–

जर्मनीच्या सर्वच्या सर्व वसाहती काढून घेणें हा काय न्याय झाला? या वसाहती जरी सुखाने वेळींच जर्मनीला दिल्या गेल्या असत्या तर कदाचित् प्रस्तुतचें युद्ध झालें नसतें.

अितर राष्ट्रांनी आपलीं सैन्यें परदेशांतून काढून घेअून लोकांना आपली राज्यव्यवस्था हवी तशी करूं देणें आणि पूर्वस्थिति प्राप्त करून देणें––

याला आयत्या वेळीं जर्मनीचाच अपवाद करण्यांत आला, व रूहर प्रांत बळकावून बसण्याला फ्रेंच सैन्याला परवानगी दिली. 'पूर्वस्थिति प्राप्त करून द्यावी' याचा अर्थ असा करण्यांत आला की, युद्धांत फ्रान्स, बेल्जम अित्यादि देशांत जर्मनीकडून झालेली सर्व प्रकारची हानि भरून निघेल अितकी रक्कम जर्मनीकडून चोपून वसूल करून घ्यावी. (प्रे. विल्सन यांचा

खरा अर्थ तसा नव्हता. आणि अिंग्लंडनेंहि प्रथम 'ना खंडणी' असाच युद्ध-हेतूंचा पुकार केला होता.)

जगांतील सोटेशाहीचा नाश करणें–

१९१९ च्या तहानंतरच जगांतील सोटेशाहीचा खरा अुदय झाला. जर्मनींतील अिटालींतील सोटेशाही प्रसिद्धच आहे. पण रशियांत नांवानें प्रजासत्ताक राज्य असलें तरी ती खरी सोटेशाहीच आहे. अितर राष्ट्रांत नामधारी पार्लमेंटें असलीं तरी त्यांचा कारभार कांही थोडया व्यक्तींच्याच हातीं आहे.

## न्यायबुद्धि सुटली

जर्मनांशी तह ठरविण्याकरितां प्रथम दहांचें मंडळ नेमलें. त्याचे पुढे पांच झाले. पण जपान व इटाली यांनी अंग काढून घेतल्यामुळे पांचाचे तीन–लॉअीड जॉर्ज, क्लेमाँसो, विल्सन अेवढेच राहिले. आणि प्रतिपक्षी जर्मनी याला कांहीएक न विचारतां एकतर्फी तह ठरून अिंग्लंड व फ्रान्स या दोघांनीच तो जर्मनीवर लादला. तो कसा टिकणार? मुळांतच न्यायबुद्धि सुटली. सर्व गुप्त तह रद्द होण्याऐवजीं गुप्त तहांतूनच नवे तह निघाले. राष्ट्रसंघ बनला त्याचीही तीच गति झाली. जून १९२८ मध्ये या संघाचे पंचावन सभासद होते. पण खुद्द अमेरिका, रशिया, मेक्सिको, तुर्कस्थान व ईजिप्त हीं राष्ट्रें मुळांतच सामील झालीं नाहीत. राष्ट्रसंघाच्या घटनेच्या अटीविरुद्ध स्वातंत्र्य नसलेल्या हिंदुस्थानासारख्या देशाला–अिंग्लंडच्या आश्रिताला–मतभरतीकरिता सभासद करून घेतलें! पुढें जर्मनी व रशिया यांनाहि सभासद करून घेतलें. पण हळुहळू अनेक राष्ट्रांनी स्वार्थबुद्धीने राष्ट्रसंघांतून अंग काढून घेतलें. आज राष्ट्रसंघाचें देवस्थान म्हणजे देअूळ आहे, पगारी पुजारी आहेत, पण देव जागेवर नाही! राष्ट्रसंघ–संस्था व्यवहारदृष्टया खलास झाली आहे! तिच्यामध्ये अेकी किंवा न्यायदानाची पात्रता किंवा दुर्बळांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य कोठे होतें? कीर्तन किंवा तमाशा चालू आहे, मात्र त्यांत वाटेल तेव्हा प्रेक्षक येअून बसतो व वाटेल तेव्हा उठून जातो, तशी राष्ट्रसंघांत आल्या–गेल्या राष्ट्रांची स्थिति

होती. जपान व जर्मनी हे आपली लष्करी तयारी होतांच राष्ट्रसंघांतून उठून गेले. फ्रान्स व इटाली व रशिया यांनी तुर्कांशी पुढें स्वतंत्र तह केले. इंग्रजांनी तुर्कांविरुद्ध ग्रीकांना मदत केली. उलट इटाली व फ्रान्स या 'मित्रां'नी तुर्कांना दारूगोळा पुरविला! इंग्लंडने अितर कांही राष्ट्रांच्या मदतीने रशियांतील बोल्शेविझम हाणून पाडण्याकरिता युद्ध केलें. मात्र तें फसलें.

१९२१ पासून १९४२ पर्यंत अिंग्लंड हा रशियाला शत्रु समजत होता. आता तह झाला आहे! पण स्टालिन हा अजून चर्चिल व रूझवेल्ट यांना भेटत नाही. आणि रशिया व जपान यांचा खासगी तह झाला आहे असेंहि म्हणतात! चतुर्दश सूत्रें निर्माण करणारा प्रे. विल्सन अमेरिकेला परत गेल्यावर प्रथम फजीत व नंतर स्थानभ्रष्ट झाला! प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचें स्थान युद्ध चालू असतांच किंचित् डळमळूं लागलें आहे. मग पुढें काय होतें हें पाहावें.

## विल्सनच्या चतुर्दश सूत्रांचा बोजवारा

प्रेसिडेंट रूझव्हेल्ट यांचे पूर्वज प्रे. विल्सन यांनी एक चतुर्दशसूत्री निर्माण केली. तिचेंहि शेवटीं काय झालें हें पाहण्यासारखें आहे. विल्सनच्या डमरूंतून कुडबुड्यांतून चौदा सूत्रें निघालीं. त्यांची काय वाट लागली याचीं अगदी थोडीं उदाहरणेंच देतों–

'शांततेचे तह उघड असावेत; गुप्त असू नयेत.'–पण युरोपियन राष्ट्रें आधीच जे गुप्त तह करून बसलीं होतीं त्यांशी हें सूत्र विसंगत होतेंच. शिवाय व्हर्सायच्या तहानंतर व राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतरहि आतापर्यंत गुप्त तह झाले व उघडकीला आले. उदा० (१) फ्रान्स व रशिया. (२) रशिया व जर्मनी. (३) इंग्लंड व तुर्कस्थान. (४) रशिया व इंग्लंड–यांच्यांतील गुप्त तह.

'सर्व समुद्र महासमुद्र हे सर्व राष्ट्रांना संचाराकरिता खुले असावेत'– हें सूत्र मित्रराष्ट्रांनीहि प्रथम मान्य केलें नाही. मग शत्रु तें कसें मान्य करणार; इंग्लंडचें नेहमीचें धोरण आपल्या आरमारी बळाने शत्रूचीच काय, पण

त्रयस्थ राष्ट्रांचीहि, कोंडी गळचेपी करावयाची. १८१२ सालीं इंग्लंड नेपोलियनशी लढत होतें तेव्हा एकदा व त्यानंतर एकदा, इंग्लंड व खुद्द अमेरिका यांच्यांत बेबनाव झाला. आणि त्यांतला एक प्रसंग युद्धाशिवाय टळला तर दुसऱ्या प्रसंगीं इंग्लंड व अमेरिका यांचें तीन वर्षे आरमारी युद्ध सुरू होतें. चालू युद्धांतहि अमेरिका व इंग्लंड यांच्यांत समुद्रसंचार-स्वातंत्र्याविषयी प्रथम तरी थोडी कुरबूर झाली होतीच असें म्हणतात.

एक साम्राज्यवादी इंग्रज इतिहासकारच काय म्हणतो पाहा–" अमेरिकन प्रेसिडेंटने जाहीर केलें होतें की, जगांत यापुढे या तहाच्या योगाने लोकशाही निर्भयपणानें नांदू शकेल. पण परिणाम मात्र असा झाला की सर्वत्र डिक्टेटरशाही (सोटेशाही) विजयी झाली." (" The American President had declared that the peace was to make the world safe for democracy. Actually the settlement had resulted in a triumph for dictatorship. ") याचें एक कारण असें की, नवीन राष्ट्रगट झाले त्यांत अनेक अल्पसंख्य उपराष्ट्रें दामटून बसविलीं गेलीं. पण त्यांचें एकमेकांशी मुळीच जमेना. तीं कांही केल्या एकजीव होईनात. तरी पण सक्तीने 'स्वातंत्र्य लादून' तें एक राष्ट्र बनविण्यांत आलें. हिंदुस्थानांतहि तशींच अनेक उपराष्ट्रें आहेत व राहणार. पण त्यांना स्वातंत्र्य मात्र नाही. म्हणून एक वेळ वाटतें की, हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळून तो डिक्टेटरच्या हातीं गेला तरी चालेल. पण आज स्वातंत्र्य नाही. उपराष्ट्रांचें भांडण मात्र युरोपसारखेंच आहे, आणि या उपराष्ट्रांच्या भांडणाचें निमित्त सांगून ब्रिटिश सरकार आपली सत्ता सोडत नाही अर्थात् आधी स्वातंत्र्य पाहिजे, मग स्वतंत्र राष्ट्र. अेकाची हुकमत अैको की अनेकांची अैको. तो अेकंदरीत त्यांच्यांतलाच ! परकी नव्हे !

जर्मनीपुढे हिटलरशाही किंवा अिंग्रजांचें फ्रेंचाचें म्हणजे परक्यांचें स्वामित्व, असा प्रश्न पडला तेव्हाच जर्मनीने हिटलरशाही पत्करली. पूर्वीच्या युद्धानंतर जो व्हर्सायचा तह करण्यांत आला तो या दोन राष्ट्रांच्या स्वार्थावर व जर्मनीच्या सर्वनाशावर रचला गेला होता. यामुळे युद्धापूर्वीच्याहिपेक्षा द्वेष अधिक बळावला. युद्ध जिंकलें तरी 'कोणी कोणाचा

मुलूख घेणार नाही व खंडणी मागणार नाही ' ( नो अॅनेक्सेशन्स् नो अिन्डेम्निटी ) अशी पहिली घोषणा होती. पण तें गाडें सगळें अुलटलें. याविषयी फिरून हाच अितिहासकार ( सर जे. अे. हॅमरटन ) म्हणतो– " A war ostensibly waged in defence of the sanctity of international engagements, ended in definite breach of one of the most sacred possible of such engagements on the part of the victorious champions of those ideals.'

ता. ११ ऑगस्ट १९४३ चा लंडन टाअिम्स म्हणतो 'It is remembered that the first acts of aggression after 1919 were committed by nations not associated with Germany in 1914–18.'

" The story of allied diplomacy during the war is not an inspiring one. For, it gives the lie to the noble professions of allied statesmen as to the purpose of the war and reveals it not as a moral crusade, but as a struggle between conflicting imperialisms."–' Our Own Times '– A. B. C. of History by Thoms and Hamm. p. 292. आणि हा शेरा मारणारे हे अितिहासकार खुद्द अमेरिकन आहेत हें लक्षांत ठेवावें.

## फसवणूक करणारी घोषणा

हा सर्व प्रकार अत्यंत खेदकारक नव्हे काय ? आता युद्ध चालू असतां हें स्पष्टीकरण कशाला करावें असें कोणाला वाटेल. पण युद्ध चालू असतां खोटीं वचनें व आश्वासनें तरी कोणी कां द्यावींत ? तीं देण्यांत येतात म्हणूनच जुन्या अनुभवावरून त्यांचा खोटेपणा पदरांत घालावा लागतो. हिंदुस्थानाला काय ? अिंग्लंडने कोणत्याहि कारणाने युद्ध पुकारलें तर, त्याचें अंकित किंवा गुलाम असें जें हिंदुस्थान त्याला साहाय्य करणें प्राप्तच, न केलें तरी आपल्या हाताने अिंग्रज सरकार तें साहाय्य करूनच घेणार. साम्राज्यांतर्गत दक्षिण आयर्लंड आज त्रयस्थ अुदासीन राहिलें आहे. पण अुलट अिजिप्त, सिलोन यांच्याप्रमाणे हिंदुस्थानालाहि मनांत असलें तरी, तटस्थ राहतां येणार नाही. घरांत चोर शिरला म्हणजे अप्रिय दुष्ट मालका-

वर मनांत जळफळणारा नोकरहि हातांत काठी घेऊन अुठतो तें वेगळें. पण राग येतो तो मायावी कपटी अप्रामाणिक मतप्रचाराचा. 'प्रोपागांडा' म्हणजे अशी कांही चीज होअून बसली आहे की त्याच्या नांवाने काय वाटेल तें खोटें बोलावें. त्यांतला प्रकार या युद्धहेतूंचा आहे. म्हणून आम्हांला अिंग्लंड-कडून खरी घोषणा पाहिजे ती अशी—"युद्धोत्तर हिंदुस्थानाला आम्ही स्वातंत्र्य देणार, मग त्यांतील पक्षोपपक्ष कितीहि अेकमेकांत भांडोत. कारण स्वातंत्र्य पदरांत पडल्यावर ते अेक होतील आणि आपली राज्यघटना वाटेल तशी दुरुस्त करून घेतील. पण आम्ही तरी आपल्या सर्व स्वार्थाला तिलांजलि देअू." अशी घोषणा अिंग्लंड करतें तर त्या घोषणेंत कांही तरी तथ्य होतें. पण "युद्धोत्तर हिंदुस्थानाचे लोक सर्वानुमतें पसंत अशी घटना तयार कर-तील ती देअूं" ही घोषणा अुघड अुघड अप्रामाणिकपणाची आहे. तिचा एकच अर्थ होअूं शकतो की, 'आम्ही कांही देणार नाही. कांही देण्याचें कारण राहणार नाही. कारण हे सर्व लोक सर्वसंमत घटना करू शकणार नाहीत.' तात्पर्य, 'सर्वसंमत' याचा अर्थ जोंपर्यंत स्पष्ट करून सांगितला जाणार नाही, तोंपर्यंत ती घोषणा फसवणूक करू पाहणारी ठरते.

वाअीट अितकेंच वाटतें की, ही साधी गोष्ट न अुमजण्याअितके भोळे मूर्ख बुद्धिमंद आम्ही हिंदुस्थानाचे लोक आहों असें अिंग्रज अजून धेअून चालतात!

## अटलांटिक सनद कोणासाठी ?

असल्या युद्धहेतूंच्या घोषणांत एक मख्खी असते ती सहसा कोणाच्या लक्षांत येत नाही. या घोषणा दिसण्यांत सर्व जगाला उद्देशून केलेल्या दिसल्या, तरी वस्तुतः जे मुलूख शत्रूच्या चढाईने त्याच्या ताब्यांत गेलेले असतात किंवा जाण्याचा संभव असतो त्यांनाच त्या लागू असतात. स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय आम्ही मिळवून देऊं— पण कुणाला? तर शत्रूच्या हातून ज्यांचें तें गेलें आहे त्यांना. पण या संकटांत न सांपडतां जे लोक पूर्वीचेच गुलामगिरीत राहिले आहेत त्यांचें काय? याचें उत्तर 'कांही नाही!' असें मिळतें. 'आम्ही तुम्हांला उद्देशून ती घोषणा केलीच नव्हती' अशी वावदुकी करण्यांत येते. हिंदुस्थानचें उदाहरण घेऊं. १९१४ च्या महा-युद्धाच्या वेळीं स्वयंनिर्णयाच्या दानाची घोषणा करण्यांत आली. पण तें

दान हिंदुस्थानाच्या पदरांत पडलें काय? हिंदुस्थानाच्या लोकांना एकत्र बसून स्वयंनिर्णय करण्याची संधि कधी मिळाली? मॉन्टेग्यू व चेल्मसफर्ड यांनी शिष्टमंडळांच्या भेटी घेऊन कैफियती सादर करण्याची परवानगी दिली, पण स्वयंनिर्णयाचा निष्कर्ष काय निघाला? किंवा निघाला तो कितीसा अमलांत आला? सायमन कमिशनचा निर्णय हा काय हिंदुस्थानाचा स्वयं-निर्णय? त्या कमिशनांत सगळे परकी अिंग्रजच होते. १९३० पासून गोलमेज परिषदा झाल्या त्या तरी काय? सरकाराने परिषदेचे सभासद म्हणून निरनिराळ्या व्यक्ति बोलावल्या. पण परिषदेपुढील कार्यक्रमा-पासून सर्व तंत्र आपल्या हातीं ठेवलें. परिषदेंतील चर्चेचे लहानसे सारांश प्रसिद्ध केले, पण शेवटीं 'स्वयंनिर्णीत' असें कांहीच अमलांत आलें नाही. पार्लमेंटचे 'व्हाईट पेपर' म्हणून निघत. पण नांवाप्रमाणें त्या 'शुभ्र कोऱ्या पत्रिका'च होत्या 'शुभपत्रिका' नव्हत्या.

तीच गोष्ट चालू युद्धप्रसंगाच्या घोषणांची समजावी. 'अटलांटिक सनद' निघाली ती जर्मनी व जपान यांनी जिंकलेल्या लोकांकरिता. हिंदु-स्थानाकरिता नव्हे! कारण हिंदुस्थान हा कांही अद्यापि शत्रूकडून जिंकला गेलेला नाही. मग त्याला काय द्यावयाचें? सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या तोंडून हिंदुस्थानाकरिता 'अटलांटिक सनदें'तील तत्त्वाची घोषणा केल्याचा देखावा झाला. पण तिचें पर्यवसान काय झालें याचें अनुमान स्वत: क्रिप्सचेंच काय झालें यावरून करावें! त्या दूताच्या तोंडून दिल्लीच्या वाटाघाटींत 'कॅबिनेट' हा शब्द निघत होता. पण त्यातून लोकसत्तानिदर्शक असा जो ध्वनि निघत होता तोहि चर्चिलसाहेबांना खपला नाही! समजा एखाद्या महापुरांत सांपडलेल्या लोकांचे प्राण बाचविण्याकरिता एक परो-पकारी पथक हिंडत आहे. त्याने इतर लोकांना वांचविण्याचा परोपकार करावयाचा. पण या पथकांतलाच एखादा मनुष्य जर तो परोपकार कर-तांना त्या प्रयत्नांत इतर कोठल्या पाण्याच्या लोंढ्यांत सांपडून गटंगळ्या खाऊ लागला, तर त्याला वांचविण्याला दोर फेकावयाचे नाहीत!

ब्रिटिश साम्राज्यांत असलेला ब्रह्मदेश जपानी शत्रूने जिंकला त्याला मात्र आता अटलांटिक सनद लागू पडण्याचा हक्क प्राप्त झाला खरा! पण

तेंच युद्धाआधी थोडे दिवस ब्रह्मदेशाचा पुढारी विलायतेस प्रधानमंडळाकडे मर्यादित स्वातंत्र्याची याचना करण्याला गेला होता त्याला काय उत्तर मिळालें ?

पण आज ब्रह्मदेश जिंकला गेल्याच्या कारणाने अटलांटिक सनदेच्या हक्काला पात्र झाला असला, तरी इंग्रजांनी उद्या तो जपानकडून जिंकून परत घेतल्यावर ती सनद त्यांच्या पदरांत पडेल ही खात्री कोणी सांगावी?

सांगण्याचें तात्पर्य हेंच की, युद्धाचे हेतु अमुक आहेत असें सांगणारांच्या शब्दावर जपून विश्वास ठेवावा हें वरें. हिंदुस्थानच्या लोकांनी युद्धांत मित्रराष्ट्रांना साहाय्य करावयाचें तें 'फॅसिझम नाझीझम' स्वतः आपणालाच पसंत नाही, त्यांना जगांतून नष्ट करणें हें इष्ट आहे, या तात्त्विक दृष्टीने व तात्त्विक भूमिकेवरून वाटल्यास करावें. पण स्वतः हिंदुस्थानाला 'उद्घोषित' स्वातंत्र्य मिळेल या स्वार्थी आशेने करूं नये. स्वार्थी लाभाची आशा ठेवून केलेल्या साहाय्याला नैतिक अधिष्ठान उरत नाहीं हें एक, आणि नैतिक दृष्टि न ठेवतां केवळ व्यावहारिक दृष्टि ठेवली तर ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या राजनीतीचा पूर्वेतिहास ध्यानांत आणावा!

स्वराज्य स्वातंत्र्य मिळण्याची खरी पात्रता वेगळ्या उपायांनी मिळत असते. ती पात्रता हिंदुस्थानाने अद्यापि मिळविली नाही असें वाटेल तर आमचें आम्ही म्हणावें. पण उदारमतवादी घोषणांनीं आपण भुलून जाऊ शकतों अशा बुद्धिहीनतेचें प्रदर्शन तरी हिंदुस्थानाने करूं नये, कपटी कावा करणाराला पहिलेंच हें उत्तर देण्याची तयारी असावी– 'हा कावा आम्हांलाहि समजतो की!'

ऑल इंडिया नॅशनॅलिस्ट लीग परिषद, पुणें, अधिवेशन २ (१९४२)चा मुख्य ठराव (ठराव ४ था) हाही खालीलप्रमाणें होता–

## अटलांटिक सनद व हिंदुस्थान

गट्टी राष्ट्रांनीं जिंकलेल्या किंवा व्यापलेल्या देशापुरतीच ती सनद लागू केल्यास, युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानाला त्या सनदेचा फायदा मिळण्याच्या कामीं प्रतिकूल बुद्धीनें वागविण्यांत येईल. म्हणून ही सभा ती सनद

घडविणारांना आणि त्यांत सामील असलेल्या अितर राष्ट्रांना अशी विनंति करीत आहे कीं, युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानाला त्या सनदेचा पूर्ण फायदा मिळेल अशी त्यांनी हिंदुस्थानाला तावडतोब हमी द्यावी. या सभेचें आणखीही असें म्हणणें आहे की, हिंदुस्थानांतील अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं राष्ट्रसंघाने निश्चित केलेलीं तत्त्वें आधारास घ्यावीं. आणि या प्रश्नांतील अडचणी पुढें करून राष्ट्रसंघाच्या तत्त्वानुरूप अल्पसंख्याकांच्या प्रश्नाचा योग्य निर्णय देण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारानें टाळूं नये याविषयी संयुक्त राष्ट्रांनी आग्रह धरावा.

---

# १३. हिंदुमहासभा व स्वराज्य

( सह्याद्रि–जानेवारी १९४४ )

गेल्या पंचवीस वर्षांत हिंदुमहासभेचा अितिहास लक्षांत घेतला असतां असें निःसंशय म्हणतां येअील की, हिंदुस्थानाकरिता स्वराज्य मिळविण्याचें कार्य तिला यशस्वी करतां आलें नाही, तरी हिंदुस्थानांतील बहुसंख्य अशा हिंदु समाजाच्या हितरक्षणाचें कार्य तरी तिने पुष्कळ केलें. हिंदुमहासभेकडून प्रत्यक्ष नांवाने स्वराज्याची चळवळ अशी झाली नाही, तरी तिला राजकीय ध्येय किंवा धोरण नव्हतें असें कोणासहि म्हणतां यावयाचें नाही. हिंदुमहासभा राहो, पण अितर कोणत्या पक्षाने स्वराज्य मिळविण्याची चळवळ यशस्वी केली तें तरी दाखवा, असा प्रश्न विचारल्यास त्याचें उत्तर काय मिळेल! हिंदुमहासभेशी समकालीन अशा मुसलमानांच्या सभा, संस्था, संघटना घेतल्या तर असें दिसून येअील की, हिंदुमहासभेअितकीहि राजकीय दृष्टि त्यांनी कधी ठेवलेली नव्हती.

## मुसलमानांची अराजकीय दृष्टि

प्रथम अलीगडवाला पक्ष हा, हिंदुस्थानांत प्रथमच संघटित झालेला असा, मुसलमानांचा पक्ष घेअूं. त्याचें ध्येय हिंदुस्थानाला राजकीय स्वातंत्र्य

मिळविण्याचें केव्हाहि नव्हतें. जें होतें तें सर्वस्वी राजनिष्ठ, धर्मनिष्ठ, जातिनिष्ठ, असेंच ध्येय होतें. अलीगडवाल्यांनी हें ओळखलें की, "शिक्षणाची फलश्रुति सहजच अधिकाराच्या व पगाराच्या जागा मिळण्यांत होते. हिंदु लोकांनी शिक्षणाच्या कामीं पांचपन्नास वर्षांची आघाडी मारल्यामुळे, राज्यकारभारांत नोकर म्हणून कां होओीना पण हिंदूंचा हात बेसुमार शिरकला आहे. त्या मानाने आपण मागे पडलों आहोंत. म्हणून मुसलमान समाज हा आपणाला सुशिक्षित केला पाहिजे." यांत मुसलमानांची हिंदूंशी स्पर्धा व आत्मरक्षणाची बुद्धि दिसून येते, व तिला नांवें ठेवतां येत नाहीत. परंतु येथे सांगण्याचा मुख्य मुद्दा हा आहे की अलीगडवाल्या मुसलमान पक्षाचें ध्येय स्वराज्य मिळविण्याचें केव्हाहि नव्हतें.

त्यानंतर १९०६ सालापासून मुसलमानांची जी दुसरी संघटना झाली तिचा हेतु तरी काय होता? हाच की, हिंदूंपासून आपण कोणी वेगळे आहों, आणि केव्हाहि ते तसेच किंवा आणखीहि अधिक वेगळे राहिलें पाहिजे. मुसलमान सुशिक्षित असो, अशिक्षित असो, त्याला निदान लोकसंख्येच्या मानांत अधिकाराच्या व पगाराच्या जागा मिळाल्या पाहिजेत. या अधिकाराच्या जागांत कायदे–कौन्सिलांतील जागाहि आल्याच. आणि सरकारानेहि तेव्हापासून असें धोरण ठेवलें की, मुसलमानांची ही मागणी मान्य केल्यास, रोखठोक स्वराज्याच्या मागणीकडे झुकणारी जी राष्ट्रीय सभा तिला अेक कायमचा प्रतिपक्ष निर्माण करून ठेवल्यासारखा होओील. पण अलीगडवाल्यांप्रमाणेंच या नव्या मुसलमान पक्षानेहि स्वराज्याची मागणी, स्पष्ट शब्दांत किंवा गर्भित अर्थाने, कोठेहि केव्हाहि केल्याचा पुरावा नाही. झाडाला जसें बांडगूळ चिकटावें आणि झाडाच्या जीवनरसावर जगून त्याने आपली स्वतंत्र व घातक वाढ करावी, त्याप्रमाणे हा मुसलमान पक्ष राष्ट्रीय सभेच्या वृक्षाला बांडगुळासारखा चिकटला. राष्ट्रीय सभेच्या राष्ट्रीय भावनेचा फायदा घेऊन या पक्षाने आपलें राजकीय बस्तान हळुहळु बसविलें, व हिंदुस्थानांत अेकजिनसी राष्ट्रीयपणा नाही हें दृश्य मात्र प्रस्थापित केलें.

## यदृच्छेने मिळालेला कॉंग्रेसच्या बरोबरीचा हक्क !

हिंदूंची जशी हिंदुमहासभा तशीच मुसलमानांची मुस्लिम लीग म्हणतां येओील. दोघींचेंहि ध्येय मिश्र स्वरूपाचें होतें. म्हणजे त्यांत राजकीय प्रग-

तीच्या आकांक्षेबरोबर पण मुख्यत: आपापल्या संस्कृतीचें रक्षण असें तें मिश्रण होतें. ही मुस्लिम लीग १९०६ ते१९१६ या दहा वर्षांत अितकी नांवारूपाला आली की, लखनौच्या राष्ट्रीय सभेंत स्वराज्याच्या प्राथमिक स्वरूपाच्या मागणीचा जो ठराव झाला त्यांतील घटनेला 'कॉंग्रेस–लीग–घटना' हें संयुक्त नामाभिधान प्राप्त झालें. आणि या संयोगामध्य राष्ट्रीय सभेच्या महत्त्वाचें प्रमाण किती व मुस्लिम लीगच्या महत्त्वाचें प्रमाण किती याचा स्पष्ट निर्देश करणें व्यवहार्य नसल्याचा फायदा घेऊन मुस्लिम लीगने आपण कॉंग्रेसच्या बरोबरीची संस्था आहों असा हक्क सांगण्यास प्रारंभ केला. तथापि लोक व सरकार हे आपल्या ठिकाणीं जाणत होते की, धर्मनिरपेक्ष जातिनिरपेक्ष असून केवळ स्वराज्यसाक्षेपी अशी जी राष्ट्रीय सभा ही मुख्य आहे, व मुस्लिम लीग ही केवळ अेक अुपराष्ट्रीय संस्था आहे.

यानंतर मुस्लिम लीग ही कांही काळ बाजूला पडून, गांधीमहाराजांच्या कृपाप्रसादाने, मौलाना मौलवी खिलाफतवाले अित्यादि धर्मनिष्ठ मुसलमानांचा पक्ष पुढे आला. त्याने मात्र कांही काळापर्यंत राजकीय ध्येयाला प्रगट स्वरूप आणलें. पण अशा अेकांतिक विकृत स्वरूपाचें की, मुसलमानी धर्माप्रमाणे कोणाहि मुसलमानाला विधर्मी राजसत्तेखाली राहतांच येत नाही म्हणे! याचा अर्थ अिंग्रज राज्यकर्त्यांनी हिंदुस्थानांतून निघून जावें, किंवा तें न घडेल तर हिंदी मुसलमानांनीं तरी हा देश सोडून, ज्या अितर देशांत मुसलमानधर्मी राजा असेल त्या देशांत जावें. आता यांत मौज ही होती की, अिंग्रज गेले असतां हिंदुस्थानांतील स्वराज्यांत हिंदूंचें स्थान कोणतें व मुसलमानांचें कोणतें याचा कांहीच विचार किंवा अुलगडा नव्हता. पण कोणत्याहि अेकान्तिक विचारांत न्यायाची व्यवस्थेची अपेक्षा कशी करावी? खिलाफतवाल्या मुसलमानांना असें वाटत असावें की, अिंग्रज गेल्यावर आम्हीच, म्हणजे दिल्लीच्या बादशहाचे वंशज हेच, हिंदुस्थानाचे राजे. आणि ज्याप्रमाणें पेशावर, पंजाब, बंगाल, आसाम, सिंध अित्यादि प्रांतांत आपण बहुसंख्य झालों त्याप्रमाणें अितरत्रहि, बहुसंख्य हिंदूंचे मुसलमान करून, हिंदुस्थानाचें मुसलमान–स्थान बनवू. आणि खिलाफतीच्या

चळवळीच्या दिवसांत मलबारांतील मोपला लोकांकडून व सरहद्द प्रांतातील कोहात वगैरे ठिकाणीं हिंदूंच्या मुसलमानीकरणाची चळवळ सुरू झालीच की नाही? पण खिलाफतवाल्यांचें दुर्दैव असें की, तुर्की केमालपाशाने मुळांतील अैनजिनसी खिलाफतच नष्ट केली! आणि तुर्की राज्याला मुसलमानी पण राष्ट्रीय स्वरूप दिलें. तेव्हापासून हिंदुस्थानांतहि खिलाफतीचें नांव मागें पडलें आणि तेव्हांपासूनच मुस्लिम लीगच्या राजकारणाला जोर चढला.

## पाकिस्तानाचे पूर्वज व बॅ. जिना

१९२४ ते १९३० या अवधींत मी मध्यवर्ती विधिमंडळाचा सभासद असल्यामुळे, दिल्लीस सर्वपक्षीय परिषदा कशा भरत याची प्रत्यक्ष माहिती मला आहे. या माहितीप्रमाणें मी असें म्हणू शकतों की, पाकिस्तानाची कल्पना, केवळ त्याच नांवाने नसली तरी, कांही कांही मुसलमान पुढाऱ्यांच्या मनांत गुप्तपणें वावरत होती. मला पक्कें आठवतें की, पेशावरचे मुसलमान पुढारी सर अवदुल कयूम यांनी, हिंदुस्थानाच्या विभागणीची कल्पना मला अेक वेळ समजावून सांगितली होती. पण सर अवदुल कयूम हे राजनिष्ठ व सरकाराचे आश्रित असल्यामुळे, हिंदुस्थानामध्ये संपूर्ण स्वराज्य स्थापित व्हावें ही गोष्ट मात्र त्यांना मान्य नव्हती. हिंदुस्थानांत अिंग्रजच राज्यकर्ते राहावेत, आणि त्यांच्या अधिराज्याखाली मुसलमान प्रांत वेगळे व हिंदु प्रांत वेगळे अशी वांटणी व्हावी हें ते म्हणत असत.

पण या वेळीं बॅ. जिना हे बरेचसे राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे ही विभागणी प्रथम प्रथम त्यांना स्वतःला मान्य नव्हती. प्रारंभीं त्यांची मुख्य मागणी इतकीच असे की, मतदार–संघ हे जातवार असावेत, मुसलमानांना कायदेमंडळांतून लोकसंख्येच्या प्रमाणाने तर जागा मिळाव्याच, पण कोठे कांही अधिकहि मिळाव्या. आणि तशाच सरकारी नोकऱ्यांतून इतकेंच. फार काय, पण मुसलमान हे हिंदूंच्या बरोबरीचे म्हणून त्यांना पन्नास टक्के जागा मिळाव्या असेंहि त्यांनी प्रतिपादिलेलें मी त्या वेळीं तरी ऐकलेलें नाही. सर्वपक्षपरिषदेंत येऊन ते मुसलमानांतर्फे बोलत तेव्हा असेंहि म्हणत कीं,

" मला म्हणजे मुसलमानांचें म्हणणें सर्वस्वी सयुक्तिक वाटतें असें नव्हे. पण त्यांना वेडे कां म्हणाना, मात्र मागतात तें द्या. कारण दोघांनीहि एका राष्ट्रांत नांदलें पाहिजेना? धाकटचा भावाची समजूत काढण्याची जबाबदारी मोठ्या भावावर ओघानेंच पडते."

१९२८ सालीं जबलपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचा अध्यक्ष मी होतों त्या प्रसंगीं मी आपल्या अध्यक्षीय भाषणांत, मुसलमान हिंदु व काँग्रेस हे तिघे कोणत्या भूमिकेवर तेव्हा उभे होते, याचें पृथक्करण केलें होतें तें येथे देतों–

मुसलमानांच्या मागण्या सात होत्या त्या अशा– (१) प्रांतानिहाय कायदे–कौन्सिलाचे मतदार–संघ मिश्र किंवा संयुक्त असले तरी चालतील. परंतु मुसलमानांकरिता कायदेमंडळांत ज्या जागा राखून ठेवावयाच्या त्या लोकसंख्येच्या प्रमाणानें ठेवाव्या. मतदारसंख्येच्या प्रमाणांत ठेवू नयेत. कारण हें दुसरें प्रमाण पहिल्या प्रमाणापेक्षा कमी पडतें. (२) ज्या प्रांतांत मुसलमान लोकसंख्या अधिक आहे अशा प्रांतांतहि मुसलमानांकरिता जागा राखून ठेवण्यांत याव्या. (३) सिंध हा प्रांत वेगळा करावा व बहुसंख्य मुसलमानी प्रांतांची संख्या वाढवावी. (४) सरहद्द म्हणजे पेशावर प्रांतांत लोकशाहीच्या प्राथमिक सुधारणा अमलांत आणाव्या. म्हणजे द्विदल राज्यपद्धति व लोकमतानुवर्ती प्रधानमंडळ हीं अमलांत यावीं. (५) हिंदुस्थानांत मुसलमानांची लोकसंख्या एकचतुर्थांशच असली तरी त्यांच्याकरिता एकतृतीयांश जागा राखून ठेवाव्या; व बाकी दोनतृतीयांशांत इतर सर्व जातींसह वर्तमान हिंदूंनी आपला समावेश करून घ्यावा. (६) यापुढे प्रांतांची विभागणी व रचना कोणत्याहि कारणाकरिता करणें झाल्यास, ज्या प्रांतांत आज मुसलमान बहुसंख्य आहेत त्या प्रांतांत ते अल्पसंख्य न होतील अशीच प्रांतरचना करण्याची हमी द्यावी. (७) कायदे–मंडळांत मुसलमान अल्पसंख्य असले तरी कांही प्रकारच्या कायद्यांच्या बिलांच्या प्रथम प्रवेशाच्या वेळींच, त्या बिलांना मुसलमानांनी हरकत घेतल्यास, तीं बिलें पुढे येण्याला बंदी व्हावी. हे सात मुद्दे त्या वेळीं बॅ. जिना यांना मान्य होते. म्हणजे मिश्र मतदार–संघहि मान्य होण्याइतक्या राष्ट्रीय वृत्तीचे

ते त्या वेळीं होते ! अर्थात् मुसलमान समाजांत ते मवाळ गणले जात. कट्टर मुसलमानी भूमिका त्या वेळीं सर महम्मद शफी व महम्मद अिकवल यांजकडे होती. कारण ते संयुक्त मिश्र मतदार–संघाला कबूल नव्हते.

आता या वेळीं हिंदुमहासभेचें म्हणणें काय होतें तें सांगतों –(१) सर्व प्रांतांतून मतदार–संघाची पात्रता समान सारखी असावी. (२) मतदारसंघ जातवार नसावेत. (३) कायदे-कौन्सिलाहून खालच्या प्रतीच्या लोकमतसंघटित संस्थांतून ( म्युनिसिपालिटचा, लोकलबोर्ड अि. ) अल्पसंख्याकांकरिता राखीव जागा असू नयेत, त्या फक्त कायदेमंडळांत असाव्यात. शिवाय ही राखीव जागांची योजना लखनौ करारांतल्याप्रमाण फक्त कांही वर्षांच्या मुदतीपर्यंत असावी. याचा अर्थ त्यापुढे ही राखीव योजनाहि नाहीशी व्हावी. (४) कोणत्याहि प्रांतांत जी जमात बहुसंख्य असेल तिजकरिता कोठेहि जागा राखून ठेवूं नयेत. (५) नवीन प्रांत-रचना करणें झाल्यास त्यांत कोणती जाति बहुसंख्य होते, कोणती अल्प-संख्य होते असला अवांतर विचार न करतां, नवीन केलेल्या वेगळ्या प्रांताला प्रांतिक स्वाधीनता म्हणजे प्रांतिक सरकारचा खर्च झेपेल की नाही अेवढेंच पाहावें. (६) पेशावर प्रांत व बलुचिस्तान यांत प्रथम फक्त न्यायखात्याची सुधारणा करावी, व नंतर अितर राजकीय सुधारणा कराव्यात. (७) सरकारी नोकऱ्यांत जातवार प्रमाण ठेवूं नये, तर शिक्षण व अेकंदर लायकी हींच लक्षांत घ्यावीं.

या वेळीं राष्ट्रीय सभा व हिंदुमहासभा यांच्या भूमिकेंत फारसा फरक नव्हता. राष्ट्रीय सभेचीं विशेष अशीं दोनतीनच कलमें होतीं तीं हीं की, (१) अेका प्रांतांतील अल्पसंख्यांना ज्या सवलती दिल्या जातील त्या, अितर अेखाद्या प्रांतांतील अल्पसंख्यांनी मागितल्यास, त्यांनाहि द्याव्यात. (२) पंजाबांत शिखांना यथान्याय जागा मिळाव्यात. (३) नवीन प्रांत-रचना सर्वस्वी भाषाभेदानुसार करावी. आणि आंध्र, ओरिसा, कर्नाटक या प्रांतांबरोबर सिंधहि वेगळा प्रांत करावा.

या तीन वेगवेगळ्या भूमिका लक्षांत घेतल्या असतां असें दिसेल की, त्यांमध्ये फारसा, म्हणजे न मिटण्यासारखा, फरक नाही. आणि मला वाटतें की, 'अेकमुखी मागणी करा म्हणजे स्वराज्य देतों' अशी आजच्यासारखी घोषणा तेव्हा होअून, तिच्यावर लोकांचा विश्वास बसता तर, अेकमुखी मागणी निर्माण होण्यास फारशी पंचाअीत पडली नसती. अेक गोष्ट खरी की, मुसलमानांच्या मागण्या 'अेका गटाने सर्वच्या सर्व' मान्य झाल्या पाहिजेत, त्यांचा फुटकळ विचार करतां येणार नाही, अशी अट बॅ. जिना हे घालून बसले होते. परंतु मला वाटतें की, निकरावर आलें असतें तर तेंहि म्हणणें मान्य झालें असतें. पण वर सांगितल्याप्रमाणे बॅ. जिना यांच्या मागण्या मवाळ म्हणून अमान्य ठरून पुढे लवकरच कलकत्ता येथील मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत त्याच्याहिपलीकडे मजल गेली.

## नंतर जिनाहि घसरू लागले

शिवाय यानंतर स्वत: जिनाहि थोडे घसरू लागले. त्यांच्या सात मागण्यांच्या चौदा मागण्या झाल्या. त्यांतील कांही मुख्य अशा होत्या. (१) अुद्या फेडरेशनस्वरूपाची मध्यवर्ती राज्यकारभाराची योजना झाल्यास प्रांतिक सरकाराकडे नाही असा कोणताहि अधिकार मध्यवर्ती सरकाराकडे शिल्लकी राहूं नये. (२) मतदारसंघ जातवारच असावेत. पंजाब, बंगाल, पेशावर प्रांतांतील जिल्हे कमी करू नयेत. म्हणजे मुसलमान बहुसंख्य आहेत ते तसेच राहावे. (३) मुसलमानांच्या धार्मिक वगैरे संस्थांना यथाप्रमाण सरकारी निमसरकारी देणग्या मिळाव्या. (४) कोणत्याहि प्रांतिक मंत्रिमंडळांत कमींत कमी अेकतृतीयांश मुसलमान असावे. (५) फेडरेशनची घटना व्हावयाची असल्यास ती हिंदुस्थानांतील संस्थानांची संमति असेल तरच व्हावी, अित्यादि.

येथपर्यंत मुस्लिमलीगच्या धोरणाचा सर्व भर जातिहितावरच होता. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य पाहिजे अशी मागणी मुस्लिम लीगने या वेळेपर्यन्त केली नव्हती. ती मागणी प्रथम १९३७ सालांत करण्यांत आली. पण हिंदुमहासभेने स्वातंत्र्याची मागणी यापूर्वीच केली होती. कॉंग्रेसनेहि १९२९ सालींच प्रथम स्वातंत्र्याची मागणी केली नाही काय?

अशा रीतीने हिंदुमहासभा राजकीय दृष्टचाहि विचार करणारी व स्वराज्यवादी असतां, तिला मात्र जात्यंध हें नांव ठेवून राष्ट्रीय सभेने ती वर्ज्य मानली. आणि मुस्लिम लीग हीच खरी जात्यंध असतां तिला मात्र खांद्यावर घेऊन मिरवल्यासारखें महत्त्व दिलें. पण मुस्लिम लीग जें मागे तें सर्व स्वतःच्या जमातीकरिता. हिंदुमहासभा मागे तें सर्व राष्ट्राकरिता. त्या मागण्यांत हिंदु हा शब्दहि नव्हता.

## मागेपासून चालत आलेला सरकारचा बहाणा

हा जुना इतिहास सांगण्याचा हेतु इतकाच की, मुसलमानांच्या मागण्या दिवसानुदिवस कशा वाढत चालल्या हें ध्यानांत यावें. पण याचा अर्थ असा नव्हे की, यापूर्वी केव्हा, म्हणजे या मागण्या मर्यादित होत्या अशा वेळीं, हिंदु-मुसलमानांचा समेट झाला असता तर हिंदुस्थानाच्या पदरीं स्वराज्य पडलें असतें! कारण स्वराज्य देण्याचें मनांत नसतां, केवळ हिंदु-मुसलमानांच्या मतभेदांची सबब सांगून, " तुम्ही एक व्हाल तर स्वराज्य देऊ " अशा ज्या बहाण्याला लॉर्ड बर्कनहेड यांच्या वेळेपासून, म्हणजे १९२४ पासून, सुरुवात झाली, तोच बहाणा आज ॲमेरी यांच्या करकीर्दी-पर्यन्त सुरू आहे.

स्वराज्यदानाला सरकार पदोपदीं सबबी सांगतें,अडचणी दाखवितें.नुसती 'बादशाही' घोषणाहि या स्वराज्यदानाविषयी अद्यापि होत नाही. अटलांटिक चार्टरमध्ये हिंदुस्थानाचा उल्लेख नाही. क्रिप्स येतो तो "आशाम् कालवतीं कुर्यात्" या न्यायाने "युद्धोत्तर कालाचा" हवाला देतो. मुख्य प्रधान चर्चिल हा चुकून एकहि शब्द याविषयी आपल्या भाषणांत बोलत नाही. जें काय अर्धवट बोलावयाचें, सशर्त बोलावयाचें, तेंहि ॲमेरीवर सोंपवितो. अित्यादि गोष्टी अुघड दिसत असतां, या कामीं सरकाराला द्यावा तो दोष न देतां, " घरच्या म्हातारीचे काळ " या न्यायाने हिंदुमहासभेवर घसरणारे किती तरी वेडे मुत्सद्दी आपण पाहतों! जणु कांही हिंदुमहासभा अुद्या नष्ट झाली,किंवा तिने बॅ. जिना यांना शरणचिठी किंवा गांधींप्रमाणें कोरा चेक लिहून दिला, तर एका रात्रींत हिंदुस्थानाच्या पदरांत स्वराज्य येऊन पडणार आहे ! आणि यामुळे कित्येकदा केवळ विनोदबुद्धीने असें मनांत येतें की, ' हें घ्या हिंदुमहासभेने

पाकिस्तान मुसलमानांना दिलें ' असा ठराव करून या आशाळभुतांची पुरी फजिती तरी करावी ! कारण, जाणत्या राजकारणी लोकांना तरी सरकाराचा राग येण्यापेक्षाहि या आशाळभुतांचा राग येण्याअितकी 'बोंबाबोंब' या आशाळभुतांनी हिंदुमहासभेविषयी केली आहे. आता या अशा खुळचट लोकांची गंमत व फजिती करण्याकरिता झालें तरी हिंदुमहासभा आपल्या तत्त्वापासून च्युत होईल असें नाही, व भलती गोष्ट कबूल करणार नाही हें निराळें. पण वर जें म्हटलें तें अितक्याकरिताच की, खरा कार्यकारणभाव न ओळखणाऱ्या, व नसती लुडबूड करून हिंदुमहासभेला नांवें ठेवणाऱ्या, या मूर्खांची फजिती तरी करावी असें म्हणण्याचा मोह क्षणभर होतो खरा !

## ब्रिटिश सरकाराचा खरा डाव

आणि हें खरेंच नव्हे काय की, मुसलमानांना पाकिस्तान देणें किंवा न देणें ही गोष्ट हिंदुमहासभेच्या संमतीवर किंवा विरोधावर अवलंबून नसून ती साम्राज्य सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे? पाकिस्तानाला खरा विरोध असेल तर तो ब्रिटिश सरकाराचाच आहे ! तो विरोध हिंदुमहासभेच्या माथीं मारून स्वतःला पळवाट काढणें, हीच अिंग्रजांची खरी करामत होय ! कारण नाअिलाजाने अुघड बोलण्याची वेळ आली म्हणजे,ब्रिटिश सरकाराच्या वतीनें हिंदुस्थानाचे व्हाअिसरॉय, अेखाद्या मुद्द्यावर, ताडकन् कसे बोलून जातात हें पूर्वी निजाम सरकाराच्या बाबतींत लॉर्ड कर्झन व लॉर्ड रेडिंग यांनी दाखविलें आहे. आणि तीच गोष्ट परवा पाकिस्तानसंबंधाने,म्हणजे हिंदुस्थानाची विभागणी करण्यासंबंधाने, मावळलेले व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी आपल्या भाषणांत केली, व बॅ. जिनांच्या शिव्या खाल्ल्या.

बरें, अुलट असाहि विचार करावा की, साम्राज्य सरकाराला मुसलमानांना पाकिस्तान बहाल करावें असें खरोखरच वाटलें, तर त्यांचा हात आज हिंदुमहासभा किती व कसा धरणार ? येअून जाऊन हिंदुमहासभा आपली असंमति प्रकट करील. पण समजा, १९३५ च्या कायद्याप्रमाणे नव्या राज्यघटनेच्या कायद्याचा प्रसंग आला, व त्यांत अितर ब्रिटिश प्रांतांचें फेडरेशन करून या फेडरेशनबरोबर पाकिस्तान देण्याची योजना सरकाराने

घातली, तर काय होईल ? पंजाबांतील हिंदु काय सशस्त्र बंड करून उठ-तील ? किंवा नव्या राज्यघटनेने बनलेलें हिंदु-हिंदुस्थान काय पंजाबवर स्वारी करून त्याला आपल्या संघटनेंत, म्हणजे आपल्या मध्यवर्ती सरकारा-च्या अमलाखाली, आणून सामील करील ?

पूर्वी अमेरिकेंत उत्तर अमेरिकन संस्थानें व दक्षिण अमेरिकन संस्थानें यांच्यामध्यें युद्ध होऊन, अुत्तरेच्या संस्थानांनी दक्षिणेच्या संस्थानांचा पराभव केला व त्यांना सक्तीनें संयुक्त अेकमुखी राज्यघटनेंत आणून बसविलें, तसें हिंदुस्थानांत होईल असें आज कोणी म्हणू शकतो काय ? झालें तर अितकेंच होईल की, पूर्वीचें कम्युनल अवॉर्ड किंवा १९३५ चा कायदा हा जसा लोकांनी नाही म्हणतां म्हणतां अमलांत आला, व काँग्रेससारख्या बहाणेखोर असह-कारितावाद्यांनीहि, त्याचा अुपयोग करून, सत्तेची हौस फेडून घेण्याकरिता प्रधानमंडळें बनविलीं, तसें अेका हिंदुस्थानाचे दोन तुकडे झाल्यावरहि होणार नाही कशावरून ? परंतु पाकिस्तानाला खरा विरोध आहे तो अिंग्रज सर-कारचाच आहे. " आजच अुगीच कशाला बोलून मुसलमानांना दुखवा ? " अशा धोरणी व धूर्त विचारानें ते तो विरोध अुघड बोलून दाखवीत नाहीत अितकेंच! कारण जोंपर्यंत हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचें सरकाराला टाळतां येत आहे तोंपर्यंत, देशी संस्थानांसकट ब्रिटिश प्रांतांचें फेडरेशन हेंच ध्येय व धोरण त्यांना आपल्या डोळ्यांपुढे ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही.

अिंग्रजांना जोंपर्यंत हिंदुस्थानांतून निघून जावयाचें नाही तोंपर्यंत, त्यांच्या हाताखालीं असणाऱ्या या राज्यांत " दोन स्वतंत्र सेनापति व दोन परदेशीय राजकारणाचे प्रधान (मंत्री) " ही योजना त्यांना कशी मानवेल ? आणि बॅरिस्टर जिना यांचें म्हणणें मान्य केलें असतां अेका हिंदुस्थानांत दोन स्वतंत्र लष्करी सेनापति व दोन स्वतंत्र परराष्ट्रीय मंत्री असाच त्याचा अर्थ होतो ना ? आज अमेरिका व इंग्लंड हीं दोन बरोबरीचीं राष्ट्रें गटानें युध्द करीत असतां, निरनिराळ्या क्षेत्रांत, एकच स्थानिक लष्करी धोरण ठेवण्याकरिता, अेकटा अेकच सेनापति नेमण्याचें धोरणहि त्यांना ठेवावें लागत आहे. म्हणजे कोठे इंग्रजांना आपणाकडे कमीपणा घेऊन अमेरिकन सेनापतीच्या हाताखाली लढावें लागत आहे, तर उलट कोठे अमेरिकन

सैन्याला इंग्रज सेनापतीच्या हाताखालीं लढावें लागत आहे. गेल्या महायुध्दांतहि, फरान्सच्या भूमीवर युध्द चालू होतें म्हणून मुख्य सेनापति हा फरान्सचा व दुय्यम सेनापति हा अिंग्लंडचा, ही योजना अिंग्लंडला मान्य करावी लागली होती. असें असतां मुसलमानेतर हिंदुस्थानाचा सेनापति अेक व पाकिस्तानी पंजाबाचा सेनापति अेक हें साम्राज्य सरकारला सुखासुखी कसें मानवेल?

## भावी राज्यघटनेचा प्रश्न कसा सुटेल ?

तुम्ही आम्ही थोडीशी तर्कशक्ति चालविली तर असें दिसून येअील कीं, खालील तीन प्रकारांखेरीज कोणत्याहि चौथ्या प्रकाराने भावी राज्यघटनेचा प्रश्न सुटणार नाही.

(१) पहिला सर्वोत्तम प्रकार म्हटला म्हणजे, मुसलमानांना सुबुध्दि सुचून, त्यांनी पाकिस्तानाची मागणी सोडून देऊन, हिंदूंच्या खांद्याशी खांदा भिडवून स्वराज्याची चळवळ करावी, व निर्भेळ स्वराज्य मिळवावें. आणि याकरिता हिंदूंनीहि मुसलमानांखातर, सत्तेचा कांही स्वार्थत्याग करून आपल्या शुद्ध राष्ट्रीय ध्येयवादित्वाला थोडी मुरड घालण्यास तयार व्हावें. पूर्वी कॅनडामध्ये व अलीकडे दक्षिण आफिरकेंत अशा सलोख्याने, समजुतीने, स्वराज्य मिळाल्याचा दाखला आहे.

(२) याहून कमी प्रतीचा पण दुसरा प्रकार असा की, आमच्याआमच्यात स ोखा न झाला तर साम्राज्य सरकाराने दोघांनाहि बाजूला ठेवून, पण न्यायबुद्धीने आपली स्वतःची अक्कल चालवून, स्वराज्याची नवी घटना बनविणें. आम्हां लोकांत परस्पर समजूत पटून सलोखा न झाला तर दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणें प्राप्तच आहे ! पण आम्ही या प्रकारचा कमीपणा आपणाकडे घेण्यास तयार झालों म्हणून, न्यायबुद्धीने जें योग्य दिसेल तेंच ' राष्ट्रीय ' स्वराज्याचें तत्त्व प्रस्थापित करण्याची सरकाराची जबाबदारी कांही टळणार नाही.

आणि सरकार तोंडाने म्हणतच आहे ना की, " आम्ही हिंदुस्थानांतून जाणार असलों तरी, तुमच्या भावी स्वराज्याची घडी नीट बसविल्याशिवाय

जाणार नाही. " म्हणजे हेंच थट्टेने बोलावयाचें तर असें की, "आम्ही तुमचा स्वराज्याचा घोडा खरारा करून खोगीर घालून शृंगारून तुमच्यापुढे आणून उभा करू. तुमच्या हातीं चाबूक देऊं, तुम्ही त्या घोड्यावर बसण्याकरिता डावा पाय वर उचलला, म्हणजे उजव्या रिकिबीला हात देऊन घोडा खडा करून धरू, आणि तुम्ही स्वार होऊन घोडा चालू लागला म्हणजे तुम्हांला रामराम करून मग तोंड फिरवून निघून जाऊं. " पण या दिव्य परोपकारी मोतद्दाराला किंवा चाबुकस्वाराला, "घोड्याचा पायबंद पुरा सुटला आहे व खोगीर, लगाम वगैरे असावे तसे ठाकठीक घातले गेले आहेत " हें जबाबदारीने पाहावें लागेल. म्हणजे पार्लमेंटरी कायद्याने हिंदुस्थानाच्या लोकांना राष्ट्रीय स्वराज्य देण्याची घटना तयार करतांना, देशांतील बहुसंख्य लोक, अल्पसंख्य लोक, पुढारलेले, मागासलेले, दलित, दीन, हीन, ह्या सर्वांचें हित रक्षण होऊन शिवाय 'राष्ट्रीय' हिताचीहि घडी नीट कशी बसेल हें ठरवावें लागणार नाही काय? बरें, हें ठरविण्याला लागणारें उपजत शहाणपण जसें इंग्रजांच्या अंगीं आहे तसेंच, राष्ट्रसंघाच्या विद्यमाने युरोपांतील भांडखोर राष्ट्रांचा अनुभवहि त्यांच्यापुढे आहे. म्हणून त्यांनी मनावर घेतल्यास, वरील प्रकारची 'न्यायबुद्धीची' राज्यघटना त्यांना सुचणें कठिण नाही. आणि खरोखर ती तशी राष्ट्रीय स्वरूपाची व न्यायबुद्धीची दिसल्यास आम्हांला पत्करण्यालाहि हरकत नाही.

(३) आणि शेवटचा तिसरा प्रकार अराजकाचा ! म्हणजे कोणत्याच गोष्टीचा निर्णय न लागतां, गांधींच्या घोषणेप्रमाणें, इंग्रजांनी हिंदुस्थान सोडून, आपलें सर्व चंबुगवाळें बाडबिस्तार घेऊन निघून जाण्याचा आणि हा देश अराजकांच्या स्वाधीन करण्याचा—म्हणजे ' हा तुमचा देश आणि हे तुम्ही! वाटेल तो गोंधळ घाला. जगा किंवा मरा. तुमचें तुम्ही पाहून घ्या. आम्ही हे निघून चाललों. आणि पांच हजार मैलांवरून तुमची गंमत पाहू. " असें म्हणण्याचा—प्रसंग यावा. पण येथे 'अराजक' या शब्दाचा अर्थ 'बहुराजक' असाच केला पाहिजे. कारण खरें अराजक असें कोठे फार काळ टिकू शकत नाही.

## 'बहुराजक' कांही नवें नाही

अगदी रानटी स्थितींतील समाजामध्येहि खरें अराजक असत नाही. तेथे शासित गट लहान लहान असतात, पण कोणत्याहि गटावर कोणी

एखादा शास्ता नसतो असें होत नाहीं. आपल्या सामर्थ्याच्या बळावर कोणी तरी झोंड, पुंड, दंडुकेशहा, झोटिंगशहा, डिक्टेटर, किंवा राजा म्हणवून घेऊन इतरांवर सत्ता गाजवितो, सोडीत नाही. मग तेथे अराजक कसें म्हणावें? असे लहान लहान गट व त्या गटांवर सत्ता गाजविणारा एकेक मुख्य, या स्थितीला अराजक न म्हणतां बहुराजक म्हणावें लागतें. आणि खुद्द हिंदुस्थानांत तरी पूर्वी काय स्थिति होती? हिंदुस्थानांत पूर्वी अशोकासारखे म्हणजे सर्व हिंदुस्थानावर एकमुखी राजसत्ता गाजविणारे कांही सम्राट होऊन गेले. पण त्यांचें अखंडित साम्राज्य किती वेळ टिकलें? म्हणजे इतिहासाचा बहुतेक काळ 'बहुराजक' स्थितींतच गेला. मुसलमानी बादशाही दिल्लीस प्रस्थापित होण्यापूर्वी,किंवा इंग्रज व्यापारी कंपनीची सत्ता सर्व हिंदुस्थानावर प्रस्थापित होण्यापूर्वी, या देशांत बहुराजिक होतें. तसें फार तर पुन्हा एक वेळ होईल. तेव्हा कोण आपलें डोकें व कान इतरांच्यापुढे काढील आणि मग कोणते मुलूख कोणाच्या सत्तेखाली येतील वा राहतील, हें कोणी सांगावें?

इंग्रजांचें एकतंत्री राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून आम्हांला अराजकाचा विसर पडला आहे. पण आज विद्यमान असलेल्या व स्वतंत्र म्हणविणाऱ्या सहाशें देशी संस्थानांनी बहुराजकाचा अनुभव पुरेपूर जिवंत ठेवलेला नाही काय? इंग्रज या देशांतून निघून गेल्यास या सहाशें संस्थानांत आणखी भर पडेल, किंवा कांही कमी होतील; दुसरें काय होणार! पण आम्ही कोणत्याहि स्थितीला मनानें तयार असलें पाहिजे. अराजकाला भिणारे आम्ही नव्हे. बहुराजकाचा अनुभव तर घेतच आहों. मुख्य प्रश्न हिंदुस्थानांत स्वातंत्र्य, स्वराज्य प्रस्थापित होण्याचा आहे. म्हणजे स्पष्ट शब्दांत बोलावयाचें तर इंग्रज या देशांतून राज्यकर्ते म्हणून निघून जाण्याचा व फार तर नोकर किंवा व्यापारी म्हणून तुरळक, पण मान खाली घालून, राहण्याचा आहे. तो सुटला आणि अराजक माजलें तर जुने अनुभव पुनः घेऊ! म्हणजे दिल्लीची दौलत लाहोरास स्थापली जाईल तर मुंबईची राजधानी पुण्यास येईल. एखादी पानिपतची लढाई होईल तर एखादी भोपाळची, उदगीरची वा श्रीरंगपट्टणची लढाई होईल. निजाम चढाई

करील तर शिंदा किंवा गुरखा काय गप्प बसेल! तात्पर्य, भवितव्यतेला भिणारे आम्ही नाही!

## इतिहासाचा दीपप्रकाश

दुसरें असें कीं, उद्या हिंदुस्थानांतून अिंग्रज जाअून स्वतंत्र मुसलमानी राज्य पाकिस्तानाच्या रूपाने स्थापलें गेलें, तरी त्याला आगाऊच भिण्याचें कारण काय ? पाकिस्तानी मुसलमान हिंदु हिंदुस्थानावर स्वारी करतील, तर आम्ही काय हातांत बांगड्या घालून किंवा दर्भाच्या काड्याच घेऊन बसणार आहों ? अवरंगजेबाच्या कारकीर्दींत शिवाजीने मराठी राज्य लढून स्थापलें व कारस्थानाच्या बळावर संभाळलें, हें कां विसरावें ? अेक वेळीं शिखांनी काबूलवर अम्मल बसविला होता, हें कां विसरावें ? मराठ्यांनी रोहिलखंड ताब्यांत घेतला होता, व दिल्लीचा बादशहा बगलेंत मारला होता, हें कां विसरावें ?

बरें, पंजाबचें मुस्लिमराज्य पलीकडच्या अफगाणिस्तानाचें साहाय्य घेअून हिंदु हिंदुस्थानावर स्वारी करील, हा संभव आजच जमेस कां धरावा? पण तसेंहि घडलें तरी काय झालें ? १७५९ पर्यंत व १७६१ नंतरहि अफगाणांची मदत दिल्लीकर बादशहाला कितीशी अुपयोगी पडली ? आणि दुसऱ्या कोणाची मदत घ्यावयाची हें तत्त्व व्यवहार्य मानलें, तर हिंदु हिंदुस्थान हें अेक राष्ट्र बनल्याने त्यालाहि दुसऱ्या अेखाद्या राष्ट्राकडून मदत कां मिळणार नाहीं ?

जगाच्या राजकारणाच्या अितिहासांत यापुढे 'पराधीनता' हा शब्द जाअून त्या ठिकाणीं 'स्वाधीनता' हा शब्द अधिक नांदू लागेल. पण त्याहीपेक्षा 'परस्पराधीनता' हा शब्द अधिक प्रभावी ठरेल. आजच पाहाना ! अिंग्लंड, अमेरिका, रशिया हीं राष्ट्रें पराधीन नाहीत, पूर्णपणे स्वाधीन आहेत. पण काय अुपयोग ? स्वाधीनता अंतर्गत राज्यकारभारापुरती. पण देशाबाहेर पडून जागतिक राजकारणांत प्रवेश झाला की परस्पराधीनताच पदरीं येते हें परवा तेहरान येथे जमलेल्या त्रिमूर्तींनी अुदाहरणाने सिद्धच केलें की नाही ? अुलट गट्टी राष्ट्रें म्हणतात त्यांतहि परस्परांच्या साहाय्यावर भिस्त आहेच की नाही ? हाच दाखला अुद्यांच्या स्वतंत्र अशा अखंड हिंदु-

स्थानाला किंवा खंडित हिंदुस्थानालाहि लावतां येईल. पाकिस्तान बनलें तर हिंदु हिंदुस्थानाला मित्रच मिळणार नाही की काय ? थोडी स्वार्थाला मुरड घातली असतां व मानापमान खिशांत घातला असतां, अिंग्लंड, अमेरिका व रशिया–म्हणजे पूर्वेतिहासांत परस्परांना शत्रु मानणारीं राष्ट्रें–जर मित्र होतात, तर हिंदु हिंदुस्थानाला बुद्ध-धर्मीय राष्ट्रे कां मदत करणार नाहीत ?

म्हणून म्हणणें अितकेंच की, हिंदुमहासभेने स्वराज्य मिळविण्याचें व हिंदुत्वसंरक्षणाचें जें दुहेरी धोरण ठेवलें आहे तें बरोबर आहे. अुद्या प्रत्यक्ष काय घटना होअील हें कोणी सांगावें ? पण येअील त्या स्थितीला आपण धैर्यानें तोंड देअूं, व जुन्या अितिहासाच्या दीपप्रकाशांत आपला मार्ग आक्रमू असा आत्मविश्वास हिंदु समाज व हिंदुमहासभा यांनी ठेवला पाहिजे.

## हीण जातें–सोनें राहतें

तथापि हा निर्वाणीचा विचार होय. संभवनीयतेच्या दृष्टीने पाहिलें तर, पूर्वी रोमने अिंग्लंडवरील राज्य सोडून देअून आपलें सैन्य काढून नेलें तसा प्रसंग हिंदुस्थानसंबंधाने अिंग्लंडवर आजच येअील असें दिसत नाही. अपेक्षेप्रमाणें चालू युद्धांत मित्र–राष्ट्रांना जय मिळाला, तर ब्रिटिश साम्राज्य मोडीस घालावें न लागतां, त्यांतील घटकांना अधिक स्वातंत्र्य मिळून अिंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामध्ये आज जो सेव्यसेवकसंबंध आहे तो जाअून त्या ठिकाणीं लहानमोठ्या दर्जाचे पण स्नेही असा नवा संबंध येणें असंभाव्य नाही. तसेंच हिंदु-संस्कृतीवर कोणी कितीहि आक्रमण केलें, तरी त्यामुळे ती नष्ट न होतां फार तर तिचें रूपांतर होअील. हिंदूंचें धर्मांतर पूर्वी झालें त्या मानानें नव्या आगामी युगांत, कमी होअील असेंच वाटतें. मग आक्रमण करूं अिच्छिणारा धर्म अिस्लामी असो वा ख्रिस्ती असो. हिंदु हे परम सहिष्णु, म्हणजे भोंगळच म्हणाना, असें असतां, त्या समाजाने आज अितकीं शतकें आपली धारणा व स्वत्व हीं संभाळलीं. त्याचें बक्षिस त्याला यापुढेच मिळण्याचा संभव दिसतो. नव्या ज्ञानविज्ञानाच्या प्रखर किरणांनी हिंदुत्व हें वितळलें जाण्यापेक्षा, तें आपल्या अुच्च तत्त्वज्ञानाच्या बळावर पूर्वीहून अधिक घन, म्हणजे धारणा संभाळण्यास पात्र होअील अशीं चिन्हें दिसतात. दागिना आटविला असतां त्यांतील हीण तेवढें जातें, पण सोनें शिल्लकच राहतें.

# १४. दोन मुलाखती

( सह्याद्रि नोव्हेंबर १९४४ )

गांधी-जिना यांच्या मुलाखतीचें इतकें स्तोम माजविलेलें पाहून मला हसूं येत होतें. आणि 'अरे बाबा जाहिरात !' या नांवाच्या अलीकडील एका नाटकाची आठवण होई. पण दुसरीकडे पाहा. याच अवधींत क्वेबेक येथे चर्चिल व रूझवेल्ट यांचीहि मुलाखत चालू होती. ती कितीतरी अधिक महत्त्वाची ! पण तिची माहिती वर्तमानपत्रांत किती थोडी येई. गांधी-जिनांच्या मुलाखतीचा तिच्या गर्भधारणेआधीपासूनच बोभाटा. उलट रूझवेल्ट व चर्चिल यांची–हजारो मैल जाऊन, गांठ पडून बोलणें सुरू झाल्या-नंतरच कांही दिवसांनी या भेटीची पहिली वार्ता जगांतील लोकांच्या कानांवर आली. खऱ्या सत्ताधाऱ्यांच्या हालचालीचें महत्त्वच इतकें असतें की, त्याची आधी परिस्फुटता होत नाही. उलट गांधी–जिनांची भेट म्हणजे फार फार झालें तर कांही थोड्या महत्त्वाची गोष्ट, असें असतां तिच्या आगाऊ बोभाटयावर तारांचा हजारो रुपये खर्च व शेंकडो रिमे कागद खर्च झाला असेल. चर्चिल-रूझवेल्ट यांच्या मुलाखतींत सगळ्या जगांतील घडामोडींची चर्चा होणार असें असतां त्या मुत्सद्द्यांची वृत्ति किती गंभीर राहते आणि वर्तमानपत्री वार्ताहरहि कसा समंजसपणा दाखवितात, हें आपण पाहतोंच. पण इकडे प्रकार पाहावा तो वेगळा !

## झुलवून घेणारें हिंदी जग

जिना–गांधी ह्या, आपापल्या परीने, दोन श्रेष्ठपद पावलेल्या व्यक्ति असल्या तरी, त्यांच्या हातून होणाऱ्या कार्यभागाची व्याप्ति वस्तुतः जगाच्या मानाने फारशी नाही. तथापि इकडील वर्तमानपत्री जाहिरातबाजी पाहिली म्हणजे कोणाला असें वाटेल की, पाकिस्तानाच्या या निकालावर जणूं कांही जगाचें भवितव्य उलथेंपालथें होणार होतें. त्यांतल्या त्यांत

पाहतां जिना हेच प्रसिद्धिविन्मुख दिसतात. ' तटस्थः स्वान् अर्थान् घटयति च मौनं च भजते ! ' हें वचन त्यांना पटलेलें दिसतें. पण गांधींनी स्वतःला जाहिरातबाजीची अितकी संवय लावून घेतली आहे व लोकांना लावली आहे की, तिचें समाधान झाल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही; व त्यांच्या वर्तमानपत्रांनाहि चैन पडत नाही. मुलाखतींत काय निष्पन्न होत असेल तें असो; पण त्यांचें शेळीचें दूध व खजूर हीं घराहून जिनांच्या बंगल्यावर जणू कांही मिरवणुकीनें येतात! आणि वार्ताहर रोज तिची जाहिरात मिनिटें व सेकंद लावून करीत असतात. हिंदी जग हें झुलवून घेण्याला अेका पायावर तयार आहे. त्याला झुलविण्याला येणाराचीच खोटी.

गांधी-जिना आणि रूझल्वेट-चर्चिल यांच्या मुलाखतींतील महत्त्वभेद किती आहे हें वर सांगितलेंच. पण त्या दोन मुलाखतींत एका बाबतीपुरतें मात्र साम्य आहे तें हें की, शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशानें जरी या मुलाखती आज होत असल्या तरी त्यांतून शेवटी अशांतताच निर्माण होणार आहे ! घरांत चोर व साप एकदम शिरले तर प्रथम चोर व घरचे नोकर मिळून सापाला ठेचतात. कारण तो मनुष्यमात्राचा वैरी. पण साप मेल्याबरोबर चोर आपलीं हत्यारें घरच्या नोकरांवर उगारतात. कारण त्यांना मारून निकामी केल्याशिवाय चोरी स्वस्थपणें करतां येत नाही. त्याप्रमाणें रशिया, अिंग्लंड, अमेरिका यांनी मिळून जर्मनी व जपान यांच्याविरुद्ध आज चढाई केली असली तरी, जगाचे हे दोन शत्रु जमीनदोस्त होताच वरील तीन राष्ट्रेंच आपआपसांत भांडूं लागतील. आणि कांही अमंगल भविष्यवाद्यांनी भविष्य वर्तविल्याप्रमाणे, पुढील युद्ध या तिघांतच माजून, जपान व जर्मनी हे आपल्या बाजूला आणण्याचा प्रयत्न त्या तिघांकडून वेगवेगळा सुरू होओील. आणि असें जर खरोखरच घडून आलें तर त्यांत कांही कोणास आश्चर्य वाटणार नाही.

## धगधगत राहिलेली युद्धाची खाई

जगाची आजवरची रीत ही अशीच झालेली लोकांनी पाहिलेली आहे. फ्रान्स–अिंग्लंड, हॉलंड–अिंग्लंड, रशिया–अिंग्लंड, रशिया व बाल्कन संस्थानें,

रशिया व टर्की, अिंग्लंड व टर्की, अिंग्लंड व चीन, अिंग्लंड व अमेरिका, इंग्लंड व जर्मनी अशा निरनिराळ्या राष्ट्रांच्या जोड्या डोळ्यापुढे आणून जुना इतिहास वाचावा. म्हणजे आज दिसणारे शत्रु–मित्र पूर्वकाली अुलट मित्र–शत्रु कसे होते व कितीदा होते हें लक्षांत येअील. आणि केवळ आपल्या राष्ट्राच्या मर्यादित स्वार्थापलिकडे कोणत्याहि राष्ट्राची मजल खऱ्या जागतिक कल्याणापर्यंत कधी गेली नाही हें दिसून येअील. कारण इतक्या निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वार्थाची तोंडमिळवणी अशक्यच! कांही कांही जें नक्की एका प्रबळ राष्ट्राला हवें तेंच नक्की दुसऱ्यालाहि हवें अशी वस्तुस्थिति होऊन राहिली आहे. यामुळे अग्निहोत्र्याच्या घरांतील होमकुंडाप्रमाणे, किंवा पारशाच्या आग्यारींतील अग्निकुंडाप्रमाणें, युरोपांत आज हजारों वर्षें युद्धाची खाअी युध्दाच्या वेळीं तर धगधगत राहिलीच. पण नामधारी शांततेच्या वेळींहि त्या अग्निकुंडांतून थोडथोडा तरी धूर अेकसारखा निघत राहिल्याने, सूक्ष्म दृष्टीने पाहणाऱ्याला आंतील अग्नीची ओळख पटण्यासारखी होती.

१९१४ च्या महायुद्धापूर्वी जागतिक हिताहिताच्या गोष्टी नुसत्या बोलण्याअितकाहि मानभावीपणा युध्यमान राष्ट्रांमध्ये आला नव्हता. यामुळे स्वयंनिर्णयाचें तत्त्व अमेरिकन प्रेसिडेंट यांच्या तोंडून प्रथमच निघालें तेव्हा शंकराच्या डमरूंतून हें पंधरावें (!) व्याकरण–सूत्र नवें कसें निघालें असें वाटून जग आश्चर्यचकित होऊन राहिलें. पण कागदावरील शाअी वाळण्यापूर्वीच एखाद्या पक्षाने करार नाकबूल करावा त्याप्रमाणे, युरोपांतील रणक्षेत्रावरील रक्त वाळण्यापूर्वीच, किंवा फार तर रक्ताचे डाग पुसून जाण्यापूर्वीच, मित्र राष्ट्रांतील तकलुपी प्रेम विलयाला गेलें. त्यांच्या परस्पर कारवाया अुघडकीस आणण्यांत येऊं लागल्या. आपणांवर आक्रमण झालेलीं दलित राष्ट्रें 'जुलूम जुलूम' म्हणून ओरडून अुठलीं. आअीबापांचे हात पोंचण्यापलीकडील मुलांनी आपसांत कलह करावा त्याप्रमाणे, कानाकोपऱ्यांतील राष्ट्रांनी तह गुंडाळून ठेवून, बैठकीवरील मांड वाढवून, शेजारच्या राष्ट्रावर आक्रमण केलें. आणि जर्मनीने तर, मित्र राष्ट्रांच्या डोळ्यादेखत व्हर्सायिचा तह पायाखाली तुडवीत, स्वतःला अितकें सामर्थ्यवान व बलिष्ठ

केलें की त्याने अेकाकी असून सुरू केलेलें युद्ध आज पांच वर्षें सुरू आहे. आणि तेंहि जगांतील सर्वांत मोठ्या अशा तीन मुख्य राष्ट्रांनी अेकजुटीचा कट केला असून.

## त्रिवर्गांतील चुरस

चालू महायुद्धांत स्वयंनिर्णयासारखा जुना शब्द माग पडून दुसरे नवे संभावित शब्द पुढे आले आहेत. पण त्या शब्दांची क्रियापदांशी सांगड घालून अर्थपूर्ण वाक्यें बनण्यापूर्वीच, या त्रिवर्ग राष्ट्रांतील चुरस व भावी वैर प्रकट होअू लागलें आहे. त्यांत रशिया म्हणतो–" मी तर अिग्लंडचा सनातन वैरी. त्याचें माझें किती जुळतें हें दिसतेंच आहे. मला सहकाऱ्यांकडून फार थोडी मदत झाली असतांहि, मी केवळ आपल्या अेकट्याच्या बळावर स्टालिनग्राडपर्यंत पोंचलेली जर्मन चढाअीची भरती हटविली. खाली तुर्कस्थानवर आणि वर फिनलंडपर्यंत ओहोटी पोंचविली. जर्मन समुद्र कोरडा केला. अर्थात माझ्या लगत्याच्या राष्ट्रांशी माझे संबंध जमतील तसें मी ठरवून घेईन. त्यांत अिग्लंडची लुडबूड चालू देणार नाही."

कोठे अिग्लंड व कोठे पोलंड ! त्यांचा अर्थाअर्थी काय संबंध ! पोलंड स्वतंत्र व प्रबळ राहिलें तर जर्मनीच्या व रशियाच्या अुरावर अेक शत्रु कायमचा अुभा राहील, व आपल्याला अिकडे हवें तें करून घेतां येअील अितकेंच अिग्लंडचें पाहणें. स्वतः पोलंडचें हित साधण्याचा जिव्हाळा अिग्लंडला येण्याचें काय कारण ? व आला म्हटलें तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार ?

अमेरिका अिग्लंडविषयी अजून अितक्या स्पष्ट शब्दांनी बोलत नाही. पण तो आपल्या कृतीने हें जाणवू लागली आहे की–" आता अिग्लंडने पुढच्या रांगेंतील आपली खुर्ची सोडून देअून मागच्या रांगेंत येअून बसावें हेंच बरें. आम्ही महासागर ओलांडला. आणि युरोपचें युद्ध तें आमचें युद्ध असें मानलें. द्रव्यबळ मनुष्यबळ यंत्रबळ तंत्रबळ सगळें अमेरिकेंत नवें अुभें केलें. प्रथम आफ्रिकेच्या टोकावर व नंतर फ्रान्सच्या टोकावर मित्र राष्ट्रांचा पाय रोवला. आणि शत्रूला आंत दूरवर मागे रेटीत नेलें. नाहीपेक्षा डंकर्कच्या

पीछेहाटीवरच अिंग्लंडचें हें युद्ध थांबावयाचें आणि जर्मनीने अिंग्लंडवर स्वारी केली नाही हेंच अिंग्लंडने आपलें सद्‌भाग्य समजावयाचें, असा विकट प्रसंग आला असता ! अिंग्लंड व अमेरिका आम्ही दोघे मुख्यतः व्यापारी राष्ट्रेंच. पण अिंग्लंड म्हातारें झालें, म्हणून त्याची भूक थोडी निवाली आहे. अमेरिका हें तरुण राष्ट्र आहे. त्याची भूक अधिक तीव्र. अर्थात तिच्या शांतीकरिता अधिक खाद्य पाहिजे. हें लक्षांत घेअून अिंग्लंडने जागतिक व्यापारांत व कारखानदारींत अमेरिकेला वाट देअून आपण थोडी माघार घेतली पाहिजे."

पण अिंग्लंडला पाहावें तो जुन्या काळांतील अेखादा जहागिरदार, अिनामदार, सावकार यांसारखी आढ्यतेची बुद्धि. त्याच्या खजिन्यांत उंदरांनी बिळें पाडलीं तरी, मोकळ्या तिजोरीकडे पाहूनच तो जुन्या अैटींत झुलत राहणार. आणि म्हणणार "चला, हटा, मागे व्हा. सनातनी खानदानीला कांही विशेष मान असतोच की नाही ? रशिया हें शेजारचें कालचें टारगट पोर आणि अमेरिका घरचा झाला तरी माझा बंडखोर लेकवळा. या दोघांनीहि माझ्यापुढे डोकें नमवलेंच पाहिजे. आणि कांही म्हाताऱ्यांना तर म्हातारपणीं भूक कमी न होतां अधिक वाढते. त्याप्रमाणे मला या वेळीं तरुण राष्ट्रापेक्षाहि अधिक खाद्य पाहिजे. मी माझ्या घरच्या नोकरांना दास्यत्वांतून मुक्त करीन न करीन. त्यांत अितरांनी लक्ष घालण्याचें कारण नाही."

वरीलप्रमाणें तीन प्रमुख राष्ट्रांची मनःस्थिति असल्यामुळे, यांच्यायांच्यांतील सलोखा व शांतता कितपत टिकेल हा प्रश्नच आहे. आणि हें पुढे दिसून येअीलहि.

## जिनांचा डौलाचा डोलारा

आता गांधी–जिना यांच्या मुलाखतीकडे वळू. या मुलाखतींतून अुभयपक्षीं मान्य असा निकाल कांही लागेल असें मला वाटत नव्हतेंच. मुलाखत फुकट न गेली असें जगाला भासावें, म्हणून कांही तात्त्विक शब्दप्रचुर मंत्र किंवा सिद्धान्त कागदावर लिहिण्यांत आले. परंतु ते व्यवहारांत अुतरविण्या-

च्या बाबतींत खरी अडचण आलीच. जिनांचें अेका परीने बरें. अेकच मुद्दा, अेकच मार्ग. तो कितीहि अयोग्य असमंजसपणाचा दिसो. त्याला चिकटून त्याच्यावर सर्व भर देअून जिना निश्चित राहिले व राहणार. त्यांना पाकिस्तान हवें, व तें न मिळालें तर हिंदुस्थानाचें राजकीय स्वातंत्र्यहि त्यांना नको. आणि व्यवहारांत असा अेकांतिक मनुष्यच खरा सुखी असतो. हट्टी व दुराग्रही हीं निंदाव्यंजक विशेषणें त्याला जग लावो. परंतु समुद्रतळीं खूप खोल चिखलांत रुतलेल्या नांगरावर आधारलेल्या जहाजाप्रमाणे, त्याची अेकांतिक मागणी तग धरून राहते. सर्व जगाला तुच्छ मानण्याच्या धारिष्टाचें हें अेक प्रकारचें बक्षिसच होय. मात्र जिनांचा हा डौलाचा डोलारा अुतरणें अेकाच गोष्टीने शक्य आहे. आणि ती ही की, आपल्या मागणीला बरकरणीं ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या सहानुभूतीचा असलेला आधार नाहीसा होणें. आणि याहि मुत्सद्द्यांनी मथून मथून हें जाणविलें आहे की, ब्रिटिश साम्राज्याला पाकिस्तान हें अहितकारक वाटेल तर मग त्याला आमच्या सहानुभूतीचा आधार राहणार नाही. पण याचा अर्थ हिंदुस्थानांतून अिंग्रज राजसत्ता जाणार नाही, आणि तिला राखून ठेवणें हेंच मुसलमान समाजाला आज हिताचें आहे. अिंग्रजी राजसत्तेला राखून ठेवून त्याबरोबरच हिंदूंशी समानतेने मुसलमानांना सत्ता मिळविणें शक्य आहे, असें जिना यांना वाटत असल्यामुळे, ते गांधींना पहिलीच अट अशी घालतील की, अिंग्रज अमल असतांच पाकिस्तानाला मान्यता द्या किंवा प्रथम अिंग्रजी राज्यांतच ५० टक्के राजसत्ता मुसलमानांना देण्याचें तुम्ही कबूल करा. आणि तीच सत्ता रुळली, रूढ झाली, म्हणजे मग अिंग्रजांना घालवून देण्याचें तुम्ही-आम्ही मिळून पाहूं.

अगदी याच्या उलट गांधींची स्थिति आज आहे.त्यांची नाव कोणत्याच नांगरावर व दोरावर आधारलेली नाही. ती लोकमताच्या वादळांत सांपडली आहे. तिचें खरें सुकाणू राष्ट्रीय सभेची वर्किंग कमिटी हें होय. पण तें जाअून मोडून पडलें आहे नगरच्या तुरुंगांत. त्याच्याअैवजी त्यांनी राजाजींच्या सुकाणूचा आधार घेतला आहे. पण त्याचा सगळा रोख आहे पाकिस्तान-वादी मध्यप्रवाहाच्या वेगांत ! गांधींची ही नाव त्या दिशेने अजून चालविली

जात आहे. पण वादळांत वारे चोहो दिशांनी वाहतात. त्याप्रमाणे, गांधी हे जिनांच्या चरणीं सर्वस्व अर्पण करण्याला आणि त्याच्या आधारावर स्वातंत्र्य मिळविण्याला मनाने तयार झाले असले तरी हिंदुमहासभा, शीखसमाज, आर्यसमाज, नेमस्त मुत्सद्दी, थिऑसफिस्ट, ख्रिश्चन, पारशी, फार काय, पण काँग्रेसच्या गटांतीलच हिंदुत्वाच्या अभिमानाला जागणारे आपलेच कांही अनुयायी, या सर्वांचा विरोध पाकिस्तानाला असल्याचें उघड झाल्यामुळे गांधींची नाव हेलकावे खात आहे, व अेकदा तोंड तर अेकदा पाठ दाखवत आहे. म्हणून जिनांना पाहिजे तें सर्व देअूनहि हिंदूंना हवें तें सर्व राखून ठेवूं, अथवा पाकिस्तानाने हिंदुस्थानाचे दोन भाग झाले तरी फिरून आपण हिंदुस्थान अखंडच ठेवूं, असल्या विसंगत बोलण्याचे ध्वनि त्यांच्याकडून नसले तरी त्यांच्या अनुयायांकडून ऐकू येत आहेत.

## मुखत्यारीची भूल लवकरच अुतरेल

मौज अितकीच वाटते की, आपणां दोघांना सर्व हिंदुस्थानाने मुखत्यारपत्र दिलें आहे अशी समजूत करून घेअून, हे दोघे स्वयंमन्य घमेंडखोर शिष्ट हिंदुस्थानाची व्यवस्था लावण्याला बसले आहेत. पण ही मुखत्यारीची त्यांची भूल लवकरच निघून जाअून ते दोघेहि शुद्धीवर येतील अशी मला खात्री वाटते. गांधी काय, जिना काय, हिंदु काय, मुसलमान काय, त्यांना आपल्या अेका शब्दाने हलकें किंवा जड, अुलथें किंवा पालथें, करण्याचें बळ विद्यमान राजसत्तेने अिंग्रजांच्या हातीं आहे हें ते स्वतः पुरें जाणतात. आणि मधून मधून अेखादा प्रसंग साधून ते या आपल्या अंकितांना तें बल जाणवितातहि. लॉर्ड रीडिंग यांनी अेका शब्दाने हैद्राबादच्या नबाबांचा शेंदूर अुतरला. लॉर्ड वेव्हेल यांनी हिंदुस्थानाच्या भौगोलिक स्थितीची आठवण करून देअून अेका शब्दाने जिनांना गोरेमोरें व्हावयाला लावलें. गांधी-जिना युति होण्याच्या वेळी आधी दोनच दिवस लॉर्ड वेव्हेल यांनी आपला व गांधींचा पत्रव्यवहार प्रसिद्ध करून आपलें अंतरंग किंचित् प्रकट केलें, आणि चर्चिलने तर अेकदाच सांगून टाकलें की, 'मी जो मुख्य प्रधान झालों तो ब्रिटिश साम्राज्य हातचें गमावण्याकरिता नव्हे तर तें सुदृढ करण्याकरितां. मग असा हा चर्चिल, केवळ स्वातंत्र्यबुद्धीने प्रेरित

झालेल्या अशा जिनांना स्वतंत्र सैन्य व स्वतंत्र परराष्ट्रीय राजकारण बहाल करून, हिंदुस्थानांतच आपल्या स्वराज्याची सरहद्द हटवून घेअून, स्वतंत्र मुसलमान राज्य निर्माण करील काय? गांधी–जिनांची मुलाखत अिकडे जिना–भवनांत चालू असतां, हातांतील कागदामागे तोंड लपवून, जिनांना नव्हे पण गांधींना मात्र फिदीफिदी हसणारे अनेक नामवंत ब्रिटिश मुत्सद्दी माझ्या डोळ्यापुढे येतात! चोर घराशेजारी अुघड्या जागेंत अुघड्या प्रकाशांत बसून, हें घर लुटून कसें घ्यावें याचा विचार करीत आहेत! आणि माडीवर अुभा राहून घरचा मालक हें पाहातो व अैकतो आहे! अशी या प्रसंगीं कल्पना केली तर ती फारशी वावगी ठरणार नाहीं.

## पंजाबांत मुसलमान पक्षाचें आशादायक मौन

पाकिस्तानाविरुद्ध सर्व हिंदु समाजाने चळवळ आरंभिली ती योग्यच आहे. पण मुख्यतः अुत्तर हिंदुस्थानांतील लोक या टोकापासून त्या टोकापर्यंत काय हालचाल करीत आहेत यावरच माझें लक्ष लागलेलें आहे. आम्ही दक्षिणेंत आपल्या ठिकाणीं पाकिस्तानाविरुद्ध चळवळ करावी हें ठीकच आहे. तथापि हा प्रश्न मुख्यतः प्रथमतः ज्या प्रांतांना पाकिस्तान–घटना लागावयाची त्यांतील हिंदूंचाच आहे. पैकी पंजाब व बंगाल यांत थोडीबहुत चळवळ दिसते. त्यांतल्या त्यांत पंजाबांत जास्त आहे. शीख, आर्यसमाज, सनातनी हिंदु, यांच्या पुढाऱ्यांपैकी अेकहि पाकिस्तानाला अनुकूल दिसत नाहीं. पण विशेष महत्त्वाची गोष्ट ही की, पंजाबांतील मुस्लिम प्रधानमंडळ आहे तसेंच म्हणजे संयुक्त राहिलेलें असून, या संयुक्तीच्या मुद्द्यावरच मुख्यमंत्री खिज्र हयातखान हे औपचारिक रीत्या मुस्लिम लीगचे सभासद असतांहि, जिनांना कोणत्याहि तऱ्हेने पाठिंबा देत नाहीत. कारण कांहीहि असो; पण सर्वपक्षीय मंत्रिमंडळाचा प्रयोग या मुसलमानी प्रांतांत आजवर जितका यशस्वी झाला तितका अितर कोठेहि झाला नाही असें म्हणतां येअील. बंगाल्यांतील संयुक्त म्हणविणारें मंत्रिमंडळ गडगडलें व तेथे लीग-प्रणीत मंत्रिमंडळ आलें. पण पंजाब अजून टिकाव धरून आहे. मग हयात-खान यांना अशी खात्री वाटत आहे की काय की, अुद्या जिनांच्या मागणी-प्रमाणे पंजाबांत मतमोजणी केली तर ती पाकिस्तानविरोधी ठरेल? कांही असो. पंजाबांतील अेका मुसलमान पक्षाचें मौन हें आशादायक वाटतें.

## बंगालचें धर्मांतराचें पाप

बंगाली राष्ट्रावर पूर्वी फाळणीचें संकट आलें त्याहिपेक्षा पाकिस्तानाचें हें संकट अधिक मोठें आहे. तथापि त्या फाळणीविरुद्ध प्रचंड चळवळ झाली तेवढी या नव्या फाळणीविरुद्ध बंगाल्यांत होत नाही हें निश्चित आहे. बंगाली हिंदूंचें पापच त्यांना भोवत आहे. तें पाप म्हणजे धर्मांतराचें. पंजाबांत केंद्रस्थानीं मुसलमानी बादशाहीच प्रत्यक्ष होती, आणि परप्रांतीय मुसलमानांना अिकडे येण्याला तो प्रदेश अगदी जवळचा. यामुळे पंजाबांत मुसलमान बहुसंख्य झाले यांत अितकेंसें आश्चर्य वाटत नाही. परंतु मध्यंतरीं दुआब, अयोध्या, बिहार, कांही ओरिसा अित्यादि प्रांतांच्या डोक्यावरून किंबहुना निम्या बंगाल्याच्या डोक्यावरून, पलीकडच्या निम्या बंगाल्यांत मुसलमान बहुसंख्य व्हावे—यावरून तिकडील बंगाली लोकांच्या मनोवृत्तीचें अनुमान करतां येतें. दिल्लीजवळ असलेल्या संयुक्त प्रांतांत ४।५ शें वर्षांत पंचवीस टक्केहि लोकसंख्या मुसलमान झाली नाही. याच्या उलट अगदी दूरच्या पूर्वबंगाल्यांत ती शेंकडा ५५।६० व्हावी याचें कारण काय? हिंदूंच्या मुली पळवून नेऊन मुसलमानी लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न आणि धर्मांतराचा प्रयत्न पूर्वबंगाल्यांत अधिक झाला खरा. फाळणीविरुद्ध झालेली चळवळ पूर्व-बंगाल्यापेक्षा पश्चिम-बंगाल्यांतच अधिक झाली. आणि आजहि पाकिस्तानाविरुद्ध चळवळ करण्याची जबाबदारी पूर्व-बंगाल्यांतील हिंदूंपेक्षा पश्चिम बंगाल्यांतील हिंदूंनीच आपल्या अंगावर अधिक घेतली आहे.

## संयुक्त प्रांतावर कॉंग्रेसच्या दडपणाचा परिणाम

हिंदुस्थानाच्या दोन टोकांना होणाऱ्या पाकिस्तानाचा तुटकपणा काढून टाकण्याकरिता, मधला संयुक्त प्रांत व बिहार यांचा कांही भाग मुसलमानी नव्या राष्ट्राला बहाल करावा, अशीहि जिनांची मागणी आहे म्हणतात. या मागणींत जिना यांचें बेछूटपणाचें धारिष्ट जितकें दिसून येतें, तितकें पंजाबचें स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र करण्याच्या मागणींत दिसून येत नाही ! कारण या मधल्या प्रांतांत मुसलमानी लोकसंख्या शेंकडा २५ अितकीहि नाही. पण हें खरें असेल, तर जिनांच्या धारिष्टापेक्षा संयुक्त प्रांतांतील हिंदूंच्या नरम-

पणाचेंच आश्चर्य अधिक वाटतें.कारण त्याविरुद्ध या प्रांतांतील हिंदूंची कांहीच चळवळ अैकू येत नाही. नाही म्हणावयाला अेकट्या पंडित मदन मोहन यांचा आवाज कांही थोडा अैकू आला. या नरमाअीचें कारण असें असावें की, संयुक्त प्रांतांत कॉंग्रेसचें प्रस्थ व दडपण फार आहे. तेथे हिंदुमहासभेचें नांव अैकू आलें तर केवळ ५।४ मोठ्या जमीनदारांत अैकू येतें. परवा सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव पुण्यास आले होते, तेव्हा त्यांच्या भाषणावरून संयुक्त प्रांतांत वरीलप्रमाणे स्थिति खरीच असल्याचें ओघानें आलें होतें असें कित्येकांना वाटलें.

## हिंदूंचें नशीब !

मग उत्तर-हिंदुस्थानांत ज्या भागांवर प्रत्यक्ष पाकिस्तानी मुसलमानांचें आक्रमण होणार तेथील हिंदु पुढाऱ्यांची,जर ही अनास्था,तर नागपूर,महाराष्ट्र, मद्रास अित्यादि प्रांतांनी ही चळवळ करण्याचें कारण काय ? याचें कारण अितकेंच की, शेजाऱ्याच्या घराला आग लागली असतां ती विझविण्याचा प्रयत्न शेजाऱ्याच्या प्रेमाखातर तर करावाच. पण निदान त्या जळत्या घराची आग आपल्या घराला लागू नये, म्हणून आपल्या घराच्या छपरावर पाणी ओतीत राहणें हें योग्यच ठरतें. आमच्या प्रांतांत मुसलमान अल्प-संख्य आहेत. तेव्हा, अुत्तर-हिंदुस्थानाचा सूड आम्ही दक्षिण-हिंदुस्थानांत काढूं अशी हिंदूंची वृत्ति असती तर अिकडील मुसलमान समाजाकडून जिना यांना पुष्कळच विरोध झाला असता. पण या सूडाची भाषा आमच्या तोंडून निघावयाची नाही. अुलट आमच्यांतलेच राजाजी पाकिस्तानाची अुठावणी करण्याला जिनांना मदत करावयाचे. हेंच हिंदूंचें नशीब !

## दोन स्थितींतील भेद

पण कांही प्रांतांतील हिंदूंचें हिताहित सोडलें तरी अखंड, किंवा पाकि-स्तान जाअून अुरलेल्या, हिंदुस्थानाच्या रक्षणाचा व परराष्ट्रीय धोरणाचा प्रश्न महत्त्वाचा असा अुरतो. या हिंदुस्थानाचें रक्षण व्हावयाचें तर, पंजा-बांत अेक स्वतंत्र हुकमतीखालचें सैन्य व अुरल्या हिंदुस्थानांत स्वतंत्र हुकम-तीखालचें दुसरें सैन्य, ही गोष्ट अिष्ट आहे काय ? तिचा परिणाम काय

होअील ? दोन्ही सैन्यें एकाच हुकमतीखाली राहणें अिष्ट नाही काय ? या प्रश्नांचें अुत्तर कोणीहि समंजस मनुष्य देअू शकेल. तसेंच परराष्ट्रांशी तहाचे संबंध स्वतंत्रपणें करण्याचा अधिकार पाकिस्तानी पंजाबाला मिळाला. आणि त्याने सरहद्दीपलीकडील मुसलमानी राष्ट्रांशी सूत बांधलें, तर हिंदुस्थानाच्या ब्रिटिशपूर्व कालाची पुनरावृत्ति होणार नाही काय ? या प्रश्नाचेंहि अुत्तर समंजस मनुष्याला सहज सुचणारें आहे. कांही लोक असा युक्तिवाद करणारे आढळतात की, असंतुष्ट पंजाब हिंदुस्थानाच्या राज्यांत असण्यापेक्षा तो संतुष्ट होअून बाहेर पडलेलाच बरा. पण अक तर असा संतोष झालेल्या पंजाबाला पुढें अतिक्रमणाचे चाळे सुचणार नाहींत कशावरून ? तसेंच मुस्लिम पंजाब स्वतंत्र न झाला तर तो असंतुष्ट राहील खरा, पण वरिष्ठ सरकारच्या कह्यांत तर राहील. त्याला स्वतंत्रपणें परराष्ट्रांशी राजरोस तह करतां येणार नाहीत. अुद्या वायव्य सरहद्दीवर युद्ध निघालें, तर बिनपाकिस्तानी पंजाब कदाचित् परक्या शत्रूला फार तर थोडीबहुत अंतःस्थ मदत करील अितकेंच. तथापि स्वतंत्र पाकिस्तानी राज्य झाल्यास तें हिंदुस्थानावर आक्रमण करण्याचाहि तह अुघड करूं शकेल. या दोन स्थितींतील भेद व तारतम्य कोणाहि सुज्ञ मनुष्याच्या लक्षांत तेव्हाच येअील.

## असमंजसपणाचें अयशस्वी राजकारण

असो. जिना-गांधी वाटाघाटी संपल्या, म्हणजे निष्फळ ठरल्या, म्हणजे पाकिस्तानाचा प्रश्नच मिटला, असें मात्र कोणी मानूं नये. गांधींच्या अनाहूत साहाय्याने पाकिस्तानाच्या कल्पनेला बाळसें आलें. किंवा कांही अंशीं त्या साहाय्यानेंच पाकिस्तानाच्या कल्पनेचा जन्म झाला. आज २०।२५ वर्षें ' मुसलमानांच्या मित्रत्वाशिवाय हिंदुस्थानाला स्वराज्यप्राप्ति नाही ' असा महामंत्र हे खादीधारी महंत अुघडपणें जपू लागल्यामुळेच मुसलमानांना वाटूं लागलें की, ' अरे, आम्ही अेवढे मोठे आहों की ! ' गांधींचा हा आत्मघातकी पाठिंबा नसता तर पाकिस्तानच काय पण अधिकाराची ५० टक्के वांटणी अित्यादि गोष्टी अैकूंहि येत्या ना. ' मुसलमान अल्पसंख्य म्हणून त्यांना विशेष रक्षण काय देतां, बोला ? ' अेवढाच प्रश्न विचारण्यांत आला

असता, व स्वतंत्र मतदारसंघ, राखीव जागा, व मुसलमान व हिंदु अल्पसंख्याक लोकांना सर्वत्र सारखें लागण्यासारखें विधिमंडळांतील प्रतिनिधिसंख्येचें थोडें झुकतें माप ( वेटेज ), अेवढ्यावर मुसलमानांच्या मागण्या थांबल्या असत्या. पण गांधीमहाराजांच्या कृपेने, सरकाराच्या अंगाला लावण्याकरिता म्हणून मुसलमानांच्या हातीं दिलेलें जळतें लाकूड मुसलमानांनी सरकाराकडून काढून अेकटचा हिंदु समाजाच्या अंगाला लावण्याचें काम साधलें व चालविलें आहे. गांधींचा आश्रय आडोसा व साहाय्य नसतें तर अुघड्या मैदानांत येअून हिंदुस्थानांत स्वतंत्र मुसलमान राष्ट्राची मागणी जिनांनी अिंग्रज सरकाराकडे कशी काय केली असती हें आम्ही पाहिलें असतें. आणि आजहि गांधींशी चाललेल्या मुलाखतींत, अिंग्रजांकडून स्वातंत्र्य हिसकावून घेण्याची भाषा जिना बोलत नसून, अिंग्रजी राज्याच्या आधारावरच ते सर्वत्र पन्नास टक्के बरोबरीचे अधिकार आणि बरोबरीच्या हक्काचें प्रधानमंडळ गांधींकडून मागून घेत आहेत. मग अिंग्रज तें देवोत न देवोत.

तात्पर्य, अेका शब्दाने सांगावयाचें तर गांधीमहाराजांनी हिंदुस्थानांत अवतार घेअून असमंजपणाचें अयशस्वी राजकारण करून, हिंदु समाजाचा मात्र सर्वस्वी घात करण्याची वेळ आणली आहे खरी. आणि सर्वांत दुर्भाग्य हें की, अशा अडाणी महंताच्या मागे लागून हिंदी जनता ही केवळ अहिंसेने व खादीने स्वातंत्र्य मिळविण्याची आशा धरून चालली आहे. पण शहरांतून आपणाला अनेक आंधळे अेकत्र जमून माळ धरून भीक मागत चाललेले दिसतातच की ! मात्र ते अेकत्र जळतात कसे याचेंच आश्चर्य वाटतें !

---

# १५. अखंड–हिंदुस्थान परिषद, मुंबई

## अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांचें भाषण

( केसरी ता. १२ डिसेंबर १९४४ )

"ज्या लोकांना हिंदुस्थानाला राजकीय स्वातंत्र्य मिळावें व देशांतील सर्व जमातींना त्यांचा धर्म व संस्कृति टिकवितां यावींत, असें आस्थापूर्वक वाटतें, अशा हिंदुराष्ट्रवाद्यांची आजची परिषद आहे. हिंदुमहासभा ही एक जातीय संस्था आहे असें म्हणण्याची एक प्रथाच पडून गेली आहे. परंतु महासभेबद्दल असें म्हणणें हें निव्वळ अन्यायाचें आहे. हिंदुमहासभा ही जशी जातीय संस्था आहे तशीच ती राजकीय संस्थाहि आहे. हिंदुमहासभेचें कोणीहि दप्तर चाळल्यास दिसून येईल की, महासभेचें राजकीय ध्येय–धोरण व तें प्राप्त करून घेण्याची तीव्र इच्छा हीं अत्यंत स्पष्ट आहेत. स्वतंत्र हिंदुस्थानाच्या भावी राज्यघटनेच्या महासभेच्या कल्पना स्पष्ट असून,देशांत शांतता नांदावी यासाठी इतर विरोधी जातींचा समावेश घटनेंत कसा करून घ्यावा या महासभेच्या योजनाहि निश्चित आहेत.

### काँग्रेसचें पाऊल घसरलें

यासाठी महासभा बलशाली व्हावयास हवी. कारण कांग्रेस आपल्या पुरातन जातीयतातीतत्वापासून व खऱ्याखुऱ्या राष्ट्रीयत्वापासून च्युत झालेली आहे. हिंदु–मुस्लीम ऐक्याच्या भुतानें ती पछाडली गेली असून सामान्य माणसाची राजकारणाकडे पाहण्याची दृष्टीच पार बदलून गेली आहे. लोकसत्तात्मक राज्यांत प्रतिनिधित्वनिष्ठ सरकार असावें लागतें हें तत्त्वच मुळी लोक विसरूं लागले आहेत. मुसलमानांच्या चढेल मागण्यांना भाव आलेला आहे व त्या मागण्या देशहिताला सर्वस्वी अहित-

कारक व अन्याय्य आहेत. त्यामुळे हिंदुसमाज देशांत बहुसंख्याक असूनहि त्याला आपला हक्क शाबीत करणें प्रयासाचें होऊन बसलें आहे. त्यामुळे सरकारचें आयतें फावलें असून लोकाहातीं सत्ता न देण्यास त्यांना आयती सबब मिळाली आहे.

अल्पसंख्याकांना खूष करण्याच्या धोरणाला अल्पसंख्याकांकडूनच चांगली थप्पड बसली आहे. जिनांना बगलेंत मारण्यासाठी कांग्रेसने काय करावयाचें ठेवलें आहे ? आणि मजा ही की, जिनांइतके कॉंग्रेसचे कठोर टीकाकार कोणी नाहीत ! अस्पृश्योद्धारासाठी गांधींनी गेलीं २४ वर्षें विश्वप्रयत्न केले, पण डॉ. आंबेडकरांइतका गांधींचा द्वेष्टा अन्य सांपडणें कठीण.

कांग्रेस आपणांस हिंदूंची प्रतिनिधि म्हणविते व महासभेकडे व तिच्या पुढाऱ्यांकडे अत्यंत तुच्छतेने पहाते म्हणून मला कांग्रेसचा निर्देश करावा लागला. कॉंग्रेसने आपली निःपक्षपातीपणाची व जातीयतातीत भूमिका सोडली नसती, देशांतील सर्व राजकीय पक्षांकडे समदृष्टीने पाहण्याचें तिचें धोरण असतें तर पाकिस्तानाला आज जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें येतेंचना.

## व्यावहारिक दृष्टीचा अभाव

मुसलमानांचें सहकार्य मिळेल तरच आपण सत्ता प्राप्त करून घेऊ अशी भलतीच कल्पना करून घेतल्याने मुसलमान चढून गेले आहेत. परंतु या लोकांना ब्रिटिशांच्या मनोवृत्तीची व व्यावहारिक राजकारणाची यथार्थ कल्पनाच नाही असें म्हणावें लागतें. आपल्या आशा–अपेक्षा कांहीहि असल्या तरी दीडशें वर्षें एकमुखी सत्ता गाजविणाऱ्या व ब्रिटनकडे द्रव्याचा ओघ वाहत ठेवणाऱ्या सरकारकडून सुखासुखी सत्तात्याग केला जाईल ही अपेक्षाच मूर्खपणाची आहे.

दोन महायुद्धांमुळे, ब्रिटिशांना त्यांच्या गरजेसाठी, हिंदुस्थानाला स्वायत्तता देऊ अशा घोषणा कराव्या लागल्या. परंतु याच महायुद्धामुळे हिंदुस्थान आपल्या हातीं कायम राखणे अत्यावश्यक आहे अशी खात्रीहि ब्रिटिश मुत्सद्द्यांची झाली आहे. सन १९३५ चा इंडिया कायदा ही गोष्ट स्पष्ट सांगत

आहे. सत्तेची भाकर खुशाल खा, असें हा कायदा सांगतो, पण भाकर मात्र ब्रिटिशांना आपल्या हातून सोडावयाची नाही. चेंगिजखानापेक्षाहि यांचें आक्रमण भयंकर आहे. या आधुनिक चेंगिजखानांनी ८ कोटि ८० लक्ष लोकवस्तीचा व पन्नास लक्ष चौरस मैलांचा प्रदेश आपल्या प्रभुत्वाखाली आणला. सन १८७० ते ९८ पर्यंतच्या अवधीत जर्मनीला फक्त दहा लक्ष चौरस मैल आणि १ कोटि ६० लक्ष लोकवस्तीचा मुलूख मिळाला. इतका संपन्न व लष्करी दृष्टचा उपयुक्त प्रदेश हे लोक सुखासुखी कधीच सोडणार नाहीत.

## भोळी समजूत

कित्येकांची अशी एक भोळी समजूत आहे की, हिंदुमुसलमानांनी एखादी स्वराज्याची संयुक्त मागणी केली तर साम्राज्य सरकार तें देईल. हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांचा असा भोळेपणा पाहून साम्राज्यवादी हसत मात्र असतील. अहिंसात्मक असहकार व फार तर उपवास हीं यांच्या राजकीय शस्त्रागारांतील प्रमुख अस्त्रें. अशा चळवळीचें काय करावें हें ब्रिटिश मुत्सद्दी उत्तम जाणतो. आपल्या राज्यकारभारास कोठे धक्का लागत नाही अशी ब्रिटिशांची खात्री झाली आहे. कॉंग्रेसने मंत्रिपदें सोडलीं तेव्हा ब्रिटिशाला हायसें वाटलें, आयता तो निर्वेध झाला, कॉंग्रेसची ही फार मोठी मदतच नोकरशाहीला नाही काय ? मग त्याने परमेश्वराचे आभार कां मानूं नयेत ? आयतें त्याला रान मोकळें सापडून ९३ कलमाखालीं त्याने कारभार हातीं घेतला, त्याला ही इष्टापत्तीच कां वाटूं नये ? अहिंसेच्या आज्ञेमुळे देशांत अंतर्गत शांततेची खात्री पटली. आता कांही लोकांनी सरकारपेक्षां आपल्याच लोकांना उपद्रव दिला हें वेगळें. तथापि त्यामुळे सरकारच्या रिक्रूट–भरतीला व युद्धप्रयत्नांना किंचितहि व्यत्यय आला नाही. सरकारची खात्री होती की, यावेळीं देशांत आपणास विरोध असा फार होणार नाही. उलट साहाय्यच होईल. कांग्रेसचा असहकार हा सरकारच्या पथ्यावरच पडला. उलट कांग्रेसने सत्तात्याग करून सत्ता सरकारच्या हातीं दिल्याने लोक मात्र रुष्ट झाले, व सरकार भारत संरक्षण कायदा व इतर वटहुकुमांवर राज्य करूं लागलें.

## उशिरा सुचलेलें शहाणपण

कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद तुरुंगांत गेले. राजगोपालाचारीयर हे मात्र बाहेर राहून हिंदु–मुस्लिम ऐक्याचें ढोलकें वाजवीत जिनासारख्या दुरा-

ग्रही माणसापुढे लाचारीनें गोंडा घोळू लागले. आपला पुढारी तुरुंगाबाहेर येतांच त्याच्यासाठी ही पूर्वतयारी होती. त्यांचा उपाय सोपा. अहिंसा-व्रताचा तोंडी उच्चार, देशविच्छेदन करून रक्तबंबाळ झालेल्या देशांतील पाकिस्तानाचा मुकुट जिनांना द्यावयाचा, की ब्रिटिशांनीं दिलेंच स्वराज्य !

उशिरा कां होईना पण त्यांना आता शहाणपण सुचेलसें वाटतें. नागपूर विश्वविद्यालयाच्या पदवीदानप्रसंगीं त्यांनी केलेल्या भाषणांत दोन सुसंगत मुद्दे ते बोलले. कौन्सिलवर बहिष्कार घालणें ही चूक झाली हें एक शहाणपण व अल्पसंख्याकांना राजी राखणें उत्तम असलें तरी त्यांचा जुलूम बहुसंख्याकांवर होतां कामा नये, हे दुसरे शहाणपणाचे उद्गार. पुढे याच भाषणांत ते म्हणतात, 'मी व गांधी जिनांना पाकिस्तान देण्यास सिद्ध असतां जिनांनीच तें घेतलें नाही.' पण असें पाकिस्तान देणारे तुम्ही व तुमचे गुरु हे कोण ? याला बहुसंख्य हिंदूंची संमति नको का ? मागें एका पोपने आपल्या एका शिष्याला उत्तर ध्रुव व दुसऱ्याला दक्षिण ध्रुव दिले. त्यांतीलच हा प्रकार. यापेक्षा औद्धत्य दुसरें कोणतें ? जिनांच्या मागण्या वाढत आहेत व त्या पुऱ्या पाडण्यासाठी गांधी-राजाजी झटत आहेत. या घोर अपराधाचा सर्व बिगर कांग्रेस पक्षांनी कडक निषेधच केला आहे.

## धोका कायम आहे

गांधी-जिना बोलणें फिसकटलें आता पाकिस्तानचा प्रश्न मिटला, असें कांहींना वाटतें, पण मला तसें वाटत नाही. मध्यवर्ती सरकाराकडे राष्ट्रीय वा संयुक्त सरकारचा प्रश्न उत्पन्न होतांच हें भूत पुन्हा डोकें वर काढील. त्याला तोंड देण्याची आपली सिद्धता असली पाहिजे.

कांहींचें म्हणणें असें की देशांत असंतुष्ट असे मुस्लीम प्रांत असण्यापेक्षा वायव्येकडे मित्रराष्ट्र म्हणून मुस्लीम राष्ट्र असणें फायद्याचें होईल. मला हें म्हणणें चुकीचें वाटतें. स्वतंत्र मुस्लीम राष्ट्र म्हणजे त्यांचें सैन्य, इतरांशी तह करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य इत्यादि गोष्टी आल्याच. म्हणून संयुक्त सत्ते-खाली असून मुस्लिम प्रांतांनी परदेशांशी कांहीं फितुरीच्या गोष्टी केल्या तर तीं संयुक्त सत्तेखालीं असलीं म्हणजे त्यांना संयुक्त फौजांच्या नियंत्रणा-

खाली राहावें लागेल. परंतु पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र झालें तर तें स्वारी करणाऱ्या राष्ट्राशी मित्र–राष्ट्र म्हणून संगनमत करील. हिंदु–मुस्लीम ऐक्याच्या नांवाखाली गांधी व राजाजी यांना खूष करण्यासाठी हा महान धोका पत्करतांच कामा नये.

आणि हा धोका केवळ काल्पनिक नाही. अल्लीबंधु मध्यप्रांतांतील तुरुंगांतून सुटल्यानंतर हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अफगाणांची मदत घ्यावी अशाबद्दल गांधींचें मन वळवीत होते. त्यांनी मुंबईस एक बैठक बोलावली होती. तींत त्यांनीं पुढील मजकूर सांगितल्याचें मला चांगलें स्मरण आहे.

" ही वेळ आहे. हिंदी लोकांनी अमानुल्लांचें स्वागत करण्यास सिद्ध झालें पाहिजे. त्याने सरहद्द ओलांडून एक लष्करी ठाणेंही जिंकलें आहे. यावेळीं हिंदूंनी व मुसलमानांनी उठाव केला व त्यांना अमिराचें साहाय्य मिळालें तर हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळेल." दुसराहि एक प्रसंग मला असाच आठवतो. अफगाण स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीला अफगाण एजन्टाने आम्हांला चहाला बोलावलें होतें. परस्परांबद्दल गोडवीचीं भाषणें झाल्यानंतर एका कांग्रेस पुढाऱ्याने एजन्टाला अशी विनंति केली की, " आता हिंदुस्थान गांधींच्या सत्य व अहिंसावादाच्या जोरावर स्वातंत्र्य संपादन करणार तेव्हां अमीरसाहेबांनीं हिंदु–मुस्लीम ऐक्याला आशीर्वाद देऊन यापुढे हिंदुस्थानावर त्यांनी स्वारी करूं नये, असें अमीरांनी आश्वासन द्यावें, ही विनंति त्यांना कळविण्यांत यावी. " राजकारणाच्या या अगाध ज्ञानाचें दर्शन पाहून मला हसू आलें. कारण मी हिंदुस्थानाचा इतिहास वाचला असून, सिंधच्या स्वारीपासून स. १७६१ च्या अबदालीच्या स्वारीपर्यंतचा इतिहास माझ्या डोळ्यासमोर होता. हिंदु समाजावर अन्याय करूनहि हिंदु–मुस्लीम ऐक्य करण्याचा कांग्रेसचा खटाटोप सुरू झाल्यापासून मुसलमानी दंगे–अत्याचार, राजकीय हक्कांबद्दल त्यांच्या वाढत्या मागण्या या अगदी नकाशाप्रमाणें स्पष्ट आहेत. यासाठी जिनांना अगर लीगला दोष देण्यांत काय अर्थ आहे ! आपल्या लाभासाठी एखाद्या मनुष्याची आपणांस अत्यावश्यकता आहे, असें तुम्ही एकसारखें म्हणत गेलांत की, त्याला सहजच आपण तसें असल्याचें

वाटूं लागतें. परंतु कांग्रेसला स्वराज्य आपल्या हातीं आणण्याची इतकी घाई सुटली होती की, त्यामुळें राज्यशास्त्राप्रमाणें हिंदु राष्ट्राची वाट काय होईल, याचा विचारच तें करू शकले नाहीत.

## जुने जिना

सन १९१७ सालीं कलकत्त्याला लीगच्या सभेपुढे, कांग्रेस–लीग योजनेचा पुरस्कार करीत असतां बॅ. जिना म्हणाले, "कांहीं मुसलमानांना वाटतें की, इतक्या तांतडीने स्वराज्य मिळाल्यास त्यामुळे मुसलमानांची हानि होईल, कारण ते आहेत अल्पसंख्य" त्यांना माझें उत्तर असें की, या देशांत हिंदु सरकार होईल असें कां तुम्हांला वाटतें ? हिंदु बहुसंख्य म्हणून कायदेमंडळांत वाटेल तो कायदा ते पास करतील असें कां तुम्हाला वाटतें ? सात कोटि मुसलमानांना एखादा कायदा अमान्य झाला तर त्याची बजावणी होईल अशी का आहे तुमची कल्पना ?' म्हणून माझें माझ्या मित्रांना सांगणें असें की, तुमच्या शत्रूंनी तुम्हांस भिवविण्यासाठी भूत उभें केलें आहे. कारण तुमचें सहकार्य त्यांना मिळूं नये हा आहे त्यांतील डाव. या देशांत मुसलमानांचेंहि राज्य होणार नाही. इंग्रजांचेंहि नाही. देशांतील जनता राज्य करणार. पुढें १९३३ पर्यंतहि मुस्लिम लीग मध्यवर्ती कायदेमंडळांत शें. ३३ प्रतिनिधित्व मागत होती. यासंबंधाने लीगने केलेल्या ठरावांत असें स्पष्टच म्हटलें आहे की, संस्थानें संयुक्त संघांत येवोत वा न येवोत सरकारने ब्रिटिश हिंदुस्थानचें फेडरेशन करण्याला दिरंगाई करूं नये. मध्यवर्ती सत्तेमध्ये योग्य संरक्षण देऊन जबाबदारी द्यावी. मुस्लिमांना एकतृतीयांश जागा फेडरल असेंब्लींत मिळाव्यात, प्रांतांना स्वायत्तता असावी.

पुढे १९३७ मध्येहि हिंदुस्थानाचे विच्छेदीकरणाचा विचार लीगपुढे नव्हता. त्यांत एक ठराव पुढील अर्थाचा पासहि झाला.

' मुस्लिम लीगचें ध्येय व हेतू स्वतंत्र लोकसत्तात्मक अशा प्रांतांचें ' संयुक्त ' व स्वतंत्र राष्ट्र स्थापन करणें हा असून त्यांतील घटनेंत मुस्लिम व इतर अल्पसंख्याकांचें योग्य व परिणामकारक रीतीने संरक्षण करणें हें धोरण राहील.'

## आणि आजचे जिना

आणि आज तेच जिना पाकिस्तान मागत आहेत. हिंदुस्थानांतर्गत स्वतंत्र राष्ट्र त्यांना पाहिजे. त्यांत त्यांचें स्वतंत्र सैन्य, परराष्ट्रांशी स्वतंत्र तह करण्याचा हक्क त्यांना पाहिजे ! स. १९३७ सालीं मुसलमानांना विभक्तीकरण नको होतें मग आजच त्यांना तें कां हवें ? माझी त्याबद्दल कल्पना अशी:–

हिटलरने प्रथम मागणी केली सुडेटन जर्मनीला परत मिळावा. ही ब्रिटिशांनी मान्य केली व सुडेटन रक्तपात न होतांच जर्मनींत समाविष्ट झाला. याला कोणी युरोपियन मुत्सद्दी दरवडा म्हणतात ! जिनांच्या डोळ्यासमोर हा दाखला होता, व त्यांनी तोच डाव खेळण्यास सुरुवात केली. मुसलमानांना वाईट वागवणूक मिळते, त्यांचा धर्म, संस्कृति धोक्यांत आहे अशी ओरड त्यांनी सुरू केली.

काँग्रेस मंत्रिमंडळें स्थापन झालीं व त्यांनी संयुक्त मंत्रिमंडळें बनविण्याचें नाकारतांच मुसलमान जास्तच क्षुब्ध झाले. काँग्रेस मंत्र्यांनी राजीनामे देतांच लीगवाल्यांनी ' सुटलों आता ' म्हणून निःश्वास टाकल्याचें माहीत आहे. त्यांनी मुक्तिदिन साजरा केला. जणूं काय दास्यशृंखलेंतूनच ते सुटले ! पाकिस्तानच्या मागणीला कांग्रेस कदाचित् जबाबदार नसेल; परंतु गोष्टी कशा घडल्या तें वर सांगितलें. त्यावरून तसा ग्रह होणें अपरिहार्य आहे. जिना आज हिटलर झाले आहेत व आपण त्या अत्याचाराला वेळींच आळा न घातला तर त्यांचा हेतु साध्यहि होईल ! स. १९२८ सालांतील त्यांचे १४ मुद्दे व १९३८ सालांतील ११ मुद्दे पाहिले तर त्यांत पाकिस्तान नाही हें ध्यानीं येईल.

## खोटी ओरड

मनूच्या माशाप्रमाणे पुढे मात्र ही कल्पना वाढीस लागली. हिंदुस्थानांत स्वतंत्र मुस्लिम राज्य ही कल्पनाच न टिकणारी आहे, कारण ते अल्पसंख्य असतांहि त्यांना राष्ट्रीय जीवनाचे सर्व ते लाभ पुरे मिळाले आहेत, व तेहि त्यांच्या संख्येपेक्षा जास्त. धर्मस्वातंत्र्य, उत्सवसमारंभ, भाषा, व्यक्तिगत

कायदे, शिक्षण, संस्कृति या सर्व बाबतींत त्यांना इतरांपेक्षा अधिक स्वातंत्र्य मिळालें आहे. सरकार तर त्यांचें पक्षपाती आहे व लष्करांतहि तेंच दिसतें.

बहुसंख्य मुस्लिम प्रांतांत त्यांचीं मंत्रिमंडळें असल्याने त्याचा पुरा फायदा ते घेतातच. अशी स्थिति असतां त्यांनी विसंवादी सूर काढण्याला कांही कारण नाही. संयुक्त मंत्रिमंडळें स्थापन झालीं की, आपोआपच धर्म, भाषा, जाति यांना संरक्षण मिळतेंच, त्यामुळे पाकिस्तानची मागणी म्हणजे स्वयंनिर्णयाच्या तत्वाविरुद्ध आहे व ती हिंदुस्थानांतील कोणाहि पक्षाला व खुद्द ब्रिटिश सरकारला मान्य होणार नाहीं.

सर्व पक्षांनी या मागणीचा निषेध केला आहे. सर चिमणलाल सेटलवाड यांनी गांधी-जिना मुलाखतीमुळे भलत्याच अपेक्षा उत्पन्न केल्याबद्दल गांधींची चांगली हजेरी घेतली असून गांधींनी अयोग्य सवलती देऊन स्वयंनिर्णयाची थट्टा केली असे त्यांचे उद्‌गार आहेत. कांग्रेसने सर्व प्रांतांत संयुक्त मंत्रिमंडळें स्थापन केलीं नाहीत म्हणून त्यांनी दोष दिला आहे. अनेक धर्म, पंथ, भाषा, जाती एका देशांत आनंदाने नांदत असल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. इ. स. १९३७ पर्यन्त मुसलमानांची हिंदूविरुद्ध तक्रार नव्हती. तीन चार वर्षांपासून ती सुरू झाली. हिंदुमंत्रिमंडळाने मुसलमानांचा कोठेहि छळ केला नाही इतकेंच नव्हे तर मुसलमानांना जास्त उदारपणाने वागविलें.

## यांतून मार्ग काढा

एकंदरीने मुसलमानांच्या पाकिस्तानमागणीला सबळ असें एकहि कारण नाही. ब्रिटिश सरकारला ह्या पाकिस्तानचा बुडबुडा केव्हाच फोडतां आला असता; परंतु त्यांना देशांतील दुहीवर राज्य करावयाचें आहे. हिंदु-मुस्लीम ऐक्य, पाकिस्तान, घटना समिति यासाठी सरकारने वाट न पाहतां प्रस्तुत राज्यकारभार राष्ट्रीय वळणाचा करावा. चालू कायद्यांत थोडा फार फेर केल्यास ही गोष्ट सहज करतां येईल.

" टाईम्स ऑफ इंडिया"लाहि ही गोष्ट संमत आहे. महायुद्ध चालू असेपर्यंत मूलग्राही बदल करतां येणार नाहीत हें सत्य आहे. परंतु तेवढ्या-

साठी सरकारने अडून न बसतां सरकारला स्वराज्य देण्याची खरीखुरी इच्छा आहे, असें लोकांना पटविण्याइतका फरक आजहि करतां येणें शक्य आहे.

यासाठी कांग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य मुक्त करावे, त्यांच्यावर अनायासेंच ही जबाबदारी पडेल. आगामी बारा महिन्यांत प्रांतिक व वरिष्ठ कायदे मंडळांच्या निवडणुकी करण्यास माझ्या मतें हरकत नसावी. त्यामुळें घटना समिति निर्माण होणें सुलभ होईल. अपक्ष परिषद ठीक आहे; पण तीपासून कांही निर्माण होण्याची आशा वाटत नाही. कांही करावयाचेंच असल्यास प्रारंभ सरकारने करावयास पाहिजे.

---

# १६. दक्षिणी संस्थानांचा संघ?

( केसरी २४ सप्टेंबर १९४६ )

दक्षिणी संस्थानांचा संघ करण्याची कल्पना चर्चिली जात आहे. त्याबाबत श्री. न. चि. केळकर यांचा पुढील लेख मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाही. त्यांचें सूत्र हें आहे की " पूर्ण प्रजा-स्वराज्य व संघनिर्मिति एकाच कलमांत घालून त्या प्रजेपुढे ठेवल्या तर विरोध टळेल. उलट संघ रोख व पूर्ण स्वराज्य मात्र उधार असा डाव असेल तर तो हुकेल."

## दान न होईल तर नाश !

एका सुभाषितकाराने द्रव्याविषयी (पैसा धन) म्हटलें आहे की--

दानं भोगो नाशः तिस्रो गतयो भवन्ति वित्तस्य । यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥ ( दान, उपभोग व नाश या तीन रीतींनी द्रव्याचा व्यय होतो. पैकी दान ही सात्त्विक गति. भोग ही राजस गति. नाश ही तामस गति. जो स्वतः उपभोग घेत नाही व उपभोगल्यावरहि दान देत

नाही त्याच्या द्रव्याचा नाश होणारच. ) संस्थानी राजसत्तारूपी द्रव्याला हें सुभाषित लावलें असतां काय दिसतें? संस्थानिकांनी राजसत्तेचा व राजमत्तेचा भोग आज शेंकडो वर्षे घेतला. आता खरोखर दानाची वेळ आली आहे. पण तें न होईल तर मात्र नाश ठेवलेलाच आहे.

भावी काळांत संस्थानांच्याहि अशाच तीन गति संभवतात--१. हिंदी राज्यांत स्वतंत्रपणें एकटें टिकून राहणें. २. संघ करून आहे तसें पण लहानाचें मोठें होऊन राहणें. ३. हिंदीराज्यघटनेंत एकदम आजच विलीन होऊन 'नामशेष'होणें. ( वस्तुत: 'नाम ' हि 'शेष' न उरणें ). पैकी क्रमांक एकची राजस गति त्याच संस्थानांना लाभेल की जीं जवळ जवळ एखाद्या प्रांताइतकीं मोठीं आहेत. क्रमांक दोनची सात्त्विक गति प्रथम प्राप्त झाली तरी ती परिणामीं फार दूर काळीं टिकणारी नाही. कारण संघ करण्यासारखीं निकटवर्ती संस्थानें जरी कांही आहेत, तरी त्यांचा संघ अगदी मोठ्यांत मोठा झाला असताहि तो एखाद्या प्रांताएवढा होणें शक्य नाहीं. आणि क्रमांक तीनची तामस गति मात्र सर्वांत सोपी--भाषेच्या दृष्टीनें जो प्रांत संस्थानाला लागून असेल, त्यांत चट्दिशी विलीन होऊन जाणें. दक्षिणी संस्थानी प्रजापक्षांतील एक पक्ष असें म्हणणारा निघालाच आहे की, दक्षिणी संस्थानें सर्व आजच्या आजच हिंदी राष्ट्रराज्यांत विलीन होऊन जावींत. मधली संघाची पायरी तरी पाय ठेवून कशाला चढावी? जगांतील राजशासित राज्यांचा इतिहास पाहिला तर तो या पक्षाच्या विचारसरणीला अनुकूल आहे. हिंदुस्थान सोडलें तर आज सर्व जगांत 'राजशासित ' अशीं राज्यें आठ दहांहून अधिक नाहीत. सन १८४६ त ( एक अमेरिका सोडून ) जगांतले सर्व देश राजशासितच होते. असें असतां एका शतकांत एवढी प्रचंड क्रांति घडली ! हिंदुस्थानांतहि असेंच कां होऊं नये असें विचारल्यास त्याला उत्तर देणें कठिण आहे.

## एक गंडांतर

परंतु लहान संस्थानांना अजून पळवाट ही आहे की जोंपर्यंत हैद्राबाद' म्हैसूर, ग्वाल्हेर, काश्मीर, त्रावणकोर इत्यादि मोठीं संस्थानें हिंदी राष्ट्रीय

सरकार टिकूं देईल, तोंपर्यंत धाकट्या संस्थानांना ' आम्हालाहि टिकूं द्या ' असें म्हणण्याचा तात्त्विक हक्क सांगतां येतो. वर सांगितलेलीं, सर्व संस्थानें तरी एका प्रांताएवढीं मोठीं कोठे भरतात ? लहान संस्थानांवर ' तुम्ही लहान आहांत ' एवढा फार तर आक्षेप घेतां येईल. पण ' तुम्ही संस्थानें आहांत ' हा आक्षेप घेतां येणार नाही. आणि ' तुम्ही लहान आहां ' या आक्षेपाला असें उत्तर देतां येईल की, ' आम्ही संघ करून मोठा आकार धरूं मग तुमची काय हरकत ' ? मात्र वरील मोठ्या संस्थानांनाहि गंडांतर नाही असें नाही. कारण लवकरच जेव्हा भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाला हिंदी राष्ट्रीय सरकार हात घालील, तेव्हा या संस्थानांतून बहुधा जबाबदार राज्य-पद्धति सुरू झालेली नसेल. मग पूर्ण स्वराज्य न भोगणारी संस्थानी प्रजा आपलीं संस्थानें टिकवावीं किंवा बुडवावीं या प्रश्नाचें उत्तर द्यायचें तें देईल आणि स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर त्या प्रश्नाचा निकाल लागेल. परंतु मोठ्या संस्थानांना पुढे येणारें गंडांतर लहान संस्थानांवर आजच आहे. आणि त्यांतून त्यांना वांचावयाचें असेल तर त्यांनी संघ बनवून मोठा आकार धारण केला पाहिजे; आणि त्या संघांत जबाबदारीचें स्वराज्य प्रस्थापित केलें पाहिजे.

## संघराज्याबरोबरच प्रजास्वातंत्र्य

हल्लीं दक्षिणी संस्थानिकांनी संघाची कल्पना स्वीकारली आहे—म्हणजे संघ करण्यांत राजसत्तेचा जितका त्याग व्यक्तिशः करावयास पाहिजे तितक्याला ते तयार झाले आहेत. पण पूर्ण जबाबदारीचें राज्य प्रजेला देण्याला ते तितकेसे तयार नाहीत. त्यांचा अंतर्गत सूक्ष्म विचार असा दिसतो की संघांत दहा संस्थानें एक होतील, पण दहा राजांत तरी आपण एक राजा म्हणून राजसत्ता चालवूंच. संपूर्ण जबाबदारीचें पूर्ण स्वराज्य म्हणजे मात्र आपली सर्व राजसत्ता नष्ट होते. पण दहांत एक म्हणून बसून व्यक्ति सत्ता-लोपाला तयार होणाराने स्वतःच्या प्रजेलाच ती सत्ता कां देऊन टाकूं नये? शिवाय त्यांनी हें लक्षांत ठेवावे की, प्रजेला पूर्ण स्वराज्य दिल्याशिवाय जर त्यांनी नुसता संघ बनविला तर प्रजापक्ष त्याकडे साशंक वृत्तीनेच पाहणार. शंका ही की, संस्थानिक संघ करणार तो स्वतः बलसंपन्न होण्याकरिता कर-

णार ! आधी संघ करूं व मग पूर्ण स्वराज्य देऊं, या म्हणण्यांत प्रजेला कपट दिसतें. म्हणून मला वाटतें की, संघराज्याची जी योजना तयार होईल तींतच संपूर्ण प्रजास्वातंत्र्याचें स्पष्ट कलम घालावें, व दोन्ही एकदमच प्रकट करावीं.

हल्ली संघराज्य कल्पनेचे चालक दोन प्रकारच्या हालचाली करीत आहेत. ज्यांना संघराज्यांत सामील होऊन व्यक्तिगत राजसत्ता गमवायला नको ते संस्थानिक संघकल्पनेविषयी लोकमत अजमावण्याचा वहाणा करतात ! कारण त्यांना माहीत आहे की, विशिष्ट लोकमत हें संघाला विरोधी आहे. दुसरें कांही संस्थानिक लोकमताच्या या प्रतिकूलतेवर इलाज म्हणून कांग्रेस पुढाऱ्यांना कौल लावून उत्तरें आणवितात. कारण या पुढाऱ्यांनी अद्यापि तरी विलीनीकरणाचा ( मर्जरचा ) आग्रह स्वीकारला नाही. पण लक्षांत ठेवावें की, जें लोकमत संघाला विरोध करतें तें विलीनीकरण ( मर्जर ) व्हावें म्हणणारें आहे ! मग तें पत्करतां काय ? दुसरे पक्षीं विलीनीकरण न झालें तरी चालेल अशी सवलत देणारे कांग्रेस पुढारीहि प्रजेला जबाबदारीचें पूर्ण स्वराज्य द्या म्हणणारेच आहेत. त्याचें काय करावयाचें ? याचा अर्थ, प्रजेला पूर्ण स्वराज्य न देतां संघाला मात्र अनुकूलता मिळवावी असा कावा साधण्याचा जर कपटी विचार कोणा संस्थानिकाच्या मनांत असेल तर तो साधणार नाही. याच्या उलट पूर्ण प्रजा–स्वराज्य व संघनिर्मिति या दोनहि इष्ट गोष्टी एकाच कलमांत घालून त्या प्रजेपुढे ठेवल्या जातील तर मात्र संघयोजनेला होणारा पुष्कळसा विरोध टळेल. उलट संघ रोख व पूर्ण स्वराज्य मात्र उधार असा डाव असेल तर तो हुकेल.

## आत्मविश्वास धरावा

स्वतः मी संघयोजनेला इतक्याचकरितां अनुकूल आहे की, तो झाल्यास एका बाजूने मितव्यय व दुसऱ्या बाजूने सुराज्य व्यवस्था व सुधारणा दोनहि साधणें शक्य आहे. संपूर्ण स्वराज्यदान हें केव्हांहि अपरिहार्यच आहे. पण असें संपूर्ण स्वराज्य भोगणाऱ्याहि पण लहानसान तुटक संस्थानांपेक्षां त्यांचा संघ हा अधिक कार्यक्षम होईल. शिवाय मला असेंहि

वाटतें की, संघ कल्पनेच्या चालकांनी कॉंग्रेस श्रेष्ठींकडे पायपिटी न करतां आत्मविश्वासावर प्रारंभच करावा. तो करण्यास सर्व संस्थानें आंत आलीं पाहिजेत अशी अट मनाशीं घालूं नये. परवा झूरिच येथें चर्चिलनें युरोपांतील राष्ट्रसंघाची कल्पना बोलून दाखविली ती द. म. संस्थानांच्या संघासारखीच कांही अंशीं आहे. आणि तिकडेहि सर्वांचें एकमत होण्याची अडचण लक्षांत घेऊन चर्चिलनें सांगितलें तें असें--

He then made his plea for a United States of Europe. "If, at first, all the States of Europe are not willing or able to join the union, we must never hesitate to proceed to assemble and combine those who will and those who can." he declared.

मात्र जबाबदारीचें स्वराज्य देणें ही पहिली अट हो !

कांही संस्थानिक मनाची भोळी समजूत करून घेतात कीं, Declaration of Responsible Government झालें म्हणजे पुरे. पण ती चूक आहे. आता Declaration नें भागणार नाही. Actual establishment च हवें. संपूर्ण स्वराज्यदानाचा हेतु बोलून अनेक वेळां झाला, आतां प्रत्यक्ष कृति पाहिजे.

---

# १७. कोण कुणाला जुलमानें बाटवितो ?

( केसरी १५ नोव्हेंबर १९४६ )

गेल्या सोमवारच्या 'टाईम्स ऑफ इंडिया'पत्रांतील अग्रलेखकाने मोठ्या सफाईने एक विधान ठोकून दिलें आहे तें असें–"आज अनेक वर्षांनी एक गोष्ट हिंदुस्थानांत पुनः घडत आहे. ती ही की, एका धर्माच्या लोकांनी दुसऱ्या धर्माच्या लोकांना जुलमाने बाटविणें. या कार्यक्रमाला पहिला मान. आणि खुनाला दुसरा मान!" लिहिणाराचा झोक असा की, चालू अत्याचार परंपरेंत मुसलमानांनी हिंदूंना व हिंदूंनीं मुसलमानांना जुलूम–जबर-

दस्तीने धर्मांतर करावयास लावलें आहे. व त्यानंतर व त्यामुळे खून होत आहेत. हें विधान सर्वस्वी निराधार आहे. निदान हिंदुसमाजापुरतें तरी तें निराधार आहे. हिंदुस्थानच्या अद्ययावत् इतिहासांत हिंदूंनी मुसलमानांना जबरदस्तीने धर्मांतर करावयास लावलें असें कोठेंहि घडल्याचें उदाहरण दाखवितां येणार नाही. दाखवितां येतील तीं सर्व उदाहरणें उलट बाजूचींच आढळतील! टाईम्सकाराचें बोलणें विपरीत आहे—म्हणजे एका इंग्रजी म्हणीप्रमाणें 'डाव्या पायाचा बूट उजव्या पायावर घालण्यासारखें आहे.' कोण कुणाला जुलुमजबरदस्तीने बाटवितो हें बाराशे वर्षांचा जगाचा इतिहास कोणालाहि सांगेल! तथापि टाईम्सकाराचा जिव्हाळा नेहमीच मुसलमानांच्या बाजूला असल्याने, त्याचें ज्ञान काय किंवा अज्ञान काय, दोन्हीहि हिंदूंच्याविरुद्ध मुसलमानांच्या बाजूनेच ताजव्यांत पडावयाचीं हें ठरलेलेंच आहे. मी असें ऐकलें आहे की, 'टाईम्स ऑफ इंडिया' हें पत्र हिंदु कोटचाधीश कारखानदार डालमिया शेठ, यांनी खरीद केलें आहे. तें खरें काय? किंवा तो खरेदीचा व्यवहार अद्यापि पुरा झालेला नाही?

## धर्मांतराचा प्रश्न

प्रस्तुत प्रकरणीं मला एका गोष्टीची आज आठवण झाली. ती अशी. कांहीं वर्षांपूर्वी पुण्याचे सुप्रसिद्ध नागरिक रँग्लर र. पु. परांजपे यांनी अशी एक सूचना पुढे मांडली होती की, हिंदुस्थानांत यापुढे कोणत्याहि एका धर्मानुयायाचें धर्मांतर कायदेशीर ठरावयास हवें असेल तर धर्मांतर करणाऱ्या स्त्री–पुरुषाने 'मी हें धर्मांतर आपखुषीनें करीत आहे' असें कोणाहि मॅजिस्ट्रेटपुढे सत्य–प्रतिज्ञापूर्वक लिहून द्यावें. माझ्या मतें हिंदुसमाज या सूचनेस सर्वस्वी अनुकूलता दर्शवील. मुसलमानांनी या सूचनेला मान्यता दिली तर हा वादग्रस्त प्रश्न पुष्कळसा निकालांत निघेल. पण त्यांनी तशी कबुली न दिली तर कोण कुणाचें धर्मांतर जबरदस्तीनेहि करूं म्हणतो हें उघडच दिसून येईल. नुकतेच मुस्लीमलीगचे एक प्रमुख पुढारी गझनफर अलीखान यांनी असें उघड बोलून दाखविलें की, 'हिंदुस्थानांतील ४० कोट लोक मुसलमान झाले पाहिजेत.' अल्ली बंधूंनीहि एकदा स्वतः महात्मा गांधींना धर्मांतर करण्याविषयी अगदी 'प्रेमळ बंधुभावा'नें खडा टाकून पाहिला होता म्हण-

तात! आज ता. १३ नोव्हेंबरच्याच वर्तमानपत्रांत, स्वतः गांधीजींनी पूर्व बंगाल्यांतील हिंदु स्त्रियांची जी करुण कहाणी निवेदन केलेली वाचकांनी वाचली असेल तिजवरून त्या भागांत जुलुमजबरदस्तीने धर्मांतर कसें झालें हें दिसून येतच आहे.

## लीगचा ठराव मागे घ्या

शेवटी एक प्रश्न प्रत्येक विचारी मनुष्याला स्वतःच्या मनाला विचारावासा आज वाटतो. तो हा की, मुस्लीमलीगने प्रवर्तित केलेलें हत्याकांड, अत्याचारकांड, केव्हातरी लवकरच संपणार की असेंच चालू राहणार? चालू राहिलें तर त्याचा बंदोबस्त किंवा निःपात करण्याला पोलीस किंवा लष्करी सैन्य कधीहि पुरें पडणार नाही. उलट या हत्याकांडांत जो कोणी कोणता अत्याचार करतो तो स्वतंत्रपणें मूळची कुरापत काढण्याकरिता करतो की इथला बदला तिथे घेण्याच्या म्हणजे सूड उगविण्याच्या भावनेने करतो? या प्रश्नालाहि फारसें महत्त्व नाही. वाईट वाटतें तें हें की या हत्याकांडांत जे लोक बळी पडतात ते प्रायः स्वतः निरपराधी असतात! आक्रमणांतील प्रतिकारांत थोडें अधिक उणें घडलें तर त्याचें तितकेसें वाटत नाही. कायदाहि त्याचें समर्थन करूं शकतो. पण निरपराधी मनुष्य मरावा हें ईश्वराघरीं केव्हांहि रुजू होणारें नाहीं. आणि मुसलमान पक्षाच्या पुढाऱ्यांच्या समजुतीने हें प्रकरण मिटावयाचें नसेल, तर शेवटी हिंदूंना हें म्हणावें लागेल की "खुनाचा बदला खुनानेच घ्यावयाचा या व्यावहारिक पण तामस नीतीनेच हें हत्याकांड चालू रहावें अशीच ईश्वराची इच्छा असेल तर, हिंदुसमाजाची संख्या मुसलमानांपेक्षा तिप्पट तरी आहे या गणिताने मनाचें समाधान करतां येईल." हिंदु हा आपण होऊन कुरापत काढीत नाही. परंतु तोहि दुसऱ्याच्या आगळिकीने चेतला जाऊं शकतो हें बिहारांत घडणाऱ्या गोष्टीवरून दिसून येतें. म्हणून हत्येच्या रूपाने सुरू केलेली मुस्लिम लीगची 'प्रत्यक्ष कृती'ची (डायरेक्ट ॲक्शनची) चळवळ जनाब जिना यांनी आतां पुढे येऊन थांबवावी हेंच श्रेयस्कर ठरेल.

---

# १८. महाराष्ट्र प्रांतिक हिंदु परिषद, बार्शी

( केसरी १७ डिसेंबर १९४६ )

[ सदर परिषदेंत श्री. न. चि. केळकर यांचें पुढील भाषण वाचून दाखविण्यांत आलें. ]

हिंदु समाजांतील सर्व लोकांनी ठिकठिकाणीं एकत्र जमून गंभीर मनोवृत्तीने अंगीं असेल तें सर्व शहाणपण खर्चून, विचारविनिमय, युक्तिवाद, पण त्याहिपेक्षां निश्चितार्थाचा निर्णय आणि संघशक्ति एकवटून कार्य करण्याची वेळ आली आहे. कारण भोजनाच्या कार्यास प्रारंभ करण्याकरिता पहिला घांस घेण्याच्या ऐनवेळीं पंक्तींत कोणी एखादें प्रेत आणून ठेवावें त्याप्रमाणे मुस्लिम लीगने म्हणजे आपल्यांतल्याच कांहीं लोकांनी, स्वराज्य व स्वातंत्र्य यांच्या भोजनाचा पहिला घांस घेण्याच्यावेळीं पाकिस्तानाचा म्हणजे सवत्या सुभ्याचा प्रश्न उत्पन्न केला आहे! पण केवळ पाकिस्तान शक्य की अशक्य, योग्य की अयोग्य, द्यावें की देऊं नये असला केवळ तात्त्विक स्वरूपाचा तो प्रश्न असता तर त्याची चर्चा व निर्णय करण्यास घटना-परिषदेसारखें स्थान होतेंच; परंतु सामोपचाराची भाषा सोडून देऊन, हा प्रश्न केवळ दंडेलीने आपल्या मनासारखा सोडवून घेण्याची इच्छा व उमेद धरून आमच्या कांही मुसलमान बांधवांनी प्रत्यक्ष हत्याकांडच नव्हे तर इतर सर्व आसुरी उपाय अवलंबून प्रखर तीक्ष्ण चळवळ सुरू केली आहे. यामुळें हिंदुमात्राचें मन तात्त्विक चर्चेवरून उडून आत्मसंरक्षक कृतीकडे वळलें आहे आणि हिंदुस्थानचें राजकीय भवितव्य कांहीहि असो, परंतु हिंदु समाजावर आज अन्यायमूलक असे घातक हल्ले होत आहेत, ते कसे थांबवावे आणि ते मुळांत थांबविण्याचें आपल्या हातीं नसल्याने निदान त्यांचा प्रतिकार कसा करावा याचा पूर्ण विचार करून, हिंदु लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न अवश्य झाला पाहिजे.

## कांग्रेसची बदललेली मनोभूमिका

सुदैवाने एका विशेष गोष्टींत पूर्वीची स्थिति किंचित् कांही बदलली आहे याचा आनंद वाटतो. ती गोष्ट म्हणजे राजकारणांत पुढारीपण मिळविलेल्या कांग्रेस-पुढाऱ्यांची मनोभूमिका. ही मनोभूमिका १९२० पासून १९४० पर्यंत बहुतांशीं मुसलमान-पक्षपाती होती. 'तुम्ही आम्ही एक झाल्याशिवाय इंग्रजांच्या हातून राज्य घेणे आम्हांला शक्य नाही; तरी या ऐक्याकरितां वाटेल ती किंमत मागा, ती आम्ही देण्यास तयार आहों' अशा शब्दांनी त्यांचीं आर्जवें चालविलीं. अल्लीबंधूंचें प्रस्थ माजविलें, खिलाफतीची चळवळ उचलून धरली; पुढे कम्युनल अॅवॉर्ड, मुसलमानांच्या जादा मागण्या, जनाब जिनांच्या पॉइण्ट्सची वाढती संख्या; शेवटीं पाकिस्तान आलें. याविषयी बोलतांना होय, नाही यापैकी कांहीच निश्चित न बोलतां कानावर हात ठेवणें, आणि शेवटी पाकिस्तानची मागणी साकार व उघड पुढे आल्यावरहि बराच काळपर्यंत तिला प्रतिकार न करणें इत्यादि चुकांची परंपरा कांग्रेस-पुढाऱ्यांनी केलेली आठवली की, तोंडांतून काय शब्द काढावेत हें कळेनासें होतें; पण एवढे निश्चित म्हणावेंसें वाटतें की, पूर्वी मुसलमानांना पक्षपात दाखवून त्यांच्या गळयांत मिठी मारून त्यांची हांजी हांजी करून, त्यांना शेफारून ठेवण्याच्या पापाचेंच प्रायश्चित्त आज कांग्रेस पुढारी भोगीत आहेत.

## आमचें धोरणच बरोबर

आता निर्वाणपदावर उभे राहिल्यावर का होईना, मुसलमान व त्यांच्याशी वागण्याचें योग्य तें धोरण याविषयी एक गांधीजी सोडून दिले तर बाकीच्या बहुतेक कांग्रेस-पुढाऱ्यांच्या तोंडून योग्य तीच भाषा निघू लागली आहे. पंडित नेहरू यांची आणि विशेषतः सरदार वल्लभभाई यांचीं ताजीं भाषणें वाचलीं म्हणजे त्यांच्या-आमच्यांत आता, म्हणजे या क्षणापुरता तरी, फारसा भेद राहिलेला नाही हें प्रांजलपणाने कबूल करावें लागतें. हिंदुसभावादी लोकांना हें समाधान निश्चित वाटावें की, जरी निवडणुकीच्या मोहिमेंत आपणाला सरसकट अपयश आलें तरी सन

१९२०-२१ पासून आपण जें राजकीय व मुसलमानविषयक धोरण एकसारखें प्रतिपादीत आलों तें आता बरोबर ठरलें. मग कांग्रेस-पुढारी आपल्या तोंडाने तसें कबूल न का करीनात !

आज हिंदुमहासभेपुढे खरा प्रश्न आहे तो पाकिस्तान मिळविण्याच्या उद्देशाने मुसलमानांनी चालविलेल्या अत्याचारी चळवळीला हिंदु समाजाने यशस्वीपणे तोंड देणें हा होय. याहिविषयी कांग्रेसचें धोरण निदान सरदार पटेल यांनीं बोलून दाखविलें तें, आणि हिंदुमहासभेचें धोरण हीं दोन्ही एकच आहेत. गांधीजींची लाज राखण्याकरिता अहिंसेनेच स्वराज्य मिळेल हें पालुपद कांग्रेस-पुढारी मधून मधून गात राहोत; परंतु त्या पालुपदाचें गायन केवळ औपचारिक आहे; त्याने निभाव लागणार नाही हें आता सर्वांना कळून चुकलें आहे. मुसलमान समाजाला व लीगला हिंदूंनी हें स्पष्ट सांगितलें पाहिजे की, हिंदुस्थान हें अविभाज्य राहील. पाकिस्तान मिळणार नाही. प्रांतानिहाय कारभारांत कितीहि स्वतंत्रता कोणी मागितली व दिली तरी मध्यवर्ती म्हणून एक सत्ता राहिली पाहिजे, व ती प्रबल आणि सर्वंकष अशी राहिली पाहिजे.

## हिंदुसभा थांबणार नाही

ब्रिटिशांकडून स्वराज्य हस्तगत करण्याचे कामीं इतरांकडून बिनशर्त साहाय्य मिळेल तर हिंदु समाज तें आनंदाने स्वीकारील; परंतु दुसरे कोणी आपणाबरोबर येत नाहीत म्हणून आपला लढा ते थांबविणार नाहीत आणि दुसरे कोणी या मार्गांत व्यत्यय आणू पाहतील तर त्यांनाहि हाताने दूर सारून हिंदुसमाज स्वराज्यप्राप्तीच्या मार्गावरील आपलें पाऊल पुढे चालू ठेवील. अल्पसंख्य मुसलमानांना हिंदुस्थानाबाहेर सहानुभूति व साहाय्य मिळू शकेल तसें साहाय्य हिंदूंना हिंदुस्थानाबाहेर कोठेहि मिळणें शक्य नाही. म्हणून हिंदुसमाजाने हरप्रयत्नाने एकजीव होऊन आपली शक्ति आपल्यांतच वाढविली व कमावली पाहिजे. एक मनुष्य तिघांना भिवविण्यापेक्षा शेवटीं तीन माणसेंच एकाला भिववूं शकतील व त्या अत्याचाराच्या कुमार्गापासून त्याला परतवूं शकतील. हिंदुस्थानांत एका वेळीं

मुसलमान बादशाहीच प्रत्यक्ष अवतरली असतां शेवटीं हिंदूंनी निदान महाराष्ट्रांतील हिंदूंनी तरी आपल्या मानेवरचें तें जोखड काढून टाकलें व माणसाशी माणूस लढू लागला असतां हिंदु हा परदेशीय व अंगपिंडाने प्रबळ अशा मुसलमानाशी यशस्वीपणें लढू शकला, ही इतिहासाची साक्ष हिंदु समाजाच्या बाजूची आहे व ती त्याला आज योग्य तें उत्तेजन देऊ शकेल.

सदुपदेशाने मुसलमानांना सुविचार सुचला तर ती गोष्ट प्रथम करावी; पण ती त्यांना न पटली तर आत्मतेज व आत्मसामर्थ्य यांवर आधारून हिंदुसमाजाने प्रसंगप्राप्त अशा सर्व उपायांनी आत्मरक्षण केलें पाहिजे. आत्मरक्षणापलीकडे जाऊन मुसलमान अल्पसंख्य म्हणून त्यांना दास्यांत ठेवणें हें धोरण पूर्वी कधी हिंदुसमाजाने स्वीकारलें नाही व यापुढेहि तो तें स्वीकारणार नाही; परंतु आत्मरक्षणहि न सुचेल इतका नादानहि तो झाला नाही.

---

# १९. लहरी ऐतिहासिक घटना

(सह्याद्रि जुलै १९४६)

History is a science–no less but no more!

इतिहास हें केवळ शास्त्र आहे; पण त्याहून कांहीच अधिक नाही. आणि खरें शास्त्र म्हटलें म्हणजे तें असें की, त्याचा प्रत्यक्ष व्यवहाराला कांहीच उपयोग होऊ नये! शास्त्राचा निरुपयोगीपणा हाच त्याचा खरा अभिमानास्पद गुण मानला जावा हें दिसण्यांत चमत्कारिक नव्हे काय? पण कांही तत्त्वज्ञ चिकित्सक तसें मानतात खरें. उदा० केंब्रिज विद्यापीठ हें गणितशास्त्राचें माहेरघर आहे. अर्थात या विद्यापीठांतील लोकांना त्या शास्त्राचा विशेष अभिमान असला पाहिजे व आहेहि. पण प्रत्येक वर्षी एका ठराविक दिवशीं या विद्यापीठाची एक खास मेजवानी होते तेव्हा मद्यचषक तोंडाला लावून गणितशास्त्राविषयी ठराविक शब्दांनी ते

लोक एक वरदान मागतात म्हणे! ते शब्द असे–God bless the higher Mathematics, and may they never be of the slightest use to anybody!' (देवा उच्च प्रतीच्या गणितशास्त्रावर तुझी कृपादृष्टि नेहमी असो. पण देवा, एक मागणें आहे की, तें शास्त्र कोणालाहि कोणत्याहि कामीं केव्हाहि उपयोगी पडूं नये असें कर! )

दिसण्यांत किती विपरीत ही प्रार्थना! शिवाय आपण पाहतोंच की, ही प्रार्थना ईश्वराने मानलेलीहि नाही. कारण ज्या सुखसोयींनी मनुष्य–जीवन समृद्ध झालें आहे त्या निर्माण करणाऱ्या शास्त्रप्रक्रियांमध्ये या वरिष्ठ श्रेणीच्या गणितशास्त्राचा अत्यंत उपयोग झालेला आहे. पण वरील विक्षिप्त प्रार्थनेंत एक कुशल मर्म आहे तें हेंच कीं, खरी शास्त्राची उपासना तीच व तेव्हाच होऊं शकते की, जींत उपासकाचा व्यक्तिस्वार्थ सुटलेला असतो. आपणां सामान्य माणसांना कशाची कोणाचीहि निःस्वार्थी उपासना किंवा भक्ति माहीतच असत नाही म्हणाना! अपत्यप्रेम हें सर्वांत निःस्वार्थी असावेंना! पण किती आईबापांच्या मनांत ही कल्पना नसते की, म्हातारपणीं आपल्या मुलांमुलींनी तांब्याभर पाणी आपणाला उचलून द्यावें? ओश्वराला तर 'तो सर्वस्वी दिल्याघेतल्याचा' असें मानूनच आपण वागवितों नव्हे का ?

देवाला नवस करणें हें त्या देवघेवी भावनेचें हास्यास्पद उदाहरण आपण रोज घरोघर पाहतों. फरक अितकाच की, सात्त्विक उपासक मुक्ति हा ईश्वरभक्तीचा मोबदला मागत असला, तर वेदांतील राजस उपासक दुभत्या गाओ व पिकाऊ शेतें मागतो; आणि 'माझ्या शत्रूचा नाश होवो' असलें तामस वरदान मागणारे उपासकहि असतातच. पण केंब्रिजच्या विद्यापीठांतील वर सांगितलेल्या वार्षिक वरयाचनेंत 'God bless the higher Mathematics, and (but) may they never be of the slightest use to anybody' असे शब्द आहेत ते भगवद्गीतेंतील खऱ्या निःस्वार्थी भक्तीच्या वर्णनाला धरूनच नाहीत काय?

अितिहासाकडे तत्त्वज्ञान, शास्त्र व कला अशा अनेक दृष्टींनी पाहणारे समंजस असेहि लोक आहेत. पण अितिहासोपासक तत्त्वज्ञानी लोकांचा

स्वार्थ हा की, त्यांतून कांही गहन तत्त्व किंवा प्रमेय हुडकून काढतां आलें तर पाहावें. " अितिहासज्ञानाने मनुष्य शहाणा होतो " हें अशा प्रमेयाचें अेक अुदाहरण होअील. पण अितिहासज्ञानाने मनुष्य शहाणा होतो हा अेक भ्रम आहे ! अितिहासाला शास्त्र मानणारे कांही लोक त्यांतील वृत्ताला कार्यकारणभाव कसून लावतात व त्यापासून भविष्य सांगूं अिच्छितात, पण तेहि सपशेल तोंडघशीं पडतात. मात्र अितिहासाच्या त्याच अुपासकाला कदाचित् अैतिहासिक सत्य हातीं लागण्याचा संभव थोडाफार असतो की, प्रथम कोणताहि फलहेतु मनांत न धरतां केवळ चिकित्सकबुद्धीनें जो अितिहास वाचील.

'We shall be in danger of writing history in order to prove something, and thereby missing that disinterested intellectual curiosity which is the only avenue to truth.' मनांत पूर्वहेतु ठेवून अितिहास वाचणाराला, जें खरोखर 'आकस्मिक' तें 'अवश्य' असा भास होतो. 'अकारण' तें 'सकारण' भासूं लागतें. पण भौतिक शास्त्राने देखील अलीकडे जर नियति ( determinism )चा आग्रह सोडून देअून अनियति (यदृच्छा) मान्य केली आहे, तर अितिहासाच्या अभ्यासकालाहि तेंच धोरण स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. अिंग्रजी भाषेंत दोन शब्द मोठे गमतीचे जमले आहेत खरे. ते शब्द कॉजल ( Causal ) व कॅजुअल ( Casual ) हे होत. या दोन शब्दांत सहा अक्षरें तींच आहेत. फार काय पहिलीं दोन व शेवटचीं दोन अक्षरें तींच व त्याच क्रमाने आहेत. पण मधल्या दोन अक्षरांनी, केवळ आपल्या परिवर्तनाने, प्रचंड अर्थभेद निर्माण केला आहे. us असा क्रम घेतला तर त्याचा अर्थ 'नियत' (कार्यकारणसंबंधाधिष्ठित) असा होतो पण su असा क्रम घेतला तर 'अकारण-आकस्मिक' असा अर्थ होतो.

या शब्दरचनेंत जो लहरीपणा आपणाला दिसून येतो तोच अैतिहासिक घटनेंतहि अनुभवाला येतो. अितिहासांत अमुक अमुक हें असें कां घडलें हें हटकून सांगणें कठीण आहे; आणि हें प्रांजलपणें मान्य केलें तर, अितिहासवाचक व चिकित्सक यांची मान ज्ञानगर्वाने ताठ न होतां अज्ञानाच्या

जाणिवेने खाली विनम्र होईल–झालीच पाहिजे ! कारण कार्यकारणांची सांखळी तपासू गेल्यास मध्येच अशी अेखादी लहानशी अज्ञात गोष्ट घडलेली दिसून येते की, तिजमुळे अैतिहासिक घटना अुलथीच्या पालथी होते.

जॉन बुकॅन नामक ग्रंथकाराने याचीं कांहीं अुदाहरणेंच दिलीं आहेत. फ्रान्समध्ये १७८८ सालीं दुष्काळ पडला तो अतर्कित होता व त्यामुळे म्हणे फ्रेंच राज्यक्रांति घडली ! केमालपाशा अुदयाला येऊन तुर्की राष्ट्राला नवें आयुष्य लाभलें याची कारणपरंपरा अशी––( १ ) १९२२ मध्ये ग्रीक सेनेचा पराभव झाला. ( २ ) हा पराभव कां झाला ? तर अभागी ग्रीक राजा गादीवर आला. ( ३ ) तो गादीवर कां आला ? तर पूर्वीचा राजा अलेक्झांडर अेकाअेकी वारला. ( ४ ) तो अेकाअेकी कां वारला ? तर राजवाड्यांतल्या बागेतलें अेक माकड त्याला चावलें व तें विष त्याला बाधलें. या अभावित घटनेचें वर्णन स्वतः विन्स्टन चर्चिल यानेच असें केलें आहे––‘ त्या मर्कटचेष्टेमुळे अडीच लक्ष लोक (युद्धांत) प्राणाला मुकले.’

अितिहास हा अशा अतर्कित घनटांनी भरलेला असल्यामुळे, कार्यकारणभावाचा ढोबळ नियम बरोबर असला तरी निदान त्याचा बारीक कीस काढणें व त्याची सत्त्वपरीक्षा करणें व्यर्थ होय. ‘ The romantic accident cannot be expelled by mechanical doctrine ’ तत्त्वज्ञान व भौक्तिक शास्त्र यांनी देखील ‘अटळ वाद’ टाकून दिला आहे. तीं कार्यकारणवादाच्या सरळ साखळीने अंतिम काय हें ठरवूं पाहत नाहीत. चालू कामापुरता निर्वाह करून घेतात. ‘ Occasional interposition and the irresistible hand of the great disposer ’ ही गोष्ट तत्त्वज्ञान व भौवितक शास्त्रहि मानतात, अितिहास चिकित्सकानेहि ती गोष्ट मान्य केली पाहिजे.

मग अितिहासाचें काल्पनिक चित्र कसें काढलें असतां तें बरोबर ठरेल? (१) अेखादी स्त्री विणकामाकरिता रेशमाच्या लडीचा गोंधळ बारीक नजरेने, नाजूक हाताने, पण दृढ आत्मविश्वासाने सोडवीत बसली आहे असें चित्र काढलें, तर तें यथार्थ होणार नाही. किंवा अेखादा रसायनशास्त्री प्रयोग-

शाळेंत आपला ताजवा व बाटली घेऊन मिश्रणें करीत बसला आहे, असलें चित्रहि यथार्थ होणार नाही. कारण प्रयोगसिद्धीची खात्री त्या रसायन-शास्त्रज्ञाला असते. पण अितिहासचिकित्सकाचें हें खालील चित्र मात्र यथार्थ ठरेल–(२) कॅलायडॉस्कोप नांवाचा कळसूत्री पट अहेतुकपणें अेक निरागस खेळकर मूल चालवीत बसलें आहे; आणि प्रत्येक चाळच्यावरोबर त्याच त्या रंगीत गोळ्यांचें अेक अकल्पित निराळ्या आकाराचें चित्र निर्माण होत आहे आणि तें मूल त्या घटनांचा लहरीपणा पाहून खदखदा हंसत आहे. घटनेच्या या लहरीपणामुळेच असें म्हणणें समर्थनीय ठरतें की, "अितिहास हा अमुक अेका प्रकारचा घडला असें तुमच्या लिखितांत नमूद असो. पण तो तसा न घडतां दुसऱ्याहि अेका प्रकारचा घडू शकला असताच की!".

अितिहास हा घडलेल्या गोष्टींचाच अेक संग्रह असतो. पण याहून वेगळ्या अशा अेका दुसऱ्या प्रकारच्या गोष्टीहि घडूं शकतात. मात्र त्या प्रत्यक्ष घडलेल्या नसतात, तर घडल्या असें कल्पनेने गृहीत धरलेलें असतें. मग मनाच्या कल्पनेचा हा जुलमी खेळ कां करावयाचा? याचीं कारणें दोन. अेक असें की, जें घडलें तें खरोखर अटळ होतेंच हें मनाला पटत नाही. मन म्हणतें 'घडलें खरें हो! पण तें सरळ संभवनीय नव्हतें. कुणाच्या तरी केवळ लहरीमुळेच तें घडलें.' दुसरें कारण असें की, घडलें तें सरळ संभवनीय वाटलें तरी न्यायाच्या दृष्टीने पाहतां तें तसें घडावयास नको होतें! घडलें तसें घडण्यांत अन्याय झाला असें वाटतें!

या दोनहि कारणांमुळे जो बौद्धिक वा मानसिक असंतोष अुत्पन्न होतो, त्याच्या परिमार्जनाचा अुपाय म्हणून, वर सांगितल्याप्रमाणें, मनुष्य असें करितो की, 'घडलें तसें खरोखर घडलेंच नाही, तर तें वेगळ्या प्रकाराने–घडल्याच्या अगदी अुलटहि–घडलें' अशी कल्पना करतो, आणि तसें बोलून किंवा लिहून दाखवितो. भवितव्यतेवर सूड घेण्याचा तो अेक चांगला अुपाय ठरतो; आणि त्याने मनाचें तरी क्षणभर समाधान होतें. मोटारीचें चाक हातीं असल्यास कळ दाबून तिची गति अुलट्या दिशेला चालू करतां यते. पण हें कालचक्र माणसाच्या हातीं तर नाहीच, पण भवितव्यतेच्या हातीं तरी कुठे आहे? भवितव्यतेला अेकाच दिशेने मोटार हाकतां येते.

अितिहास–घटनेशी सहमत असलेला मनुष्य मोटार चालविण्याचेंच श्रेय अेक प्रकारे मिळवितो. मोटार–हाक्याच्या डाव्या अंगाला बसलेला स्नेही मनाने ड्रायव्हरच्या हाताशी सहकार्य करतोच की नाही ?

पण भवितव्यतेलाहि करतां येत नाही अशी गोष्ट कल्पक मनुष्य आपल्या प्रतिभेने करतो. तें असें कीं जे घडलें नाही तें घडलें अशी कल्पना करतो ! अुदाहरणार्थ नुकत्याच संपलेल्या युद्धासंबंधाने अशाहि कल्पना कां करितां येअू नयेत ? म्हणजे,- डंकर्क बंदरांतून अिंग्लंडने आपलें सर्व सैन्य अिंग्लंडांत परत नेलें, तोच लाग साधून जर्मनीने धडक मारून अिंग्लंडवर स्वारी केली, आणि फ्रान्सप्रमाणे अिंग्लंडची स्थिति झाली ! म्हणजे, कांही काळपर्यंत अिंग्लंड जर्मनीच्या ताब्यांत गेला; मात्र शेवटीं अमेरिकेच्या साहाय्याने बंधमुक्त झाला ! मार्शल पेतॉंप्रमाणेंच चर्चिलची स्थिति होणें अशक्य नव्हतें. १९३९–४० सालीं अिंग्लंडची युद्धाची तयारी किती कोती अपुरी होती हें आता अिंग्रजांनीच आपल्या तोंडाने सांगितलें आहे ! मग "जर्मनीने अिंग्लंड प्रथम हस्तगत केला त्या वेळीं काय झालें वा होणें शक्य होतें" याचा काल्पनिक वृत्तान्त कोणी लिहिला तर मनोरंजक होणार नाही काय ?

आणि खरोखर असलें अेक पुस्तक १९३२ सालीं प्रत्यक्ष लिहिलेलें प्रसिद्ध झालेंहि आहे, या पुस्तकाचें नांव 'If it had happened otherwise' म्हणजे 'प्रत्यक्ष घडलें त्याहून वेगळें घडलें असतें तर !' हें आहे. आणि मौज ही की, हा कल्पनेचा खेळ केवळ पोरखेळ नसून त्यांत अनेक नामवंत व्यक्तींनी लेख लिहिले आहेत.

विन्स्टन चर्चिलने लेख लिहिला आहे त्यांतील विषय असा आहे की, "७० वर्षांपूर्वी अुत्तर अमेरिकेने द. अमेरिकेशी युद्ध करून तें जिंकलें (आणि त्यामुळे अमेरिकन राष्ट्र–युनायटेड स्टेटस्–निर्माण झालें आणि गुलाम संस्था अमेरिकेपुरती नष्ट झाली) तसें न होता, दक्षिण संस्थानांनीच जिंकलें असतें तर काय घडलें असतें ?" या लेखाच्या प्रारंभीं चर्चिल लिहितो, " The quaint conceit of imagining what would have happened if some important or unimportant event had settled itself differently, has become so fashionable

that I am encouraged to enter upon an absurd speculation." आणि मग कल्पनातरंग चालवितां चालवितां त्याने अशा कांही घटना रंगविल्या आहेत की त्या वाचून मौज वाटतेच, पण असेंहि अंतरंगांत वाटतें कीं, खरेंच, असेंहि पण कां न व्हावें ? तें अशक्य कां मानावें ?

तसेंच प्रसिद्ध अितिहास–लेखक फिशर याने अशी कल्पना करून लिहिलें आहे की, "१८१४ सालीं नेपोलियनचा वॉटर्लू येथे पराभव झाला खरा, पण त्यानंतर तो अिंग्रजांच्या हातीं न लागतां अेखाद्या अमेरिकन बोटीवर चढून त्या वेळच्या त्या मित्र राष्ट्राच्या साहाय्याने अमेरिकेंत गेला असता, तर त्याचें पुढील जीवनचरित्र कसें घडलें असतें ? " आर्नोल्ड मावरिस याने अशी कल्पना केली आहे की, "फ्रान्सचा राजा सोळावा लुअी हा जर किंचित स्वतंत्र व खंबीर बुद्धीचा असता व बायकोचें न अैकतां आपल्याच मनाप्रमाणे तो वागता, तर फ्रान्समधील सुप्रसिद्ध राज्यक्रांति झाली नसती ! आणि ही राज्यक्रांतीच झाली नसती तर नेपोलियनचा अितिहासहि घडला नसता, आणि जगाचा अितिहास कांही वेगळा झाला असता." एमिल लडविग या विख्यात लेखकाने अशी कल्पना करून लिहिलें आहे की, "माजी कायसर विल्यमचा बाप राजपुत्र फ्रेडरिक हा आपला बादशहा पहिला विल्यम याच्या मरणानंतर अवघ्या सहा महिन्यांत कॅन्सरच्या विकाराने मेला नसता तर अविचारी इंग्लंडद्वेषी कायसर विल्यम हा गादीवर न बसता, आणि मग १९१४ चें महायुद्ध झालें नसतें." अशाच रीतीने "१९३० मधील इंग्लंडांतील सर्ववर्गीय संप फसला नसता, साधला असता, तर काय झालें असतें? " "लॉर्ड बायरन १९ व्या शतकाच्या प्रारंभीं ग्रीसचा राजा झाला असता तर काय झालें असतें? " "अमेरिकेंतील यादवी युद्ध जिंकणारा आब्राहाम लिंकन हा नाटकगृहांत मारेकऱ्याच्या गोळीला बळी पडला, तसें न घडतां गोळीचा नेम चुकला असता तर काय झालें असतें?" अशा अनेक कल्पना करून प्रतिभासंपन्न लेखकांनी लेख लिहिले आहेत. ते वाचीत असतां, स्वतःला विश्वकर्मा विधाता असें मानतां न आलें तरी कांही काळ आपण एका वेगळ्या पण संभाव्य सृष्टींत वावरत आहों असें वाटतें खरेंच.

अगदी स्वल्प अभावित कारणाने घडत घडत पुढे फार मोठें कार्य त्यांतून निघालें असें पाहिलें तर ती भवितव्यतेची लहर व अन्याय म्हणावेंसें वाटतें. पण कार्यकारणांचा असा अतिरेकी अविवेकी संबंध घडतो असें लोक मानतात खरें, व अुदाहरणेंहि दाखवून देतात, त्याला काय करावें ?

कसें तें पाहा. वरील विचारसरणीला क्षणभर अनुसरून मीहि एक कल्पनाचित्र याखाली रंगविणार आहें. वाचकांनी केवळ सहृदयतेने त्याकडे पाहावें–

सुभाष बोस यांनी जपानची कुमक आपण होअून मागितली नाही किंवा घेतली नाही. झालें तें असें की, दक्षिण ब्रह्मदेशांत जपानचा पराभव झाला व जपानी सैन्य पळून गेलें. तेव्हा त्याने अनेक प्रकारची युद्धसामग्री मागे सोडून दिली ती आयतीच सुभाषसेनेच्या हातीं लागली. अिंग्रजांनी हिंदुस्थानाकडे पळ काढतांना आपलें सैन्य अेका भागांत मागे सोडून दिलें होतें त्यावर आता कोणाचीच सत्ता हुकुमत राहिली नव्हती. तें सैन्य घेअून व ती युद्धसामग्री घेअून नेताजींनी अुत्तर-ब्रह्मदेशाकडे चाल सुरू केली, पण एकहि जपानी शिपाअी आपल्या सैन्यांत ठेवून घेतला नाही. आणि सयामी, ब्रह्मी, हिंदी अशा लोकांचें मिश्र पण अेकजीव असें सैन्य बनवून नेताजी निर्धाराने हिंदुस्थानाकडे वळले. दर मुक्कामागणिक त्यांच्या सैन्यांत भर पडत गेली. आणि असा चमत्कार घडला की, जे नवीन स्थानिक लोक नेताजींचे सैनिक बनले त्यांना कोणत्याहि प्रकारचें लष्करी शिक्षण नसतांहि ते अुत्तम प्रकारची शिपाअीगिरी करू लागले. केवळ स्फूर्ति व अुत्साह यांनी अशा गोष्टी जगांत घडतातच.

ज्या शिवाजीच्या मराठ्यांनी मोंगलांपासून स्वराज्य परत मिळविलें त्यांनी तरी कोणत्या लष्करी शाळेंत शिक्षण घेतलें होतें ? अिंग्रजशाहींतील लष्करी शाळा म्हणजे लढाअीच्या शिक्षणापेक्षा दिमाखच अधिक. तो लष्करी अैटदार ड्रेस, त्यावर घासून पुसून तुकतुकीत केलेलें पितळेचें बटन, कपड्याला कोठे सुरकुती दिसावयाची नाही. शिपायाने रोज आपल्या हाताने दाढी केलीच पाहिजे. त्यानें सामुदायिक भोजनगृहांत जेवलेंच पाहिजे. लष्करी अधिकाऱ्याने तर जेवणखाण, दारू, तंबाखू, पदरचा खिदमतगार अित्यादिकांवर भारी खर्च

केलाच पाहिजे. त्याला बसायला वाहन हवेंच. तो प्रवासाला निघाला की गाद्या गिरद्या घातलेला दुसऱ्या किंवा पहिल्या क्लासाचा डबा त्याला हवाच. त्याच्या पोटांत जाअील त्यापेक्षा अधिक अन्न व अितर चैनीचे पदार्थ त्याच्या नांवाने फुकट गेलेच पाहिजेत. बराकींत त्याला विजेचा दिवा, विजेचा पंखा अवश्य हवा. असल्या वैभवांत वाढविलेले, सुखावलेले, पोसलेले लष्करी अधिकारी आणि त्याच मानाने त्यांच्या हाताखाली सैनिक!

पण सिंगापूर, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणांवर पळ काढून शत्रूला पाठ दाखवून धांवतांना अिंग्रजांचें लष्करी शिक्षण व त्यांची बहादुरी ही जगाला दिसून आली. याच्या उलट, पूर्वीच्या मराठा-मावळ्याची स्थिति काय होती! कमरेला लंगोटी, हातांत काठी, डोक्याला दहा हात फडकें, अंगावर घोंगडी, पायांत वहाण आहे आहे नाही नाही! काठीला बांधलेली शिळी भाकर हाच त्याचा बडा खाना. कमरेला मोडकी तोडकी तलवार व हातांत गंजलेला भाला. असला दरिद्री लष्करी सरंजाम असलेला मराठी शिपाअी. पण त्याने काय पराक्रम केले हें अितिहास आपणाला सांगतोच.

सांगण्याचें तात्पर्य हें की, नेताजींना लाभलेल्या हिंदी व परदेशी सैनिकांनाहि स्फूर्ति व उत्साह यांनीच शूर व बलसंपन्न केलें. ज्या प्रांतांतून ते येऊं लागले त्यांतील ग्रामीण नागरिक लोकांना या सैन्याचें इतकें कौतुक वाटलें की, त्यांनी आपल्या जवळ असलेला पैसा व इतर सामग्री नेताजींच्या चरणीं नुसती ओतली.

नेताजी हे विमानाचा अपघात होऊन मेले अशी गोष्ट मुळांत खोटीच होती. ते आसामच्या सरहद्दीला येऊन भिडेपर्यंत त्यांना कोठेहि प्रतिकार झाला नाही. वाटेंत ब्रह्मदेशाच्या शेवटच्या मुक्कामांत इंग्रजांविरुद्ध बंड करून उठलेला ब्रह्मी मुत्सद्दी बा माँ याने नेताजींची भेट घेतली तेव्हां, बसल्या बैठकींत ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची सनद तयार होऊन बा माँच्या स्वाधीन झाली. त्याला नेताजी म्हणाले– "गड्या या कागदाला स्वातंत्र्याची सनदहि म्हणतां येत नाही. सनद म्हटली म्हणजे ती देणारा वरिष्ठ व घेणारा कनिष्ठ असा भेद पडतोच. तो येथें कोठे आहे? तूं व मी दोघेहि अेकाच हेतूनें प्रेरित झालेले सहकारी मित्र आहों. आणि आपण

दोघांनी त्या कागदावर सह्या घातल्या त्या स्वातंत्र्य दिलें–घेतलें या अर्थानें नसून ज्याचें त्यानें तें मिळविलें या गोष्टीच्या उल्लेखावर आपण दोघांनीहि साक्ष घातली आहे. भावी ब्रह्मी राष्ट्राला ही सनद नव्हे, तर त्यानें आत्मगौरवार्थ लिहून ठेवलेला हा ताम्रपट किंवा सुवर्णपट आहे. आपल्या दोन्ही राष्ट्रांना अितकेंच करावयाचें आहे की, यापुढे हिंदुस्थान व ब्रह्मदेश हीं स्वतंत्र अधिकारी राष्ट्रें म्हणून मित्रभावाने नांदतील, कोणीहि एक दुसऱ्याला अुपद्रव देणार नाही, व तिसरा शत्रु अुत्पन्न झाला असतां दोघेहि मिळून त्याजविरुद्ध लढतील."

आसामच्या सरहद्दीवर नेताजींनी आपल्या सैन्यानिशी पाय ठेवला अितक्यांत हिंदुस्थानकडून बातमी आली की, अखेरच्या मोहिमेंत जर्मनीचा विजय झाला. अिंग्रज व अमेरिकन सैन्य शत्रु–दोस्तांना शरण गेलें. रशिया व जर्मनी यांनी युद्धापूर्वीचा तह कायम केला, आणि स्टालिन आपलें सैन्य घेऊन मॉस्कोकडे परत गेला. नेताजींप्रमाणे हिटलर मेला ही गोष्टहि खोटीच होती. हिटलर व स्टॅलिन यांच्या शेवटच्या भेटींत जुन्या तहांत अेक नवीन कलम असें घालण्यांत आलें की, हिटलरनें नात्सी पक्षांतील कडक शिस्त कमी करून जर्मन राष्ट्राला लोकशाहीचें नवें वळण द्यावें, व कोणी कम्युनिझम स्वीकारला नाही तरी त्याचा द्वेष करूं नये. अुलट स्टॅलीननें हें मान्य केलें की, रशियन कम्युनिस्ट लोकांनी जें मतस्वातंत्र्य आपल्या देशांत भोगलें तेंच अितर राष्ट्रांनाहि लाभू द्यावें. म्हणजे कम्युनिझमचा असंमत प्रचार अितर राष्ट्रांत करूं नये. ज्या त्या राष्ट्रांतील लोकांनी लोकशाहीचें संवर्धन करावें. परंतु आपल्या संस्कृतीला अनुरूप असें राजकीय आर्थिक व सामाजिक ध्येय ठेवावें. हिटलर स्टॅलिनला म्हणालाच की, " मीहि कांही नवें शिकलों आहे व तें असें की, जर्मनीने आपलें वंशनिष्ठ वर्चस्व मनांत ठेवलें तरी तें अितरांवर गाजवूं नये. ज्यू लोकांचा द्वेष व छळ करू नये. आणि नात्सी पक्षांतील अुपपक्षांना अधिक मतस्वातंत्र्य आणि रास्त राजकारण खेळण्याला वाव द्यावा."

अमेरिकेंत याच वेळी 'आयसोलेशनिस्ट' म्हणजे बाहेरच्या जगाशी आपली गुंतागुंत करून घेऊं नये– आपल्यापुरतें आपण पहावें– या राजकीय

पक्षाचा विजय होऊन त्याने हिटलरशी परस्पर बोलणें सुरू केलें. इंग्लंडांतहि मजूरपक्ष प्रभावी होऊन त्यानेहि हें नवें धोरण ठरविलें की, हिंदुस्थानासह जगांतील इतर अंकित लोकांवरील अधिराज्य सोडून द्यावयाचें. इंग्लंडांतील राजशाही व हिंदुस्थानांतील संस्थानिक यांचे राजीनामे घेऊन त्यांना तीन पिढ्या पुरेल इतकी संपत्ति व वार्षिक द्रव्यदान ठरवून द्यावयाचें. आणि ब्रिटिश साम्राज्य हा शब्द नाहीसा करून ब्रिटिश राष्ट्र एवढाच शब्द व्यवहारांत ठेवावयाचा. युरोपांतील अमेरिकन व इंग्रज सैन्य पराभव पावून शरण आलेंच होतें, यामुळे अमेरिकेंतील एकांडा पक्ष व इंग्लंडांतील मजूरपक्ष यांच्याशी तह करणें हिटलरला सोयीचें झालें. आणि अमेरिकन व ब्रिटिश सैन्यें बंधमुक्त झालीं असें त्याने जाहीर केलें.

हीं बंधमुक्त सैन्यें स्वदेशीं परत जाण्याला आगबोटी व विमानें पुरीं पडण्यासारखीं नव्हतीं यामुळे जो काळ लागणार त्यांत जागच्या जागीं राहून पण अमेरिकन, इंग्रज, जर्मन हीं नातीं विसरून सर्वांनी एकत्र नांदावें असें ठरलें. युरोपांत मित्रपक्षाचा पराजय झाल्यामुळे हिंदुस्थानांतील क्रांतिकारक चळवळीला जोर आला हें कशाला सांगावयाला हवें? सगळे भूमिगत तरुण, तेजस्वी लोक व स्त्रिया बाहेर पडल्या. पंजाब, गंगा–यमुना प्रांत, महाराष्ट्र यांतील क्रांतिकारक एक होऊन प्रथम नागपूरला एकत्र भेटावें, असें ठरलें. हिंदुस्थानांतील सर्व ब्रिटिश सैनिकांनी मजूरपक्षाच्या हुकुमाने आपलीं हत्यारें खाली ठेविलीं. सिमल्यांतील बंगले खलास झाले. आणि जे कोणी इंग्रज हिंदुस्थानांत हिंदराष्ट्रीय म्हणून राहण्यास तयार नसतील त्यांनी कलकत्ता, कराची व मुंबई या तीन ठिकाणीं येऊन राहावें, व वहानाची सोय होईल त्याप्रमाणें स्वदेशीं परत जावें असें ठरलें. दुष्ट भविष्यवाद्यांनी केलेलें भविष्य खोटें ठरून, हिंदुस्थानांत अराजक निर्माण न होतां शहरांत व खेडेगांवीं बरेचसे व्यवहार पंचायत–पद्धतीने निकालांत निघूं लागले.

मुसलमानांचें अिंग्रजांकडील गुप्त पाठबळ नाहीसें झाल्याने या देशांत आपण कोण व किती आहों याचा प्रकाश त्यांच्या डोक्यांत पडला. आणि बॅ. जिना यांची तिस्मारखानी वृत्ति लोपून त्यांनी आपण होऊन पंडित नेह-

रूंशी पत्रव्यवहार सुरू केला. कलकत्त्यास सर्व क्रांतिकारकांची अेकत्र भेट झाल्यावर त्यांनी मध्यवर्ती केंद्र म्हणून देशांतील सर्व भागाच्या लोकांनी नागपुरास जमून स्वतंत्र हिंदी राष्ट्राची घोषणा करावी असें ठरलें; व १९२० सालीं ज्याप्रमाणे जिनांसह कॉंग्रेसवाले राष्ट्रीय सभेंत एकत्र जुळले होते त्याप्रमाणेच आताहि ते फिरून एकवार जुळले. हिंदु व मुसलमान यांचे संबंध काय राहावे याचा ठराव करण्याकरिता जिना, वल्लभभाई आणि श्यामाप्रसाद मुकर्जी यांची उपसमिति नेमली गेली. १९२० सालीं नागपूरच्याच सभेंत असहकारितेचा ठराव झाला होता, पण आता इंग्रज निघून गेल्यामुळे असहकारिता या शब्दाचा उच्चारच ऐकूं न येतां निरनिराळ्या प्रांतांतील लोकांनी परस्पर सहकारिता करून राष्ट्र समृद्ध व बलवान कसें करावें याचीच चर्चा संयुक्त परिषदेंत झाली व तिलाच कॉन्स्टिटचुअंट असेंब्लीचें स्वरूप आलें.

कित्येकांना मनांतून वाटत होतें की, आता राष्ट्राचें प्रधानपद नेहरू यांना मिळावें की नेताजी सुभाषांना मिळावें याविषयी तीव्र मतभेद होऊन कलागती लागतील. परन्तु तसें घडलें नाही. अुलट नेहरू व नेताजी हेच अेकमेकांना ' तुम्हीच राष्ट्राध्यक्ष व्हा ' असा आग्रह करू लागले. नेहरू म्हणाले, " नेताजी आम्ही कितीहि स्वातंत्र्याची बडबड केली तरी प्रत्यक्ष सैन्य घेअून कलकत्त्यास तुम्हीच आला. तेव्हा ज्याने हा शेवटचा घाव शत्रूवर घातला त्यालाच राष्ट्राध्यक्ष होण्याचा मान मिळाला पाहिजे. " पण यावर नेताजी म्हणाले की, " मी सैन्य घेऊन इकडे निघालों परन्तु युरोपांत अिंग्रज अमेरिकन सैन्याचा पराभव न होता तर माझें काय चाललें असतें? म्हणून १९२९ सालीं ज्यानें प्रथम रावी नदीच्या तीरावर आज हिंदुस्थान स्वतंत्र झालें अशी घोषणा केली त्यालाच राष्ट्राध्यक्षाचा मान मिळाला पाहिजे." त्यावर नेहरू म्हणाले—"मी अशी घोषणा केली तरी पूर्वीच्या क्रांतिकारक राष्ट्रीय पुढाऱ्यांनी स्वातंत्र्याची कल्पना बोलून दाखविली त्यांच्याकडेच तो मान जातो." तेव्हां सर्वांनी मिळून परिषदेंत अुपस्थित असलेल्या सावरकरांचें नांव घेतलें, व अेकाने जाअून ते आजारी म्हणून त्यांना हाताने धरून व्यासपीठावर आणलें. तेव्हा सावर-

कर म्हणाले, "सर्वांच्या आधी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा अुच्चार मी व माझे गुरु कै. आण्णासाहेब परांजपे यांच्या तोंडून झाला हें खरें. तथापि राजकारणाची प्रत्यक्ष चळवळ करण्याला जी लोकसंग्रहाची बुद्धि, व्यक्ति-निःस्वार्थता, व्यावहारिक चातुर्य, व अंगमेहनत लागते ती माझ्या ठिकाणीं कोठे होती ? हे गुण पुढच्या पिढीतील लोकांनीच प्रकट केले. मी केलें याहून त्यावेळीं अधिक करणें शक्य नव्हतें हें तुम्हीहि मान्य करालच. परन्तु मलाहि हें मान्य केलें पाहिजे की, कालाची अनुकूल लाट आली तेव्हा तिच्यावर आरूढ होअून यशाचें बंदर गांठण्याचा शारीरिक जोमच काय पण मानसिक कौशल्यहि मजमध्ये राहिलें नाही. कांहीहि असो; राष्ट्रा-ध्यक्ष होण्याचा मान तुम्ही मला दिला तरी तो घेण्याला मी पात्र नाही. मुलांचे पराक्रम पाहणें यापेक्षा वृद्धांना अधिक आनंद तो काय असणार?"

मग सर्वांच्या मतें असें ठरलें की, नेहरू, सुभाष, सावरकर यांनी आपण होअून आपलीं नांवें मागे घेतल्याने, सर्वांत निःस्वार्थी व विनयशील अशा राजेंद्रप्रसादांना राष्ट्राध्यक्षाचें हें पद द्यावें. मात्र त्यांच्या मंत्रिमंडळांत हे तिघे व त्याप्रमाणे जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अित्यादि निवडक तरुण घ्यावे.

इतक्यांत एकजण म्हणाला, "अहो हें सर्व झालें; परंतु आपण महात्मा गांधी यांना विसरलोंच." आणि नेहमीप्रमाणें अंतिम उपदेशाचें वाक्य गांधींनी उच्चारावयाचें ती रीत सुटूं नये म्हणून महाबळेश्वर मुक्कामीं गांधीजींकडे शिष्टमंडळ गेलें. तेव्हा त्यांची वृत्ति आनंदी दिसली नाही. ते म्हणाले, "तुम्ही हें सर्व यश मिळविलें. पण त्यांत अहिंसेचा पाडाव होअून क्षात्रवृत्तीचा विजय झालेला दिसतो. म्हणून यापुढील कोणत्याच राष्ट्रीय कार्यांत मला भाग घ्यावयाचा नाही. मी आता महाबळेश्वर सोडून खाली उतरणारच नाही. फार तर पांचगणीला पावसाळ्यांत चार महिने मुक्काम करीन. सर्वांत वृद्ध मी. म्हातारपणीं बापाचें व मुलाचें न जुळलें तर त्यांनी वेगवेगळें रहावें हेंच युक्त. मजकरितां अितकेंच करा की, दूध पिण्याला एक शेळी, रिकामा हात चालविण्याला एक चरखा, रिकामपणीं वाचण्याला अेक गीता, अहिंसेचें प्रतीक म्हणून बुद्धाची एक संगमरवरी मूर्ति, आणि हिंदु-

मुसलमानांच्या एकीचें स्वप्न प्रत्यक्षांत दिसावें म्हणून कोणी तरी एक दाढी-वाला मुसलमान सोबती अितकी माझी सिद्धता करा म्हणजे पुरे. पुढच्या पिढीच्या तुम्हां तरुण मंडळींनी हवी तशी राज्यघटना बनवावी. आणि राष्ट्राला तिचा उपभोग घेऊं द्यावा. खरें बोलावयाचें तर राज्यघटनाशास्त्रांतील कोणत्याहि कायद्याचें पुस्तक मी वाचलेलें नाही. व व्यवहारी राजकारणांत मला कांही कळत नाही. हिंदी जनतेची श्रद्धा माझ्यावर कां बसली हें मला माझा आंतला आवाज सांगतो. पण माझ्या आंगच्या कोणत्या गुणामुळे किंवा अवगुणामुळे कां होअीना, मी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यांत उपयोगी पडलों यांतच माझें समाधान आहे."

* * *

## आणि मग १९४७ सालीं हें घडलें !

सन १९४७ हें वर्ष कांही अपूर्व चमत्कार दाखविणार याविषयी सगळ्या जगांतील तज्ज्ञांचें बहुधा अेकमत होतें. भविष्याच्या नांवाने अनुमानें करण्याचा अग्राधिकार ज्योतिषी गणक यांना असतो. आणि खरोखरच पहावें तों विलायतेचा झडकील आणि हिंदुस्थानांतले ज्योतिर्भूपण यांनी या १९४७ सालाविषयी स्वतंत्र रीतीनें एकच भविष्य वर्तविलें होतें. आणि ते झाले तरी तसें न वर्तवून काय करणार? ज्योतिर्मंडळांत जर या सालीं सप्तग्रहीच उपस्थित झाली, तर तें वर्ष अपूर्व योग घडवून आणणार हें आपोआपच सिद्ध होतें. योग अपूर्व तेव्हा फल अपूर्व असलेंच पाहिजे. मग तें जगाला चांगलें असो किंवा वाअीट असो. पण फलज्योतिषाच्या भविष्याची हीच मौज असते की, कोणत्याहि फलित गोष्टीला 'चांगलें' अगर 'वाईट' हीं दोन्ही विशेषणें यथार्थतेने लावतां येतात. म्हणून त्या स्थूल विशेषणांच्या शब्दांनी भविष्य वर्तविणाराचें भविष्य चूक ठरतच नाही.

१९१४ चें महायुद्ध चांगलें की वाअीट? याचें अुत्तर दोन्ही प्रकारचें देतां येतें व दोन्ही अुत्तरें बरोबर ठरतात. महायुद्धांत मनुष्यप्राणहानि झाली म्हणून तें वाअीट! पण त्यांतून स्वयंनिर्णयाचें तत्त्व प्रस्थापित झालें, लहान सहान राष्ट्रांच्याहि स्वातंत्र्याचा हक्क जगाने मान्य केला, व राष्ट्रसंघाची

संस्था निर्माण झाली—तेव्हा महायुद्धाला चांगलेंच म्हटलें पाहिजे! हा जुना अनुभव असल्याने १९४७ या सालाला 'अपूर्व' असें जरी भविष्यकारांनी म्हटलें तरी, त्याला चांगलें किंवा वाईट असें निर्णायक गुणविशेषण लावण्याच्या भरीला मात्र ते पडले नाहीत. मनांत म्हणाले, "फलाची अपूर्वता सिद्ध झाली म्हणजे चांगलें वाईट जें काय म्हणावयाचें तें पुढे म्हणूं. आजच घाई कशाला? आज 'अपूर्व' म्हटलें काम झालें!"

पण ज्योतिषी किंवा भविष्यवादी यांच्याशिवाय अितर लोकांनाहि वाटे की, १९४७ हें साल कांही तरी विलक्षण घडामोड करील खास. कारण १९१४ च्या महायुद्धसमाप्तीनंतर तीस वर्षे बिनबोभाट गेलीं. तीस वर्षांचा काळ हें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चरित्रांत अेक युग मानतात. तेव्हा ज्योतिष सोडून दिलें तरी व्यवहाराच्या अनुभवाने पाहतां, आता नव्या घडामोडींचा काळ आला होता. स्वाभाविक फेरबदलाने प्रबळ राष्ट्रें दुर्बळ होअूं लागलीं होतीं. व दुर्बळ राष्ट्रें प्रबळ होऊं घातलीं होतीं. परिस्थितीमुळे जित व जेते यांची अदलाबदल होण्याचा रंग होता. १९१४ च्या युद्धसमाप्तीनंतर आलेली अुद्योगधंद्याची शिथिलता जाअून फिरून अेकवार कारखाने समृद्ध होअून अुत्कर्षाची वाट पाहत होते. १९१४ च्या महायुद्धांत जी पिढी गारद झाली तिच्या जागीं आलेली नवी पिढी अंगांतील नव्या रक्तामुळे मनाने युयुत्सु बनली होती. आणि संहारकारक असे नवे शोध लावून, त्यांवर पैसा खर्चून व त्यांचें पेटंट जगभर घेअून बसलेले शास्त्रज्ञ आपल्या शोधांचा अुपयोग करून पाहण्याची संधि मिळण्याविषयी अुत्सुक व अुतावळे झाले होते.

महायुद्धांत स्वतंत्र झालेल्या लहान राष्ट्रांना आपल्या सरहद्दी अधिक सोयीच्या व प्रशस्त करून घ्याव्याशा वाटत होत्या. पूर्वी भोगलेलें साम्राज्य नष्ट झालेल्या राष्ट्रांना आपल्या जुन्या वसाहती परत मिळविण्याची अिच्छा झाली होती. रशियाने २५ वर्षें कम्युनिझमच्या नांगराने सर्व जग नांगरून पेरून ठेवलें असल्यामुळे, रक्ताचा अेक मोठा पाअूस पडतांच हें नवें पीक जमिनींतून फोफावून वर येअील अशी त्याला आशा वाटत होती. जर्मनी महायुद्धानंतर सक्तीने निःशस्त्र करण्यांत आला होता. परंतु कारखान-

दारीची मोकळीक त्याला होती तिचा फायदा घेऊन, त्याने कारखान्यांनाच शस्त्रागारांचें रूप देऊन ठेवलें होतें. आणि ज्याप्रमाणें नाटकांत अेका प्रकट देखाव्याच्यामागे दुसरा गुप्त देखावा आधीच रचून ठेवण्यांत येतो, आणि शिटी वाजली किंवा वार अुडाला म्हणजे पुढचा देखावा अेका क्षणांत कोसळून पडतो व मागचा एकदम त्याच्या जागीं अुभा राहतो, त्याप्रमाणे कारखान्याच्या तळघरांतून युद्धोपयोगी नवीं साधनें बाहेर काढून, जगाशी झुंजण्याच्या तयारीने जर्मनी टपून बसला होता. अिंग्लंडला असें झालें होतें की, विमानविद्येंत आपण मागे पडलों खरेच, परंतु अजूनहि आरमार शिल्लक व तयार आहे. तोंपर्यंत त्याचा अेकदा अुपयोग करून पाहावा व बिघडत जाणारी वर्चस्वाची घडी पुनः बसवून पाहावी. आणि अमेरिका म्हणत होती की, "पूर्वी नाही म्हणतां म्हणतां आपण युद्धांत गुतून गेलों, पण आता तसें कांहीअेक न करतां हातांत केलॉग पॅक्ट घेऊन त्यावर सह्या केलेल्या राष्ट्रांना तोंडाने नावें ठेवीत, हातांनी पुनः अेकवार जगांतील सोनें गोळा करून आपल्या तळघरांतून भरून ठेवूं."

हिंदुस्थानांतील लोकहि या सालाकडे मोठ्या अुत्सुकतेने पाहात होते. पण त्याचीं कारणें मात्र वेगळीं होतीं. त्यांपैकी सामान्य अशीं कांही वर दिलींच आहेत. पण आणखीहि कांही थोडीं विशेष होतीं तीं अशीं. १९१७ सालीं स्वराज्याचा जाहीरनामा प्रकट झाला. १९२७ सालीं सायमन कमिशन बसलें. १९३७ सालीं अेका लष्कराशिवाय सर्व वरिष्ठ खातीं लोकप्रतिनिधींकडे सोंपविण्यांत आलीं. अर्थात १९४७ सालीं अुरलें तेवढें सर्व स्वराज्य हिंदी लोकांच्या हातीं जावें हा क्रमच ठरत नाही काय ? याहिपेक्षा अेक सूक्ष्म कारण असें की, १८५७ सालीं बंड झालें, व १ ८ ५ ७ या आंकड्यांची बेरीज २१ होते तशीच १ ९ ४ ७ या आंकड्यांचीहि होते. अर्थात बंडाच्या सालीं घडलें तसलेंच कांहीतरी या नव्या सालीहि घडणार खास ! पण याहिपेक्षा सूक्ष्म व शेवटचें निर्वाणीचें कारण असें की, विद्यमान व्हाअिसरॉयांचें नांवच ( Lord Shevetlor ) असें होतें. याचा अुच्चार 'लॉर्ड शेवटला' असा होतो. प्रतिष्ठित अिंग्रज लोक अन्त्य r किंवा र याचा अुच्चार करीत नाहीत. अर्थात लॉर्ड 'शेवटला' या शब्दानेच अशी गुप्त

सूचना दिली की, 'लॉर्ड शेवटला' हा 'शेवटला'च व्हाअिसरॉय होणार म्हणजे हिंदी लोकांना संपूर्ण स्वराज्य मिळणार !

दिल्ली येथील नव्या राजवाड्यामध्ये लॉर्ड शेव्हेटलॉर हे आपल्या खाजगी खोलींत महत्त्वाचे कागदपत्र पाहत बसले होते. महत्त्वाचे कागदपत्र पाहणें सुरू असलें म्हणजे थोर लोकांचा शांतताभंग कोणी करीत नाही. असले कागदपत्र पाहणें ही मोठ्या लोकांची गूढ विचाराची गोष्ट असल्यामुळे,क्वचित आत्मा 'पुरितति नाडींत' शिरू शकतो व त्यामुळे कागद पाहणाराला झोंप येते; पण खोलीचें दार उघडण्याची मनाई असल्यामुळे महत्त्वाचे कागदपत्र पाहणारा खरोखर कागदपत्र पाहतो आहे की निजला आहे हें तो प्रत्यक्षपणें घोरत असल्याशिवाय कसें कळणार ?

असो. ता. ३१ डिसेंबर १९४७ या दिवशीं तिसरे प्रहरीं लॉर्ड शेव्हेटलॉर हे, वर सांगितल्याप्रमाणे, 'महत्त्वाचे कागदपत्र पाहात' बसले असतां त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी मि. गॉन हा खोलीच्या दरवाजाशी घाईने पावलें टाकीत, पण पाऊल न वाजवितां, येऊन दाखल झाला. त्याच्या तोंडावर बेसुमार फिकटपणा आला होता व त्याचे डोळे डोक्यांतील भ्रमामुळे बाहेरचें कांहीच पाहत नव्हते म्हटलें तरी चालेल. त्याने दोन मिनिटें थांबून खोलीच्या दाराला कान लावून कानोसा घेतला. घोरण्याचा आवाज अैकू येत नाही असें पाहून त्याला थोडें बरें वाटलें. आणखी दोन मिनिटांनी त्याने दाराची कडी खुणेदाखल वाजविली. तेव्हा दार उघडलें गेलें. लॉर्ड साहेबांनी प्रश्न केला, "काय, मि गॉन, आज भेटीस येणाऱ्या स्वराज्यवादी लोकांच्या शिष्टमंडळाच्या सत्काराची सर्व तयारी नीट झाली ना?"

"होय, ती सर्व तयारी नीट झाली आहे. शिष्टमंडळ येण्यास अजून दोन तास अवकाश आहे. पण मध्येच लंडनहून ही तार आतांच हातीं आली ती देण्याकरिता म्हणून मला अवेळीं येऊन आपल्या कामांत व्यत्यय आणावा लागला याबद्दल माफी असावी."

लॉर्ड साहेबांनी सेक्रेटरीच्या हातांतील तार उतावीळपणाने हिसकावून घेतली असें म्हटलें तरी चालेल, व वाचतांच ती त्यांच्या हातून गळून

पडली. उभयतांच्याहि तोंडांतून शब्द निघेना; पण मोहांत फार वेळ पडणें हा अिंग्रजांचा धर्म नव्हे. त्याप्रमाणे लॉर्ड साहेबांनी ती तार वर उचलून घेतली व तिजकडे पाहत पाहत ते म्हणाले, "गॉन, तुम्ही आलां त्या वेळीं मी ताज्या वैमानिक टपालाने हातीं आलेले खलिते व पत्रें वाचीत होतों. त्यांतील मजकूर वाचतांना अशी ही तार कदाचित लवकरच केव्हा तरी येईल असें मन सांगत होतें, व स्टेट सेक्रेटरीच्या पत्राच्या ताज्या कलमांत 'तार पाठवूंच' असें लिहिलेंहि होतें.पण मनुष्याची आशा ही बलवत्तर असल्या-मुळे ही तार आजच येईल असें मात्र वाटलें नव्हतें खास. असो, आतां विचार कसला ? पुढच्या तयारीला लागलेंच पाहिजे. तर याच पावलीं जा व आपल्या सेनापतींना तावडतोब घेऊन या. शिष्टमंडळ येईपर्यंत मी काम करीत येथेच बसणार आहें!"

सेनापति आंत आले ते पाय आपटीतच आले. त्यांच्या तोंडावर घाब-रटपणापेक्षा खेदाचीच छटा अधिक होती. ते म्हणाले, "आपण कशाला बोलाविलें तें मी समजलों. पण आपणाला तार आली त्याच्या आधीच बारा तास मला सांकेतिक शब्दांची अशीच तार आली होती."

लॉर्ड शेव्हेटलॉर म्हणाले, "आश्चर्य आहे! माझ्या आधी तुम्हाला तार? छे, पण आश्चर्य कसलें? हिंदुस्थानांत व्हाईसरॉयपेक्षा सेनापतीला अधिक मान ही गोष्ट कर्झन–किचनेर यांच्या युद्धापासून ठरलेलीच आहे! तथापि ही वेळ तुमच्याआमच्या मानाची तुलना करण्याची नव्हे."

"तार पाठविणारांनीहि या वेळीं ती दृष्टि ठेविली नव्हती. तर मला अेकदम परस्पर तार पाठविल्याने जहाजाची तयारी अधिक त्वरित होईल म्हणूनच. व त्याचप्रमाणे शेवटच्या लढाऊ जहाजाची सिद्धता मी करून ठेवली आहे."

" फार चांगलें केलेंत. मी तरी बोलावून तेंच सांगणार होतों!"

"वाईट इतकेंच वाटतें की, ज्या गोऱ्या अिंग्रज सैन्याचें ठाणें हिंदुस्थानांत आज इतकीं वर्षे होतें, त्याला आज तें ठाणें समूळ उठवावें लागणार!"

"होय. लॉर्ड हार्डिंज यांनी पूर्वी एक वेळ India was bled white of troops असें म्हटलें होतें तें आज India must be bled of white troops असें म्हणावें लागत आहे पण काळें सैन्य मागे राहणार हें एका अर्थानें ठीकच आहे. कारण हिंदुस्थानचें रक्षण व्हावयाचें तर तें आता तेंच सैन्य करील!"

"पण आपण तर सैन्याला आज दोनशें वर्षांत तोफेचा गोळा उडविण्यालाहि शिकविलें नाही."

"नाही म्हणून काय झालें ? मनुष्य पाण्यांत पडला म्हणजेच पोहायला शिकतो. तुम्ही आणखी दोनशें वर्षें राहतां तरी त्याला कांहीच अधिक शिकविलें नसतें. प्रसंग हाच मनुष्याला सर्व कांही शिकवितो. असो, आज जाणारें तेंच शेवटचें लढाऊ जहाज ना ?"

"तेंच शेवटचें. आपण व मी दोघेहि त्या जहाजावरून स्वदेशीं परत जाणार आहों !"

"हिंदुस्थानांतून पाय काढतांना वाईट वाटणारच. पण तोंडापर्यंत पाणी चढलें तेव्हा गोष्टींतल्या वानरिणीने आपलें मूल पायाखाली घालून त्यावर ती अुभी राहिलीच की नाही ? गोऱ्या सैन्याने मूळ तरवार कमरेला बांधली ती अिंग्लंडांतच. त्या तरवारीचा आज अिंग्लंडच्याच संरक्षणाकडे अुपयोग व्हावयाचा तर त्यांत तरी वाईट काय ?"

इतकें बोलणें झाल्यावर सरसेनापति निघून गेले ! पाठोपाठ लॉर्ड बिशपसाहेब आले. त्यांचीहि जागा या शेवटच्या जहाजावर राखून ठेवल्याचें त्यांना कळविण्यांत आलें होतें. पण हिंदुस्थान सोडण्याची गोष्ट सेनापतीपेक्षा या भटजीबुवांनाच अधिक अप्रिय वाटत होती. ते देवळांतील प्रार्थनेचा रडका सूर काढून म्हणाले, "हाय रे देवा, आम्ही ख्रिस्ती धर्मोपदेशक गेल्यावर बिचाऱ्या हिंदुस्थानाचें कसें होणार ? पीक पिकवून तें मळून कणगींत भरण्याच्या वेळी जमिनीचा तावा सावकाराला देतांना जें दुःख शेतकऱ्याला होतें, तेंच आज मला व मिशनरी लोकांना ख्रिस्ती धर्माचें चंबूगवाळें येथून गुंडाळतांना होत आहे."

लॉर्ड शेव्हेटलॉर अुपहासाच्या स्वराने हंसून म्हणाले, " सद्धर्मबांधवा ! जाअू दे की ! ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी परदेशांत जाअून करावयाचें तें स्वदेश-कार्य सर्व तुम्ही येथे पुष्कळ केलें ! शिवाय हल्ली धर्मांतर करविण्याचा तुमचा धंदा पूर्वीसारखा चालत नाही. आणि तुमच्यांतले जे खरे निःस्वार्थी ख्रिस्तसेवक असतील त्यांना आज स्वदेशांतच काय थोडी कामगिरी आहे ? परोपकारापेक्षा स्वदेशभक्ति हीच अधिक श्रेष्ठ नव्हे काय ? चला, तुम्ही आम्ही सर्वच जाअून आपलें घर संभाळूं. "

अितकें बोलून त्यांनी बिशपसाहेबांना रजा दिली. व आपलें अुरलेलें सामान व कागदपत्र गोळा करून पेटयांतून भरण्याचा हुकूम त्यांनी पट्टे-वाल्यांना केला.

* * *

ठरल्याप्रमाणें हिंदी पुढाऱ्यांचें शिष्टमंडळ आलें. थाट नेहमीसारखाच होता. आजअुद्या सर्व अिंग्रज शेवटच्या लढाअू जहाजावरून स्वदेशीं परत जाणार या जाणिवेची गंधवार्ताहि व्हाअिसरॉयांनी आपल्या चेहऱ्यावर शिष्टमंडळाला दिसू दिली नाही.

परस्पर ओळखी करून झाल्यावर शिष्टमंडळाच्या पुढाऱ्याने खण-खणीत आवाजाने आपली कैफियत वाचली व फिरून मुखजबानीने सांगितलें की, "स्वराज्यदान मागण्याचा हा शेवटचाच प्रसंग समजा. यापुढे अशी याचना तोंडाने हिंदुस्थान तुम्हाकडे पुन्हा केव्हाहि करणार नाही. हातांनी काय होअील तें पाहून घेअूं. गैरसमज होअू नये म्हणून अितकेंच सांगतों की, प्रत्यक्ष राज-सत्ता जावी असें आम्ही अजून म्हणत नाही. स्वतंत्र वसाहती व अिंग्लंड यांचा–सोन्याच्या साखळीने बांधलेल्यासारखा–जो नाजूक पण जिव्हाळ्याचा ऋणानुबंध आज आहे, तसाच हिंदुस्थानाचाहि राहो व राहील. पण पावणेसोळा आणे स्वराज्य तावडतोब मिळालेंच पाहिजे अशी आमची मागणी आहे. "

लॉर्ड शेव्हेटलॉर हे शिष्टमंडळाला अुत्तर देण्याकरिता अुभे राहिले. ते म्हणाले, " मित्र हो– "

शिष्टमंडळी हा अपरिचित अुद्‌गार व संबोधन अैकून आश्चर्याने अेक-मेकांकडे पाहूं लागून ' आज हें नवें काय ' असें अेकमेकांना नेत्रसंकेताने विचारूं लागली.

लॉर्ड शेव्हेटलॉर यांनी अधिकच गंभीर स्वर काढून भाषण चालू केलें. ते म्हणाले, " आपण आज भेटीला आलां हा खरोखरच अपूर्व योग आहे. कारण, मी जें आपणाला सांगणार तेंहि तसें अपूर्वच आहे. आज जुनी भाषा बोलूं नये, स्पष्टच सांगून टाकावें, अशी मला विलायतेंतील सरकाराची आज्ञाच आहे."

हें अैकतांच शिष्टमंडळापैकी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भीति व संशय हीं ज्याच्या त्याच्या मूळ स्वभावाप्रमाणें प्रकट झालीं. " आपण काय म्हणणार ? " असें विचारावें असें प्रत्येकाला वाटलें. पण व्हाअिसरॉय बोलत असतां कोणी मध्ये बोलण्याची चाल नाही.

लॉर्ड शेव्हेटलॉर म्हणाले, " आंधळा मागतो अेक डोळा व देव देतो दोन, ही म्हण तुमच्या भाषेंतलीच आहे. आज तिचाच अनुभव तुम्हांला येअील. तुम्ही पावणे सोळा आण्यांचा आग्रह धरितां पण–पण–"

शिष्टमंडळाचे लोक तटस्थ झाले. त्यांच्या डोळयांचीं बुबुळेंहि हालेनात.

" पण मला सांगण्याला आनंद वाटतो की, मला आताच तारेने खलिता येअून पोहोंचला. त्यांत हिंदुस्थानाला सोळा आणे स्वराज्य देण्याचें विलायती सरकारने ठरविलें असून मला तसें कळविण्याचा हुकूमहि केला आहे. "

आपण काय अैकतो हें शिष्टमंडळाला क्षणभर कळेचना. शिष्टमंडळापैकी अेकजण चुकून 'गॉड सेव्ह दि किंग' असें मोठ्याने म्हणाला व 'वंदे मातरम्' या शब्दांनी दुसऱ्या अेकाने त्याला जोराने अुत्तर दिलें.

लॉर्ड शेव्हेटलॉर यांनी आपला आशय पुन्हा अेकवार स्पष्ट करून सांगितला. व्हाअिसरॉय यांच्या अुत्तरावर प्रत्युत्तर देण्याची रीत नाही. तथापि आश्चर्याने बेभान झाल्यामुळे शिष्टमंडळांतील गृहस्थ व्यक्तिशः बोलूं लागले. पैकी एक गृहस्थ म्हणाले, " सरकाराने आमच्यावर असा राग करू नये. शतकांचा जोडलेला संबंध तोडू नये. दोघांचेहि हितसंबंध परस्पर गुंतलेले आहेत. "

दुसरा म्हणाला, "आपण सर्व सैन्य काढून नेणार, मग रशिया, अफगाणिस्थान किंवा जपान यांनी आमच्यावर स्वारी केली तर? आज आम्हांला निराश्रित असहाय टाकून जाणें हा अिंग्लंडच्या हातून अन्याय घडत आहे. मी म्हणतों, तो नैतिक गुन्हा आहे. वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानाचें संरक्षण, आम्ही समर्थ होअीपर्यंत करणें हें अिंग्लंडचें पवित्र कर्तव्य आहे."

याबर तिसरा म्हणाला, "बस कर हा भ्याडपणा, हा लाळघोटेपणा! लॉर्डसाहेब बोलले याचें प्रत्यंतर येण्याला अजून अवकाश आहे म्हणा. तो अिंग्रजांचा शब्द! त्यांत किती अर्थ असतील कोणी सांगावें. पण जर बोललेले शब्द खरेच असतील तर, मी म्हणतों की, दोनतीन शतकें केलेल्या पापाची निष्कृति करण्याची बुद्धि देवाने अिंग्रजांना आज दिली म्हणावयाची! आणि त्यांच्या पापाची निष्कृति करण्याबरोबर आम्हां हिंदी लोकांनाहि अीश्वराने स्वाभिमान प्रकट करण्याची बुद्धि दिली असें मी म्हणतों. परराष्ट्रांची भीति कसली सांगतां? तीं मात्र माणसें आणि आम्ही काय पशु आहों वाटतें? ज्या अीश्वराने आम्हांला अुत्पन्न केलें तोच आमचें रक्षण करील."

हें अैकून लॉर्ड शेव्हेटलॉर म्हणाले, "मित्र हो! आजवर तुमच्या तुमच्यांतले मतभेद कानावर आले म्हणजे आम्हां अिंग्रजांना आनंद होअी. पण अीश्वरसाक्ष सांगतों, आजचाच पहिला दिवस असा की, तुमच्यांतील मतभेद अैकून अिंग्रजांना वाअीट वाटतें. तसेंच आजवर तुमच्यांतल्या जहाल लोकांना नांवें ठेवावीं असेंच आमचें धोरण ठरलें होतें. मनांतून त्यांची किंमत आम्ही ओळखीत होतों; पण आज ती तोंडाने बोलून दाखविण्याचा सुदिन अुगवला खरा. ढोंगीपणामुळे आजवर छातीवर पडलेलें दडपण आज निघालें. प्रामाणिक अुद्गार तोंडांतून निघाल्याने आजवर घुसमटलेली सदसद्विवेकबुद्धि देखील मोकळी झाली. मित्र हो, तुमच्यापैकी शेवटला गृहस्थ बोलला तेंच खरें. स्वावलंबनासारखा दुसरा गुण जगांत नाही! आज आमचेंच पाहाना. अिंग्लंडवर प्राणसंकट आल्याबरोबर आम्ही दुसऱ्या कोणाला हांक न मारतां सगळ्या जगाच्या कानाकोपऱ्यांतले अिंग्रज घराकडे धांवून निघालोंच की नाही?

"अमेरिकन अितिहास तुम्हाला माहीतच आहे. मूळ अमेरिकन वसाहतवाले किती राजनिष्ठ ! पण सत्ताभिलाषाने अिंग्रज-मंत्रिमंडळाने कशी दडपशाही केली व कर बसविले ! शेवटीं राजनिष्ठ लोक बंडखोर झाले. युद्ध जुंपलें. अमेरिका स्वतंत्र झाली. अिंग्लंडला तिचें स्वातंत्र्य मान्य करावें लागलें. अिंग्लंडच्या राजदरबारीं पहिल्या अमेरिकन वकिलाची नेमणूक झाली. वकिलाने आपलें अधिकारपत्र जॉर्ज राजाला सादर करण्याचा दरबार भरला ! राजावर कोण तो प्रसंग ? पण आम्ही अिंग्रज शहाणे आहोंत. जॉर्ज राजाने वकिलाचें स्वागत केलें व म्हणाला, 'अेक वसाहत हातची गेली; पण अेका स्वतंत्र पराक्रमी राष्ट्राचा कायमचा स्नेह जोडला गेला ! अमेरिकेला स्वातंत्र्यदान करण्याला माझ्याअितका विरोध माझ्या राज्यांत खरोखर दुसऱ्या कोणीहि केला नसेल. पण लक्षांत ठेवा, तुमचें स्वागत मी जितक्या आनंदाने खुल्या दिलाने करीत आहें अितका दुसरा कोणीहि करणार नाही.'

"आज हिंदुस्थानाच्या लोकांना अुद्देशून अशाच अर्थाचे शब्द बोलण्याचा मान मला मिळत आहे हें मी माझें महद्भाग्य समजतों.

"आमचें शेवटचें लढाअू जहाज निघण्याची वेळ झाली. तर माझ्याशी अेक वेळ हस्तांदोलन करून जा !"

शिष्टमंडळ निघून गेलें. लॉर्ड शेव्हेटलॉर आपल्या खोलींत गेले व काठी घेअून बाहेर आले. प्रायव्हेट सेक्रेटरी दिसेल म्हणून त्यांनी अिकडेतिकडे पाहिलें,पण तो दिसेना. तेव्हा त्यांनी अे डी. सी.ला विचारलें, "व्हेअर अिज मि. गॉन !" अे. डी. सी. म्हणाला, "ही अिज् गॉन, सर !" त्यावर लॉर्ड शेव्हेटलॉर म्हणाले, "वेल ही अिज् राअीट. ही अिज् ट्रु टु हिज् नेम. सो वुअि मस्ट ऑल बी !"

सुमारे अेका तासाने दूर क्षितिजावर अेका लढाअू जहाजाचें धुराडें अिंच दोन अिंच दिसत होतें. पण पंधरा मिनिटांनी तेंहि नाहीसें झालें ! !

[ सदर गोष्ट "मौजेचे चार प्रहर" या पुस्तकांतून या लेखांत जशीच्या तशी उद्धृत केली आहे. गोष्टीचें नांव **"शेवटचें लढाऊ जहाज"** ! ]

---

# २०. सुभाष बोस यांस–

(वाङ्मयशोभा नोव्हेंबर १९४६)

सुभाष–होय, एवढाच शब्द पुरे ! तुम्हांला हाक मारून बोलायला हें साधें संबोधनच पुरे ! 'प्रिय' हें विशेषण लावावें तर तें इतकें दिखाऊ, कोडगें व औपचारिक होऊन बसलें आहे की, मनांतून शिव्या देत असतांहि इंग्रजी पत्रव्यवहार करणारा तें खुशाल लावतो. उद्या म. गांधी तुम्हांला पत्र लिहावयास बसले तरी ते 'डिअर = प्रिय' हा शब्द तुम्हांला खास लावतील ! बरें, प्रेम व्यक्त करायला, 'प्रिय' हें विशेषण लावलेंच पाहिजे असें नाही. तुम्हांला 'बाबू' म्हणावें तर तुम्ही केवळ बंगाली भावनेचे नाही. आणि तुम्ही महाराष्ट्राशी समरस होऊ शकतां तरी तुम्हांला राव किंवा पंत हें उपपद लावणें कानाला कसेंसेंच लागेल. 'महाशय' म्हणावें तर तो शब्द कोणी कोणी विनोदार्थीहि घेतात! खऱ्या देशभक्ताला देशभक्त म्हटलेलें आवडत नाही. त्याला वाटतें की, आपल्या देशसेवेच्या मानाने हा भारी वजनाचा शब्द आपल्याला लावून व्यर्थ खर्ची घातला जातो. महात्मा म्हणावें तर 'द्वितीयगामी न हि शब्द एप नः' असें म्हणून गुरकावतील असे अंध सांप्रदायिक या देशांत बोकाळले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करतां तुम्हांला नुसत्या सुभाष या नांवानेच हाक मारावी हें बरें. त्या नांवांत तरी काय कमी आहे? तें नुसतेंहि कानाला गोड लागतें. पूर्वी तुमच्याशी प्रत्यक्ष बोलण्याचे प्रसंग मला आले, त्यांत तुमचें विनयशील स्तिमित सुभाषित्व माझ्या मनाला पटलें होतेंच. म्हणून त्या साध्या नांवाने हाक मारून तुमच्याशी हे दोन शब्द बोलतों.

तुम्ही अद्यापि जिवंत आहां की मृत्यु पावलां याविषयी लोकांत वाद चालू आहे. तुम्हांला तोंडच्या शब्दाने मारणारे मारीत आहेत, व जिवंत ठेवणारे जिवंत ठेवीत आहेत, हें पाहून तुम्हांला किंवा तुमच्या आत्म्याला मौज वाटत असावी. पानिपतचे वीर भाऊसाहेब पेशवे यांच्यासंबंधाने पुष्कळ दिवस

अशीच उलटसुलट चर्चा चालली होती. तशीच आज तुमच्याविषयी चालू आहे. यांत एकच गोष्ट बरी वाटते ती ही की, होय–नाही, आशा–निराशा, संभव-असंभव यांच्या दोल्यावर बारा वर्षे झोके खात राहिल्यामुळे जिवाची दुर्दशा, विटंबना व छळणूक झालेल्या पार्वतीबाईसारखी पत्नी तुमच्यामागे उरलेली नाही. बरें, पार्वतीबाईसारखी साध्वी मागे न राहतां, भोवळ संन्यासी प्रकरणांतल्या रमेशच्या पत्नीसारखी दुर्बळ मनाची, कुलटा पत्नी तुम्हांला लाभून मागे राहती, तर तुम्ही जिवंत असतांहि तुम्हांला तोतया ठरवून पुनर्विवाह करून ती तुमची विटंबना करती! तुम्ही ब्रह्मचर्य स्वीकारून सर्व आयुष्य व जीवन स्वदेशाच्या चरणीं वाहिलें यामुळे ही आपत्ति टळली. या दृष्टीने पाहतां धाडसी देशभक्ताने अविवाहित राहणेंच बरें असें वाटतें. तसें म्हटलें तर निष्ठावंत ब्रह्मचारी हा लग्न न केल्यामुळे केवळ एकलकोंडा जन्म काढतो असें नाही. कारण, संन्याशाला–ब्रह्मचाऱ्याला हा घरचा नाही तर तो दुसरा सार्वजनिक संसार असतोच. ब्रह्मचाऱ्यालाहि मुलें होतात, मात्र त्या मुली असतात! कारण, त्या संस्थारूपाने निर्माण होतात. मी पोतदारांना म्हणत असतों की, भारत इ. सं. मंडळ–संस्था ही तुमची मुलगी आहे. तशीच सुभाष! तुम्हीं परदेशांत निर्माण केलेली 'राष्ट्रीय सेना' ही तुमची कन्याच नव्हे का?

तुम्ही खरोखर मृत्यु पावला असला तरी मी दुःखी होणार नाही. कारण, मृत्यूच्या मुक्कामाला हजार वाटा आहेत अशी म्हण आहे. आणि तुम्हांला यांपैकी जी वाट भेटली असें लोक सांगतात ती तुम्ही अंगीकारलेल्या धाडसी महत्कृत्याला शोभेशीच आहे. वीरासारखें इतर कोणाला मरण शोभत नाही. ज्यानें सेना निर्माण केली त्याला वीर हें नांव यथार्थतेने लावतां येतें. पण तुम्ही सेना नुसती निर्माण केली असें नाही तर हातांत तरवार घेऊन तिच्या अग्रभागीं राहून तिचें नेतृत्व केलें. हिंदुस्थान ब्रिटिशांकडून जिंकला जाण्यापूर्वी किंवा त्यानंतरहि हिंदभूमींत वीर निपजले नाहीत असें नाही. पहिल्या प्रकारच्या वीरांनी इतिहासांत आपली कीर्ति उज्ज्वलाक्षरांनी लिहून ठेवलीच आहे. आणि त्या वीरांविषयी आपलेपणा वाटतो. इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकल्यावरहि या देशांत वीर निपजले, पण त्यांनी इंग्रजांची नोकरी पतकरून जी वीरवृत्ति गाजविली ती स्वदेशाला उपकारक न होतां त्याच्या पायांतल्या

दास्यशृंखला घट्ट करण्याचा अपकारच तिने केला. पण तुमच्या राष्ट्रीय सैन्यांत ज्यांनी वीरवृत्ति प्रकट केली त्यांनी मात्र इंग्रजांपूर्वीच्या हिंदी वीरवृत्तीशी आपला नवा धागा जोडला. आणि हें सिद्ध केलें की, हिंदभूमींतून शिपाईगिरी व सरदारी अजून--म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दीडशें वर्षे खच्ची केली तरी--ती नामशेष झाली नाही. वसंतऋतु आला की पर्वत जसा तांबड्या पळसाच्या फुलांनी बहरून जातो त्याप्रमाणें देशभक्तीने लढण्याचा प्रसंग आला असतां ते सगळे क्षात्रवृत्तीचे गुण पुन्हा हटकून जागृत होऊ शकतात. इंग्रजांनी हिंदी लोकांच्या हातून हजारो तरवारी काढून घेतल्या त्या सर्वांची भरपाई तुमच्या कमरेला स्वातंत्र्यसंग्रामासाठी लटकविलेल्या एका तरवारीनें झाली!

पण तुम्ही जिवंत आहां की गमावलां या वादांत 'तुम्ही जिवंत आहां, मरण पावलां नाही, असें मानणारा मी आहें.' हिटलर–मुसोलिनी मेले असतील, पण रूझवेल्ट–चर्चिल जिवंत राहिलेच की नाही? मग तुम्हांलाहि जिवंत असण्याला काय हरकत? रूझवेल्ट–चर्चिल हे मुत्सद्दीच काय, पण आयसेनहोवर, माँटगोमेरी, मॅकार्थर हे रणवीर जिवंत आहेतच की नाही? हिटलर–मुसोलिनी मेले हेंच एका अर्थानें बरें झालें. नाही तर रोम–बर्लिन, पॉट्सडम, येथील ऐश्वर्यसंपन्न इमारतींत गुरखे शिपाई परेड करीत असलेले त्यांना पाहावे लागले असते! पण तुमचें तसें नव्हतें. तुमच्या स्वतःच्या सेनेचें विसर्जन करावें लागलें तरी हिंदुस्थानवर जपानी आक्रमणाचें संकट टळलें! न जाणो विजयी जपानने पुढे तुमच्याशी कसें वर्तन ठेवलें असतें! आणि तुमचें सेनापतित्व संपलें तरी या युद्धाच्या शेवटच्या घटनेंतून हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या मार्गाला लागला. आणि तो त्या मार्गाच्या शेवटाला पोंचलेला पाहावयाला तुम्हीं अवश्य जगलें पाहिजे. म्हणजें तुमचें धाडस कर्तृत्व व परिश्रम यांचें पारितोषिक तुम्हांला मिळेल. तुमचा जन्मभरचा उद्योग पाहिला म्हणजे तुम्ही बसलेलें विमान कोठे तरी चट्दिशी आपटून फुटावें आणि तुमचा अंत व्हावा हा मनाला ईश्वराघरीं अन्याय वाटतो. म्हणून हल्ली तारांतून वार्ताहर लोक कांही कांही बातम्या पाठवूं लागले आहेत त्या वाचून आनंद होतो. 'सुभाष जिवंत आहेत! ते हिंदुस्थानच्या मार्गाला लागले आहेत! प्रवासी तिबेट

यात्रेकरूंच्या मेळयांत ते राहिले असून त्या मेळयाबरोबर त्यांनी हिंदुस्थानांत प्रवेश केला आहे!' हें सर्व वाचून मनाला किती आनंद होतो म्हणून सांगूं!

सुभाष! तुम्हांला ईश्वराने दीर्घयुषी करावें! पण एक गोष्ट तुम्हांला सुचवावीशी वाटते. आणि ती चमत्कारिक वाटली तरी सुचविण्याचें धाडस मी करतोंच. ती ही की, तुम्ही हिंदुस्थानांत परत येऊं नका! परदेशांत राहूनच करतां येईल तें कार्य करा. याविषयी माझीं कारणें अशीं : तुम्ही हिंदुस्थानांतून बाहेर जाऊन जी अपूर्व कामगिरी केली आहे तिने तुम्हांला एक प्रकारें विभूतिमत्त्व प्राप्त झालें आहे. पण विभूतिमत्त्व म्हणजे तें असें असतें व असावें कीं, ग्राउंड ग्लास (घासलेली कांच)—मधून प्रकाश दिसतो, पण ज्योत दिसत नाही, असें एक प्रकारचें तेजाचें चमत्कारिक ऐश्वर्य विभूतीच्याभोंवती निर्माण व्हावें आणि तुम्ही हिंदुस्थानांत येऊन प्रत्यक्ष व्यवहारांत वावरू लागल्यास हें अभेद्य तेजोवलय तुमच्याभोंवती राहणार नाही. तुम्ही इकडे आलांत तर प्रथम एवढ्या जंगी लोकसमुदायाच्या सभा भरतील की, त्यांत शें—पन्नास लोक चुरडून जातील. लाउड—स्पीकर अपुरे पडतील. वर्तमानपत्रांचे रकाने भरतील. पोलिसांच्या कामाचे तास वाढतील. आणि गर्दी—दंगे मोडण्याकरिता कांही सरकारी दारूगोळाहि खर्ची पडेल.

प्रथम कांही वेळ हें सर्व होईल. पण तुम्ही पुढे काय कराल हा प्रश्न सहजच मनांत येतो. तुम्ही आपला फॉरवर्ड ब्लॉक पक्ष स्वतंत्र निशाणाखाली उभा करून काँग्रेसच्याहि पुढे जाऊन स्वातंत्र्याच्या मागणींत किंवा प्रत्यक्ष चळवळींत एखादी मजल माराल? कीं काँग्रेसमध्येच समाविष्ट व्हाल व बुडून जाल ? पैकी पहिली गोष्ट केल्यास तिने आज काँग्रेस जें प्रत्यक्ष कार्य करीत आहे त्यांत थोडासा अडथळा येण्याचा संभव आहे. वास्तविक आयर्लंड व इजिप्त यांचें उदाहरण घेतलें तर एका पक्षाच्या पुढाऱ्याने इंग्रजांशी समझौता करून राज्यशकट चालविला असतां, त्यासमोर त्याच वेळीं त्याला प्रतिस्पर्धी अधिक जहाल, अधिक पुरोगामी, असा दुसरा एक पक्ष केव्हाहि असतो. आणि देशाचें पाऊल पुढे पडण्याला कदाचित् त्याची थोडीबहुत मदत होते असें म्हणतां व दाखवितांहि येऊं शकेल. परंतु आज हिंदुस्थानांत पक्षोपपक्षांची गर्दी झाली असून, कोणत्याहि लहानशा मतभेदाचा फायदा करून घेण्याला

विलायतेंतील मुत्सद्दी टपून बसलेले आहेत हें लक्षांत घेतां, काँग्रेसला तूर्त एकतंत्री धोरण पुरें करण्याची संधि मिळावी, मग काँग्रेसनेहि इतर पक्ष हळू-हळू आपणांत सामील करून घ्यावे, आणि संयुक्त पक्षघटनेने मुस्लिम लीगच्या पाकिस्तानी चळवळीला विरोध करीत करीत राज्यघटनेचा रिपोर्ट व इंग्लंडशी स्वातंत्र्याचा तह या गोष्टी शक्य तितक्या लवकर हस्तगत व्हाव्या हें एका परीने इष्ट वाटतें. तुम्ही हिंदुस्थानांत आल्याबरोबर तुम्हांला प्रेमालिंगन देऊन एकदम ' काँग्रेसचें अध्यक्षस्थान घ्या ' म्हणून गांधींनी निमंत्रण द्यावें, किंवा हंगामी सरकारांतील संरक्षणमंत्र्याच्या जागेवर एकदम तुमची नेमणूक व्हावी, या दोहोंपैकी एखादें तरी होईल अशी खात्री वाटेल तर तुम्ही हिंदुस्थानला परत यावें असें मी म्हणेन. पण तसें न झालें तर तुम्ही काय कराल? तुम्हांला स्वतंत्र सेना उभारतां येणार नाही. काँग्रेस कमिटयांतील निवडणुकी यशस्वी करतां येणार नाहीत, आणि काँग्रेसशी नुसत्या झगडयाचा देखावा मात्र होत राहील. बरें, यांपैकी कांही न होतां तुम्ही विझलेल्या निखाऱ्यासारखे राहिलां तर त्यांत तरी काय शोभा ? अशा विझलेल्या निखाऱ्याचीं उदाहरणें आजहि कांही डोळयांपुढे आहेतच. आणि तें स्वाभाविकहि आहे.

तुमच्या आझाद फौजेचे अधिकारी सरकारने पकडून इकडे आणले व त्यांच्यावर खटला भरला तेव्हा त्यांतून ते सुरक्षित बाहेर पडले त्याक्षणीं त्यांच्यावर पुष्पवृष्टि झाली. त्यांजकडे पाहून अनेकांचे डोळे दिपले. त्यांच्या मिरवणुकी निघून त्यांनी मोठमोठीं भाषणेंहि केलीं. पण पुढे काय? त्यांच्या जुन्या मार्गाने त्यांना कांहीच करितां येत नाही. आणि त्यांचा जो मोठेपणा मनाला भासला त्याला साजेसें नवें काम त्यांना चालू व्यवस्थेंत कोठे मिळालें नाही. यामुळें सामान्य माणसाप्रमाणे त्यांनी दारोदार हिंडावें, किंवा साध्या गण्या–गणप्याप्रमाणे कांही तरी करीत बसावें, असें पाहिलें म्हणजे उदात्त भावना तोंडघशी पडल्याशिवाय कशी राहील ? तसेंच तुमच्या कॅप्टन लक्ष्मीने तिकडे काय पराक्रम केला असेल तो असो. पण परवा तिच्या नवऱ्याने तिच्याविरुद्ध घटस्फोट मिळविला ही बातमी ऐकल्याबरोबर तिच्या विभूतिमत्त्वाचा पारा लोकांच्या मनांतून किती अंश खाली उतरला हें लक्षांत आल्याशिवाय कसें राहील? एका म्यानांत दोन सुऱ्या मावत नाहीत. त्याप्रमाणे तुम्ही व

जवाहरलाल नेहरू आज एकाच कार्यक्षेत्रांत चौरस बसूं शकणार नाहीं असें उघड दिसतें. कारण, स्वभावाच्या लकबी असतातच. पक्षनिष्ठाहि आडवी येते. आणि मी असेंहि म्हणण्याचें धाडस करतों की, तुमच्याशी वागतांना गांधीजींनी जी वृत्ति पूर्वी दाखविली तीच आज दाखवून आपल्या माहात्म्याला डाग लावण्यासहि ते मागे घेणार नाहीत. अर्थात तुम्ही व गांधी यांचा झगडा सुरू झाल्यास काय होईल हें लोकांना दिसत आहे.

तात्पर्य, एकेका अवताराचें एकेकच अवतारी कृत्य असतें आणि तें घडून आलें म्हणजे फिरून तेंच कार्य करण्याला त्याला अवसर नसल्यामुळे, अवतारसमाप्ति हाच त्याचा स्वाभाविक शेवट ठरतो. श्रीकृष्णाचा शेवट कसा झाला हें वाचलें म्हणजे वाईट वाटतें. वामनाने बळीला पाताळांत दडपलें पण स्वतः त्याचें काय झालें ? रामाचें पूर्व चरित्र व उत्तर-चरित्र यांची तुलना केली तर त्यांतलें लोकांना कोणचें आवडतें ? व त्याचें खरें अवतार-कृत्य त्यांपैकी कशांत दिसून येतें ? पुराण वाचणारे लोक प्रायः रामकृष्ण-चरित्रांचे शेवटचे अध्याय कधी वाचीतच नाहीत म्हणून बरें ! सुदैवानें तुम्ही प्रथमपासूनच देशभक्तीबरोबरच वैराग्यवृत्ति स्वीकारली. यामुळे तुम्ही लग्न केलें नाही, तुम्हाला संतति नाही. तुमचे जनक-जननी आज जिवंत नाहीत. अशा रीतीने सामाजिक व सांसारिक पाशांतून तुम्ही मुक्तच आहां. मग इकडे येऊन निकटवर्ती अशा कोणाच्या सहवास-सुखाचा आनंद भोगणार ? आणि जिवांत जीव असेपर्यंत तुम्ही जी हिंद-राष्ट्रसेवा करणार ती परदेशांत राहूनच तुम्हाला इकडच्यापेक्षा अधिक करतां येणार नाही काय ? मला वाटतें, कांग्रेस सरकाराने तुम्हांला कायमचे बिनसरकारी परराष्ट्रीय वकील नेमावें. तुम्ही जसे पूर्वी हिटलर-मुसोलिनी-टोजो यांच्या मुलाखती घेत होतां, तशाच आज स्टालीन-ट्रूमन-चँगकैशेक यांच्या दरबारीं जाऊन भेटी घ्याव्या. हिंदुस्थानचें गाऱ्हाणें त्यांना जाऊन सांगावें. परदेशांतून कुमक करावी. हिंदी लोकांच्या प्रत्यक्ष दृष्टीला न पडतां परस्पर जें बाहेर राहून करतां येईल तें करावें. अशानेच तुमचें विभूतिमत्त्व कायम राहील. आमच्या पुराणांतून वर्णन केलेले चिरंजीव आत्मे आहेत–अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान, बिभीषण इत्यादि. ते आहेत; पण दिसत नाहीत यांतच काय तें

खरें स्वारस्य आहे. कारण, आज व्यास प्रत्यक्ष आला तर त्याच्याजोगा आश्रम कोठून आणावा ? आणि तो आजच्या भारताचें काय महाभारत लिहील ? आणि अश्वत्थामा जर डोक्यांतील जखम भरण्याकरितां तेल मागावयाला आला तर आम्ही कोणी 'कंट्रोल असल्यामुळे घरांत खोबरेल तेल नाही' म्हणून त्याला सांगू. एकूण काय, तुम्ही–सुभाष–जिवंत असा, चिरंजीव व्हा ! तुमच्या पराक्रमाच्या वार्ता आमच्या कानीं येवोत. पण तुम्ही मूर्तिमंत हिंदुस्थानांत येऊ नका असें सांगण्याचें मी धाडस करतों. इटली स्वतंत्र करून रोम शहर राजाच्या स्वाधीन करणारा ग्यारीबाल्डी हा रोममध्ये घर करून राहिला नाही किंवा परत रोमलाहि कधी गेला नाही असें म्हणतात. रोमन योद्धा सिन्सिनेटस याने युद्ध जिंकून स्वदेशाला चिंतामुक्त केल्यानंतर तो अज्ञात स्थळीं शेतकरी म्हणून राहून जमीन नांगरीत बसला. अशाच रीतीने पराक्रमी माणसें स्वतःला नामशेष करून घेतात !

# २१. जनाब! अब देहेल्ली तो बहोत दूर नही है!

( सह्याद्रि आक्टोबर १९४६ )

दि. २ सप्टेंबर रोजी दिल्ली येथे वरिष्ठ मध्यवर्ती सरकारचा कारभार काँग्रेसने बनविलेल्या व व्हाइसरॉयने संमति दिलेल्या राष्ट्रीय स्वरूपाच्या प्रधान–मंडळाच्या हातीं दिला गेला, ही अेक अत्यंत महत्त्वाची गोष्ट झाली. आजपर्यंतच्या हिंदी राजकारणांत अेवढी मोठी गोष्ट अेकाच धाअूक घटनेने घडून आली नव्हती. स्वराज्य व स्वातंत्र्य यांचें पीठ आजवर ब्रिटिश सरकारच्या हातून हिंदी राष्ट्राच्या पदरांत पडलें तें थांबून थांबून चिमटी चिमटीने पडत होतें. परंतु दि. २ सप्टेंबर रोजीं जें घडलें त्याचें वर्णन तें पीठ वचकभर अेकदम दिलें असें करितां येअील. तथापि असें म्हणण्यानेहि केवळ स्थूलच कल्पना येते. म्हणून या नव्या महत्त्वाच्या घटनेने प्रत्यक्ष नवें काय दिलें, तथापि अद्यापि काय द्यावयाचें राहिलें आहे हें

स्पष्ट करून न सांगितलें तर कदाचित कांही लोकांच्या मनांत गोंधळ होण्याचा संभव आहे. म्हणून काय दिलें, काय न दिलें हें आपण बारीक नजरेने पाहूं या.

## काय दिलें, काय न दिलें

नव्या दिल्या अशा महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणे :-

( १ ) वरिष्ठ कार्यकारी मंडळाचें संपूर्ण हिंदीकरण.

( २ ) मंडळांतील सभासदांची निवड लोकमतानुवर्ती अशा अेका प्रबळ राजकीय पक्षाच्या हातून झालेली.

( ३ ) या मंडळाला संयुक्त अधिकार व संयुक्त जबाबदारी.

( ४ ) वरिष्ठ सरकारच्या सर्वहि खात्यांचा अधिकार पूर्ण मुखत्यारीने चालवितां येणें.

याविरुद्ध-किंवा यानंतर असें म्हणूं-२ सप्टेंबरच्या घटनेने काय दिलें नाही म्हणजे अद्यापि काय द्यावयाचें, मिळवावयाचें, राहिलें आहे तीं कलमें अशीं :-

( १ ) अिंग्लंडचा राजा हाच अद्यापि हिंदुस्थानचा राजा बादशहा आहे. तो अिंग्लंडवर कदाचित् राहो, पण हिंदुस्थानाच्या खांद्यावरून तरी अद्यापि उतरलेला नाही.

( २ ) राजा व ब्रिटिश पार्लमेंट हीं दोघें मिळून आज हिंदुस्थानावर स्वामित्व व अंतिम सत्ता गाजवीत आहेत तीं कायमच आहेत, तीं निघून गेलेलीं नाहीत.

( ३ ) हिंदुस्थानचा स्टेट सेक्रेटरी हा अद्यापि हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरलचा वरिष्ठ आहे; व तो गव्हर्नर-जनरल हिंदुस्थानांत कोणालाहि जबाबदार नसून ब्रिटिश प्रधानमंडळाला, स्टेट सेक्रेटरीमार्फत, जबाबदार आहे.

( ४ ) व्हाअिसरॉय हा वरिष्ठ कार्यकारी मंडळाचा सभासद आहे. पण तो स्वतंत्र सभासद व मंडळाचा अध्यक्ष आहे. अितकेंच नव्हे तर, प्रसंगविशेषीं केवळ तात्त्विक दृष्टीने कां होअीना मंडळाचा कोणताहि ठराव अमान्य करून रद्दबातल समजून निष्फळ करू शकेल.

( ५ ) अद्यापि सनदी सिव्हिल सर्व्हिस म्हणजे मुख्यांशाने गोऱ्या सिव्हिलिअन लोकांची भरती खालपासून वरपर्यंत आहे ती २ सप्टेंबरच्या घटनेने अेकदम बंद झालेली नाही. अर्थात् सिव्हिल सर्व्हिस परीक्षा किंवा विनपरीक्षेने होणारी परदेशी लोकांची नोकरभरती थांवली नाही.

(६) हिंदी लष्कराचा आजचा गौरकाय सेनापति हा त्याच जागेवर आहे; आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश फौजा व त्यासंबंधीचे कायदे अद्यापि कायम आहेत.

( ७ ) सन १९३५ च्या राज्यघटनेचा कायदा अद्यापि प्रभावी आहे.

( ८) संस्थानें व अिंग्रजी बादशहा यांचे स्वतंत्र संबंध अद्यापि कायम आहेत.

## प्रस्तुत घटनेचें गांधीकृत वर्णन

तात्पर्य, वर जी किंचित् आहे नाही याची फोड केली तिजवरून मिळालें त्याचें महत्त्व कळून आलें तरी जें मिळालें नाही किंवा मिळावयाचें उरलें आहे त्याचेंहि महत्त्व व मनांतील धाक शिल्लकच राहतो. प्रस्तुत घटनेचें गांधीकृत वर्णन असें आहे की, 'कॉंग्रेसने आज राष्ट्रीय स्वातंत्र्याचें केवळ द्वार उघडलें असून, ती गोष्टहि सरकारशी सहकारिता करून पदरांत पाडून घेतली.' हें वर्णन वहुतांशीं बरोबर आहे. स्वातंत्र्य–मंदिराचें द्वार उघडलें याचा अर्थ प्रवेश झाला. तथापि मंदिराच्या आंत सांठविलेल्या ज्या स्पृहणीय अशा अनेक गोष्टी त्या सर्व ताब्यांत आल्या असें नाही. एखाद्याला घराचें दार उघडून आंत येऊं दिलें व घर वापरू दिलें, तरी घराचा मालक डोळे उघडे ठेवून वरून पहातो आहे. आणि घरांत वापरण्याकरिता व त्यांतील वस्तूंचा उपभोग घेण्याकरिता हातांपायांची हालचाल सुरू झाली असतां तो केव्हा कोठे 'हां' म्हणेल, 'थांब' म्हणेल 'हात लावूं नको' म्हणेल, 'तसें करूं नको म्हणेल' याचा धाक वावरणाऱ्याच्या मनांत राहतोच. सार्वजनिक बागेच्या दारावर लावलेल्या पाटीवरून बाग सार्वजनिक आहे असें समजून मनुष्य आंत जातो; पण आंतल्या बाजूस कोठे कोठे खालील अक्षरें लिहिलेल्या पाट्याहि असतात ! किंवा पाट्याच

नसल्या तरी बागेचा रक्षक केव्हा हळूच पुढे येऊन 'फुलें तोडूं नका' 'हरळी-वरून चालूं नका' 'स्त्रियांकरिता राखून ठेवलेल्या बाकांवर बसूं नका' 'फळें तोडूं नका' 'येथे फळांच्या साली टाकूं नका' 'आपणांबरोबर कुत्रा बागेंत फिरवूं नका' 'सूर्यास्त झाला, आता आंत राहूं नका' इत्यादि हुकूम करील व दटावील याचा नेम नसतो.

## कार्यकारी मंडळाचें हिंदीकरण

या सर्व गोष्टींचा तपशीलवार विचार करणें म्हणजे हिंदी राजकारणावर एखादा ग्रंथ लिहिण्याइतकें तें भारूड होईल. म्हणून काय मिळालें, मिळावयाचें राहिलें, याची आपण तांत्रिक चांचणी करूं. पहिली गोष्ट वरिष्ठ कार्यकारी मंडळाचें संपूर्ण हिंदीकरण झालें. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण आजपर्यंत सामान्यतः या वरिष्ठ कार्यकारी मंडळांत हिंदी मनुष्य प्रथम नेमलाच जात नव्हता; व पुढे कांही हिंदी सभासद नेमण्यांत येऊ लागले तरी त्यांच्याकडे महत्त्वाचीं खातीं थोडीं किंवा मुळीच दिलीं जात नव्हतीं. आणि निर्णायक सत्ता तर नाहीच नाही, अशी स्थिति होती. तोंडावर पानें पुसून देखावा करावा करावयाचा तर, " हें पहा, हिंदी सभासद आम्ही कारभारी मंडळावर घेतले आहेत व ते आमच्या बरोबरीने बसून कामधाम करतात! परंतु त्यांच्याकडे खातीं म्हणजे अगदी सटरफटर असावयाचीं. उदाहरणार्थ, शिक्षण, आरोग्य, परदेशी गेलेल्या हिंदी लोकांचें संरक्षण, हितसंबंध इत्यादि. पण राष्ट्रांतील जमाखर्चाची व्यवस्था व वांटणी म्हणजे सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार, लष्करी नियंत्रण, परराष्ट्रीय संबंध, तार–पोस्ट, आगगाड्या इत्यादि खातीं, हवाई खातें व पोलिटिकल खातें तर सर्वस्वी–यांचा कारभार गोऱ्या मनुष्यांच्या हातींच असला पाहिजे! तो काळ्या हिंदी माणसांच्या हातीं गेला की बाटला! अशी ब्रिटिश सरकारची मनोभूमिका होती. आणि यामुळेच आतां झालेल्या पूर्ण हिंदीकरणाचें महत्त्व ठरतें. तथापि अद्यापि ब्रिटिश सिव्हिल सर्व्हिस ही 'अरेबियन नाईट' मधील सिंदबादच्या खांद्यावर चढून बसलेल्या सैतानाप्रमाणे शिल्लकच आहे.

येथे जातां जातां या हिंदीकरणाचें किंचित् सिंहावलोकन केल्यास तें उपयुक्त होईल व तें असें--१८९२ सालीं पांच हजार ते दहा हजार अितक्या सालिना पगाराच्या जागांवर शेंकडा १३ अितकेच हिंदी लोक असत आणि उरले ८७ हे युरोपियन आणि युरेजिअन असत. आणि सालिना १० हजार रुपयांच्या पगारावरच्या जागांमध्ये ३ टक्के हिंदी लोक व ९७ टक्के गौरकाय लोक असत.पुढे १९१५ पर्यंत खालील स्थिति होती:– महिना दोनशे रुपये पगारावरच्या जागांवर ४५०० हिंदी आणि ५००० गौरकाय होते. महिना १००० हून अधिक पगाराच्या जागांवर सुमारें १५० हिंदी व १६०० गौरकाय लोक होते. आणि महिना ३००० रुपयां-हून अधिक पगाराच्या जागांवर फार तर २ किंवा तीन टक्के हिंदी असून ९७ गौरकाय होते. या वेळीं हिंदुस्थानांत राहणारे फक्त १ लक्ष गौरकाय असतां, त्यांना दर ४५ लोकांमागे एक अितक्या मोठ्या पगाराच्या जागा मिळत. आणि सुमारे दर ५४ हजार हिंदी लोकांपैकी अवघा एकच हिंदी गृहस्थ असे. १९२४ च्या सुमारास ही स्थिति किंचित् बदलली. युद्धापूर्वी शेंकडा ९३ मोठ्या पगाराच्या जागा गौरकायांना व अवघ्या ६ जागा हिंदी लोकांना मिळत.

## हिंदीकरण म्हणजे स्वराज्याची अर्धी मजल

तात्पर्य, हिंदीकरणाच्या दृष्टीने अद्यापहि पुष्कळच काम व्हावयाचें आहे. परंतु वरिष्ठ प्रधान–मंडळांत आता सगळे हिंदीच लोक आले याचें महत्त्व असें की, हिंदीकरण म्हणजे स्वराज्याची अर्धी मजल गांठणें होय. कोणत्याहि अधिकाराच्या जागेवर युरोपियन असणें आणि हिंदी मनुष्य असणें, यांत तत्त्वतः आणि व्यवहारतः फारच फरक पडतो. कारण वरिष्ठ सत्ता परक्याच्या हातीं असली तरी देखील हिंदी अधिकारी हा थोडेबहुत स्वदेशाच्या हिताच्या दृष्टीने पाहणारच. याशिवाय या अधिकाऱ्याला मिळणाऱ्या पगाराचा पैसा सर्व या देशांत राहतो हाहि फायदाच आहे. हिंदी संस्थानांत अद्यापि लोकसत्तेचें राज्य स्थापन झालेलें नसलें तरी, हुज-ऱ्यापासून हुजुरापर्यंत बहुतेक सर्व हिंदी अधिकारीच असतात. तेथे गोरा अधिकारी सहसा दृष्टीस पडत नाही. ही संस्थानांच्या वादाच्या बाबतींत

संस्थानांतर्फे व अनुकूल म्हणून एक गोष्ट सांगण्यांत येते व ती त्यापुरती खरीही असते.

परंतु आता वरिष्ठ मंत्रिमंडळांत बहुतेक सर्व सत्ता हिंदी लोकांच्या हातीं असल्यामुळे, सरकारी नोकऱ्यांतून गोऱ्या लोकांचें उच्चाटण लवकरच झाल्याखेरीज राहणार नाही. सनदेच्या हक्काने आलेले गोरे लोक क्रमशः कमी होतील, त्यांची नवी भरती बंद होईल, आणि अशा रीतीने हिंदीकरण सर्वत्र दृष्टीस पडेल. केवळ तज्ज्ञ व विशिष्ट ज्ञानयुक्त म्हणूनच जे कांही थोडे गोरे लोक ठेवणें अवश्य वाटेल तेवढेच ठेवले जातील. त्यांचे पगारहि कमी राहतील. आणि विशेष हें की, ते हल्लीसारखे अरेराव न राहतां विनीत आज्ञाधारक नोकर म्हणूनच राहतील. एक व्हाअिसरॉयच तेवढा किंवा कांही प्रांतिक गव्हर्नर कदाचित् थोडे दिवस गौरकाय रहातील. परंतु सर्व मुलकी नोकरवर्ग तरी हिंदीमय होईल. अशा रीतीने लष्करहि सर्वस्वी हिंदीमय होईल. परंतु त्याला किंचित् अवधि लागेल.

## हिंदीकरणानंतरचा सत्ताधिकार

हिंदीकरणानंतर सत्ताधिकार ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेण्याची आहे. वरिष्ठ कार्यकारी मंडळांत संयुक्त मतदारपद्धतीने जो कारभार होईल तो सर्वस्वी लोकमतानुवर्ती होईल हें सांगावयासच नको. तात्त्विक दृष्ट्या व्हाअिसरॉयच्या हातीं 'व्हेटो' म्हणजे अंतिम नामंजुरी तूर्त राहील. परंतु तो अधिकार व्हाअिसरॉय फार जपून वापरील याविषयीं शंका नको. कारण त्याने तो वापरला म्हणजे पेचप्रसंगच उत्पन्न झाला. परंतु चाल क्रमाने पाहतां हिंदुस्थानांतील अंतर्गत कारभार व सत्ता रुपयांत १२–१४ आणे तरी हिंदी जनतेच्या हातीं आली असें म्हणण्यास हरकत नाही. संयुक्त जबाबदारीने मंत्रिमंडळ बंदिस्त संघटित आणि बलवान् होतें.एका मंत्र्याला काढून टाकणें सोपें. परंतु सबंध मंत्रिमंडळांत क्रांति होणें ही गोष्ट फार जोखमीची ठरते. तात्पर्य,व्हाअिसरॉयच्या हातीं अंतिम नामंजुरीचा अधिकार असला तरी तो जवळ जवळ नाही असें समजून चालावयास हरकत नाही. मंत्रिमंडळाचा राजीनामा ही गोष्ट यापुढे सोपी रहाणार नाही. तो राजीनामा म्हणजे नवें भांडण, नवी चळवळ, नवा संग्राम, असेंच स्वरूप त्याला राहील.

ही नवी व्यवस्था 'अिंटेरिम गव्हर्नमेंट' म्हणजे 'तात्पुरतें सरकार' अशा नांवाने संबोधिली जाते, याचेंहि स्वारस्य आहे. कारण याच्यापुढची तावडतोबीची घटना म्हणजे हिंदी राज्यघटनासमितीची बैठक ही होय. तिच्या भवितव्याविषयी आज कांही निश्चित बोलतां येत नाही. परंतु हंगामी सरकार, घटना-समिति, इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील तह, त्यावर आधारलेलें ब्रिटिश पार्लमेण्टच्या सत्तात्यागाचें बिल, अशा गोष्टी क्रमाने दिसूं लागतात. आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीने त्या आशाप्रद वाटतात.

## कॉंग्रेसचें ध्येय

अशा रीतीने वरिष्ठ अधिकाराच्या केंद्रस्थानीं राष्ट्रीय सभेला आपल्या पसंतीचें मंत्रिमंडळ नेमतां आल्यामुळे, लोकसत्तेचें पाऊल एकदम पुष्कळ पुढे पडलें ही गोष्ट निर्विवाद असून,तिचें श्रेय कांग्रेसचे चालक व पुढारी यांना देणें सर्वस्वी न्यायाचें ठरेल. कांग्रेसच्या आजपर्यंतच्या धोरणाविषयी जें नापसंतीचें म्हणून आम्हांला बोलावयाचें होतें तें आम्ही वेळोवेळी बोललोंच आहों. त्यांत आम्ही कांहीहि उपेक्षा केलेली नाही, व पुढेहि करणार नाही. परंतु १९२० पासून आज सतत २५ वर्षें तोच एक कांग्रेस पक्ष व बहुश: त्याच त्या प्रमुख चालक पुढारी व्यक्ति टिकून राहून, त्यांना योग्य वाटेल तें धोरण ठेवून कां होईना चळवळी करून, पण स्वराज्य व स्वातंत्र्य यांचें ध्येय डोळ्यांपुढे ठेवून त्यांनी देशभक्तीच्या प्रेरणेने जो उद्योग केला, आणि आज जें मर्यादित कां होईना यश त्यांना लाभलें त्याकरिता त्यांचें सर्वस्वी अभिनंदन करणें योग्य होईल. म्हणून अितरांप्रमाणें तें आम्हीहि खऱ्या व मोकळ्या मनाने करतों.

असहकारितेच्या चळवळीच्या सुरुवातीपासून कांग्रस पक्षाच्या पुढाऱ्यांचा जो एक गट निर्माण झाला तो आज वीस-पंचवीस वर्षें एकत्र टिकून राहिला आहे. त्यांत फारशी फाटाफूट झाली नाही, भांडणें झालीं नाहींत, ही गोष्ट त्यांना भूषणास्पद आहे आणि अितर पक्षांना अनुकरणीय आहे, असें आम्हांस वाटतें. म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, श्री. राजगोपाळाचारीअर, बाबू राजेंद्रप्रसाद, मौलाना

अबुल कलम आझाद–तसेच प्रांतोप्रांतीं असलेले कांग्रेस पक्षाचे पुढारी–या सर्वांची जूट राहिल्यामुळे आपलें चुकलेलें किंवा बरोबर वाटणारें धोरण त्यांनीं एकमताने ठरविलें व पार पाडलें. १९२३ सालीं कांग्रेस पक्षांतून स्वराज्य पक्ष निघाला व पुढे त्यांतून प्रतिसहकार पक्ष निघाला. यांपैकी प्रतिसहकार पक्ष हा कांग्रेसच्या मध्यवर्ती मंडळांतून बाहेर पडला तरी पं. मोतीलाल नेहरू यांच्यासारखे पुढारी मरेपर्यंत कांग्रेसचेच पुढारी म्हणून राहिले. त्यांनी कांग्रेस पक्षाची ही सेवा केली की, शुद्ध असहकारितेचें स्वरूप बदलून ती शबल असहकारिता केली. म्हणजे स्वतःला योग्य वाटेल तेव्हा कौन्सिलप्रवेश करावा, योग्य वाटेल तेव्हा मंत्रिमंडळें स्थापावीं आणि बाहेरच्याप्रमाणें सरकारच्या अंतरंगांतूनहि दाब पाडून स्वराज्याच्या चळवळीला बळ मिळवून द्यावें असें धोरण–म्हणजे कांही अंशीं प्रतिसहकारितेचेंच धोरण–कांग्रेसला नवें शिकविलें.

यांत महात्मा गांधी व ही अितर मंडळी यांचे मतभेद झाले नाहीत असें नाही. गांधीजी व पंडित नेहरू यांची मनोभूमिका केव्हा कधी एकच होती? राजगोपालाचारी हे कट्टर कॉंग्रेसवाल्यांच्या मतें दगाबाज ठरलेच की नाही? तथापि गांधी व नेहरू यांच्यांतील मतभेद विकोपाला तर कधी गेलेच नाहीत; परंतु बाहेर चव्हाटयावरहि फारसे आले नाहीत.असहकारिता, अहिंसा, परराष्ट्रीय चळवळीचा तिरस्कार, विधायक कार्यक्रमाचा जुलूम, या सगळ्या गोष्टींत गांधींनी वेळोवेळी नमतें घेतलें.आणि या अितर मंडळींनी वडिलांना फक्त नमस्कार करावा आणि पुढील पुण्याहवाचनाचें सर्व कार्य आपण आपणाला वाटेल तसें अुरकावें, असा अुभयपक्षीं जणू कांही समजुतीचा करार ठरावा त्याप्रमाणें आज वीस वर्षे कांग्रेस पक्षाच्या बालेकिल्ल्यांतील व्यवहार सुरू आहे. विठ्ठलभाई पटेल कांग्रेसशी तिरकसपणाने वागणारे; परंतु ते कांग्रेसचे खास प्रतिनिधि म्हणून वरिष्ठ विधिमंडळाचे अध्यक्ष झाले व राहिले. राजगोपालाचारीअर दगाबाज ठरले. तरी फिरून आज वरिष्ठ कार्यकारी मंडळांत त्यांचा समावेश झालाच.या गटाचें खरें भांडण झालें असें सुभाषचंद्र बोस यांच्याशी. आणि तोहि बहाद्दर असा की, या गटाचा विरोध गुंडाळून घेऊन कांग्रेसचा अध्यक्ष झालाच! आणि आज स्वातंत्र्यफौजेचा

पराक्रम दृष्टोस पडल्यावर या गटाने सुभाषबाबूंच्या वडील भावाला आपल्यांत घेतलें. तात्पर्य, आज या गटाचा बेवनाव कांही उरला आहे तो कांग्रेस सोशालिस्ट व प्रच्छन्न कम्युनिस्ट यांच्याशी उरला आहे, तथापि श्री. जयप्रकाश नारायण या जहाल पक्षाच्या पुढाऱ्याला कांग्रेस वर्किंग कमिटींत घेण्यांत आलें आहे. अशा रीतीने या पक्षाने आपली संघटना बलवान व यशस्वी केल्यामुळे, व्हाअिसरॉयाचें आव्हान स्वीकारून आपण दिलेल्या यादीबरहुकूम त्याला वरिष्ठ मंत्रिमंडळ बनवितां आलें आहे.

## कांग्रेसचें निवडणुकींतील वाढतें यश

१९३७ सालीं व १९४६ सालीं कांग्रेस पक्षाने सर्व हिंदुस्थानांत निवडणुकी किती प्रमाणांत जिंकल्या हें पाहिलें म्हणजे कांग्रेसची ही एकजूट कशी यशस्वी झाली हें दिसून येअील.

प्रांतवार कांग्रेसच्या प्रतिनिधींची संख्या

| क्रमांक | प्रांत | १९३७ | १९४६ |
|---|---|---|---|
| १ | वायव्य सरहद्दप्रांत | १९ | ३० |
| २ | सिंध | ७ | २१ |
| ३ | आसाम | ३३ | ५९ |
| ४ | ओरिसा | ३६ | ४७ |
| ५ | मध्यप्रांत | ७० | ९२ |
| ६ | पंजाब | १९ | ५१ |
| ७ | मुंबई | ८६ | १२८ |
| ८ | संयुक्त प्रांत | १३४ | १५३ |
| ९ | मद्रास | १५९ | १६५ |
| १० | बंगाल | ५२ | ८६ |
| ११ | बिहार | ९२ | ९८ |

वरील आकड्यांवरून गेल्या दहा वर्षांत कांग्रेसने सरकारी विधिमंडळांत आपलें बळ किती वाढविलें हें दिसून येईल. आणि देशांतील लोकमत अजमावण्याचें अेक साधन म्हणून कौन्सिल निवडणुकींतील यश हें मानलें तर त्यावरून हें यश कांग्रेस पक्षाच्या पदरांत किती पडलें हें उघड दिसून येतें. आणि हें यश अितकें निर्णायक ठरतें की, हंगामी मंत्रिमंडळ निवडण्याची वेळ आली तेव्हा, मुस्लिम लीगने असहकार केला तरी, कांग्रेसच्या

यादीबरहुकूम व्हाअिसरॉयला तें मंत्रिमंडळ बनवावें लागलें. या निवड-णुकींतील हें यश मिळण्याला महायुद्ध, कायदेभंगाची चळवळ, १९४२ ची गुंडगिरीची चळवळ, आयत्या वेळीं सुभाषचंद्र बोसच्या आझाद सैन्याच्या पराक्रमाचें कौतुक करण्याचा पान्हा फुटल्याचा देखावा दाखवून उत्पन्न केलेला हिंसास्वीकाराचा देखावा, अित्यादि गोष्टींचा फायदा किती झाला असेल याची चिकित्सा करण्याचें कारण नाही. बोध घ्यावयाचा तो अितकाच की, अुलटसुलट हवें तसें वागून, तत्त्वभ्रष्टतेचा आरोप सोसून, किंवा प्रत्यक्ष तत्त्वभ्रष्ट होऊन, मित्रांना लाथा मारून व शत्रूच्या गळीं पडून खोटें प्रेम दाखवून, म्हणजे सूक्तासूक्त युक्तायुक्त कांहीहि करून, विसंगतीची लाज न बाळगून, कांग्रेस पक्षानें आज हंगामी सरकार प्रस्थापित करण्यापर्यंत मजल नेली, हें त्याचें श्रेय त्याच्या प्रतिपक्षालाहि मान्य करावें लागेल.

१९३७ व १९४६ या दोन सालांत झालेल्या निवडणुकींचे आकडे खाली दिले आहेत त्यांवरून या नअू–दहा वर्षांत मुस्लिम लीगनेहि आपलें बळ कसें वाढविलें हें दिसून येअील.

प्रांतवार मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींची संख्या

| क्रमांक | प्रांत | १९३७ | १९४६ |
|---|---|---|---|
| १ | सरहद्द | ० | १७ |
| २ | सिंध | ० | २७ |
| ३ | आसाम | १० | ३१ |
| ४ | ओरिसा | ० | ४ |
| ५ | बिहार | ० | ३४ |
| ६ | मध्यप्रांत | ५ | १३ |
| ७ | पंजाब | १ | ७५ |
| ८ | मुंबई | १८ | ३० |
| ९ | संयुक्त प्रांत | २६ | ५४ |
| १० | मद्रास | १० | २८ |
| ११ | बंगाल | ३९ | ११४ |

वरील तक्त्यावरून हें दिसून येईल की, जेथे १९३७ साली शून्य आंकडा दाखविला आहे तेथें मुस्लिम लीग या नांवाने तेव्हा पक्ष निर्माण झालेला नव्हता. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, तेथें अितर मुसलमान पक्ष नव्हते. उदाहरणार्थ, सरहद्द प्रांतांत कांग्रेसशिवाय कोणत्याहि पक्षांत

समाविष्ट नसलेले असे २१ मुसलमान होते. सिंध प्रांतांत मुस्लिम लीग पक्ष नव्हता, तरी गुलाम हुसेन हिदायतुल्ला पक्ष १६ आणि आझाद पक्ष १ असे १७ मुसलमान होते. ओरिसा प्रांतांत कांग्रेसशिवाय संयुक्त पक्ष ६, स्वतंत्र ६, नॅशनल पक्ष ४ व अितर ४ यांत मिळून मुसलमान सभासद वांटून गेले होते. बिहार प्रांतांत लीग पक्ष नव्हता तरी १९३७ साली युनायटेड मुसलमान पक्ष ६, अहरार ३, बिनपक्ष मुसलमान २७ असे वांटून गेले होते.

यावरून दिसून येईल की, प्रांतानिहाय ज्या मुसलमान सभासदांच्या जागा ठरल्या होत्या ती वट्ट संख्या मुस्लिम लीगला अर्थातच वाढवितां आली नाही. परंतु फुटकळ, तुटक, लोंबकळते, स्वतंत्र निराधार असे मुसलमान सभासद होते त्या बहुतेकांना जिना हे गेल्या नऊ वर्षांत मस्लिम लीग पक्षांत ओढू शकले.

## कांग्रेस व लीग यांव्यतिरिक्त पक्षांचें बळ

एकंदर विधिमंडळांतून कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांनीच बहुतेक जागा व्यापलेली आहे, आणि उरली ती किती थोडी आहे हें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

(आंकडे १९४६)

| क्रमांक | प्रांत | कांग्रेस | मुस्लिम लीग | अितर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सरहद्द | ३० | १७ | २ | ४९ |
| २ | सिंध | २१ | २७ | ११ | ५९ |
| ३ | आसाम | ५९ | ३१ | १५ | १०५ |
| ४ | ओरिसा | ४७ | ४ | ४ | ५५ |
| ५ | बिहार | ९८ | ३४ | ५ | १३७ |
| ६ | मध्यप्रांत | ९२ | १३ | ४ | १०९ |
| ७ | पंजाब | ५१ | ७५ | ४९ | १७५ |
| ८ | मुंबई | १२८ | ३० | ११ | १६९ |
| ९ | संयुक्त प्रांत | १५३ | ५४ | २१ | २२८ |
| १० | मद्रास | १६५ | १८ | १६ | १९९ |
| ११ | बंगाल | ८६ | ११४ | ३३ | २३३ |

यावरून लीगनेहि आपलें बळ किती कसें वाढविलें हें दिसून येईल. एकीकडे कॉंग्रेसच्या दृष्टीने मद्रास प्रांत बलिष्ठ (१६५) तर दुसरीकडे मुस्लिम लीगच्या दृष्टीने बंगाल प्रांत बलिष्ठ (११४). याशिवाय पंथिक, अकाली, स्वतंत्र, युरोपियन असे किरकोळ पक्ष आहेत. पैकी युरोपियन पक्ष सर्वांत बंगाल प्रांतांत बलिष्ठ आहे (२३) व त्या खालोखाल मद्रास मुंबई येथे (दोन्ही मिळून ७ + ६ = १३).

## हिंदुमहासभा आणि कॉंग्रेसी हिंदु

हिंदुमहासभा हाहि एक पक्ष म्हणून सुप्रसिद्ध आहे. तथापि सर्व हिंदुस्थानांत मिळून या पक्षाचे म्हणून निवडलेले बंगाल्यांत २ व मुंबई इलाख्यांत १ मिळून तीनच सभासद आहेत! सर्व हिंदुस्थानांत हिंदूंची लोकसंख्या सर्वांत मोठी असें असतां हिंदु या नांवाच्या पक्षाला तीनच सभासद मिळावे हें अर्थांतच एक कोडें वाटतें. परंतु त्याचा उलगडा असा की, प्रबळ कॉंग्रेस पक्षांत शेकडा ९०–९५ इतके जातीने धर्माने हिंदु लोकच आहेत. आणि बॅ. जिना कॉंग्रेस पक्षाला 'हिंदु कॉंग्रेस' म्हणतात ते याच आधारावर. आता यांत बारीक श्लेष आहे तो इतकाच की, कॉंग्रेसमधले हे हिंदु स्वतःला उघडपणे हिंदुत्वनिष्ठ न म्हणतां राष्ट्रीय असें म्हणवून घेतात. आणि त्यांच्यावर हिंदुमहासभेचा आरोप आहे तो हा की, कॉंग्रेसी हिंदु हा खऱ्या लोकसत्ताक राज्याचीं तत्त्वें नीट पाळीत नाही, व त्यांतूनहि हिंदूंच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांना जागा मिळण्याचा आग्रह न धरतां सर्व बाबतींत मुसलमानांकडे झुकता काटा ठेवतो. हा झुकता काटा इतका की, पूर्वी रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचा जातीय निवाडा झाला, जिनासाहेबांनी सर्वत्र हिंदूंच्या बरोबरीचे हक्क (पॅरिटी) मुसलमानांना मागितले, किंवा प्रत्यक्ष पाकिस्तानचा सवता सुभा मागितला. तरी अगदी कालपर्यंत कॉंग्रेसने त्यावर स्पष्ट मत दिलें नव्हतें. असें असतांहि निवडणुकींत हिंदु मतदारांनी कांग्रेसला मतें दिलीं. हिंदुमहासभेला मतें दिलीं नाहीत! वास्तविक हिंदु मतदारांनी यांत खरा समजूतदारपणा दाखविला नाही. परंतु लोकराज्यांतील मतदारपद्धति लक्षांत घेतां, म्हणजे मतदान झालें तें शेवटीं गुप्तपणानेच झालें हें लक्षांत घेतां,

कोणत्याहि कारणाने कां होईना पण त्यांना योग्य वाटलें तें त्यांनी केलें असेंच म्हणणें शेवटीं प्राप्त आहे. याविषयी हिंदु मतदारांचें अज्ञान असेल तर त्यांना नांवें न ठेवतां, हिंदुमहासभेने आपलें कार्य अधिक जोराने करावयास पाहिजे होतें, इतकाच यांतून बोध निघेल.

पण सुदैवाने आता कांग्रेसने पाकिस्तानाविरुद्ध बऱ्याच अंशाने मत प्रकट केलें आहे. आणि लीगची तमा न बाळगतां हंगामी सरकार स्थापून राज्यघटनासमितीचा मार्ग खुला करून दिला आहे. अेवढेच नव्हे तर जनाब जिनांच्या दंडुकेशाहीला योग्य अुत्तर देअून प्रतिकार करण्याचा निश्चय प्रत्यक्ष कृतीने दर्शविला आहे. म्हणून हिंदुमहासभेचें कार्यच थोडयाबहुत अंशाने पदरांत पडल्यामुळे, तिचा कांग्रेसला विरोधहि त्याप्रमाणाने शिथिल व कमी होअील आणि व्हावाहि. हिंदुमहासभेला जें कार्य स्वतःला करतां आलें नाही तें कांग्रेसने करून दाखविल्यामुळे त्याचें योग्य तें श्रेय कांग्रेसला दिलेंच पाहिजे. कदाचित ही गोष्ट लक्षांत घेऊन डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी व बॅ. जयकर यांनी घटनासमितीवर आपली निवडणूक कांग्रेसच्या साहाय्याने करून घेतली असेल !

## कांग्रेसचें कर्तव्य

यानंतर अेक गोष्ट मात्र अिष्ट वाटते ती ही की, कांग्रेस पक्ष हा हळूहळू फॅसिस्ट, नात्सी, कम्यूनिस्ट अशा पक्षांच्या वळणावर जात आहे अशी शंका येअू लागली असल्यामुळे, ती शंका निराधार आहे असें दाखवून देण्याच्या मार्गाला कांग्रेस लागेल तर बरें होअील. हिंदुमहासभेसंबंधाने कांग्रेसच्या धोरणांत फारशी सुधारणा होण्याचा संभव दिसत नाही.परंतु कांग्रेस सोशालिस्ट पक्षासंबंधाने तिचें मतपरिवर्तन होत आहे असें दिसतें. फॉरवर्ड ब्लॉकचे पुढारी सुभाषचंद्र बोस हे स्वतः अुद्या हिंदुस्थानांत अवतरले तर कांग्रेस त्यांना कसें वागवील हें सांगणें कठीण आहे ! परंतु सुभाषबाबूंचे बंधु शरच्चंद्र बोस यांना हंगामी मंत्रिमंडळांत घेतलें हें आम्ही शुभचिन्हच समजतों. आमचें म्हणणें अितकेंच की, कांग्रेसने केलेल्या कार्याबद्दल तिला योग्य तें श्रेय देण्याला अितर कोणत्याहि पक्षाने तयार असावें हें जसें खरें,तसेंच कांग्रेसनेहि अितर सर्व पक्षांशी सलोख्याने वागावें हें तितकेंच अिष्ट आहे. अुद्या स्वतः

कांग्रेस झाली तरी काय ती नात्सी फॅसिस्ट कम्युनिस्ट या वळणावर जाओल ? आणि जाओल तर मग ती खरी लोकशाही कसली ? सुलतान-शाही गुंडशाही असेंच तिला म्हणावें लागेल. परवा वेव्हिन याने म्हटल्या-प्रमाणे 'The gap between Russia and the West is really unbridgeable so long as Russia defines democracy in terms of a single party, a single list of candidates, a secret police and a controlled press.' कांग्रेस ही वरील वर्णनांत पुढे केव्हाहि पडूं नये अशी अिच्छा कोण करणार नाही ? मग घडेल तें खरें !

## हंगामी सरकारशी सहानुभूति

कॉंग्रेस पक्षाला हंगामी सरकार बनवितां आलें याकरिता त्याचें जसें अभिनंदन केलें पाहिजे, तसेंच हंगामी सरकारची जबाबदारी अंगावर घेणाऱ्या व्यक्तींना सहानुभूति दाखविणें हेंहि अवश्य आहे. अधिकारग्रहण करतांच त्यांच्यासमोर मुस्लिम लीगने उठविलेले दंगे उभे राहिले. याचा दोष जरी सर्वस्वी लीगवर येतो तरी अधिकारग्रहण हें त्याला निमित्त तरी ठरतें. यामुळे पंडित नेहरू यांना भांबावून गेल्यासारखें होणें शक्य आहे. परंतु या परिस्थितीला निर्धाराने तोंड देण्याचें त्यांनी ठरविलें आहे असें दिसतें. आणि या कामीं त्यांना लोकमताचा पाठिंबा मिळणें अवश्य आहे. सुदैवाने आज हिंदी सैन्यांत अजून शिस्त कायम आहे. नाही तर स्थिति अधिकच बिकट झाली असती! आम्हांला खरोखरच अजूनहि वाटतें की, लीगचा मतप्रचार सैन्यामध्ये शिरल्यास सैन्याच्या बंडाचा प्रसंग १८५७ सारखा पुनः येतो की काय? फरक हा की, त्या वेळीं हिंदु व मुसलमान बंडवाले एक होते. पण लीगविरुद्ध कॉंग्रेस व सरकार असा तंटा उपस्थित झाल्यास, हिंदी सैन्याचे हे दोन विभाग परस्पर लढायला उभे राहतील आणि मोठाच संहार होईल. परंतु स्वतः बॅ. जिनाच झालेल्या दंग्यावरून बोध घेऊन आपल्या धोरणाचा फेरविचार करतील असा संभव डोकावूं लागला आहे. आणि तसें घडल्यास पाकिस्तानवादाचा प्रचार व हंगामी सरकारला विरोध करण्याकरिता बंड करण्याची चळवळ सैन्यांत शिरणार नाही. दुर्दैवाने अशा प्रचंड आपत्तींची कल्पना करण्याची वेळ आली आहे

खरी. म्हणूनच हंगामी काँग्रेस सरकारला सहानुभूति दाखविणें योग्य होईल.

## बॅ. जिनांच्या अरेरावीला कारण

मात्र बॅ. जिना यांना आजच्या या दुर्दम अरेराव पदवीला पोचवून स्वतःच्या पायांत खोडा घालण्याचा सर्व दोष कोणालाहि काँग्रेस व त्यांतूनहि म. गांधी यांना द्यावा लागेल. बॅ. जिनांच्या मागण्यांची वाढ व अराष्ट्रीय धोरणाची परिणति यांना कारण काँग्रेसचें जुनें चुकीचें धोरणच ठरतें. कल्पना करा की, १९२० पासून परवा हंगामी सरकारने अधिकारग्रहण करीपर्यन्त, काँग्रेस व गांधी असेंच म्हणत राहिले की " मुसलमानांनो या; तुम्ही आमच्याबरोबर आल्याशिवाय आम्हांला स्वातंत्र्य मिळणार नाही. आणि तुम्ही आमच्याबरोबर येण्याकरिता मागाल ती किंमत आम्ही देण्यास तयार आहों, " तर मुसलमानांनी तरी काय करावें ? शेफारलेल्या मुलाचे लाड पुरवीत गेल्याने कुटुंबांत जी आपत्ति येते तीच गांधींच्या अविचाराने आज हिंदुस्थानावर आली आहे. बँकेवरील कोऱ्या चेकाची देणगी ही खाजगी व्यवहारांत जशी घातक ठरूं शकेल, तसेंच गांधींनी मुसलमानांना देऊं केलेल्या कोऱ्या चेकचें अभिवचन हिंदी राजकारणाला घातक ठरलें आहे. उलट " याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय, आणि विरोधी व्हाल तर तुमच्याशीहि लढून " असें त्रिदळात्मक आव्हान काँग्रेसने मुसलमानांना प्रथमपासूनच द्यावयास हवें होतें. आणि ही सूचना मुळीच नवीन नसून, टिळकपक्ष व हिंदुमहासभा नक्की हीच सूचना कांग्रेसला आज पंचवीस वर्षें करीत आली आहे. पण गांधींना व काँग्रेसला आपल्या अहंकाराच्या धुंदींत ही गोष्ट पटेचना त्याला काय कोणी करावें? पण शेवटी हा उपदेशच मान्य करून हंगामी सरकार स्थापण्यास मान्यता द्यावी लागली. विषवृक्षाने मूळ धरलें म्हणजे पुढे त्याचा विस्तार होणारच. त्याप्रमाणें खिलाफत चळवळीला दाखविलेल्या सहानुभूतीच्या मुळांतून कालांतराने पाकिस्तानच्या मागणीचा विषवृक्ष कसा निर्माण झाला हें आता जगाने पाहिलेंच आहे. अर्थात् टिळकपक्ष व हिंदुमहासभा यांना आज जरी निवडणुकी

जिंकतां आल्या नाहीत तरी त्यांचें धोरण व उपदेश खऱ्या शहाणपणाचा होता अशी कबुली तरी काँग्रेसला द्यावी लागेल.

## लीगची उष्टी चळवळ

मात्र कांग्रेसचें चुकलें म्हणून जिनांचें बरोबर असें कोणी तिऱ्हाईत म्हणू शकणार नाही. अेक चुकला म्हणून दुसऱ्याचें चूक तें बरोबर कसें ठरणार ? गांधी कोरा चेक द्यावयाला निघाले तरी, रकमेच्या कोऱ्या जागेंत काय आंकडा लिहावा याला तारतम्य लागत नाही काय ? पण शेवटी बॅ. जिना यांनी जो आंकडा लिहिला तो असा लिहिला की, तितका पैसा चेक देणाऱ्याच्या खातीं बँकेंत शिल्लकच नव्हता ! चढेलपणाला जग मान डोलवीत जातें, व त्या मान डोलविण्याने फिरून चढेलपणा चढत जातो, त्याप्रमाणे काँग्रेस व जिना यांची अेकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया झाली. आणि शेवटी दोघेहि अेकमेकांवर नाराज होअून स्वतः फजीत झाले. तथापि बॅ. जिना यांनी जो पुढचा मार्ग पत्करला तो सर्वस्वी अनिष्ट व निंद्य असा आहे. मौज ही वाटते की, मुस्लिम लीगने कांग्रेसशी विरोध करतांना जी चळवळ म्हणून आरंभिली तीहि अुष्टी अशी कांग्रेसकडूनच घेतली ! मात्र पदरची भर घातली ती फक्त हिंसेची. पण लीगच्या लक्षांत हें आलें नाही की, कांग्रेसकडून घेतलेल्या असहकारितेच्या चळवळीप्रमाणे आपली चळवळहि निष्फळ होणार. पदव्या टाका, सरकारी नोकऱ्या सोडा, या आदेशाची पुनरुक्ति वाचून आम्हांला तर हसूं आलें ! कारण फुकटांत मिळालेल्या मोठ्या मानाच्या व पगाराच्या नोकऱ्या सोडण्याअितके मुसलमान निःस्वार्थी आहेत असें आम्हांला वाटत नाही.

## जिनांनी ही धमक दाखवावी

गांधींच्या अहिंसावादाचें दडपण असल्यामुळे कांग्रेसच्या चळवळींत १९४२ पर्यंत प्राणनाशाचें कलम शिरलें नव्हतें. अुलट मुसलमानांनी प्रथमच जी चुणूक दाखविली तींत 'राक्षस' ही पदवी यथार्थपणे लावतां यावी अितकी क्रूरता, अमानुषता त्यांनी प्रकट केली. पण लीगच्या हें लक्षांत येत नाही की, कलकत्त्यांत किंवा मुंबईंत प्राणाला मुकले ते कोण ? असे निर-

पराधी हजारो लोक मारण्याचें पाप मात्र पदरीं पडेल, पण त्याने पाकिस्तान मिळणार नाही ! बॅ. जिना यांना आमची अशी सूचना आहे की, त्यांनीं ही बायकांपोरांची कत्तल करण्याची चळवळ टाकून द्यावी. आणि ते प्रामाणिक असतील तर, त्यांनी पंजाबांत जाअून तेथील जनतेंतून राष्ट्रीय सैन्य अुभारावें, पंजाबच्या सरहद्दीवर खडे राहावें, पंजाब, सिंध, वायव्यप्रांत, क्वेट्टा, बलुचिस्तान हीं सर्व पाठीशीं घालावीं, आणि समांतर स्वतंत्र राज्य स्थापावें आणि मग काय होतें तें पाहावें ! हें त्यांना करतां आल्यास कदाचित त्यांची पाकिस्तानची मागणी कोणी न देतांच स्वावलंबनाने पदरीं पडेल. कारण गांधीप्रणीत नेहरू कदाचित् म्हणतील की, "जाअूं द्या. होअूं द्या पाकिस्तान निर्माण. अुत्तर द. अमेरिकेच्या युद्धाप्रमाणे हिंदुस्थानांत आम्हांला युद्ध अुभें करावयाचें नाही. एखाद्या प्रांताला संघांतून फुटून जाण्यास प्रारंभींहि आम्ही सवलत देण्याचें कबूल केलें आहे, तर ती सवलत मुस्लिम लीगने अमलांत आणली असें फार तर म्हणूं. पण हिंदी सैन्याला मध्यवर्ती सरकारच्या हुकुमाने पंजाबवर स्वारी करण्यास पाठविणार नाहीं." असें झालें तर पाकिस्तान आयतें सिद्धच झालें ! अुलट लीगने अुभारलेल्या राष्ट्रीय सैन्याला लढावें लागलें तर मग, रणदेवता जो कौल देईल तो स्वीकारणें कोणालाहि प्राप्त असतेंच. म्हणण्याचें तात्पर्य अितकेंच की, लीगने अुघड बंडाचा व युद्धाचा ( चोरट्या भोसकाभोसकीचा नव्हे ! ) कार्यक्रम स्वीकारल्यास त्याला आम्ही तरी नांवें ठेवणार नाही. कारण "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें" या अुक्तीवर आमची श्रद्धाच आहे. पण कलकत्ता–मुंबअीच्या गल्ली–कुचींतून बायकांपोरांना भोसकून, चिरून, जाळून मारण्याने काय मिळणार ?

## मूर्खपणाची प्रतिक्रिया

सुदैवाने या मूर्खपणाच्या कार्यक्रमाची प्रतिक्रिया लीगवर होअूं लागली आहे असें किंचित् लक्षण दिसतें. शिवाय मुसलमानांच्या तिप्पट हिंदूंची लोकसंख्या आहे हें लीगने विसरू नये. आणि मारामारीला प्रारंभ जरी मुसलमान करतो तरी शेवटी हिंदूंचीच सरशी होते हें त्यांनी अनुभविलेंच आहे.

शिवाय ब्रिटिश लोकमतालाहि कत्तली करण्याचें धोरण मानवत नाही असें त्यांना दिसून आलें. नेहरूंच्या भाषणांतहि दरवाजा अुघडा ठेवल्याची भाषा आता आली तेव्हा जिनांनाहि वाटू लागलें असावें की, सामोपचाराने घेतलें तर कांग्रेसच्या भोळ्या शंकराकडून आपणाला हवें तें बहुतेक मिळविता येअील. म्हणून पूर्वी एक वेळ गांधींनी व्हाअिसरॉय, स्टेट सेक्रेटरी यांच्या-कडून आशाळभूत भिक्षुकाप्रमाणे बोलावणें बोलाविण्याची खटपट केली, तशी बॅ. जिना हे विलायतेस जाअून मंत्रिमंडळाचें मन वळविण्याची कारवाअी साधते का हें पाहूं लागले आहेत. तूर्त आम्ही आशा अितकीच करतों की या कारवाअींत जिना यांनी मान्य केल्याप्रमाणें हंगामी सरकारचें काम चालू राहावें, त्यांतून राष्ट्रीय हिताचीं फळें जनतेच्या पदरांत पडूं लागावीं आणि राज्यघटनासमितीच्या कामाला जोराने प्रारंभ व्हावा.

---

# २२. ब्रिटिश साम्राज्याचा ऱ्हास

( सह्याद्रि जुलै १९४७ ).

**जयांसि भुकेलिया आमिषा। हें विश्व न पुरेचि घांसा ॥**
**कुळवाडी यांचिया आशा। चाळीत असे ॥ –ज्ञानेश्वरी ३–२४६**

Empire is the best winding sheet

**( मरावें पण साम्राज्य गाजवून )– अेक रोमन म्हण.**

**१८९७** सालीं लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला, त्यांत सरकारने आक्षेप घेतलेलें अेक वाक्य असें होतें––

'हिंदुस्थानांत राज्य करण्याचा ताम्रपट अीश्वराने अिंग्रजांना दिलेला नाही!'

**१९४७** सालीं साम्राज्यशाही अिंग्रज आपलें चंबुगवाळें घेअून हिंदुस्थान सोडून जाण्याच्या घाअींत आहेत! यावरून टिळकांचें वाक्यच खरें ठरत नाही काय? अवघ्या पन्नास वर्षांत घडलेलों

अेवढी मोठी क्रांति काय दर्शविते ? हेंच की साम्राज्यांना अुदयाप्रमाणें अंतही असतो !

१९१४ व १९३९ सालीं सुरू झालेल्या दोन महायुद्धांत अिंग्रज विजयी झाले. यामुळे कोणाचीहि स्वाभाविक अपेक्षा हीच असणार की अिंग्रजांचें साम्राज्य हिंदुस्थानांत यापुढे दृढमूल होणार ! पण खरोखर घडलें तें मात्र अगदी याच्याविरुद्ध. १९१८ पासूनच अिंग्रजी साम्राज्याच्या ऱ्हासाला आंतून प्रारंभ झाला. कारण तेव्हाच हें दिसून आलें की, ब्रिटिश राष्ट्र हें जातीनें दुर्बळ आहे. केवळ अिंग्लंड हें बेट असल्यामुळे पूर्वी नेपोलियनला त्यावर स्वारी करितां आली नाही. आणि त्याच कारणानें हिटलरने डंकर्कच्या विजयानंतर अिंग्लंडवरच स्वारी करावी ती केली नाही, म्हणून अिंग्लंडची अब्रू बचावली.

पहिल्या युद्धांतील अिंग्लंडचा विजय हा फ्रान्स, अमेरिका व हिंदुस्थान यांच्या साहाय्यामुळे झाला. पण त्या युद्धामुळे तें राष्ट्र अेकदम वरच्या पायरीवरून खालच्या पायरीवर आलें. त्यापूर्वीहि, १९०६ सालीं, ना. गोखले हे अिंग्लंडहून अिकडे परत आले, तेव्हा तिकडील अेक लोकप्रवाद म्हणून ते सांगत असें मला आठवतें. तो असा की, जगाच्या मतानें अिंग्लंड हें बाहेरून आपल्या सामर्थ्याचा आव आणतें तो खरा म्हणजे साधार नाही. समजा अेखादा रेल्वेचा प्रवासी मारे अैटीनें पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसून प्रवास करतो आहे. परंतु खरोखर त्याच्या हातांत तिकीट आहे तें मात्र दुसऱ्या वर्गाचें हशील भरलेलें ! लहानसहान स्टेशनांवर तो मोठ्या दिमाखानें मगरूरी करितो. धाक दाखवितो. हवें तें हवें तसें करून घेतो. पण मोठें स्टेशन किंवा गाडी बदलण्याचा प्रसंग आला म्हणजे त्याला तिकीट तपासणाऱ्या अधिकाऱ्यापुढे तोंड चुकवावें लागतें. आणि तें न साधतां त्या अधिकाऱ्याची गांठ पडून त्यानें तिकीट तपासलें म्हणजे दंड भरावा लागतो, किंवा खजील होअून लाचारी पत्करावी लागते.

अिंग्लंडचेंहि असेंच झालें आहे. पूर्वी जगभर त्यानें साम्राज्याचा विस्तार केला, तेव्हा त्याची गाठ कनिष्ठ, मागासलेल्या, हीन कर्तृत्वाच्या लोकांशी पडली. यामुळे त्याला प्रतिष्ठा मिरवितां आली. परंतु खोटें नाणें बाजारांत

किती दिवस चालणार ? यामुळे खरी परीक्षाच आली तेव्हा अिंग्लंडला आपला दुर्बळपणा मान्य करावा लागला. आणि या दुर्बळतेमुळेच त्याला आज पासिफिक महासागरांतील लढाअू ठाणीं, व्यापारपेठा, आणि हिंदुस्थानहि सोडून जावें लागत आहे. नेणत्या लोकांना, हें सर्व पाहून, पौर्णिमेचा चंद्रच अवचित गळून खाली पडावा असें वाटल्यास काय आश्चर्य ? पण जें घडलें तें सर्व सकारण घडलें आहे.

## साम्राज्य परवडेना !

हिंदुस्थानांतून अिंग्रजांना आपलें साम्राज्य अुठविण्याचीं कारणें थोडक्यांत खालीलप्रमाणे म्हणून सांगतां येतील :—

या दोन महायुद्धांत मिळून अिंग्लंडची अेक तरुण पिढी जवळ जवळ खलास झाली. साम्राज्य संभाळण्याकरिता बाहेर अिंग्रज सैन्य लाखांनी मोजण्याअितकें ठेवावें लागतें. त्याचा खर्च त्या भागांतील अुत्पन्नापेक्षा अधिक ठरतो. हे सैनिक लोक देशांतून बाहेर राहिल्यामुळे, स्वदेशांत शेती कारखानदारी व अितर रीतीने अर्थोत्पादन करण्यास हवें तितकें मनुष्यबळ लाभत नाही. देशांतील लोकसंख्येंत यथाप्रमाण वाढ होत नाही. स्त्रीपुरुषांचें मिळून कुटुंबजीवन हें स्थिर असेल तरच प्रजा निर्माण होअू शकते. देशांतील तरुण पुरुषांची बेसुमार संख्या बाहेर राहिल्यामुळे प्रजाजनन होत नाही. अवैध स्त्रीपुरुषांच्या संगतींत अपत्यजननाविरुद्ध प्रयत्न होतात. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य हवेंसें वाटूं लागल्यामुळे त्या अविवाहित राहू अिच्छितात, व विवाह केला तरी संततिनियमनाचे अुपाय अुपयोगांत आणितात. जीवनोपयोगी पदार्थांची टंचाअी व बेसुमार महागाअी झाल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला अेकटें राहणें आवडू लागतें. बाहेरचें साम्राज्य सोडलें तरी खुद्द अिंग्लंडांतच भारी फौज, आरमार, विमानदळ ठेवावें लागतें, त्याचा खर्च अिंग्लंडला आता झेपत नाहीसा झाला आहे. आपला वडेजाव संभाळण्याकरिता अिंग्लंड बाहेरच्या लहानसान राष्ट्रांना कर्जे देतें, परंतु स्वतः अिंग्लंडला अमेरिकेकडून कोटयवधि रुपयांचीं कर्जें काढावीं लागलीं आहेत, व तीं परत देण्याला अिंग्लंडजवळ आज शक्ति नाही. अतिपूर्वेकडील व्यापार संपुष्टांत आला.

तेथील ठाणीं, वसाहती अुठवाव्या लागल्या. यामुळे व्यापाराचें पाअूल मागे पडलें. बाहेर साम्राज्य होतें त्या भागांत अुद्या तेथील लोकांचें राजकीय स्वराज्य प्रस्थापित झाल्यास, त्या भागांतील लोकांना अनुकूल अशीं बंधनें अिंग्लंडच्या निर्यात व्यापारावर पडण्याचा दाट संभव अुत्पन्न झाला. त्याच वरील कारणामुळे मुलकी लष्करी खात्यांतील कनिष्ठच काय पण वरिष्ठ अधिकाराच्या जागा तद्देशियांना मिळाल्या पाहिजेत, असा हक्क सांगण्यांत येऊ लागला. यामुळे ज्या अुरल्या थोड्या मुलकी लष्करी जागा त्या ब्रिटिशांना मिळणार. तेवढ्याकरिता या परकीय मुलुखांतील राज्यकारभार अिंग्लंडांत चालविण्याला लागणारा खर्च अिंग्लंडला जड वाटूं लागला आहे.

पगारी सैन्याचा खर्च फार म्हणून तें कमी करावें तर अैनजिनसी सैन्य कमी पडतें. आणि आयत्या वेळीं आपखुषीने होणारी लष्करभरती युद्धकार्याला पुरी पडत नाही. शिवाय या हंगामी शिपायांना लष्करी शिक्षण हवें तसें मिळत नाही. म्हणून अिंग्लंडांत सक्तीच्या लष्करी शिक्षणाला प्रारंभ करण्यांत येत आहे. परंतु अिंग्रज लोकांना मनांतून तें प्रिय नाही. या कारणामुळे युद्धेंच मुळांत थांबवावीं असा विचारप्रवाह अिंग्लंडांतील जनतेंत अधिक प्रभावी होत आहे. या बाहेरच्या युद्धांत हिंदुस्थानचा पैसा व सैन्य अुपयोगी पडत होतें पण आता युद्धेंच थांबवायचीं तर हिंदुस्थान हातीं ठेवण्याचा काय अुपयोग ! अुलट हिंदुस्थानांत राष्ट्रीय चळवळ अितकी जोरदार सुरू झाली आहे की, तिजपुढे अिंग्लंडचा टिकाव यापुढे लागणें कठिण. पगारी हिंदी लष्करांतहि राष्ट्रीय स्वाभिमानाची ज्योत फुलू लागली आहे. आणि हिंदी सैन्य बेदिल होअून केव्हा तोंड फिरवील याचा नेम नाही. नेताजी सुभाष बोस यांच्या हिंदुस्थानावरील स्वारीने ही गोष्ट अुघडकीस आणली आहे. १९१४ च्या व १९३९ च्या युद्धांचें समर्थन करितांना अिंग्लंड व अमेरिका यांनी स्वयंनिर्णय व राजकीय स्वातंत्र्य या अुदात्त तत्त्वांची घोषणा व पुरस्कार केला. त्या तत्त्वांकडे अंगुलिनिर्देश करून हिंदुस्थानसारख्या राष्ट्रांना युद्धसाहाय्य करण्याच्या भरीस घातलें. अर्थात् युद्धें जिंकल्यावर ती घोषणा कृतींत अुतरविणें अवश्य प्राप्त झालेंच. आणि हें कृतींत अुतरविणें म्हणजे त्या त्या साहाय्यकारी लोकांना स्वातंत्र्य देअून टाकणें याशिवाय दुसरा मार्ग कोणता !

## प्रगतीचें मुंगीचें पाऊल

याहून आणखी वेगळीं कारणें म्हणून कांही सांगतां येतील. तथापि सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, अिंग्रजांना आता साम्राज्य परवडेनासें झालें आहे. जगाला आश्चर्य वाटतें तें अेवढेंच की, अिंग्रजांनी साम्राज्यसत्ता अितकी सुखासुखी कशी सोडली ? त्यांची साम्राज्याविषयीची पूर्वीची आसक्ति पाहिली तर आज हिंदुस्थानांत घडणारी गोष्ट हा राजकारणाच्या अितिहासांतील अेक चमत्कारसा वाटतो. अमेरिकन लोकांवरील सत्ता अिंग्रजांनी सोडली ती प्रत्यक्ष युद्धांत पराभव पावल्यामुळेच. आणि हिंदुस्थानांतहि अिंग्रज हा शेवटच्या खंदकांत अुभा राहून लढून मरेपर्यंत तो आपली सत्ता सोडणार नाही असेंच सर्वांना वाटे.

अिंग्रजांनी हिंदुस्थानांतील प्रजेला पूर्वी जे राज्याधिकार दिले त्यांची चाल मुंगीच्याच काय पण गोगलगाअीच्या गतीअितकी मंद होती. यावरून अिकडील साम्राज्य शक्य तोंवर न सोडण्याचा त्यांचा निर्धार अुघड होतो. याचीं कांही अुदाहरणेंच घेअू. १८९२ सालीं हर्बर्ट पॉल या पार्लमेंटच्या सभासदाने दादाभाअी नवरोजी यांच्या प्रयत्नाने पार्लमेंटाकडून असा 'ठराव' करवून घेण्यांत यश मिळविलें की, 'सिव्हिल सर्व्हिस परीक्षा अेकच व ती अिंग्लंडांत घेतली जाते त्या अैवजी ती परीक्षा अिंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांत घेतली जावी.' अुद्देश हा की सिव्हिल (मुलकी) सर्व्हिसमध्ये हिंदी तरुणांची भरती अधिकाधिक व्हावी. हा ठराव म्हणजे कांही कायदा नव्हता व पुढे तो ठराव तेव्हा अमलांतहि आला नाही. तथापि झालो होच गोष्ट अिकडील लोकांना अितकी महत्त्वाची वाटली की, त्या आनंदाप्रीत्यर्थ मुंबअींत कांही लोकांनी रोषणाअी केली म्हणतात ! या सुधारणेने वरिष्ठ मुलकी नोकऱ्यांचें कांही थोडें हिंदीकरण झालें असतें. तें सत्तासंक्रमण मुळीच नव्हतें ! यानंतर वीस वर्षांनी रॉयल पब्लिक सर्व्हिस कमिशन अिकडे आलें. त्यापुढे साक्षी देणाऱ्या हिंदी देशभक्तांना 'अेकंदर सिव्हिल सर्व्हिसच्या जागांपैकी शेंकडा पन्नास अितक्या जागा हिंदी लोकांकरिता राखून ठेवाव्या' अशी मागणी करणें म्हणजे आपण ही मोठी धाडसाची गोष्ट करतों असें वाटलें. लष्करी वरिष्ठ नोकरीसंबंधाने तर याहून अधिक अडचण ठरली.

१९२४ सालीं स्कीन कमिटी नामक अेक चौकशी-समिति नेमली. तिचा अुद्देश वरिष्ठ लष्करी जागांच्या हिंदीकरणाचा होता. परंतु तिचें काम चालू असतां अिंग्रज अधिकारी निर्लज्जपणाने अशा योजना मांडीत की, लष्करांतील वरिष्ठ जागांचें पूर्ण हिंदीकरण व्हावयाचें तर त्याला शंभर वर्षें तरी सहज लागतील ! १९०५ सालीं कै. गोपाळराव गोखले यांनी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून भाषण करितांना हिंदुस्थानाला वसाहतींच्यासारखें स्वराज्य मिळणें हें हिंदी राष्ट्राचें ध्येय, पण ध्रुवताऱ्यासारखें 'अंतिम ध्येय' म्हणून पुढे मांडलें. टिळकांच्या तोंडून 'तावडतोब संपूर्ण स्वराज्य हवें' असे शब्द कधीं निघाले नाहीत. त्यांचा संतोष त्या वेळीं 'होमरूल'ने होणार होता. आणि १९२८ सालीं पंडित मोतीलाल नेहरू यांनी सर्वपक्ष-परिषदेची म्हणून मागणी केली ती देखील वसाहतीच्या स्वराज्याच्या स्वरूपाचीच.

## महायुद्धाने घडविलेलें स्थित्यंतर

हिंदी राजकीय राष्ट्रीय आकांक्षांच्या अुल्लेखाचा हा क्रम पाहिला म्हणजे १९४७ सालीं हिंदुस्थानला संपूर्ण स्वराज्य मिळेल असें अनुमान कोणालाच करतां आलें नसतें. परंतु हें आता घडलें खरें. आणि ही गोष्ट गेल्या दोन महायुद्धांमुळेच घडून आली. केवळ हिंदी राष्ट्रीय चळवळीने ती घडून आली असें कोणालाहि प्रामाणिकपणें म्हणतां येणार नाही.

१९१४ व १९३९ च्या महायुद्धांनी अिंग्लंडप्रमाणे हिंदुस्थानाचीहि पुष्कळच हानि झाली. परंतु या हानींतूनच स्वराज्यप्राप्ति निघाली. हिंदुस्थानावर अिंग्रजांची सत्ता, यामुळे त्याला स्वतःची खरी अिच्छा नसतांना या महायुद्धांत पडावें लागलें. मनुष्यहानि कांही झाली. पैशाची हानि तर फारच झाली. देशांत अुपासमार व कायमची महर्गता प्रस्थापित झाली हें सर्व खरें; तथापि खालीलप्रमाणें लाभहि झाले : १. हिंदी लोकांचें शौर्य वीर्य युद्धकौशल्य जगाच्या निदर्शनास आलें. २. निःशस्त्रीकरणामुळे राष्ट्र मनाने दुबळें झालें होतें त्याला हातीं हत्यार पडलें तर आपणहि अितर पुढारलेल्या राष्ट्रांप्रमाणें पराक्रम करू असा आत्मविश्वास अुत्पन्न झाला. ३. अिंग्रजांविरुद्ध सशस्त्र अुठावणी करण्याचा संभव पूर्वी मनांत येत नव्हता तो येअू लागला व शक्यहि

वाटू लागला. ४. दुसऱ्या लोकांच्या स्वातंत्र्यदानाकरिता आपण जगभर लढलों तर तें स्वातंत्र्यदान स्वतःकरिता मागणें हा न्यायाचा हक्कच आहे, अशी मनःप्रेरणा झाली. ५. स्वार्थाकरिता कां होओीना, ‘स्वयंनिर्णय व स्वातंत्र्य हाच युद्ध-कार्यांत आपला अुद्देश होय’ हें अिंग्रजांना अितकें स्पष्ट व पुनःपुन्हा तोंडाने म्हणावें लागलें की, केवळ त्याच्या आधाराने अिंग्रजांचें तोंड बंद करून स्वराज्याची मागणी करितां आली. ६. युद्धांत हिंदी जनतेची अुपासमार झाली, परंतु त्यामुळे अिंग्लंड हा ऋणको व हिंदुस्थान हा धनको अशी स्थिति निर्माण झाली.

## स्वराज्याच्या विहिरीला पाणी कसें आलें ?

या स्थित्यंतराचें वर्णन खालील कल्पित गोष्टीने करितां येअील. ‘निर्जल अशा अेका गांवीं अेका गृहस्थाने अत्यंत परिश्रम करून आपल्या बागेंत विहीर निघावी म्हणून अेक फार खोल खड्डा खणला. तो अितका खोल गेला की, पाणी तर निघालें नाहीच, पण याहून अधिक खोल जाणें म्हणजे श्रमाचा व पैशाचा दुरुपयोग करणें होय, असें वाटून तो निराश झाला. पण कर्मधर्मयोगाने असें घडलें की, त्या गांवच्या अेका चोराने शेजारच्या छावणींतून डायनामाअीटच्या बऱ्याचशा कांड्या चोरून आणल्या. आणि पोलीसतपास चालू झाला तेव्हा त्या लपवाव्या म्हणून त्या चोराने त्या गृहस्थाने खणलेल्या खोल खड्ड्यांत अुतरून ठेवून दिल्या. नंतर अेक दिवस वरच्या बाजूने अेक मोठा दगड खड्ड्यांत पडला तो नेमका या कांड्यांच्या जुडग्यावर ! त्याबरोबर डायनामाअीट अुडून अेवढा प्रचंड स्फोट झाला की, त्याने घराचें सर्व छपरच्या छपर अुडून जाअून घर अुजाड झालें. या गोष्टीचें दुःख करीत तो गृहस्थ दुसऱ्या दिवशीं बागेंत गेला, आणि त्याने विहिरीकरिता खणलेल्या खड्ड्यांत सहज डोकावून पाहिलें तों त्याला असें दिसलें की त्या स्फोटामुळे विहिरीच्या तळाचे खडक फुटले, आणि त्यांतून मोठमोठे झरे निघून अेका रात्रींत विहीर निम्मी अधिक पाण्याने भरून वर आली. घराचें छपर अुडून गेलें तें पुन्हा चढविणें ही गोष्ट सर्वस्वी हातची, पण विहिरीला पाणी भरपूर लागणें ही गोष्ट पराधीन ती पदरांत पडली हा त्या चोराच्या अुपद्व्यापाचा फायदा झाला. तसेंच

कांहीसें या दोन महायुद्धांमुळे घडलें. आर्थिक दृष्टया हिंदुस्थानचें टाळकें सडकलें व घर अुजाड झालें; पण स्वराज्याच्या विहिरीला पाणी निघून विहीर भरली. कांही असो, अवघ्या दीडशे वर्षांत हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य नष्ट होअून हिंदुस्थानाला राजकीय स्वातंत्र्य मिळणार मग तें टिकविण्या-भोगण्याला त्याला आनुषंगिक श्रमसायास कितीहि पडोत किंवा संकटें सोसावीं लागोत.

## मजूरपक्षाची इमानदारी

हिंदुस्थानाला स्वातंत्र्य द्यावें, तेथील साम्राज्याचें ठाणें उठवावें, आजवर जमविलेलें वैभव मोडीला घालावें, ही गोष्ट इंग्लंडांतील साम्राज्यवादी पक्षाला अत्यंत अप्रिय. पण करणार काय ? चर्चिलला जगभर महायुद्ध जिंकतां आलें. तथापि घरची पार्लमेंटरी निवडणूक जिंकतां आली नाही ! मजूर पक्ष अधिक इमानदार. स्वातंत्र्यदान व स्वयंनिर्णय यांतच खरी न्यायबुद्धि आहे हें त्या पक्षाला मनांतून खरें पटलेलें. पण १९३१ सालीं या पक्षाला लाभलेल्या आऊट घटकेच्या वर्चस्वांत ही गोष्ट त्याला मनाप्रमाणें करतां आली नाही. पुढे अनेक वर्षें मजूर पक्षाचा म्हणविणारा पुढारी रॅमसे मॅकडोनाल्ड हा प्रधानमंडळांत एक प्रधान किंवा मुख्य प्रधान होता. परंतु तें मंत्रिमंडळ बोलून चालून संयुक्त, एकमेकांच्या खांद्यावर आधारलेलें, एकमेकांना संभाळून वागणारें, शिवाय रॅमसे मॅकडोनाल्ड हा हाडाचा जनतावादीच नव्हे. यामुळे त्याला हिंदुस्थानचें कांहीच हित करितां आलें नाही.

पण एकंदरीने मजूरपक्ष हा मनाने आता खरा स्वातंत्र्यवादी ठरला. त्याने गेली निवडणूक जिंकून स्थिरपद होतांच, आर्थिक गृहस्थिति लक्षांत घेऊन, आणि ध्येयवादाला जागून, हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचा उपक्रम केला. आणि स्वत: चर्चिल याने प्रथम जरी विरोध केला तरी आता त्यानेहि या उपक्रमाला संमति दिल्यामुळे येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत हिंदुस्थानाला कॅनडा ऑस्ट्रेलिया आयर्लंड यांच्याप्रमाणे 'डोमिनियन स्टेटस'–म्हणजे व्यवहारत: संपूर्ण स्वराज्याचे अधिकार–मिळणार. आणि हिंदुस्थानांत आज दीडशें वर्षे गोरा अिंग्रज शेफारून जाऊन दिमाखाने तोऱ्याने गर्वाने सत्ताधारी म्हणन वावरला तो किंचित् काळाने, कोणत्याहि अधिकाराच्या स्थानीं

दिसणार नाही. अजूनहि पुडे कांही दिवस गोरें सैन्य पाकिस्तानांत, किंवा संस्थानांतून, किंवा हिंदुस्थानच्या सरहद्दीवर, हिंदुस्थानच्या संरक्षणार्थ दिसत राहील असा कांही लोकांचा तर्क आहे. पण आत्मरक्षण हें आपलें आपण न करितां, अठराव्या एकोणिसाव्या शतकांतल्या बाजीराव–निजामा-प्रमाणे आम्हांपैकी कोणीहि ( हिंदुस्थानाने पाकिस्तानाने संस्थानिकांनी) तें गोऱ्या परकी भाडोत्री सैन्यावर अवलंबून ठेवलें, तर आम्ही हिंदी लोक स्वातंत्र्याला नालायक आहों हें कायमचेंच सिद्ध होणार नाही काय ?

पण याला अगदी जुना दाखला नाहीच असें म्हणतां येणार नाही. कारण स्वतः इंग्लंडने कांही शतकें रोमन साम्राज्याच्या अमलाखाली घाल-विल्यावर, रोमन लोकांनी स्वतःच्या अडचणींमुळे इंग्लंडांतील आपलें सैन्य परत बोलावलें, त्या वेळी " हें सैन्य परत नेऊ नका, तें आमच्यावर स्वारी करणाऱ्या स्वकीय–परकीयांपासून रक्षण करण्याला राहू द्या, " असें म्हण-णारे कांही ब्रिटिश लोक निघालेच!

## इंग्रजाचा समजूतदारपणा

तें कांही असो, परंतु हिंदुस्थानांतून साम्राज्याचें ठाणें उठवून नेतांना, पूर्वीच्या अपेक्षेप्रमाणे अिंग्रजांनी वैताग व्यक्त न करतां सौजन्य दाखविलें, याविषयी त्यांना योग्य तो भलेपणा देणें प्राप्त आहे. यापूर्वीचा अनुभव असा होता की, हिंदी प्रजेवर अधिकार गाजविणारा गोरा इंग्रज जितक्या अधिक खालच्या दर्जाचा तितका तो अधिक मस्तवाल मगरूर उर्मट विन-माणुसकीचा असावयाचा. आणि याच्या उलट वरिष्ठ दर्जाचा इंग्रज अधि-कारी हा संभावित, शिस्त संभाळणारा, माणुसकी ओळखणारा असावयाचा तीच गोष्ट आजहि अनुभवाला आली आहे.

न दहति रविरपि तादृक् यादृक् परिदहति वालुकानिकरः
अन्यस्मात् लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति ।

आज दीड वर्षभर पार्लमेंटचे सभासद, स्वतः ब्रिटिश राज्य–मंत्री, व व्हॉअिसरॉय यांच्या व हिंदी पुढाऱ्यांच्या ज्या प्रहरान् प्रहर अत्यंत निक-राच्या वैठकी झाल्या, त्यांतहि वरीलप्रमाणेच अनुभव आला ही गोष्ट ऐक-

ण्यांत येते. आणि परका सत्ताधारी म्हणून इंग्रज आपणाला कितीहि अप्रिय वाटला तरी या प्रसंगीं प्रकट झालेले त्याचे सौजन्याचे गुण स्पृहणीय व अनुकरणीय होत, हें कोणालाहि मान्यच करावें लागेल.

पूर्वी अमेरिकेने इंग्लंडशी प्रत्यक्ष लढून स्वराज्य व स्वातंत्र्य प्रस्थापित केलें, तेव्हाहि इंग्रज राजाने असाच संयम व समजूतदारपणा प्रकट केल्याचें सांगतात. अमेरिका व इंग्लंड यांचा तह झाल्यावर, स्वतंत्र राष्ट्र म्हणून अमेरिकेला बरोबरीच्या नात्याने आपला वकील इंग्लंडच्या राजदरबारीं पाठविण्याचा हक्क प्राप्त झाला. त्याप्रमाणे तो वकील येऊन दाखल झाल्यावर तिसऱ्या जॉर्ज बादशाहाने दरबार भरविला, त्यांत अमेरिकन वकिलाचें सत्कारपूर्वक स्वागत केलें, आणि त्याचें मुखत्यारपत्र हातीं घेऊन राजाने भाषणहि केलें. त्यांत असे अुद्‌गार काढले की, "आमचें व आमच्या अमेरिकन जातभाअींचें युद्ध संपलें व दोस्तीचा तह झाला, याबद्दल मला आनंद वाटतो. खरें बोलावयाचें तर अमेरिकेशी मिळतें न घेऊन युद्ध चालू ठेवण्याची पराकाष्ठा करणारांत मी स्वतःच प्रमुख होतों. तथापि झालें तें होअून गेलें. तो विरोध करणारा मीच आज तुमचें, म्हणजे स्वतंत्र अमेरिकन राष्ट्राच्या वकिलाचें, स्वागत मनःपूर्वक करितों. यापुढे अिंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें बंधुप्रेमानेच वागतील." आणि बहुधा त्याप्रमाणें घडलेंहि.

## अिंग्लंड व अमेरिका

आता यानंतर पुढील काळांत अिंग्लंड व अमेरिका यांच्यामध्ये मतभेद व कुरबुरी अगदीच झाल्या नाहीत असें नाही. १८१२ सालीं तर, अिंग्लंडने नेपोलियनचा आरमारी कोंडमारा करण्याचा प्रयत्न केला त्यावेळीं, अमेरिकेच्या व्यापारी जहाजांना अुपद्रव होअूं लागला. तेव्हा अिंग्लंड व अमेरिका यांचें युद्ध जुंपण्याचीच वेळ आली होती ! अमेरिकेचा ओढाहि मनाने अिंग्लंडविरुद्ध होता. परंतु तेव्हा तें युद्ध टळलें. त्यानंतर 'आपण युरोपांतील भानगडींत पडावयाचें नाही ' असा आत्मनिर्बंधच जणु अमेरिकेने स्वतःवर घालून घेतला. परंतु तो १९१४ च्या महायुद्धांत टिकला नाही. फिरून १९१८ चा तह झाल्यावर आपल्या जुन्या, आत्मसंयमाची आठवण अमेरिकेला

झाली! आणि प्रेसिडेंट विल्सन यांच्या विद्यमाने झालेला व्हर्सायचा तह अमेरिकेच्या राष्ट्रसभेने मंजूर केला नाही. पण फिरून १९३९ च्या महा-युद्धांत अमेरिका सामील झालीच. आणि आता तर अमेरिकेने नुसतें युरोप-च्याच काय पण सर्व जगाच्या राजकारणांत हात घालावयाचा विडाच अुच-लला आहे. आणि हें नवें धोरण अमलांत आणण्याकरिता जगभर राष्ट्रांना कर्जे देअून आपलें अंकित केलें आहे, विमानतळ बांधले आहेत, रशियाविरुद्ध तरवार अुपसली आहे, आणि या कामीं मदत व्हावी म्हणून अिंग्लंडला आपला आश्रित बनविलें आहे. दुसरे पक्षीं, अमेरिका ही पूर्वी आपली तावेदार वसाहत होती ही गोष्ट विसरून, वर सांगितलेल्या जॉर्ज राजाचें धोरण अिंग्लंडने पुढे चालविलें आहे, अितकेंच नव्हे तर अमेरिकेपुढे लाचारी पत्क-रली आहे. मात्र अमेरिकेची ही मैत्री आपणाला भोवेल की काय अशी भीतीहि अिंग्लंडला मनांतून वाटू लागली आहे. अिंग्लंडलाहि अमेरिकेप्रमा-णेच रशिया हा आपला शत्रु वाटत आहे. यामुळे ही मैत्री तूर्त टिकेलसें दिसतें. परंतु राक्षस व ठेंगू या गोष्टींतल्याप्रमाणे भावी युद्धाचे आघात आप-णास सोसवेनासे झाले तर अिंग्लंड अमेरिकेची 'गडी फू:' केल्याशिवाय राहणार नाही.

## नव्या दमाच्या शिकाऱ्याचा जुना कुत्रा

१९१४ व १९३९ च्या दोन युद्धांतील या मैत्रीने असें दिसलें की, अमेरिका हा नव्या दमाचा एक शिकारी आहे व अिंग्लंड हा त्याचा अेक आवडता जुना शिकारी कुत्रा आहे. आणि या शिकाऱ्याला शिकारीची हौस आली म्हणजे किंवा कुत्र्याच्याहि प्रेरणेनें हे दोघे शिकारीला बाहेर पडत. पण सांगतात त्या गोष्टीप्रमाणें अेकदा कुत्र्याला शेपटीखाली जखम झाली अशा स्थितींत शिकाऱ्याला शिकारीची लहर आली. तेव्हा शिकारीला जावें तर जखम दुखते, न जावें तर धनी नाराज होतो, आणि आपलें दुःख तर धन्याला सांगतां येत नाही, अशी कुत्र्याला पंचाअीत येअून पडली. या गोष्टी-वरून म्हणच पडली कीं, 'कुत्ता रोवे × × × दर्दसे–मालिक बोले चलो शिकार.'

कांहीं असो. अमेरिका व अिंग्लंड यांच्या संबंधाच्या या अितिहासावरूनहि हेंच दिसून येतें की, जगांत भवितव्यतेच्या लीलेनें श्रेष्ठाचा कनिष्ठ व कनिष्ठाचा श्रेष्ठ होअू शकतो. पण हें ओळखणें हाच समजूतदारपणा ठरतो. पूर्वी कोकणच्या कान्होजी आंग्र्यानें अिंग्रज वकिलाला खडसावून म्हटलें होतें म्हणे की, 'जगांत शाश्वत असें कांहीं नसतें हें अिंग्रज दर्यावर्दी लोकांनी ध्यानांत ठेवावें!' पण तें सांगणाऱ्या आंग्र्याचें आरमारच स्वत: पुढे किती दिवस टिकलें? आणि त्यानंतर अिंग्रजांचें आरमारी वर्चस्व दीडशे वर्षे जगभर राहिलें तरी आता विमानविद्येच्या प्रगतीमुळे तेंहि संपुष्टांत येत चाललें आहे. पण सांगण्याचा मुद्दा हाच की, आपल्या पायाखालची वाळू घसरून जात आहे हें जाणत असतां साम्राज्यवादी अिंग्रज आपला तोल सुटलेला नाही हें दाखविण्याची पराकाष्ठा करीत आहे. हा त्याचा सत्त्वगुणच म्हणावा लागतो. आपल्या हातानें आपलें साम्राज्य गुंडाळून घेत असतां अिंग्रज ही जी मनोवृत्ति दाखवीत आहे ती अनुकरणीय नाही असें कोण म्हणेल? लॉर्ड माअुंटबॅटन यांनीं 'मी हिंदुस्थानचा शेवटचा व्हाअिसरॉय आहें' असे शब्द तोंडांतून काढल्याचें मी वाचलें तेव्हा माझ्याहि तोंडून न कळत शब्द निघाले की, 'शाबास, जगभर प्रचंड साम्राज्य स्थापणाऱ्या अिंग्रजांच्या पराक्रमाच्या मोठेपणाला शोभण्यासारखेच हे डोळस त्यागवृत्तीचे शब्द आहेत!'

## अिंग्रजाबद्दलचीं दोन मतें

ब्रिटिश मजूरपक्ष, प्रधानमंडळ, व व्हाअिसरॉय हे सर्व साम्राज्यविसर्जनाच्या वेळीं हिंदुस्थानाच्या भावी सुस्थितींत अितक्या साक्षेपाने लक्ष घालीत आहेत याचे दोन परस्पर विरोधी अर्थ करतां येतात, व तसे ते करण्यांत येतहि आहेत. अेका पक्षाचें म्हणणें असें की, "अिंग्रज हा साम्राज्यवादी असला तरी मनानें सुसंस्कृत आहे. दीडशे वर्षांच्या सहवासानें त्याला हिंदुस्थान देशासंबंधानें व हिंदुस्थानच्या लोकांविषयी प्रेमच नसलें तरी अेक प्रकारचें अगत्य अुत्पन्न झालें आहे. आपण जाणार तर त्यांना तोंडानें कल्याणप्रद आशीर्वाद द्यावा, अितकेंच नव्हे तर हातानें कल्याणप्रद अशी कांहीं सुव्यवस्था करतां आली तर तीहि करावी, असें अिंग्रजाला वाटत

आहे हें खरें. मग हें त्याला आपल्या सुसंस्कृत राजनीतीमुळे वाटो किंवा कृतज्ञतेमुळे वाटो. कारण हिंदुस्थानांतील साम्राज्याने पूर्वी आपल्या मायदेशाचें अनेक रीतींनी कल्याण झालें आहे हें अिंग्रज कबूल न करील तर त्याला माणूस कोण म्हणेल ? "

उलट बाजूचें म्हणणें असें की, " अिंग्रज परत जातांना मागे उरणाऱ्या हिंदुस्थानची राज्यव्यवस्था पक्की करून जाण्याची खटपट करीत आहे ती अगत्य किंवा कृतज्ञता यांपैकी कोणत्याहि कारणाने नसून ती सर्वस्वी स्वार्थीपणाची आहे. जगाला नुसतें दाखविलें की, आम्ही युद्धहेतूंच्या घोषणेला स्मरून हिंदुस्थानांतील साम्राज्य काढून घेऊन त्याला स्वातंत्र्यदान केलें. पण पुढच्या दाराने बाहेर पडलेलें दाखवून मागच्या दाराने परत घरांत येण्याचा हा डाव आहे. एरवी हिंदुस्थान अखंड राहावा हा अिष्टार्थ जर श्रेष्ठ असें यांना खरेंच वाटत होतें, तर त्या धोरणानेच त्यांना पार्लमेंटांत कायदा करून टाकून अखंड हिंदुस्थानाचें फेडरेशन स्थापित करतां आलें असतें. पण मनांतून तें करावयाचें नाही ! म्हणून 'स्वयंनिर्णया'च्या तत्त्वाला यांनी फाजील महत्त्व दिलें आणि हिंदुस्थानांत स्वतंत्र मुस्लिम राज्य निर्माण केलें. अशीं परस्परविरोधी राज्यें निर्माण झालीं म्हणजे तीं भांडणार, हातघाईवर येणार. मग त्यांतला निर्बळ असेल तो बाहेरून दुसऱ्या कोणाचें लष्करी साहाय्य मागणार. झालें; आमच्याशिवाय त्याला तें कोण देणार? पूर्वी आम्ही कंपनी म्हणून हिंदुस्थानांत वावरत असतांना त्या वेळचीं राज्यें आपापसांत भांडलीं व त्यांनी आमची मदत मागितली. त्या प्रकाराचीच पुनरावृत्ति होणार. आहे काय आणि नाही काय?"

हे दोनहि युक्तिवाद केवळ तर्कदृष्ट्या समर्थनीय आहेत. म्हणून भावी काळाविषयी ज्याचें अनुमान पुढे प्रत्यक्ष खरें ठरेल तो भविष्यवादीच म्हणावा लागेल. पण तें कांही न करतां, आज साम्राज्य सोडून जाणारा अिंग्रज कसें वागत आहे यापुरता तरी त्याला भलेपणा देण्यास हरकत नसावी आणि तो कसा वागत आहे याचा आमचा अर्थ त्याने काय निर्णय दिला हा नसून मनुष्य या नात्याने तो कसा वागत आहे इतकेंच दर्शविण्याचा आहे.

असो; इंग्रज जाणार हें निश्चित. पण पुढे काय कसें होणार हें अद्यापि अनिश्चितच आहे म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानाला डोमिनियनचा दर्जा दिला तरी तेवढ्याने सर्व प्रश्न सुटत नाहींत. म्हणून आणखी थोडें काय घडतें याची वाट पाहून मग त्याविषयी लिहिलेलें बरें.

## साम्राज्याच्या मूळ प्रवृत्ति

आता यानंतर एकंदरीने साम्राज्याच्या मूळ प्रवृत्तींचा थोडा विचार करू. त्यांत हें दिसून येतें की, मानवी समाज-संघटनेच्या मार्गांतील एक टप्पा म्हणजे साम्राज्य हें होय. या संघटनेंतील पूर्वीचे टप्पे व्यक्ति, कुटुंब, कुल, जाति, श्रेणी, गण, जानपद, राष्ट्र अित्यादि होत. पण राष्ट्रापर्यन्त समाजाची मजल पोचली म्हणजे ती तेथे थांबत नाही. तिच्यापुढे साम्राज्य हा टप्पा येतो. मात्र त्याच्याहि पुढची एक पायरी असून ती एकजगत्व ही होय. पण मौज ही आहे की, क्रमाने साम्राज्य ही एक-जगत्वाला अगदी लागून असलेली खालची पायरी असली, तरी गुणांनी तीं दोन अत्यंत भिन्न आहेत. म्हणजे साम्राज्यांत मनुष्याचे स्वार्थीपणाचे सर्व दुर्गुण दिसून येतात. पण संघटनेची मजल ह्यावरच्या एक-जगत्वाला पोचू शकेल तर स्वार्थीपणाचा हा दुर्गुण जाऊन, स्वार्थाचा म्हणजे अंतिम स्वार्थाचा किंवा परम-अर्थाचा गुण त्यांत दिसून येईल अशी आज तरी कल्पना आहे. गेल्या हजारों वर्षांत राजकीय तत्त्वज्ञान हें राष्ट्रवाद साम्राज्यवाद येथपर्यंत पोचलें असून, त्यांतून पुढे पाऊल निघण्याचें चिन्ह अद्यापि दिसत नाही. सत्ता गाजविण्यास सांपडेल तितकी गाजवावी हा मनुष्यधर्मच होऊन बसला आहे. ही सत्ता कुटुंबांत मुख्य पुरुष (बाप) गाजवितो. कुलांत कुलपति गाजवितो. जातींतील नेमले-निवडलेले पंच ती सत्ता गाजवितात, व बहिष्कारादि साधनांनी प्रभावी करितात. राष्ट्रांत राजकीय सत्ता कोणाच्या हातीं असेल हें सागणें कठीण. कारण पूर्ण लोकसत्ता, मर्यादित लोकसत्ता, सांघिक लोकसत्ता, अनिर्बंध राजसत्ता, सनदी राजसत्ता, श्रेष्ठवर्गसत्ता, सेनापतिसत्ता, व शेवटीं झोटिंगशाही सत्ता, अित्यादि सत्ताधारणाचे अनेक प्रकार राष्ट्रसंस्थेंतहि दिसून येतात. राष्ट्र हें ही सत्ता सैन्याच्या बळावर राखतें चालवितें, आणि त्या सैन्याच्या जोरावर युद्धें करून

पुढे साम्राज्य स्थापतें. अितिहासकालांत असा देश सहसा सापडणार नाही की राष्ट्र या पदवीपर्यंत पोचलेल्या लोकांनी पुढे साम्राज्यस्थापनेचा उद्योग केला नाही.

पौराणिक कालांतील साम्राज्यांची हकीकत काल्पनिक म्हणून सोडून देऊ. पण ग्रीक राष्ट्रापासून आज अमेरिकन राष्ट्रापर्यंत सत्ताभिलाप, अर्थाभिलाप त्याकरितां सैन्याच्या साहाय्याने युद्ध, परराष्ट्राक्रमण अित्यादि गोष्टी जवळजवळ त्याच स्वरूपांत दिसून येतात. ग्रीक राष्ट्र प्रथम तरी सत्ताभिलाषी नव्हतें. त्याने केवळ आपल्या वसाहती दूरवर स्थापल्या. शिवाय या वसाहती म्हणजे खुद्द अथेन्स शहराच्या धर्तीवर तीं नगरराज्यें स्वतंत्र व लोकमतानुवर्ती असावीं असा परिपाठ होता. परंतु पुढे सत्ताभिलाप हाच अथेन्सच्या नाशाला कारणीभूत झाला. कारण स्वतःच्या दोघां वसाहतींच्याच भांडणांत अथेन्स पडलें, आणि तेंही त्यांतील अेकाला दुसऱ्याविरुद्ध साहाय्य केल्याने आपलें आरमारी बळ वाढेल असा मोह होऊन त्यांत सांपडल्याने !

## अथेन्सपासून अमेरिकेपर्यंत

अथेन्सने प्रथम लहानसान नगर-संस्थानांना दोस्तींत घेऊन मित्रसंघ बनविला. पण पुढे कोणापासून खंडणी घे, कोणावर तूं अितकीं जहाजें पुरविलीं पाहिजेत अशी सक्ती कर, कोणाचा खजिना तुझ्या घरीं सुरक्षित राहणार नाही म्हणून मी तो अथेन्समध्यें नेअून ठेवतों असें म्हणून उचलून ने, अेकाला धांव म्हणावें व दुसऱ्याला त्याची पाठ शीव म्हणावें असे खेळ सुरू केले. प्रथम मित्रसंघ बनला तो परचक्राची भीति निवारण्याकरितां. पण त्या भीतीचें निवारण झाल्यावरहि संघ कायम ठेवून अथेन्सने त्याचें अध्यक्षपद आपणाकडे घेतलें. पण हा विश्वासघातच शेंवटीं त्याच्या नाशाला कारण झाला. परंतु प्रथम तरी ग्रीसने अगदी नव्या पद्धतीचें साम्राज्य स्थापन केलें नव्हतें.

यापूर्वी पर्शिया म्हणजे अिराण याने साम्राज्य स्थापण्याच्या आकांक्षेने खुद्द ग्रीसवरच स्वारी केल्याचें प्रसिद्ध आहे. यानंतर रोमचा अितिहास पाहिला असतां रोमने आपलें साम्राज्य जगभर कसें पसरलें होतें हें अितिहासवाच-

कांना माहीतच आहे. त्यानंतर अलीकडे युरोपांतील बहुतेक प्रत्येक देशानें साम्राज्य स्थापण्याचा कमीअधिक यशस्वी प्रयत्न केला हें ताजा अितिहास सांगतोच आणि आता शेवटीं, स्वतः अिंग्रजांच्या राजशाही साम्राज्याविरुद्ध बंड करून स्वतंत्र झालेली अमेरिका, जगभर ठिकठिकाणीं, या नाही त्या रूपानें साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र हें अमेरिकन साम्राज्य युद्धानें किंवा लष्करी स्वारीनें स्थापण्यांत येणार नाही. तें देवघेवीनें करारानें स्थापलें जाईल. आणि जें स्थापलें जाईल त्याचें स्वरूप सत्तांकितापेक्षा स्नेहांकित व ऋणांकित असेंच अधिक असेल. तथापि मुद्दा हा आहे की अशा नवीन म्हणजे कमी जुलुमाच्या मार्गानें स्थापलेलें साम्राज्य हें देखील राष्ट्रवादांतच दाखल होतें. अेकाच राष्ट्राचें बळ वाढविणें हा त्याचा परिणाम होतो. सर्व जगाचें एकराष्ट्र (वन् वर्ल्ड वन् नेशन) निर्माण करणें हा त्याचा परिणाम होत नाही.

## हिंदुस्थानांतील जुनीं साम्राज्यें

हिंदुस्थानांतहि जुन्या अितिहासांत साम्राज्येंच आढळतात. अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, भोज, हर्ष हे राजे सम्राट म्हणजे साम्राज्यवादीच होते. मध्ययुगांत महाराष्ट्रामध्यें जे राजे होऊन गेले ते म्हणजे शातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, कलचुरी यादव, शिलाहार हे सर्व राजे साम्राज्यवादीच होते. म्हणजे त्या सर्वांनी परराष्ट्रांवर स्वाऱ्या करून त्यांना अंकित केलें होतें. फरक थोडा अितकाच होता की, हिंदुस्थानांतील जुने सम्राट परराष्ट्रावर आपला कायमचा ताबा ठेवून, तेथील लोकांना सर्वस्वी पादाक्रांत करून स्वतःच्या अधिकाऱ्यांकडून तेथील सर्व कारभार स्वतः चालवीत नसत. म्हणजे या दुसऱ्या अल्पबल राजांनी नुसतें या श्रेष्ठांचें मांडलिकत्व कबूल केलें, करभार दिला, तर त्यांना मांडलिकाच्या नात्यानें स्थानिक राज्यकारभाराचें स्वातंत्र्य मिळत असे. म्हणजे प्रश्न मुख्यतः वरिष्ठपणा तोंडानें कबूल करवून घेण्याचा होता. सर्व चिरकाळ वावतांतहि ती सत्ता लोकांवर लादण्याचा व त्यांच्या घरीं-दारीं ती प्रभावी करण्याचा नव्हता.

येथे मला सहज एक आठवण झाली ती अशी कीं, सन १८९५ त केसरीमध्ये 'भस्मेन' पातशाही आणि अिंग्रजी राज्य या विषयावर एक

अग्रलेख आला होता. वरील विषयावर त्या वेळचे सुप्रसिद्ध सिव्हिलियन वुअिल्यम लीवॉर्नर ह्यांनी विलायतेंत अिंपीरिअल अिन्स्टिटयूटपुढे जो एक निबंध वाचला होता, त्यांत रोमन व अिंग्रजी साम्राज्याची तुलना करून अिंग्रजी साम्राज्य हें अधिक चांगलें ठरविलें होतें. या निबंधाला उत्तर म्हणून 'केसरी'कारांनी खरमरीत लेख लिहून शेवटीं एक वाक्य लिहिलें होतें तें असें–" रोमन लोकांची बेबंदशाही एक वेळ पुरवली; पण हल्लीचा हा फाजील पंतोजीपणाच आम्हांला दुस्सह झाला आहे." असो. सांगण्याचें तात्पर्य हेंच की, हिंदुस्थानांतील जुन्या साम्राज्यांपेक्षा रोमन साम्राज्य अधिक त्रासदायक ठरलें यांत शंकाच नाही. तथापि साम्राज्याची आवड ही पश्चिमेकडील राष्ट्रांनाच होती, आणि पूर्वेकडील राष्ट्रांना ती नव्हती, असें नाही. अिंग्रज अिकडे येण्यापूर्वी मोगल बादशहांचें साम्राज्य होतें. तें बरेचसें अिंग्रजी साम्राज्याच्या धर्तीवर होतें.आणि अिंग्रजांनी हिंदुस्थानांतील राज्य ज्या मराठे लोकांच्या हातून शेवटीं घेतलें, त्यांनी देखील, आपला हात चालला अशा थोडया काळांत, हिंदुस्थानभर हिंदुपद पातशाही म्हणजे साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करून पाहिला. हा प्रयत्न प्रथम चौथाई खंडणी वसूल करण्यापुरताच होता. परंतु " आज खंडणी मिळते उद्या मुलूख हातीं येतो " हें गोविंदराव काळयांच्या राजनीतीचें सूत्र साम्राज्य-प्रस्थापनेच्याच बुद्धीचें द्योतक नाही काय? आणि केवळ चौथाअीची खंडणी वसूल करण्याच्या प्रयत्नांतहि, म्हणजे प्रत्यक्ष खरें साम्राज्य स्थापण्याचें अजून दूरच होतें अशा काळींहि आपल्या साम्राज्यवादाने मराठे हिंदुस्थानभर अप्रिय झाले होते. उघडच आहे. साम्राज्यवाद म्हणजे दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांचें स्वराज्य व स्वातंत्र्य हीं हिरावून घेणें. पण सुदैवाने स्वराज्यापेक्षा साम्राज्य हें फार कमी काळ टिकतें. अितिहासांत शतकेंच्या शतकें अबाधित चालू राहिलेलीं स्वराज्यें आढळतात.उलट साम्राज्यें हीं मर्यादित कालापर्यंतच टिकतात असा अितिहासाचा दाखला आहे.

## गेल्या तीस वर्षांचा दाखला

जगाचा अितिहास वाचणाराला साम्राज्यांचा ऱ्हास हा मोठासा चमत्कार वाटत नाही. जुन्या अितिहासांत ग्रीक, रोमन (पश्चिम व पूर्व), पर्शि-

यन हीं साम्राज्यें कशीं नष्ट झालीं, हें वाचावयास मिळतेंच; पण गेल्या अवघ्या तीस वर्षांत आपल्या डोळ्यादेखत किती तरी साम्राज्यें नष्ट झालीं नाहीत काय? त्यांची यादीच पहा– १. ऑस्ट्रो–हंगेरियन, २. जर्मन, ३. ऑटोमन (तुर्की),४. मँचू (चिनी), ५. फ्रेंच, ६. झारशाही–रशियन, ७.जपानी, ८. अिटालियन अि.फ्रेंच,डच,ब्रिटिश, पोर्तुगीज हीं साम्राज्यें अद्यापि कांही अंशीं जिवंत आहेत.तथापि फ्रेंच साम्राज्य ब्रिटिश साम्राज्याच्या आधी नष्ट होअील. पोर्तुगालचीं गोवा, दीव, दमण हीं ठाणीं हिंदुस्थानांत अजून जीव धरून आहेत. पण तीं असून नसल्यांतच जमा नव्हेत काय? साम्राज्य नष्ट झालें म्हणजे त्याच्या उदरांतून लहानसान स्वतंत्र राज्यें बाहेर पडतात. ऑस्ट्रियन साम्राज्यांतून स्लाव व बाल्कन राज्यें निघालीं., फ्रेंच व डच साम्राज्यांतून पूर्व आशिया खंडांतील पासिफिक महासागराच्या किनाऱ्या-वरील राज्यें निघालीं. तुर्की साम्राज्यांतून अरब राष्ट्रें निघालीं. जर्मन साम्राज्यांतून पोलंड बाहेर पडला. जपानी साम्राज्यांतून कोरिया, मांचूरिया बाहेर निघाले. अिटलीच्या साम्राज्यांतून शिद्दी राज्य (अेथिओपिया) बाहेर पडलें. फ्रेंच साम्राज्यांतून अिंडोचायना बाहेर निघाला. ब्रिटिश साम्राज्यांतून हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सिलोन बाहेर पडणार!

---

# २३. फाळणीविषयी कांही तात्त्विक विचार

(सह्याद्रि ऑगस्ट १९४७)

गेल्या महिन्याच्या १८व्या तारखेला हिंदुस्थानासंबंधी ब्रिटिश पार्ल-मेंटचा जो नवा कायदा राजसंमतीने मंजूर झाला तो महत्त्वाचा आहे. कारण त्यापूर्वी हा देश जो ब्रिटिश साम्राज्यांतील एक सत्तांकित देश होता, तो या कायद्याने स्वतंत्र व स्नेहांकित केला. ब्रिटिश राज्यांत पूर्ण सत्तांकित अशा देशांबरोबर स्वतंत्र पण स्नेहांकित असेहि देश समाविष्ट आहेत. एका बाजूला टाचेखाली तुडविलेले दासप्राय प्रजाजन, तर दुसऱ्या बाजूला हातांत हात घालून एकासनावर बसविलेले स्नेहांकित समाज, असे

सर्व सत्ताप्रकार या बहुरंगी ब्रिटिश साम्राज्यांत आहेत. आणेवारीने बोलावयाचें झालें तर आण्या–दोन आण्यांपासून पावणेसोळा आण्यांपर्यंतचें स्वातंत्र्य या साम्राज्यांतील घटकांत दिसून येतें. स्वातंत्र्य भोगणाऱ्या, समान हक्क भोगणाऱ्या लोकांचें प्रमाण पूर्वीच्या कोणत्याहि साम्राज्यापेक्षा ब्रिटिश साम्राज्यांत अधिक भरेल.

## आयर्लंडचा दाखला

पार्लमेंटने मान्य केलेल्या या कायद्यांत 'स्वातंत्र्य' हा शब्दच घातल्यामुळे या स्वातंत्र्याविषयी शंका उरण्याला जागा नाही. अिंग्लंडचा राजा हा, न्यांवाने कां होओीना, हिंदुस्थानचा अधिराजा राहावयाचा की नाही हें आता हिंदी घटना–समिति ठरवील. तो राजा राहिला तर हिंदुस्थान हें ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये आहे, नाही तर नाही. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अितर अनेक स्वतंत्र राष्ट्रांनी हा अधिराजा मान्य केला आहे, आणि या कारणाने त्या राष्ट्रांवर राजप्रतिनिधि म्हणून एक गव्हर्नर जनरल असतो. कॅनडा, ऑस्ट्रेलिया अित्यादि स्वतंत्रप्राय राष्ट्रांनी राजाबरोबर गव्हर्नर जनरलहि स्वीकारला आहे. आयर्लंडने गव्हर्नर जनरल अमान्य केला, पण राजा राखून ठवला! जन्मभर अिंग्लंडचा कट्टा वैरी असलेला आयरिश देशभक्त डी व्हॅलेरा याने नुकताच या गोष्टीचा खुलासाहि केला. गेल्या युद्धांत तटस्थ राहून आयर्लंडचें खरें स्वातंत्र्य डी व्हॅलेराने प्रकट केलें. तथापि अिंग्लंडचा राजा हा अद्यापि आयर्लंडचा राजा म्हणून त्याला आयरिश राष्ट्रघटनेंत स्थान ठेवलें आहे. डी व्हॅलेरा याने खुलासा केला तो अितकाच की अिंग्लंडच्या राजाला मान्यता देणें हें आज आपल्याला 'प्रिय' नाही पण सोयीचें आहे. ही सोय कशी हें त्याने अधिक स्पष्ट केलें नाही. पण अशा रीतीने डोक्यावर परका राजा ठेवूनहि एखाद्या राष्ट्राला 'स्वतंत्र रिपब्लिक' म्हणून राहता येतं व स्वार्थाकरिता मानवतं हा चमत्कार आयर्लंडने निर्माण केला आहे. राज्यघटनाशास्त्र हें असं चमत्कारिक आहे खरं. त्याचा अर्थ इतका की राष्ट्राने स्वतंत्र बुद्धीने हवं तें केलं तरी चालतें व शोभतें. असं कां आहे व असं कां नाही याचं उत्तर देण्याची जबाबदारी त्याच्यावर नाही. हिंदु-

स्थानाने मात्र ब्रिटिश राजा हा हिंदुस्थानचा राजा असें मानूं नये असें आम्हांला वाटतें. आणि भावी राज्यघटनेंत तशी योजना होईल अशीच आमची अपेक्षा आहे. तथापि हिंदी चालू राजकारणाच्या दलदलींत कोठे केव्हा चिखलांत पाय पडेल, व तो तेथे किती खोल जाईल हें कळणें अलीकडे कठीण झाल्याकारणाने, घटना-समिति, या जिव्हाळ्याच्या भावनेच्या दृष्टीने ,काय करील याचें (कॉंग्रेसवाले लक्षांत घेऊनहि किंवा घेऊनच) भविष्य करणें हें धाडसाचें वाटतें.

## मनाला विषाद देणारा विचार

अशा रीतीने पार्लमेंटच्या या नव्या कायद्याच्या योगाने हिंदुस्थानाला आपलें नष्ट स्वातंत्र्य परत मिळणार खरें. तथापि तें स्वातंत्र्य कशा प्रकारचें आहे याविषयी आम्हांला एक खटचाळ संस्कृत सुभाषित आठवतें. तें असें : " कोणा एखाद्याची पत्नी व लेखणी ही जर परक्याच्या हातीं गेली तर त्या वस्तु सहसा परत येत नाहीत. आणि त्या परत आल्याच तर भ्रष्ट दष्ट व चुंबित अशाच येतात, " असें या कोटीबाज श्लेषसाधक पण कांहीशा ग्राम्य सुभाषिताचें तात्पर्य आहे. कांता व लेखणी या दोहोंना वरील तीन विशेषणें सारखींच कशीं लागतात हें सहृदय वाचकाला अधिक स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाही. हें सुभाषित हिंदी स्वातंत्र्याला चांगलेंच लागू पडतें, आणि हा विचार मात्र मनाला विषाद उत्पन्न करणारा आहे.

तथापि हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे की, पाकिस्ताननिर्मितीने भ्रष्ट स्वातंत्र्य आपणाला लाभलें असा खेद मानणाराने पूर्वी स्वातंत्र्य होतें तेव्हा तरी हिंदुस्थान अभंग एकसंध होता काय हें लक्षांत आणूनच कसें तरी समाधान करून घेण्यासारखें आहे. दुसरीहि एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे ती ही की, आज जें स्वातंत्र्य परत मिळत आहे तें आम्हां हिंदी लोकांनी केवळ आत्मसामर्थ्याच्या बळावर लढून मिळविलेलें नाही. ती एक देणगी आहे. आणि त्या देणगीचा कायदेशीरपणा, म्हणजे आधार, ब्रिटिश पार्लमेंटचा एक कायदा हा आहे. मग दुसऱ्याने देणगी दिली ती, त्याला हवी तशा प्रकारची त्याने दिली तर त्यांत त्याला काय

बोल लावणार? मूल आपल्या हाताने जेवलें तर त्याला स्वतःला हवा तेवढा मोठा घास घेतां येतो. परंतु दुसऱ्याने भरवून तें जेवलें तर त्याच्या तोंडांत जाणारा घास लहान अपुरा असला, किंवा तो थोडाबहुत अंगावर सांडला, तर मुलाने त्याचें वाईट वाटून घेण्यांत काय अर्थ? कोणत्याहि रीतीने मिळालें तरी तें स्वातंत्र्य हें खरें.पण हिंदुस्थानाने स्वतः 'मिळविलेलें' वेगळें व त्याला 'मिळालेलें' वेगळें.

अहेराची शालजोडी कोणी दिली तर ती कशा प्रकारची असावी, किती लांबरुंद, कोणत्या रंगाची, जरीकाठी की साधी, किंबहुना किती किंमतीची असावी, याचा निर्णय प्रायः अहेर देणाराच करतो. अहेर घेणारा करीत नाही. त्याचें काम एवढेंच की, अहेर घेऊन आभारप्रदर्शक नमस्कार करावयाचा! मग फावल्या वेळीं ती शालजोडी उघडून अंगावर घेतल्यावर अहेर देणाराला बरें म्हणावयाचें किंवा नांवें ठेवावयाचीं! याच्या उलट बाजारांत जाऊन रोख–ठोक किंमत देऊन विकत घेतलेलीच शाल-जोडी मनासारखी भेटणार! पण प्रस्तुत प्रकरणीं ब्रिटिश सरकाराने अहेराचा सामान्य व्यवहारहि बाजूला ठेवून हिंदी लोकांना, स्वतः आणि इतर दुस-ऱ्यांकडून विचारवून, 'तुम्हांला अमुक एक प्रकारची शालजोडी देण्याचा विचार आहे तर ती चालेलना' असें अजमावण्याची सावधगिरी घेतली होती. आणि चा–ले–ल' असें समजल्यावरच तें सणंग अहेर करणाराने पक्कें ठरविलें आहे. अशा प्रकारचें पाकिस्तानदूषित स्वातंत्र्याचेंच सणंग बाजारांत आज विकावयास आहे, दुसरें नाही, असें नाजूकपणाने जाण-विल्यावर, "दुसरें असतें तर बरें झालें असतें, आणि हें मनासारखें नाही म्हणून मुळी नकोच" असें कॉंग्रेस व शीख यांनी–फार काय जिनांनीहि–सांगितलें नाही, ही सबब ब्रिटिश सरकारने पुढे मांडली तर त्याला काय दोष ? पण आपण हें अप्रिय सणंग तुमच्यावर जुलमाने लादीत नाही असें दाखविण्याकरिता साम्राज्यशाहीच्या मुख्याधिकाऱ्यांनीहि "तें स्वतः आम्हांला तरी सर्वोत्तम म्हणजे हवें तसें कोठे वाटतें? नाइलाजाने, आणि तुमच्या घरच्याच कांही चौकस माणसांना तें सणंग चाललें, आणि तेंच असूं द्या असा आग्रह इतर कांहींनी धरला म्हणूनच, हें सणंग खरीद करणें आम्हांला प्राप्त झालें" असेंच म्हटलें आहे. मग काय उरलें ?

## ब्रिटिश साम्राज्याची लाभ–हानि

मुसलमानांना पाकिस्तान देऊन हिंदुस्थान दुभंग करण्यांत स्वतः हिंदुस्थानचें नुकसान कांहीहि असो, पण त्याने ब्रिटिश साम्राज्याला लाभ आहे की हानि आहे हा प्रश्न वादग्रस्त ठरत आहे. सकृत् दर्शनीं असें वाटतें की जागतिक घडामोडींत या साम्राज्याला आपलें संरक्षण करणें व स्थान टिकविणें याला हिंदुस्थान हा जर आधारभूत वा साहाय्यभूत वाटत असेल तर त्या दृष्टीने हिंदुस्थान अभंग असावा हेंच अिंग्रजांना अिष्ट वाटावें. अर्थात् तसें असल्यास पाकिस्तानाला त्यांचा विरोध असावा. पण अिंग्रजांच्या स्वार्थसाधनांत पर्याय लागतात. आणि अखंड हिंदुस्थानापेक्षा दुभंग हिंदुस्थानच बरा, कारण त्या दोन खंडांची चुरस लागून आमचें साहाय्य त्यांपैकी कोणी अेकाने मागितलें तर पाअूल काढून जाण्याच्या अेवजी हिंदुस्थानांत फिरून पाअूल ठेवायला जागा झाली, असें जर अिंग्रजांना वाटलें, तर पाकिस्तानाचें दान हें त्यांच्या फायद्यांतच पडलें नव्हे का? असा दोन प्रकारांनी हा वाद रंगवितां येतो. रिकामटेकडेपणाने बोलणारांत वावदूक वकीलच अधिक. आणि न्यायासनासमोर उभा राहिलेला वकीलहि अेकाच मुद्द्यावर हवें तसें अुलटें सुलटें कसें बोलू शकतो हें प्रसिद्धच आहे.

परराष्ट्रीय धोरण हें कोणत्याहि राष्ट्राचें सनातन नेहमी अेकच व निश्चित असत नाही. प्रत्येक वेळीं अुद्भवणाऱ्या परिस्थितीने तें बदलू शकतें. या फेरपालटाविषयी अिंग्रजांची अशी प्रसिद्धि आहे की अिंग्रजांचें परराष्ट्रीय धोरण हें एक कोडें किंवा गौडबंगाल आहे असेंच सर्वजण म्हणतात (' The British foreign policies are often considered mysterious or even paradoxical. '– Contemporary World Politics, पृष्ठ २६७.)

## इंग्लंडचें सोयीस्कर धोरण

पण त्याला कारणेंहि तशींच आहेत. युरोपियन राजकारणांत अिंग्लंडला हें पाहावें लागतें की, कोणतेंहि अेकच राष्ट्र विशेष प्रबळ होअू नये. सर्व राष्ट्रें जवळ जवळ तुल्यबळ राहावीं. म्हणजे त्यामुळे आपलें बळ व सामर्थ्य

पणाला न लागतां, सुखाची प्रतिष्ठा व फुकाचें पुढारीपण मिरवायला गाजवायला सांपडेल. तालबद्धता समतोलपणा हा नाच नाचणाराला बरा वाटतो. गेल्या महायुद्धानंतर जर्मनी हा तेव्हाच नामशेष करावयाचा होता की नाही! आणि फ्रेंचांचा तसा विचारहि होता. पण त्याला अिंग्लंड आडवें आलें. जर्मनी त्यापुढे जिवंत ठेवण्याचा आग्रह अिंग्लंडनेच धरला. पण त्याच कारणाने, हिटलर प्रबळ झाल्यावर फिरून अिंग्लंडने फ्रान्सची मैत्री संपादण्याचा प्रयत्न चालविला. पण याविषयी अिंग्लंडलाच नांवें कां ठेवावीं! मनरो डॉक्ट्रिन या नांवाने प्रसिद्ध असलेलें अलिप्तपणाचें, तटस्थपणाचें, आपल्या पायापुरतें आपण पाहण्याचें, दुसऱ्याच्या भांडणांत न पडण्याचें, धोरण अमेरिकेने तरी आज कोठे कायम ठेवलें आहे? १९२० पर्यंत टिकविलेलें धोरण १९३२ पासून अमेरिकेने बदललें, आणि १९३६पासून तर जगाच्या टोकापर्यंतच्या राजकारणांत अमेरिका हात घालूं लागली आहे!

१९३९ सालीं, पण युद्धापूर्वी थोडेच दिवस, लिहिणारा अेक अमेरिकन समालोचक लिहितो, "अेकंदर पाहतां अिंग्लंडचें सामर्थ्य, वजन आणि वडेजाव हीं घटत आहेत. त्याच्या साम्राज्याचे तणावे देखील शिथिल होत आहेत, किंवा अिटली, जपान, जर्मनी अशांच्या आक्रमक हालचालींमुळे कमजोर होत आहेत. या आपत्तीपासून वचावावें म्हणून ब्रिटन संयुक्त संस्थानांना ( अमेरिका ) आपल्या कक्षेंत ओढू पाहील अशीं चिन्हें आधीच दिसूं लागलीं आहेत." (" On the whole, the power, the influence and the prestige of Great Britain are declining, and her ties with the empire are either loosening or are being gradually undermined or cut by the aggressiveness of Italy, Japan and Germany. There are already indications that Britain will try to save herself by enticing the United States into her orbit. ")

१९३९ सालीं अिंग्लंडच्या राजाराणीनें अमेरिकेला भेट दिली ती नुसत्या मेजवान्या खाण्याकरिता नव्हती. पूर्वी खरोखर युद्धांत पराभव करून स्वराज्य व स्वातंत्र्य हें अिंग्लंडच्या उरावर नाचून मिळविणाऱ्या अमेरिकेशी अिंग्लंडने अलीकडे जी खुषमस्करीगिरी, जो तोंडपुजेपणा, लघळपणा, लाचारी

केली ती अिंग्लंडसारख्या प्रतिष्ठित अहंमन्य गर्विष्ठ राष्ट्राला शोभण्यासारखी नव्हती. पण करणार काय ? पूर्वी युद्धांत पराभव करणाऱ्या अमेरिकेशी जर अिंग्लंड असें परराष्ट्रीय धोरण ठेवतें, तर आपण होऊन स्वातंत्र्य दिलेल्या हिंदुस्थानशी तें स्नेहभावच ठेवूं इच्छील यांत शंका नाही. आणि हिंदुस्थानकडूनहि त्याला स्नेहभावाचीच परतभेट मिळेल यांत आज तरी शंका नाही. पण त्यांतल्या त्यांत मुसलमानांना खूष ठेवावें की मुसलमानेतर हिंदी लोकांना? या नाजूक प्रश्नाचा निर्णय अिंग्रजांनी अद्यापि आपल्या मनाशी पक्का केला नसावा असें वाटतें. यामुळे हिंदुस्थानची फाळणी अनिष्ट असें अिंग्लंड तोंडाने म्हणतें, पण अल्पसंख्य मुसलमानांचें निमित्त सांगून ती फाळणी प्रत्यक्ष पार्लमेंटच्या कायद्यानें करून टाकतें. या दुहेरी धोरणाचें खरें अंतरंग कळण्याअितकें खोल कोणाला शिरतां येणार ?

## ईजिप्तला लंगडें स्वातंत्र्य

पण स्वातंत्र्यदान करतांना त्यांतल्यात्यांत अेखाद्याचा पाय मोडून ठेवून त्याला लंगडा करून ठेवणें ही गोष्ट कांही अिंग्रजांच्या राजकारणांत नवी नाही. आणि याविषयी आयर्लंड व ओीजिप्त यांचें उदाहरण आम्ही हिंदी लोकांनी डोळ्यापुढे आणावें म्हणजे तें बोधप्रद ठरण्याचा संभव आहे. प्रथम ओीजिप्तसंबंधी थोडें लिहून मग आयर्लंडकडे वळूं.

ओीजिप्त हा देश पूर्वी तुर्की साम्राज्यांत मोडत होता. १८८२ सालीं ओीजिप्तमधील अंतर्गत अव्यवस्थेमुळे अिंग्रजांचा हात ठराविक रीतीनें, म्हणजे भांडणांत पडलेल्या दोन पक्षांपैकी एकाला हातीं धरून व त्याला लष्करी पाठबळ देऊन, ओीजिप्तच्या राजकारणांत प्रथम पडला. १९१४ च्या डिसेंबरांत अिजिप्त हा देश आपल्या संरक्षणाखाली घेतल्याचें अिंग्लंडने जाहीर केलें. जुना राजा पदच्युत केला. दुसऱ्या अेकाला सुलतान बनवून गादीवर बसविलें. पुढें १९२२ सालीं ही 'संरक्षित' नांवाची स्थिति संपल्याचें जाहीर करण्यांत आलें. पण ओीजिप्तमध्ये पाय रोवून बसलेलें सैन्य बाहेर निघेचना. संरक्षित सुलतानाचा स्वतंत्र राजा झाला.पण गेल्या युद्धांत ओीजिप्त देशाचें संरक्षण झालें तें आमच्यामुळे असें अिंग्रज म्हणतो आणि तें खरेंहि आहे. पण खरा मुद्दा हा आहे की, अिंग्रजाकडून संरक्षण न झालें असतें तर

जर्मनीच्या हातीं जाण्याला अिजिप्तची नाखुषी कुठें होती ? हिटलर काय कमी देणार होता तें अिंग्लंडने अधिक दिलें? पण पाय रोवलेला अिंग्रज बाहेर कां निघेल ? तो निघावा म्हणून १९३६ सालीं नवा तह झाला. पण सुअेज कालव्याचें संरक्षण ही आमची विशेष हितसंबंधाची जोखीमदारी आहे, अशी सबब अिंग्लंड सांगू लागलें. आज तीहि सबब संपून अिजिप्त पूर्णपणें स्वतंत्र झाला आहे. पण ओजिप्तच्या मालकीचा सूडन प्रांत अजून आपल्याकडे ठेवून म्हणजे ओजिप्त दुभंग करून, अिंग्लंडने फक्त आपलें सैन्य ओजिप्तमधून काढून सुअेज कालव्यापलीकडे नेलें. पण साअुडनवरचा ताबा सोडलेला नाही. तें भांडणाचें मूळ अजून शिल्लकच आहे.आणि आफ्रिका खंडांत नव्या दमाने साम्राज्य स्थापण्याचा अिंग्लंडचा झोक पाहिला म्हणजे साअुडनवरचें 'समाओक स्वामित्व' (याला कॉनडोमिनिअन ही संज्ञा आहे. सोयीच्या संज्ञांना काय तोटा?) अिंग्रज सहसा सोडणार नाही. साअुडनचें क्षेत्रफळ नअू लक्ष सदुसष्ट हजार चौरस मैल व खुद्द ओजिप्तचें क्षेत्रफळ तीन लक्ष शायशी हजार चौरस मैल आहे. म्हणजे साऊडन हा ओजिप्तचा केवढा मोठा तुकडा आहे आणि तो ओजिप्तपासून तोडून काढल्याने या फाळणीचें ओजिप्शियन राष्ट्राला किती वाईट वाटत असेल, याची कल्पना करतां येते.

## अधिक बोधप्रद उदाहरण

पण ओजिप्तच्या फाळणीपेक्षा आयर्लंडच्या फाळणीचें अुदाहरण प्रस्तुत विषयांत अधिक लागू व बोधप्रद ठरणारें आहे. आयर्लंड व हिंदुस्थान यांचें साम्य, ब्रिटिश साम्राज्याच्या शत्रुत्वापुरतें तरी, जितकें जुळतें आहे तितकें अितर कोणत्याहि देशाचें नाही. आयर्लंड हें अेकच अखंड राष्ट्र आहे असें आपण सामान्यतः मानतों. कारण आयर्लंड हें अेक बेट आहे. पण तसें खरोखर नाही. आयर्लंडला स्वातंत्र्य देतांना अिंग्लंडने त्याचीहि हिंदुस्थानाप्रमाणेच फाळणी केली आहे. आणि अुत्तर आयर्लंड व दक्षिण आयर्लंड असे अेका आयर्लंडचे दोन तुकडे झाले आहेत.

१९१६ पूर्वीचा आयर्लंडचा सर्व अितिहास येथे सांगण्याचें कारण नाही. आठशे वर्षांपूर्वी अेका आयरिश राजाच्या निमंत्रणावरूनच अिंग्रजांनी

आयर्लंडवर स्वारी केली व देश जिंकला. परंतु या जिंकण्याला बाकीच्या आयरिश लोकांनी केव्हाच कबुली किंवा मान्यता दिलेली नव्हती. मध्यंतरीच्या शेंकडो वर्षांचा अितिहास असंतोष मारामारी युद्ध यांनीच भरलेला आहे. २५० वर्षांपूर्वी अेकदा आयर्लंड हें स्वतःची पार्लमेंट स्थापून स्वतंत्रहि झालें होतें. पण आयर्लंडला हिंदुस्थानासारखेंच अंतःकलहाचें वरदान असल्यामुळे त्यांनी आपल्या हातांनीच ती पार्लमेंट मोडली. त्याअैवजी ब्रिटिश पार्लमेंटांत सुमारे ८० सभासद निवडून पाठवावयाचा अधिकार आयरिश राष्ट्राला मिळाला. पण सहा–सातशें प्रतिकूल अशा ब्रिटिश सभासदांपुढे या ८० लोकांचें काय चालणार? म्हणजे स्वदेशाच्या मतांनी निवडलेला प्रतिनिधि ब्रिटिश पार्लमेंटांत पाठविण्याचा जो हक्क ब्रिटिश साम्राज्यांत अितर कोणत्या घटकाला आजवर मिळालेला नाही तो आयर्लंडला मिळून फुकट गेला! या ८० सभासदांनी अडवणुकीची शर्थ करून पाहिली. गैरहजर राहून पाहिलें. ब्रिटिश पार्लमेंटांतील दोन पक्षांपैकी अेकाला हातीं धरावा, दुसऱ्याला अव्हेरावा, असें करून आपल्या अल्पसंख्येने विरोधी पक्षाचें बळ वाढवून मंत्रिमंडळाचा पराभव करून पाहिला. शेवटीं प्रकट व गुप्त असें दोन्ही प्रकारचें सशस्त्र बंड आरंभिलें. आणि रिपब्लिक म्हणजे स्वतंत्र लोकशाही बिनराजवटीचें राज्य स्थापिल्याची घोषणा केली. फिरून तीन वर्षांनी नव्या निवडणुकी करून स्वतःचें पार्लमेंट बनवून स्वातंत्र्याची घोषणा केली. तरी त्याचा अुपयोग झाला नाही. पण पहिलें महायुद्ध आयर्लंडच्या अुपयोगी पडलें. १९२० सालीं, आयर्लंडच्या कटकटीला कंटाळून, अिंग्लंडने आयर्लंडला स्वसत्ताक पार्लमेंट दिलें. पण अुत्तर व दक्षिण आयर्लंड असे दोन विभाग म्हणजे फाळणी करून अेकेकाला स्वतंत्र बनविलें, व दोहोंचा परस्पर संबंध ब्रिटिश साम्राज्याशी ठेविला. येथे आज हिंदुस्थानची जी फाळणी झाली आहे त्याच प्रकारची ही फाळणी होय. अिकडे जसे मुसलमान तसे तिकडे अिंग्लंडशी संबंध ठेवू पाहणारे प्रॉटेस्टंट आयरिश व अिंग्लिश लोक. १९२१ सालीं अुत्तर आयर्लंडचें ( अल्स्टर ) पार्लमेंट स्थापित झालें. त्यांत सहा परगणे समाविष्ट केले गेले. ही पार्लमेंट छोटीशीच,

म्हणजे अेका सभागृहांत २६ व दुसऱ्या सभागृहांत ५२ अितक्या थोड्या सभासदांची आहे परंतु अुत्तर आयर्लंड हा अिंग्लंडचा अेक प्रांत व अल्स्टर पार्लमेंट म्हणजे अेक प्रांतिक विधिमंडळ अितकीच त्याची योग्यता आहे. कारण महत्त्वाचे सर्व अधिकार ब्रिटिश पार्लमेंटकडे राखून ठेवण्यांत आले आहेत.

## फाळणीची संवय

या अुत्तर आयर्लंड ( प्रांत ) राज्याकडून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये १३ सभासद निवडून पाठवितां येतात. १९३८ सालीं युद्धापूर्वी झालेल्या निवडणुकींत अिंग्लंडशी संबंध जोडलेला राहावा असें म्हणणारे ३९ ( युनिअनिस्ट ) सभासद होते. ८ आयरिश नॅशनॅलिस्ट म्हणजे ब्रिटनशी आयर्लंडचा संबंध राहूं नये असें म्हणणारे होते. व मग अेखादा मजूर पक्षवादी, अेखादा स्वतंत्र अशी घटना होती. अर्थात प्रधान–मंडळ बनविलें गेलें तें या ३९ तूनच. अल्पमतवाल्याना राज्यकारभारांत कांहीच स्थान नाही. या छोट्या ब्रिटिश–आयरिश (अल्स्टर) राष्ट्राचा वरिष्ठ कारभार लंडनच्या होमऑफिसमार्फत चालतो. या छोट्या राज्याची लोकसंख्या सुमारे १३ लक्ष अितकीच आहे. पैकी रोमन कॅथॉलिक ४। लक्ष, प्रेस्बिटेरियन ४ लक्ष आणि प्रॉटेस्टंट ३।।, अितर पंथाचे अर्धा लक्ष अशी धर्मपंथांच्या दृष्टीने वांटणी आहे. आणि हे तीन पंथ परस्परांचें शत्रुत्व कसें करतात हें प्रसिद्ध आहे. तथापि १३ लाखांतील अवघे ४–४।। लक्ष रोमन कॅथॉलिक ते विरोधी पण निर्बळ पक्ष म्हणून गप्प बसतात. राज्यकारभारावर त्यांचा कांही परिणाम होत नाही. हे सहा परगणे मूळच्या आयर्लंडपैकीच ; परंतु रोमन कॅथॉलिक धर्माच्या आयरिश राष्ट्राला स्वराज्य देण्याची पाळी आली, तेव्हा अेकंदर आयर्लंडची फाळणी करून ब्रिटिशांनी आपला डाव असा साधून घेतला. आणि गेल्या महायुद्धांत अुत्तरेचें हें $\frac{1}{4}$ आयर्लंड अिंग्लंडबरोबर युद्धांत सामील, व त्या खालचें $\frac{3}{4}$ आयर्लंड स्वतंत्र म्हणून आपला अधिकार चालवून तटस्थ राहिलेलें, असा देखावा दिसून आला ! ही फाळणी रद्द ठरावी म्हणून स्वतंत्र आयर्लंडचा प्रयत्न अेक सारखा सुरू आहे. डी व्हॅलेराने तें साध्य

होण्याकरितां डोक्यावर ब्रिटिश राजाहि मान्य केला. तथापि अल्पसंख्य प्रॉटेस्टंट लोकांकरिता, ते राजभक्त व मित्र म्हणून, अिंग्लंडने आयर्लंडचे दोन तुकडे केले. असा जुना अनुभव असल्यामुळे हिंदुस्थानची फाळणी करण्याचें अिंग्रजांना कांही चमत्कारिक वाटलें नाही.

## क्षुद्र स्वराज्यें !

मुख्य दक्षिण स्वतंत्र आयर्लंडची लोकसंख्या तीस लक्ष आहे. दक्षिण आयर्लंडच्या पार्लमेंटाचे १३८ सभासद आहेत. पण त्यांत फिरून ५ अुपपक्ष आहेत. सगळ्यांत मोठा ६७ सभासदांचा पक्ष फियानाफेल, ३२ फिनेजेल, १७ मजूरपक्ष, १४ शेतकरी पक्ष व ८ स्वतंत्र. क्षेत्रफळ किंवा लोकसंख्या यांचें प्रमाण कमी असल्यामुळे तो देश किंवा तें राष्ट्र स्वातंत्र्याला पात्र नाही असें ब्रिटिश पार्लमेंट मानीत नाही, ही गोष्ट खरी आहे. कारण निरुंद अशा अिंग्लिश खाडींतील आअिल ऑफ मॅन किंवा चॅनल आयलँडस् अशा क्षुद्र भूविभागांनाहि स्वतंत्र पार्लमेंटचा अधिकार आहे आअिल् ऑफ् मॅन याची लोकसंख्या अवघी ५० हजार भरेल व या छोटेखानी राज्याचें अुत्पन्न सुमारें चौदा लक्ष पौंड भरेल. यांतील मतदारसंख्या सुमारे ४० हजार असेल, पण यावर शेरा असा आहे– " साम्राज्य पार्लमेंटच्या जेवढ्या कायद्यांत याचा विशेष निर्देश असेल तेवढेच कायदे यावर बंधनकारक आहेत" ("The Island is not bound by acts of the Imperial Parliament, unless specially mentioned in them. ") ब्रिटिश खाडीच्या दुसऱ्या टोकाला ' चॅनल आयलँडस् ' हें बेट आहे. या बेटाचें अुत्पन्न सुमारें सहा लक्ष पौंड व खर्च जवळ जवळ तितकाच आहे. परंतु या छोटया राज्यावरहि शेरा असाच आहे. ( " The Channel islands are not bound by acts of the Imperial Parliament unless especially named in them. " ) यालाहि ) एक छोटेखानी मंत्रि-मंडळ आहे. यानंतर वरील हून मोठीं परंतु अनेकरीतें क्षुद्र असलेलीं पोटराष्ट्रें पण लोकशाही वळणाचीं ब्रिटिश साम्राज्यांत आहेत. अुदाहरणार्थ, [illegible] हें नाविक दलाचें ठाणें, याचें क्षेत्रफळ १५ मैल, लोकसंख्या सुमारें तीन लक्ष

पण येथेही छोटेखानी विधिमंडळ असून १९४३ च्या ७ जुलै रोजीं ब्रिटिश पार्लमेंटने अशी घोषणा केली की, युद्धानंतर माल्टाला जबाबदारीचें स्वराज्य देण्यांत येईल.

## अखंड होण्याची मोकळीक

पण हीं उदाहरणें वाढवीत बसत नाही. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच की' भूविभाग लहान असो, मोठा असो, त्याला योग्यता आली म्हणजे किंवा तसेंच कांही स्वतःचें कारण घडलें म्हणजे विधिमंडळ, पार्लमेंट, स्वराज्य, स्वातंत्र्य हीं आपल्या लोकांना देण्याला अिंग्लंड मनाने तयार असतें. त्यांत कांहीं विशेष दिलें असें त्याला वाटत नाही. किंबहुना कोणत्याहि लोकांना लोकशाही स्वराज्य मागण्याचा जन्मसिद्ध हक्क असतो, असें तत्त्व अिंग्लंडने आपल्या मनाशी ठरवून ठेविलें आहे. यामुळें हिंदुस्थानांतून सत्तात्याग करून निघून जाण्याचें ठरविल्यावर, हिंदुस्थानच्या अेकंदर ४० कोटी लोकांपैकीं १० कोटी मुसलमान लोकांना त्यांनी मागणी केल्यास पाकिस्तान म्हणजे स्वतंत्र राज्य देणें यांत आपण कांही गैर करीत आहों असें अिंग्लंडला कां वाटावें? नाही तर स्वयंनिर्णय तो काय? शिवाय त्याला हेंहि म्हणतां येईल की आम्ही हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं हिंदुस्थान अखंड अभंग कोठें होतें ? त्यांत शेंकडो स्वतंत्र राज्यें संस्थानें होतीं. आम्ही आल्यावरच आपल्या हाताने कारभाराने हिंदुस्थान अेक व अखंड केला; पण आता जातांना अल्पसंख्य बहुसंख्य हा भेद लक्षांत घेऊन हिंदुस्थान दुखंड केला तर त्यांत आम्ही काय गुन्हा केला ?

किंबहुना अिंग्लंड हें आम्हां हिंदी लोकांकडे हात दाखवून म्हणूं शकेल की, '' आम्ही फोडलें, पण आता आम्ही येथून निघून गेल्यावर तुम्हाला वाटेल तर तुम्हीं फिरून जोडावें. तुम्हाला नको कोणी म्हटलें आहे ? असें पाहा की, १९३७ सालीं अमलांत आलेल्या आयरिश राज्यघटनेच्या आयरिश कायद्याच्या प्रस्तावनेंत (प्रीॲंबलमध्ये) द्विखंड आयर्लंडच्या एकीकरणाला उद्देशून 'Seeking to restore the unity of our country ' असे शब्द तो कायदा करणाऱ्या अखंड आयर्लंडवादी लोकांनी घातलेले आहेत याचा अर्थ आज नाही उद्या तरी आयर्लंड हा देश एक व अखंड करूं अशी

आकांक्षा हे आयरिश लोक अजून बाळगून आहेत. वाटल्यास तें उदाहरण डोळ्यापुढे ठेवून, तुम्ही उद्या घटना-समितींत हिंदुस्थानाकरिता जो नवा कायदा बनवाल त्याच्या प्रस्तावनेंत तुमच्या देशाच्या भावी एकीकरणाला उद्देशून काढलेले असले उद्‌गार तुम्हांलाहि स्पष्ट शब्दांनी व्यक्त करतां येतीलच. तुम्हांला स्वातंत्र्य देण्याचा आमच्यापुरता कायदा आम्ही केला. उद्या तुमच्याकरिता तुम्ही जो कायदा कराल त्यांत अमुक शब्द घाला अमुक घालूं नका असें सांगण्याला आम्ही येत नाही."

## सिद्धस्य गतिश्चिंतनीया

स्वातंत्र्य दिलें याचा अर्थच हा की, हवें तसें हवें तेव्हा करावें. पण आयरिश लोकांची भावना आयर्लंड अखंडच असावें अशी असतांहि त्यांना अल्स्टर परगण्याचें उत्तर आयर्लंड तोडून घेतलेलें आज मान्य करावेंच लागलें. आयर्लंडने हातीं आलेल्या स्वातंत्र्यावर या फाळणीमुळे बहिष्कार पुकारला नाही, किंवा स्वतःचें सैन्य घेऊन उत्तर आयर्लंडवर स्वारी केली नाही. हिंदुस्थानची गोष्टहि अशीच नव्हे काय? फाळणी झाली म्हणून उरल्या ८।१० प्रांतांचें एकीकरण करून इंग्लंडने स्वतंत्र स्वराज्य दिलें तें टाकवत नाही. आणि आज परिस्थितीच अशी कोठे आहे की, हिंदुस्थान सरकाराने सैन्य घेऊन पाकिस्तानवर स्वारी करून तें आपल्यांत आणून बसवावें, देशी संस्थानांवर अशीच हुकमत चालवावी, आणि अशा रीतीने हिंदुस्थान हा अखंड स्वायत्त व स्वयंपूर्ण करावा? बरें. फाळणीला मान्यता देणें हें कॉंग्रेसचें चुकलें खरें. पण अितर पक्षांजवळ तरी असें काय सामर्थ्य आहे की त्याच्या जोरावर त्यांना पाकिस्तानला यशस्वी विरोध करतां येईल? म्हणजे एकंदरीने कॉंग्रेस बाहेर असलेले हिंदु व शीख यांना कांग्रेसला व अिंग्लंडला नांवें ठेवण्यापलीकडे काय करतां येण्यासारखें आहे! हिंदुस्थानचें अंतिम अखंडत्व हें जर परमहित व अंतिम साध्य, तर पूर्व पंजाब व पश्चिम बंगाल या प्रांतांतील लोकांनी फिरून हिंदुस्थानाचे तुकडे करून ते अितर प्रांतांना जोडण्या लिंपण्याला संमति कां दिली? अर्थात हें त्यांचें करणें म्हणजे ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणें-" जैशा खांडूनिया शाखा। मग तयाचिया बुडुखा। कुंप कीजे।"-शाखा अफाट वाढल्या तेव्हा सबंध एक मोठा वृक्ष

दिसला; परंतु बुडख्याजवळ तळांत तो असुरक्षित वाटला तर आपण हेंच करतों की नाही की, त्याच झाडाच्या फांद्या तोडाव्या आणि त्याच्याच बुडख्याभोवती कुंपण घालावें? म्हणजे शीख व बंगाली हिंदु यांनीं पोट फाळणीने दुभंग हिंदुस्थान अभंग केलें नाही, तर फक्त पाकिस्तान जाऊन उरलेल्या हिंद राज्याच्या वृक्षाचा बुंधा, ८।१० प्रांतांचें संघीकृत राज्य, सुरक्षित राहावा याकरिता, स्वतःला पश्चिम व पूर्व दिशेकडे पाकिस्तानांतून तोडून घेऊन या मध्यवर्ती राज्याला जोडून घेतलें. अिष्टार्थ साध्यें व ध्येयें हीं सर्वांचीं कांही कांही असतातच. पण तीं पदरांत पाडून घेण्याला जें सामर्थ्य लागतें तें अंगीं असेल तरच उपयोग. नाही तर साध्य तें साध्य या सदराखालीच रहातें व सिद्ध तेंच व्यवहार्य म्हणून घेऊन चालावें लागतें. 'सिद्धस्य गतिः चिंतनीया' असें जें वचन आहे तेंच खरें. म्हणजे जें सिद्ध झालें व आज तरी बदलतां येत नाही त्याची सुस्थिति कशी करावी राखावी व त्याला गतिमान कसें करावें यांवरच व्यवहारी माणसाला, समाजाला समाधान करून घ्यावें लागतें. खंडित हिंदुस्थानाचेंहि असेंच होणार.

## मागणी व नकार यांचा लढा

१९१७ सालीं हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पक्ष हा प्रथम होमरूलवर संतुष्ट होता. होमरूल म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटाच्या वरिष्ठ अधिकारांतून तोडून दिलेले कांही अधिकार चालविणारें विधिमंडळ व त्याला जबाबदार असणारें मंत्रिमंडळ. पण अशा विधिमंडळाने मंजूर केलेला कोणताहि कायदा राजाच्या नांवाने नामंजूर करण्याचा अधिकार स्टेट सेक्रेटरीला राहतो. शिवाय तोडून न दिलेल्या किंवा दिलेल्याहि अधिकारांतील कारभाराविषयी आपलाच वरिष्ठ अधिकार चालवून ब्रिटिश पार्लमेंटच्या मनाला आलें तर स्वतःच एखादा कायदा करतां येतो. पण ब्रिटिश सरकारने हें 'होमरूल'हि हिंदुस्थानाला दिलें नाही, आणि जें थोडें मागितलें तें दिलें नाही म्हणजे अधिक मागण्याची प्रवृत्ति होते. मागणाराला सहजच वाटतें की जें थोडें मागितलें तें देणें योग्य व न्यायाचें आहे. पण हेंहि जर मिळत नाही तर मग त्याहून मोठें असें कांही कां मागू नये? नकारच घ्यावयाचा तर त्याला हप्तेबंदी कशाला? अशा रीतीने मागणी व नकार यांच्या लढ्यांतच सर्वस्वी। स्वतंत्र

स्वराज्याची कल्पना वळावली व " आपल्या तोंडाने स्वातंत्र्य जाहीर करून टाकूं, मग पुढे काय व्हावयाचें तें होईल " असा विचार हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेने केला. १९२९ सालीं लाहोर येथे रावी नदीच्या कांठीं पं. नेहरू यांनी स्वतंत्र स्वराज्यस्थापनेची घोषणा केली. पण तिला प्रत्यक्ष कृतीचें पाठबळ नव्हतें. कॉंग्रेसने कांही दिवस असहकारिता केली, परंतु त्या असहकाराचा कंटाळा येऊन कॉंग्रेसने कौन्सिलप्रवेश मान्य केला,व प्रधान-मंडळेंहि बनवून १९३५ च्या पार्लमेंटरी घटनेला एक प्रकारें संमति दिली. अर्थात महायुद्ध झालें नसतें तर १९३५ चा कायदा मनाने व तोंडाने अमान्य असतांहि प्रत्यक्षांत त्याचा व्यवहार कांग्रेसकडून आजवर होत राहिला असता. पण १९३९ च्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांनी मिळविलेल्या यशानंतर उदार युद्धहेतूंच्या घोषणेची अमलबजावणी करणें प्राप्त झालें. आणि त्यांतूनहि युद्धानंतर झालेल्या निवडणुकींत ब्रिटिश मजूर पक्ष विजयी झाला; त्याला साम्राज्याचा कारभार जड झाला; म्हणून त्याने स्वतः लक्ष घालून आजचा हिंदी स्वातंत्र्याचा कायदा पार्लमेंटांत घडविण्यापर्यंत मजल आणली. पण खरें पाहिलें तर प्रत्यक्ष एकदम स्वातंत्र्यदानाचा उच्चार करण्याला पूर्वी आयरिश प्रकरणांत मिळालेल्या अनुभवाचाच बोध त्या पक्षाने घेतला.

## शेष प्रश्न आणि असंतोषाचा मुद्दा

पहिल्या महायुद्धानंतर जी परिस्थिति आयर्लंड व अिंग्लंड यांच्यामध्ये निर्माण झाली, तीच परिस्थिति दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थान व अिंग्लंड यांच्यामध्ये उत्पन्न झाली. १९२१ सालीं अिंग्लंडच्या चॅन्सेलरने उघड कबुली दिली की "आम्ही आयर्लंडविरुद्ध लढाऊ सैन्याचा उपयोग केला तरीहि आयरिश लोकांची सशस्त्र चळवळ आम्हांला बंद करतां आली नाही." (We were not, with the resources which were at the given time at our disposal, successfully coping with the forces of disorder.). अुलट आयरिश पुढारी मायकेल कॉलिन्स यानेही उघड कबुली दिली की, " आम्हाला सशस्त्र चळवळीने अिंग्रजांना आयर्लंड-मधून घालवून देतां आलें नाहीं." (We had not beaten the enemy

out of our country by force of arms. ) उभयपक्षीं अशी स्थिति झाल्याने सामोपचार हाच एक मार्ग आयरिश प्रकरण निकालांत काढण्याला उरला. तो म्हणजे तह करून तंटा मिटविणें. या कामीं मुख्य प्रधानाने आयरिश पुढाऱ्यांना बोलणें करण्याकरिता निमंत्रण पाठविलें. यांतून पुढें तह ठरला. शेवटीं डोमिनियन स्टेटसचें स्वतंत्र स्वराज्य आयर्लंडला देण्यांत आलें. आणि त्यानंतरहि जें उरलें सुरलें तें आयरिश पार्लमेंटनें आपल्या हाताने करून घेतलें. हिंदुस्थानांत होमरूलची चळवळ १९१६ त सुरू झाली त्यानंतर ३१ वर्षांत त्याला डोमिनियन स्टेटस मिळालें. आयर्लंडला या गोष्टीला प्रत्यक्ष स्वातंत्र्याची चळवळ सुरू केल्यानंतर ८० वर्षें लागलीं होतीं.

तथापि डोमिनियन स्टेटस दिल्याने जसें आयर्लंडचें समाधान झालें नाही तसें हिंदुस्थानचेंहि झालेलें नाही. दोनहि राष्ट्रांत शेष प्रश्न व असंतोषाचा मुद्दा अेकच स्वरूपाचा राहिला, व तो राष्ट्राच्या विभागणीचा. आयर्लंडने स्वातंत्र्य मिळविलें तरी अल्स्टर हातचें गेलेलें निमूटपणें त्याला पाहावें लागत आहे; हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळालें तरी पाकिस्तानचे पूर्व पश्चिम टोकाचे प्रांत हातचे गेलेले त्याला पाहावे लागत आहेत. तात्पर्य, राजकारणांत सर्व कांही अेकदम कोणाच्याही हातीं पडत नाही. म्हणून टिळकांनी म्हटलेलेंच खरें–'मनुष्यानें मिळेल तें घेऊन खिशांत टाकावें. आणि अधिक मिळवायचें अुरेल त्याकरिता हात सरसावावा.'

---

# २४. आता सुराज्याच्या तयारीला लागा !

( सह्याद्रि सप्टेंबर १९४७ ).

गेली तारीख १ ऑगस्ट ही लोकमान्य टिळकांची २७ वी पुण्यतिथि हें ध्यानांत आलें म्हणजे सहजच टिळकांसारख्या ज्या दिवंगत थोर पुढाऱ्यांनी हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीला पूर्वी साहाय्य केलें त्यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. आमच्या आजच्या पिढीला हिंदी स्वातंत्र्य दृष्टीस पडलें म्हणून आम्ही स्वतःला भाग्यवान म्हणणें योग्य ठरेल. परंतु हें भाग्य आम्हांला लाभण्याला ज्या जुन्या पिढींतील लोकांची देशभक्ति, श्रम व स्वार्थत्याग हीं प्रथम कारणीभूत झालीं त्यांचें स्मरण न ठेवणें हें कृतघ्नपणाचें होईल. बिचाऱ्या त्या पूर्वजांनी हेंच समाधान मानलें होतें की, आपण आज जे श्रमसायास, जे उद्योग करीत आहों त्यांचें फळ आम्हांला न मिळालें तरी आमच्या पुढच्या पिढीला तरी मिळावें. अुत्तर-वंशजाच्या रूपानेच पूर्व-वंशज जगत असतात. पुढची पिढी हाच मनुष्यमात्राचा आत्मा होय. निपुत्रिक निरपत्य अशांचाच आत्मा नष्ट होतो, असेंच माझें तत्त्वज्ञानविषयक मत आहे.

## पुढच्या पिढीचेंच कल्याण

तीस वर्षांपूर्वी लो. टिळक होमरूलच्या चळवळींत व्याख्यानें देत, त्यांत केव्हा केव्हा त्यांच्या तोंडून एक खेदयुक्त वाक्य निघत असे, हें पुष्कळांना माहीत असेल. टिळक आपल्या व्याख्यानाच्या शेवटीं म्हणत की, ‘आमच्या जन्मांत आम्हांला स्वराज्य मिळालेलें दिसणार नाही !’ ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तें मी मिळवीनच मिळवीन’ असे आत्मविश्वासपूर्ण अुद्‌गार ज्याच्या तोंडून ठासून निघत, त्या व्यक्तीच्या पदरांत तो जन्मसिद्ध हक्क मरणापूर्वी न पडणें हें न्यायाचें नाही. परंतु ‘माझा’ या शब्दाने टिळक हे केवळ स्वतःच्या व्यक्तीचा निर्देश करीत नसत, तर ‘माझा’

म्हणजे पुढील पिढीचा व पिढ्यांचा अितकी दीर्घ अर्थव्याप्ति त्यांना अभिप्रेत होती. ठीकच आहे. अक्रोडाच्या झाडाला, तें लावल्यापासून, साठ वर्षांनी फळें येतात असें म्हणतात. तें झाड लावणाराला हें माहीत असतें. अर्थात त्या झाडाचीं फळें आपणांला खायला मिळतील अशी अपेक्षा तो कशी करील ? पण पुढच्या पिढीच्या कल्याणाकरिता परिश्रमपूर्वक खपणें हेंच आपलें कर्तव्य असें मानून तें तो करीत असतो.

दुसरा अेक दाखला द्यायचा तर तो असा देतां येअील. अेखादें युद्ध अेखाद्या राष्ट्राने आरंभिलें म्हणजे मग खड्या सैन्याशिवाय शिलकी राखीव सैन्याची भरती होअूं लागते. या भरतींत प्रौढ वयाचे लोकच प्रथम बोलावण्यांत येतात. आणि युद्धांतील पहिल्या पहिल्या लढायांतच त्यांपैकी पुष्कळ मरण पावतात. पण युद्धसमाप्तीच्या वेळेपर्यंत पुढे ही सैन्यभरती चालूच राहते. आणि तेव्हा या राखीव सैन्यांतल्या तरुण अल्पवयी नागरिक शिपायांची भरती होते. त्यांतीलहि कांही कांही शेवट शेवटच्या लढायांत मरतात; परंतु पुष्कळजण युद्धसमाप्तीपर्यंत जिवंत राहूं शकतात. आणि युद्धांत राष्ट्राला जयप्राप्ति झाली म्हणजे आनंदोत्सव सत्कारसमारंभ होतात, त्यांत या जिवंत अुरलेल्या सैनिकांच्याच मिरवणुकी मोठ्या थाटाने निघतात आणि त्यांच्यावर पुष्पवृष्टि होते. मग त्यांनी रणांगणहि पाहिलेलें नसेना ! अुलट पूर्वी जे रणांगणावर पडले त्यांच्या वांट्याला त्यांतलें काय येतें ! ते कोठे मरून पडले, कोठे गाडले गेले, त्यांतल्या कुणाचीं प्रेतें कोल्ह्याकुत्र्यांनी खाल्लीं, याची दाद किंवा नोंदहि असत नाही. फार तर 'अज्ञात अनामिक मृतवीरांचें स्मारक' म्हणून अेखादा दगडी स्तंभ अुभा करतात झालें !

## दिवंगत लोकांचा ऋणनिर्देश

दिवंगत राष्ट्रभक्त म्हणून लो. टिळकांचा नामनिर्देश आज मी केला. तथापि या देशांत ते अेकटे अेकच देशभक्त होऊन गेले नाहीत. त्यांच्यापूर्वीहि कांही झाले त्यांची गणना अितिहासांत झालेली आहे; तसेंच त्यांचे समवयस्क सहकारी, परंतु त्यांना व परस्परांनाहि अपरिचित असे अनेक देशभक्त हिंदुस्थानांत होअून गेले, त्यांचेंहि स्मरण टिळकांच्याबरोबर करणें

योग्य होईल. अशा देशभक्तांची प्रत्यक्ष नामावलि देण्याचें कारण नाही. कारण अेक तर त्या काहींचीं नांवें तुम्हां–आम्हांला माहीत आहेत. शिवाय अेकाचें नांव घेअून दुसऱ्याचें चुकून राहिलें तर गैरसमज होतो. पण याहि-पुढे जाअून मी हें म्हणतों की, ज्यांचीं नांवें तुम्हां-आम्हांला माहीत नाहीत असेहि शेंकडो देशभक्त, पुरुषच काय पण स्त्रियाहि, गतकालांत, म्हणजे सुमारे अेक शतकांत, अनेक होअून गेले. यांपैकी कोणी मानसिक तप केलें, कोणी प्रकट विचारप्रवर्तन केलें, कोणी पढिक शिक्षण दिलें, कोणी संस्था-समित्या स्थापल्या, कोणी व्याख्यानें दिलीं, कोणी लेख लिहिले, कोणी स्वार्थ-त्यागाची पराकाष्ठा केली, कोणी लढाअू वृत्ति निर्माण केली, कोणी तीव्र पण निःशस्त्र चळवळी केल्या, कोणी सशस्त्र क्रांतिकारक अुठावणी केली. या सर्वांच्या प्रयत्नाचें फळ म्हणजे आजची स्वराज्यप्राप्ति होय.

## विद्यमानांचें अभिनंदन

दिवंगत लोकांचें ऋण अशा कृतज्ञ व आदरबुद्धीने फेडल्यानंतर, राज-कारणांत वावरणारे जे देशभक्त आज विद्यमान आहेत त्यांचाहि अुल्लेख करणें योग्य होईल. पण त्याचें स्वरूप थोडें वेगळें, म्हणजे अभिनंदनाचें, होईल. या वर्गांत प्रथम सर्वच राजकीय पक्षांचा समावेश मी करतों. देशा-करिता गेल्या कांही वर्षांत ज्यांनी झगडा चालू ठेवला, अशा सर्वच राज-कीय पक्षांचें अवश्य अभिनंदन करावयास हवेंच; कारण ता. १५ ऑगस्ट रोजीं होणाऱ्या स्वराज्यप्राप्तीचें खरें मर्म त्यांनाच समजणारें आहे. त्यांचें राष्ट्रकार्य जाणतेपणे हेतुपुरःसर झालें. त्यांचें अुद्दिष्ट निश्चित होतें. हातांत बंदूक असली म्हणून अुगाच हवेंत बार काढणें वेगळें, आणि वेधलक्ष्य डोळ्यापुढे ठेवून निशाणबाजी करणें वेगळें. हवेत अुडालेला बार आवाज काढण्यापलीकडे कांहीच कार्य साधीत नाही. पण बरोबर नेम मारणारा गोळी टिपून मारतो, व निशाण खाली पाडतो. मग तो अहिंसावादी असेल तर आपल्या गोळीने एखादें गोड फळ अुंच झाडावरून पाडून खाअील, किंवा हिंसावादी शिकारी असेल तर अेखादा अुडता पक्षी किंवा धावतें हरिण मारून त्याचें पक्वान्न करून खाअील. जाणतेपणे स्वराज्याच्या अुद्देशाने ज्यांनीं अुद्योग केला त्यांनाच स्वराज्यप्राप्तीचा खरा आनंद होणार.

स्वराज्यप्राप्तीच्या 'जाणतेपणाचा अुद्योग' असें मी म्हटलें तें सहेतुक आहे. कारण असा अुद्योग करणारे केव्हाहि थोडेच असतात. अितर सर्व जनता अशी असते की, आपापल्या स्वार्थापलीकडे त्यांना देशांत काय चाललें आहे याची जाणीव नसते. टिळकांनी अेक ठिकाणीं असें म्हटलेलें आठवतें की, भरतखंडांत अनादिकालापासून चालत आलेला शेतकरी, खांद्यावर आसूड टाकून, बैल कसे हाकावे आणि बीं पेरून पीक कसें काढावें येवढेंच जाणतो, व येवढ्याचीच काळजी करितो. देशावर कोण राजा राज्य करतो याची त्याला माहिती नसते, व ती माहिती करून घेण्याचा तो प्रयत्नहि करीत नाही. आणि राजा आपला परका कोणीहि त्याला चालतो. भरत- खंडांत शेंकडा ८० टक्के शेतकरी वर्ग आहे म्हणून टिळकांना शेतकऱ्याचें अुदाहरण सुचलें असावें. तथापि अुरल्या वीस टक्क्यांत तरी स्वराज्यांत लक्ष घालणारे कितीसे असतात! शेतकरी सोडून व्यापारी घेतला तर तो स्वार्थाविषयी दक्ष व व्यवहारचतुर असतो; पण राजकारणाच्या दृष्टीने व्यापाऱ्यांपैकीहि शेकडा ८० टक्के अज्ञानी व बेफिकीर असतात.

'निद्रिताचे नि अंगेसी। साप तैसी अुर्वशी' राजकारणाच्या विषयांत अज्ञानी मनुष्यांना ज्ञानेश्वरांचें हें वचन पुरें लागू पडतें.

## निद्रितांसहि लाभ झालाच

पण राजकारणाविषयी अज्ञानी व निद्रित अशाहि लोकांना स्वराज्य- प्राप्तीच्या या 'अभिनंदनांतून' वगळतां येत नाही. याचें कारण असें की, राजकीय चळवळ करणारांनी ती करून स्वराज्य मिळविलें तरी तें केवळ स्वतःकरिता नाही. तर राष्ट्रांतील अखिल जनतेकरिताच आहे जे प्रत्यक्ष चळवळीचे श्रमसायास करितात त्यांना त्याचें वेगळें स्वतंत्र पारितोषिक म्हणून कांही मिळणें योग्य. तें त्यांना लोकप्रियता, लोकमान्यता, पुढारीपण, फार काय पण स्वराज्यांतील अधिकाराच्या व लाभाच्या जागा यांच्या रूपाने मिळतेंच. परंतु स्वराज्यापासून होणारे, सुराज्यापासून होणारे फायदे हे सर्वसामान्य असतात आणि ते या पुढारी वर्गाबरोबर सामान्य जनतेलाहि समान हक्काने भोगावयास मिळतात. चालू घटना-

समितीने मंजूर केलेल्या घटनेचा प्रास्ताविक सरनामाच पाहाना. त्यांत असें लिहिलेलें आहे की, ही स्वराज्यघटना सर्व राष्ट्राकरिता आहे. अेवढेंच नव्हे तर पुढे ' फंडामेंटल राअिट्स् ' चें–मूलभूत हक्काचें म्हणून– जें प्रकरण आहे तें पाहिल्यास त्यांत पाळण्यांतल्या ( स्त्री-पुरुषलिंगी ) बालकापासून मृत्यूचा शेजार गाठलेल्या यच्चयावत् जीवमान सर्व मनुष्यांना ही घटना काय संरक्षण देईल त्यांचे काय हक्क मान्य करील, त्यांना काय जीवनसाधनें प्राप्त करून देईल याचा खुलासा करून, स्वतः राष्ट्रीय सरकार त्या बाबतींत त्यांना जामीन राहिल्याची घोषणा केलेली दिसून येअील.

## अप्रामाणिक खोटा पुकारा

जाणतेपणाने स्वराज्याची चळवळ करणारे सर्व राजकीय पक्ष हे स्वराज्यप्राप्तीविषयक अभिनंदनाला पात्र आहेत असें म्हटलें, त्याचें अेक विशेष कारण आहे की, दुर्दैवाने आजवर यांतील अेका पक्षाने, म्हणजे काँग्रेस पक्षाने, हिंदुसभांतर्गत राजकीय पक्षाला तो ' जातीय ' आहे असें खोटें दूषण लावून, जगाचा गैरसमज करून देण्याचा अक्षम्य अपराध चालविला आहे. वास्तविक हिंदूंची हिंदुसभा, शीखांचा अकाली पंथ, हे त्या त्या नांवाने दर्शविलेल्या जातींचे जमातींचे वर्गांचे संघ असले तरी, ते केवळ धर्मदृष्टया आपल्या जातींची सुधारणा करण्याकरिता जन्माला आलेले नाहीत, तर राजकीय स्वराज्य मिळविण्याकरिता. मात्र हें स्वराज्य मिळावयाचें तर त्याकरिता स्वधर्माची किंमत दिली पाहिजे असें हिंदुमहासभा व अकाली पंथ मानीत नाही. स्वराज्य मिळवावयाचें, पण स्वधर्म स्वसंस्कृतीहि संभाळावयाची, अशी खरी भूमिका आहे. असें असता त्यांच्या स्वराज्यवादी राजकारणी वृत्तीला आपल्या वगलेंत झाकून दडपून ठेवून, त्यांचें धर्मप्रेम व संस्कृतिप्रेम हीं मात्र काँग्रेसने जगाच्या नजरेला घालण्याचा प्रयत्न केला, व त्या पक्षाला राजकारणांत स्थान नाही असा अप्रामाणिक खोटा पुकारा केला.

पण अगदी याच्या अुलट स्वतः कांग्रेसची मात्र स्थिति होती. गांधींच्या पुढारीपणाच्या आहारीं जाअून तिने प्रथमपासून हें वेड

डोक्यांत घेतलें की, मुसलमान समाजाला स्नेहांकित केलें म्हणजे अिंग्र-जांच्या हातून आपणाला स्वराज्य मिळेल ! पण ही स्नेहाची देणगी देण्याला मुसलमान सवत्या सुभ्याची किंमत मागणार ही गोष्ट काँग्रेसच्या लक्षांत आली नाही, किंवा लक्षांत येऊनहि तिने त्याकडे दुर्लक्ष केलें. याचा स्वाभाविक परिणाम हा झाला की, धर्मभेदापासून अलिप्त अशा स्वराज्याचा शब्द अगदी प्रथमपासून काँग्रेसच्या तोंडून कधी निघाला नाही पण अितकी लगट व लाळघोटेपणा करूनहि, काँग्रेसला मुसलमानांना आपल्या चळवळींत ओढून घेतां आलें नाही. बरें, हिंदुसभा ही जातीय-दृष्टिदूषित, तर मुस्लिम लीग तरी काय होती ? तिला स्वतः अिंग्रजांशी लढून झगडून स्वराज्य मिळवावयाचें नव्हतें, तर हिंदूंनी व कांग्रेसने राज्य मिळविलें म्हणजे त्यांत आपला हात घालून मोठा वांटा कसा मिळवितां येअील येवढेंच ती पाहत होती. आणि मुस्लिम लीगचा तो डाव आज कांग्रेस व अिंग्रज यांनी साधून दिला ! आणि सर्वस्वी जातीय दृष्टीच्या लीगविषयी कांग्रेसने आपलेपणा ठेवला ! स्वराज्यासाठी जीव देअून झगडणाऱ्या हिंदुसभेविषयी तिने विटाळ मानला, आणि केवळ संख्येच्या हिशेबाने मुसलमानांनी कांग्रेसला हिंदु ठरवून तिला हिंदुसभेचा प्रतिनिधि भासवून त्या वाहण्याने तिच्या द्वारें आपलें कार्य साधून घेतलें. तात्पर्य, हिंदुमहासभेला कांग्रेसने कितीहि नांवें ठेविलीं तरी आज झालेल्या स्वराज्यप्राप्तीबद्दल तिचेंहि अभिनंदन केलें पाहिजे.

स्वतः कांग्रेसचें या स्वराज्यप्राप्तीबद्दल अभिनंदन केलें पाहिजे हें तर अुघडच आहे. कारण १८८५ सालीं जन्माला आलेल्या या संस्थेने आज ६०।६२ वर्षें या अुद्देशानेच कार्य केलें. तिची परंपरा अखंड चालली. आणि अिंग्रजांनी तहाचीं सामोपचाराचीं बोलणीं करण्याचा प्रसंग आणला तेव्हा त्यांनी तिलाच पुढारीपणाचा मान दिला. कांग्रेसचें हें अभिनंदन मी खरोखर मनःपूर्वक करितों. कारण मी कांग्रेसचा प्रतिपक्षी असलों तरी शत्रु नाही. गांधीप्रणीत काँग्रेसशी माझें भांडण आज वीस पंचवीस वर्षें चालू आहे. पण तें फक्त कांही मुद्द्यांपुरतें आहे. हे मुद्दे प्रसिद्ध असल्यामुळे येथे मी त्यांचा पुनः अुच्चार करीत नाही. हे

मतभेदाचे मुद्दे कांही आता थोडे आपोआप परस्पर अुलगडण्याच्याहि मार्गाला लागले आहेत. अुदाहरणार्थ: असहकारिता, चरखा, खादी, अहिंसा अित्यादि गांधीप्रणीत तत्त्वांचें आज कांग्रेसमध्ये काय अुरलें आहे? स्वत: कांग्रेसच्या नव्या धोरणाने व आचरणानेच त्यांचें खंडन झालें आहे. गंगाधरराव देशपांडे यांच्यासारख्या कट्टर व नि:स्वार्थी कांग्रेसभक्ताने गांधीभक्ताने, कांग्रेसला नांवें ठेवणारें भाषण परवा केलेलें प्रसिद्धच आहे. अितर अनेक कांग्रेसभक्त मनांत तेंच बोलत आहेत.

## कॉंग्रेसचें अभिनंदन म्हणजे शरणचिठ्ठी नव्हे

कांग्रेसशी असणारे आमचे मतभेद, आणि स्वत: कांग्रेसपक्षांतील दोष, हे क्षणभर विसरून जाअून सध्याच्या प्रसंगीं तिचें अभिनंदन करणें हें कांही लोकांच्या दृष्टीने फाजील अुदारपणाचें आहे. ते म्हणतात कीं, "तुम्ही अेवढी जी माणुसकी दाखवितां ती स्वत: कांग्रेस पक्षांत कोठे आहे? घटनापरिषदेची रचना करितांना, व त्यानंतर तिचें काम चालतांना, हिंदुस्थानांत कांग्रेस पक्षाबाहेर कोणीहि देशभक्त, कोणीहि राष्ट्रप्रेमी, कोणीहि अनुभवी, कोणीहि शहाणे लोक नाहीत–सर्व राष्ट्रोपयोगी सद्‌गुणांचा मक्ता आपणांस मिळालेला आहे–अशा समजुतीने कांग्रेसपक्ष वागला आहे. हिंदु बहुसंख्य असलेल्या या पक्षाने विश्वासघातकी व हिंदुसमाजाला बेमान ठरून राष्ट्रीय दृष्टीनेहि त्याला अन्याय केला आहे. कॉंग्रेस पक्षाचा अहंकार आढयता उद्दामपणा बिनमुर्वतखोरपणा स्वार्थसाधूपणा हे दोष कोणीहि निंद्यच मानतो." हें सर्व खरें; तथापि अशा प्रतिपक्षालाहि भाग्य लाभल्यास त्याचें अभिनंदन मला करावेसें वाटतें खरें. हें अभिनंदन म्हणजे त्याला शरणचिठ्ठी नाही, मान्यतेची कबुली नाही, योग्यतेचें प्रशस्तिपत्र नाही. तथापि कांग्रेसपक्ष हा कांही झालें तरी माझा हिंदी भाऊबंद आहे. त्याने फाळणीला संमति देऊन स्वातंत्र्य व स्वराज्य यांना कमीपणा हीनगुणता आणली हें खरें आहे. तरी देखील आज तसल्या कां होईना स्वराज्यदानाच्या वेळीं तें घेण्याकरिता हात पुढे करण्याला पाचारण कांग्रेस पक्षाला झालें, व त्या दानाचें उदक त्याच्या हातावर पाडून त्याच्या

द्वारें इतरांच्या अंगावर शिपडलें जाणार, या त्याच्या विशेष प्रकारच्या भाग्याला उद्देशून तरी त्याचें प्रकट अभिनंदन करावें असें मला वाटतें खरें. आज कांग्रेसपक्षाचे शंभर आणि आम्ही पांच असेच, विधिमंडळादि महत्त्वाच्या स्थानांमधून दिसलों तरी कोणाहि अिग्रजादि परक्याविरुद्ध आम्ही १०५ असेंच हिंदुसभावादीहि मानतों असें मला वाटतें.

## काँग्रेसची यशस्वी पक्ष–संघटना

सन १९२० पासून काँग्रेस ही गांधीसारख्यांच्या हातीं गेली, तिने वराच काळपर्यंत अव्यवहार्य विपरीत वर्तन केलें, हिंदुराष्ट्राचा घात चालविला, तरी तिने राजकीय चळवळ चालू ठेवली. आणि हिंदुस्थानांत हाच पक्ष प्रमुख कार्यकर्ता आहे, स्वातंत्र्य स्वराज्य देअून टाकावयाचें तर तें त्याच्या हातीं दिलें पाहिजे, आज हिंदुस्थानांत पुढारी पक्ष असा तोच आहे, अशी भावना ब्रिटिश पार्लमेंट, ब्रिटिश मुत्सद्दी, किंबहुना बाहेरचें सर्व जग, यांची व्हावी अितका प्रमुखपणा त्याने मिळविला ही गोष्ट कांही खोटी नाही. फार काय, काँग्रेस पक्षाचें खरें अंतरंग अुघडें होअून त्याचे राजकीय दोष, हिंदुसमाजद्रोह, व घातकीपणा प्रकाशाअितका स्वच्छ झाला असतांहि, अुद्या निवडणुकी फिरून अुभ्या राहिल्या तर आमचे बहुसंख्य हिंदु मतदार महाशय काँग्रेसपक्षाच्या अुमेदवारांनाच मतें द्यावयाला मतनोंदणीच्या केंद्रावर जाअून कोसळणार, आणि मतनोंदणीची धडपड करणार, हें भविष्य कोणीहि करील. हा हिंदु-दुर्दैवविलास होय. तथापि हिंदी राजकारणाच्या धकाधकींत काँग्रेसने हें असामान्य यश मिळविलें हें मान्य केलेंच पाहिजे. फार तर हें लक्षांत घेअून, अुद्या यथाकाल काँग्रेसचा पाडाव करण्याकरितां इतर पक्षांनी अधिक जोराने कंबर कसावी आणि अेकजूट करावी असें म्हणावें,व त्या मार्गाने निश्चयानें कामाला लागावें. तथापि क्रिकेटच्या खेळांतला डाव ज्यान जिंकला त्या संघमुख्याचें अभिनंदन करण्याकरिता हात पुढे करण्याला हार खाल्लेल्या पक्षाच्या प्रमुखाला वाईट वाटत नाही. ते करण्याइतकी खेळकर वृत्ति त्याजमध्ये असते. कारण आज तूं डाव जिंकलास तर उद्या मीहि जिंकीन अशी आशा त्याला असते. त्याच न्यायाने व तितक्या अर्थाने कां

होईना, पण आज अितर सर्व पक्षांकडून अभिनंदन केलें जाण्याला कांग्रेस ही पात्र आहे असें मला म्हणावेंसें वाटतें.

(१) आज सुमारे सत्तावीस वर्षें गांधीजींना कांग्रेसचें पुढारीपणच नव्हे, तर तिजवर गुरु–शिष्याच्या नात्याने वर्चस्व टिकवितां आलें. (२) कांग्रेस पक्षाच्या केंद्रस्थानीं वावरणाऱ्या बुद्धिमान देशभक्तांना आपली एकजूट राखतां आली. हिंदुस्थानांतल्या फुटीर वृत्तीच्या दृष्टीने ही गोष्ट विशेष ध्यानांत घेण्यासारखी नव्हे का ? (३) आणि चुका कर करीत कां होईना पण कांग्रेसने शर्यतीच्या मैदानांत धावून शेवटीं जयस्तंभाशीं सर्वांच्या पुढे मान काढली, ही गोष्ट तिला भूषणास्पद व प्रतिपक्षांना बोधप्रद (!) ठरेल यांत शंका नाही. यांत कांग्रेस पुढाऱ्यांच्या शहाणपणाचा किंवा गांधींच्या अनुयायांच्या भोळसट बुद्धीचा विजय असो. परंतु राजकीय चळवळ करणारा एक नामांकित पक्ष म्हणून गांधी व गांधीप्रणीत काँग्रेस यांनी बाहेरच्या सर्व जगावर छाप पाडली यांत शंका नाही. आणि याकरिता तरी त्यांचें अभिनंदन अवश्य केलें पाहिजे. सूक्तासूक्त कोणत्याहि साधनांनी कां होईना, पण पक्षसंघटनेचें कर्तृत्व कांग्रेसपक्षाने प्रदर्शित केलें यांत शंका नाही.

असो. हें सर्व बोलून झाल्यावर आता 'पुढे काय? ' या प्रश्नाचें उत्तरच उपस्थित होतें. व तें देण्याचा प्रयत्न मी यथामति करितों जिना व ब्रिटिश मुत्सद्दी यांच्या संगनमताने आणि कांग्रेसच्या संमतीने हिंदुस्थानची फाळणी झाली. फाळणीने दूषित झालेल्या स्वातंत्र्यप्राप्तींत कोणाचेंहि सर्व कांही साधलें, किंवा त्याला हवें होतें तें सर्व हवें होतें तसें मिळालें, असें म्हणतां येत नाही.

## चर्चिल व अलेक्झांडर यांमधील शब्दाशब्दी

ब्रिटिशांना हें हवें होतें की, स्वयंनिर्णयाचा हक्क हिंदुस्थानने बजावला तरी त्याची मजल प्रत्यक्ष स्वातंत्र्यापर्यंत जाऊं नये. 'फ्रीडम' व 'अिंडिपेंडन्स' या दोन्ही इंग्रजी शब्दांचा अर्थ जवळ जवळ एकच आहे. त्यांत भेद असलाच तर तो इतका सूक्ष्म आहे की, तो एखाद्या इंग्रजालाहि शब्दांनी स्पष्ट करतां यत नाही. ता. १३ डिसेंबर १९४६ रोजीं पार्लमेंटांत चर्चिल

व अलेक्झांडर या दोघांत या दोन शब्दांवर वाद किंवा शब्दाशब्दी झाली ती मौजेची होती :-

अलेक्झांडर :- Future India, we all hope, will get complete freedom.

चर्चिल :- By complete freedom does the Minister mean independence ? (स्पष्टच बोलाना ! हातचें ठेवून तें लपवितां कां ?)

अलेक्झांडर :- Yes.

चर्चिल :- Why not *say* so ?

अलेक्झांडर :- I am always prepared to take instructions from such a master of the English language as Mr. Churchill on what words ought to be chosen. If independence means freedom, it may also be that freedom means independence. In the offer, made by the Secretary of State for India in June 1945, he said he hoped Indians would be able to get their complete freedom within the Commonwealth or *without* it.

चर्चिल :- This expression ' full freedom ' does require a more precise definition. As far as freedom is concerned India has had an immense measure of freedom. But the question of independence has a different aspect of freedom; and it is necessary to distinguish between the two. We are expecting to hear that the Constituent Assembly has declared in favour of an independent Indian republic. That is independence–whether it is freedom is a matter which only the future can show. (हा लांबलचक उतारा इंग्रजींतच देण्यांत स्वारस्य असल्यामुळे त्याचें मराठी भाषांतर आम्ही देत नाही. आणि तसें करण्याबद्दल सह्याद्रीच्या निव्वळ मराठी वाचकांची क्षमा मागण्याशिवाय दुसरें कांही करतां येत नाही. जेथे freedom आणि independence या दोन शब्दांच्या अर्थाबद्दल दोन इंग्रजांतच वाद रंगतो तेथे त्याचें भाषांतर करण्याचें धाडस कसें करावें ?)

## इंग्रजाला मनांतून नको असें थोडेसें घडलेंच

या वादांतील तात्पर्य हेंच की, अिंग्रजाला मनांतून हिंदुस्थानाला किंचित् मर्यादित असेंच स्वातंत्र्य द्यावयाचें आहे. तथापि पूर्ण स्वातंत्र्य असे शब्द योजणें तो नाअिलाजानें प्राप्त मानतो. आणि पार्लमेंटांत आणलेल्या बिलाचें नांव 'स्वातंत्र्याचें बिल' असें असलें तरी त्यांतील सत्त्व 'डोमिनियन स्टेटस' हेंच आहे. खरें बोलावयाचें तर मजूर पक्षालाहि हें आवडेल की, जोंवर तो पक्ष स्वतःच अिंग्लंडचा राजा मानतो, तोंवर तरी हिंदुस्थानांतील लोकांनी (आयर्लंडप्रमाणें) डोमिनियन स्टेटसमध्ये अन्तर्भूत असलेला राजा मानावा. पण आता घटना-समितीने घटनेंतून राजा काढून टाकला, डोमिनियन न ठरवितां रिपब्लिक ठरविलें, तेव्हा अिंग्रजाला मनांतून नको असें थोडें तरी या स्थित्यंतरांत घडलें असें म्हणावें लागतें.

याचीं प्रत्यंतरेंहि मिळत आहेत. मजूर पक्षाच्या ढिलेपणाला कॉंझरव्हेटिव्ह पक्ष मनांतून नाराज आहे. ब्रिटिश व्यापारी व उद्योगधंदेवाले किती नाखूष आहेत हें, परवा हिंदी दर्यावर्दी व्यापाऱ्यांच्या बाबतींत हिंदी सरकारकडून मान्यता घेऊन गेलेल्या वालचंद हिराचंद प्रमुख शिष्टमंडळाला कसें उर्मटपणे वागविण्यांत आलें,यावरून दिसून आलें आहे. हातचा मासा उडी मारून परत पाण्यांत जातोसा दिसल्यावर, 'जा तुला जीवदान देण्याचें पुण्य मला लाभो' असें म्हणून हात चोळणाऱ्या जळ-पारध्याअितकेंच औदार्य अिंग्लंडने खरें दाखविलें आहे. अितकेंच नव्हे तर, जातां जातां फाळणी लादून करतां येईल तितकें हिंदुस्थानचें नुकसान तरी केलें, या गुप्त भावनेने चर्चिलप्रभृति अिंग्रज आपल्या हानीचें कसें तरी समाधान करून घेत आहेत अितकेंच. तात्पर्य, झालेल्या हिंदी स्थित्यंतरांत इंग्लंडचें मनासारखें साधलें नाही असेंच म्हणणें प्राप्त आहे.

## बाकी सगळे नाराजच

बरें, तुलनेने सर्वांत अधिक लाभ पाकिस्तानच्या रूपाने जनाब जिनांच्या पदरांत पडला असें असलें तरी, पंजाब-बंगाल हे सबंधच्या सबंध हातीं यावे अशी जी त्यांची महत्त्वाकांक्षा होती ती कुठे पुरी झाली ?

आणि पूर्व व पश्चिम पाकिस्तानमध्ये एक राखीव बोळ त्यांना हवा होता तो तर मिळालाच नाही. मिळून, जिना ब्रिटिश सरकारवर नाराजच. पंजाबी पाकिस्तानचे मुसलमान नाराज, कारण त्यांना पाकिस्तानची सरहद्द हवी तितकी पूर्वेकडे सरकवतां येत नाही व दिल्ली शहर मिळत नाही आणि बंगाल पाकिस्तानचे मुसलमान नाराज कारण त्यांना कलकत्ता शहर मिळत नाही.

शीख नाराज, कारण त्यांच्यापैकी लाखो लोकांना पाकिस्तान प्रांतांत समाविष्ट व्हावें लागत आहे, व त्यांचीं कांही पवित्र स्थळें मुसलमानी अमलाखाली जात आहेत.

बंगालचे हिंदु नाराज, कारण कांही हिंदु जिल्हे पूर्व पाकिस्तानांत जात आहेत.

कांग्रेस नाराज, कारण फाळणीला संमति देण्याचें तिचें दुष्कृत्य चव्हाट्यावर आलें, व आपण मुसलमानधार्जिणे म्हणून हिंदु समाजाकडून निंदेचा वर्षाव तिला सोसावा लागत आहे.

हिंदुसभा व बहुतेक हिंदुसमाज तर (यांत कांग्रेसवालेहि अनेक आहेत) नाराज, अितकेंच नव्हे तर सर्वस्वी रुष्ट आहे. हातीं हत्यार व पदरीं सैन्य नाही म्हणूनच तो युद्धाला आज उभा राहूं शकत नाही. नाही तर कांग्रेसला आत्मसंरक्षणाकरिता मुसलमानांची किंवा ब्रिटिश सैन्याची मदत घ्यावी लागली असती.

पण फाळणी सोडली, तरी घटनासमितीच्या इतर अनेक निर्णयांनीहि कांग्रेसने हिंदुसमाजाच्या भावना दुखविल्या आहेत. फाळणीसंबंधाने 'आम्हांला तरी ती कुठे इष्ट वाटते ? पण करणार काय ?' असें कांग्रेसला म्हणतां येतें. पण नव्या स्वतंत्र राष्ट्राचें नांव, राष्ट्रीय ध्वज, इत्यादि विषयांत कांग्रेसने, ती पूर्ण स्वतंत्र असतां, ज्या अप्रिय गोष्टी केल्या आहेत त्यांचें फाळणीप्रमाणे, रडकें समर्थनहि तिला करतां येण्यासारखें नाही. एक राष्ट्रनामच घ्या. हें नांव घटना समितीने 'अिंडिया' असें पसंत केलें आहे. पण 'हिंदुस्थान' असें कां नाही ? 'अिंडिया' हा शब्द अिंग्रजी आहे. स्वतंत्र हिंदी स्वराज्याचा बाकी सर्व व्यवहार संस्कृतनिष्ठ हिंदींतून व्हावयाचा आहे.

तर राष्ट्राचें नांवहि त्या भाषेंत सापडणार नाही काय ? पण नवीन हुडकायला जाण्याचें कारण तरी काय ? 'हिंदुस्थान' हें नांव संस्कृतप्राय असून, शिवाय शेंकडो वर्षांपासून रूढ आहे. 'हिंदुस्थान' हा शब्द, बाहेरच्या सर्व जगाला 'पाकिस्तान' या नव्या नांवापेक्षा शत-पटीने अधिक परिचित आहे. हिंदुस्थान हा शब्द अिंग्रजी वाङ्मयांत, ग्रंथांत, हजारो ठिकाणीं उपयोजिलेला दाखवून देतां येईल. फार काय पण स्वत: जनाब जिनाहि 'हिंदुस्थान' हाच शब्द वापरतात. ता. १३ डिसेंबर १९४६ रोजीं लंडन येथील किंग्जवे हॉलमध्ये भाषण करितांना बॅ. जिना म्हणतात, "There is no other way but to divide India. Give Muslims their homeland, and give Hindus Hindustan."

## 'हिंदु' या शब्दाची लाज का भीति ?

हिंदूंचें घर तें हिंदुस्थान ! वरील भाषणावरून हें दिसून येईल की, पाकिस्तान देऊन टाकल्यावर या देशांत जें उरतें त्याला 'हिंदुस्थान' असा शब्द लावण्याला स्वत: जिना हे तयार आहेत. असें असतां कांग्रेस मात्र तसें करण्यास तयार नाही. हिंदुस्थानला हिंदुस्थान म्हणण्याला कांग्रेसची तयारी नाही, कारण 'हिंदु' हा शब्द उच्चारण्याला कांग्रेस लाजते किंवा भिते–कांहीहि म्हणा. पण वास्तविक तसें लाजण्याचें किंवा भिण्याचें काय कारण ? पाकिस्तानव्यतिरिक्त भूभागाला हिंदुस्थान म्हटलें म्हणजे त्यांत शेंकडा शंभर हिंदूच राहतात असें होत नाही. पण येथेंच काय, जगांतल्या कोणत्याहि देशांत शेंकडा शंभर एकजिनसी एकजातीय एकधर्मीय एक-वंशज असा समाज असतच नाही, व तसें कोणी समजतहि नाही. देशच काय, पण आज हिंदुस्थानांत बहुधा असें एकहि गांव सांपडणार नाही की, त्यांत वरील प्रकारचा कोणताहि एकजिनसी समाजच राहत असेल.

प्राय: बहुतेक गांवांतून मुख्य वस्ती हिंदूंची, मग इतर कांही मुसलमान व कांही थोडे अन्यधर्मीय अशी वस्ती असावयाची. त्या इतरांत कोठे ख्रिस्ती थोडे अधिक, तर कोठे जैन लिंगायत अधिक, कोठे बौद्ध अधिक. पण कोठेहि अशा मिश्रणांत हिंदूंचेंच प्रमाण अधिक भरणार. पण समजा

पाकिस्ताननजीक क्वचित एखाद्या गांवांत हिंदूंपेक्षा मुसलमान अधिक भरले तरी तो तालुका किंवा जिल्हा घेतला तर तेथे हिंदूच अधिक भरणार. मुसलमान हेच ज्या जिल्ह्यांत अधिक असतील ते जिल्हे पाकिस्तानांत जाणारच, किंबहुना ते त्या त्या विभागांत जावे वसवावे याकरिताच सरहद्द-मंडळें काम करीत आहेत. तात्पर्य, हिंदुस्थान हें या राज्याचें राष्ट्राचें देशाचें नांव न ठेवण्याला एकच कारण–म्हणजे हिंदु या नांवाची जी खंती गांधी-प्रणीत कॉंग्रेसने आज पंचवीस वर्षे घेतली आहे तेंच होय! दुसरें नाही. तें नांव ठेवण्याला स्वत: कांग्रेसशिवाय इतर कोणाचीहि हरकत नाही. ब्रिटिशांची नाही. हिंदुस्थानांतील युरोपियन, युरेजियन, ख्रिस्ती, पारशी, जैन, बौद्ध, यहुदी यांची नाही. आणि वर सांगितल्याप्रमाणे स्वत: जिनाच हिंदुस्थान हें नांव कबूल करतात तर हिंदुस्थानांतील मुसलमान तें नाकबूल कसें करतील? हिंदुस्थानांतील मुसलमानांना अल्पसंख्यांचे म्हणून कांही हक्क आहेत. तथापि त्यांनी, या देशांत ते राहणारे म्हणून, हिंदुस्थान याशिवाय दुसरें एखादें नांव सुचविलेलें आमच्या ऐकिवांत नाही. कोकणांत साप समंध यांचा त्या शब्दांनी उल्लेख न करण्याचा प्रघात आहे. वैद्य लोक रोगाचें नांव उच्चारीत नाहीत. तशीच ' हिंदु ' या शब्दाचीहि गत झाली म्हणावयाची !

## पाकिस्तान तर आलेंच; मग पुढे काय ?

आज मुसलमानांव्यतिरिक्त असा एकहि पक्ष नाही की ज्याने फाळणीला इष्ट मानलें, बरें म्हटलें. ही गोष्ट हिंदुमहासभेपासून स्वत: ब्रिटिश प्रधानमंडळापर्यंत सर्वांनी स्पष्ट शब्दाने प्रकट केली आहे. तथापि ता. १८ जुलै रोजीं अमलांत येणाऱ्या पार्लमेंटरी कायद्यानें पाकिस्तान व हिंदुस्थान अशीं दोन स्वतंत्र राज्यें या देशांत निर्माण झालीं खरीं. या आपत्तीचा निर्वाह वेदान्ती पद्धतीने करणारे, म्हणजे द्वैतांत अद्वैत पाहणारे, ' एकं सत् विप्रा बहुधा कल्पयंति ', ' अविभक्तं विभक्तेषु यः पश्यति स पश्यति ' असें म्हणून समाधान मानणारे कांही तत्त्वज्ञानी निघतील. तर उलट ही फाळणी आज नाही तरी उद्या मोडून काढूं, आणि यापुढे सर्व शक्ति, सर्व प्रयत्न या दिशेने चालवूं असें म्हणणारे ध्येयवादीहि कांही भेटतील.तथापि वेणीसंहारां-

तील भीमाप्रमाणे 'हा पहा माझ्या गदेने मी हा संधि मोडतो, तुम्हां कुणाला तो जोडण्याची शक्ति असेल तर तो जोडून पहा,' ('मम गदा विघटयति यूयं, घटयथ') असें म्हणून बॅ. जिना यांनी हिंदुस्थानचे तुकडे केले ही गोष्ट तूर्त तरी सिद्ध म्हणून घेऊन चालणें प्राप्त आहे. ब्रिटिश मुत्सद्दी व कांग्रेस यांनी असा दगा दिला नसता तर देशांत कलह माजले असते खरे, परंतु कायद्याने हिंदुस्थान अखंड राहिलें असतें. कारण जिना हे कांही स्वतःचें ऐखादें सैन्य अभारून, अिष्ट सरहद्दीवर अुभे राहून, पाकिस्तान पाठीशीं घालून "हे पहा आम्ही स्वतंत्र झालों, असेल छाती तर लढायला या" असें म्हणते ना. बरे, आता फाळणी झाल्यावर ती अमान्य असणारे हिंदु लोक तरी काय करणार ? स्वतः शेष हिंदुस्थान सरकारला फाळणी अनिष्ट वाटली तरी, सैन्य घेऊन पाकिस्तानवर चालून जाऊन तें राज्य मोडून परत हिंदुस्थानांत घालण्यास लागणारें नीतिधैर्य, उत्साह, कांग्रेस-प्रमुख हिंदुस्थान सरकारांतच जर नाही तर हिंदुमहासभा झाली तरी ती काय स्वतंत्र सैन्य अुभारून पाकिस्तानावर चालून जाऊन तें हस्तगत करणार ? हेंहि शक्य नाही. याचा अर्थ हाच की आहे ही स्थिति नाअिलाजाने गृहीत घेऊन यापुढे तीन गोष्टी कशा कितपत करतां येतील याकडे हिंदुस्थान सरकाराने व अितर पक्षांनी लक्ष दिलें पाहिजे. पैकी (१) अेक गोष्ट ही की आता हिंदुस्थानी स्वराज्यांतून सुराज्य कसें किती निघेल ? (२) दुसरी गोष्ट ही की पाकिस्तानांत सांपडलेल्या अल्पसंख्य हिंदुशीखादिकांना संरक्षण व न्याय कसा मिळेल ? आणि (३) तिसरी गोष्ट ही की शेष हिंदुस्थानच्या राज्यांत जे अल्पसंख्य मुसलमान राहिले आहेत त्यांच्याशी कसें वर्तन ठेवावें ? म्हणजे स्वतः त्या मुसलमानांना तर अन्याय न होअील, परंतु त्यांतल्या त्यांत पाकिस्तानांतील हिंदूंना साहाय्य होअील, असें प्रतियोगी दहशतवादी किंवा आत्मौपम्य प्रतीत करून देणारें धोरण कसें ठेवतां येअील ?

## स्वराज्याची किंमत सुराज्यानेच होते

या तिन्हीपैकी पहिली गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण स्वराज्याची किंमत सुराज्यानेच होत असते. सुराज्याच्या कसोटीवरच स्वराज्याचा कस लागतो. स्वराज्याला स्वतंत्र अशीहि कांही किंमत आहे हें खरें-

म्हणजे सुराज्य कितीहि चांगलें ठरलें तरी तें स्वराज्याची जागा घेऊं शकत नाही हें खरें. सुराज्यांत मिळणाऱ्या सुखाने स्वराज्यहानीच्या दुःखाची भरपाअी होत नाही हें खरें. तथापि स्वातंत्र्य मिळवावयाचें तें सुराज्य पदरीं पाडून घेण्याच्या पराक्रमाला संधि मिळण्याकरितांच मुख्यत्वेंकरून मिळवावयाचें असतें, ही गोष्टहि कांही खोटी नाही.

आज घटनासमिति बसली आहे ती जी अेखादी घटना निर्माण करील ती सुराज्य पदरांत पडण्याच्या हेतूनेच प्रथम करील ही गोष्ट खरी. तथापि तीच घटना अनंतकालपर्यंत अबाधित टिकणारी नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव येईल त्याप्रमाणे प्रजाजनतेच्या अिच्छा भावना आकांक्षा बदलत गेल्या तर त्याप्रमाणे राज्यघटनाहि बदलावी लागेल. स्वराज्य हें सुवर्ण आहे. व घटना हा अलंकार आहे.

मोडोनि भांगाराचा रवा । लेणें घडलें आपलिया सवा ॥
मग नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ॥ (ज्ञाने.)

सोनें आपल्या मालकीचें असल्यावर त्याचा दागिना हवा तसा आवडीअभिरुचीचा सुखसोअीचा बनविण्याचा अधिकार आपणाला राहतोच. आज घटना–समितींत बनणारी राज्यघटना कांही तपशिलाच्या बाबतींत तरी तात्पुरती कामचलाअू समजण्याला हरकत नाही. मूलभूत मौलिक गोष्टी बदलत नाहीत; पण तपशिलाच्या बदलूं शकतात. अुदाहरणार्थ, हिंदुस्थानांत राजशाही राहणार नाही लोकशाहीच राहील हें निश्चित आहे. पण प्रांतीय विधिमंडळें खालचीं वरचीं अशीं पुढें दोन राहतील की अेकेकच राहील हें कोणी सांगावें ? त्याचप्रमाणें सभासदसंख्या, गटवारी, संयुक्त विभक्त मतदारसंघ, अल्पसंख्यांना देण्याच्या सवलती, अित्यादि गोष्टींचा कायदा बदलूं शकेल आणि त्यांची आवश्यकता अनवश्यकता प्रत्यक्ष राज्यकारभार करतांनाच कळून येईल.

## अेक उपमा

ता. १५ ऑगस्टपासून नव्या हिंदुस्थान सरकाराला आपला वरिष्ठ कारभार नव्या दृष्टीने नव्या माणसांकडून नव्या धोरणाने करावा लागेल.

आणि तेव्हापासून त्यांच्या अंगीं देशांत सुराज्य निर्माण करण्याच
किती आहे हें कळून येअूं लागेल. स्वराज्याला स्वयंपाकाची अुपमा
ठरेल. 'स्वयंपाक' म्हणजे भोजन करणाराने आपल्या हाताने केलेलें
श्रीमंतांच्या घरीं स्त्रियांनाहि स्वयंपाक आपल्या हाताने करावा लागत .
अेखादे दिवशीं कौतुकाने त्या अेखादा आवडीचा पदार्थ आपल्या हाताने करून खातील; पण त्यांच्या घरीं नेहमीचा पाक हा खऱ्या अर्थाने स्वयंपाक नसतो. परक्या स्त्री–पुरुष आचाऱ्याच्या हातचाच बरा वाअीट होअील तसा खावा लागतो. गरिबांच्या घरीं स्त्रियाच पाक करतात, तो त्यांच्यापुरता स्वयंपाक ठरला तरी घरच्या पुरुषांना तो परहस्तपाकच असतो. पण दुसऱ्याने केलेल्या पाकांत अशुद्ध अनिष्ट असे पदार्थ पोटांत जाण्याचा संभव असतो. हें न घडावें तर स्वयंपाकाचा शिधा तोहि ज्याचा त्याने स्वतः निवडून पाखडून घेअून रांधावयास हवा. आणि अशा रीतीने तयार झालेला स्वयंपाक हाच अिष्ट मानावा लागतो.

श्री ज्ञानेश्वरांचीं दोन वचनें येथे आठवतात:––

( १ ) सिद्धसाध्य भोजनीं तृप्ती अेक

( २ ) भोजनसुख महाग पाकु करितां.

सिद्ध म्हणजे आधीच तयार करून झालेल्या अन्नाने जसें जितकें अुदर भरतें तितकेंच स्वतः नवीन रांधिलेल्या अन्नानेहि भरतें. भूक भागण्याला अमुक अितकें अन्न लागतें मग तें कांहीहि असो व कोणीहि शिजविलेलें असो. पण केवळ जठराचें भरताड भरणें हेंच कांही भोजनसुख नव्हे. तें सुख मिळण्याला स्वतः हाताने हवे तसे रांधलेले स्वादिष्ट पदार्थच लागतात. पण स्वयंपाक आपला आपण करण्याला श्रम लागतात ना ? त्या श्रमामुळे भोजनसुख मिळालें तरी तें महाग पडतें ना ? असलें महागडें भोजनसुख कां घ्यावें? याचें उत्तर हेंच कीं, जें महाग असतें म्हणजे ज्याला अधिक किंमत पडते तेंच अधिक मौल्यवान असतें. अुंची पदार्थच महाग पडावयाचा. खाद्य अन्नाचें मूल्य व महत्त्व त्याच्या स्वादिष्टपणावर व शुद्धतेवर अवलंबून असतें. आणि या दोनहि गोष्टी साधावयाला स्वतःच्या हाताने स्वयंपाक तर करावाच लागतो, पण त्याचा शिधाहि स्वतः पाखडून निवडून घ्यावा लागतो.

# गुणदोषाचे धनी आपणच

ुकरी मागून उदरंभरण करणारा विद्यार्थी व कोऱ्हान्न मागणारा ा हे याविषयी आपण तुलनेला घेऊं. नुसतें थोडें हिंडलें कीं मधुकरी ाऱ्या विद्यार्थ्याच्या झोळींत आयतें शिजविलेलें अन्न येऊन पडतें. त्यानें नुसतें पाटावर बसून खाल्लें म्हणजे झालें. हें करण्याला त्याला श्रम काय पडणार? उलट अग्निहोत्र्याच्या ताम्हनांत कोरें धान्य पडतें तें तो घरीं नेतो, सुपांत पाखडतो किंवा पाटावर घालून निवडतो, मग चुलीवर ठेवून रांधतो आणि खातो. अशा रीतीने निर्मळ स्वच्छ केलेला शिधा आपल्या हातानें शिजवून खाण्याला श्रम लागत असले तरी त्या स्वयंपाकानें खरें भोजनसुख मिळतें यांत शंका नाही. स्वराज्यांतून सुराज्य निर्माण करणें हा देखील स्वयंपाकच होय. तो चांगला झाला तर त्याची गोडी श्रेय आपलें आपणाला, तसाच तो वाईट झाला तर त्याची जबाबदारी आपणावरच असते, त्यांत दुसऱ्याला नांवें ठेवण्याला जागा राहत नाही.

आजवर या देशांत अिंग्रज राज्यकर्ते होते तेव्हा राज्यकारभारांत कांही दुखलें–खुपलें तर आपण अिंग्रज सरकारला नांवें ठेवून मोकळे होत होतों. पण ते येथून निघून गेल्यावर, सुराज्याची जबाबदारी आपणावर आली. म्हणजे आपण स्वराज्य चांगलें हांकलें तर त्याचें सुख आपणालाच मिळणारें आहे. तसेंच आपणाला तें चांगलें चालवितां आलें नाही तर त्याचा दोष आपणालाच पत्करावा लागणार आणि त्याचें दुःख आपणालाच भोगावें ागणार. जबाबदारी ही गुणपरीक्षा करणारें रसायन ठरतें. म्हणून आता ापण सर्व पक्षांचे लोक झालें गेलें सर्व विसरूं या, आणि स्वराज्यांतून ुराज्य कसें निर्माण होअील या अेकाच विचाराने प्रेरित होअून पुढच्या ामाला लागूं या. लो. टिळकांनी हाच संदेश सर्व जनतेला दिला असता.

---

# २५. रोमन अमलाखालचें इंग्लंड

( सह्याद्रि डिसेंबर १९४७ )

हिंदुस्थान हें जसें ब्रिटिश अमलाखाली दीडदोनशें वर्षे होतें तसें स्वतः ब्रिटन हेंहि एकदा परतंत्र होतें. तें खिस्ती शतकाच्या प्रारंभीं सुमारे चारशें वर्षें. सगळ्या सासवा पूर्वी एक वेळ सुनाच असतात. ब्रिटनचे हे परकीय राज्यकर्ते म्हणजे रोमन लोक. आणि अितर अनेक प्रकारची हानि झाली असतां, हिंदुस्थान हें जसें शेवटीं दिखाअू सुधारलेल्या स्थितींत ब्रिटिश अमलांतून बाहेर पडलें, तसेंच ब्रिटनहि सुधारणा होऊन रोमन अमलांतून बाहेर पडलें. रोमन लोकांचें राज्य होण्यापूर्वी ब्रिटनमध्यें यादवी होती, तशीच रोमन राज्य निघून गेल्यावरहि ती दोनशें वर्षें टिकली. अिंग्रज येण्यापूर्वी हिंदुस्थानांत अशीच यादवी होती. परंतु आता ते गेल्यावर यादवी अशीच कायम चालू राहील की केव्हा तरी शांतता नांदू लागेल कोणी सांगावें?

प्रख्यात रोमन सेनापति ज्यूलियस सीझर याने ब्रिटनवर स्वारी करण्याचा विचार मनांत आणला तेव्हा कांही ब्रिटिश लोक (उत्तर भागांत) अंगाला निळा रंग लावणारे, रानावनांत राहणारे असेच पुष्कळांशीं होते म्हणतात. अिंग्लंडच्या दक्षिण भागांतील लोक मात्र थोडे अधिक सुधारलेले होते. कारण खाडीपलीकडील युरोपीय लोकांचा व त्यांचा संबंध थोडा बहुत येअी. युरोपाचा उत्तर भाग यापूर्वी रोमन लोकांच्या अमलाखाली बरेच दिवस आला होता. अिंग्लंडच्या या दक्षिण भागांत तेव्हा सोन्याचें नाणें चालू होतें. लोकांचे लहान लहान संघ स्वयंशासित असेहि कांही येथे होते. मात्र मोठें संघटित राज्य नव्हतें. शेती, धान्य व गुरें यांचाच काय तो व्यापार मुख्यतः चाले. पण थोडें रुपें, मोतीं, लोखंड हेंहि जिन्नस पैदा होत, विकले जात. जहाजें बांधण्याची कला लोकांना माहीत हो

अितकी की, रोमकडून येणाऱ्या जहाजांनाहि अेखादें ब्रिटिश जहाज भारी अनावर वाटावें. त्यांचे सोल लोखंडी व अवजारें कातड्याचीं असत. रथ व गाडे हेहि बांधले जात. बेल्जम देशावर रोमन लोकांच्या स्वाऱ्या होत तेव्हा दक्षिण पूर्व ब्रिटनचे लोक त्यांना साहाय्य करीनात, असें आढळून आल्यावरून रोमन सरदारांची दृष्टि ब्रिटनकडे वळली. आपसांत भांडणाऱ्यांपैकी कांही ब्रिटिशांनी ज्यूलियस सीझरकडे संधान बांधलें आणि आपल्या शत्रूविरुद्ध मदत मागितली. सीझरने ऐंशी जहाजें व दहा हजार सैन्य या स्वारीवर योजिलें. मात्र सरंजाम व धान्यसामग्री थोडीच घेतली; कारण ब्रिटनमध्यें सैन्य उतरविलें तरी अवश्य तो कार्यभाग करतांच तें परत यावयाचें होतें. या सैन्याला केंट परगण्यांतील लोकांनी विरोध केला. त्यामुळे सीझरला कसा तरी तह करून सैन्य परत आणावें लागलें.

परंतु पुढील वर्षी (खिस्तपूर्व ५५ सालीं) त्याने प्रचंड आरमार व सैन्य सिद्ध करून दुसरी स्वारी केली. या खेपेस त्याला प्रथम समुद्रावरील वादळाने व नंतर गनिमी ब्रिटिशांनी फार त्रास दिला. यामुळे ही स्वारी देखील परतली. परंतु ब्रिटिश लोकांना रोमन शिपायांचा धाक बसला. त्यांनी कांही जामीन पटविले व वार्षिक खंडणीहि मान्य केली. यानंतर सुमारे नव्वद वर्षेपर्यंत फिरून रोमन स्वारी अशी अिकडे झाली नाही. परंतु दक्षिण इंग्लंडांतील बेल्जम वसाहतवाल्यांनी रोमन लोकांशी दिलजमाअी व व्यापार आरंभला. रोमन विद्या व कला यांचा प्रवेश अिंग्लंडांत हळू हळू सुरू झाला. यामुळे ब्रिटन हें संपत्तिमान आहे असे रोमन लोकांच्या मनाने घेतलें, रोमला देण्यांत येणाऱ्या खंडणीचें रूपांतर बंदरी जकातींत झालें. कांही ब्रिटिश स्त्रिया रोमन पुरुषांशी लग्नें लावून रोममध्ये सासरी म्हणून रहावयास जाऊं लागल्या. लॅटिन भाषेचा चंचुप्रवेश ब्रिटनमध्ये सुरू झाला.

खि. पू. ३४ या सालीं रोमन बादशहा ऑगस्टस याच्या मनांत इंग्लंडवर स्वारी करण्याचें आलें होतें. परंतु तें घडून आलें नाही. शेवटीं रोमन बादशहा क्लॉडियस याच्या कारकीर्दींत पुन्हां रोमने स्वारी केली. एका ब्रिटिश राजकुमाराने बापाविरुद्ध बंड करून रोमन सैन्याची मदत मागितली.

बंडखोर फ्रेंच लोक अिग्लंडांत जाऊन आश्रय घेतात, अशीहि एक सबब सांगण्यांत आली. ड्रयुअीडपंथी लोक ख्रिस्तीधर्मप्रसाराला विरोध करतात हीहि एक सबब मिळाली. रोमन कारकुनी फड व लष्करी फड यांना ब्रिटनच्या कारभारांत भारी पगारी जागा मिळण्याचा संभव दिसला. क्लॉडियसने पन्नास हजार फौज तयार केली. ऑलस प्लॉटियस याला सेनापतित्व देण्यांत आलें. लंडनजवळ टेम्स नदींत मोठी लढाअी झाली. रोमन सैन्यानें लकडी पूल काबीज केला. स्वतः क्लॉडियस् ब्रिटनमध्ये आला. ब्रिटिश सैन्याचा मोड झाला व ब्रिटनमध्ये रोमन राजसत्तेला प्रारंभ झाला. मात्र उत्तर ब्रिटनकडून हल्ले सुरूच होते, व अखेरपर्यन्त म्हणजे तीनशें वर्षांच्या राज्यांत रोमन सरकारला स्कॉटलंडचें उत्तर टोंक गांठतां आलें नाही!

लंडन येथे रोमन सरकार स्थिर होतांच सराअीत रोमन अिंजिनिअरांनी लंडन हें केंद्र धरून अिग्लंडभर रस्ते बांधण्यास सुरुवात केली. पण या सुमारास स्वातंत्र्य परत मिळविण्याची बंडाची चळवळहि सुरू झाली. यांत ड्रयुअीडपंथी लोक व कांही देशभक्त स्त्रियाहि होत्या. उलट रोमन राज्यकर्त्यांनी जमीनदार सरदार यांच्या जमिनी जप्त करण्यास प्रारंभ केला. दुसरी झांशीकरीण लक्ष्मीबाईच अशी अिग्रज राणी बोएडिशिया या चळवळींत पुढारी होती. तिने लिंकनजवळ रोमन सैन्याचा पराभव केल्यामुळे दुय्यम गव्हर्नर केट्स् हा फ्रान्सला पळून गेला. परंतु शेवटीं राणी बोएडिशिया व तिच्या दोन मुली यांचा पराभव होऊन राणीने विष खाऊन जीव दिला! घोड्यावर स्वार झालेली झांशीवाली लक्ष्मीराणी आणि रथारूढ बोएडिशिया यांचें चित्रसाम्य मनाला फार पटण्यासारखें वाटतें. असो; अखेर अि. स. ६१ सालीं रोमन बादशहाने सामोपचाराचा जाहीरनामा काढून कशीबशी शांतता प्रस्थापित केली.

येथून ब्रिटनमध्ये भौतिक सुधारणा सुरू झाली. नव्या पद्धतीच्या इमारती, पूल, रस्ते झाले. ब्रिटनमधील लोक रोमन व्यापारी माल घेऊ मागवूं लागले. रोमन शिक्षक येऊन राजभाषा म्हणून लॅटिन भाषेचें शिक्षण देऊं लागले. चिनीमाती, कांच यांचे कारखाने उघडण्यांत आले. रोमन

गरुडध्वज उत्तरेकडे सरकू लागला. मात्र यॉर्कशायर व लॅंकॅशायर या दोन परगण्यांतील बंडाचें बंड मोडलें नव्हतें. दक्षिण वेल्स व उत्तर स्कॉटलंड हीं देखील बंडाचीं केंद्रेंच होतीं. पण ज्यूलियस ॲग्रिकोलासारखे सौम्य शहाणे गव्हर्नर लाभल्यामुळे बंडाचा प्रसार झाला नाही.

रोमन सैन्याच्या पहिल्या स्वारीनंतर सुमारे सातशे वर्षांनी सर्व ब्रिटन देश रोमन सत्तेखाली आला. अि. स. १२१ या वर्षी रोमन बादशहा हॅड्रियन याने ब्रिटनला भेट दिली. त्याने स्वत: सरहद्दीची पाहणी करून किल्ले बांधले, खंदक खणले. लष्करी ठाणीं बसविलीं. त्यांचे अवशेष अजून आढळतात. दुसरे पक्षीं सरकारी कामकाज, व्यापार, वाहतूक, टपाल, नगररचना, शेतीची वाढ व सुधारणा झपाट्याने सुरु झाल्या. स्थानिक स्वराज्याचे हक्क निवडक शहरांना देण्यांत येऊ लागले. रोमन नागरिकत्वाचा मान हा मौल्यवान समजण्यांत येऊ लागला. लॅटिन भाषा सर्वत्र बोलण्यांत येऊ लागली. रोमन व्यापारांतील चैनीच्या पदार्थांची मागणी वाढली. रचनेंत बांधणींत शोभिवंतपणा आला. उपनगरांतील चैनीची राहणी वाढली. रोमन विटांचे कारखाने निघाले. धर्माचारांत रोमन देवदेवता यांच्या पूजेचा प्रसार झाला. ड्रुइड धर्मपंथांतील नरयज्ञावर बहिष्कार पडून त्यावर हत्यार उपसण्यांत आलें. अि. स. १८१ सालीं बंड झालें. तें मोडल्यावर अि. स. १८४ सालीं रोमन बादशहाने 'ब्रिटॅनिकस' (ब्रिटनचा बादशहा) ही पदवी आपल्या रोमन राजे या पदवीला जोडली (राणी व्हिक्टोरियाने "हिंदची बादशाहीण" हा किताब घेतला तशी). ब्रिटनचे दोन भाग करण्यांत आले. त्यांतील उत्तर भाग हा लष्करी व दक्षिण भाग हा मुलकी असें ठरविलें. उत्तरविभागांत शांतता राहण्याकरिता सरकार स्वतःच त्या लोकांना वार्षिक खंडणी देऊ लागलें! (हिंदी वायव्य प्रांतांतील पठाणांना अिंग्रज सरकार देई त्याप्रमाणे). अि. स. २१० या सालीं स्कॉटलंडमधील अखेरचें बंड मोडलें. अि. स. २०० ते ३०० या शतकांत पूर्ण शांतता नांदली. यामुळे ब्रिटनची सुधारणा अतिशयच झाली. ब्रिटनसारख्या या दूर देशांत प्रतिअिटली अवतरला असें लोक म्हणू लागले. स्थानिक संपत्ति व रोमन संस्कृति यांना भरती आली. रोमन राज्यव्यवस्थेला उपद्रव न करणाऱ्या देशी चालीरीति

धर्मविधि भाषा यांना रक्षण देण्यांत येई. आपण 'रोमन नागरिक आहों!' अशी आढ्यतेची भाषा ब्रिटिश लोकांत सुरू झाली. रोमन नाण्यांची टांकसाळ सुरू झाली. राजे परकी खरे, परंतु सुख व शांतता हीं या राज्यांत मिळतात, असें प्रजाजन उघड कबूल करूं लागले.

तिसऱ्या शतकाच्या शेवटीं एक नवा बनाव झाला. ब्रिटनच्या पूर्व व दक्षिण किनाऱ्यावर परदेशी चाचे लोकांचा मारा अितका सुरू झाला कीं, त्याकरितां रोमन सरकारला एक प्रचंड नाविक दळ व आरमार निर्माण करावें लागलें. पण या सैन्याचा अधिपति हा महत्त्वाकांक्षी ठरला. हिंदुस्थानांतील मोंगलाई बादशाहींत नबाबांनी जें केलें तेंच या नाविक दलपतीने केलें. त्याने स्वतंत्र होऊन आपल्याच नांवाच्या नाण्यांची टांकसाळ घातली. अखेर तो इतका शिरजोर झाला की, रोमन बादशहा डायोक्लिशियनने त्याला 'जोड बादशहा' ही पदवी दिली. अि. स. २९६ सालीं फ्रँक नामक पगारी सैनिकांनी बंड केलें, तें मोडण्यांत आलें. पण पिक्ट, आयरिश, सॅक्सन इत्यादि लोकांच्या स्वाऱ्या वरून खालून सुरू झाल्या. अि. स. ३५० हें साल इंग्लंडांतील रोमन राज्याच्या उत्कर्षाचा उच्च बिंदु मानण्यांत येतो. येथून ऱ्हास सुरू झाला. इंग्लंडचें चौथें शतक व एकोणिसावें शतक यांची आपआपल्या परीनें—म्हणजे इंग्लंडच्या सुस्थितीच्या दृष्टीनें—बरोबरी मानण्यांत येते.

अि. स. ३६४ या सालीं स्वत: रोमन साम्राज्यावरच रानटी टोळ्यांचे हल्ले सुरू झाले. इंग्लंडला जसें हिंदुस्थान तसें रोमन राज्याला अिंग्लंड, इतकें सापेक्ष महत्त्व अिंग्लंड या रोमन प्रांताला आलें होतें. पण शेवटीं या प्रांताचें रक्षण करणें रोमला अशक्य होऊं लागलें. खुद्द ब्रिटनमधील सैन्यांतले सैनिकच सैन्य सोडून जाऊं लागले. रोममध्ये लष्करी पुढाऱ्यांतच यादवी माजली. पूर्व व पश्चिम रोमन राज्यांत युद्ध जुंपलें शेवटीं अि. स. ४०६ सालीं व्हॅन्डॉलप्रभृति लढाऊ रानटी लोकांनी हल्ले चढविल्यामुळे, व त्यांनी गॉल प्रभृति रोमन प्रांत आपल्या ताब्यांत घेतल्यामुळे, रोमन सरकारला आपलें ब्रिटनमधील सैन्य स्वत:च्या संरक्षणाला परत बोलवावें लागलें.

अि. स. ४१० या सालीं अॅलॅरीक याने खुद्द रोम शहरच जिंकून लुटलें. मग दूरचें ब्रिटन ताब्यांत कोण कसें ठेवणार ?

अर्थात् ब्रिटनचें रक्षण करण्याचें काम यापुढे स्वत: ब्रिटनच्या लोकांवरच पडलें. यामुळे स्थानिक राजे--रजवाडे उदयाला येअूं लागले. सुप्रसिद्ध राजा आर्थर हा यांतीलच एक होता.

---

# २६. ब्रिटिश साम्राज्याचा अधःपात

( सह्याद्रि जानेवारी १९४८ )

आज हिंदुस्थानांत घडून आलेली राज्यक्रांति मुख्यत: शांततेच्या मार्गाचीच आहे. गेल्या सुमारे पंचवीस तीस वर्षांत या देशांत झालेल्या राजकीय चळवळींत शांततेचा भंग, लूटमार, जाळपोळ, मनुष्यवध, सामुदायिक आक्रमण व विरोध अित्यादि प्रकार झाले ते अशांततेचे होते यांत शंका नाही. परंतु दृश्य स्वरूपांत न येणारा असंतोष व त्यावर आधारलेली अेकंदर जनतेची सरकारशी वागणूक हाच भाग या चळवळींत अधिक होता. म्हणजे वरून बाहेरून राजसत्तेला दणके बसण्यापेक्षा आंतून वर उमटणारें दडपण अधिक प्रभावी व परिणामकारक होतें यांत शंका नाही. लढाया, युद्धें अित्यादि स्फोटरूपी विध्वंसाचे प्रकार अचानक घडल्यामुळे डोळे दिपवितात व अधिक संस्मरणीय वाटतात. अुलट पाण्याच्या दावाप्रमाणे दृष्टीस न पडता पण हमखास रीतीने सर्वांगीण खालवर दडपण पाडणारी शक्ति परिणामकारक असली तरी अुघड न दिसणारी म्हणून डोळ्यांत भरत नाही. समुद्राची भरती भरू घातलेली पाहात असतां तिच्या वाढत्या पाण्याकडून कांही परिणामकारक कार्य होअूं शकेल, असें कोणाच्या तरी लक्षांत येत असेल काय ? परंतु वीज किंवा वाफ यांच्या शक्तीने जेवढीं कार्यें झालेलीं दृष्टीस पडतात, तेवढीं समुद्राच्या भरतीच्या दावाचा अुपयोग करून घेतल्यास होअू शकतात, याला भौतिक विज्ञानशास्त्राची साक्ष देतां येअील. पावसा-

ळ्यांत अेकदम पूर येऊन ओसरून जातो तो दृष्टीला पडतो म्हणून लक्षांत राहतो, परंतु अगदी शांत शरदृतूमध्येहि नद्यांचे प्रवाह डोंगरी अुचवट्यां-तील माती आपल्या लाटांच्या कोवळ्या नखांनी अुकरून दूरदूरच्या प्रांतांत वाहून नेअून आपल्या काठचे भूमिभाग मअू, सुपीक मातीच्या थरांनी संपन्न व समृद्ध करतात ही गोष्ट कोणाच्या लक्षांत येते ? शेंकडो वर्षे जावीं तेव्हा 'अरे ! या ठिकाणीं पूर्वी टेकाडें किंवा अुंचवटे होते' असें फक्त संशोधकाला कळून येतें व मग त्याच्या तोंडून तसे उद्गार निघतात.

कोणत्याहि देशांतील राजकारणाचा अितिहास घेतला तरी त्यांत जुन्या सत्तेचे ढीग, उंचवटे, टेकाडें, डोंगर हीं धुपून जाअून (क्वचित् अेखाद्या प्रसंगीं उलथून पडून) सत्तेचे नवे थर, ढीग, उंचवटे अित्यादि निर्माण झाले, हाच अितिहासाचा क्रम दिसून येअील.

गेल्या ता. १५ ऑगस्ट रोजीं झालेली राज्यक्रांति विजेच्या चमकीसारखी वाटली. त्या विजेने कशावर प्रत्यक्ष आघात केला नाही. परंतु डोळे दिपून त्याचबरोबर त्या डोळ्यांना अेक आनंददायक असा प्रकाश दाखविला.आता वीज चमकल्यानंतर फिरून अंधार डोळ्यांत भरतो व तो कदाचित् पूर्वीच्या अंधारापेक्षा क्षणभर अधिक काळोखी भासवितो हें खरें; तथापि त्या अंधारा-मुळे वीज चमकून गेली ही गोष्ट कांही खोटी पडत नाही. हिंदुस्थानांतील राजकारणाचें आजचें स्वरूप, पूर येअून ओसरून गेल्याप्रमाणे किंवा वीज चमकून गेल्याप्रमाणे कांहींना वाटेल हें खरें; तथापि या पुराचा अेकंदर वर्षा काळाशी जो संबंध तोच या विजेचाहि वातावरणांतील वाढत्या अुष्णता-मानाशीं संबंध आहे. अर्थात् राजकारण हें क्षणिक नसून तें विस्तीर्ण काला-वर पसरलेलें सुसंगत सकारण असतें.

## इंग्रजी साम्राज्याचा हिशेब

अिंग्रजी साम्राज्य पूर्व महासागर व हिंदुस्थान, ब्रह्मदेश यांतून नाहीसें होणार असलें तरी जगांतून तें समूळ नष्ट होत नाही. अुलट आफ्रिका खंडांत तें दृढमूल होण्याचा रंग आहे.यापूर्वीच या मागासलेल्या खंडांत अिंग्लंडने आपले पाय खोल रोवून ठेवलेले होते. आणि अुत्तरेस अीजिप्तमधून

त्याचें ठाणें अुठलें तरी मध्य आफ्रिका, पूर्व आफ्रिका यांमध्यें तें दृढ होत आहे· दक्षिण आफ्रिकेला अिंग्लंडने स्वराज्य दान करून आज पस्तीस वर्षें अंकित करून ठेवलें आहे. कांही महिन्यांपूर्वी अिंग्लंडच्या राजा–राणी–राजकन्या या त्रयीची मिरवणूक दक्षिण पूर्व आफ्रिकेंतून काढण्यांत आली ती सहेतुकच होती. आमच्या अिकडे कांही देवस्थानांचा वार्षिक किंवा नैमित्तिक समारंभ असला म्हणजे त्याच्या प्रारंभीं देवळांतल्या गर्भगारांतल्या मूर्ति बाहेर काढून चौकांत चवाठ्यावर कांही दिवस मांडून ठेवतात, त्या अर्थानें राजाराणीची ही आफ्रिकन फेरी झाली आहे. हिंदुस्थानांतलें गोरें सैन्य निघून आफ्रिकेंत जाणार, नवे विमानतळ बांधले जाणार आणि नाअील नदीच्या दोनहि अंगाने ब्रिटिश साम्राज्याची स्थापना होणार.

प्रत्यक्ष सत्तांकित अशा ब्रिटिश साम्राज्यांत अद्यापि खालील ठाणीं व ठिकाणें राहणार आहेत–न्यू ग्वायना, पाप्युआ, बोर्निओ, सारावाक, सीलोन, ( अँग्लो अिजिप्शन ) साअुडन, सोमाली लँण्ड, अेडन, सायकिलीज बेटें, केनिया, झांझिबार, न्यासालँड, ऱ्होडेशिया, स्वाझीलँड, बसूटोलँड, नैर्ऋत्य आफ्रिका, बेक्युआनालँड, टांगानिका, युगांडा, कॅमेरून, टोगो, नायगेरिया, सीरालिऑन, गँबिया, सायप्रस, माल्टा, जिब्राल्टर, जमेका, पूर्व पॅसिफिक-मधील कांही बेटें. स्नेहांकित साम्राज्यांत कॅनडा, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड हीं राष्ट्रें राहतील. हीं व्यावहारिक दृष्ट्याच स्वतंत्र आहेत. हिंदु-स्थान, ब्रह्मदेश, अीजिप्त अित्यादि राष्ट्रें पूर्ण स्वतंत्र होणार. तीं ग्रेट ब्रिटनशी कितपत स्नेह ठेवतील हें पुढे ठरणार आहे.

परंतु वरीलप्रमाणे गेल्या-राहिल्याचा हिशेब केला असतां हिंदुस्थान, ब्रह्मदेश व अीजिप्त हीं राष्ट्रें ब्रिटिशांच्या हातून गेल्यानेच साम्राज्याचा, खरा तोटा व ऱ्हास आहे. वसाहती स्वतंत्र असल्यामुळें त्या नकाशांत तांबड्या रंगाने दाखविल्या गेल्या तरी त्यांवर अिंग्लंडला यापुढे फारसें आधारून अवलंबून राहतां येणार नाही. सत्तांकित साम्राज्यांत राहणाऱ्या ठाण्याठिकाणांची यादी वर दिली आहे, ती मोठी वाटते; तथापि तीं ठाणीं ठिकाणें महत्त्वाचीं नाहीत. समुद्रावरून फिरतांना आरमार, व्यापारी जहाजें यांना पाय ठेवण्याटेकण्याला मित्रभूमि अितकाच त्यांचा अुपयोग अिंग्लंडला

होईल. भरपूर आर्थिक लाभाच्या जागा हिंदुस्थान, ब्रह्मदेश व ओजिप्त हीं हातचीं जाणार व तोच खरा ऱ्हास.

अिंग्लंडच्या या नव्या अुपक्रमाने पूर्वसमुद्र, ब्रह्मदेश, हिंदुस्थान यांतील साम्राज्य ' ऱ्हास पावलें ' ही गोष्ट लपविली जाअू शकत नाही. आणि हें नवें साम्राज्यहि कालांतराने नष्ट होणारें आहे. येवढेंच काय, मेकॉले याच्या प्रतिभेने वर्णिल्याप्रमाणे अशीहि अेक वेळ येअील की, " पूर्व महासागरांतील वसाहतींकडून आलेला अेक प्रवासी टेम्स नदीच्या अेका पुलावर अुभा आहे. आणि त्याला स्थानिक माहिती करून देणारा अेक अिंग्रज दूरवर अंगुलि-निर्देश करून म्हणत आहे–तें पाहा, ब्रिटिश पार्लमेंट म्हणून अितिहासांत महत्त्वाचा अुल्लेख येतो ना, त्या पार्लमेंटचें तें सभागृह. त्या पडक्या भिंती, ते बुरुजाचे अवशेष दिसतात ना ! हां––थेट तिथेंच पार्लमेंटचें सभागृह होतें".

## इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाचें गूढ

पण मी हें अिंग्रजाविषयीच्या कोण्या द्वेषबुद्धीने म्हणत नाही. हिंदु साम्राज्याचें तसेंच झालेलें नाही काय ? रायगडावरची शिवाजी महाराजांच्या सिंहासनाची जागा परवापर्यंत रानटी लतावेलींनी झाकून गेली होती आणि अशोक, चंद्रगुप्त यांच्या साम्राज्याची खूण कांही भग्न स्तंभ, कांही पुसट शिलालेख, कांही दुर्वाच्य नाणीं यांशिवाय काय राहिली आहे ? वर मेकॉलेच्या शब्दांनी मी ब्रिटिश राज्याचें वर्णन दिलें आहे ते शब्द लिहिणारा ग्रंथकार हा कांही अिंग्रजद्वेष्टा नव्हता. सर्वभक्षक काळाच्या लीलेचें हें केवळ वर्णन होय. पण काळ हा सर्वभक्षक असला तरी त्याच्याच अुदरांतून नित्य नवोत्पत्ति होत असते. यामुळे वठलेल्या झाडाच्या बुडीं कालांतराने नवा रोपा फुटतो, किंवा अुद्‌ध्वस्त झालेल्या वास्तूच्या पायावर किती तरी नवीं घरें बांधलीं जातात. तात्पर्य, अिंग्रज साम्राज्य हिंदुस्थानांत नष्ट झालें तरी त्याचा अिंग्लंडला व हिंदुस्थानला दोन निरनिराळ्या प्रकारचा बोध होअू शकतो. मात्र तो होण्यासाठी मनुष्याचें मन विचारी असलें पाहिजे.

साम्राज्याभिलाषी राष्ट्रांत अिंग्लंड हें अग्रगण्य असें मानलें गेलें आहे आणि त्याचमुळे हिंदुस्थानांतील सत्ता अशी अभावित रीतीने सुखाने हातो-

हात अिंग्लंड कशी सोडून देत आहे, हें पाहिलें म्हणजे अिंग्लंडच्या परराष्ट्रीय राजकारणी धोरणाचें पुष्कळ विचारी लोकांना मोठें गूढ वाटतें. पण आजच काय, पूर्वीहि युरोपियन मुत्सद्द्यांना तें असेंच गूढ वाटत असे. ( ' British foreign policy is mysterious' ). आपटी खाअून फिरून त्याच जोराने वर डोकें काढणाऱ्या अिंग्रजांच्या मुत्सद्द्यांच्या राजनीतीची गुरुकिल्ली आहे तरी काय, असा पुष्कळांनी आपापल्या ठिकाणीं प्रश्न केला आहे व अिंग्लंडच्या अितिहासावर भाष्य करतांना विरोधाभासात्मक विवेचन केलें आहे. ( १ ) 'अिंग्लंड लहान आहे म्हणूनच मोठें आहे.' ( २ ) अिंग्लंड हें अेक तुटक बेट आहे म्हणूनच भूवलयांकित अनेक देशांशी त्याचा निकट संबंध आला व तो त्याने टिकविला. ( ३ ) अिंग्लंड लढाया, मोहिमा हरतें, पण युद्धें जिंकतें. ( ४ ) अिंग्लंड स्वत: आजवर नेहमी राजशासित असतां लोकशाहीचा आग्रह धरणारांत व पुरस्कार करणारांत तेंच सर्वांच्या पुढे असतें. अित्यादि. आणि विरोधाभास याचाच अर्थ हा की दिसतांना विपरीत, विरुद्ध म्हणून जें दिसतें तें खरोखरच सकारण असतें. अि. स. १६०० ते १९१४ हीं तीन शतकें हा ब्रिटिश पातशाहीचा भर अुत्कर्षाचा काळ. या काळांत फरान्स, ऑस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी, रशिया हीं राष्ट्रें बरोबरीचीं व पुढारलेलीं अशीं होतीं व त्यांतच अिंग्लंड हें एक होतें. एक फरान्स सोडून या इतर देशांत अिंग्लंडप्रमाणे राजशाही नांदत होती. इतकेंच नव्हे तर जर्मन व रशियन राजघराण्यांशी इंग्रज राजघराण्याचे आप्तपणाचे संबंध होते. या काळांत लोकसत्तेचा उदय हळू हळू होत असला तरी प्रत्यक्ष राजसत्ता वरिष्ठ वर्गाच्या कांही थोड्या वजनदार घराण्यांच्या हातीं होती. या पुढारी राष्ट्रांत युद्धें होतच नव्हतीं असें नाही. पण तीं मर्यादित थोड्या काळीं लहानशा जागीं ( स्थानिक ) होत. येवढेंच काय, या युद्धांत कोणत्याहि राष्ट्राला नामशेष करणें हा हेतु नव्हता. या काळांत विज्ञानांत पुष्कळच भर पडली. अशा उत्कर्षाच्या काळीं इंग्लंडला पुढारीपणाचें वैभव लाभलें आणि खरोखरच हें वैभव मोठें होतें.

## इंग्लंडच्या योग्यतेची झांकली मूठ उघडली

पण १९१४ व १९३९ च्या महायुद्धांनी अिंग्लंडची अंतर्गत वाढती दुर्बळता जगाच्या प्रत्ययाला येऊं लागली. पहिल्या महायुद्धांत फ्रान्स होता

म्हणून अिंग्लंड उघडें पडलें नाही. दुसऱ्या युद्धांत तर जपान व जर्मनी यांच्या पराभवाचें श्रेय मुख्यतः अमेरिका व रशिया यांनाच द्यावें लागतें. चीनमधून जपानला निघून जावें लागलें; पण चीनने जपानचा पराभव केला असें होत नाही. जें काय झालें तें अमेरिका व रशिया यांनी केलें.

इंग्लंडच्या खऱ्या योग्यतेची झाकली मूठ सव्वा लाखाची होती, याचें कारण आठ राष्ट्रांच्या तोलावर इंग्लंड नाचत होतें तसेंच त्याच्या जोडीला इंग्लंडची आर्थिक स्थिति चांगली होती; पण आता या दोन्ही अनुकूल गोष्टी नाहीशा झाल्या आहेत. आज इटलीच्या उत्तरेपासून बाल्टिक समुद्रापर्यंत एकजात रशियाचें प्रस्थ माजलें आहे. चेक, पोलिश, युगोस्लाव्ह, बल्गेरियन या राष्ट्रांवर रशियाने आपली पकड बसविली आहे. उलट पश्चिम युरोपांत असाच एक प्रतिस्पर्धी राष्ट्रांचा संघ बनविण्याचा इंग्लंडचा बेत होता तो साधलेला नाही. या पश्चिम युरोपियन राष्ट्रांत कम्युनिस्ट कारवाया रुजल्या असून बऱ्याच खोल गेल्या आहेत. इंग्लंडचें पुढारीपणाचें महत्त्वाचें स्थान जाऊन त्याला अमेरिकेच्या उपग्रहासारखें नाचावें लागत आहे आणि तसें न नाचून कसें होणार ? कारण अमेरिकेच्या कर्जांत इंग्लंड गळ्याअितकें खोल रुतलें आहे. इंग्लंडने पूर्वी जगाची सावकारी केली ती आता संपली.

## डोळ्यांनी पाहिलेली इंग्लंडची स्थिति

दीड वर्षांपूर्वी मुंबईचे व्यापारी गृहस्थ ए. डी. श्रॉफ हे अिंग्लंडला एका शिष्टमंडळाचे सभासद म्हणून गेले होते. त्यांनी परत आल्यावर स्वतः डोळ्यांनी पाहिलेली इंग्लंडची स्थिति मुंबईस एका व्याख्यानांत सांगितली. ती अशी:– " इंग्लंडची आर्थिक स्थिति घसरत चालली आहे. उद्योगधंद्याची घडी बरीच विसकटली आहे. मनुष्यबळ फार कमी झालें आहे. सामाजिक स्थितीहि बिघडली आहे. एक वेळीं इंग्लंडचें चारशें कोटि पौंडाअितकें भांडवल बाहेरच्या देशांत गुंतलेलें असून त्याला घरबसल्या सुमारे पंधरा कोटि पौंड व्याज येत असे. पण युद्धाच्या भरीस पडल्यामुळे इंग्लंडचें हें सर्व भांडवल खलास झालें असून उलट साडेतीनशें कोटि पौंड कर्ज

झालें आहे. कारण युद्धांत इंग्लंडने चोवीसशें कोटि पौंड खर्च केला. शांततेच्या काळीं पुढारलेले, भरभराटलेले इंग्लंडचे एक दोन मोठे धंदे जवळजवळ बुडाले. उदाहरणार्थ, लँकेशायरच्या कापडाचा धंदा. आमच्या इकडे शेत जमिनीचे तुकडे तुकडे झाल्याने शेतकी बुडाली त्याप्रमाणे लँकॅशायर परगण्यांत या धंद्यांतील हितसंबंधाचे तुकडेतुकडे झाले आहेत. धंदेवाईक कुटुंबांतील तरुण मुलें धंदा सोडून गेलीं. अतरांजवळ धंदा चालविण्याअितका पैसा उरला नाही.

" आम्ही कांही कारखान्यांत समक्ष जाऊन पाहिलें तेव्हा असें दिसून आलें की, त्यांतील पुष्कळ वर्षें वापरलेली जुनी यंत्रसामग्री निरुपयोगी झाली आहे. इमारतींची पडझड झाली, तिची दुरुस्ती नाही. इमारतींत हवी तशी हवा खेळत नाही. अिंग्लंडांत ट्रेड युनियन्स (मजूर संघ) प्रबळ आहेत अशी कीर्ति; पण हे संघ या साध्या गोष्टींतहि अजून सुधारणा घडवून आणू शकले नाहीत ! सन १६८० मध्ये स्थापलेला एक चाकू कात्र्या सुऱ्या यांचा कारखाना आम्ही पाहिला. त्याचें स्वरूप इतकें जुनाट मागासलेलें दिसलें की, आमच्या इकडेहि तसा कारखाना आढळणार नाही. अशा स्थितींत व्यापारी माल कसा तयार होणार व परदेशीं कसा पाठविला जाणार ? अजून रणक्षेत्रावरचे सैनिक परत स्वदेशीं आलेले नाहीत आणि आले तरी ते आपापल्या जुन्या उद्योगधंद्यांत एकदम चौरस कसे बसणार ? अनेक कारखान्यांत नुसती युद्धसामग्री तयार होत असे; पण आता युद्ध थांबल्यावर त्यांतील युद्धसामग्री काय कामाची ? युद्ध जुंपलें म्हणजे सैन्यभरती होते, तींत वाटेल त्या धंद्यांतला माणूस वाटेल त्या दुसऱ्या कामावर नेमला जातो, पण तो परत आल्यावर जुना धंदा व त्यांतली जुनी जागाहि त्याला नेमकी कशी मिळणार ? जुनें शिक्षण विसरलें गेलें; नवें मिळालें तें शांततेच्या काळांत निरुपयोगी ठरणार ! अशा विपरीत स्थितींत सुमारे एक कोटि लोक सापडले तर काय होईल याची सहज कल्पना करतां येते. युद्ध काळाच्या कारखान्यांत सामान्य मजुराला दर आठवड्याला सहा ते आठ पौंड वेतन मिळे. सोळा ते अठरा अशा कोवळ्या वयाच्या स्त्री मजुरांनाहि आठवड्याला पांच पौंडांपर्यंत वेतन मिळे. पण शांततेच्या काळांतील कारखान-

दारींत इतकें भारी वेतन देण्याला कसें परवडणार ? म्हणून मजूरवर्ग कामावर जायला नाखूष असतो. शिवाय सहा वर्षांच्या सतत श्रमामुळे एकंदर अिंग्रज जनतेला क्षीण शिथिलता आली आहे. जो तो कंटाळून हाताचीं बोटें मोडीत जांभया देतोसा वाटतो. मनाजोगें काम भेटण्याची तो वाट पाहतोसा दिसतो. पण इतक्या लोकांपैकी सर्वांना मनाजोगेंच काम कसें भेटणार ? युद्धांत भारी वेतन मिळालें त्यांतलें कांही शिलकी पडलें; त्यावर कांही दिवस गुजारा करावा व निरुद्योगी राहावें अशी बुद्धि त्याला झाल्यास काय नवल?

"युद्धकाळांत लष्करी सामान-सरंजाम यांच्या उत्पादनाकडे सहा लक्ष लोक गुंतले होते. आता ती संख्या कमी झाली तरी अजून घरची कारखानदारी, आणि बाहेरच्या उपद्व्यापांमुळे सैन्य ठेवून ठाणीं सांभाळण्याच्या जबाबदाऱ्या यांचा मेळ इंग्लंडला घालतां येईनासा झाला आहे. दहा लाख माणसें खाणी आणि कारखाने यांकडे अधिक द्यावीं तेव्हा युद्धपूर्वीच्या उत्पादनाच्या पाऊणपटीइतकें उत्पादन इंग्लंडच्या पदरांत पडेल. पण हे दहा लाख शिपाई परत बोलवावयाचे तर पॅलेस्टाइन, ग्रीस, जर्मनी व पूर्वीचें स्वतःचें जगभर पसरलेलें साम्राज्य हें कसें संभाळावयाचें ? बरें, सैन्यांत घेतलेले लोक मोकळे न करावे तर तेहि इतके दिवस लष्करी नोकरीसाठी घराबाहेर राहून इतके कंटाळले आहेत की त्यांची आणखी उपेक्षा केली तर ते बंड करतील. आजच सुमारे वीस हजार ब्रिटिश सैनिक परवानगीशिवाय नोकरी सोडून गेले व बेपत्ता झाले आहेत. अमुक एका तारखेपर्यंत ते बिनबोभाट परत येऊन दाखल झाले तर त्यांच्या अपराधाची क्षमा होईल अशी घोषणा सेनापतींना करावी लागली. तिचा फायदा घेऊन हे लोक चोरून परत आले तर येतील."

## इंग्लंडपुढचा खरा प्रश्न

वास्तविक पॅलेस्टाईन, ग्रीस इत्यादि देशांत ब्रिटिश सैन्य ठेवण्याची अिंग्लंडला काय गरज ? पण सर्व जगाचें पालनकर्तृत्व आपणाकडे दिलें आहे अशी जी भावना अिंग्लंडने विनाकारण स्वतःची करून घेतली ती त्याला नडत आहे; दुसरें काय ?

शिवाय आता अिंग्लंडपुढे खरा प्रश्न येऊन पडला आहे तो वेगळाच. तो म्हणजे उद्या अमेरिका व रशिया यांचें युद्ध जुंपलें तर अिंग्लंड काय करणार ? तटस्थ राहावें तर मैत्रीच्या तहाचा भंग होतो. ज्याच्या उपकारावर अिंग्लंड दोन महायुद्धांतून वर निघालें त्याची साथ या नव्या युद्धांत न करून कसें चालेल ? शिवाय रशिया हा जितका अमेरिकेचा तितकाच अिंग्लंडचाहि शत्रु आहे. बरें, सहकारी मित्र म्हणून अमेरिकेबरोबर युद्धांत पडावें तर अिंग्लंड आणखी दरिद्री, कर्जबाजारी होणार. एवढेंच नव्हे तर लष्करी दृष्ट्याहि रशिया अिंग्लंडला भारी ठरून तो अिंग्लंडचीं हाडें सैल करील. एक अमेरिकन पत्रकार लिहितो– "एका धूर्त कोल्ह्याने बेत केला की, दोन मूर्ख बोकडांना एकत्र आणून भांडावयास लावावें व त्यांचें रक्त आपण प्यावें. पण झालें असें की, त्या दोन बोकडांच्या टकरींत स्वतः कोल्हाच सापडून त्याचा चेंदामेंदा झाला. अमेरिका व रशिया यांच्या युद्धांत अिंग्लंडची हीच स्थिति होणार आहे. हें युद्ध सुरू झालें तर पूर्वी जर्मनीने केलें तसें रशिया पहिल्याच झपाट्याला करील; म्हणजे आपल्या प्रचंड सैन्याच्या बळावर बहुतेक सर्व युरोप व्यापून बसेल. रशियाजवळ अणु-अस्त्र नसलें तरी फ्रान्सच्या किनाऱ्यावरून तो अिंग्लंडवर घातक विमानांचा मारा करीत राहील आणि अर्धवट पदरांत पडलेली अणु-अस्त्राची कला जर मध्यंतरी त्याने हस्तगत केली तर पाहावयासच नको. अिंग्लंडचें सर्व ऐश्वर्य अवघ्या बारा शहरांत साठविलेलें आहे. तीं उद्ध्वस्त झालीं की संपलें ! इकडे अमेरिकेने तर रशियाची कुरापत काढण्याचा सपाटा चालविला आहे. या दोघांच्या कलहांत अिंग्लंडची मध्यस्थी यशस्वी झाली तरच बरी गोष्ट. पण चर्चिल व बेव्हिन यांचें परराष्ट्रीय धोरण पाहिलें तर तें हा कलहाग्नि चेतविण्याचेंच आहे. युद्ध प्रत्यक्ष जुंपलें म्हणजे अमेरिका राहील दूर; पण पहिला तडाखा अिंग्लंडला बसेल. तोंडाने साम्राज्यशाही-विरुद्ध अिंग्लंड बोलतें; पण आज अमेरिकेचें धोरण आपल्या डॉलर-संपत्तीच्या जोरावर जगभर वर्चस्व स्थापण्याचेंच चालू नाही काय ? आणि समजा प्रत्यक्ष युद्ध टळलें तरी अिंग्लंडचें वर्चस्व जाऊन त्या जागीं अमेरिकेचें वर्चस्व प्रस्थापिलें जाणें अटळ आहे."

अिंग्लंड आज आपलीं शस्त्रास्त्रें अमेरिकेच्या धर्तीचीं करीत आहे. हेतु हा की अमेरिकेकडून या शस्त्रास्त्राचें जें प्रचंड उत्पादन होत आहे त्यांतलें सामान आपल्याला आयतें भरीला मिळून अमेरिकन व अिंग्रज शिपाई समान भूमिकेवरून लढतील. अमेरिकन व अिंग्रज सैन्याधिकारी यांची अदलाबदल व देवघेवहि सुरू आहे. इंग्लंडने आपल्या आरमाराने अटलांटिक संभाळावा आणि अमेरिकेने पासिफिक महासागर संभाळावा अशा योजना होत आहेत. आपल्या वसाहती पूर्वीसारख्या आपल्या साहाय्याला धावून येतील अशी इंग्लंडची समजूत आहे, पण तो भ्रम ठरण्याचा संभव आहे. पूर्वीच्या युद्धांत आयर्लंड 'साम्राज्यांतर्गत' असलें तरी तटस्थ राहिलेंच की नाही ? हिंदुस्थानहि नव्या युद्धांत तेंच तटस्थपणाचें धोरण स्वीकारील यांत शंका नाही. कांग्रेस सरकार हिंदी कम्युनिस्टांचा द्वेष करो. परंतु उद्या प्रत्यक्ष युद्धांत रशियाविरुद्ध अिंग्लंड अशी स्थिति उत्पन्न झाल्यास हिंदुस्थान रशियाविरुद्ध दंड थोपटून उभें राहणार नाही. ऑस्ट्रेलियाहि बहुधा तटस्थ राहील. कॅनडा मात्र अमेरिकेची बाजू धरील असें दिसतें; पण तीहि खात्री नाही. तटस्थ राहण्यांतच कॅनडाचें संरक्षण व हित आहे आजवर साम्राज्याच्या जोरावर अिंग्लंडने बढाया मारल्या, साहसें केलीं; पण उद्या हिंदुस्थानचें साम्राज्य हातचें गेलें म्हणजे काय राहिलें ? याचा अर्थ हाच की येऊन जाऊन ग्रेट ब्रिटनने आपल्या बेटांचें संरक्षण केलें म्हणजे मिळविली. पण त्याकरिता त्याला आपलें सर्व तिरंगी लष्करी सामर्थ्य अेकवटावें लागेल.

## अेकदा कर्ज घरांत शिरलें म्हणजे—

मनुष्य एकदा कर्जबाजारी झाला म्हणजे मग तो मिळेल तिकडून कर्जच काढीत सुटतो. इंग्लंडचेंहि असेंच झालें आहे. जुनें कर्ज सोडून दिलें तरी अलीकडे अिंग्लंडने अमेरिकेकडून शंभर कोटि पौंडांचें नवें कर्ज काढल्याचें पुष्कळांना ऐकून माहीत आहे.पण अिंग्लंडने कॅनडा वसाहतीकडूनहि बाराशेंपन्नास कोटि डॉलरचें कर्ज काढलें आहे; आणि वैमानिक शिक्षणाच्या साम्राज्यव्यापी योजनेच्या निमित्ताने कॅनडाकडून पूर्वी काढलेलें बेचाळीस कोटि डॉलरचें कर्ज माफ करवून घेतलें आहे, ही गोष्ट पुष्कळांना माहीत नाही. कॅनडांतील प्रत्येक मनुष्यागणिक इंग्लंडला शंभर पौंड कर्ज देण्यांत

आलें आहे असा हिशोब होतो. इंग्लंड मागेल तितकें कर्ज त्याला देणें अमेरिकेला प्राप्तच झालें आहे. कर्ज देऊन कसें तरी अिंग्लंडला आपल्या पायावर उभें न केलें तर सगळ्या जगांतील युद्धविषयक व इतर राजकारणाचा भार एकट्या अमेरिकेवर पडेल. इंग्लंडला अमेरिकेने कर्ज दिलें त्या वेळीं तें कर्ज किती हप्त्यांनी कसें उचलावें याविषयी या ऋणको-धनकोमध्ये कांही समजुतीचा करार झाला होता. पण इंग्लंडच्या हातून तो पाळला गेला नाही. १९४६ च्या जुलै महिन्यांत पावणेचार अब्ज डॉलरचें कर्ज देऊं केलें तेव्हा समजूत अशी होती की, हें कर्ज, इंग्लंडने साडे तीन वर्षांत मिळून थोडथोडें घ्यावें. परंतु पहिल्याच वर्षाच्या आंत इंग्लंडने निम्याअधिक कर्जाची रक्कम उचलली आणि दुसऱ्या वर्षाच्या आंतच उरलेली सर्व रक्कम इंग्लंड घेऊन टाकणार आणि फिरून नवें दुसरें कर्ज मागण्याला हात पुढे करणार !

आधी कर्ज देऊन किंवा घेऊन मग तक्रारी काढीत बसण्याची इंग्लंडची रीत प्रसिद्धच आहे. इंग्लंडने आता अशी तक्रार सुरू केली आहे की, जुलै १९४६ पासूनच अमेरिकन मालाच्या किंमती वाढण्यास सुरुवात झाल्यामुळे त्या प्रमाणाने इंग्लंडच्या पदरांत पडणाऱ्या रकमेचा ऐवज कमी झाला. किमतीच्या कमालीची वाढ पहिल्याच वर्षात झाली म्हणून इंग्लंडला पहिला हप्ता अदमासावाहेर उचलावा लागला.

## घरच्या अडचणी

इंग्लंडला घरच्या अडचणी याच वेळेस उभ्या राहिल्या. मोठी अडचण कोळशाच्या खाणींतील मजुरांचा संप ही ठरली. या संपामुळे इंग्लंडचा निर्यात व्यापार ऐशी कोटि डॉलर्सनी कमी झाला. यामुळे स्वतंत्र रीतीने डॉलर कमी पडले; अर्थात कर्जाच्या रकमेचीच उचल करावी लागली. शिवाय जगभर वाहेर पसरलेल्या ब्रिटिश सैन्याला, विशेषतः जर्मन मुलुखावर वसविलेल्या सैन्याला, धान्यपुरवठा करण्याची जबाबदारी पार पाडावी लागली. या जबाबदाऱ्यांचा खर्चच सत्तर कोटि डॉलर इतका झाला. शिवाय याच काळांत युरोपांतील इतर देशांचा व्यापार सुधारावा तसा सुधारला नाही. तो सुधारता तर अमेरिकेकडून घ्यावें लागणारें कर्ज तितकें कमी झालें

असतें. ब्रिटन स्वतः युरोपला जो माल पुरवतें त्याचा मोबदला डॉलर नाण्यांत मिळत नाही. त्याचा हिशेब युरोपियन नाण्यांतच पटवावा लागतो.

दुष्काळांत तेरावा महिना या म्हणीप्रमाणें इकडे कोळशाच्या खाणींतून निघणारा माल कमी पडला तर तिकडे कधी नव्हे इतका कडक हिवाळा पडून प्रथम बेसुमार वर्फवृष्टि आणि नंतर उन्हें पडूं लागतांच नद्यांना बेसुमार पूर येऊन दहा कोटि डॉलरचें नुकसान झालें.

जुलैनंतर परदेशी व्यापाऱ्यांना स्टर्लिंग पौंडाऐवजी डॉलर मागण्याचा हक्क प्राप्त होईल; त्यामुळे स्वतः अिंग्लंडच्या उपयोगाला येणाऱ्या डॉलरची संख्या कमी होऊन कर्जाऊ घेतलेल्या डॉलरांतून कांही अंशीं दुसऱ्यांची भर करावी लागेल.

शिवाय चौदाशे कोटि पौण्ड स्टर्लिंगचें दुसऱ्याचें (हिंदुस्थान,अीजिप्त) देणें अिंग्लंड लागतें. त्याचा बोजा अिंग्लंडच्या अुरावर आहेच. तो अुतरण्यास अिंग्लंडला अप्रामाणिक बनल्याशिवाय म्हणजे अितकें काय देणें आम्ही लागतों, ती रक्कम तुमची तुम्ही कमी करा, नाही तर आम्ही नाकबूल करूं, असें म्हणण्यास तयार झाल्याशिवाय गत्यंतर नाही.

पहिलें कर्ज अकालीं संपवून फिरून अमेरिकेकडे दुसरें कर्ज मागण्याला तोंड नाही. परंतु तें मागितल्याशिवाय गत्यंतर नाही. मात्र हें कर्ज मागितल्याने हटकून मिळेलच असें नाही. याला राजकीय कारणें आर्थिक कारणांपेक्षा अधिक प्रबळ अशीं आहेत. अमेरिकेच्या प्रेसिडेंटची नवी निवडणूक येत्याच वर्षांत व्हावयाची आहे. तेव्हा प्रे. ट्रूमनला विरोध करणाऱ्या लोकांना हें अेक हत्यार अुपयोगी पडण्याचा संभव आहे. नवीन अुघडलेल्या जगाच्या पेढीकडे कर्ज मागावें तर ती म्हणणार, "विधायक आर्थिक सुधारणेच्या लोकहिताच्या अशा कोणत्या योजना तुम्ही हातीं घेतल्या आहेत म्हणून त्या करिता कर्ज मागतां ?" याला अुत्तर द्यायला अिंग्लंडजवळ नाही. हें कर्ज राजकारणी अुलाढालीवर खर्चण्याला काढतों असें सांगण्याला तोंड नाही. शिवाय कर्ज मिळेल त्याला व्याजहि भारी पडेल. बाहेरून आणण्याच्या मालांत अुद्योगधंदे, कारखाने यांना लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षां अन्नधान्य

असाच माल अधिक. तो आला की खाऊन फस्त व्हावयाचाच; पण तो न आणवावा तर खावें काय ?

घरगुती राजकारणांतहि अिंग्लंडला अशीच अडचणीची स्थिति प्राप्त झाली आहे. मजूर पक्ष निवडणुकीच्या वेळीं अघळपघळ वचनें मतदारांना देऊन वसला. पण तीं निस्तरतांना प्रधानमंडळाच्या नाकीं नव येत आहेत. अिंग्लंडांतल्या कोळशाच्या खाणी, रेल्वे या गोष्टी राष्ट्रीय मालकीच्या करावयाच्या हें धोरण समाजसत्तावादाच्या दृष्टीने गोंडस दिसतें. पण तें पुरें पाडायला पैसा लागतो त्याची वाट काय? खाणींतील मजूर-वर्गाला खूप करण्याच्या दृष्टीने आठवड्यांतील कामाचे दिवस व तास कमी करण्याचें धोरण मंत्रिमंडळाने स्वीकारलें. पण सहा दिवसांच्या ऐवजी पांच दिवसांचा कामगारी आठवडा ठरविला तर सहा दिवसांत होणारें उत्पादन पांच दिवसांच्या कामाने व्हावयास नको काय? एरवी सहा दिवसांचा पगार पांच दिवसांकरिता देऊन कसें परवडेल? हें साधण्याकरिता कामकरी वर्गाला पूर्वी असलेल्या कांही सवलती कमी कराव्या लागल्या. पण तें करतांच फिरून कामगार-विहिणींचा पापड वाकडा ठरला. खोटचा हजेऱ्या भरण्यांत येऊ लागल्या. आजारीपणाचीं खोटीं डॉक्टरी सर्टिफिकिटें पुढे करण्यांत येऊ लागलीं. यामुळे कोळसा कमी निघू लागला व कारखान्यांना जळण कमी पडूं लागलें. मनुष्य कामगारांऐवजी यंत्रसाहाय्याने कोळसा खणून काढणें ही एक युक्ति यावर आहे. पण यंत्रें म्हटलीं म्हणजे फिरून पैशाचा प्रश्न आलाच. शिवाय सर्वच ठिकाणीं यंत्रें चालतील असें या खाणींचें स्वरूप नाही. कोळसा काढण्याचा खर्च दर टनीं १९३८ सालीं तीन डॉलर होता, तो १९४५ सालीं सात डॉलर झाला आहे.

## निर्वाणीचा एकच उपाय

तात्पर्य, या अनेक प्रकारच्या आर्थिक अडचणी, आपत्ति निस्तरावयाच्या तर बाहेर जगभर चालविलेल्या राजकारणी उठाठेवींतून आपलें अंग शक्य तितकें काढून घेणें हा एकच उपाय आहे. पण तें करावें तर इंग्लंडची अब्रू कमी होते आणि अमेरिकेच्या अंगावरचा भार वाढतो. दोनहि गोष्टी कठीणच. पण दुसरे पक्षीं न करून तरी काय?

'वर्ल्ड रिपोर्ट' नामक एका अमेरिकन साप्ताहिकांतील एक लेखक लिहितो:– " निर्वाणीचा उपाय म्हणून इंग्लंडने आंतरराष्ट्रीय व्यवहारांतून आपलें अंग काढून घेतलें पाहिजे. त्यानंतर आपलें पुनरुत्थान व्हावें यासाठी कडक व्यापारी बंधनें आणि आर्थिक नियंत्रणें इंग्लंडला घालून घ्यावीं लागतील. हें उत्तर इतकें खडतर आहे की, जाहीरपणे कोणीच त्यावर चर्चा करण्यास तयार नाही. खाजगी बोलतांना, त्या गोष्टीची आवश्यकता पडणार नाही असें त्यास वाटत नाही. एक वर्षाच्या आंत ब्रिटनला मोठ्या आपत्तीला तोंड द्यावें लागेल त्यासाठी जगाचा नाद सोडून देऊन आपला डॉलरी खर्च कमी करावा लागेल एक, किंवा अमेरिकेचें कर्ज तरी काढावें लागल हें दुसरें! ह्या विकट परिस्थितींत दीर्घकालीन योजना आणि आयत्या वेळच्या तजविजी यांच्या कचाट्यांत अिंग्लंडची मोठी कुतरओढ चाललेली आहे. आणि एकंदर अनुभव पाहतां यांतल्या कोणत्याहि एका बाबतींत इंग्लंडला यशस्वी होण्यासाठी वेळ किंवा कुवत नाही असेंच मत दृढ होत आहे. "

## आर्थिक तूट भरून काढण्याचे दोन मार्ग

केवळ आर्थिक दु:स्थितीमुळें अिंग्लंडला अनेक ठिकाणच्या साम्राज्यांतून अंग काढून घ्यावें लागत आहे. पण तेवढ्यानें भागणारें नाही. अिंग्लंडच्या आर्थिक गरजा व आर्थिक पात्रता यांजमध्ये यंदाच्या सालीं २४०० कोटि डॉलर्सची म्हणजे सुमारे ६।७ शें कोटि पौंडांची, तूट येणारी आहे. असली तूट भरून निघण्याचे मार्ग दोन असतात. (१) जनतेनें आपल्या गरजा कमी कराव्या, कंजुपपणाने राहावयास शिकावें, खरेदी कमी करावी आणि (२) आपलें राष्ट्रीय उत्पादन आणि बहिर्गत निर्यात व्यापार वाढवून स्वदेशांत बाहेरून अधिक पैसा आणावा.यापैकी कोणता मार्ग तावडतोब स्वीकारावा याविषयी स्वत: ब्रिटिश तज्ज्ञांतच मतभेद दिसतो. अुत्पादन वाढवावें तर खाणी व कारखाने जोराने चालले पाहिजेत. पण अिंग्लंडांत अुत्पादन निदान दहा बारा टक्के अितकें अेका वर्षांत वाढवावें अशी प्रधानमंडळाची अिच्छा असतां,त्यांना अुलट कामकऱ्यांच्या कामाचे आठवड्याचे दिवस, व दिवसाचे तास कमी करणें भाग पडत आहे. दिवस व तास कमी

करा म्हणजे त्यानेच कामकऱ्यांच्या अंगीं हुषारी व उत्साह वाढून तो अैनजिनसी उत्पादन पूर्वीच्या प्रमाणापेक्षाहि अधिक वाढवून दाखवील अशीं आश्वासनें कामगार संघानें दिलीं; पण तीं प्रत्यक्ष अनुभवांत अुतरलीं नाहीत. अिंग्लंडच्या सरकारी वार्षिक अंदाजपत्रकांतील जमेची बाजू, युद्धानंतर, सुमारे ७५००,०००,००० अितक्या पौंडांनी कमी झाली आहे. तसेंच बाहेरच्या जगांतील कारखान्यांत घातलेलें भांडवल३७००,०००,००० पौंडांनी कमी झालें आहे. प्राप्तीचा कर दर माणशीं ३४ टक्के अितकें अुत्पन्न खाणार. मग धनोत्पादकाला श्रम करण्याला अुत्साह कसा वाटणार?

परदेशीं ठेवलेल्या सैन्याचा खर्च परस्पर भागेनासा झाला आहे. अितरहि कांही अडचणी आहेतच. जुलै १५ पासून अिंग्लंडने अितर राष्ट्रांवर घातलेली स्टर्लिंगच्या दोरीची गळचेपी ढिली करावी असें ठरलेलें आहे. अितर नाण्यांतून विशेषतः डॉलरमधून किंमती द्याव्या लागतील. अीजिप्त, हिंदुस्थान, अिराक, आयर्लंड, पॅलेस्टाअीन वगैरे देशांची स्टर्लिंग शिल्लक देऊन टाकण्यास सुरुवात करावी लागणार आहे. १९५१ पासून तर अमेरिकन कर्जफेडीला सुरुवात डॉलर नाण्याने केल्यास करावी लागेल. त्याचा वार्षिक हप्ता १६ कोटींचा बसेल. परराष्ट्रीय व्यापार वाढवावयाचा तर परदेशांनी बसविलेल्या जकाती कमी होऊन अनिर्बंध व्यापार वाढला पाहिजे. स्वतः अिंग्लंडनेच हें अनिर्बंध व्यापाराचें धोरण आजवर सुसंगत टिकविलें नव्हतें. पण तें आतां त्याला सुचूं लागलें आहे! या कामीं कॅनडा अिंग्लंडच्या बाजूला राहील. पण ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड तितकींशीं अनुकूल राहणार नाहीत. आणि हिंदुस्थानाला तर प्रथम कांही दिवस सप्रतिबंध व्यापाराचें धोरण स्वीकारून अिंग्लंडच्याहि व्यापारी मालावर संरक्षक जकाती बसवाव्या लागतील. अिंग्लंड व हिंदुस्थान यांजमध्ये होणाऱ्या भावी तहाच्या कलमांत ही अेक वादविवादाची बाब होअून राहण्याचा संभव आहे. कारण हिंदुस्थानांत जुन्या कारखान्यांची सुधारणा व नव्या कारखान्यांची वाढ व्हावी तर,त्यांतून निघणाऱ्या मालावर परदेशी मालाने सवंगतेची कुरघोडी केल्यास कसा निभाव लागणार ? म्हणून टॅरिफ बोर्ड हें खातें अनेक वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत ठेवावें लागणार !

इंग्लंडच्या लोकांनी गतवर्ष फार हालांत काढलें. तिकडे थंडी कधी नव्हे इतकी पडली आणि कोळसा खाणींतून निघण्याचें प्रमाण याच वेळीं खूप घटलें. विजेचे दिवे मिळेनात. मेणबत्त्यांवर व्यवहार करावा लागला. पुढे पाऊसहि बेसुमार पडून पुरांमुळे अतिशय नुकसान झालें. मजुरांचा तुटवडा भरून काढण्याला एक सरळ मार्ग म्हणजे सैन्याच्या नोकरींत गुंतलेले निरुद्योगी लोक कमी करणें. त्याप्रमाणे इंग्लंडने ग्रीस, पॅलेस्टाईन, जपान आणि कांहीसा जर्मनी, यांतील सैन्य कमी करून ते लोक स्वदेशीं आणले. मुलकी कारभारांतीलहि बरेच नोकर–चाकर कमी करून ते कारखानदारीला मिळतील असाहि प्रयत्न चालू आहे. आर्थिक उत्पादन पंचाहत्तर टक्क्यांनी वाढविण्याची आशा इंग्लंडने धरली होती ती फोल ठरली. निर्यात मालाच्या किंमतींत चाळीस कोटि डॉलर इतकी तूट पडली

## राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक सुस्थिति

हिंदुस्थानाला राजकीय स्वातंत्र्य मिळालें. मग त्या बरोबर लगेच आर्थिक सुस्थितीहिं कां मिळूं नये ? निदान हल्लीचें हें सर्वांगीण आर्थिक दैन्य कां नाहीसें होऊ नये? असा प्रश्न सामान्य मनुष्याला सुचतो. परंतु प्रथम त्याला हें सांगावें लागतें की, राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक सुस्थिति यांचा मेळ पडतोच असें नाही. तसें असतें तर गरीब–श्रीमंत हा भेदच स्वतंत्र राष्ट्रांत व्यक्तिस्वातंत्र्य भोगणाऱ्या व्यक्तींमध्ये दिसला नसता. ज्या राष्ट्रांनी आपल्या राज्यघटनेंत मूलभूत हक्क मान्य केले आहेत त्यांत कायद्याच्या राजकीय हक्काच्या दृष्टीने भिक्षाधिपति आणि लक्षाधिपति हे एकाच पातळीवर उभे राहतात हें खरें. परंतु प्रत्यक्ष जीवनांत कुठे लक्षाधीश व कुठे भिक्षा मागून तिजवर जगणारा भिकारी ? समाजसत्तावादी व कम्युनिस्ट अित्यादि ध्येयवादी लोक हाच भेद काढून टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांना तें अजून साध्य झालेलें नाही. आणि पुढेहि केव्हा, आजच्या अितकी आर्थिक विषमता जगांत न उरली तरी, स्वतंत्र माणसांमाणसांतील द्रव्यसंपन्नतेंत थोडा तरी भेद, थोडा तरी कमीजास्तपणा, राहणारच. हिंदुस्थानला आज राजकीय स्वातंत्र्य मिळालें असून त्यांतील प्रजाजनांकरिता हवी तशी राज्यघटनाहि तयार होत आहे.

परंतु तींत श्रीमंत–गरीब हा भेद निघून जाण्याचें प्रत्यक्ष कलम आढळणार नाही. आणि जी गोष्ट राजकीय स्वातंत्र्य भोगणाऱ्या माणसांमाणसांत, तीच गोष्ट राजकीय स्वातंत्र्य भोगणाऱ्या राष्ट्रांराष्ट्रांत दिसून येणार व आज दिसून येत आहेहि. हें सांगण्याचा हेतु हाच की राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक सुस्थिति यांची समव्याप्ति असत नाही. तसेंच अधिक काळ स्वातंत्र्य भोगलेलें राष्ट्र अधिक संपन्न किंवा आर्थिक दृष्टया अधिक सुखी, व अल्पकाळ स्वातंत्र्य भोगणारें राष्ट्र कमी संपन्न व कमी सुखी असाहि मेळ बसत नाही.

हजार पंधराशे वर्षें स्वातंत्र्य भोगलेलें इंग्लंड आणि ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं स्वतंत्र झालेलें हिंदुस्थान दोन्हीहि मुळांत कमी अधिक श्रीमंत असलीं तरी व्यक्तिजीवनाच्या दृष्टीने आज घटकेला सारखींच आर्थिक दुःस्थितींत आहेत असें म्हणतां येईल. आणि चीन, जपान, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, फार काय रशिया, हे देश देखील तीच विवंचना भोगीत आहेत. या सर्व देशांतील राष्ट्रीय संपत्तीचा निरनिराळा हिशेब केला तर तो घाउक आकडा, किंवा त्यांतील प्रत्येक व्यक्तिमात्राच्या संपत्तीच्या सरासरीचा आकडा, हे अर्थातच वेगवेगळे निघतील. परंतु हे आकडे कमी जास्त असले तरी वरील सर्वच देशांत अन्नवस्त्रादि साध्या वस्तूंचें दुर्भिक्ष अितकें एकसारखें माजलें आहे की तें पाहून वाईट वाटतें. या अप्रिय वार्तेचा कदाचित् एकच सदुपयोग म्हणतां येअील, तो हा की ती अैकल्यामुळे हल्लीच्या आपल्या हलाखीचें हिंदुस्थानाला विशेष दुःख होणार नाही ! त्याला हें दिसून येईल की आपणासारखी दुःस्थिति भोगणारीं अितरहि अनेक राष्ट्रें आहेत. आणि फिरून त्यांतहि चिरस्वतंत्र, अल्पस्वतंत्र, जिंकलीं गेलेलीं आणि त्यांबरोवर त्यांना जिंकणारीं अशींहि राष्ट्रें एकाच पंक्तीला बसलेलीं आहेत. लोकांचें दुःख पाहून आपलें दुःख सर्वस्वी नाहीसें होत नाही, हें खरें. पण थोडें हलकें होतें हेंहि खरें. 'स्निग्धजनसंविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति' किंवा 'Social sorrow loses half its pain' अशा म्हणीच आढळतात. जगाचें पाहून आपलें दुःख हलकें मानावें, सोसावें, अशी स्थिति दुर्दैवाने हिंदुस्थानाला आज आली आहे खरी. पैकी हिंदुस्थानांतील दुःस्थितीचें वर्णन करण्याचें कारण नाही. ती आज आपण प्रत्यक्ष भोगतोंच आहों. परंतु अितर देशांची आपणाला फारशी माहिती नसते म्हणून ती थोडी यापुढें देत आहें.

## इतर देशांचें उदाहरण

'वर्ल्ड रिपोर्ट' पत्रांतील रशियाचें खालील वर्णन पहा :–

" मजूर–कामकरी यांच्या वेतनांत फक्त सव्वापट वाढ झाली आहे. परंतु बाजार–किमती दुपटीने वाढल्या आहेत. यामुळे त्याला जीवनरक्षणाला लागणाऱ्या वस्तु विकत घेतां येत नाहींत. सरकारच किंमती चढ्या ठेवण्याला साहाय्य करीत आहे. नुसत्या भाकरी (रोटी) पायीं त्याच्या मजुरीचा तेवीस टक्के पैसा खर्च होतो. मांसादि अन्नालाहि तितकाच खर्च. स्निग्ध पदार्थ दररोज दर माणशीं सव्वा तोळाच मिळतो. पण त्यालाहि तितकाच खर्च येतो. एक खोलीच्या घराला सत्तर रुबल भाडें पडतें. त्यांत फार तर शेगडीचा खर्च बसतो. अडीच शेर बटाट्यांना सोळा रुबल पडतात. पुष्कळ लोकांना अेकच कपडा–पेहराव सात सात वर्षे वापरावा लागत आहे. नवा विकत घेतां येत नाही. नवा घ्यावयाचा तर त्याला आठशें रुबल म्हणजे सात आठवड्यांच्या मजुरीचे पैसे खर्चावे लागतात. एका रेडियोला साडे-तीन महिन्यांचा पगार खर्ची घालावा लागेल. चैनीच्या पदार्थांचें दर्शन नाही. कोणीकडून रोटी मिळूं दे अितक्याचीच मनुष्य आशा करीत असतो."

वास्तविक रशियाने आपल्या ताब्यांतील जर्मनीच्या विभागांतील कारखानदारीचें सांपडेल तें सामान रशियांत नेलें आहे. आणि पूर्वीप्रमाणे कांही नव्या पंचवार्षिक योजनाहि आखून चालू केल्या आहेत. परंतु बाहेर देशाला पाठविण्याला मिळेल अितका विकाऊ माल त्याला आज फारसा उत्पन्न करतां येत नाही. उलट हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे की, रशियावर जर्मनीने स्वारी केली तेव्हा रशियन कारखानदारीचा अितका नाश झाला की, या दुसऱ्या युद्धांत अितर कोणाचाच तितका झाला नसेल.

दक्षिण अमेरिकेची स्थिति मात्र बरी आहे. कारण तिला महायुद्धाची झळ लागली नाही. उलट तिला आपला व्यापार वाढवितां आला. तिला बाहेरच्या व्यापारांत भरमसाट किंमती मिळाल्या. आरजेंटिना हा कृषिप्रधान देश, पण तो आतां कारखाने काढूं लागला आहे. सर्वस्वी स्वावलंबी होऊं पाहात आहे नवे आगगाडीचे रस्ते, तारायंत्रें, टेलिफोन बसवीत आहे. लोकांजवळ

सढळ खर्च करण्याइतका पैसा साचला आहे. ब्राझिल परदेशी मालावरील जकाती वाढवीत आहे. चिली देशाने तांब्याचा व्यापार वाढविला आहे. व्हेनिझुएला फारच भरभराटीच्या स्थितींत आहे.

आशिया खंडांत चीनची स्थिति चांगली नाही. जपानमध्ये हलाखी आहे, तथापि अमेरिकेची मदत घेऊन, जपाननें आपला सुती-रेशमी कापडाचा व्यापार वाढविला आहे. कित्येक कोटि रुपयांचें जपानी कापड हिंदुस्थानाकडे येत आहे. जपानला भलेपणाने वागविण्याचें अमेरिकन सेनापतीचें धोरण फलद्रूप होत आहे. आणि जपान सर्व जुनें साम्राज्य गमावून बसलें तरी चीन व हिंदुस्थान यांपेक्षा तो देश लवकर सावरेल असा अंदाज आहे. जावांतील साखरेची निर्मिति चालू आहे, व फ्रेंच इंडोचायनामध्यें भाताचें पीक चांगलें निघत आहे. परंतु या दोनहि देशांतील युद्ध अद्यापि सर्वस्वी थांबलेलें नाही. यामुळें व्यापारी माल पिकूनहि त्याचा उठाव व्हावा तसा होत नाही. परंतु एकंदरीने कृषिप्रधान अशा पूर्वेकडील या देशांना अन्नधान्याची टंचाई भासत नाही. यामुळे ते देश खाण्यापिण्यापुरते सुखी आहेत असें म्हणतां येईल.

---

स मा प्त

## परिशिष्ट

# हिंदी स्वातंत्र्याचें भविष्य खरें ठरलें !

## श्री. न. चिं. केळकर यांचा वीस वर्षांपूर्वीचा लेख

(लेखक:–श्री. वि. ज. फडणीस, अिचलकरंजी.)

**श्री.** तात्यासाहेब केळकर यांनी 'मौजेचे चार प्रहर' या पुस्तकांत जें ऐतिहासिक भविष्य रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, तो बऱ्याच अंशीं सत्य स्थितींत उतरला आहे, हें सांगावयास मला आनंद वाटतो. सदर बाबतचा लेख दि. १५ ऑगस्ट १९४७ ला म्हणजे स्वातंत्र्य-दिनाच्या दिवशींच सहज माझ्या वाचनांत आला.

सदरचें पुस्तक सन १९३१ सालीं प्रकाशित झालेलें दिसतें. त्यापूर्वी श्री. केळकर यांनी तो लेख केव्हा लिहिला हें समजत नाही. सदरच्या लेखाचें नांव 'शेवटचें लढाऊ जहाज' असें असून श्री. केळकरांनी त्याच्या प्रस्तावनेंत त्यासंबंधाने जो खुलासा केला आहे तो त्यांच्याच शब्दांत खाली देत आहें त्यावरून वाचकांना बोध होईल.

### शेवटचें लढाऊ जहाज

"शेवटचें लढाऊ जहाज—या लेखांत एक ऐतिहासिक भविष्य रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. अिंग्लंड व हिंदुस्थान यांच्या स्थितीची तुलना केली असतां, या लेखांत वर्णिल्यासारखा प्रकार घडणें हें हिंदुस्थानाला स्वराज्य कसें मिळेल या कूट प्रश्नाच्या अनेक उत्तरांपैकी एक आहे. हिंदी लोक स्वराज्य मिळवण्याच्या कामांत अखंड प्रयत्न करतीलच; पण स्वतः अिंग्लंडवर संकटें येणें ही गोष्ट देखील महत्त्वाची आहे व ती जेव्हा जेव्हा घडेल तेव्हा तेव्हा हिंदी राष्ट्राचें पाऊल पुढे पडण्यास मदतच होईल. रोमन साम्राज्याची व ब्रिटिश साम्राज्याची तुलना अिंग्रज लोक हौसेने करतात,

तेव्हा रोमन साम्राज्य नष्ट होण्याच्या वेळच्या त्यांच्यावरील संकटामुळेच खुद्द अिंग्लंडला स्वातंत्र्य लाभलें, तसेंच अिंग्लिश साम्राज्य अितर रीतीनेंहि नष्ट होण्याचें संकट जेव्हा अिंग्लंडवर येईल, तेव्हा अिकडील चळवळीला मदत होऊन हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल असें भविष्य करून, त्याच ऐतिहासिक तुलनेची पूर्तता कोणी केल्यास ती बोधप्रद व्हावी असें वाटतें !"

अिंग्रजानी हिंदुस्थानला नुकतेंच जें स्वातंत्र्य दिलें त्या बाबतींत श्री. केळकर यांनी आपल्या लेखांत आगाऊ कसें भविष्य लिहिलें व तें कितपत खरें ठरलें हें वाचकांनी खालीं लिहिलेल्या त्यांच्याच कांही महत्त्वाच्या उताऱ्यांवरून ठरवावें.

## १९४७ या वर्षाचा उल्लेख

"सन १९४७ हें वर्ष कांही अपूर्व चमत्कार दाखविणार याविषयीं सगळ्या जगांतील तज्ज्ञांचें बहुधा एकमत होतें."

"पण ज्योतिषी किंवा भविष्यवादी यांच्याशिवाय इतर लोकांनाहि वाटे की, १९४७ हें साल कांही तरी विलक्षण घडामोडी करील खास; कारण १९१४ च्या महायुद्धसमाप्तीनंतर ३० वर्षे बिनबोभाट गेलीं. तीस वर्षांचा काळ हें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चरित्रांत एक युग मानतात. तेव्हा ज्योतिष सोडून दिलें तरी व्यवहाराच्या अनुभवानें पाहतां आता नव्या घडामोडीचा काळ आला होता. स्वाभाविक फेरबदलाने प्रबल राष्ट्रें दुर्बल होऊं घातलीं होतीं व दुर्बल प्रबल होऊं घातलीं होतीं. परिस्थितीमुळे जित व जेते यांची अदलाबदल होण्याचा रंग होता."

"हिंदुस्थानांतील लोकहि याच सालाकडे मोठ्या उत्सुकतेने पाहात होते. पण त्यांचीं कारणें मात्र वेगळीं होतीं. त्यांपैकीं सामान्य अशीं वर दिलीं आहेत. पण आणखी कांही थोडीं विशेष होतीं तीं अशीं. १९१७ सालीं स्वराज्याचा जाहीरनामा प्रकट झाला. १९२७ सालीं सायमन कमिशन बसलें. १९३७ सालीं एका लष्कराशिवाय सर्व वरिष्ठ खातीं लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यांत आलीं. अर्थात १९४७ सालीं उरलें तेवढें सर्व स्वराज्य हिंदी लोकांच्या हातीं जावें हा क्रम ठरत नाही काय? याहि

पेक्षां एक सूक्ष्म कारण असें की, १८५७ सालीं बंड झालें व १, ८, ५, ७ या आकड्यांची बेरीज २१ होते तशीच १, ९, ४, ७ या आकड्यांची होते. अर्थात बंडाच्या सालीं घडलें तसलेंच कांहीं तरी या नव्या सालींही घडणार हें खास."

### शेवटच्या व्हाइसरायाची घोषणा

"हिंदुस्थानला स्वातंत्र्यदान करण्यासाठीं त्या वेळचे व्हाइसरॉय Lord Shevetlor लॉर्ड शेवटला (?) यांनी हिंदी पुढाऱ्यांच्या शिष्टमंडळास आपले निवासस्थानीं बोलावलें व त्यांच्याशी वाटाघाट करून स्वातंत्र्य-दानाची घोषणा केली."

"मित्र हो! आजवर तुमच्यांतुमच्यांतले मतभेद कानावर आले म्हणजे आम्हां इंग्रजांना आनंद होई. पण ईश्वरसाक्ष सांगतों, आजचा पहिला दिवस असा की, तुमच्यांतले मतभेद ऐकून इंग्रजांना वाईट वाटतें. तसेंच आजवर तुमच्यांतल्या जहाल लोकांना नांवें ठेवावीं असेच आमचें धोरण ठरलें होतें. मनांतून त्यांची किंमत आम्ही ओळखीत होतों. पण आज ती तोंडाने बोलून दाखविण्याचा सुदिन उगवला खरा. ढोंगीपणामुळे आजवर छातीवर पडलेलें दडपण आज निघालें. प्रामाणिक उद्‌गार तोंडांतून निघाल्याने आजवर धुमसलेली सदसद्‌विवेकबुद्धि देखील मोकळी झाली."

"अमेरिकन इतिहास तुम्हांस माहीतच आहे. मूळ अमेरिकन वसाहत-वाले किती राजनिष्ठ पण सत्ताभिलाषाने इंग्रज मंत्रिमंडळाने कशी दडप-शाही केली व कर वसविले! शेवटीं राजनिष्ठ लोक बंडखोर झाले. युद्ध जुंपलें. अमेरिका स्वतंत्र झाली. इंग्लंडला तिचें स्वातंत्र्य मान्य करावें लागलें. इंग्लंडच्या राजदरबारी पहिल्या अमेरिकन वकिलाची नेमणूक झाली. वकि-लाने आपलें अधिकारपत्र जॉर्ज राजाला सादर करण्याचा दरबार भरला. राजावर कोण तो प्रसंग! पण आम्ही इंग्रज शहाणे आहोंत. जॉर्ज राजाने वकिलाचें स्वागत केलें व म्हणाला, 'एक वसाहत हातची गेली. पण एका स्वतंत्र पराक्रमी राष्ट्राचा कायमचा स्नेह जोडला गेला! अमेरिकेला स्वातंत्र्य-दान करण्याला माझ्याइतका विरोध माझ्या राज्यांत खरोखर दुसऱ्या कोणीहि केला नसेल. पण लक्षांत ठेवा, तुमचें स्वागत मी जितक्या आनंदाने खुल्या दिलाने करीत आहें इतका दुसरा कोणीहि करणार नाही."

"आज हिंदुस्थानच्या लोकांना उद्देशून अशाच अर्थाचे शब्द बोलण्याचा मान मला मिळत आहे हें मी माझें महद्भाग्य समजतों."

"आमचें शेवटचें लढाऊ जहाज निघण्याची वेळ झाली तर माझ्याशी एक वेळ हस्तांदोलन करून जा!"

"सुमारे एका तासाने दूर क्षितिजावर एक लढाऊ जहाजाचें धुराडें इंच दोन इंच दिसत होतें. पण पंधरा मिनिटांनी तेंहि नाहीसें झालें!!"

वरील उताऱ्यांवरून वाचकांना योग्य तो बोध होईलच. अधिक खुलाशासाठी वरील पुस्तक अवश्य वाचावें.

श्री. तात्यासाहेब केळकर यांनी आगाऊ भविष्य जें गोष्टीरूपाने वर्तविलें आहे, त्यांतील बराच भाग सत्य स्थितींत उतरला आहे, असें आज म्हणावयास कांहीच हरकत नाही. याबद्दल त्यांचें मी जाहीरपणें अभिनंदन करीत आहें. (केसरी २२ ऑगस्ट १९४७.)